International Research Fellow Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal
Issue - 291C

# Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology

Chief Editor
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik (M.S.) INDIA

Executive Editor
**Dr. Tejesh Beldar,** Nashikroad (English)
**Dr. Gajanan Wankhede,** Kinwat (Hindi)
**Mrs. Bharati Sonawane,** Bhusawal (Marathi)
**Dr. Rajay Pawar,** Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible, answerable and accountable for their content, citation of sources and the accuracy of their references and bibliographies/references. Editor in chief or the Editorial Board cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights. Any legal issue related to it will be considered in Yeola, Nashik (MS) jurisdiction only.*

***- Chief & Executive Editor***

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

## Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)**
**Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)**
**Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)**
**Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)**

**Co-Editors -**
- **Prof. Mohan S. -** Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva -** Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju –** Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh-** King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar -** BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar -** Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik -** Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh -** Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath-** Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - BoS Member (SPPU), MGV's LVH College, Panchavati-Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi -** Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**
- **Prof. K. M. Waghmare -** Librarian, Anandibai Raorane College, Sawantwadi **[M.S.] India**
- **Prof. Vidya Surve-Borse-** MGV's LVH Arts, Sci. & Com.College, Panchavati-Nashik **[M.S.] India**

**Advisory Board -**
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare -** Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur -** Chairman, BoS, Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**
- **Dr. J. S. More** - BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar-** BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** - Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar -** M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, **Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

'A' Grade NAAC Re-accredited (3rd Cycle)

*Golden Jubilee Celebration of our college and 75 th Independence Day Celebration of India*
''आझादी का अमृत महोत्सव''

# One Day International Multidisciplinary Conference

On

## Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology

Jointly Organzied by

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University Jalgaon**

and

**JDMVP Co. Samaj's Shri S. S. Patil Arts, Shri Bhausaheb T.T. Salunke Commerce and Shri G.R. Pandit Science College,**

(Nutan Maratha College), Jalgaon 425001 (Maharashtra - India)

**9th April 2022 (Saturday) Time : 10 am to 5 pm**

Organizer
**Principal Dr. L. P. Deshmukh**

Organizing Secretary
**Prof. B.C.Patil**

Convener
**Prof. Dr. A.Y.Badgujar**

**EDITORIAL POLICIES**-Views expressed in the papers/ articles and other matter published in this issue are those of the respective authors. The editor and associate editors does not accept any responsibility and do not necessarily agree with the views expressed in the articles. All copyrights are respected. Every effort is made to acknowledge source material relied upon or referred to, but the Editorial Board and Publishers does not accept any responsibility for any inadvertent omissions.

# INDEX


| No. | Title of the Paper's and Author's | Page No. |
|---|---|---|
| १ | मराठी साहित्य आणि संस्कृती<br>- *प्रा. डॉ. वाल्मिक शंकर आढावे* | ०१ |
| २ | ग्रामीण साहित्य आणि महानगरीय साहित्य यातील अनुबंध इतिहास<br>- *प्रा. आशा विठ्ठल पाटील* | ०४ |
| ३ | कोविड काळात क्रीडा क्षेत्रावर झालेला परिणाम<br>- *प्रा. डॉ. संतोष बडगुजर* | ११ |
| ४ | आदिवासींच्या आर्थिक विकासात वन उत्पादने आणि वनयोजना<br>- *भाग्यश्री सदाशिवराव होले* | १४ |
| ५ | भारतीय नव-आध्यात्मिक संघटनांतील महिला वैभूतिक नेतृत्व<br>- *प्रा. भालचंद्र देविदास पाटील, प्रा. डॉ. दिलीप राजाराम चव्हाण.* | १७ |
| ६ | मराठी साहित्य आणि संस्कृती<br>- *प्रा. देशमुख सुरेखा विठ्ठल* | २१ |
| ७ | ''युक्रेन'' यूरोपचे अफगणिस्तान बनण्याच्या मार्गावर<br>- *धनंजय गंगाराम रायसिंग* | २३ |
| ८ | नवीन शैक्षणिक धोरण आणि भारतीय समाज<br>- *धर्मा हिम्मत कोळी* | २५ |
| ९ | सायबर गुन्हेगारी : दक्षता व उपाययोजना<br>- *प्रा. डॉ. दिलीप आर. चव्हाण* | ३० |
| १० | सातपुड्यातील आदिवासी संस्कृती आणि लोकजीवन<br>- *प्रा. साळवे कल्पना सुदास* | ३४ |
| ११ | स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातील महिलांचे राजकीय स्थान : विशेष संदर्भ महाराष्ट्र<br>- *डॉ. माधव केरबा वाघमारे* | ३६ |
| १२ | कोविड १९ चा महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम<br>- *कु. मनिषा राजेंद्र पारधी* | ३९ |
| १३ | ब्रिटिश प्रशासकीय दडपशाहीच्या विरोधाला न जुमानता मिठाच्या सत्याग्रहात सहभागी जळगाव जिल्ह्यातील सत्याग्रहींनी नोंदविलेल्या प्रतिक्रिया<br>- *मनोहर रूपचंद शिंदे, प्रा. डॉ. धनंजय रमाकांत चौधरी* | ४२ |
| १४ | नवीन शैक्षणिक धोरण व भारतीय समाज<br>- *डॉ. मुरलीधर पंडित गायकवाड* | ४५ |
| १५ | जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत स्त्रियांच्या उच्च शिक्षणात येणाऱ्या वेगवेगळ्या समस्या व त्यांच्या पुढील आव्हाने<br>- *डॉ. साहेब विरभद्राव पडलवार* | ४९ |
| १६ | अरविंद नारखेडे यांच्या साहित्यातील सामाजिक जीवनमुल्य आणि जाणीव<br>- *डॉ. रेखा पाटील, डॉ. सिंधू भंगाळे, श्री. संदीप मोतीराम पाटील* | ५४ |

| | | |
|---|---|---|
| १७ | गौरी देशपांडे यांच्या कथेमधील अभिव्यक्ती शैली<br>*- प्रा. रिना भाऊराव पवार* | ५८ |
| १८ | नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी पावरा जमातीचे आर्थिक जीवन एक अभ्यास<br>*- सुनील रोलजी खर्डे, प्रो. डॉ. खासेराव हिंमतराव पाटील* | ६० |
| १९ | २१ व्या शतकातील सार्वजनिक ग्रंथालयाचे आव्हाने आणि संधी<br>*- श्री. विजय कडू वाडे, प्रा. डॉ. चंद्रशेखर डी. वाणी* | ६२ |
| २० | ऑनलाइन विपणन, आधुनिक काळाची गरज<br>*- प्रा. आर. जी. बडगुजर* | ६९ |
| २१ | मिश्रित शिक्षण<br>*- लक्ष्मी सदाशिव कदमबांडे* | ७७ |
| २२ | महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील तंत्रविज्ञान वापर एक अभ्यास<br>*- सौ. क्रांती संदेश क्षीरसागर* | ८२ |
| २३ | कोविड- १९ चा भारतीय शेतीवरील परिणाम<br>*- प्रा. शुभम मनोहर सुरवाडे, प्रा. डॉ. जयश्री पुरोषोत्तम सरोदे* | ८५ |
| २४ | Covid-१९ च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्याच्या ऑनलाईन खरेदीच्या वर्तणुकीवर झालेल्या बदलांचा तुलनात्मक अभ्यास<br>*- सरला कडू महाले* | ८९ |
| २५ | म. गांधींच्या सत्य आणि अहिंसेची प्रासंगिकता<br>*- प्रा.भालचंद्र देशमुख* | ९२ |
| २६ | भारतीय राजकारणात प्रसार माध्यमांची भूमिका : एक अध्ययन<br>*- कु. देशमुख पौर्णिमा लक्ष्मण* | ९४ |
| २७ | शीतयुद्धत्तर काळात व्यापारी संघाचे वाढलेल्या महत्त्वाचे विश्लेषणात्मक अध्ययन<br>*- कु. देशमुख पौर्णिमा लक्ष्मण* | ९९ |
| २८ | खानदेशातील जंगल सत्याग्रह आदिवासींचा सहभाग- १९२०-१९४७<br>*- प्रो. डॉ. जुगलकिशोर वि. दुबे* | १०३ |
| २९ | धडगाव तालुक्यातील आदिवासी भिल्ल बोलीभाषा (नंदुरबार जिल्हा)<br>*- सहा. प्रा. राकेश गोरसे* | १०७ |
| ३० | संसदीय लोकशाहीची वाटचाल : महाराष्ट्राचा विशेष संदर्भ<br>*- श्री. पी. एन कपले, श्री. डॉ. श्रीराम येरणकर* | ११० |
| ३१ | भारतीय इतिहासातील स्त्रियांची कामगिरी<br>*- प्रा. संतोष पंढरीनाथ कारभारी, प्रा. शैलेश कुशेंद्र भालेराव* | ११४ |
| ३२ | रशिया युक्रेन वाद व त्याचा भारतावर तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणावर होणारा परिणाम<br>*- प्रा. मुंडे रविकांत प्रकाशराव* | ११७ |
| ३३ | नंदुरबार जिल्ह्यातील भिल्ल जमातीतील स्त्रीच्या समाजशील अभ्यास<br>*- सहा.प्रा. पराडके विनोद कागडा* | १२० |
| ३४ | पाटणच्या लढाईत मराठा सरदार महादजी शिंदे यांनी अवलंबलेली यशस्वी युद्धनीती<br>*- घन:शाम गंगाराम पाटील, प्रा. डॉ. लक्ष्मण पोपटराव वाघ* | १२२ |
| ३५ | रशिया-युक्रेन युद्धाचे युक्रेन देशातील पर्यावरणावर झालेला परिणाम<br>*- प्रा. वैशाली मोतीलाल सपकाळे* | १२४ |

| | | |
|---|---|---|
| ३६ | **भारताचा स्वातंत्र्य लढा आणि खानदेशातील राष्ट्रवाद**<br>*- श्री. शिवाजी देविदास सुर्यवंशी, प्राचार्य. डॉ. पी. एस. सोनवणे* | १२६ |
| ३७ | **संस्कृती आणि साहित्य अनुबंध**<br>*- प्रा. डॉ. सुषमा विश्वरत्न तायडे (अहिरे), प्रा. डॉ. के. के. अहिरे* | १२८ |
| ३८ | **जागतिकीकरण आणि उत्तम कांबळे यांच्या कवितेतील महानगरीय जाणीव**<br>*- प्रा. सौ. ललिता सिद्धार्थ हिंगोणेकर* | १३१ |
| ३९ | **कोकायना कोंबडा कुकुचकु या अहिराणी गीताचा आशय आविष्कार विशेष**<br>*- प्रा रत्नाकर खंडू कोळी* | १३५ |
| ४० | **शेती व शेतकरी समस्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी, एक अध्ययन**<br>*- डॉ. बामणे एम. एम.* | १३८ |
| ४१ | **भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मॅडम भिकाजी कामा यांचा सहभाग- एक ऐतिहासिक अभ्यास**<br>*- सौ. वंदना एम. पाटील* | १४१ |
| ४२ | **नव्वदोत्तरी महानगरीय आणि ग्रामीण कवितेचा अनुबंध**<br>*- प्रा. डॉ. सत्यजित बळीराम साळवे* | १४३ |
| ४३ | **सातपुड्यातील भिल्ल आदिवासींचे समाज जीवन (विशेष संदर्भ नंदुरबार जिल्हा)**<br>*- सहा. प्रा.करणसिंग. टी.वळवी* | १४८ |
| ४४ | **उद्योजकता विकास : एक नावीन्यपूर्ण, सर्जनशील आणि नफा कमावण्याची प्रक्रिया**<br>*- डॉ. कोल्हे गोपाळ गोरख, योगेश सुरेश पाटील* | १५१ |

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal*
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# मराठी साहित्य आणि संस्कृती

**प्रा. डॉ. वाल्मिक शंकर आढावे**
सहयोगी प्राध्यापक,
स्व. अण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी ता. साक्री, जि. धुळे

**प्रस्तावना –**

संस्कृतीच्या अभिव्यक्तीचे भाषिक रुप म्हणजे साहित्य असे म्हणण्यात साहित्य आणि संस्कृती यांचा अनन्यसाधारण संबंध स्पष्ट होतो. सांस्कृतिक दृष्टीकोन विविध असले तरी त्यांचा संबंध संस्कृतीशी आहे. आपले वर्तमानातील सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन भौतिक आणि अभौतिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत अपरिहार्यपणे ओढले जाते. संस्कृतीचा संबंध हा भौतिक सृष्टीशी असतो. आपल्या दैनंदिन जीवनाला सुसह्य करणाऱ्या अनेक वस्तु, यंत्रे, अस्त्रे मानवाने निर्मिले. या वस्तुनिर्मितीमध्ये त्याने त्याचे पारंपरिक ज्ञान, कौशल्य अधिकाधिक प्रगत करीत वापरले. त्यातून भौतिक सृष्टी अधिकाधिक बदलत गेली. याच वास्तवधिष्ठित सामग्रीचा उपयोग साहित्यातून वास्तवसृष्टी निर्मिताना केला जातो. त्यामुळे साहित्यातील शब्दसृष्टीचा संबंध इंद्रियगोचर भौतिक सृष्टीशी येतो. या अर्थाने साहित्य आणि संस्कृती यांचा अतुट संबंध असतो. लोकांना नवनवे शिक्षण देण्याची, ज्ञान देण्याची, त्यांचे कौशल्य विकसित करण्याची प्रक्रिया ज्या समाजात चालू असते तो समाज अधिक प्रगती साध्य करतो. या प्रक्रियेत संस्कृती अधिक परिवर्तनशील असावी लागते. काळानुसार परिवर्तनशीलता असणे हे संस्कृतीचे महत्त्वाचे लक्षण असते. संस्कृती परिवर्तनशील नसेल तर संस्कृती-उपसंस्कृतीमध्ये संघर्ष होतात. संस्कृती परिवर्तनशील असेल तर समाजाची उन्नती होते. ज्या संस्कृतीने अशी उन्नती साध्य केली आहे त्या समाजाचे साहित्य उन्नत होते. समाज कृतीशील व परिवर्तनशील व्हायचा असेल तर प्रबोधनाची-उद्बोधनाची प्रक्रिया सातत्यपूर्ण असावी लागते. संस्कृतीची जडण-घडण आणि परिवर्तन प्रक्रिया प्रबोधन-उद्बोधनावर अवलंबून असते. संस्कृतीच्या अशा जडणघडण प्रक्रियेत साहित्य महत्वाची भूमिका पार पाडत असते. साहित्य आणि संस्कृती यांचा अन्वय यामुळे महत्वाचा ठरतो. आजही ग्रामीण भागातील समाजमनावर संत साहित्य, पारंपरिक लोकगीते, लोककथा, शाहिरी वाङ्मय यांची आवड अधिक आहे याचे कारण तेथील समाज-माणसांमध्ये संस्कृतीत आहे. प्रा. रा. ग. जाधव यांनी 'संस्कृती भाषा साहित्य' याचा अन्वयार्थ मांडतांना म्हटले आहे की, ''भाषा हे साहित्येतर माध्यम आणि साहित्यिक हा समाजाचा घटक. यामुळे संस्कृती-निरपेक्ष अशी साहित्यकृती असणे शक्य नाही.''[१] खरोखरच साहित्यातून संस्कृतीचे रुप व्यक्त होते. साहित्याद्वारा मानवी मन आणि सामाजिक मन घडविण्याचे कार्य घडते. संस्कृतीचा प्रभाव साहित्याच्या जडणघडणीवर होतो तसाच प्रभाव साहित्याचाही संस्कृतीच्या जडणघडणीवर होतो.

**मराठी साहित्य आणि संस्कृती –**

भारतामध्ये विविध जाती, धर्माचे, पंथाचे, वंशाचे लोक एकत्र राहतात. त्यातून त्यांची एक विशिष्ट संस्कृती निर्माण झाली. भारतीय संस्कृतीमध्ये विविधता दिसून येते. सण, उत्सव, पेहराव, चालीरिती, रुढी, परंपरा, रीतिरिवाज बोलीभाषा यामध्ये भिन्नता आहे. परंतु त्या सर्वांना एकत्र ठेवणारी जीवन पद्धत म्हणजे भारतीय संस्कृती होय. मराठी संस्कृती जोपासण्यात वारकरी संप्रदयाचे फार मोठे योगदान आहे. अध्यात्म, परोपकार, सेवा, मानवता, समानता या मूल्यांची सांगड घालत उज्वल परंपरा निर्माण केली आहे. प्रसिद्ध विचारवंत डॉ. सदानंद मोरे 'वारकरी संप्रदाय आणि साहित्य या लेखात म्हणतात, ''मराठी भाषा आणि संस्कृती यांचा अभ्यास करतांना वारकरी संप्रदाय महत्वाचा वाटतो, कारण या संप्रदायाने भाषा संस्कृती आणि साहित्याच्या अभिवृद्धीस हातभार लावला आहे. सामाजिक जीवनात अहिंसा, शांततामय सहजीवन, समानता, निर्व्यसनीपणा अशी मूल्ये रुजवण्यात महत्वाची कामगिरी बजावली आहे.''[२] संस्कृती आणि साहित्य यास वेगळे करता येत नाही. जशी संस्कृती तसे साहित्य निर्माण होते. साहित्याचा अभ्यास करताना त्यांची सांस्कृतिक पार्श्वभूमी समजावून घेणे महत्वाचे असते. संस्कृती म्हणजे समाजाने घालून दिलेले लिखित किंवा अलिखित नियम होय. श्री. के. रं. शिरवाडकर म्हणतात, ''संस्कृती म्हणजे माणसाची विशिष्ट जीवन पद्धती, परस्परांशी वागणे, व्यवहार निती, कायदे, कला साहित्य इ. अनेक गोष्टीतून आपली वैशिष्ट्यपूर्ण जीवनपद्धती स्पष्ट होते.''[३] यावरून साहित्य आणि संस्कृती याचे महत्व लक्षात येते. संस्कृती म्हणजे संस्कारमय जीवन जगण्याची पद्धत होय.

ग्रामीण साहित्यातून ग्रामसंस्कृती व समाजाची ओळख होते. ग्रामीण बोली, सण, उत्सव, यात्रा, कृषीप्रधान संस्कृती, गावगाडा, राजकारण, बेकारी, भ्रष्टाचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, सावकारी फास, कर्जबाजारीपणा याचे वास्तव चित्रण ग्रामीण साहित्यातून घडते. खेड्यागावातील व्यथा, वेदना, दुष्काळ, महापूर, नैसर्गिक आपत्ती यामुळे शेतकऱ्यांची होणारी दैन्य अवस्था ग्रामीण साहित्यातून चित्रित झालेली आहे. समकालीन परिस्थितीचा प्रभाव साहित्यावर होतो. ग्रामसंस्कृती मध्ये झालेले परिवर्तन साहित्याच्या माध्यमातून चित्रित होताना आढळते. आनंद यादवांच्या 'गोतावळा' या साहित्यकृतीमध्ये पारंपरिक संस्कृती आणि आधुनिक यंत्रयुग यांच्यातील संघर्ष प्रकर्षान जाणवतो. दोन संस्कृती मधील संघर्ष या कादंबरीत आलेला आहे. या कादंबरीत पारंपरिक संस्कृतीचे प्रतिनिधित्व नारबा करतो. शेतमळ्यातील प्राणी विश्वाचा गोतावळा हा नारबाचा जीवाभावाचा सोबती आहे. इथे चालणाऱ्या जीवनाला एक सांस्कृतिक वारसा आहे जी या संस्कृतीत बैलांच्या खांद्यावरती शेती-संस्कृतीचे जोखड होते. बैलांच्या कष्टावर शेती केली जात होती. वर्षभर कष्ट करणाऱ्या बैलाची पोळ्याच्या दिवशी बसवराज म्हणून पूजा केली जाते. ही पारंपरिक संस्कृती त्यात माणसाच्या भावनिक नात्याला प्राधान्य दिलेले दिसून येते. यंत्रयुगामुळे शेतावर कामासाठी ट्रॅक्टरचा वापर सुरु होतो. शेतीकडे पाहाण्याची दृष्टी बदलते. गोठ्यातील एक-एक जनावर विकले जातात. त्यांची उपयुक्तता संपून त्याकडे पाहाण्याचा दृष्टीकोन बदलतो. प्रत्येक गोष्टीचे मूल्य पैशांमध्ये तोलले जाते. जुनापाना पिंपळही मालक विकून टाकतो. तो तोडतांना नारबा हवालदिल होतो. पारंपरिक संस्कृतीचे प्रतिक म्हणून पिंपळाकडे पाहिले जाते. यंत्रयुगामुळे पारंपरिक गोष्टींचे मूल्य कमी होत जाते. यातच पारंपरिक

व आधुनिक संस्कृतीचा संघर्ष या कादंबरीत आढळतो.

समाज परिवर्तनाचे चित्रण करणारी नामदेव कांबळे यांची 'राघववेळ' ही कादंबरी होय. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर आणि कृषी संस्कृतीवर अवलंबून असलेले कारू नारू या सर्वांचेच चित्र या कादंबरीत व्यक्त होते. कृषिसंस्कृती हा या ठिकाणचा कणा आहे. इथला माणूस शेतीसंस्कृतीशी जोडला गेलेला आहे. प्रत्येक हंगामात घेतल्या जाणाऱ्या पिकांवर इथल्या सगळ्याच माणसांचं जगणं अवलंबून आहे. पावसाचा लहरीपणा इथल्या मानवी जीवनाला हैराण करतो. चांगला पाऊस झाला तरच जगण्याला अर्थ अशी ग्रामीण भागातली परिस्थिती आहे. निसर्गावर अवलंबून असलेली शेती व्यवसाय बिनभरोशाचा आहे. जगण्याच्या आणि माणुसकीच्या ओलाव्याच्या असीम धाग्याने इथला माणूस तगून राहतो. विशेषकरून ग्रामीण जीवनातील सण, यात्रा, उत्सव यांची रचनाच कृषी संस्कृतीला पूरक अशी केलेली असते. शेतकऱ्यांच्या जीवनात अविरत कष्टाच्या कामातून सणवारांच्या निमित्ताने तेवढी उसंत मिळते. यानिमित्ताने आनंद व्यक्त करता येतो. ग्रामीण समाज जीवनात सांस्कृतिक जीवनाला एक विशिष्ट स्थान असते. त्याचबरोबर मातंग समाजालाही स्वत:ची अशी वेगळी संस्कृती लाभलेली असते. त्याचेही तपशीलवार चित्रण नामदेव कांबळे यांनी केले आहे. यावरून सिद्ध होते की, साहित्य आणि संस्कृती यांचा परस्परसंबंध असतो.

एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मानवाने निर्माण केलेले ज्ञान, विश्वास, कला, कौशल्य आदी निरंतर संक्रमण होता. प्रत्येक समुहाने हे निश्चित केलेली जीवनरीत प्रवेशानुरुप निर्माण झालेली असते. या जीवन पद्धतीवर भौगोलिक स्थितीचा, पर्यावरणाचा निश्चित स्वरुपांचा परिणाम झालेला असतो. त्यानुरुप संस्कृतीला वेगळे परिमाणही लाभते. त्यातून सामाजिक वारसा निर्माण होत जातात. भूक लागल्यावर जेवणे म्हणजे प्रकृती. भूक लागल्यावर सोबत असणाऱ्याना सोडून जेवणे म्हणजे विकृती आणि सर्वांना विभागून जेवणे म्हणजे संस्कृती. प्रकृती म्हणजे निसर्ग आणि त्यावर संस्कार करणे म्हणजे संस्कृती. प्रकृतीला विकार झाला तर विकृती येते. ही विकृती येऊ नये यासाठी संस्काराची गरज असते. संस्कृतीचे सार्वभौमत्व असते. प्रत्येक मानवसमुह वेगवेगळी संस्कृती निर्माण करतो. याचे सुरेख चित्रण मराठी साहित्यकृतीत आढळते.

संस्कृती या शब्दाचा अर्थ व्यापक आहे. कोणत्याही समाजाची संस्कृती त्याच्या जगण्याच्या पद्धतीशी निगडित असते. हजारो वर्ष संस्कृती घडत असते, परंपरा निर्माण करीत असते. तिच्यातून समाजाच्या रीती, रुढी, रिवाज, पद्धती निर्माण होत असतात. संस्कृती दुसऱ्या समाजाची उसनी आणता येत नाही. आणली तर ती मुळ स्वरुपात येऊ शकत नाही. इथल्या परंपरागत समाजमांडणीशी तिला संघर्ष करावा लागतो. हा संघर्ष करता करता रासायनिक प्रक्रियेप्रमाणे हा संघर्ष चालून दोन्हीही संस्कृतीचे घटक बदलून जातात आणि नवी संस्कृती आकाराला येते.''[४] संस्कृतीचे काही घटक स्थित तर काही बदलणारे असतात. उदा. भौगोलिक रचना, निसर्ग, हवामान, धर्म इ. स्थिर असतात. तर मानव त्याचे उद्योगधंदे, विज्ञान, जीवनविषयक नवे तत्वज्ञान, बाहेरच्या संस्कृतीचे आगमन, कायदे, व्यवस्था इ. घटक बदलते व गतिशील असतात. या गतीशील घटकांनी संस्कृती प्रवाही होऊन स्थिर घटकांनी तिचा सांधा परंपरेशी पक्का निगडित राहतो.

ग्रामीण समाजरचनेत स्वातंत्र्यपूर्वकाळापर्यंत मुस्लीम व ब्रिटिश काळात तसेच नवनव्या धर्मसंप्रदायाच्या काळात किरकोळ बदल झालेले असले तरी त्यांच्यामुळे ग्रामसमाजरचनेच्या आत्म्याला फारसा ढळ पोचला नाही. पण स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही, निवडणूका, पंचवार्षिक योजना सुधारणा, शिक्षण व्यवस्था, नवी जीवनदृष्टी यांच्यामुळे ग्रामीण समाजात मार्ग बदल झालेला दिसून येतो. ''जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत असे सत्तेचे विकेंद्रीकरण झाले. जुनी ग्रामव्यवस्था मोडकळीस येऊन नवीन पंचायत व्यवस्था आली. राजकारण गावागावात जाऊन पोहचले. गावागावात राजकारणाचे दोन तट पडले. त्यामधून सत्तेच्या सारीपाटावरील आणि विरोधकांच्या रुपात काम करणारी मंडळी यांचे चित्र विश्वास पाटील यांनी 'पांगिरा' या कादंबरीत मांडले आहे.''[५]

'पांगिरा' कादंबरीतील पांगिरा गावचा सरपंच धूर्त, स्वार्थी, राजकारणी असतो. आमदार बाबा सावंत यांच्या गटाला धरून राहतो. त्यांची मर्जी सांभाळतो. दूध डेअरी काढून त्यामध्ये तो भष्टाचार करतो. गावातील दुध डेअरीची इमारत, नळपाणी योजना, ग्रामपंचायत यामध्ये जमेल तसा भ्रष्टाचार करून पैसे उचलतो. सत्ता एकहाती ठेवतो. मुरार पाटील विरोध करतो. त्याला मात्र खडतर प्रसंगाला सामोरे जावे लागते. गटातटाचे राजकारण विश्वास पाटील यांनी 'पांगिरा' कादंबरीत रेखाटलेले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण संस्कृतीत झालेले परिवर्तन विश्वास पाटील यांनी चित्रित केले आहे. ही कादंबरीत वाचत असताना राजकारण आणि भ्रष्टाचार यांचा जवळचा संबंध आहे का? असा प्रश्न वाचकांच्या मनात निर्माण होतो. काळ बदलला की समाज बदलतो. समाजाचे ध्येय धोरणे बदलतात. बदल विधायक स्वरुपाचा झाला तर समाजाची प्रगती होते. मात्र स्वार्थी दृष्टीकोनामुळे आणि स्वत:चे कल्याण कसे करता येईल या दृष्टीकोनामुळे संबंध ग्रामव्यवस्था वेठीस धरणारे महाभाग लोकशाही व्यवस्थेतही निर्माण होतात याचे सुरेख चित्रण पांगिरा कादंबरीत आले आहे. यावरून साहित्य आणि संस्कृती यांचा जवळचा अनुबंध असतो.

**सारांश –**

मानवी व्यवहारातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रम मानवनिर्मिती 'संस्कृती' नियंत्रित करीत असते. संस्कृती संकल्पना अमूर्त आहे. या संकल्पनेने मानवी जीवन संपूर्ण व्यापून टाकले आहे. संस्कृती या संकल्पनेत भौतिक आणि अभौतिक बाबींचा समावेश होतो. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाणारा सांस्कृतिक ठेवा हा सामजिक वारसा असतो याचे प्रतिबिंब साहित्यातून होते. काळानुसार समाजजीवनात बदल होतो. मध्ययुगीन काळातील समाजजीवन आपल्याला संत, पंत आणि तंत साहित्यात आढळते. त्या काळातील सांस्कृतिक जीवन या साहित्यकृतीत आलेले आहे. आधुनिक काळात ग्रामव्यवस्थेत बदल झाला. ग्रामसंस्कृतीत झालेला बदल ग्रामीण साहित्यकृतीत आढळतो. संस्कृती म्हणजे समाजाने घालून दिलेले अलिखित नियम होय. जशी संस्कृती तसेच साहित्य निर्माण होते. संस्कृतीचा साहित्यावर आणि साहित्याचा सांस्कृतिक जीवनप्रणालीवर परिणाम होतो. साहित्याच्या जडणघडणीवर संस्कृती प्रभाव पडतो. म्हणून साहित्य आणि संस्कृतीचा अनुबंध दिसून येतो.

**निष्कर्ष –**

१. साहित्य आणि संस्कृती यांचा परस्परसंबंध असतो.
२. समाजातील नैतिक मूल्य जोपासण्याचे काम साहित्य आणि संस्कृती करते.

३. मानवी जीवनव्यवहार जीवनपद्धती, जीवन जगण्याची पद्धत संस्कृतीमध्ये समाविष्ट होतात. त्याचे प्रतिबिंब साहित्यात पडते.
४. साहित्यातून बदलत्या ग्रामसंस्कृतीचे चित्रण आढळते.
५. संस्कृतीचा संबंध भौतिक आणि अभौतिक जीवनप्रणालीशी असतो. सांस्कृतिक जडणघडणीचा प्रभाव साहित्यावर होतो.

**संदर्भ**

१) डॉ. लुलेकर, डॉ. तुपे 'साहित्याचे सांस्कृतिक संचित', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर-२००५, पृष्ठ क्र. २९.
२) डॉ. मोरे सदानंद (लेख-वारकरी संप्रदाय आणि साहित्य), संत साहित्य आकलन आणि अध्यापन, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती, डिसेंबर-२०११, पृष्ठ क्र. १९४
३) शिरवाडकर के. रं., संस्कृती समाज आणि साहित्य, पद्मगंधा प्रकाशन, पृष्ठ क्र. ३०
४) यादव आनंद, मराठी साहित्य समाज आणि संस्कृती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृष्ठ क्र. ११४
५) डॉ. पाटील तानाजी, मराठी कादंबरी : समीक्षा, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती-२००९, पृष्ठ क्र. ८९

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# ग्रामीण साहित्य आणि महानगरीय साहित्य यातील अनुबंध इतिहास

**प्रा. आशा विठ्ठल पाटील**
विवेकानंद प्रतिष्ठान पुरस्कृत के. ए. के. पी. वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, जळगाव
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

**सारांश –**

ग्रामीण साहित्य आणि महानगरीय साहित्य यातील अनुबंध हा या दोन्ही साहित्य प्रकारात निर्माण झालेले आणि प्रसिद्धीस आलेले साहित्यप्रकारातून दाखविता येतो. ग्रामीण जीवनातील व्यथा-वेदना, संघर्ष, राजकारण,कृषी जीवन, सण-उत्सव, सांस्कृतिक खेळ या सर्व गोष्टी शब्दबद्ध करण्यात आले आहेत. संवेदनशील, सर्जनशील तरुणपिढी आपले जीवनानुभव ग्रामीण साहित्याच्या माध्यमातून मांडतांना दिसून येते. ग्रामनिष्ट जाणीवा व्यक्त करणे,कृषिनिष्ठ संस्कृतीचा कलात्मक आविष्कार करणे, ग्रामीण माणूस आणि निसर्ग यांच्या संबंधाचा शोध घेणे, ग्रामीण समाजाची व्यामिश्रता स्पष्ट करणे, बदलत्या खेड्यांचा वेध घेणे, आधुनिक ग्रामीण समाजातील परिणाम अभ्यासणे, ग्रामीण समाज आणि तेथील राजकारण या निकषांच्या आधाराने ग्रामीण साहित्याचा सखोल अभ्यास करता येईल. स्वातंत्र्योत्तर काळात म्हणजेच साठोत्तरी साहित्य प्रवासात ग्रामीण कादंबरी आणि महानगरीय कादंबरी यांचा प्रवेश झालेला दिसून येतो. ग्रामीण साहित्य आणि महानगरीय साहित्य या दोन्हीमध्ये भेद दिसून येत असला तरी या दोन्ही साहित्यप्रकारात समकालीन परिस्थितीत लिखाण केलेले आढळून येते. प्रस्तुत लेखात ग्रामीण साहित्य आणि महानगरीय साहित्य यातील अनुबंध इतिहास अभ्यासताना ग्रामीण साहित्य आणि महानगरीय साहित्य यांच्या संकल्पना तसेच ग्रामीण आणि नागर यातील भेद स्पष्ट करून ग्रामीण आणि महानगरीय साहित्यातील अनुबंध कथा, कविता, कादंबरी, नियतकालिके या साहित्य प्रकारांच्या अंगाने विश्लेषण केलेले आहे.यासाठी तुलनात्मक संशोधन अभ्यास पद्धतीचा वापर केला आहे. ग्रामीण साहित्यात लेखक कवी यांनी भरपूर असे लेखन केलेले आढळून येते. मात्र महानगरीय साहित्य लिखाणात मोजकेच लेखन असलेले दिसून आले. ग्रामीण साहित्य म्हणजे कृषिनिष्ठ अथवा कृषी संस्कृतीचे प्रतिबिंब पडलेले साहित्य होय. तसेच महानगरात एकत्रित झालेले विविध लोकसमूह त्यांची रूपे, नवीन जीवन शैली, परंपरा, चालीरीती या सर्वांचे चित्रण ज्या साहित्यात दिसते ते म्हणजे महानगरीय साहित्य होय. ग्रामीण आणि नागरी समाजाचे वेगळेपण व्यवसाय, पर्यावरण, लोकसंख्या, सामाजिक स्थिती या माध्यमातून स्पष्ट करता येते. ग्रामीण समाजातील जातिभेद, सामाजिक रूढी, परंपरा व ग्रामीण समाज व मानवी जीवन यांचे प्रत्ययकारी दर्शन ग्रामीण साहित्यात दिसून येते. त्याचप्रमाणे महानगरीय आधुनिक जीवन पद्धतीत आयुष्य व्यतीत करणारे यंत्रयुगीन समाज आणि मध्यमवर्गीयांचे किरटे जीवन किती भयावह असते हे महानगरीय साहित्यात निदर्शनास येते.

**प्रस्तावना –**

ग्रामीण आणि नागरी या दोन संज्ञा कधी निर्माण झाल्या हे स्पष्टपणे सांगणे अवघड आहे. असे असले तरी या संज्ञानी ध्वनित होणारे अर्थ मात्र निरनिराळे आहेत. तर, ते परस्परविरोधीही आहेत. अर्थात, हे निराळे अर्थ केवळ साहित्याच्या क्षेत्रात आहे असे नाही, तर एकूणच जीवनाच्या क्षेत्रात या दोन्ही शब्दांनी ध्वनित होणारे अर्थ निराळे आहेत. उदा. सर्वत्र अभ्यासक्रम एकच असला तरी ग्रामीण शिक्षणाच्या वेगळ्या समस्या आहेत असे आपण म्हणतो किंवा उद्योग म्हटला तरी ग्रामीण भागातील उद्योग आणि शहरी भागातील उद्योग यात भेद आहे असे दिसून येईल. मानवी स्वभाव हा इथून-तिथून सारखाच असतो असे आपण म्हणतो खरे, परंतु परिस्थितीप्रमाणे आणि प्रदेशाप्रमाणे त्याला वेगळे आकार प्राप्त होतात. म्हणूनच आपण जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये ग्रामीण आणि शहरी असा भेद करतो. शिक्षण, राजकारण, अर्थकारण, समस्या या ग्रामीण आणि शहरी भागात भिन्नत्वाने जाणवतात. याच जीवन पद्धतीत आलेले अनुभव, त्यांच्या आयुष्याचा प्रवास लेखक व कवी यांनी त्यांच्या पद्धतीपरत्वे साहित्यात नमूद केले आहे. ग्रामीण व शहरी या दोन्ही संकल्पनांवर मराठी साहित्यात विपुल असे लेखन केले गेले आहे. ग्राम आणि नागर या दोन्ही संज्ञा भिन्न असल्या आणि त्यात सीमारेषा असली तरी दोन्हीमध्ये निर्माण होणारे साहित्य विशिष्ट अनुबंधाने जोडलेले आहेत. प्रस्तुत लेखात ग्रामीण साहित्य आणि महानगरीय साहित्य यातील अनुबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**शोधसंज्ञा –** ग्रामीण साहित्य संकल्पना, महानगरीय साहित्य संकल्पना, ग्रामीण आणि नागर यातील भेद, ग्रामीण आणि महानगरीय साहित्यातील अनुबंध

**शोध निबंध संशोधनाची पद्धती –** तुलनात्मक अभ्यास पद्धती

**शोध निबंध संशोधनाची उद्दिष्टे –**

१. ग्रामीण आणि महानगरीय साहित्याची संकल्पना अभ्यासणे.
२. ग्राम आणि नगर यातील भेद स्पष्ट करणे.
३. कविता, कथा, कादंबरी, नियतकालिके या साहित्य प्रकारांच्या आधारे ग्रामीण आणि महानगरीय साहित्याचा तुलनात्मक अभ्यास करणे.
४. ग्रामीण आणि महानगरीय साहित्यातील अनुबंध इतिहास शोधणे.

**ग्रामीण साहित्य संकल्पना –** साहित्यातील 'ग्रामीण' हा शब्द 'ग्राम' या शब्दावरून मराठीत आलेला आहे. संस्कृत 'ग्राम' चा अर्थ मराठीत 'गाव' असा आहे. खेडेगाव, शेतीवस्ती असे आणखी अनुषांगिक अर्थही प्रचलित आहेत. परंतु 'ग्राम' म्हणजे 'गाव'हाच अर्थ संयुक्तिक आहे. 'ग्राम' वरून ग्रामण्य, ग्रामस्थ, ग्रामकन्या, ग्राम्य असे संस्कृत शब्द तर 'गाव' वरून गावढा, गावठाण, गावगाडा, गावकी, गावकरी, गावठी, गावकूस, गावरान, गावभवानी इत्यादी अनेक शब्द मराठीत वापरात आहेत. त्यातील प्रत्येक शब्दाचा अर्थ गावाशी निगडित आहे. अशा रीतीने ग्रामीण म्हणजे गावाकडील किंवा गावाशी निगडित असेल ते ग्रामीण होय असे म्हणता येते. यावरून मराठी ग्रामीण साहित्यासंदर्भात असे विधान करता येईल की, एखाद्या साहित्यकृतीमध्ये प्राधान्याने 'गावातले' असे काही चित्रित झाले असेल तर त्या साहित्यकृतीला ग्रामीण साहित्य ही संज्ञा देता येईल. ग्रामीण साहित्यामध्ये वर्ण्यविषयाचा मुख्य आधार घटक गाव हाच असला पाहिजे. 'ग्रामीण साहित्य' या शब्द प्रयोगातील ग्रामीण हे विशेषण स्वातंत्र्योत्तर घडलेल्या व निर्माण झालेल्या सामाजिक,सांस्कृतिक, वाङ्मयीन परिवर्तनातून जन्मलेले आहे. हे विशेषण वापरत असताना भौगोलिक तसेच भाषा विशिष्ट स्वरूपाची साहित्य परंपरा आणि जीवनपद्धती अथवा जीवनशैली इत्यादी अनेक संदर्भ लक्षात घेणे आवश्यक असते. या शब्द प्रयोगात सर्वप्रथम प्रदेशाचा संदर्भ येतो. ग्रामीण म्हटल्यानंतर लगेच आपल्यासमोर विरोधाभासाने 'नागर' हा शब्द येतो आणि या दोन्हीचा विशेष म्हणजे दोघांनाही प्राप्त झालेला भौगोलिक संदर्भ होय. थोडक्यात, ग्रामीण साहित्य म्हणजे कृषिनिष्ठ अथवा कृषी संस्कृतीचे प्रतिबिंब पडलेले साहित्य होय. त्यातून भौगोलिक, भाषा, साहित्य परंपरा आणि वेगळी अशी जीवनपद्धती इत्यादी अनेक संदर्भ सूचित करण्याचा प्रयत्न असतो. ग्रामीण साहित्याचे मूलभूत स्वरूपाचे वेगळेपण शोधत असताना आशय आणि अभिव्यक्ती या दोन घटकांचा विचार करावा लागतो. ग्रामीण साहित्य हा मराठी साहित्यातील वेगळा व स्वतंत्र प्रवाह आहे असे विधान करत असताना त्याची पृथगात्मकता किंवा वेगळेपण नेमके त्याच्या रचनेमध्ये आहे की त्याच्या वृतामध्ये आहे. म्हणजेच ग्रामीण साहित्याचा प्रवाह आशयाच्या दृष्टीने वेगळा आहे आणि परंपरागत व समकालीन साहित्यापेक्षा त्याची रचना पद्धती भिन्न आहे.[८]

ग्रामीण साहित्यात गावातले समाजजीवन, निसर्ग-शेती, प्राणीजीवन चित्रित झालेले असते. ते सर्व गावाशीच निगडित असते. त्या साहित्य कृतीमधील वातावरण, घटना, प्रसंग गावातले असतात. म्हणून त्या साहित्याला ग्रामीण साहित्य म्हणायचे.ग्रामीण साहित्याची भाषा प्रमाण, बोली अशी कोणतीही एकच न राहता ती गावाकडच्या जीवनाशी रुळलेली असते. व्यंकटेश माडगूळकर, द. मा. मिरासदार, शंकर पाटील यासारख्या लेखकांच्या लेखनातून साहित्यात ग्रामीण जीवनप्रवास दिसून येतो.

**महानगरीय साहित्य संकल्पना –** औद्योगिक क्रांती आणि वैज्ञानिक प्रगतीच्या झपाट्यात विसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच जगभर महानगरी उभी राहिली. महानगर म्हणजे रोजगार मिळविण्याचे हमखास ठिकाण. या भावनेतून पारंपरिक व्यवसाय टाकून उपजीविकेसाठी खेड्यापाड्यातील वेगवेगळ्या प्रदेशातील वेगवेगळ्या जाती-धर्माच्या, वेगवेगळ्या सांस्कृतिक रीतीरीवाजाचे लोकसमूह महानगरात येऊन स्थलांतरित झाला. शहरातील समाज हा विराट समाज असतो. कारखानदार, उद्योगधंदेवाले व व्यापारी यांचा सधन वर्ग,नोकरी करणारा पांढरपेशा मध्यम वर्ग आणि मजूर काम करणारा तिसरा वर्ग अशी आर्थिकदृष्ट्या वर्गविभागणी पडलेली दिसून येते. कष्टकरी, शेतकरी, वडिलोपार्जित व्यवसाय करणारे निरनिराळ्या आपत्तीमुळे स्वतःचा देश सोडून निर्वाहित परक्या भूमीत पाय रोऊ पाहणाऱ्या निर्वासित लोकांच्या भिन्न भिन्न जीवन शैलीच्या संकरातून महानगरीय जीवनाची स्वतःची अशी परंपरा व चालीरीती आणि स्वतःचे असे वर्तनबंध तयार झाले. महानगरातील लोकसमूह अनेक रुपी आणि अनेक स्तरीय आहे. या सर्वांचे चित्रण ज्या साहित्यात येते त्यास महानगरीय साहित्य असे म्हणतात. या महानगरीय साहित्याचा उगम १९६० नंतर इतर प्रवाहांसोबत झालेला आढळतो. प्राचीन काळापासून ग्रामीण आणि नागर हे दोन्ही शब्द अस्तित्वात आहेत. व्यवस्थापनाशी निगडित असणाऱ्या गोष्टी जेथे एकवटल्या आहेत ज्यांचा शेतीशी फारसा संबंध नाही तो विभाग म्हणजे नागर विभाग किंवा शहरी विभाग असे म्हणता येईल. अर्थात नागर आणि ग्रामीण या दोन्ही विभागांमध्ये काही आदान-प्रदान होते हे उघड आहे. आजही हे आदान-प्रदान आहेच आणि त्याचे परिणामही परस्परांवर होताना दिसून येतात. ग्रामीण आणि नागरी या संज्ञा ठसठशीतपणे जाणवू लागल्या त्या मात्र औद्योगिकीकरणानंतरच. म्हणजे इंग्रजांच्या आगमनानंतर, एकोणिसाव्या शतकाच्या मध्यातून पुढे आपल्याकडे औद्योगिकीकरणाला प्रारंभ झाला. साधारणतः १८८० च्या दरम्यान आपल्याकडे मोठ्या प्रमाणात कापड कारखाने उभे राहू लागले. इतरही उद्योगधंदे शहरांमध्ये स्थिर होऊ लागले. रेल्वे सारखे वाहतुकीची साधने उपलब्ध झाले. इतरही सुविधा उपलब्ध होऊ लागल्या. परिणामतः आपल्या देशात एक व्यवस्था प्रक्रिया सुरू झाली. ती प्रक्रिया म्हणजे आपापले खेडे सोडून लोक हळूहळू शहराकडे जाऊ लागले. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर कोकणातून आणि एकूणच महाराष्ट्रातून लोकांचा लोंढा मुंबईकडे येऊ लागला आणि शहराच्या आकारमानात गतीने वाढ होऊ लागली.[२]

**ग्रामीण व नागरी समाजाचे वेगळेपण –** ग्रामीण व नागर समाजातील सामाजिक संबंधाचा विशेष अभ्यास करणे अगत्याचे ठरते. त्यासाठी त्यातील भेद स्पष्ट करणे आवश्यक आहे. श्री. पी. ए. सोरोकिन व श्री. सी. सी. झिम्मरमन यांनी आपल्या 'Principal of Rural Urban Sociology' या ग्रंथात हे भेद स्पष्ट केले आहेत. ते करण्यासाठी त्यांनी खालील आधार शोधले आहेत.[५]

१) व्यवसाय
२) पर्यावरण
३) समुदाय- आकारमान
४) लोकसंख्येची घनता
५) लोकसंख्येतील सजातीयता व विजातीयता
६) सामाजिक भेद व स्तरीकरण
७) सामाजिक गतिशीलता
८) सामाजिक आंतरक्रिया

याशिवाय सामाजिक भेदाच्या दृष्टीनेही विचार करता येईल, असे त्यांनी सुचविले आहे. या निकषाच्या अनुषंगाने ग्रामीण जीवनाचे वेगळेपण लक्षात येते.

E-ISSN : 2348-7143
April : 2022

| क्र. | निकष | ग्रामीण जग | नागर जग |
|---|---|---|---|
| १) | व्यवसाय | प्रामुख्याने शेती करणारे, काही थोडे बिगर शेती उद्योग | बिगर शेती उद्योग, यंत्र उद्योग निर्मिती,व्यापार ,प्रशासनाशी संबंधित अगर इतर व्यवसाय |
| २) | पर्यावरण / वातावरण | निसर्गाचे वर्चस्व. आदिम सामाजिक वातावरण. निसर्गाशी प्रत्यक्ष नाते. | निसर्गापासून लक्षणीय दुरावा. मानवनिर्मित वस्तूंचे निसर्गावर वर्चस्व. |
| ३) | लोक समूहाचा आकार | छोटे छोटे जनसमूह शेतीशी निगडित. | एकाच देशात, त्याच काळात लोकसंख्या तुलनेने अधिकच असते |
| ४) | लोकसंख्या | शहराच्या तुलनेत (त्याच काळात, त्याच देशात) ग्रामीण भागात कमी लोक राहतात. | नागर विभागात लोकसंख्येची घनता अधिक असते |
| ५) | समूहभावना | शहरांच्या तुलनेत ग्रामीण भागात समूहभावना, एकोपा अधिक असतो. | विविध भेद आणि विविध स्तर हे शहराचे वैशिष्ट्य असते. |
| ६) | स्थलांतर | व्यक्ती रोजगारासाठी शहराकडे जातात. | शहराकडून खेड्याकडे जाण्याचे प्रमाण अत्यल्प |
| ७) | आदान प्रदान | माणूस म्हणून समजून घेणे | तात्पुरते संबंध, संवादाचे मार्ग मात्र |
| | | येथे महत्त्वाचे, संबंध साधे आणि प्रामाणिक करारही साधेच. संवादाचे मार्गही मर्यादित | खूप. औपचारिक संबंध अधिक व्यक्तीला व्यक्ती म्हणून फारसे महत्त्व नसणे. |
| ८) | सामाजिक भेद व स्तरीकरण | ग्रामीण जीवनात सामाजिक भेद व स्तरीकरण जातीपरत्वे अधिक असतात | सामाजिक भेद व स्तरीकरण कमी प्रमाणात दिसतो |
| ९) | सामाजिक गतिशीलता | सामाजिक गतिशीलता ग्रामीण जगात कमी प्रमाणात असते. गतिशीलतेचा अभाव हे ग्रामवासीयांचे वैशिष्ट्य आहे. | सामाजिक गतिशीलतेला भरपूर वाव असतो.समस्तरीय व विषम स्तरीय गतिशीलता आढळते. गतिशीलता हा शहरवासीयांचा स्थायीभाव आहे. |
| १०) | सामाजिक आंतरक्रिया | प्राथमिक संबंधाचे प्राबल्य असते. | दुय्यम संबंधाचे प्राबल्य असते. |

(कोत्तापल्ले नागनाथ, भगत दत्ता, लिंबाळे शरणकुमार, ग्रामीण, दलित स्त्रीवादी साहित्य, Y. C. M. O. U.)

वर दिलेला तक्ता लक्षात घेतला की, ग्रामीण समाजाचे वेगळेपण लक्षात येते. ही भिन्नता ग्रामीण भागातील विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळेच निर्माण झाली आहे. परिस्थिती व संस्कृती यांचा अन्योन्य संबंध लक्षात घेता एका विशिष्ट परिस्थितीत वाढणाऱ्या ग्रामवासीयांचे वर्तन प्रकार, आचार-विचार नगरवासीयाहून भिन्न असल्यास वावगे ठरणार नाही. आजच्या नागरीकरणाच्या प्रक्रियेत शुद्ध स्वरूपाचा ग्रामीण समाज अस्तंगत होत चालला आहे. सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात होणारे झंझावती बदल ग्रामीण समाज ढवळून काढीत आहेत. यामुळेच ग्रामीण व नागरी समाजातील अंतर झपाट्याने कमी होत आहे.

**ग्रामीण आणि महानगरीय साहित्यातील अनुबंध इतिहास –** ग्रामीण साहित्य आणि महानगरीय साहित्य यातील भेद आणि वेगळेपण हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. महानगरीय साहित्य हे ग्रामीण साहित्याचे परिपाक आहे.ग्रामीण साहित्य आणि महानगरीय साहित्यातील अनुबंध अभ्यासताना कविता, कथा, कादंबरी, नियतकालिके या साहित्याच्या अंगाने विचार करता येईल.

**कविता (ग्रामीण कविता) –** १९६० नंतरच्या काळात मराठीतील सर्वच वाङ्मयप्रकारात महत्त्वपूर्ण बदल घडून आले. कविता वाङ्मयही याला अपवाद राहिले नाही. साठोत्तरी काळात मराठी कवितेत वेगाने विकास घडून आला. एकीकडे दलित कवितेच्या रुपाने नवा आशय आणि आविष्कार कवितेत दाखल झाला. त्यानंतर ग्रामीण कवितेच्या रूपाने अस्सल ग्रामीण जीवनानुभव ग्रामीण कवितेतून जिवंतपणे व्यक्त होऊ लागले. ग्रामीण साहित्याची चळवळ याच कालखंडादरम्यान सुरू झाली. ग्रामीण भागातील नवशिक्षितांची पिढी या काळात आपले वास्तव जीवनानुभव व ग्रामीण संवेदना आपल्या कवितेतून जाणीवपूर्वक व्यक्त करू लागली. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे दारिद्र्य कष्टप्रद जीवन, शोषण, त्यांच्या श्रद्धा, रिती, ग्रामीण निसर्ग, ग्रामीण भागातील समस्या अशा अनेक अंगाने ग्रामीण भागाचे दर्शन या ग्रामीण कवितेने घडविले. आनंद यादव, ना. धो. महानोर, विठ्ठल वाघ, सरोजिनी बाबर, राजन गवस, पुरुषोत्तम पाटील अशा अनेक कवींनी साठोत्तरी ग्रामीण कविता समृद्ध केली. ग्रामीण जीवनाचे बहुविध दर्शन, लोकगीतांचा बाज, सामाजिक ग्रामीण जीवनाचा आलेख, अनुभूतीसह आविष्करण ही ग्रामीण कवितेची वैशिष्ट्ये सांगता येतील. भा. रा. तांबे यांच्या कवितेत काही ठिकाणी ग्रामीणता दिसते. कृषी परिसर, ग्रामजीवनाच्या छटा त्यांच्या कवितेत आलेल्या दिसतात. उदा. 'घट तिचा रिकामा' व 'घट भरे प्रवाही बुडबुडांनी' या सारख्या कवितेतून कृषीपरिसर साकारताना दिसतो.

**काही ग्रामीण कवितासंग्रह –**

१) ‘सुगी’, ‘मीठभाकर’ ग. ल. ठोकळ
२) ‘रानजाई’, ‘निंबोळ्या’ – ग. ह. पाटील
३) ‘शिवार’ – के. नारखेडे
४) ‘काव्यकेतकी’, ‘अनुपमा’ – सोपानदेव चौधरी
५) ‘बहिणाबाईंची गाणी’ – बहिणाबाई चौधरी
६) ‘हिरवे जग’, ‘मळ्याची माती’, ‘माय लेकरं’ – डॉ. आनंद यादव
७) ‘रानातल्या कविता’,‘वही’,‘पावसाळी कविता’,‘प्रार्थना दयाघना’,‘अजिंठा’,‘पक्ष्यांचे लक्ष थवे’,‘पळसखेडची गाणी’ – ना. धो. महानोर
८) ‘साय’, ‘काया मातीत मातीत’ – विठ्ठल वाघ
९) ‘आपुण तर माणसं हाय’ – माधव थोरात

१९३३ साली प्रसिद्ध झालेल्या ‘सुगी’ या पहिल्या प्रातिनिधिक जानपद कवितासंग्रहातील कविता ग्रामीण कवितेच्या संदर्भात महत्त्वाच्या ठरतात. प्रत्यक्ष ग्रामीण जीवनाचा अनुभव जिव्हाळा, साधेपणा हा ग. ह. पाटील यांच्या कवितेचा विषय दिसतो. बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतून संसाराची व्याख्या ते करतात...

“अरे संसार संसार, जसा तवा चुल्ह्यावर
आधी हाताले चटके, तव्हा मिळते भाकर.”
...कवयित्री बहिणाबाई चौधरी (बहिणाबाईंची गाणी)

**महानगरीय कविता –** महानगरीय जीवनाची विदारकता, यंत्रयुगीन समाज आणि मध्यमवर्गीयांचे कीरटे जीवन मर्ढेकरांच्या कवितेत पहिल्यांदा प्रगट झाले. उद्योगप्रधान अर्थ केंद्रित संस्कृतीपासून दूर असलेल्या पर्यावरणातील लेखक जेव्हा आधुनिक जीवनपद्धतीला सामोरा जातो, तेव्हा पारंपरिक संस्कारांनी घडलेली त्यांची मानसिकता आणि आधुनिक जीवनपद्धती यांच्यातील मोठे अंतर त्याला जाणवते. नव्या व्यवस्थेशी नीट जुळवून न घेता आल्याने स्वतःविषयी न्यूनगंड निर्माण होऊ शकतो. अशा कुचंबळेमुळे आणि न्यूनगंडामुळे या लेखकांपुढे एक प्रकारचा Identity Crisis उभा राहतो. मर्ढेकरोत्तर कालखंडात लिहिली गेलेली महानगरीय कविता अशा Identity Crisis मधून पुढे आलेली आहे. (विकिपिडीयावरील उपलब्ध माहितीच्या संदर्भानुसार) मराठी काव्यक्षेत्रात नवकाव्य प्रवाह निर्माण करण्याचे श्रेय बा. सी. मर्ढेकरांना दिले जाते. त्यांचे ‘शिशिरागमन’ (१९३८), ‘काही कविता’ (१९४७), ‘आणखी काही कविता’ (१९५१), ‘मर्ढेकरांची समग्र कविता’ (१९५९) इत्यादी कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर सर्वच देशांना अनेक समस्यांनी ग्रासले असताना यंत्रयुगाच्या अस्तित्वामुळे माणसाच्या जीवनात अनेक समस्या निर्माण झाल्या म्हणूनच ‘पंक्चरलेली रात्र’, ‘पिपात मेलेले उंदीर’, ‘लांडी धडपड वरती काखा’ इत्यादी कविता निर्माण झाल्या, त्यांची कविता चिंतनात्मक, संयमशील, बहुरुपी आणि वेगवेगळे प्रयोग करणारी आहे. या जगात ‘जगण्याची पण सक्ती आहे, मरणाची पण सक्ती आहे’ असे सांगून ‘परिस्थितीचे पिन असिड, लिबलिबली ही मने हडकुळी’ अशा शब्दात यंत्रयुगावर भाष्य करतात. भावनेतील यांत्रिकपणा हे महानगरीय साहित्याचे वेगळेपण आहे. सामाजिक परिस्थितीचे वास्तववादी चित्रण व्यक्त करताना आणि दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम सांगताना ते लिहितात, पृथ्वीची तिरडी, एरव्ही परडी फुलांनी भरली, जळो देवा भली याचे महत्त्वाचे कारण समाजातील, देशातील राजकीय सत्ताच आहे असे ते सांगतात. ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल शंका निर्माण करताना ते लिहितात

“काष्ट झालेल्या हो मनी, जळी, स्थळी नि पाषाणी
सांगा पाहिला का कधी, देव कुणी...”

मराठी कवितेला मर्ढेकरांनी नवकवितेबरोबर नवा विचारही दिला. मर्ढेकरांच्या कवितेवर टीकाही झाली. मर्ढेकर स्वतः म्हणतात जीवनातील प्रश्न जर नवे असतील तर ते सोडविण्याचे मार्गही नवे असावेत.[१६]

**कथा (ग्रामीण कथा) –** ग्रामीण साहित्याचा प्रांत समृद्ध करणाऱ्या व्यंकटेश माडगुळकर, शंकर पाटील यांनी मराठी ग्रामीण कथा स्थूलतेकडून सूक्ष्मतेकडे नेली.याच काळात रणजीत देसाई, शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे यांनाही दलित ग्रामजीवनाचे दर्शन घडविणाऱ्या दर्जेदार कथांचे लेखन केले. १९६० नंतर ग्रामीण कथेमध्ये समाजजीवनाचे विविध परिवर्तन, शेतकऱ्यांची दु :ख, त्यांचे विविध प्रश्न, शोषण, भ्रष्टाचार, बेकारी यांचे वास्तव चित्रण साकारण्यात आलेले आहे. त्याचबरोबर परिवर्तनामुळे नष्ट होऊ लागलेली कृषी संस्कृती, ग्रामीण तरुणांचा चंगळवाद, शेतकऱ्यांच्या मालाला नसलेला भाव यांचे वास्तव चित्रण ग्रामीण कथेतून करण्यात आलेले आहे. आनंद यादव १९६३ पासून कथालेखन करीत असून त्यांच्या कथांमधून शेतकऱ्यांच्या जीवनातील दु : ख, आगतिकता, लाचारी, कष्टमय जीवन, दैवाधीनता, काळ्या आईवरील श्रद्धा यांचा प्रत्यय येतो. अस्सल ग्रामीण बोलीतून व ग्रामीण संवेदनशीलतेमधून लिहिली गेलेली यादवांची कथा ग्रामीण कथात्मक साहित्याचे लेणे आहे. त्यांचे १) ‘खळाळ’, २) ‘मातीखालची माती’, ३) ‘उखडलेली झाडे’ इत्यादी कथासंग्रह प्रकाशित आहेत. रा. रं. बोराडे खेड्यांतून व प्रत्यक्ष शेतकरी कुटुंबातून आलेले ग्रामीण कथाकार आहेत. खेड्यातील माणसे, त्यांची जीवन पद्धती, त्यांचे अज्ञान, दारिद्र्य, उपासमारी, अहोरात्र करावे लागणारे कष्ट, ताणतणाव, कौटुंबिक नातेसंबंध यांचे प्रतिबिंब त्यांच्या कथांमध्ये उमटलेले आहे. त्यांचे १) ‘पेरणी’ (१९६२), २) ‘ताळमेळ’, ३) ‘मळणी’, ४) ‘वरात’, ५) ‘नातीगोती’, ६) ‘बोळवण’, ७) ‘वाळवण’, ८) ‘फजितवाडा’, ९) ‘माळरान’, १०) ‘राखण’, ११) ‘बुरुज’, १२) ‘वणवळ’, १३) ‘गोंधळ’, १४) ‘हेलकावे’, १५) ‘खोळंबा’, १६) ‘कडबा आणि कणसं’ (१९९४) इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. रा. रं. बोराडे यांच्या कथेमधून ग्रामजीवनाचा व कृषी निष्ठेचा प्रत्यय येतो. कौटुंबिक नात्यांतील विविध ताणतणाव त्यांच्या कथेमधून प्रतिबिंबित झालेला आढळतो.

उद्धव शेळके यांच्या कथांमधून ग्रामजीवनातील विविध स्तरांचे दर्शन घडते. गावगाडा आणि त्या गावगाड्याशी संबंधित सर्व घटकांचे त्याचबरोबर वैशिष्टपूर्ण अशा ग्रामसंस्कृतीचेही चित्रण त्यांच्या कथेत घडते. १) ‘शिळाण आणि आठ कथा’, २) ‘वानगी’, ३) ‘संसर्ग’, ४) ‘गरिबाघरची लेक’, ५)

'घुसळण', ६) 'कडुनिंबाची सावली', ७) 'बिंदिया', ८) 'बाबला', ९) 'उमरखा कुलकर्णी', १०) 'उमलती कळी' इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. ग्रामीण जीवनाचा अनुभव व वैदर्भीय बोलीभाषेचा परिणामकारकपणे केलेला वापर यामुळे त्यांची कथा वैशिष्टपूर्ण व सकस ठरते.

योगीराज वाघमारे, भास्कर चंदनशिव, जगदीश कदम, रामचंद्र पठारे, उत्तम बावस्कर, कृष्णा इंगोले, उत्तम तुपे, श्रीराम गुंदेकर, प्रतिमा इंगोले, अनंत भोयर, अशोक कोळी आणि रवींद्र पांढरे यासारख्या कलाकारांनी ग्रामीण कथेच्या क्षेत्रात मोलाची कामगिरी केली आहे. त्यांच्या कथांचे स्वरूप समाजन्मुख असून समकालीन वर्तमान परिस्थितीचे त्यांनी विशेष महत्व रेखांकित केले आहे. शंकर सखाराम यांच्या 'घुगाट' संग्रहातील 'तुकाचा मांडव' या कथेत सांगितलेली प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची शोकांतिका वाचकांचे हृदय पिळवटून टाकणारी आहे.[१५]

नागनाथ कोतापल्ले, भास्कर चंदनशिव, राजन गवस, चारुता सागर हे १९८० नंतरचे महत्वाचे असे कथाकार आहेत. नागनाथ कोतापल्ले यांनी जातीयता, ग्रामीण भागातील दंगली, राजकारणात तरूणांचा होत असलेला वापर, झुंडशाही यांचे परिणामकारक चित्रण त्यांच्या कथांमधून केलेले आहे. त्यांच्या १) 'कर्फ्यू', २) 'काफिला', ३) 'उलट चालला प्रवाह', ४) 'रक्त आणि पाऊस', ५) 'सावित्रीचा निर्णय' या कथा प्रसिद्ध आहेत. भास्कर चंदनशिव यांनी आपल्या कथांमधून शेतकरी त्यांचे दारिद्र्य, शोषण, शोषणास कारणीभूत व्यवस्था, ग्रामीण भागातील राजकारण, शेतकऱ्यांची मनोवस्था, ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे विविध प्रश्न अत्यंत ताकतीने हाताळले आहेत. तोडणी, इस्कुटा ,कोळसं, तिढा या कथा ऊस तोडणी कामगारांच्या समस्या मांडणारे आहेत. 'सडणी' सारखी कथा कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणारी आहे.

१९९० नंतर महाराष्ट्रात ग्रामीण भागात आमूलाग्र परिवर्तन घडून आले. महाराष्ट्रातील या बदलत्या स्थित्यंतराचे प्रतिबिंब या कथांमधून आढळते. या कथाकारांमध्ये प्रामुख्याने श्रीराम गुंदेकर, शिवाजी मरगीळ, भास्कर बडे, संजय ठोकळ, प्रकाश मोगले, सदानंद देशमुख इत्यादी कथाकार यांचा समावेश होतो.

**महानगरीय कथा –** विलास सारंग यांनी 'सोलेदाद' (१९७५) आणि 'आतंक' (१९९९) या कथासंग्रहातून आधुनिक माणसाच्या जीवनातील असुरक्षिततेची, निरर्थकतेची जाणीव, व्यवस्थेकडून माणसाच्या स्वातंत्र्यावर होत असलेले अतिक्रमण, व्यवस्थेची दहशत, माणसाचे एकाकीपण, तुटलेपण, माणसामाणसांमधील विसंवाद यासारखे अनुभव व्यक्त केले आहे. कथेतील महानगरीय वातावरणाचे व परिसराचे अतिवास्तवात रुपांतर करण्याचे तंत्र यशस्वीपणे हाताळले आहे. भाऊ पाध्ये (प्रभाकर नारायण पाध्ये) हे मराठी कथात्मक साहित्यात आपली वेगळी वाट निर्माण करणारे लेखक आहे. 'एक सुनेहरा ख्वाब' (१९८०), 'मुरली' (१९८१), 'थालीपीठ' (१९८४) 'थोडीसी जो पी ली' (१९८६), 'दावेदार' (१९९६) असे कथासंग्रह त्यांच्या नावावर आहेत. महानगराच्या सुबत्तेपासून, सुखसोईपासून झगमगाटापासून दूर, अंधाऱ्या, अभावग्रस्त वस्त्यांमधून जगणारी माणसे भाऊ पाध्ये यांच्या कथेचा विषय बनलेली आहेत. या माणसाचे जगणे पांढरपेशांच्या सुरक्षित, शांत जगण्यापेक्षा वेगळे, अस्थिर व असुरक्षित असे आहे. महानगरातील जगण्याचा हा वेगळा स्तर भाऊ पाध्ये यांनी साकार केला आहे. ह. मो. मराठे, अरुण साधू, केशव मेश्राम, अनिल रघुनाथ कुलकर्णी, रंगनाथ पठारे, एस. डी. इनामदार, बाळकृष्ण प्रभुदेसाई, मिलिंद बोकील, राजन गवस, अरुणा ढेरे यांच्या कथा १९८० नंतरच्या उल्लेखनीय कथा म्हणून अभ्यासता येतील. आधुनिक शहरातील औद्योगिक विकासामुळे निर्माण झालेल्या अनेक समस्या मराठे यांच्या कथांमधून दिसून येतात. अरुण साधू यांच्या कथांमधून महानगर आणि ग्रामीण परिसर हे दोन्ही भौगोलिक प्रदेश चित्रित झालेले दिसून येते.[१६]

**कादंबरी (ग्रामीण कादंबरी) –** १९३० च्या सुमारास रा. वि. टिकेकर (धनुर्धारी) यांनी लिहिली. 'पिराजी पाटील' ही एखाद्या दीर्घ कथेसारखी असलेली पहिली ग्रामीण कादंबरी मानली जाते. महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या कादंबरीचा बराच प्रभाव त्यावर आहे. १९३० नंतर र. वा. दिघे यांनी लिहिलेल्या 'आई आहे शेतात', 'पाणकळा', 'पड रे पाण्या' इत्यादी काही कादंबऱ्यात निसर्ग वर्णनाला प्राधान्य दिले आहे. १९४४ मध्ये ग. ल. ठोकळ यांची 'गावगुंड' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. ग्रामीण कादंबरीला वास्तवाच्या पातळीवर आणण्याचे कार्य ठोकळानी केले.

१९४५ च्या सुमारास अण्णाभाऊ साठे, शंकर पाटील, आनंद यादव, रा. रं. बोराडे, रणजीत देसाई, भालचंद्र नेमाडे, रंगनाथ पठारे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. राजन गवस, विश्वास पाटील, सदानंद देशमुख यासारख्या लेखकांनी साठोत्तरी ग्रामीण कादंबरी या कालखंडात ग्रामजीवनाचे वास्तववादी दर्शन घडविले आहे. अण्णा भाऊंनी 'चित्रा' (१९५१), 'फकिरा (१९५९), 'वैजयंता' (१९५९), 'माकडीचा माळ' (१९६३), 'आवडी' (१९६३), 'वैर' (१९६४), 'रानगंगा' (१९६५), 'पाझर' (१९६५), 'मास्तर' (१९६६), 'वारणेचा वाघ' (१९६८), चंदन, अलगुज, केवड्याचं कणीस, चिखलातील कमळ (१९७४) इत्यादी अनेक कादंबऱ्या लिहिल्या.[४]

ग्रामजीवनातील परिवर्तनाच्या खुणा या कादंबऱ्यांमध्ये आढळतात. उद्धव शेळके यांच्या 'धग' या कादंबरीत यंत्रयुगामुळे ग्रामीण भागातील शिंप्याची होणारी अवस्था, सावकाराची दंडेली यांचे परिणामकारक चित्रण केले आहे. १९८०-२००० पर्यंत ग्रामीण भागातील खेड्यापाड्यांमध्ये अमुलाग्र बदल झाले आहेत. ग्रामीण साहित्य चळवळ व शेतकरी संघटना यांनीही शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी आंदोलन उभारले आहे. नव्या दमाचे व ग्रामीण वास्तवाचे आकलन असलेले अनेक कादंबरीकार जोमाने कादंबरी लेखन करीत आहेत.

**महानगरीय कादंबरी –** १९२० नंतर गांधीवाद, साम्यवाद, समाजवाद ना. सी. फडके यांच्या कलावाद या प्रेरणांनी काही कादंबऱ्या लिहिल्या गेलेल्या दिसतात. मामा वरेरकर, ना. वि. कुलकर्णी यांनी केलेल्या कादंबरी लेखनात ही मानवतावादी, साम्यवादी, गांधीवादी विचारसरणी दिसून येते. महानगरीय कादंबऱ्यांचा विचार करता बहुसंख्य कादंबऱ्या 'मुंबई' या महानगराचेच जीवनवास्तव मांडतांना दिसून येतात. या महानगरीय जीवन चित्रण करणाऱ्या कादंबरीकारांमध्ये श्री. ना. पेंडसे ('हत्या', 'आकांत', 'ऑक्टोपस'), जयवंत दळवी ('चक्र', 'कहाणी', 'अल्बम'), भाऊ पाध्ये ('डोंबाऱ्याचा खेळ', 'करंटा', 'वैतागवाडी', 'बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर', 'राडा', 'अग्रेसर', 'वॉर्ड नं. ७', 'सर्जिकल', 'वणवा', 'होमसिक ब्रिगेड', 'जेलबर्डस'), सुभाष भेंडे ('अदेशी', 'अंधारवाटा'), मधु मंगेश कर्णिक ('माहिमची खाडी', 'वारूळ'), ह. मो. मराठे ('सॉफ्टवेअर', 'मार्केट', 'इतिवृत्त', 'कलीयुग'), अनंत कदम ('किडे', 'दिवसाच्या अंधारात'), अरुण साधू ('मुंबई दिनांक', 'सिंहासन', 'झिपऱ्या', 'तडजोड'), ल. ना. केरकर ('तो आणि त्याचा मुलगा', 'पांढरा सिंह काळी चौकट'), वसंत आबाजी डहाके (अधोलोक), गौरी देशपांडे ('मुक्काम'), संजीव खांडेकर ('अशांत पर्व') यासारख्या लेखकांचा समावेश होतो. मराठी साहित्यात वरील कादंबरीमध्ये महानगरीय जगाचे चित्रण रेखाटलेले दिसून येते. पण त्यातून महानगरीय जीवन जाणीव व्यक्त होते की मध्यमवर्गीय जीवन जाणीव व्यक्त होते हा प्रश्न पडतो. लेखकांच्या कादंबरीतून मध्यमवर्गीय जाणीव व्यक्त होत असेल आणि मध्यमवर्गीय

महानगरातील एक उपसंस्कृती आहे असे ध्यानात घेतल्यास कादंबरीत महानगरातील उपसंस्कृतीचे जीवन चित्रण आलेले आहे, हे म्हणावे लागेल. डॉ. राजन गवस यांच्या मते भाऊ पाध्ये हे महानगरीय जीवन जाणिवा ठळकपणे अभिव्यक्त करणारे महत्त्वाचे महानगरीय कादंबरीकार ठरतात.[१६]

**नियतकालिके –** १९६० च्या आसपासची पिढी सर्वच बाबतीत असंतुष्ट असमाधानी होती. शहर अमर्याद वाढत चालली होती आणि खेडी बकाल होत होती. समाजात सामान्य माणसाने व्यक्ती म्हणून मूल्य हरवलेले होते. व्यक्तीतला विसंवाद वाढत होता. बहुसंख्य माणसांना असहाय्य, परात्म, निराश आणि वैफल्यग्रस्त आयुष्य जगावे लागत होते. अशा या जगण्याचे वास्तव चित्रण राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक स्तरावर प्रतिबिंबित होत नव्हते. सर्वच बाबतीत असंतुष्ट असमाधानी असणाऱ्या या पिढीला सर्वच क्षेत्रातील प्रस्थापितता खुपत होती. या असंतोषातून साहित्यक्षेत्रातील लघुनियतकालिकांची चळवळ जोमाने पुढे आली. या लघुनियतकालिकांनी पारंपरिक जीवन दृष्टीला आणि वाङ्मयीन संकेतांना विरोध केला. अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, मनोहर ओक, तुळसी परब, वसंत दत्तात्रेय गुर्जर, नामदेव ढसाळ, सतीश काळसेकर, वसंत आबाजी डहाके हे कवी लघुनियतकालिकांच्या चळवळीतून पुढे आलेले कवी आहेत. या कवींच्या कवितेत महानगरीय समाजव्यवस्थेचे भयावह रूप उघडे करून दाखविणारे महानगरीय संवेदन प्रकट झाले आहे. अशाप्रकारे महानगरातील साहित्य अवतरले आहे, पण आज ही एक सक्षम साहित्यप्रवाह म्हणून ज्या प्रमाणे दलित साहित्य, ग्रामीण साहित्य या प्रवाहाचा विकास व्यापक स्वरूपाचा झाला. त्याप्रमाणे तो महानगरीय साहित्याच्या संदर्भात आढळत नाही.

अर्थात याची कारणे शोधली असता ती महानगरीय जीवनाच्या चक्रातच सापडतात. महानगराचे आयुष्य धकाधकीचे आहे. जीवन धावपळीचे आहे. समाजाचे आकलन करण्यास गट अत्यल्प असून त्यातही बहुतांशी लोक महानगरीय नाळेसोबत आत्मियतेने जोडले गेलेले नाहीत. परिणामी महानगरीय साहित्याच्या चित्रणात काही गोष्टींच्या मर्यादा पडतात. महानगरीय साहित्यामुळे मूल्यविशेष घेऊन साहित्य प्रकटन नाही आणि जरी ते प्रगटले तरी ते प्रभावीपणे साकारले गेलेले नाही. या संदर्भात भाऊ पाध्ये यांचा उल्लेख महानगरीय साहित्याचे सम्राट म्हणून करावा लागेल. कारण खऱ्या अर्थाने त्यांनी महानगरीय साहित्याच्या विकासात मोलाची भर घातली आहे. अन्य साहित्यिकांचे साहित्य उपलब्ध असले तरी भाऊ पाध्ये यांच्या साहित्यापुढे ते कमी प्रमाणात उपलब्ध असून फारसे प्रभावी असल्याचे आढळत नाही. नवसाहित्याच्या चळवळीत महानगरीय साहित्य विकसित होत असे तरीही त्यात कृत्रिमपणा आणि इतर उणिवा आढळतात. तेव्हा खऱ्या अर्थाने महानगरीय साहित्याच्या विकासासाठी पाऊल उचलणे तितकेच अपेक्षित आहे. (विकिपिडीयावरील उपलब्ध माहितीच्या संदर्भानुसार)

**निष्कर्ष –**

१. ग्रामीण साहित्य हे समकालीन परिस्थिती, काळाची गरज, समाजातील निरनिराळ्या घटना, घडामोडी, ग्रामीण भागातील जीवनानुभव यातून प्रगट झालेले दिसून येते.
२. महानगरीय साहित्य हे दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या समस्या व त्यांच्या परिणामातून निर्माण झालेली दिसून येते.
३. ग्रामीण साहित्य कविता, कथा, कादंबरी या अंगाने ओतप्रोत भरलेले दिसून येते,परंतु महानगरीय साहित्य मात्र अजून बाळबोध अवस्थेत असल्याचे आढळून येते.
४. ग्रामीण आणि महानगरीय या दोन्ही संकल्पना परस्परविरोधी असल्याकारणाने या दोन्हीमध्ये निर्माण झालेले साहित्य हे विशिष्ट अनुबंधाने जुळलेले दिसून येते.
५. एकीकडे ग्रामीण साहित्यात ग्रामीण समाज जीवनाचे चित्रण आहे तर महानगरीय साहित्यात मध्यमवर्गीयांचे किरीटे जीवन रेखाटलेले आहे.
६. ग्रामीण साहित्यात कृषी संस्कृतीचे प्रतिबिंब दिसून येते तर महानगरीय साहित्यात मध्यमवर्गीय मानव समाजाचे आयुष्य रेखाटलेले दिसून येते.

**समारोप –** मानवी जीवनाचे विविध पैलू उलगडून दाखविणारे कथा, कविता, कादंबरी हे साहित्यप्रकार लेखकाच्या मनातील भाव-विचार व्यक्त करण्यासाठी उत्तम साधन मानले जाते. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले व १९६० साली मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. या कालावधीत भारताच्या व एकूणच महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांपर्यंत शिक्षणाचा प्रसार वेगाने झालेला होता. विविध सुधारणांचे वारे ग्रामीण भागापर्यंत वाहू लागले. रस्ते, वीज, औद्योगिकीकरण, सहकार शिक्षण या क्षेत्रामुळे ग्रामीण भागात परिवर्तनाला प्रारंभ झाला. त्यामुळे परंपरागत व कृषिकेंद्रित अशा ग्रामीण संस्कृतीला एक प्रकारे तडा जाण्याची शक्यता निर्माण झाली. याच काळात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी शेतकरी संघटनेने लढा उभारला. ग्रामीण साहित्य चळवळीनेही व्यापक रूप धारण केले. या ग्रामजीवनातील सर्व परिवर्तनाचे प्रतिबिंब मराठी ग्रामीण साहित्यामध्ये पडलेले दिसून येते. परिणामी संख्यात्मकदृष्ट्या व गुणात्मकदृष्ट्या मराठी ग्रामीण साहित्य समृद्ध झालेले दिसून येते. परंतु ग्रामीण साहित्य प्रमाणे महानगरीय साहित्य विकसित झालेले आढळून येत नाही. महानगरीय साहित्य हे महानगरीय संस्कृती, राजकीय वातावरण, सामाजिक घटक आणि घटनांचा प्रभाव यातून निर्माण झालेले साहित्य आहे. महानगरीय साहित्यात आढळून येणारे असंतोष, यंत्रयुगीन समाजातील निरसता या अभिव्यक्तीने साहित्याला प्रभावित केले आहे. प्रस्तुत लेखात महानगरीय साहित्यात कमी प्रमाणात बोलले गेलेले असण्याचे कारण हेच आहे. महानगरी साहित्य हे समकालीन साहित्यापेक्षा कमी प्रमाणात निर्माण झालेले आढळून येते. ग्रामीण साहित्य संदर्भ अधिक प्रमाणात आढळून येतात तसे महानगरीय साहित्य आढळून येत नाही.

**संदर्भ**

१. यादव आनंद, (२०१६) ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, ISBN -९७८८१७१६१२६८०
२. यादव आनंद, (जुलै १९९३) ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस. ISBN-९७८८१७१६१२६९५
३. भोसले द.ता., (२३सप्टेंबर २००९ ) ग्रामीण साहित्य : एक चिंतन, मनोविकास प्रकाशन, ISBN- ९७८९३८०२६४२१९
४. ठाकूर रविंद्र, (१ सप्टेंबर २००१) मराठी ग्रामीण कादंबरी, पुणे,स्नेहवर्धन प्रकाशन, ISBN- ८१८५६०१६४द
५. नाडगोंडे गुरुनाथ द., (१९९७) ग्रामीण समाजशास्त्र, पुणे, कॉन्टीनेन्टल प्रकाशन विजयानगर
६. कोत्तापल्ले नागनाथ, (डिसेंबर २०१०)ग्रामीण साहित्य आणि शोध, औरंगाबाद, स्वरूप प्रकाशन
७. बोराडे रा. रं., (१९९२)ग्रामीण साहित्य, औरंगाबाद, साकेत प्रकाशन

८. गुंदेकर श्रीराम, ग्रामीण साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन, औरंगाबाद, दिलीपराज प्रकाशन
९. यादव आनंद, मराठी ग्रामीण कथा, पुणे, स्नेहवर्धन प्रकाशन
१०. कोत्तापल्ले नागनाथ, भगत दत्ता, लिंबाळे शरणकुमार (सप्टेंबर २००१) ग्रामीण, दलित स्त्रीवादी साहित्य, Y.C.M.O.U. ISBN- ८१७१७१८२५६
११. मुलाटे वासुदेव (डिसेंबर २०१०) ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा, औरंगाबाद, स्वरूप प्रकाशन
१२. डोईफोडे पंढरी (१५ ऑगस्ट २०१३) ग्रामीण कादंबरी : बदलते स्त्रीजीवन, औरंगाबाद, स्वरूप प्रकाशन, ISBN- ९७८८१९१०११२७२
१३. शेलार सुधाकर, (२ ऑक्टो.२००९) ग्रामीण साहित्य चळवळीचे सामाजिक व सांस्कृतिक योगदान, औरंगाबाद, स्वरूप प्रकाशन
१४. पाटील मोहन (१५ ऑगस्ट २००८) ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, औरंगाबाद, स्वरूप प्रकाशन
१५. सुरवाडे मनोहर (१३ मे २०१२) ग्रामीण : समाज आणि कथासाहित्य, अमरावती, सुगम प्रकाशन,खडइछ- ९७८८१९२३३१२३२
१६. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (२०१८) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ, ISBN- ९७८८१९३९३८१६४

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# कोविड काळात क्रीडा क्षेत्रावर झालेला परिणाम

**प्रा. डॉ. संतोष बडगुजर**
कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संलग्नित के. ए. के. पी. वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,जळगाव

**गोषवारा –**

करोना हा संसर्गजन्य आजार हा वैष्णविक महामारी म्हणून जागतिक आरोग्य संघटनातर्फे जाहिर करण्यात आला. डिसेंम्बर २०१९ साली चीनच्या वूहान येथे या रोगाचा प्रथम रोगी मिळाला आणि काही महिन्यात या रोगाची साथ पूर्ण वुहान नंतर संपूर्ण चीनमध्ये प्रसार झाला. बहुसंख्य लोक या आजाराने मृत्यमुखी पडले हा आजार हवेत पसरणारा विषाणूमुळे पसरणारा असल्यामुळे नाकाद्वारे शरिरात जाऊन फुफूसाची कार्यक्षमता प्रभावित करतो, परिणामी रक्तात ऑक्सिजन मात्रा कमी होते आणि व्यक्ती अस्तव्यस्त होते. रोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी सर्वप्रथम चीन याने संपूर्ण ताळेबंदी लावली त्यानंतर संपूर्ण जगातील वेगवेगळ्या देशात पसरला यावर संपूर्ण टाळेबंदी हाच एक उपाय समोर होता जेणे करून ह्या रोगाचा प्रादुर्भाव रोखता येईल वेगवेगळ्या देशात संपूर्ण ठिकाणी जमावबंदी घालण्यात आली कामाचे ठिकाण, सार्वजनिक वाहतूक, खेळाची मैदाने, स्पर्धा व सराव हे थांबविण्यात आले आणि त्याचा प्रभाव पूर्ण जगातील क्रीडा क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात झाला.

**सुचनक शब्द –** संसर्गजन्य आजार, उपाय, क्रीडास्पर्धा, शारीरिकक्षमता,

**प्रस्तावना –**

करोना ही महामारी डिसेंम्बर २०१९ पासून पूर्ण जगात वेगाने पसरली. करोना हा आजार संसर्गजन्य आजार म्हणून जागतिक आरोग्य संघटनेने वैष्णविक महामारी म्हणून घोषित केला. एका अदृश्य विषाणूमुळे हा आजार वेगाने पूर्ण जगात पसरला, लाखो लोक यामध्ये मृत्युमुखी पडले विषाणू नाका व तोडावाटे शरीरात जाऊन फुफूसाची कार्यक्षमता कमी करून परिणामी रक्तात ऑक्सिजन मात्रा कमी होते. नाक वाहने, सर्दी, अंगदुखणे, डोके दुखणे हे प्राथमिक लक्षणे असतात, नंतर रोगीला हॉस्पिटलमध्ये स्थानांतर करून ऑक्सिजन लावण्याची वेळ येत होती, ज्या लोकांचे रोगाविषयी लढण्याची शारीरिक रोग प्रतिकार क्षमता कमी आहे आणि ज्यांना विविध हृदय, मधुमेह व इतर आजारांनी अगोद ग्रासले आहेत त्यांना या आजारात आपले प्राण गमवावे लागले संपूर्ण जगात पूर्ण मानव जातीवर हे संकट ओढवले गेले लोकांना आपले रोजगार गमवावे लागले स्वतःजवळ असलेली जमापुंजी या आजारमुळे लोकांना गमवावी लागली करोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण जगात टाळेबंदी करण्यात आली. सर्व नागरिकांना घरातच राहण्याचे आदेश सरकारद्वारे दिले गेले याचा मोठा प्रभाव क्रीडाविश्व व स्पर्धा आणि खेळाडूंवर झाला स्पर्धा, मैदाने, सराव सत्रे संपूर्ण शासकीय आदेशानुसार बंद करण्यात आले. खेळाडूंना घरीच रहावे लागत होते. त्यामुळे खेळात मिळवलेली प्राविणता शारीरिक क्षमता, तांत्रिक कौशल्य, तंत्र सरावा अभावी कमी झाले व त्यामुळे विविध समस्या क्रीडा क्षेत्रावर आल्या त्यावर मात व उपाय काय असावे त्याबद्दल तज्ञ लोंकांची मार्गदर्शन करण्यात आले. विविध ऑनलाइन चर्चा, प्रशिक्षणसत्रे, शाळा, महाविद्यालय, विद्यापीठेमार्फत घेण्यात आलेत्याचा काही प्रमाणात फायदा खेळाडू, प्रशिक्षक सामान्य नागरिक याना झाला.

कोविडचा प्रसार कमी करण्यासाठी सरकारने क्रीडा स्थळे, मैदाने, व्यायामगृहे, शाळा, महाविद्यालय बंद करून करोना आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. तरुण खेळाडू, प्रशिक्षक आणि संस्थांसाठी गेल्या १८ महिन्यांपासून संघटित खेळातील व्यत्यय हे आव्हानात्मक होते कारण ते बदललेले दिनचर्या, प्रशिक्षण आणि स्पर्धांबाबत अनिश्चितता आणि व्यावसायिक खेळाडूसाठी त्यांच्या व्यावसायिक क्रीडा कारकीर्दीमध्ये नकारात्मक प्रभाव पडला भविष्यात असल्या आकस्मिक आणीबाणी परिस्थितीसाठी मंथन करून मार्गदर्शने, विविध, धोरणे ठरवत उपायबाबत नियोजन करणे भविष्यकालीन गरज आहे.

**करोना महामारीमुळे क्रीडा क्षेत्रावर झालेला परिणाम–**

**१. क्रीडा महासंघ आणि संघटना –** सरकार अंतर्गत सरकारी क्रीडा महासंघ, संघटना व जगभरातील महासंघयांच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या विविध वयोगटातील स्पर्धा कोविड प्रसार रोखण्यासाठी थांबविण्या आल्या. क्लब, संघटनांना सुरक्षितता, आरोग्य, श्रम आणि इतर आंतरराष्ट्रीय मानके व मार्गदर्शन सूचना देऊन भविष्यातील क्रीडा स्पर्धा सुरक्षित आनंददायक बनवण्यासाठी व भविष्यातील क्रीडा स्पर्धांना सुविधा देण्याच्या उद्देशाने एक संघ म्हणून सहकार्याने कार्य करण्यास मार्गदर्शक सूचना भविष्यासाठी महत्वाच्या ठरतील त्यासाठी क्रीडा महासंघ आणि संघटनां याना ठोस पावले उचलावी लागणार आहे.

**२. व्यावसायिक क्रीडा परिणाम –** उत्पादक, प्रसारक, चाहते, व्यवसाय, मालक आणि खेळाडू यांचा समावेश असलेल्या क्रीडा परिसंस्थेला क्रीडा जगतावरील कोविडचे नकारात्मक परिणाम सोसावा लागला, उत्पादने कमी झाले कामगार कमी करावे लागले साहित्याचा खप कमी झाला. मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सोसावे लागले भविष्यात यावर मात करण्यासाठी नवीन आणि नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याची गरज आहे. यामध्ये भविष्यात सुरक्षित खेळ कार्यक्रम सुनिश्चित करण्यासाठी चाहत्यांमध्ये गुंतण्याचे मार्ग शोधणे, कर्मचारी वर्ग राखणे, नवीन कार्यप्रणाली, स्थळ धोरणे तयार करणे भविष्याची गरज आहे.

**३. तांत्रिक सहकार्य आणि क्षमता विकास –** कोविड ताळेबंदीमध्ये विविध कार्य ऑनलाईन मार्फत केली जात होती. खेळातील जाणकार

व्यक्ती, संघटना, महाविद्यालय, विद्यापीठामार्फत ऑनलाईन कार्यशाळा व विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जात होते त्यामार्फत सामान्य नागरिक व खेळाडू याना विविध पैलुवर चर्चा व खेळाबाबत सखोल ज्ञान प्रदान केले गेले आणि प्रत्येकाला प्रत्येकापर्यंत पोचता आले. सरकार, संयुक्त राष्ट्र संघ व जागतिक आरोग्य संघटना आणि इतर प्रमुख भागधारकांनी, विशेषत: कोविडच्या युगात, आरोग्य आणि कल्याण वाढवण्यासाठी खेळाचा सर्वोत्तम वापर करण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धोरणे आणि दृष्टीकोनांचा विकास आणि अंमलबजावणीला समर्थन देण्यासाठी क्षमता विकास आणि तांत्रिक सहकार्य सेवांची तरतूद सुनिश्चित करण्यासाठी काही धोरणे विकसित करणे काळाची गरज आहे.

**४. सामान्य नागरीकांपर्यंत पोचणे व जागरूकता वाढवणे** – संयुक्त राष्ट्रे, क्रीडा समुदायाने, क्रीडा शिक्षण समुदायासह, जागतिक आरोग्य संघटना आणि सर्वांनी संसर्गजन्य साथीच्या रोगाचा सामना करण्यासाठी वैयक्तिक आणि सामूहिक उपायांबद्दल इतर मार्गदर्शन प्रसारित करणे पुढील काळात गरजेचे आहे. इंटरनेट आणि सोशल मीडियावर मर्यादित प्रवेश असलेल्या समुदायांपर्यंत पोहोचण्यासाठी उपाय योजले पाहिजेत खेळाडू, सामान्य नागरिकाला घरी बसल्या शारीरिक व्यायामबद्दल माहिती ऑनलाइन मार्फत उपलब्ध करून देणे काळाची गरज आहे. राष्ट्रीय, मंत्रालयीन स्तरापासून ते प्रांतीय, महानगरपालिका, जिल्हापरिषद, ग्रामपंचायत स्तरापर्यंत, राष्ट्रीय शारीरिक शिक्षण निरीक्षकापासून खालच्या स्तरापर्यंत क्रीडा शिक्षणाचे योग्य नियोजन करून सामान्य स्तरावर पोचता येईल. शिक्षक, राष्ट्रीय क्रीडा महासंघापासून ते क्लबपर्यंत पोचण्यासाठी नियोजन करणे गरजा ओळखण्यासाठी आणि विशिष्ट उपाय सामायिक करण्यासाठी महत्त्वपूर्ण अभिप्राय प्रदान करते. क्रीडापटू याना साथीच्या काळात आपले आत्मसात केलेले कौशल्य कसे टिकवता येईल याबाबत अधिक माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. साथीच्या रोगाने गंभीरपणे प्रभावित असताना विशेषत: तरुण प्रेक्षक जोखीम समजून घेतात आणि मार्गदर्शन तत्त्वयाची अंबलबजावणी करणे महत्वाचे आहे.

**५. सकारात्मक सामाजिक वृत्ती आणि वर्तनाचा प्रचार करणे** – संपूर्ण जगात ताळेबंदी असताना शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक तंदुरुस्ती, तसेच सामाजिक दृष्टीकोन आणि वर्तन वाढवण्यासाठी क्रीडा शिक्षण हे एक शक्तिशाली माध्यम आहे. आंतरराष्ट्रीय हक्क आणि मूल्यांवर आधारित क्रीडा शिक्षण साधने शारीरिक शिक्षणाची आंतरराष्ट्रीय कार्यक्रम शारीरिक क्रियाकलाप आणि खेळ, दर्जेदार शारीरिक शिक्षण धोरणे आणि क्रीडा मार्गदर्शके शिक्षण हे अनेक ऑनलाइन शारीरिक क्रियाकलापांची खात्री करण्यासाठी अत्यंत संबंधित साधने आहेत. सध्या तैनात केलेले मानांकन लिंग समानता, गैर-भेदभाव, सुरक्षा आणि गुणवत्ता मानकांचे पालन करतात.

**६.मानसिक आरोग्य** – अलगाव एखाद्या खेळाडूच्या कामगिरीची पातळी, निरोगी पोषण आणि दर्जेदार झोप राखण्याच्या क्षमतेला आव्हान देते उच्च उष्मांक असलेले खेळाडू, कमी व्यायाम आणि कंटाळवाणेपणा आणि ताणतणावांसह आरामदायी खाण्याचे मूड-संबंधित प्रेक्षण विकसित करूनही तेच खाण्याचे कार्यक्रम राखू शकतात. झोपेची कमी गुणवत्ता एकाकीपणाशी जोडली गेली आहे यामुळे एखाद्या खेळाडूची बरे होण्याची आणि प्रशिक्षित करण्याची क्षमता कमी होऊ शकते . खराब झोपेच्या गुणवत्तेनंतर प्रशिक्षण आणि स्पर्धेकडे परत येणे कामगिरीमध्ये अडथळा आणू शकते. खेळाडूंची मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी ॲप्सच्या वापराद्वारे निरोगी झोपेच्या पद्धतींना बळकटी दिली जाऊ शकते सामाजिक कार्यक्रम, वर्ग आणि क्रीडा स्पर्धांच्या परिणामी संबंध निर्माण करण्याच्या क्षमतेस प्रतिबंध करते. लोक सोशल मीडिया द्वारे संपर्कात राहू शकतात, परंतु सखोल मैत्री विकसित करण्याच्या कमी संधी आहेत. आश्चर्याची गोष्ट नाही की, ऑनलाइन संप्रेषणावर अवलंबून राहणे सामान्य लोकांमध्ये एकाकीपणा आणि नैराश्याच्या मोठ्या दरांशी जोडलेजाते. क्रीडापटूंमध्ये विशेषत: महिला खेळाडूंमध्ये, वैयक्तिक व सांघिक खेळांमध्ये गुंतलेल्या आणि खालच्या सामाजिक आर्थिक पार्श्वभूमीतील खेळाडूंमध्ये कोविडचा संसर्ग होण्याची भीती असते. या लेखात नंतर चर्चा केल्याप्रमाणे पुरेशा आरोग्य आणि सुरक्षिततेच्या तरतुदींशिवाय क्रीडापटूंना गट प्रशिक्षण आणि स्पर्धेत परत येण्याबद्दल आरक्षण केले जाऊ शकते.

**७.शारीरिक स्वास्थ्य** – नियमित शारीरिक हालचालींचा अभाव शरीरातील चरबी आणि स्नायुंचा शोष वाढण्याशी संबंधित आहे, परिणामी स्नायूंची आकुंचन क्षमता कमी होते. कोविड साथीच्या रोगा अगोदर सामान्य माणसाचे दैनंदिन आयुष्य धकाधकीचे असल्याने चांगल्या आरोग्य सवयी,चुकीचे खानपान, शारीरिक व्यायाम अभाव असल्यामुळे रोग प्रतिकारकशक्ती हीन होते. विशेषतः कोविड विषाणू शारीरिराची रोग प्रतिकारक क्षमता कमी असल्यामुळे या रोगामुळे लाखो लोक मृत्युमुखी पडले. शरीराची रोग प्रतिकारक क्षमता वाढविण्यासाठी चांगला आहार नियमित व्यायाम योगप्राणायम इत्यादी दैनंदिन कार्यक्रमात सामावेश करणे यासाठी ठोस पावले उचलणे भविष्यासाठी गरजेचे आहे. क्रीडा कार्यमान कामगिरीतील घट घरावर-आधारित व्यायाम प्रशिक्षण सत्र किंवा बाह्य एरोबिक क्रियाकलापांच्या रुपांतराने मर्यादित असू शकते, जेथे परवानगी आहे. प्रशिक्षण आणि स्पर्धेत परत येण्यापूर्वी सत्र विभाजन मर्यादित करण्यासाठी सातत्यपूर्ण शारीरिक क्रियाकलाप करणे फायदेशीर ठरेल.

**८.सामाजिक गतिशीलता** – स्पर्धेच्या सर्व स्तरांवर शारीरिक क्रियाकलाप आणि खेळ क्रीडापटू, प्रशिक्षक आणि कुटुंबांमध्ये सामाजिक संवाद साधण्याची संधी प्रदान करतात. प्रशिक्षण किंवा खेळात सामाजिक परस्परसंवाद भावनिक तणावासाठी एककल्पना प्रदान करू शकतात. कोविड साथीच्या रोगाने जागतिक स्तरावर तरुणांना जबरदस्तीने अलगाव आणि वेगवेगळ्या प्रमाणात निर्बंधांचा मोठ्या प्रमाणात परिणाम केला आहे, परिणामी अनेक क्रीडा स्पर्धा आणि सामाजिक क्रीडा स्पर्धांचे वेळापत्रक रद्द करण्यात आले आहे, त्यामुळे आर्थिक नुकसान झाले मनोसामाजिक कार्यावर कायमस्वरूपी परिणाम झाला भविष्यात अशा काळात खेळाडू, पंच, तांत्रिक सहायक, क्रीडा उपकरणे व्यवसायसाठी वेगळे धोरण तयार करणे आवश्यक आहे.

**९. स्पर्धा रद्द, पुढे ढकलणे** – कोविड महामारीच्या काळात संपूर्ण जगात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात येणाऱ्या क्रीडा स्पर्धा उन्हाळी ऑलिंपिकखेळ आणि पॅराऑलिंपिक, हिवाळी ऑलिंपिक, जागतिक खेळ,आशियायी पॅरा खेळ, उन्हाळी जागतिक विद्यापीठ स्पर्धा. देशाअंतर्गत विविध सांघिक आणि वैयक्तिक क्रीडा स्पर्धा रद्द किंवा पुढे ठकलण्यात आल्या अपवाद पुढे ठकलण्यात आलेले ऑलिम्पिक खेळ टोकियो २०२१ व काही अंशी देशाअंतर्गत आय. पी. एल या महामारीमध्ये यशस्वी आयोजन केले गेले. स्पर्धेसाठी वेगळे मार्गदर्शन सूचना प्रसारित करण्यात आल्या, खेळाडूंचे आर्थिक, सामाजिक नुकसान झाले त्यादरम्यान विविध वयोगटातील खेळाडू स्पर्धेतील व योगटातून बाद झाले नंतर एक वर्ष वयोमर्यादा निगडित खेळात सूट दिली गेली. स्पर्धेत तांत्रिक समिती, क्रीडा साधने याची मागणी कमी झाली, सराव आणि स्पर्धा आयोजन संपूर्ण थांबल्याने मैदानाच्या दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागला भविष्यात अश्या समस्यांना सामोरे जाण्यासाठी विशेष असे धोरण निश्चित करण्यात येणे काळाची गरज आहे.

**१०. स्पर्धेसाठी विचार –** खेळ संघटना खेळाडू व आपल्या संघाच्या सदस्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आणि स्पर्धा करण्यासाठी सुरक्षित वातावरण प्रदान करणेबाबत काही मार्गदर्शक माहिती प्रस्तापित केले पाहिजे त्यात कोविड संसर्गाच्या लक्षणांबद्दल जागरूकता, मास्क घालणे, शारीरिक अंतर, पेयाच्या बाटल्या, खाद्यपदार्थ आणि भांडी, रुमाल, कपडे, संपूर्ण लसीकरण, संरक्षणात्मक खेळाचे उपकरण आणि प्रशिक्षणात आणि स्पर्धा करताना हाताची स्वच्छता आवश्यक असते. महामारी काळात स्पर्धा आयोजनसाठी बायोबबल्स संकल्पना राबवुन स्पर्धा आयोजन केले जाऊ शकते समुदायातील कोविड हॉट स्पॉट्स येथे तापमानाची तपासणी करणे आणि संभाव्य संसर्गजन्य प्रकरणांशी संपर्क साधण्याबाबत प्रश्न विचारणे उपयुक्त ठरते. मोबाइल फोन ऍप्सक्विक रिस्पॉन्स क्यू, आर. कोडचा वापर लोकांच्या हालचालींचा मागोवा घेण्यासाठी, कार्यक्षम संपर्क ट्रेसिंग सक्षम करण्यासाठी उपयुक्त ठरलेलाआहे.

**११.स्पर्धा, सराव नियोजन व निर्मूलन धोरण –** खेळाडूंनी त्यांचे स्वतःचे लेबल केलेले क्रीडा उपकरणे आणि कपडे सांभाळावेत. जेथे प्रशिक्षणामध्ये व्यायाम शाळेतील कामाचा समावेश असतो, तेथे शारीरिक अंतर मार्गदर्शन, परवानगी देणे आवश्यक आहे. कोविडची लागण होण्याचा धोका कमी करण्यासाठी प्रशिक्षण आणि स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघातील सदस्यांसाठी प्रवास आणि निवास व्यवस्था वेगळे करणे आवश्यक आहे. सरकारने खेळात टप्प्याटप्प्याने परत येण्यासाठी उपयुक्त मार्गदर्शक तत्त्वे प्रदान केली आहेत ज्यात प्रशिक्षकवर्ग, प्रेक्षक यांचे तपासणीकरणआणि प्रवास, व्यावहारिक सल्ला प्रदान करणे समाविष्ट आहे.

**१२. क्रियाकलापावर श्रेणीबद्ध परतावा –** कोविड संसर्गानंतर क्रीडापटू पुन्हा क्रीडा क्रियाकलापांकडे परत येत असताना त्यांच्यासाठी शारीरिक आणि मानसिक स्तरावरविचार करणे गरजेचे आहे. प्रशिक्षण आणि स्पर्धेकडे परत येण्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे पुराव्यावर आधारित नसून तज्ज्ञांच्या शिफारशींवर आधारित आहेत. देशांमधील परिवर्तनशीलता प्रदर्शित करतील. खेळाडूना आपल्या मागील उत्कृष्ट क्रीडा कार्यमान परत मिळवण्यासाठी खेळ प्रशिक्षण तज्ज्ञांनी वेगळे मार्गदर्शन सूचना खेळ संघटना यांनी खेळाडूंना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे जेणेकरून खेळाडू आपले क्रीडा तंत्रकौशल्य परत मिळवून किंवा राखून ठेवता येईल. काळ विभाजन खेळाडूंच्या प्राथमिक अवस्था सौम्य, मध्यम प्रमाणे विभागून स्तरीकरण करून क्रीडा क्रियाकलापांकडे परत येण्यासाठी काळ विभाजनासाठी तज्ज्ञांच्या शिफारसी करणे काळाची गरज आहे. त्याबाबत धोरणे तयार करण्याची गरज आहे.

**सारांश –**

कोविड साथीच्या रोगाने समुदायातील संघटित खेळात व्यत्यय आणला आहे, कारण विषाणूचा प्रसार कमी करण्याच्या धोरणाचा एक भाग म्हणून अधिकाऱ्यांनी खेळातील सहभाग रद्द केला व मोठ्या प्रमाणात बदल केला किंवा पुढे ढकलला, तरुण खेळाडूआणि त्यांच्या कुटुंबांवर त्यांच्या मानसिक–सामाजिक, शारीरिक आणि करिअरच्या प्रगतीच्या विचारांच्या संबंधात याचा महत्त्वपूर्ण प्रभाव पडला. टाळेबंदीच्या अडचणी, वैद्यकीय सेवेच्या वितरणासाठी अकार्यक्षम राष्ट्रीय क्षमतेवर मात करण्याची गरज आहे. स्थानिक, राष्ट्रीय, संघटना, क्रीडा विकास महासंघ आणि जगभरात प्रभावी लस कार्यक्रम राबविणे, पुरेशी सामूहिक प्रतिकारशक्ती विकसित करणे बाबत जनजागृती शासनातर्फे त्यासाठी मार्गदर्शन सूचना प्रकाशित करणे काळाची गरज आहे. वातावरण निर्माण करणे यांनी खेळाच्या स्पर्धा ,सराव शिबिरे भविष्यात कश्या प्रकारे आयोजन करावे त्याबाबत तज्ञ मार्गदर्शकाचे मार्गदर्शन सूचना प्रकाशित करण्यात याव्या क्रीडा मैदाने रखरखावसाठी विशेष आकस्मिक आर्थिक तरतूद करावी व सर्व बाबी लक्षात घेऊन हा व्यत्यय काही वर्षे कायम राहण्याची शक्यता आहे. सहभागी, प्रशिक्षक, पंच, प्रशासक आणि निरीक्षकांसाठी खेळात परत येण्याच्या सुरक्षिततेबद्दल आत्मविश्वास वाढवणे त्यांना नुकसान भरपाई कश्या प्रकारे करता येईल त्याबद्दल मंथन करून योग्य तो निर्णय भविष्य निर्वाहासाठी घेणे काळाची गरज आहे.

**संदर्भ**

१) सॅम्युअललुई, लोबो, यिंग-कान लॉ, जॉर्ज, कोविड-१९ महामारीचा खेळ आणि व्यायामावर होणारा परिणाम एशिया-पॅसिफिक जर्नल ऑफ स्पोर्ट्स मेडिसिन.
२) कोरोना व्हायरस : व्हायरसने जगभरातील क्रीडा स्पर्धांवर कसा परिणाम केला आहे बीबीसी १२ मार्च २०२०
३) कोविड -१९ शैक्षणिक व्यत्यय आणि प्रतिसाद. युनेस्को ४ मार्च २०२० . २४ मे २०२०.
४) शाळा बंद होण्याचे प्रतिकूल परिणाम. युनेस्को १० मार्च २०२०, १५ मार्च २०२०.
५) दूरस्थ शिक्षण उपाय, युनेस्को ५ मार्च २०२०, २३ मार्च २०२०.
६) फ्रेडन टी. इबोलाचे धडे: यशस्वी साथीच्या प्रतिसादाचे रहस्य, सीएनएन १५ मार्च २०२०
७) https://en.m.wikipedia.org/wiki/ImpactšofšthešCOVID19špandemicšonšsports.

# आदिवासींच्या आर्थिक विकासात वन उत्पादने आणि वनयोजना

**भाग्यश्री सदाशिवराव होले**
जळगाव जिल्हा मराठा विद्याप्रसारक सह समाज संचालित
श्री एस. एस. पाटील आर्ट्स महाविद्यालय जळगाव.

**सारांश –**

आदिम काळापासून आदिवासी हे मुख्य प्रवाहापासून वेगळे असून त्यांचे मुख्य आश्रयस्थान वने आहेत, वनातून निघणाऱ्या विविध उत्पादनातून त्यांच्या दैनंदिन गरजांची पूर्तता होते, परंतु सध्याच्या आधुनिक युगात वन उत्पादने आणि वनापासून निघणाऱ्या तत्सम उत्पन्न साधने हे वृक्षतोडीमुळे आणि लोकसंख्यावाढीमुळे विभागले गेले किंबहुना ते अल्प स्थरावर आले आहे पण अशा काळातही सध्या वनौषधी, वन भाज्या यांचे महत्व वाढत आहे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणात वाढत आहे. वन उत्पादनांना आदिवासींच्या आर्थिक विकासात खूप मोठा वाटा आहे परंतु अशिक्षितपणा, आधुनिक संसाधनांची कमतरता, बाजारपेठेचा अभाव, शासनाच्या विविध योजनांची माहिती नसणे, त्यामुळे योग्य तो भाव त्यांच्या उत्पादनांना मिळत नाही आणि त्यामुळेच त्यांना जो आर्थिक लाभ व उत्पादनापासून मिळायला हवा तो मिळतोच असे नाही. या संशोधनामध्ये आदिवासी समाजाला व उत्पादनातून मिळणारा आर्थिक लाभ किती मिळतो त्याचबरोबर त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढीसाठी शासन स्तरावरील विविध योजना आदिवासींच्या उत्पन्नवाढीसाठी योगदान सामाजिक संघटनांचे आणि वन उत्पादनासाठी शासन स्तरावरील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या धर्तीवर वन उपज बाजार समिती केंद्रीय योजनांचा अभ्यास याकरिता या विषयाचे संशोधन महत्त्वाचे आहे.

**मुख्य शब्द –** आदिवासी, वन उत्पादने, विकास, योजना.

**प्रस्तावना –**

जगातील सर्व देशात आदिवासी जमाती अस्तित्वात आहेत. विशेषतः आशिया, आफ्रिका आणि अमेरिका या खंडामधील देशात आजही आदिवासी जमाती मोठ्या प्रमाणात आढळतात. भारतात आदिवासी जमाती मोठ्या संख्येत असून त्या भारतभर पसरलेल्या आहेत. अरण्यात राहणारे म्हणून 'वनवासी' तसेच पर्वतावर राहणारे म्हणून 'गिरिजन' असे शब्द वापरले जातात राहणारी जमात आणि आदिवासी हा शब्द रुढ झालेला आहे हिंदीत 'जनजाती'हा शब्द वापरतात असे विविध शब्द असले तरी मराठीत 'आदिवासी' हा शब्द जास्त प्रचलित झालेला दिसून येतो.

आदिवासींची वस्ती सामान्यतः अरण्यात किंवा राज्यातील दऱ्याखोऱ्यात असते. मात्र तिथे पर्वत किंवा अरण्य नाही तिथेही काही आदिवासी जमाती सापडतात. भारतात अनेक आदिवासी जमाती असून त्या सर्व घटक राज्यांमध्ये तसेच काही केंद्रशासित प्रदेशांमध्ये पसरलेल्या आहेत. काही जमाती लोकसंख्येने फार मोठ्या तर काही संख्या मर्यादित स्वरूपाची आहे. सामान्यतः डोंगराळ प्रदेश दऱ्याखोऱ्यात करण्यात त्यांचा परंपरागत निवास आढळतो डोंगर पट्ट्यावरून तसेच नद्यांच्या खोऱ्यातील मार्गाने त्यांचे स्थलांतर मोठ्या प्रमाणात झालेले आहे काही जमातीत अजूनही प्रगत आणि आधुनिक वस्त्यांमधून दूर घनदाट जंगल किंवा पर्वतावर राहत असून त्यांच्या जवळ जाऊन पोचणे अवघड वाटते अर्थात त्यामुळे बाह्य संस्कृतीशी संबंध असून त्यांच्या जमातीची मूळ संस्कृती, परंपरा रूढी, धर्म संकल्पना यांचे जतन मोठ्या प्रमाणात झालेले दिसते. महाराष्ट्र राज्याची भौगोलिक क्षेत्र ३ लाख ७ हजार ७१३ चौरस किलोमीटर असून त्यापैकी ५७४७ चौरस किलोमीटर क्षेत्र आदिवासी उपाय योजनेखाली येते २०११ च्या जनगणनेनुसार राज्याची एकूण लोकसंख्या ९ कोटी ६८ लाख ७९ हजार एवढी आहे त्यात आदिवासी लोकसंख्या म्हणजे ८५ लाख ७७ हजार आहे राज्यात एकूण पंचेचाळीस जमाती आहेत खोला कातकरी, माडिया गोंड या तीन जमाती आदिम जमाती म्हणून अधिसूचित केले आहे राज्यात ३५ जिल्ह्यांपैकी धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, ठाणे, चंद्रपूर ,गडचिरोली, भंडारा, गोंदिया ,अमरावती, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये आदिवासी संख्या मोठ्या प्रमाणात राहतात. महाराष्ट्रात एकूण ६३८६७ चौरस किलोमीटर भूभाग वन व्याप्त असून हा भाग राज्यांच्या भौगोलिक क्षेत्राच्या २१ टक्के एवढा आहे म्हणूनच आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक विकासात वनविषयक कामे महत्त्वाची भूमिका बजावतात या कामांमध्ये मुख्य ते मुख्य आणि गवळण म्हणून उत्पादन घेणे वनीकरण आणि रोपांची लागवड वन्य पशू जीवन आणि निसर्ग संवर्धन संरक्षण इत्यादी कामांचा समावेश होतो वनात मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेली व उत्पादने वनविभाग जंगल कामगार सहकारी संस्था व विकास महामंडळ महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ इत्यादी मार्फत पुरवला जाणारा रोजगार इत्यादींद्वारे उपलब्ध होणाऱ्या रोजगारावर आदिवासींची आर्थिक परिस्थिती मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. पूर्वी आदिवासींच्या अज्ञान व अशिक्षितपणामुळे वन कंत्राटदारांकडून शोषण केले जात होते म्हणून आदिवासींना शोषणमुक्त करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने वेगवेगळे अधिनियम तयार केलेले आहेत उदाहरणार्थ १९६६ महाराष्ट्र आदिवासी आर्थिक स्थिती सुधारणा अधिनियम, १९७६ मेंदू आणि आपटा पानांचे राष्ट्रीयीकरण करणे अधिनियम, आदिवासी उपाय योजना २०१४–१५ मध्ये वेगवेगळ्या वनविषयक योजनांसाठी खर्च १०९४५.९९ लागीची तरतूद करण्यात आली या वाल्याविषयक योजनांद्वारे आदिवासींना दारिद्र्य रेषेच्या वर आणण्यासाठी त्यांच्या मिळकत क्षमतेत वाढ करून उद्देशांची पूर्तता होते.

**वनातील उत्पादने –** बिजा, एन, हळद, तिवस हे महाराष्ट्रातील उत्पादने आहेत. गोंद, लाख, हिरडा, मोह, आवळा, पडळसपाज, मुरुडशेंग, मधमेठा, जनावरांची कातडी, कुसुम, तेंदु, खिरमी, मोहाची फुले, सर्व प्रकारच्या वेली हे आदिवासी जमातींच्या आर्थिक विकासात भर घालणारी व उत्पादने आहेत.

**संशोधन पद्धती –**

प्रस्तुत लघुशोधनिबंधाच्या लेखनासाठी प्राथमिक सामग्रीतून निरीक्षण तंत्राचा आणि द्वितीयक सामग्रीतून संदर्भग्रंथ, नियतकालिके, इंटरनेट या स्तोत्रांचा वापर करण्यात आला आहे.

**वन कायद्यातील तरतुदीनुसार योजना –**

१) औद्योगिक व व्यापारी उपयोगांसाठी असणाऱ्या इमारती लाकूड, बांबूचा पुरवठा करण्याकरिता त्या प्रजातीची वृक्ष लागवड करणे, कमी प्रतीच्या वनांचे आर्थिक दृष्टया सबळ वनांमध्ये परिवर्तन करणे.
२) निकृष्ट वनांचे पुर्नवनीकरण ही गोष्ट वनांचा दर्जा वाढवणे वनांची घनता वाढवणे या योजनेचे उद्दिष्ट आहे .
३) किरकोळ उत्पन्नाचा विकास जंगल उत्पन्नाचा विकास-वनक्षेत्रात फळझाडांचे प्रमाण वाढवणे वनक्षेत्रात हिरडा, चंदन खेडी इत्यादी प्रजातींच्या वृक्षांची लागवड करून वनसंपत्तीचे प्रमाण वाढविणे वनक्षेत्रातील वनवासीना रोजगार उपलब्ध करून देणे या योजनेचे उद्दिष्ट आहेत.
४) वनकामगार वन सेवक वर्ग यांच्यासाठी सुखसोयी-वनांचे संरक्षण संवर्धन करण्यासाठी दुर्गम भागात कार्यरत असणाऱ्या वनाधिकारी असतील कर्मचारी यांना सोयी-सुविधा पुरवणे आवश्यक असते सदर योजनेसाठी आदिवासी क्षेत्र उपयोजना अंतर्गत निधी मंजूर झाला आहे.
५) संयुक्त वनव्यवस्थापन-वनांचा दर्जा वाढविणे लोकांच्या सहभागाने वनांचे संरक्षण करून लोकांना उद्युक्त करण्यासाठी लोकोपयोगी कामे घेणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.
६) रोपवन कार्यक्रम-वनीकरणाच्या माध्यमातून रोपवन कार्यक्रम ही योजना राबविण्याचे प्रयोजन केले आहे.
७) दळणवळण-दळणवळणाच्या योग्य रस्त्या अभावी वनवासींच्या वर्षातून पाच ते सहा महिने शहरांशी,गावांशी असलेला संपर्क हा विस्कळीत होत असतो यांच्या संरक्षणाकरिता वाला रस्ते व वाहतूक अत्यावश्यक आहे नवीन योजना राबविण्यासाठी वारंवार भेटी देण्यासाठी रस्तेही गरजेचे आहेत.
८) अग्नीपासून वनांचे संरक्षण-अवैध वृक्षतोड पासून व अग्नीपासून वनांचे संरक्षण करणे वन्य प्राण्यांचे रक्षण करणे अवैध उत्खनन अतिक्रमण बाबींवर आळा घालण्यासाठी योजना आहेत तसेच वनविभागातील रोपवाटीका बळकटीकरण करणे.
९) वनक्षेत्रातील पर्यटनस्थळांचा विकास-आदिवासी शेत्र व आदिवासी क्षेत्राबाहेरील वनविभाग असलेल्या पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी २०१४-१५ करिता राज्यस्तरीय योजनांसाठी आदिवासी विकास उपाय योजनेअंतर्गत निधी उपलब्ध आहे.
१०) दगडी चेम डॅम बांधणे-पाणी आडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबविण्यासाठी व भूगर्भातील दिवसेंदिवस खालावलेली विकासाची पातळी भरून काढण्यासाठी वन्य प्राण्यांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करण्यासाठी ही योजना आहे.

**वनबंधू कल्याण योजना –** वनबंधू कल्याण योजना ही भारतातील वंचित घटकांच्या कल्याणासाठी भारत सरकारने एक उपक्रम म्हणून सुरू केली आहे. भारतातील आदिवासी लोकसंख्येच्या सर्वांगीण विकासात योगदान देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.वनबंधू कल्याण योजना आदिवासी कार्य मंत्रालयाने जुलै २०१४ मध्ये सुरू केली आहे. या योजनेंतर्गत, भारत सरकार भारतातील आदिवासी लोकांचे जीवनमान आणि सामाजिक-आर्थिक पैलू सुधारणने हा आहे.योजनेच्या अंमलबजावणीसाठी १०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. संपूर्ण भारतात या योजनेच्या प्रभावी आणि सुरळीत अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला होता. त्यामुळे वनबंधू कल्याण योजना उत्तम दर्जाचे जीवनमान आणि संधी उपलब्ध करून देते. आदिवासी लोकसंख्या आणि इतरांमधील पायाभूत सुविधा आणि शैक्षणिक आणि पात्रतेतील तफावत कमी करण्यासाठी ही योजना मदत करेल. ही योजना आदिवासी लोकसंख्येच्या संस्कृती आणि वारशाचे संरक्षण आणि जतन करण्यात मदत करेल.त्यामुळे वनबंधू कल्याण योजना उत्तम दर्जाचे जीवनमान आणि संधी उपलब्ध करून देते. आदिवासी लोकसंख्या आणि पायाभूत सुविधा, शैक्षणिक आणि पात्रतेतील तफावत कमी करण्यासाठी ही योजना मदत करेल. ही योजना आदिवासी लोकसंख्येच्या संस्कृती आणि वारशाचे संरक्षण आणि जतन करण्यात मदत करेल.

प्रत्येक राज्यातील आदिवासी लोकसंख्येच्या गुणोत्तरावर आधारित योजनेच्या अंमलबजावणीसाठी संपूर्ण भारतातील एकूण दहा राज्यांची निवड करण्यात आली आहे. योजनेअंतर्गत आंध्र प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, तेलंगणा, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश, ओरिसा, झारखंड, महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील आदिवासीनी या योजनेचा लाभ आर्थिक उत्पण वाढीसाठी करून घेणे गरजेचे आहे त्यातूनच विकास साधणे शक्य होईल.

**वन धन योजना –** केंद्रीय स्तरावर नोडल विभाग म्हणून आणि राष्ट्रीय स्तरावर नोडल एजन्सी म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १४ एप्रिल २०१८ रोजी आदिवासी व्यवहार मंत्रालयासोबत सुरू केलेली वनधन योजना समाज कल्याणासाठी एक विचारपूर्वक केलेला हा मास्टर प्लॅन आहे देशातील आदिवासी लोकसंख्येचा आर्थिक विकास करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. वनधन योजनेचा मुख्य उद्देश आदिवासी लोकांसाठी उपजिविकेचे साधन निर्माण करणे आहे त्यांना उद्योजक बनवणे आहे. आदिवासी समुदायाची जंगले असलेल्या ठिकाणी आदिवासी विकास केंद्र स्थापन केलेली आहे आदिवासी भागात पन्नास हजार मानधन विकास केंद्रे स्थापन करण्याचे सरकारने योजले आहे. वन उपजावर प्राथमिक प्रक्रिया आणि मूल्यवर्धन आधी उपलब्धता सुनिश्चित करणे आणि आदिवासींना रोजगार उपलब्ध करून देणे याकरिता योजना राबवली जात आहे.

या योजनेंतर्गत फळ कँडी (आवळा, अननस, जंगली सफरचंद, आले, अंजीर, चिंच), जाम (अननस, आवळा, जुजुब), रस आणि स्क्वॅश (अननस, आवळा, जंगली सफरचंद, मनुका, बर्मी द्राक्ष), मसाले (दालचिनी, हळद, आले), लोणचे (बांबू शूट्स, किंग चिली मिरची) आणि प्रक्रिया केलेले गिलॉय, सर्व वन धन विकास केंद्रांवर प्रक्रिया केलेले आणि पॅकेज केले जातात आणि TribesIndia.com da Tribes India आउटलेट्सद्वारे विकले जातात परंतु मार्केटिंग बाजारात केले जाते.

केंद्र सरकारच्या भारतीय जनजातीय विपणन संघामार्फत (ट्रायफेड) महाराष्ट्रात प्रधानमंत्री वन धन विकास योजना राबवली जात आहे. त्या अंतर्गत

राज्य सरकारने आदिवासी भागातील स्वयंसहायता बचत गटांच्या मदतीने जंगलांच्या भागातील उत्पादनांवर मूल्यप्रक्रिया करून त्याची विक्री करण्यासाठी राज्यात २२० वन धन विकास केंद्रे स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. योजना राबविण्यासाठी राज्याचा आदिवासी विकास विभाग मध्यस्थ म्हणून काम करणार आहे. नाशिकच्या शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत योजना राज्यात राबवित आहे.

अशाप्रकारे आदिवासींचे साधी निर्वाह प्रधान अर्थव्यवस्था शेती व शेतमजुरी व त्यांचे संकलन आणि शिकारी आदिवासीचे मिळवण्याची साधने आहेत आदिवासीच्या एक वैशिष्ट्य आहे.

आदिवासींमध्ये संख्या वृत्तीचा अभाव असल्याने नियोजित परस्पर व्यवहार केले जातात,नैसर्गिक शक्तीच्या सहाय्याने परीक्षणातून आर्थिक क्रिया केल्या जातात अर्थ उत्पादन साधनांची उपलब्ध किमान गरजा यामुळे आर्थिक जीवनात चढ-उतार असतात याकरिता विकासाच्या विविध योजनांची माहिती आदिवासी बांधवांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. आदिवासी समूहासाठी गावांसाठी जास्त मोलाचा आहे तो सामुदायिक हक्क. या हक्काचा उपयोग आदिवासी पारंपारिक वनवासी यांच्या विकासासाठी व्हायला हवा वन कायदा २००६ अंतर्गत आदिवासी व इतर पारंपारिक वनवासींना खूप चांगल्या प्रकारे हक्क म्हणून उदरनिर्वाहाचे साधन मिळाले वनांची मूळ मालकी जीवन विभागाकडे असली तरी या हक्कासाठी उदरनिर्वाहासाठी व जीवनमान उंचावण्यासाठी फायदा करता यावा यासाठी आदिवासींना मदत करणे गरजेचे आहे आदिवासी विकास विभाग हा यासाठी केंद्रस्थानी काम करत आहे तरी वनविभाग, जलसंपदा ,कृषी, फलोत्पादन, महसूल, ग्रामविकास या सरकारी लागतो हा कायदा लागू करण्यात महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे आज बऱ्याच गावांमध्ये संयुक्त वनव्यवस्थापन समिती, पर्यावरण विकास समिती, जैवविविधता संवर्धन समिती, पाणलोट समिती अशा समित्यांची आवश्यकता आहे अशा विविध समित्या न ठेवता या कामासाठी एकच समिती राहिली तर त्याच त्या समितीत वनशेती वन हक्का धारकांना शाश्वत उत्पन्न मिळवून देणे वनांचे क्षेत्रांची संरक्षण करणे या दोन्ही बाबी करता येईल याविषयी वनविभागाने शास्त्रीयदृष्ट्या वाणांचे संवर्धन करण्यासाठी वापरलेल्या निरनिराळ्या पद्धती यांची योग्य ती सांगड घातली गेल्यास आदिवासींच्या दृष्टी उदरनिर्वाहाचे साधन तर होईलच त्याचबरोबर जीवनमान सुधारण्यास मदत होईल. वनांची माहिती आदिवासी बांधवांना पर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष –**

- आदिवासींच्या आर्थिक उत्पन्नाचे मुख्य स्रोत हे वन उत्पादने आहेत.
- आदिवासींच्या आर्थिक उत्पन्नवाढीसाठी विविध संस्था शासनाच्या योजना आणि समाजसेवक कार्यरत आहेत.
- वन उत्पादनात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊन आर्थिक विकास साधला जाऊ शकतो आणि याची माहिती आदिवासी समाज घटकाला नाही ती त्यांच्यापर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे.
- आदिवासी वन उत्पादने विक्री करताना विविध अडचणींचा सामना करावा लागतो अशावेळी सरकारच्या योजनांचा ते लाभ घेऊ शकतात.
- आदिवासी नावाने उत्पादनांच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या तसेच बाजार भाव याची माहिती मिळू शकते.
- वन उत्पादनावर आधारित असणाऱ्या आदिवासी समाजाची आर्थिक स्थिती हालाखीची आहे ती सुधारण्याकरिता वन योजना लाभदायी ठरू शकतात.

**संदर्भ**

१) डॉ. एस. जी. देवगांवकर,आदिवासी विकास प्रशासन, साईनाथ प्रकाशन, धरमपेठ नागपूर. पृष्ठ क्रमांक २,२२७.
२) डॉ. जयश्री महाजन प्रा. सागर बडगे,आदिवासी समाज :संस्कृती आणि आरोग्य (२०१७) अथर्व पब्लिकेशन.
३) योजना-आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र शासन- संदर्भ प्रकाशन.
४) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१९-२० अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.
५) जनजातीय सहकारी विपणन विकास महासंघ जनजातीय कार्य मंत्रालय,(ट्राइफेड) भारत सरकार.

**वर्तमानपत्रातील लेख –**

१) सुनील लिमये, संरक्षण वनांचे आणि आदिवासींचीही. महाराष्ट्र टाईम २९ ऑगस्ट २०१९.
२) महेंद्र महाजन, आदिवासी बांधवांचा वनावर अधिकारासाठी केंद्राचा पुढाकार, सकाळ ७ जुलै २०२१.
३) डॉ. संजय दाभाडे, आदिवासींना कायदाच उखडणार उखडणार? लोकसत्ता ७ मार्च २०१९

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# भारतीय नव-आध्यात्मिक संघटनांतील महिला वैभूतिक नेतृत्व

**प्रा. भालचंद्र देविदास पाटील**
सहयोगी प्राध्यापक (समाजशास्त्र)
गी. द. म. कला, के. रा. न. वाणिज्य व म. धा. विज्ञान महाविद्यालय, जामनेर

**प्रा. डॉ. दिलीप राजाराम चव्हाण.**
सहयोगी प्राध्यापक (समाजशास्त्र)
ज. जि. म. वि. प्र. चे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, जळगाव

**सारांश –**

आध्यात्मिक मार्ग हा व्यक्तीच्या आत्मोन्नतीचा मार्ग भारतीय तत्त्वज्ञानात सांगितलेला आहे. मात्र काही अपवाद वगळता महिलांसाठी हे क्षेत्र पूर्वीच्या काळी बंद होते.भारतीय समाजात नव्याने निर्माण झालेले काही नव-आध्यात्मिक संघटन लिंगभाव निरपेक्ष आहेत. आध्यात्मिक संघटनांच्या नेतृत्वाभोवती वैभूतिक दैवी गुणाधिष्ठित अधिसत्तेचे वलय असते. त्यामुळेच त्यांचा प्रचार-प्रसार आणि अनुयायांमध्ये वृद्धी होते. जे अनेक महिला या नव-आध्यात्मिक संघटनाच्या प्रमुखपदी विराजमान आहेत. त्या आपल्या अनुयायांना प्रभावी असे आध्यात्मिक मार्गदर्शन करतात. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अशा भारतीय वैभूतिकमहिला नेतृत्वाचा स्वीकार केल्याचे दिसून येते.

**पारिभाषिक शब्द –** विभूती,नेतृत्व,अध्यात्म,आध्यात्मिकता,योग,ध्यान,मोक्ष,इ.

धर्म आणि आध्यात्मिकता यांचा भारतीय समाजावर मोठा प्रभाव आहे. प्राचीन काळापासूनच धार्मिकता आणि आध्यात्मिक साधना यांचे आकर्षण भारतीय समाजात आढळते. आध्यात्मिक साधनेद्वारे मोक्ष प्राप्ती करणे हे मानवी जीवनाचे प्रमुख उद्दिष्ट मानले होते. मुक्ती किंवा मोक्षाप्रत केली जाणारी वाटचाल ही अत्यंत कठीण होती. त्याग, समर्पण, सातत्य आणि नियमितपणा, अनुशासन, इ. महानतम सद्गुणांना आत्मसात करून या उद्दिष्टास प्राप्त करण्याचा प्रयत्न असंख्य लोक करीत असत. वर्णाश्रम व्यवस्थेच्या कालखंडात व्यक्ती जीवनाची चार टप्प्यात आश्रमांच्या रूपात विभागणी केली होती. त्यातील अंतिम टप्पा म्हणजेच संन्यासाश्रम हा मोक्षप्राप्तीचा आश्रम होता. जीवनाचा हा आराखडा केवळ उच्चवर्णीयांपर्यंतच मर्यादित होता. शूद्रांना व स्त्रियांना तपश्चर्या व आध्यात्मिक साधना करण्याचा अधिकार नव्हता.

वरील विवेचनाच्या संदर्भात अध्यात्म व आध्यात्मिकता म्हणजे काय या मुद्द्यांची चर्चा होणे आवश्यक आहे. हिंदू धर्म तत्त्वज्ञानानुसार संपूर्ण सृष्टी ही परमात्म्याचा अंश आहे. हे संपूर्ण विश्व केवळ ब्रह्माचा अंश आहे. ब्रह्म, परमात्मा, शिव हेच अंतिम सत्य असून जग मिथ्या आहे. जीवात्मा म्हणजेच जीव हा परमात्म्याचा अंश आहे. मात्र जीवाला आपल्या मूळ स्वरूपाचा विसर पडून तो पशू, पक्षी, कीटक, जिवाणू, मनुष्य इ. चौऱ्यांशी लक्ष जन्म घेत फिरत राहतो. म्हणजेच जन्म-मृत्यूच्या चक्रात अडकतो या चक्रातून सुटका करून जीवात्म्याचे परमात्म्यामध्ये विलीन होणे हे जीवात्म्याचे अंतिम ध्येय आहे. त्यालाच मोक्षप्राप्ती असे म्हणतात. मनुष्यजन्म ही मोक्षप्राप्तीसाठी मोठी संधी आहे. किंबहुना मोक्ष प्राप्ती ही केवळ मनुष्य जन्मातच प्राप्त केली जाऊ शकते; म्हणून माणसाने केवळ भौतिक सुखात रममाण न होता धर्मनिहीत जीवनाचे अनुसरण करून मोक्ष प्राप्ती करून जन्ममरणाच्या फेऱ्यातून आपली सुटका करून घ्यावी असे हिंदू धर्म तत्वज्ञान सांगते. स्थूल मानाने या विचारालाच अध्यात्मवाद असे म्हटले जाते. सर्वसामान्य व्यक्तीसाठी आध्यात्मिक मार्गाचे अनुसरण करणे सुलभ व्हावे यासाठी विविध आध्यात्मिक गुरू या संदर्भात मार्गदर्शन करतात. गुरुदर्शित मार्गाचे अनुसरण करून जीवात्मापरमात्म्याला प्राप्त होतो. गुरु आपल्या शिष्यांना सांसारिक बंधनांपासून मुक्तीचा मार्ग दर्शवितात. अशी श्रद्धा व मान्यता जनमानसात आढळते.

प्राचीन काळापासून आध्यात्मिक जीवनाचे पथप्रदर्शक व शिष्यांचे उद्धारक म्हणून गुरु ही संकल्पना हिंदू धर्मात अत्यंत घट्टपणे रुजलेली आहे. गुरुविना मोक्ष नाही किंवा गुरु बिन कौन बतावे बाट- संत कबीर,गुरुर्वा पारमेश्वरी अनुग्राहिका शक्ती म्हणजे परमेश्वराची अनुग्रह शक्ती ही गुरुंमधून प्रवाहित होते. श्री गुरु हे परमेश्वरा पेक्षा भिन्न नाहीत. त्यांनी परमेश्वराशी एकात्म अवस्था प्राप्त केलेली असल्याने, ते आपल्या शिष्यांमध्ये ही शक्ती प्रवाहित करून त्यांना देखील परमेश्वराचे रूप दाखवू शकतात. किंबहुना तूच परमेश्वर आहेस अशी अनुभूती आणून देतात. शिष्यांना आपल्यासारख्या पूर्णत्वाच्या स्थितीस पोहोचविण्याचे सामर्थ्य गुरूंमध्ये असते. ह्या श्रद्धेतूनच गुरु ही एक सामान्य व्यक्ती न राहताअसामान्य अशी विभूती बनते. गुरूंना आलेला एखादा विशिष्ट असा उच्चतम आध्यात्मिक अनुभव इतरांसाठी आदर्श ठरतो. त्यातूनच त्या विशिष्ट अनुभवाद्वारे गुरुंकडे शिष्य म्हणून लोक आकर्षित होत जातात व त्याद्वारेच विशिष्ट अशा आध्यात्मिक संघटनाची अथवा संप्रदायाची निर्मिती होते. आपला आध्यात्मिक अनुभव सार्वजनिक करून संप्रदायाचा प्रसार करण्याचे कार्य प्रमुख गुरूपासून ते अनुयायांपर्यंत संप्रदायाचे सर्वच सदस्य करतात. अशा आध्यात्मिक संघटनांचे नेतृत्व गुरु करतात गुरुंकडील हे नेतृत्व अर्थातच त्यांच्याकडे असलेल्या विशिष्ट आध्यात्मिक शक्तीमुळे आलेले असते. संघटना सदस्यांची ही श्रद्धा गुरूंना विभूती बनविते आणि गुरु अथवा संघटनप्रमुख यांचे नेतृत्व वैभूतिकनेतृत्व (Charismatic Authority) बनते जे संघटनामध्ये सर्वोच्च (Supreme) तर असतेच परंतु संपूर्ण जगात केवळ आपले गुरूच श्रेष्ठ आहेत, पूर्णत्वास गेलेले परमेश्वर आहेत; ही भावना संघटनाच्या सदस्यांमध्ये आढळते.

समाजशास्त्रात विभूती ही संकल्पना सर्वप्रथम मॅक्स वेबर यांनी १९२२ मध्ये मांडली.

Charisma is a whole revolutionary power that may lead to change of vital courses of ethos and action and complete Re orientation of all attitude to any single life form and to the world in general. - Max Weber

Charisma is a certain quality of an individual personality by virtue of which he is set apart from ordinary men and

treated as endowed with Supernatural , Superhuman or at least specifically exceptional powers or qualities. - Max Weber

Charisma हा शब्द मूळ ग्रीकभाषेतील Charizasthus ह्या क्रियापदापासून तयार झालेला आहे ज्याचा अर्थ to favor असा दिलेला आहे. Charisma या इंग्रजी शब्दाचा केंब्रिज डिक्शनरी नुसार special power that some people have naturally that makes them able to influence other people and attract their attitudes, attract their attentions and admiration. असा दिलेला आहे.

मराठी भाषेत Charisma ह्या शब्दासाठी विभूती असा प्रतिशब्द योजण्यात येतो. विभूती शब्दाचे पुढीलप्रमाणे अर्थ सांगितले जातात.

१. **भस्म किंवा राख** – आध्यात्मिक संघटन प्रमुख किंवा गुरू हे शिष्य अथवा अनुयायांच्या दुःखाची आणि अज्ञानाची राखकरतात. त्यांना भस्म करून टाकतात. अशी श्रद्धा अनुयायांमध्ये असते आणि त्यामुळेच संघटन प्रमुख किंवा गुरुंना दैवी गुणांसह श्रेष्ठ स्थान प्राप्त होते.

२. **ऐश्वर्य, तेज किंवा भव्यता** – आध्यात्मिक संघटनाचे प्रमुख आपल्या अनुयायांसाठी संपूर्ण विश्वाचे धनी असतात. ते तेजोमय आणि भव्य असतात. त्यांची कीर्ती सर्वत्र व्यापलेली असते. ही भावना संघटन प्रमुखास वैभूतिक नेतृत्व प्रदान करते.

३. **अणिमादि अष्टसिद्धी** – अणिमा म्हणजे सूक्ष्म. सूक्ष्म रूपात परिवर्तित होण्याची गुरूंमध्ये क्षमता असते. सूक्ष्म रूपाने ते शिष्यातील समग्र दोषांचे निराकरण करतात आणि त्यास पवित्र बनवितात. अणिमा, महिमा, लघिमा, गरिमा, प्राप्ती, प्राप्त, इशिता आणि वशिता या अशा पारलौकिक आणि आत्मिक शक्ती आहेत ज्या तप आणि साधनेद्वारे गुरु अथवा संघ प्रमुखांना प्राप्त असतात आणि त्यामुळेच त्यांना वैभूतिक नेतृत्व प्राप्त होते.

४. **ईश्वरीय महापुरुष** – विभूती शब्दाच्या या अर्थानुसार आपल्या आध्यात्मिक संघटनेचे प्रमुख अनुयायांसाठी ईश्वरासमान असतात. किंबहुना ईश्वरापेक्षा देखील गुरुंचे स्थान उच्च मानलेले आहे. गुरू की महिमा हरी से अधिकाई ही उक्ती आपणास हेच दर्शविते. किंवा संत कबीर यांच्या म्हणण्यानुसार गुरु गोविंद दोनो खडे, काके लागू पाये। बलिहारी गुरू आपने जिन गोविंद दियो बताये।। अर्थात गुरु आणि परमेश्वर दोन्हीही एकाच वेळेस समोर आल्यास मी पहिल्यांदा गुरूंचे चरणस्पर्श करीन कारण गुरुमुळेच मला ईश्वराचे दर्शन झाले आहे, असे विवेचन कबीर करतात. हरौरूष्टेगुरूस्त्राता- श्री गुरुगीता अर्थ: हर म्हणजे शिव रुष्ट झाले तरी गुरू आपल्या शिष्याचे त्यांच्या क्रोधापासून संरक्षण करतो. शिष्याला तारतो कारण तोच त्राता आहे. म्हणूनच सर्वंकष प्रयत्नांच्याद्वारे श्रीगुरुंना शरण गेले पाहिजे.

भारतीय तत्वज्ञानात विविध धर्मग्रंथांमध्ये अशाप्रकारे आध्यात्मिक संघटना प्रमुखांना ईश्वरीय स्वरूप प्रदान केलेले आढळते. हा दृष्टिकोन सर्वसामान्य अनुयायांमध्ये गुरु आणि त्यांच्या आध्यात्मिक मार्गाविषयी श्रद्धा आणि निष्ठेचा मार्ग आत्यंतिक दृढ बनवितो. आध्यात्मिक साधना मार्ग आणि गुरूंवरील निष्ठा अनुयायांना त्यांच्या वर्तनात आमूलाग्र बदल घडविण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे जीवनात परिवर्तन येते; अशा प्रकारचे अनेक अनुभव अनुयायी विविध माध्यमांमधून व्यक्त करतात.

वैभूतिक अधिकार प्राप्त व्यक्तीचे नेतृत्व हे परिपूर्ण आणि संघटन व त्याद्वारे आरंभित मोहिमेस यशस्वितेकडे, पूर्णत्वाकडे नेणारे असते. अशा विभूतींची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगितली जातात.

१. **दैवी गुणसंपन्नता** – विभूती ह्या दैवी गुणसंपन्न असतात. हे गुण इतर सर्वसामान्य व्यक्तींपेक्षा अद्भुत असतात. वेगळे असतात. हे गुण अशा विभूती मध्ये जन्मजात असतात किंवा त्यांना त्यांच्या आध्यात्मिक साधनेतून अथवा त्यांच्या गुरूंच्या कृपेने प्राप्त झालेले असतात. अशा दैवी गुणांमुळे ते आपल्या अनुयायांचा उद्धार करतात; अशी श्रद्धा अनुयायांमध्ये आढळते.

२. **प्रेरक व्यक्तिमत्व** – वैभूतिकअधिकारप्राप्त नेतृत्वाचे अंगी प्रेरणांचा स्रोत असतो. त्यांचे व्यक्तिमत्व इतरांसाठी प्रेरक असते. आपल्या प्रत्येक प्रकारच्या कृतीतून, विचार, वाणी व भौतिक कृतीतून ते अनुयायांना प्रेरणा देतात. त्यांचा दृष्टिकोन परिवर्तीत करू शकतात.

३. **सुस्पष्ट अभिव्यक्ती** – विभूती म्हणून मान्यताप्राप्त महान व्यक्तींच्या अंगी सुस्पष्टता असते. विचार, संवेदना आणि भावना प्रकट करण्याची अलौकिक क्षमता त्यांच्यामध्ये असते. भारतीय आध्यात्मिक तत्वज्ञानात ईश्वराचे सगुण आणि निर्गुण रुप वर्णिलेले आहे. सगुण स्वरूपाचे वर्णन सहज अभिव्यक्त करता येते. तथापि विभूतीमध्ये हे कौशल्य असते की ते निर्गुण स्वरूपालासुद्धा सुस्पष्ट अभिव्यक्त करू शकतात. कारण त्यांनी त्याचा अनुभव घेतलेला असतो अशी अनुयायांची मान्यता असते.

४. **प्रभावी वक्तृत्व** – बहुतांश आध्यात्मिक नेतृत्वाकडे अत्यंत प्रभावी वक्तृत्व शैली असते. यामुळे जनसामान्यांना त्या आकर्षित करू शकतात आणि आपला संदेश त्यांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचवू शकतात. आधुनिक काळात तर धार्मिक अथवा आध्यात्मिक नेतृत्वाकडे उच्चतम वक्तृत्वशैली असणे ही एक अनिवार्य अशी अत्यावश्यक बाब मानली जाते. विविध दूरचित्रवाहिन्या आणि अन्य माध्यमांवरील आधुनिक आध्यात्मिक गुरू आपल्या वक्तृत्वाद्वारे प्रवचन प्रवचनांमधून भक्त मंडळींना प्रभावित करीत असल्याची अनेक उदाहरणे आपल्याला सांगता येतील.

५. **भावनिक सहसंबंध** – संघटना, संघटना सदस्य अथवा अनुयायांबरोबर वैभूतिक नेतृत्वाचे भावनिक सहसंबंध प्रस्थापित झालेले असतात. अनुयायांच्या भावना सहजपणे त्यांना जाणवतात. याउलट अनुयायी देखील संघटन प्रमुखांच्या भावना ओळखून त्यानुसार कृती करण्याचा प्रयत्न करतात. किंबहुना आपल्या संघटन प्रमुखांसोबत भावनिक तादात्म्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न ते करतात. ही एक आध्यात्मिक प्राप्ती मानली जाते. गुरु-शिष्य संबंधांमध्ये भावनोत्कटता याद्वारे निर्माण होते.

६. **संवेदनशीलता** – वैभूतिक नेतृत्वाच्या अंगी संवेदनशीलता हा एक महत्त्वाचा गुण मानला जातो. अनुयायांच्या भावना, त्यांच्या आवश्यकता भौतिक अधिभौतिक इतकेच नव्हे तर वनस्पती, प्राणी, इतर व्यक्ती, जीवजंतू यांच्याविषयी देखील त्यांचे मनात संवेदनशीलता असते. यातूनच त्यांच्या अंगी संतत्व आणि दैवी गुणांचे प्रकटन होते. संत एकनाथांनी वाळवंटात कडक उन्हात तहानेने व्याकूळ होऊन मरणासन्न झालेल्या गाढवाला आपल्या कावडीतील गंगेचे पाणीपाजून जीवदान दिल्याची कथा सर्वश्रुत आहेच.

७. **सर्वस्तरीय संपर्क** – समाजाच्या सर्वच स्तरातील लोकसमूहासोबत प्रभावी संपर्क प्रस्थापित करण्याचे कौशल्य अशा वैभूतिक अधिकारप्राप्त

नेतृत्वाच्या अंगी असते. भारतीय समाजात आध्यात्मिक क्षेत्रात वर्तमानकाळात समाजाच्या सर्वच स्तरातील म्हणजेच जात, लिंग, वर्ण, संपत्ती, सत्ता इ. निकषांवर आधारित व्यक्ती सहभागी होताना दिसतात. अशा सर्वच व्यक्तींसोबत निरपेक्ष संपर्क प्रस्थापित करून त्यांना आपलेसे करण्याचे कौशल्य खऱ्या आध्यात्मिक विभूतीमध्ये असते. वैभूतिक नेतृत्वाच्या वरील वैशिष्ट्यांशिवाय दूरदृष्टी, ध्येयनिश्चिती, उत्तरदायित्वाची भावना, सुस्पष्ट दृष्टिकोण, हीदेखील काही वैशिष्ट्ये आढळतात.

वरील वैशिष्ट्यांसह युक्त अशा अनेक विभूतींनी भारतीय आध्यात्मिक क्षेत्रात आपला प्रभाव निर्माण केलेला आहे. प्राचीन काळापासून विविध संप्रदाय, भक्तिमार्ग, आध्यात्मिक पंथ, यांच्या माध्यमातून समाजाला प्रभावित केले आहे. तथापि हे प्रभावक्षेत्र निर्माण करण्यामध्ये पुरुष संत महात्म्यांचा वाटा अधिक होता. पुरुषसत्ताक, वर्णवर्चस्ववादी समाजरचनेत अध्यात्म आणि तपश्चर्येचा अधिकार स्त्रियांना नाकारला होता. असे असले तरी, निव्वळ मोजक्या स्त्रियांची प्राचीनकाळी देखील आपली आध्यात्मिक उन्नती केल्याची निवडक उदाहरणे आहेत.

आध्यात्मिक क्षेत्र खऱ्या अर्थाने स्त्रियांसाठी खुले झाले ते तेराव्या शतकात. भारताच्या विविध भागात सुरू झालेल्या भक्ती आंदोलनामुळे धर्म आणि धार्मिकता यांच्या परिभाषेत मूलगामी स्वरूपाचा बदल झाला. भक्ती तत्वाचा संबंध धार्मिकतेशी जोडला गेला. त्यामुळे धार्मिकता ही केवळ व्रतवैकल्ये, कर्मकांडे, उच्च वर्णव पुरुषसत्ताक अशी मर्यादित न राहता नामस्मरण, संकीर्तन, कीर्तन अशा सुलभ साधनांच्या द्वारे जनसामान्यांपर्यंत पोहोचली.

कनिष्ठ वर्ण तसेच स्त्रियांसाठी देखील आध्यात्मिक क्षेत्र खुले झाले. महाराष्ट्रात वारकरी संप्रदायात अनेक महिला संत होऊन गेल्यात. परंतु त्यांनी स्वतःचा असा कोणताही संप्रदाय किंवा अध्यात्मिक संघटना स्थापन केल्याचे दिसत नाही. तथापि ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतीय अध्यात्म क्षेत्र पश्चिमेस प्रसारित झाले. याचा परिणाम अधिक व्यापक आणि खुला करण्यासाठी झाला.आध्यात्मिक क्षेत्रातील खुलेपणाचा परिणाम अर्थातच आध्यात्मिक नेतृत्वावर देखील झाला.

आध्यात्मिक संप्रदायामध्ये स्त्रियांचा सहभाग केवळ साधक अथवा साधिका एवढ्यापुरता मर्यादित न राहता काही आध्यात्मिक संघटनांचे व्यवस्थापन, प्रशासन आणि नेतृत्वाची धुरा देखील स्त्रिया सांभाळू लागल्या. इतकेच नव्हे तर संघटनप्रमुख म्हणून वैभूतिक नेतृत्व पत्करून त्यांनी मोठा असा अनुयायांचा वर्ग निर्माण केल्याचे दिसते. महिला आध्यात्मिक गुरू आणि त्यांचे पुरूष शिष्य व अनुयायी असे चित्र दिसू लागले. पुढील काही उदाहरणांवरून स्त्रियांच्या वैभूतिक नेतृत्वाची कल्पना येईल.

१. **श्री. सारदा देवी** – प्रसिद्ध आध्यात्मिक गुरू श्री रामकृष्ण परमहंस यांच्या पत्नी. ठाकूरमा या नावानेदेखील त्यांची ओळख. रामकृष्ण परमहंस यांच्या शिष्यांनी आदरपूर्वक पवित्र माता म्हणून त्यांना संबोधले. त्यांच्या जन्मजात अशा साधेपणाचा व शिष्य, पत्नी आणि शिक्षक, गुरू अशा आपल्या भूमिका अत्यंत समर्पित भावनेने पार पाडल्या त्याचा सकारात्मक परिणाम रामकृष्ण मठातील इतर अनुयायांवर झाल्यामुळे त्यांनी रामकृष्ण परमहंस यांच्या नंतर शारदा देवीचे वैभूतिक नेतृत्व सहजपणे स्वीकारले होते. अर्थात सारदा देवींच्या वैयक्तिक आध्यात्मिक योग्यतेबरोबरच रामकृष्णांच्या पत्नी या वारसयुक्त नात्यामुळे देखील सदर वैभूतिक नेतृत्वाचे अभिसरण त्यांच्याकडे झाले असे देखील दिसते.

२ **श्री दया माता** – पूर्वाश्रमीच्या Rachel Faye Wright, परमहंस योगानंद यांच्या शिकवणीचा प्रसार. योगोदा सोसायटी ऑफ इंडिया या परमहंस योगानंद यांनी स्थापन केलेल्या एकमेव आध्यात्मिक संघटनेच्या तृतीय अध्यक्ष. संघमाता म्हणून ओळख. Self Realization आत्मसाक्षात्कार या उद्देशासाठी कार्यरत संस्था.

३. **मृणालिनी माता** – पूर्वाश्रमीच्या Merna Brown. योगोदा सोसायटी ऑफ इंडियाच्या चतुर्थ अधिपती. त्यांची निवड स्वतः परमहंस योगानंद यांच्याद्वारे करण्यात आली होती. परमहंस योगानंद यांनी आपल्या उत्तराधिकारी म्हणून स्त्रियांची व त्यातही विदेशी वंशाच्या स्त्रियांची निवड केली होती हे दिसते.

४. **माता निर्मला देवी** – माताजी म्हणून भक्त गणांमध्ये प्रचलित. सहजयोग ह्या ध्यान प्रधान योग मार्गाची स्थापना. ४ मे १९७० रोजी मुंबई जवळ समुद्रकिनाऱ्यावर संपूर्ण रात्रभर ध्यानस्थ. पाच मे रोजी विश्वाचे सहस्रार चक्र उघडताना त्यांनी पाहिले आणि सहज योग ध्यानधारणा अस्तित्वात आणली. जगभरातील जवळपास १२० देशांमध्ये सहज योगध्यानाचा प्रसार झालेला असून अनुयायांची मोठी संख्या आहे. भारतातील विविध शहरे व गावांमध्ये सहजयोगाची ध्यान केंद्रे आहेत. त्यामधून माताजी निर्मला देवी प्रणित सहजयोगाचे ध्यान केले जाते. माताजींच्या फोटोसमोर बसून शिष्य ध्यान करतात. शिष्याच्या सर्व प्रकारच्या भौतिक–अधिभौतिक आणि आध्यात्मिक अडचणींवर माताजींचे ध्यान हा प्रभावी उपाय आहे; अशी मान्यता शिष्यांमध्ये आढळते. कुंडलिनी शक्तीचे जागरण करून मनुष्याला सर्वव्यापी परमात्म्याची चैतन्य अनुभूती माताजींच्या कृपेने अगदी सहज व विनासायास प्राप्त होते. म्हणूनच यास सहजयोग असे म्हटले जाते. निर्मला मातांचा कोणीही उत्तराधिकारी नाही.

५. **गुरुमाई स्वामी चिद्विलासानंद** – गणेशपुरी, जिल्हा ठाणे येथील गुरुदेव सिद्धपीठ आणि सिद्धयोगाच्या अधिष्ठात्री. स्वामी मुक्तानंद यांचेकडून दीक्षाद्वारे सिद्धपीठाचे प्रमुख गुरूपद प्राप्त. भगवान नित्यानंद, स्वामी मुक्तानंद आणि गुरुमाई चिद्विलासानंद अशा पद्धतीने वैभूतिक नेतृत्वाचे हस्तांतरण. सिद्धयोगाची संपूर्ण जगात साधना केंद्रे, आश्रम आणि अनुयायी मोठ्या संख्येने आहेत.दानम्आत्मज्ञानम्हे सिद्ध योगाचे ब्रीद आहे. गुरु आपल्या कृपेने शिष्यातील सुप्त अशा कुंडलिनी शक्तीला जागृत करून त्यास पूर्णावस्थेस पोहोचवतात. शिष्यांमध्ये आत्मयोग्यतेचा भाव निर्माण करतात. ध्यान, स्वाध्याय, मंत्रस्मरण, गुरुसेवा ही साधनेची काही रूपे आहेत.

६. **मीरा माता किंवा मदर मीरा** – या आंध्र प्रदेशातील असून त्यांचे दर्शन हाच शिष्यांसाठी प्रमुख अभ्यास मानला जातो. हे दर्शन मूक रुपाने घ्यावयाचे असते. आपल्या दृष्टीपाताद्वारे त्या अनुयायांमधील अज्ञानाचे बंध तोडून ज्ञान प्रकाशाची प्राप्ती करून देतात; अशी भावना शिष्यांमध्ये आढळते. पृथ्वीवर आध्यात्मिक प्रगती सुलभ करणे, हेच आपले उद्दिष्ट असल्याचे त्या सांगतात. मदर मीरा ह्या स्वतः गुरु असून त्या कुणाच्याही उत्तराधिकारी नाहीत. तसेच आपण गुरु असल्याचा दावा देखील करीत नाहीत. त्यांची शिकवण मुख्यतः भक्ती या घटकाशी संबंधित असून ईश्वराप्रती समर्पण हे मुख्य साधन असल्याचे त्या मानतात. त्यांच्यावर योगी अरविंद घोष यांच्या विचाराचा प्रभाव आहे.

७. **प्रजापिता ब्रह्मकुमारी –** ब्रह्मकुमारी ही एक आध्यात्मिक संघटना असून १९३० मध्ये लेखराज कृपलानी यांनी तिची स्थापना केली. या संघटनेचे संपूर्ण व्यवस्थापन महिलांच्या द्वारेच केले जाते. तेच शिवबाबा किंवा ब्रह्मा बाबा म्हणून ओळखले जातात. माउंट अबू, राजस्थान या ठिकाणी या संस्थेचे मुख्यालय आहे. १४० देशांमध्ये जवळपास ८००० सेवा केंद्रे सध्याच्या काळात अस्तित्वात आहेत. सध्या दादीरतन मोहिनी ह्या संघटनेच्या प्रमुख म्हणून कार्यभार सांभाळतात. दादी जानकी आणि दादी हृदय मोहिनी त्यांना सहकार्य करतात.

वरील काही उदाहरणांच्या द्वारे भारतातील नव-आध्यात्मिक संघटनांच्या वैभूतिक नेतृत्वाची धुरा महिला संघटन प्रमुखांनी समर्थपणे सांभाळली आहे असे दिसते. हे नेतृत्व त्यांच्याकडे मॅक्स वेबरच्या सिद्धांताप्रमाणे वारसा हक्काने, गुरुद्वारे दीक्षा मार्गाने विशेषाधिकार प्रदान करून किंवा स्वतःच आध्यात्मिक संघटनेची स्थापना करून आलेले आहे.

**निष्कर्ष –**

१. आधुनिक भारतीय समाजात नव-आध्यात्मिक संघटनांच्या माध्यमातून महिला वैभूतिक नेतृत्वाचा स्वीकार समाजाने केलेला आहे.
२. पुरुषप्रधान, वर्चस्ववादी समाज असूनदेखील आध्यात्मिक क्षेत्रात नेतृत्वाच्या संदर्भात लिंगभाव निरपेक्षता आढळते.
३. वैभूतिक नेतृत्वाची निवड वारस, दीक्षा आणि स्वयंनिर्मिती अशा प्रकारांनी झाल्याचे आढळते
४. आध्यात्मिक क्षेत्रातील योग, ध्यान, शक्तिपात इ. गूढ आणि सूक्ष्म क्रिया करण्याचे अधिकारदेखील लिंगभाव निरपेक्ष पद्धतीने महिला आध्यात्मिक नेतृत्वाकडे हस्तांतरित झाल्याचे दिसते.
५. भारतीय महिला वैभूतिकनेतृत्वाचा स्वीकार भारताबाहेर इतर राष्ट्रांमध्ये देखील झाल्याचे दिसते.
६. विदेशी पाश्चात्त्य वंशाच्या महिला देखील भारतीय नव-आध्यात्मिक संघटनांचेनेतृत्व करतात असे देखील दिसून येते.

**संदर्भ**

१. बिवलकर, र. वा. महाराष्ट्र के प्रमुख साधना संप्रदाय. कौस्तुभ प्रकाशन नाशिक, १९८८.
२. सरदार, गं. बा. संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९७०.
३. गोखले, वा. दा. अनुभवामृत. नीलकंठ प्रकाशन पुणे, १९६८.
४. गुरुमाई चिद्विलासानंद सिद्धयोग दीक्षा. चितीशक्ती प्रकाशन, चेन्नई, २०००.
५. रानडे, रा. द. हिंदी संत वाङ्मयातील परमार्थ मार्ग, गजेंद्रगडकर पुणे, १९९२.
६. कुलकर्णी, पी. के. संस्थांचे समाजशास्त्र, विद्या प्रकाशन नागपूर, १९९७.
७. सहजयोग ध्यान केंद्र, सहजयोग परिचय पुस्तिका, सहजयोग ध्यान केंद्र, २००७.
८. Mehta,Uday. Modern Godmenin India. Popula, 1993.
९. Saliba,John. Perspectives on New Religious Movements. Jeoffery Chapman,1999.
१०. Robinson,Rowena.Sociology of Religion in India. SGE, 2006.

Webs -
http://www.yogajournal.com
http://www.vedicfeed.com
http://www.balancegurus.com
http://www.angsuman.medium.com
http://www.syda.org
http://www.sahajyoga.org
http://yssofindia.org
http://mother meera.com
http://www.wikipedia.org

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# मराठी साहित्य आणि संस्कृती

**प्रा. देशमुख सुरेखा विठ्ठल**
श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य, विज्ञान
महाविद्यालय, मांडवगण फराटा ता. शिरूर जि. पुणे

**प्रस्तावना–**

मराठी भाषकांचे मौखिक–लिखित मुद्रित साहित्य आणि त्यांची संस्कृती यामध्ये अनुबंध आहे. हे अनुबंध उलगडण्याचा प्रयत्न थोडक्यात प्रस्तुत पेपर मध्ये मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

संस्कृती असलेल्या लोकसमूहाची साहित्य ही एक अभिव्यक्ती आहे आणि साहित्यकृतीतून याच लोकसमुहाच्या विविध अवस्थांचे चित्रण होत असते. त्यामुळे साहित्यकृतींचे आकलन करुन घेताना वाचकांना– समीक्षकांना त्या भाषकांच्या संस्कृतीचे भान असणे आवश्यक ठरते.

**उद्दिष्ट्ये –**

१. मराठी साहित्याची ओळख करुण देणे.
२. संस्कृती संकल्पना स्पष्ट करणे.
३. मराठी भाषेची ओळख करुण देणे.
४. मराठी साहित्य व संस्कृती यांचा सहसंबंध स्पष्ट करणे.
५. संस्कृतीचे संवर्धन व संक्रमण करणे.

साहित्य आणि समाज आणि संस्कृती यांच्या अनुबंधा ची चर्चा तीन अंगाने करता येऊ शकते.

१) साहित्याची निर्मिती विशिष्ट स्थलकालबद्ध अशा सामाजिक,सांस्कृतिक आणि वाङ्मयीन वातावरणात होत असल्याने साहित्याचा समाज आणि संस्कृतीशी संबंध येतो

२) साहित्यात सामाजिक सांस्कृतिक स्तिथीगती, वास्तव, विचारप्रणाली मूल्य व्यवस्थांचे चित्रण केले जाते. साहित्यगत प्रतिमित सामाजिक सांस्कृतिक वास्तव हे प्रत्यक्षगत सामाजिक सांस्कृतिक व्यवस्थेशी प्रत्यक्ष अटळ नाते असते. या अंगाने साहित्याचा समाज आणि सांस्कृतीशी संबंध येतो

३) साहित्य हे वाचक आणि समाज मनावर काही एक संस्कार करते. हा परिणाम सौंदर्यात्मक, वाङ्मयीन, सामाजिक आणि वैचारिक स्वरूपाचा असतो. या अंगाने साहित्य हे समाज आणि संस्कृतीच्या जडणघडणीत सहभागी होत असते. तसेच संस्कृती ही साहित्याच्या जडणघडणीत सहभागी होत असतो. परिणामाच्या अनुषंगाने हे संबंध द्वंद्वात्मक अथवा परस्पराश्रयी असतात साहित्य आणि संस्कृती यांच्या अनुबंधाची मुद्यांच्या अनुषंगाने उपरोक्त चर्चा करण्यापूर्वी साहित्य आणि संस्कृती या संकल्पनेचा ही अर्थ सुस्पष्ट करणे अभ्यासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल.

**साहित्य** – मराठी भाषेतील साहित्य ही संकल्पना इंग्रजीतील Literature या शब्दाला पर्यायी म्हणून उपयोजिली गेली. इंग्रजीतील literature या शब्दाचा शब्दकोशात अर्थ कला मूल्य असलेले लेखन, साहित्य विशिष्ट विषयावरचे वाङ्मय माहिती देणारे छापील वाङ्मय असा आहे. तसे साहित्य हा शब्द संहित या धातूपासून निर्माण झालेला असून साहित्याचा अर्थ एकत्र ठेवलेला असा आहे. साहित्याचा व्यावहारिक अर्थ सामानसुमान असा ही आहे. परंतु आपण साहित्याचे अभ्यासक म्हणून आपल्याला साहित्याचा जो अर्थ अभिप्रेत आहे. तो मौखिक, लिखित सर्जनशील साहित्य असा होय. परंतु मराठीत म्हणजे अशा सर्जनशील साहित्यासाठी वाङ्मय सारस्वत विदग्ध वाङ्मय, ललित वाङ्मय अशा पर्यायी संकल्पना उपयोजिल्या जातात. आजमितीस साहित्य आणि वाङ्मय या दोन संकल्पनाचा प्रामुख्याने आपण वापरतो .मराठी मध्ये साहित्या शिवाय मोठ्या प्रमाणात प्रचलित असलेली दुसरी संकल्पना म्हणजे वाङ्मय आता वाङ्मय याचा अर्थ वाक् (वाणी ) असा होतो परंतु जो वाणी युक्त आहे ते सर्वच वाङ्मय असे म्हणता येत नाही. त्या प्रमाणेच जे जे लिहले जाते त्या लिखित साहित्यालाही साहित्य म्हणता येत नाही. या संरचनातील अतिव्याप्तीचा दोष टाळून आपण ज्या सर्जनशील साहित्याचा शोध घेतो ते ललित साहित्य होय. काटेकोरपणे निर्माण करण्यासाठी म्हणून साहित्याचा ललित व ललितेतर असा प्रकार भेद केला जातो. संस्कृत परंपरेमध्ये साहित्य असा शब्दप्रयोग इ.स. ९०० च्या सुमारास केला गेला. साधारणपणे रुद्रटा नंतर साहित्यशास्त्र हे काव्यामिमांसेचे मार्गदर्शक शास्त्र म्हणून रूढ झाले. तत्पूर्वी यास अलंकारशास्त्र असे संबोधले जात असे व त्या शास्त्राच्या आचार्यांना आलंकारिक अशी पदवी प्रदान केली गेली. प्राचीन काळात रस, गुण, रीती इत्यादीसाठी व्यापक अर्थाने अलंकार ही संकल्पना उपयोजली गेली की शब्दाअर्थालंकार इ. मर्यादित अर्थाने. अलंकार या संकल्पने शिवाय साहित्य या अर्थाने क्रियाकल्प अशी ही संकल्पना वापरली गेली. क्रियाकल्प याचा अर्थ काव्य करण्याचे नियम असा आहे. इ.स. ९०० च्या दरम्यान काव्यमिमांसेचे शास्त्र या अर्थाने साहित्यही संकल्पना उपयोजिली गेली आणि शब्द व अर्थ यांचे परस्परांना अनुरूप असे सौंदर्यशाहीत्व म्हणजे साहित्य असे स्थूलमानाने ठरले.

प्राश्चात्य परंपरेत साहित्याच्या व्याख्या, लक्षणे, सत्वाची चर्चा करून त्याचे स्वरूप स्पष्ट करण्याचा व्यक्तीगत व विविध प्रकारांनी प्रयत्न केला. पाश्चात्यांनी Literature आणि Imaginative Literature असा स्पष्ट फरक केलेला दिसतो अनुकृतीवादी अँरिस्टॉटलने साहित्य ही जीवनाची सर्जक अनुकृती मानून ते विश्वात्मकतेची सत्वाची अनुकृती मानले व ते शब्द भाषेच्या माध्यमातून जीवनाची अनुकृती करते असे म्हटले. तर भावनाविष्कार आत्मविष्कार संबोधले. भावना विष्कारवादी वर्डस्वर्थने केलेली व्याख्या देखील हे स्पष्ट करते.

Poetry is the spontiuious overflow of powerful feeling.It take, if origin from emotion and recollected in tranquility . ही

व्याख्या सर्व प्रसिद्ध आहे. त्यांच्या मते काव्य म्हणजे भावनांचा सहजस्फूर्त उत्कट तीव्र उद्रेक होय. रुपवादी परंपरेत साहित्य आणि काव्याची चर्चा भाषिक आणि रूप किंवा संरचनेच्या अंगाने केली आणि सेंद्रिय एकात्मता, अनेकार्यता, विरोधाभासात्मकता, व्यक्ती निरपेक्षपता, संदर्भात इ. सिद्धांत मांडले गेले.

वॉरन/क्लेफे यांनी मौखिक भाषा, कथनात्मकता, कल्पितता, संघटना, रुपबंध, व्यक्तीनिष्ठ अभिव्यक्ती, व्यावहारिक प्रयोजनाचा अभाव इ. विशेषांच्या आधारे साहित्य व अन्य लेखनात भेद केलेला आहे आणि त्यानंतर ह्या समीक्षकांनी साहित्य कलाकृती म्हणजे अर्थबाहुल्ययुक्त व विविध संबंधयुक्त गुंफणीतून स्तरीकरण झालेली एक जटिल स्वरूपाची संघटना असते असे म्हटले. साहित्याला जीवनानुभवाचा आविष्कार करते, जीवनाचा वेगवेगळ्या पद्धतीने अन्वयार्थ लावला जातो. साहित्य मूल्यांच्या संकल्पना असल्याने त्यामध्ये विविधता आढळते. म्हणूनच डब्ल्यू वी गॅलीने साहित्य ही स्वभावतः वादग्रस्त संकल्पना आहे असे म्हटले आहे. साहित्य ही एक व्यामिश्र व अनेकांगी घटना आहे. म्हणून साहित्याची एकच एक व्याख्या असंभव आहे. म्हणून त्याच्या अंगविशेषाद्वारे केवळ स्वरूप स्पष्ट करता येऊ शकते. आपल्या कडे प्रा. गंगाधर पाटील यांनी साहित्याची सात अंगे सांगितली आहेत. या ठिकाणी साहित्य बरोबर संस्कृतीची संकल्पना देखील स्पष्ट होणे गरजेचे आहे.

**संस्कृती –** संस्कृतीची व्याख्या अनेक शास्त्रज्ञांनी करण्याचा प्रयत्न केला आहे.त्याची संक्षेपाने चर्चा करणे महत्वाचे आहे. काही शास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या पुढील प्रमाणे –:

१) **इरावती कर्वे –** ''संस्कृती म्हणजे सकाळ इंद्रिय लावलेले वळण माणसाच्या सर्व व्यवहारात त्यात येणारे सर्व रीतीरिवाज नियम ज्ञान इ. सर्व काहींना समावेश होतो.''

२) **एडवर्ड टायटर –** ''समाजाचा एक सदस्य म्हणून मानव जे ज्ञान, कला, श्रद्धा, नितीतत्त्वे, कायदे, परंपरा आणि इतर क्षमता, सवय, तसेच इतर तत्सम गोष्टी संपादित करतो. त्या सर्वांच्या संमिश्र एकीकरणास संस्कृती असे म्हणतात.''

३) **एलफ लिंटन –** 'संस्कृती ही शिक्षित वर्तन प्रकारच्या कलांची संघटीत किंवा साचेबंध समग्रता होय मनुष्य एका विशिष्ट समाजाचा सदस्य या नात्याने जे जे वर्तन प्रकार शिकतो,ते सर्व वर्तन प्रकार व या संस्कृतीत समाविष्ट होतात.''

४) **मॅलीनोवास्की –** ''ज्याच्या सहाय्याने मानव आपली उद्दिष्ट्ये साध्य करतो ती मानव निर्मित साधने व मध्यम म्हणजे संस्कृती होय.''

५) **रा. ग. जाधव –** ''साहित्य हा संस्कृतीचा महत्वाचा घटक आहे.''

वरील सर्व व्याख्यांचा विचार केल्यास एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे मानव अथवा मानवी समूहाच्या अंतरक्रीयेतून किवा संपर्कातून संस्कृती निर्माण झाली. विविध लोक समूहामुळे तिच्यात काळानुसार बदल घडत असतात प्रत्येक व्यक्ती सामाजिक अंतरक्रीयेतून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या संस्कृती शिकत असतो. म्हणजे संस्कृती ही जन्म:जात प्राप्त होत नाही मानव आपल्या गरजा गरजांसाठी जे विशिष्ट वर्तमान प्रकार निश्चित केले आणि हे सर्व समाजाच्या संस्कृतीद्वारे ठरविण्यात आले. व्यक्ती आपल्या सांस्कृतिक नियमानुसार वर्तन करीत असतो. जगातील प्रत्येक समाजाची संस्कृती वेगवेगळी आहे समाजात राहत असताना मानवाला ज्या गोष्टींचे ज्ञान झाले. तसेच त्याचा विश्वास ज्या गोष्टींवर बसला अशा गोष्टींना मुल्ये आणि प्रमाणके म्हणून स्वीकारले. बहुतेक यातील बरेच घटक अमूर्त स्वरूपाचे असल्यामुळे अशा घटकांना मानवाने मूल्य,संकेत, प्रतिक स्वरुपात स्वीकारले. म्हणूनच हॅरी जॉन्सने संस्कृतीची चर्चा करताना ज्ञान, विश्वास, मूल्य किवा प्रमाणके आणि चिन्हे यांचा संस्कृतीमध्ये समावेश केला आहे. प्रत्येक मानवी समाज अथवा समूहाची स्वतंत्र संस्कृती असते. कारण कोणत्या ना कोणत्या प्रकारचा फरक इतर समूहाच्या बाबतीत निदर्शनास येतो. हे वेगळेपण तेथील भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक घटकांमुळे होते. एका विशिष्ट समाजाच्या संस्कृतीमध्ये असणारे ज्ञान, विश्वास, परंपरा, मूल्य, प्रमाणके संकेत हे दुसऱ्या समाजाच्या संस्कृतीमध्ये असतीलच असे नाही. म्हणून प्रत्येक समाजाच्या संस्कृतीनुसार त्याच्या ज्ञान, विश्वास, परंपरा, मूल्य, प्रमाणके संकेत इ. मध्ये भिन्नत्व आढळून येते. जसे कि भारातीय संस्कृती पाश्चात्य राष्ट्रांची संस्कृती यामध्ये भेद आढळतो. एवढेच नाहीतर एकाच देशात, प्रदेशात, समाजातही सांस्कृतीक भेद आढळतात. त्यांना पोटसंस्कृती असे संबोधले जाते.

**साहित्य आणि संस्कृती सहसंबंध –** साहित्याची निर्मिती स्थलकाल्बद्ध अशा सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन अवकाशात होत असते. या अनुषंगाने साहित्याचा संस्कृतिशी संबंध येतो. साहित्यकृती घडलेली आणि घडवलेली असते असे तिच्या निर्मिती प्रक्रियेबद्दल दोन मते आढळतात. ती घडलेली असते असे म्हणताना तिची निसर्गनिर्मित वस्तुच्या नैसर्गिक घडनिशी तिचे नाते जोडले जाते. त्यामध्ये मानवाकडून ही गोष्ट घडते त्यासंबंधी तिचे अलौकिकवादी स्पष्टीकरण अभिप्रेत आहे. जसे की मज विश्वंभर बोलाविती ही ज्ञानेश्वरांची प्रतिक्रिया –

''करितो कवित्व म्हणाल कोणी ।
नव्हे माझी वाणी पदरीची .
माझीया नव्हे हा प्रकार ।।''

ही तुकाराम महाराजांची प्रतिक्रिया साहित्य निर्मितीच्या प्रतिभा शक्तीचे अलौकिक स्पष्टीकरण देण्यावर भर देणारी आहे.जसे इंग्रजी मध्ये poest are born not made असे म्हटले गेले. संस्कृती परंपरेतील बहुतांश प्रतिभा विषयक विचार हा भारतापासून ते जगन्नाथ पंडितापर्यंत प्रतिभा साहित्य निर्मितीशी निगडीत मनाची शक्ती असून जन्मत:च प्राप्त झालेली देणगी असते. मनाच्या एकाच्या अवस्थेत ती क्रियाशील होते ती अलौकिक शक्ती आहे .

**समारोप –** समाज जीवनातील संघर्ष साहित्य कृतींना जन्म देतात त्यानिर्माण झालेल्या साहित्यकृतीमध्ये वास्तवाचे विविध विचारप्रणालीचे, मूल्यव्यवस्थेचे चित्रण केले जाते. साहित्यकृतीत प्रतिमित होणारे सांकृतिक वास्तव प्रत्यक्षगत सांस्कृतिक वास्तवाचा एक अविभाज्य भाग असते या अर्थाने सांकृतिचा साहित्याशी जवळचा संबंध असतो.

**संदर्भ**

१. मराठी साहित्य समाज आणि संस्कृती, आनंद यादव
२. आधुनिक मराठी साहित्य (स्वरूप, आकलन आणि आस्वाद) प्रा. डॉ. संदीप सांगळे, डायमंड पब्लिकेशन्स २०२१
३. मराठी साहित्य विमर्श आणि विमर्शक : व. दि. कुलकर्णी, २००१
४. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि दिशा, वासुदेव मुलाटे

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# ''युक्रेन'' यूरोपचे अफगणिस्तान बनण्याच्या मार्गावर

**धनंजय गंगाराम रायसिंग**
सहाय्यक प्राध्यापक,
संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग
नूतन मराठा महाविद्यालय, जळगाव

**प्रस्तावना –**

मागील एक महिन्यापासून रशिया आणि युक्रेन यांच्यात युद्ध सुरु आहे. या युद्धात संयुक्त राष्ट्र संघटनेच्या मानवी हक्क आयोगाच्या अहवालनुसार ११०० नागरिक मारले गेले आहेत तर २५ लाख युक्रेनियन नागरिक हे पश्चिम युरोपीय देशात स्तलांतरित झाले आहेत. युक्रेनचे अनेक शहरे, शासकीय इमारती आणि सामरिक दुर्ष्टीकोनातून महत्वपूर्ण लष्करी ठिकाणे हे रशियाच्या हवाई हल्ल्याचे प्रमुख लक्ष्य राहिले आहेत. हे युद्ध लवकर थांबले नाही तर युक्रेन कायमस्वरूपी युद्धक्षेत्र बनू शकते तसेच जगाला परत शीतयुद्धकालीन द्विध्रुवीय व्यवस्थेकडे किंवा रासायनीक आणि अणू युद्धाकडे नेऊ शकते. रशियाच्या युक्रेनमधील लष्करी आक्रमणाची तुलना आता शीत युद्धकाळातील दोन महत्वाच्या युद्धांशी केली जात आहे एकम्हणजे सोव्हिएत रशियाने 'ब्रेजनेव डॉट्रीन' नुसार एप्रिल १९७८ मध्ये अफगाणिस्तानात मोहम्मद दाऊद खानच्या सत्तेचा पाडाव करण्यासाठी नूर मोहम्मद तारकी यांच्या नेतृत्वाखालील डाव्या विचारसरणीच्या लष्करी अधिकाऱ्यांना दिलेला पाठिंबा आणि त्यातून पुढे १९७९ मध्ये अफगाणिस्तानात निर्माण झालेले युद्ध आणि दुसरे अमेरिकेने, नाटोने ११ सप्टेंबर २००१ च्या अमेरिकेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर अफगाणिस्तानात 'वॉरवटेरर' शीर्षकाखाली आंतर्राष्ट्रीय दहशतवादाविरुद्ध सुरू केलेली लष्करी मोहिम .

१९७९ ते १९८९ असे दहा वर्ष सोव्हिएत रशियाची 'रेडआर्मी' अफगाणिस्तान युद्धात होती या युद्धात पंधरा हजार रशियन सैन्य मारले गेले, अफगाणिस्तानात झालेला भरमसाठ लष्करी खर्च आणि राजकीय हस्तक्षेपाचे परिणाम पुढे सोवियात रशियाचे पंधरा राष्ट्रात विघटनासाठीही कारणीभूत ठरले त्यानंतर अमेरिका, नाटो सैन्याचे लष्कर हे ओक्टोम्बर २००१ पासून ३१ ऑगस्ट २०२१, असे विस वर्ष अफगाणिस्तान युद्धात अडकले होते . अफगाणिस्तान युद्धात सोव्हिएत रशियाचा लष्करी पराभव झाला तर अमेरिकेला अपेक्षित यश न मिळता अफगाणिस्तानात २५०० सैन्य गमवावे लागले तर अडीच ट्रिलियन डॉलर खर्च करून परतावे लागले. अफगाणिस्तानातील विस वर्षीय युद्ध हे अमेरिकेचे तसेच नाटोच्या लष्करी विश्वासाहर्तेवर प्रशचिन्ह निर्माण करणारे ठरले. आज अमेरिका आणि रशिया जागतिक राजकरणात 'सॉफ्टपॉवर' म्हणून जरी ओळखली जात असली तरी एखाद्या लहान सार्वभौम राष्ट्रांच्या भूप्रदेशावर लष्करी आक्रमण करून त्या प्रदेशावर संपूर्ण नियंत्रण मिळविणे हे अमेरिकेला १९५५ ते १९७५ पर्यंत व्हिएतनाम आणि २००१ ते २०२१ पर्यन्त अफगाणिस्तानमधील प्रदीर्घ युद्धांनंतर ही शक्य झाले नाही तशीच परिस्थिति अफगाणिस्तानमध्ये सोवियात रशियाची शीत युद्धकाळात आणि आता युक्रेनमध्ये होत आहे.

**रशियाचे धोरण –** युक्रेनला रशियाच्या प्रभावाखाली आणण्यासाठी पुतिन अनेक वर्षांपासून प्रयत्न करीत आहेत. युक्रेन नाटोच्या छावणीत सामील होण्याचा प्रयत्न करत असताना, रशियाने असे झाल्यास युरोपला भयंकर परिणाम भोगावे लागण्याची धमकीही दिली होती. रशिया, युक्रेन आणि बेलारूस हे एतिहासिक सोवियत रशियाच्या साम्राज्याचा एक संघभाग आहेत असे पुतीन मानतात. युक्रेन युद्ध जर लवकर थांबले नाही तर युक्रेनची परिस्थिती हि अफगणिस्तानसारखी होऊ शकते. अमेरिकेतील काही प्रभावशाली तज्ज्ञ हे रशियाला युक्रेनमध्ये दीर्घकालीन संघर्षात अडकविण्याच्या नियोजनात आहेत. अमेरिकेचे राष्ट्रपती जो बायडन यांनी आपल्या 'स्टेट ऑफ युनिअन', मधील भाषणात याचे संकेत हि दिले आहेत. अमेरिकेने १९७९ पासून सोव्हिएत रशियाला दहा वर्ष अफगणिस्तानात युद्धात गुतंवून ठेवले या युद्धात पाकिस्तानचा 'फ्रंटलाईनस्टेट', म्हणून वापर करून लाखो अफघाण मुजाहिदींनांना शस्त्र आणि लष्करी प्रशिक्षण देऊन सोव्हिएत रशियाच्या लष्करा विरोधात मोठा प्रोक्झी विद्रोह अमेरिकेच्या सी.आय.ए. ने पाकिस्तानची गुप्तचर संघटना आय. एस. आय. च्या सहकार्याने 'डिपस्टेट' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अफगाणिस्तानात निर्माण केला, हेच धोरण पुढे अमेरिका युक्रेनमध्ये ठेवण्याचा प्रयत्न करेल. अमेरिकेने हे स्पष्ट केले आहे कि युक्रेन युद्धात नाटो राष्ट्रे हि प्रत्यक्ष युद्धांत सहभाग घेणार नाहीत मात्र युक्रेनला वेळोवेळी लष्करी मदत मिळण्याची व्यवस्था निर्माण करण्यात येईल. २०१४ मध्ये, पुतिनयांनी क्रिमियन द्विकल्पावर केलेल्या लष्करी कार्यवाही नंतर अमेरिकेने युक्रेंनियन लष्कराला शस्त्र आणि प्रशिक्षण देणे सूर केले होते . नाटो वयुरोपीयन युनिअनमध्ये युक्रेन सहभागी होऊ नये, क्रिमिया, पूर्व युक्रेनच्या डोनबासमधील डोन्स्टेक आणि लुहान्स या भागातील रशियन भाषिक नागरिकांचे मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी रशियाने युक्रेनवर युद्ध लादले. रशिया– युक्रेन युद्ध फक्त दोन राष्ट्रांच्या अस्तित्वाचे युद्ध नाही तर या युद्धाच्या मागे अनेक भुराजनैतिक समीकरणे आहेत. वर्ष २००० ला रशियात पुतीन सत्तेत आल्यापासुन त्यांनी प्रथम रशियाच्या अर्थव्यस्थेला स्थिर आणि मजबूत केले. रशियन गॅस्प्रोन कंपनीच्या पाईपलाईनद्वारे गॅसची निर्यात पूर्व युरोपातून पश्चिम युरोपापर्यंत नेली. युरोपिअन युनिअनला लागणाऱ्या एकूण गॅसचा ४५% पुरवठा रशियाच्या गॅस्प्रोन कंपनीमार्फत होतो. आज रशियाची ऑइल आणि गॅस निर्यात प्रथम क्रमांकावर असून जगातील प्रथम क्रमांकाचे गॅस तसेच सहाव्या क्रमांकाचे ऑइल साठे रशियात आहे. वर्ष २०२१ मध्ये २.३७ ट्रिलियन महसूलापैकी १.१८ ट्रिलियन महसूल हा फक्त ऑइल आणि गॅस निर्यातीतून रशियाला मिळाला, तसेच रशिया हे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे शस्त्रास्त्र निर्यात करणारे राष्ट्र आहे. वीस बिलियन डॉलर एवढे वार्षिक उत्पन्न फक्त शस्त्र निर्यातीतून रशियाला मिळते. जगातील जवळपास पंचेचाळीस राष्ट्रे हे रशियन मेड संरक्षण साहित्य खरेदी करतात. रशियाचे वाढते लष्करी महत्व, युरोप खंडाला असणारी गॅसची गरज आणि व्यापार हा युक्रेन युद्धाचा मुख्य केंद्रबिंदू आहे.

**अमेरिकेची चिंता –** रशियाची वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था, लष्करी विस्तार, इंडो -पॅसिफीक क्षेत्रामध्ये चीनचा वाढता प्रभाव, रशिया- चीनमध्ये वाढणारे द्विपक्षीयसंबध, रशियाच्या ऑइल आणि गॅसवर अवलंबून असलेली नाटोतील पश्चिम युरोपीयन अर्थव्यवस्था आणि अफघाण युद्धानंतर नाटोचे

झालेले खच्चीकरण हे अमेरिकेसाठी मोठे सामरिक आव्हान बनत चालले होते. अफगणिस्तान युद्धात अमेरिकेच्या एक ध्रुवीय लष्करी व्यवस्थेला आलेल्या अपयशाचा कूटनैतिक उपयोग हा रशियाने आपला प्रभाव युरोप आणि आशियात वाढविण्यासाठी केला. रशियाची २००८ मध्ये जॉर्जिया आणि २०१४ क्रिमियामध्ये सैन्य कार्यवाही, २०१५ मध्ये सिरीयाच्या गृहयुद्धात राष्ट्रपती बशरअल असादयांना आर्थिक, राजकीय आणि लष्करी मदत, २०१७ मध्ये लिबियामधील संघर्षात खलिफा हफ्तार यांना पुतीन यांनी दिलेले समर्थन यातून हे स्पष्ट संकेत दिले जात होते कि अमेरीका केंद्रित जागतीक व्यवस्थेला दुसरा पर्याय फक्त रशियाच असू शकते. वाढत्या रशियन प्रभावाला नियंत्रित करण्यासाठी अमेरिकेने एशियन नाटो म्हणून ओळखली जाणारी ऍंझूस (ANZUS) आणि क्वाड (Quad) चे संघटन इंडो- पॅसिफिक क्षेत्रात तयार केले. अफघाण युद्धात विश्वासाहर्ता गमावलेल्या नाटोची युरोपात पुनर्स्थापना करायची असेल तर रशिया केंद्रित धोका निर्माण करणे हा एकमेव पर्याय अमेरिके समोर होता. म्हणून अमेरिकेने युक्रेनमध्ये आपला प्रभाव २०१५ नंतर वाढविणे सुरु केले. २००८ मध्ये बुर्सेल्समध्ये नाटोच्या वार्षिक अधिवेशनात युक्रेनला नाटो आणि युरोपिअन युनिअनचे सदस्यत्व देण्याच्या घोषणे मागील उद्देश हा तेथील सामरिक खनिजांवर केंद्रित होता.

**युक्रेनचे सामरिक महत्त्व –** नवव्या शतकात निर्माण झालेले क्यीवन रुस हे राज्य मध्ययुगा दरम्यान एक बलाढ्य राष्ट्र होते. १९ व्या शतकामध्ये युक्रेनचा मोठा हिस्सा रशियन साम्राज्याच्या तर उर्वरित भाग ऑस्ट्रिया-हंगेरीच्या अधिपत्याखाली होता. पहिल्या महायुद्धावर शियन यादवी नंतर ३० डिसेंबर १९२२ रोजी सोव्हिएत संघामध्ये सामील होणारा युक्रेन हा आघाडीचा देश होता. तेव्हापासून १९९१ सालामधील सोव्हिएत संघाच्या विघटनापर्यंत युक्रेनियन सोव्हिएत साम्यवादी गणराज्य हे सोव्हिएत संघातील एक आघाडीचे गणराज्य होते. २४ ऑगस्ट १९९१ रोजी युक्रेनला स्वातंत्र्य मिळाले.

युक्रेन हे युरोपमधील भौगोलीकदृष्ट्या दुसऱ्या क्रमांकाचे राष्ट्र आहे . युक्रेन हा पूर्व युरोपातील एक देश आहे. युक्रेनच्या उत्तरेस बेलारूस, पूर्व ववायव्येस रशिया, पश्चिमेस पोलंड, स्लोव्हाकिया व हंगेरी, नैऋत्येस रोमेनिया व मोल्दोव्हा हे देश आहेत तर दक्षिणेस काळा समुद्र तर आग्नेयेस अझोवचा समुद्र आहे. क्यीव ही युक्रेनची राजधानी व सर्वात मोठे शहर आहे. युक्रेनमध्ये ३९ ट्रिलियन क्युबिक मीटर गॅस, २ ट्रिलियन बॅरल ऑइल, ३८ मिलियन कोळसा हा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा केंद्रबिंदू आहे. ६,०३,७०० वर्ग कि.मी. क्षेत्रफळ असलेला युक्रेन हा जगातील ४४ व्या क्रमांकाचा देश आहे. ह्या बाबतीत युक्रेनचा युरोपात दुसरा क्रमांक लागतो. युक्रेनला २,७८२ कि मी. लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. द्रीपरही युक्रेनमधून वाहणारी प्रमुख नदी असून डॅन्युब नदी युक्रेन व रोमेनियाच्या सीमेवरून वाहते. युक्रेनचे सामरिक महत्व ओळखून अमेरिकेने आपला प्रभाव हा युक्रेनमध्ये २०१४ नंतर वाढवण्यास सुरुवात केली. युक्रेन हे नाटोचे सद्यस्य राष्ट्र बनणे हे सरळसरळ रशियाला लष्करी आव्हान होते. युक्रेन जर अमेरीकेच्या प्रभावाखाली आला तर रशियाचा ऑइल आणि गॅस व्यापार , अर्थव्यवस्थेला पश्चिम युरोपात पर्याय निर्माण करता येऊ शकतो तसेच युक्रेनची भूमी मिलिटरी लॉंच पॅड म्हणून रशिया विरोधात वापरता येऊ शकते, मात्र पुतीन हे अमेरिकेचे मनसुबे ओळखून होते म्हणून रशियाने प्रथम युक्रेनमधील ८०% ऑइल आणि गॅसच्या साठा असलेले पूर्व युक्रेनियन प्रदेश लुहान्स आणि डोन्स्टेक हे सैन्य कार्यवाही करून ताब्यात घेऊन नाटोला एक रेडलाईन आखून दिली. दुसरीकडे यावर्षी नोव्हेंबरमध्ये अमेरीकन कॉंग्रेसची निवडणूक आहे. राष्ट्राध्यक्ष बायडेन यांना अमेरिकेत दाखवायचे आहे की अमेरिका अजूनही जागतिक नेता आहे आणि युक्रेनमध्ये रशियाशी खंबीरपणे लढत आहे. बायडेन यांच्यासाठी युक्रेन हे मोठे आव्हान आहे. जर रशियाने युक्रेन जिंकले तर अमेरिकेच्या प्रतिमेला मोठा फटका बसू शकतो.

**निष्कर्ष –** रशियन राष्ट्रवादाच्या नावाखाली सुरु झालेले युक्रेन युद्ध हे रशियाने दिलेल्या अटीं -शर्थी पूर्ण झाल्यावरच थांबेल असे संकेत आहेत. हे युद्ध भविष्यात रशिया विरोधी युक्रेनियन अस्मितेला अति-राष्ट्रवादी नक्कीच बनवेल. पुतीन यांना युक्रेनियन नागरिकांच्या समर्थनाची आशा आता करता येणार नाही. रशिया विरोधी आक्रमक युक्रेनियन राष्ट्रवादाला अमेरीका आणि नाटोचा पाठिंबा हा रशियासाठी युक्रेन हे दुसरे अफगणिस्तान युद्ध बनण्याची शक्यता येणाऱ्या काळात नाकारता येत नाही.

**संदर्भ**

**Books -**
- Gregory Feifer,The Great Gamble: The Soviet War in Afghanistan, Penguin Modern Classics, 2010
- Lester W. Grau,The Soviet-Afghan War: How a Superpower Fought and Lost, University Press of Kansas; 1st edition (28 February 2002)
- Carter Malkasian, The merican War in fghanistan: History,Oxford University Press; 1st edition (July1,2021)
- Beth Bailey and Richard H. Immerman, Understanding the U.S. Wars in Iraq and fghanistan,NYU Press,: 2015

**Online Sources -**
- https://www.idsa.in/idsacomments/russias-ai-enabled-military-ecosystem-ssharma-160322, accessed on, 18th March,2022
- https://ndupress.ndu.edu/Portals/68/Documents/Books/understanding-war-in-afghan.pdf,
- https://www.idsa.in/idsacomments/ukraine-crisis-and-us-russia-face-off-rkumar-080211, 18th March,2022
- https://www.claws.in/military-lessons-from-the-war-in-ukraine/,, 18th March,2022
- https://www.claws.in/publication/hybrid-war-in-ukraine-will-have-blowback-impact-on-europe/,18th March,2022
- https://www.bbc.com/news/world-60525350, accessed on, 22th March,2022
- https://www.bbc.com/news/world-60945122, accessed on, 22th March,2022
- https://www.bbc.com/news/58888451, accessed on, 22th March,2022
- https://www.bbc.com/news/world-europe-56720589, accessed on, 22th March,2022
- https://www.aljazeera.com/tag/ukraine-russia-crisis/,, accessed on, 22th March,2022
- https://www.aljazeera.com/news/2022/4/1/russia-invasion-of-ukraine-list-of-key-events-day-37, accessed on, 22th March,2022

# नवीन शैक्षणिक धोरण आणि भारतीय समाज

**धर्मा हिम्मत कोळी**
संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग,
ज.जि.म.वि.प्र.सह. समाजाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव

**प्रस्तावना –**

राष्ट्रीय दृष्टिकोनातून सर्वांसाठी शिक्षण हा राष्ट्र विकासाच्या संदर्भातला अपरिहार्य भाग आहे. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हा मूळ स्रोत आहे. विविध स्तरावर मानव विकासाचे कार्य करण्याची सर्वात मोठी शक्ती शिक्षणात आहे. त्यादृष्टीने आपल्या देशात विविध कालखंडात शिक्षण व शिक्षण पद्धतीत सुधारणा करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आल्याचे दिसते. उच्च शिक्षणाच्या विस्ताराची धोरणे आणि विकासासाठी प्रचलित कायद्याच्या चौकटीत बृहत आराखडा तयार करावा लागतो. शिक्षणाच्या सर्वांगीण विकासाचे प्रतिबिंब पडणे आवश्यक असते. मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी समान आणि न्याय्य समाज विकसित करण्यासाठी तसेच राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया भारताच्या सातत्यपूर्ण प्रगतीसाठी आणि आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि समानता, शास्त्रीय प्रगती, राष्ट्रीय एकात्मता आणि संस्कृतीचे जतन या क्षेत्रामध्ये जागतिक पातळीवर नेतृत्व करण्यासाठी सर्वांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे. व्यक्ती, समाज, देश आणि जगाच्या हितासाठी आपल्या देशातील समृद्ध प्रतिभा आणि संसाधनांचा पुरेपूर वापर करण्याकरिता उच्च दर्जाचे सार्वभौमिक शिक्षण हा भविष्यासाठी सर्वात चांगला मार्ग आहे. पुढील दशकात जगातील सर्वात मोठी युवकांची संख्या भारतामध्ये असेल आणि त्या सर्वांना चांगल्या गुणवत्तेच्या शिक्षणाच्या संधी पुरविण्याच्या आपल्या क्षमतेवर भारताचे भवितव्य ठरेल.

अशा अनुषंगाने नवनवीन शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी ही शासनामार्फत होणे अतिशय महत्वाचे आहे. म्हणून १९३५ मध्ये मेकॉले यांच्या प्रस्तावातील शैक्षणिक विकासाची कल्पना संपूर्णतः ब्रिटिश शासनाला उपयोगी व भारतामध्ये कारकुनांची जमात निर्माण करणारी होती. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेच १९४८ मध्ये उच्च शिक्षणावर पहिले 'युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशन' डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली गठित केली. त्यानंतर मुदलियार समिती (१९५२) आणि कोठारी कमिशन (१९६४) चे गठन भारत सरकारने केले. स्वातंत्र्यानंतर गठीत झालेल्या या आयोगाने उच्च शिक्षणाला दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. या शैक्षणिक विकासाच्या शृंखलेत महत्त्वाची कडी जोडण्याचे महत्त्वाचे कार्य शासनामार्फत केले जाते. राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर (१९४८) पासून तर आजपावेतो विविध आयोग, समित्या आणि मंडळाच्या माध्यमातून शैक्षणिक स्तरावर विविध बाजूंनी प्रयत्न केल्याने आपणास निदर्शनास येते.

**उद्दिष्टे –**

१) विद्यार्थ्यांमध्ये स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता, निर्णय क्षमता, कृतिशीलता, तात्विक विचार सरणी, विश्लेषण क्षमता या गुणांचा विकास होणे.
२) शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी करणे व त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे.
३) सामाजिक, सांस्कृतिक संरचना, कौशल्यांचा विकास हा सर्व स्तरांवर होणे.
४) एकविसाव्या शतकातील उच्च शिक्षणाचा विचार केला तर सर्वांगीण विकासासाठी महत्वपूर्ण बाबींची दखल घेणे.
५) शिक्षण व्यवस्थेचे नूतनीकरण करून तिला नवी ऊर्जा प्रदान करणे आणि त्याद्वारे समता आणि सर्वसमावेशक गुणवत्तेचे शिक्षण प्रदान करणे.

**गृहीतके –**

१) भारत हा कुशल मनुष्यबळ पुरवू शकणारा देश असेल.
२) अभ्यासक्रमातून सुद्धा कौशल्य विकासाच्या संधी, योजना व शिक्षण पद्धती केंद्रस्थानी असल्या पाहिजेत.
३) शैक्षणिक क्षेत्रातील प्रायोगिक क्षमता, स्वयंनिर्णय, स्वयंविकास, सकारात्मक मानसिकता वृद्धिंगत करणे.
४) शिक्षणाचे स्वरूप व निकष यामध्ये झालेल्या बदलांना समर्थपणे अभ्यासणे.
५) शैक्षणिक धोरणांमध्ये शिक्षणातील सर्वसमावेशकता व तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर देणे

**संशोधन पद्धती –**

सदर शोधनिबंध लेखनास वापरण्यात आलेल्या संशोधन पद्धती पुढीलप्रमाणे – वर्णनात्मक पद्धती व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच दुय्यम स्त्रोतांचा व संगणकीय माहितीचा वापर करण्यात आला आहे. त्याचबरोबर प्रसारमाध्यमांचा वापर केलेला आहे.

**२०२२ पूर्वी मंजूर झालेले शैक्षणिक धोरणाचा आढावा –** १९३५ मध्ये मेकॉले यांच्या प्रस्तावातील शैक्षणिक विकासाची कल्पना संपूर्णतः ब्रिटिश शासनाला उपयोगी व भारतामध्ये कारकुनाची जमात निर्माण करणारी होती. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेच १९४८ मध्ये उच्च शिक्षणावर पहिले युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशन डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली गठित केले. त्यानंतर मुदलियार समिती (१९५२) आणि कोठारी कमिशन (१९६४) चे गठन भारत सरकारने केले. स्वातंत्र्यानंतर गठीत झालेल्या या आयोगांनी उच्च शिक्षणाला दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

A) **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९६८** (National Education Policy, 1968) – १९६८च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये महत्वपूर्ण धोरणाचा

विचार करण्यात आला. यामध्ये राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय उत्पादनात वाढ, सर्वांगीण विकासासाठी शिक्षण पद्धतीची पुनर्रचना, शिक्षण आणि जीवन यातील संबंध, तंत्रज्ञानाचा शिक्षणात वापर तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी ग्रामीण भागापर्यंत भौतिक सुविधा आणि कौशल्यपूर्ण शिक्षण उपलब्ध करणे आवश्यक असल्याचे या धोरणामध्ये सूचित केल्याचे दिसते.

B) **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ –** श्री आचार्य राममूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली गठीत झालेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ चा अहवाल १९९० मध्ये सादर केला. या शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणातील सर्वसमावेशकता व तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर देण्यात आला. परंतु सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑफ एज्युकेशन यांच्या विनंतीनुसार १९९१ मध्ये या अहवालावर पुनर्विचार करण्यासाठी श्री. एन. जनार्दन रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन केले. त्यांनी आपला अहवाल जानेवारी १९९२ मध्ये सादर केला.

C) **नवीन शैक्षणिक धोरण २०१५ –** केंद्रात नवीन सरकार रूढ झाल्यानंतर नवीन शैक्षणिक धोरण निश्चित करण्यासाठी २०१५ मध्ये कमिटीचे गठन करण्यात आले. राज्य विद्यापीठांना सक्षम करणे, शिक्षणामध्ये कौशल्य विकासाला सम्मिलित करणे, शिक्षणातील विषमता दूर करून शिक्षणाला समाजाभिमुख करणे, संशोधन कार्याला प्रोत्साहित करणे असे अनेक मुद्दे विचारार्थ आहेत.

D) **शैक्षणिक धोरण २०१९ –** भारताला केंद्रस्थानी मानून अशा शिक्षण प्रणालीची कल्पना करते ती सर्वांना उच्च दर्जाचे शिक्षण प्रदान करून आपल्या राष्ट्राला सातत्याने न्याय व चैतन्यमय, ज्ञानी समाजामध्ये परिवर्तीत करण्यात थेट योगदान देते.

E) **राष्ट्रीय ज्ञान आयोग २००५ –** मा. पंतप्रधानांचे उच्चस्तरीय सल्लागार म्हणून कार्य करण्यासाठी श्री. सॅम पित्रोदा यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय ज्ञान आयोगाचे गठन भारत सरकारने केले. भारतभूमी ही 'ज्ञान भूमी' (Knowledge Landscape) असे माणून शैक्षणिक केंद्राची एज्युकेशनल हब निर्मिती करणे ही सॅम पित्रोदा यांनी केलेल्या ३०० शिफारशीद्वारा प्रामुख्याने विस्तार (Expansion), सहभाग (Inclusion) आणि गुणवत्ता (Excellence) ही उद्दिष्टे सूचित केली आहेत.

डॉ. राधाकृष्णन समिती, मुदलियार समिती व कोठारी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार शिक्षणाला सुधारणा, परीक्षा पद्धतीत, शिक्षण पद्धतीतील सुधारणा, परीक्षा पद्धतीत सुधारणा व तत्सम मुद्यांवर प्रामुख्याने भर देण्यात आला. परंतु जागतिकीकरणानंतर गठीत झालेल्या समित्यांनी शिक्षणाच्या विस्ताराबरोबर सर्वसमावेशक शिक्षण देण्याचा आग्रह धरला आहे. सॅम पित्रोदा यांनी राष्ट्रीय ज्ञान आयोग २००५ च्या अहवालामध्ये शिक्षणातील उत्कृष्टतेवर भर दिला आहे. २०१० मध्ये महाराष्ट्र राज्याने शिक्षणातील गुणवत्ता या विषयासाठी डॉ.काकोडकर समितीचे गठन केले. या शैक्षणिक विकासाच्या शृंखलेत एक महत्वाची कडी जोडण्याचे कार्य महाराष्ट्र सरकारने केले आहे. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन करून आतापर्यंत विविध समित्यांनी सुचविलेल्या उपाययोजना व महाराष्ट्रातील वास्तविकता यांची सांगड घारून आत्ताच नवीन शैक्षणिक धोरण मंजूर करण्यात आले आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२२ –** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास २०१४ नंतर भारताचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पूर्वीच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आढावा घेण्यासाठी २०१६ मध्ये माजी केंद्रीय सचिव टी. एस. आर. सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय धोरण समिती नेमली. या समितीने पूर्वीच्या पुढील शासकीय योजनांचा आढावा घेतला.

१) डिस्ट्रिक्ट प्रायमरी एज्युकेशन प्रोग्राम (DPEP)
२) सर्व शिक्षा अभियान २००१ (SSA)
३) राईट टू एज्युकेशन (RTE)
४) नॅशनल प्रोग्राम एज्युकेशन फॉर गर्ल्स ॲट एलिमेंट्री लेवल (NPEGEL)
५) राष्ट्रीय माध्यमिक स्तरावर अपंगांसाठी इंक्लुसिव एज्युकेशन फोर दि डिसेबल फोर सेकंडरी स्टेज (IEDSS)
६) प्रौढ साक्षर भारत (AEI)
७) उच्चशिक्षण विकासासाठी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान २०१३ (RUSA)

अशा सर्व स्तरांवर आढावा घेतल्यावर तब्बल ३४ वर्षानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत शासनाने २९ जुलै २०२० मध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मंजुरी देऊन ते संपूर्ण देशात लागू केले आहे. इस्रोचे माजी प्रमुख के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्य समितीने या नव्या धोरणाचा मसुदा तयार केला आहे. यानुसार शालेय शिक्षणाची रचना १०+२ ऐवजी ५+३+३+४ अशी करण्यात आली आहे. यामध्ये पहिली ३ वर्षे पूर्व प्राथमिक व २ वर्ष पहिली व दुसरी असणार वय वर्ष (३ ते ८) त्यानंतर ३ वर्षे तीसरी ते पाचवी असणार वय वर्ष (८ ते ११) त्यानंतर तीन वर्षे सहावी ते आठवीपर्यंत असणार. वय वर्ष ११ ते १४आणि शेवटचे ४ वर्षे नववी ते बारावी, वय वर्षे (१४ ते १८) अशा एक पंधरा वर्षांमध्ये शालेय शिक्षणाची रचना करण्यात आली आहे. आतापर्यंत ३ ते ६ वर्षातील मुल शालेय अभ्यासक्रमात येत नव्हती. परंतु नवीन शैक्षणिक धोरणामुळे त्याचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. २१ व्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण आहे आणि या धोरणाचे ध्येय आपली देशातील वाढत्या विकासात्मक आवश्यकता व उपाययोजना करणे हे आहे. या धोरणामध्ये SDG4 Sustainable Development Goal सह २१ व्या शतकातील शिक्षणाच्या महत्वाकांक्षी उद्दिष्टांशी सुसंगत अशी नवीन प्रणाली तयार करण्यासाठी भारताच्या परंपरा आणि मूल्ये यावर भर देवून शैक्षणिक रचनेचे नियमन आणि व्यवस्थापन यासह या रचनेच्या सर्व पैलूंमध्ये बदल आणि सुधारणा प्रस्तावित आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विशेषतः प्रत्येक व्यक्तीच्या सृजन क्षमतेच्या विकासावर जास्त भर देते. शिक्षणाने केवळ आकलन क्षमता विकसित केल्या पाहिजेत असे नाही तर साक्षरता आणि संख्या ज्ञान या मुलभूत क्षमता आणि उच्च दर्जाच्या तार्किक आणि समस्या निराकरण क्षमताच नव्हे तर सामाजिक नैतिक आणि भावनिक क्षमतांचा विकास सुद्धा केला पाहिजे.

**नवीन शैक्षणिक धोरण २०२२ चे महत्व –** पूर्वाध्ययन स्तरामध्ये पायाभूत स्तरातील खेळ, शोध आणि उपक्रमावर आधारित अध्ययन आणि अभ्यासक्रमाच्या शैलीवर विकसित तीन वर्षाचे शिक्षण असेल. काही सोपा मजकूर असलेल्या पुस्तकांचा तसेच अधिक औपचारिक परंतु संवादात्मक पद्धतीने वर्गात शिकण्याच्या बाबींचा देखील समावेश करण्यास सुरुवात केली जाईल. जेणेकरून वाचन, लेखन, बोलणे, शारीरिक शिक्षण, कला, भाषा विज्ञान आणि गणित यासारख्या विषयांचा भक्कम पाया तयार होईल.

- विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास.
- आवश्यक शिक्षण आणि तार्किक विचारशक्ती वाढविण्यासाठी अभ्यासक्रमाचा मजकूर करणे.
- अनुभवात्मक शिक्षण
- अभ्यासक्रम निवडीमध्ये लवचिकता देवून विद्यार्थ्यांना सक्षम करणे.
- बहुभाषावाद आणि भाषेची शक्ती
- आवश्यक विषय कौशल्ये आणि क्षमतेचे अभ्यासक्रमिक एकात्मीकरण
- विद्यार्थ्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण क्षमता शोधणे आणि त्या विकसित करण्यासाठी प्रयत्न करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये मुलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान तसेच लवचिकता असावी.
- बहुशाखीय चींश्रींळ-उळीलळश्रिळपरीूआणि समग्र शिक्षणाचा विकास
- संकल्पना समजून घेण्याबरोबर तर्कशुद्ध निर्णय घेण्यासाठी आणि नाविन्यपूर्णतेला प्रोत्साहन
- अध्यापनात आणि अध्ययनात बहुभाषिकत्व आणि भाषा शक्ती यांना प्रोत्साहन
- तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर
- सर्व शैक्षणिक निर्णयामध्ये पूर्ण समानता आणि सर्वसमावेशकता ही पायाभूत गोष्ट
- सर्व पातळ्यांवरील शिक्षणाच्या अभ्यासक्रमात सुसूत्रता, पारदर्शकता व अखंडता असणे
- शिक्षण ही एक सार्वजनिक सेवा आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मुलभूत हक्क समाजाला पाहिजे.

ज्ञानाच्या बाबतीत जगामध्ये वेगाने बदल होत आहेत. बिग डेटा, मशीन लर्निंग, कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामधील वेगाने होत असलेल्या विकासामुळे जगभरातील अकुशल कामे आता माणसांऐवजी यंत्रे करू शकतील. त्याचवेळी विशेषतः गणित, संगणक, विज्ञान आणि डेटा विज्ञान यातील कर्मचाऱ्यांना वाढती मागणी असेल. भारताने २०१५ मध्ये स्वीकारलेल्या शाश्वत विकासाच्या २०३० च्या कृती कार्यक्रमाच्या उद्दिष्ट ४ मध्ये जागतिक शिक्षण विकास कृती कार्यक्रम समाविष्ट असून हे उद्दिष्ट २०३० पर्यंत सर्वांसाठी समावेशक आणि समान गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि सर्वांसाठी निरंतर अध्ययनाच्या शिक्षणाच्या संधीना प्रोत्साहन देणे यासाठी प्रयत्न करण्याविषयी आहे. या उत्तुंग उद्दिष्टांकरीता अध्ययनास पाठींबा आणि चालना देण्यासाठी संपूर्ण शिक्षण प्रणालीची नव्याने रचना करणे आवश्यक आहे. म्हणजे शाश्वत विकास कृती कार्यक्रम २०३० ची सर्व महत्वाची लक्ष्ये आणि उद्दिष्ट्ये सध्या करता येतील.

**ऑनलाईन आणि डिजिटल शिक्षण –** नवीन परिस्थिती आणि वास्तविकता यासाठी नवीन उपक्रमांची गरज असते. सध्या वाढत असलेले साथीचे रोग आणि महामारी लक्षात घेता. जेव्हा कधी आणि जिथे कुठे पारंपारिक आणि प्रत्यक्ष शिकवण्याच्या माध्यमांचा वापर शक्य नसेल तेव्हा पर्यायी दर्जेदार शिक्षणाचे माध्यम तयार ठेवणे गरजेचे असते. उदा. कोरोनासारख्या महामारीत ऑनलाईन शिक्षणासाठी झालेली अंमलबजावणी यासाठी अतिशय महत्वपूर्ण मध्यम ठरले आहे. यासंदर्भात तंत्रज्ञानामुळे मिळणाऱ्या फायद्यांचा लाभ घेण्याचे महत्व राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मान्य करीत आहे.

यासंदर्भात तंत्रज्ञानामुळे मिळणाऱ्या फायद्यांचा लाभ घेण्याचे महत्व राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ने मान्य करत तंत्रज्ञानाशी संबंधित जोखामा आणि धोक्याची सुद्धा दाखल घेतली आहे. ऑनलाईन शिक्षणातील तोटे दूर करून किंवा त्यांचे निराकरण करत ऑनलाईन शिक्षणाचे फायदे कशा प्रकारे मिळवता येतील, हे निश्चित करण्यासाठी काळजीपूर्वक तयार केलेल्या आणि योग्य रीतीने प्रमाणबद्ध केलेल्या पथदर्शी अभ्यासाची गरज आहे. या दरम्यान सर्वांसाठी दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यातील वर्तमान आणि भविष्यातील आव्हानांचा सामना करण्याकरता विद्यमान डिजिटल प्लॅटफॉर्म आणि खउढ आधारित शैक्षणिक उपक्रमांचा दर्जा वाढवावा लागेल आणि त्यांचा विस्तार करावा लागेल.

**शैक्षणिक धोरण २०२२ खालील उपक्रमांची शिफारस करते –**

**ऑनलाईन शिक्षणासाठी पथदर्शी –** सामान्य शिक्षणाचे ऑनलाईन शिक्षणाशी एकात्मीकरण करण्याच्या फायद्याचे मुल्यांकन करण्यासाठी व दोष कमी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना उपकरणांची सवय लागणे इ. मजकुरासाठी सर्वाधिक पसंतीचा फॉरमॅट अशा इतर संबंधित बाबींचा अभ्यास देखील करण्यासाठी समांतरपणे काही पथदर्शी अभ्यासाची मालिका आयोजित करणे. संस्था : NETF, CIET, NIOS, IGNOU, IITs, NITs इत्यादी.

a) **ऑनलाईन शिक्षणासाठी पथदर्शी अभ्यास –** समस्या शिक्षणाचे ऑनलाईन शिक्षणाशी कात्मिकरण करण्याच्या फायद्याचे मूल्यांकन करण्यासाठी व दोष कमी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना उपकरणांची सवय लागणे इ. मजकुरासाठी सर्वाधिक पसंतीचा फॉरमॅट अशा इतर संबंधित बाबींचा अभ्यास देखील करण्यासाठी समांतरपणे काही पथदर्शी अभ्यासाची मालिका आयोजित करण्यासाठी योग्य संस्था जसे की NETF, CIET, NIOS, IGNOU, IITs, NITs इ. निश्चित केल्या जातील. या पथदर्शी अभ्यासाचे निकाल सार्वजनिकरित्या जाहीर केले जातील आणि सतत सुधारणा करण्यासाठी वापरले जातील.

b) **डिजिटल पायाभूत सुविधा –** भारताचा आकार मोठा, विदिधाता, गुंतागुंती आणि उपकरणांची उपलब्धता यावर उपाय म्हणून एकाहून अधिक प्लॅटफॉर्मद्वारा आणि विशिष्ट उपायांद्वारे वापरता येईल. अशा मुक्त, अंतरकार्यक्षम (इंटरओपरेबल), विकसनक्षम, सार्वजनिक डिजिटल पायाभूत सुविधा शिक्षण क्षेत्रात निर्माण करण्यासाठी गुंतवणूक करण्याची गरज आहे. यामुळे हे सुनिश्चित होईल की तंत्रज्ञानावर आधारित उपाय तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रगतीमुळे कालबाह्य होणार नाहीत.

c) **ऑनलाईन अध्यापन प्लॅटफॉर्म आणि साधने –** शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर नजर ठेवण्यासाठी, संरचित, वापरण्यास सोप्या, समृद्ध सहाय्यक साधनांचा संच प्रदान करण्यातही SWAYAM, DIKSHA अशा समर्पक विद्यमान ई-अध्ययन प्लॅटफॉर्मचा विस्तार केला जाईल. ऑनलाईन वर्ग घेण्यासाठी टू-वे-व्हिडीओ आणि टू-वे-ऑडीओ इंटरफेस यासारखी साधने ही काळाची गरज आहे. हे सध्याच्या महासाथीने दाखवून दिले आहे.

d) **मजकूर निर्मिती, डिजिटल भांडार आणि प्रसार –** कोर्स वर्क, गेम्स आणि सिम्युलेशन शिकणे ऑगमेंटेड वास्तव आणि व्हर्च्युअल वास्तव यासह मजकुराचे एक डिजिटल भांडार विकसित केले जाईल. ज्यामध्ये परिणामकारकता आणि गुणवत्तेबाबत वापरकर्त्यांद्वारे रेटिंग देण्याची एक स्पष्ट

सार्वजनिक प्रणाली असेल. मजा घेऊन शिकण्यासाठी ॲप्स, भारतीय कला व संस्कृती यावर आधारित गेम्स अशी विद्यार्थ्यांना साजेशी साधने देखील एकाहून अधिक भाषांमध्ये वापरण्याच्या स्पष्ट सूचनांसह तयार केली जातील. विद्यार्थ्यांपर्यंत ई-सामग्रीचा प्रसार करण्यासाठी एक विश्वासार्ह बॅकअप यंत्रणा प्रदान केली जाईल.

e) **डिजिटल दरी कमी करणे –** अत्यंत मर्यादित डिजिटल सुविधा उपलब्ध असलेला लोकसंख्येचा एक मोठा वर्ग अजूनही अस्तित्वात आहे, हे वास्तव लक्षात घेता, दूरदर्शन, रेडीओ आणि कम्युनिटी रेडीओ अशा विद्यमान प्रसारमाध्यमांचा चित्रप्रक्षेपण आणि प्रसारणासाठी व्यापकपणे वापर केला जाईल. असे शैक्षणिक कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या विविध गरजा भागविण्यासाठी वेगवेगळ्या भाषांमध्ये २४/७ उपलब्ध करून देण्यात येतील. सर्व भारतीय भाषांमध्ये मजकूर निर्मितीला महत्व दिले जाईल आणि ते आवश्यक असेल. डिजिटल मजकूर शिक्षक आणि विद्यार्थ्यापर्यंत शक्यतो त्यांच्या शिक्षणाचे मध्यम असलेल्या भाषेतून पोहोचणे आवश्यक आहे.

f) **व्हर्च्युअल प्रयोगशाळा –** व्हर्च्युअल प्रयोगशाळा तयार कारणासाठी DIKSHA, SWAYAM आणि SWAYAM PRABHA या सारख्या विद्यमान ई-लर्निंग प्लॅटफॉर्मचा उपयोग केला जाईल. जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रात्यक्षिक आणि प्रत्यक्ष प्रयोग आधारित अध्ययन उपलब्ध होईल. आधीच मजकूर लोड केलेल्या टॅबलेट सारख्या योग्य डिजिटल उपकरणांद्वारे SEDG विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्याची शक्यता विचारात घेऊन ती विकसित केली जाईल.

g) **शिक्षकांना प्रशिक्षण आणि प्रोत्साहन –** विद्यार्थी केंद्रित अध्यापनशास्त्राचे आणि ऑनलाइन शिक्षण प्लॅटफॉर्म आणि साधने वापरून स्वतःच उच्च गुणवत्तेचे ऑनलाइन मजकूर निर्माते कसे बनावे? याचे शिक्षकांना काटेकोर प्रशिक्षण दिले जाईल. मजकूरासोबत आणि एकमेकांसोबत विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग सुलभ करण्यातील शिक्षकांच्या भूमिकेवर भर दिला जाईल.

h) **ऑनलाइन मूल्यांकन आणि परीक्षा –** राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र किंवा परखसारख्या प्रस्तावित संस्था, शालेय बोर्ड, NT किंवा इतर मान्यताप्राप्त संस्था क्षमता, पोर्टफोलिओ, रुब्रिक्स, मानक मूल्यांकन आणि मूल्यांकनाचे विश्लेषण यांच्या रचनेसह मूल्यांकनाच्या आराखड्याची रचना आणि अंमलबजावणी तयार करतील. एकविसाव्या शतकातील कौशल्यांवर लक्ष केंद्रित करून शैक्षणिक तंत्रज्ञान वापरून मूल्यांकनाची नवीन मार्ग निश्चित करण्यासाठी अभ्यास हाती घेतले जातील.

i) **अध्ययनाची मिश्र मॉडेल्स –** डिजिटल अध्ययन आणि शिक्षणाला प्रोत्साहन देताना, समोरासमोर प्रत्यक्ष अध्ययनाचे महत्त्वसुद्धा पूर्णपणे लक्षात घेण्यात आले आहे. त्यानुसार वेगवेगळ्या विषयांच्या योग्य पुनरावृत्तीसाठी मिश्र अध्यापनाची विविध परिणामकारक मॉडेल्स शोधले जातील.

j) **मानके निश्चित करणे –** ऑनलाइन आणि डिजिटल शिक्षणाबद्दलचे संशोधन होईल. तसे एनईटीएफ आणि इतर योग्य संस्था ऑनलाइन/ डिजिटल अध्यापन-अध्ययनासाठी आशय, तंत्रज्ञान आणि अध्यापनशास्त्र यांची मानके निश्चित करतील. ही मानके राज्य, बोर्ड, शाळा आणि शाळा संकुले इ. साठी ई-शिक्षणाची मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी मदत करतील.

**भारतातील शिक्षण प्रणाली सध्या ज्या प्रमुख समस्यांचा सामना करत आहे, त्या पुढीलप्रमाणे –**

१) अतिशय विखुरलेली उच्च शैक्षणिक परिसंस्था.
२) आकलन कौशल्याचा विकास आणि अध्ययनाच्या निष्पत्तीवर कमी भर.
३) शैक्षणिक शाखांची साचेबंद पद्धतीने विभागणी, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना खूप लवकर एका विशिष्ट विषयाची किंवा शाखेची निवड करायला लागते आणि अध्ययनाच्या संकुचित क्षेत्राकडे वळवले जाते.
४) मर्यादित उपलब्धता विशेषतः सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित क्षेत्रांमध्ये जेथे स्थानिक भाषेत शिकवणारे अतिशय कमी HEIs उपलब्ध आहेत.
५) मर्यादित शिक्षक आणि संस्थात्मक स्वायत्तता.
६) गुणवत्तेवर आधारित करिअर व्यवस्थापन आणि शिक्षक व संस्थेच्या प्रमुखांची प्रगती, यासाठी अपुरी यंत्रणा.
७) बहुतांश विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये संशोधनावर कमी भर आणि शाखांमध्ये स्पर्धात्मक सहाध्यायी परीक्षण संशोधन निधीचा अभाव.
८) HEIs मध्ये शासन आणि नेतृत्वाचा अभाव.
९) अपरिणामकारक नियामक व्यवस्था.
१०) अनेक संलग्न विद्यापीठे अस्तित्वात असल्यामुळे पदवीपूर्व शिक्षणाचा खालावलेला दर्जा.

**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२२ च्या दूरदृष्टीमध्ये पुढील मुख्य बदलांचा समावेश करण्यात आलेला आहे –**

१) अशा उच्च शैक्षणिक व्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करणे, ज्यात प्रत्येक जिल्ह्यात किंवा जवळपास किमान एक मोठे बहुशाखीय विद्यापीठ आणि महाविद्यालयाचा समावेश असेल आणि संपूर्ण भारतभर अशा अनेक HEI असतील ज्यांचे शिकवण्याचे किंवा कार्यक्रमाचे माध्यम स्थानिक किंवा भारतीय भाषा असेल.
२) अधिक बहुशाखीय पदवीपूर्व शिक्षणाच्या दिशेने वाटचाल करणे.
३) अध्यापकीय आणि संस्थात्मक स्वायत्ततेच्या दिशेने वाटचाल करणे.
४) विद्यार्थ्यांना अधिक चांगला अनुभव मिळण्यासाठी अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र मूल्यांकन, आणि विद्यार्थी सहाय्य यामध्ये सुधारणा करणे.
५) अध्यापन, संशोधन आणि सेवा यावर आधारित नेमणूक आणि करिअर प्रगतीद्वारे शिक्षकांच्या आणि संस्थात्मक नेतृत्वाच्या सचोटीची पुष्टी करणे.
६) सहाध्यायीनी पुनरावलोकन केलेल्या संशोधनाला अर्थसाहाय्य करण्यासाठी आणि विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये सक्रियपणे संशोधन रुजवण्यासाठी राष्ट्रीय संशोधन संस्थेचे (नॅशनल रिसर्च फाउंडेशन) स्थापना करणे.

७) शैक्षणिक व प्रशासकीय स्वायत्तता असलेल्या उच्च पात्रताधारक स्वतंत्र मंडळांमार्फत HEI चे शासन.
८) उच्च शिक्षणासाठी एकाच नियामकाद्वारे 'सुलभ पण परिणामकारक' नियमन.
९) उत्कृष्ट सार्वजनिक शिक्षणाच्या मोठ्या संधीसारख्या अनेक उपायांद्वारे अधिक उपलब्धता. समानता आणि सर्वसमावेशकता, उपेक्षित वंचितांसाठी खासगी/धर्मादाय विद्यापीठाद्वारे शिष्यवृत्त्या, ऑनलाइन शिक्षण व मुक्त दूरस्थ शिक्षण (ODL) आणि सर्व पायाभूत सुविधा व शिक्षण साहित्य दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सहज वापरता येण्याजोगे आणि उपलब्ध.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२२ ची वैशिष्ट्ये –**

१) भारताच्या नवीन शैक्षणिक धोरणाच्या आगमनाने केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय आता शिक्षण मंत्रालयया नावाने ओळखले जाईल.
२) नवीन शैक्षणिक धोरण २०२२ अंतर्गत शिक्षणाचे सार्वत्रीकरण केले जाईल. ज्यामध्ये वैद्यकीय आणि कायद्याचा समावेश करण्यात आलेला नाही.
३) भारतात पूर्वीच्या शैक्षणिक धोरणांतर्गत १०+२ पॅटर्न पाळला जात होता. मात्र आता नवीन शैक्षणिक धोरण अंतर्गत ५+३+३+४ पॅटर्नचा अवलंब केला जाईल. ज्या अंतर्गत बारा वर्षाचे शालेय शिक्षणही दिले जाईल.
४) ३ वर्षांच्या पूर्व शालेय शिक्षणाचाही समावेश करण्यात आला आहे. भारताच्या नवीन शैक्षणिक धोरण अंतर्गत सहाव्या येथील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. कारण व्यावसायिक प्रशिक्षण इंटर्नशिप ही सहाव्या इयत्तेपासून सुरू होणार आहे.
५) इयत्ता पाचवीपासून मातृभाषेतून/प्रादेशिक भाषेतून शिक्षण दिले जाईल. मातृभाषेतून शिक्षण घेता येईल.
६) पूर्वी जसे विज्ञान, कला आणि वाणिज्य शाखेचे प्रवाह असायचे त्याअंतर्गत विद्यार्थ्यांना ठराविक विषयाचा अभ्यास करायचा होता. पण आता ही पद्धत बंद करण्यात आली आहे.
७) सहाव्या इयत्तेपासून विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर आणि ॲप्लिकेशनची माहिती दिली जाईल. तसेच त्यांना कोडींग शिकवले जाईल.
८) सर्व शाळा डिजिटल केल्या जातील. सर्व प्रकारच्या सामग्रीचे प्रादेशिक भाषेत देखील भाषांतर केले जाईल.
९) नवीन शैक्षणिक धोरण २०२२ अंतर्गत व्हर्च्युअल लॅब देखील विकसित केल्या जातील.

**भारताच्या नवीन शैक्षणिक धोरण २०२२ चे फायदे –**

१) नवीन शैक्षणिक धोरण भारतात लागू करण्याचा सर्वात मोठा उद्देश भारतातील विद्यार्थ्यांना सक्षम करणे हा आहे.
२) नवीन शैक्षणिक धोरण २०२२ ची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र सरकार जीडीपीच्या सहा टक्के खर्च करेल.
३) संस्कृत आणि भारतातील प्राचीन भाषेला अभ्यासात महत्वाची भूमिका दिली जाईल. संस्कृतला आयटीआयच्या क्षेत्रातही पुढे नेले जाईल. तसेच ज्या विद्यार्थ्यांना हवे असेल ते संस्कृत भाषेतूनच असून इतर विषयांचा अभ्यास करू शकतील.
४) बोर्डाची परीक्षा खूप सोपी होणार. पूर्वी बोर्डाच्या परीक्षेच्या वेळी बोर्डाची तयारी फक्त दोन–तीन महिन्यात अभ्यास करूनच करायची, असे वाटणारे विद्यार्थी ही पद्धत रद्द होणार. आता विद्यार्थ्यांना वर्षभर अभ्यास करा आणि बोर्डाची परीक्षा दोन टप्प्यात देता येईल.
५) अभ्यास सोपा करण्याबरोबरच विद्यार्थ्यांना समजून घेता यावे. यासाठी आर्टिफिशिअल इंटेलिजन्स सॉफ्टवेअरचाही अभ्यास क्षेत्रात वापर केला जाईल.
६) उच्च शिक्षण स्तरावर एम. फील. पदवी रद्द करण्यात येत आहे.
७) नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत मुख्य अभ्यासक्रमात अभ्यासक्रमेतर उपक्रम ठेवण्यात आले आहेत.
८) नवीन शैक्षणिक धोरण २०२२ अंतर्गत विद्यार्थ्यांना ०३ भाषा शिकविल्या जातील. ज्या भाषा राज्याला त्यांच्या स्तरावर निश्चित कराव्या लागतील.
९) नवीन शैक्षणिक धोरण २०२२ अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेद्वारे शालेय शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा तयार केला जाईल.
१०) नवीन शैक्षणिक धोरण आल्याने कुशल विद्यार्थ्यांवर अधिक लक्ष दिले जाणार असून त्यांना विशेष शिक्षण दिले जाणार आहे.
११) नवीन शैक्षणिक धोरण २०२२ अंतर्गत तळागाळातील नवीन नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी भारतात अनेक संस्था स्थापन केल्या जातील. ज्यामुळे नवीन नवीन शैक्षणिक धोरण सुरळीत चालण्यास मदत होईल.
१२) नवीन शैक्षणिक धोरण २०२२ मंजूर झाल्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक क्षेत्रात कुशल व सक्षम होण्यास मदत होईल.

अशा प्रकारे नवीन शैक्षणिक धोरण २०२२ भारतीय समाजासाठी राष्ट्रीय व राज्य पातळीवर सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धिक आणि मानसिक स्तरावर सामाजिक दृष्टीकोनातून अतिशय महत्वाचे धोरण आहे. याचा भविष्यात सामाजिक सर्व स्तरावर विकास होण्यास मदत होईल. म्हणून नवीन शैक्षणिक धोरण २०२२ जे आम्ही स्वागत करतो.

**संदर्भ**

१) भारत मे सामाजिक विकास, प्रा. पी. एन. नाटानी, आदी पब्लिकेशन, जयपूर.
२) मानवी हक्क, प्रा. व्ही. बि. पाटील, के सागर प्रकाशन, पुणे.
३) भारतीय राजकीय विचार, डॉ. शुभांगी राठी, अथर्व प्रकाशन, जळगाव.
४) मुलभूत जनरल नॉलेज २०२०, रंगराव पाटील, प्रशांत प्रकाशन, जळगाव.
५) National Education Policy, Education Department, Govt. of India, New Delhi
६) www.wikipedia.com/nationalšeducationšpolicyš2020/pdf
७) www.google.com

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# सायबर गुन्हेगारी : दक्षता व उपाययोजना

**प्रा. डॉ. दिलीप आर. चव्हाण**
समाजशास्त्र विभाग
ज.जि.म.वि.प्र.सह समाजाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव

**प्रस्तावना –**

आजचे युग हे माहिती व तंत्रज्ञानाचे युग आहे. आपण 'इन्फॉरमेशन (Information) युगात' रहातो. संगणक, मोबाईल, फोन, डिजिटल कॅमेरे आणि इतर इलेक्ट्रोनिक्स गॅझेट आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. दररोजच्या जीवनातील विविध पैलूंमधील तंत्रज्ञानाचा आणि इंटरनेटचा वाढता वापर यामुळे सायबर अपराधी बऱ्याच मोठ्या प्रमाणावर नागरिकांवर हल्ले करत आहेत. माहिती तंत्रज्ञानाचा वापर गैरप्रकारासाठी आणि गुन्हेगारीसाठी केला जातो. त्यास 'सायबर गुन्हा' असे म्हणतात पांढरपेशीय गुन्हेगारीतील हा एक नवा प्रकार आहे. आधुनिक काळात संपूर्ण जगात सायबर गुन्ह्यांच्या संख्येत प्रचंड वाढ होत आहे. भारतात देखील या गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले आहे. सायबर गुन्ह्यात दुसऱ्याच्या बेकायदेशीर फाईल्स, प्रोग्रॅम, माहिती चोरणे, पासवर्ड मिळवून पैसे कमविणे, माहिती आणि ज्ञान चोरणे याचा अंतर्भाव होतो. सायबर गुन्हे हे उच्च वर्गातील लोक करतात. आधुनिक काळात तर क्रीप्टोकरन्सी सारखे घोटाळे होत आहेत. हा देखील सायबर गुन्हेगारीचाच प्रकार आहे.

**उद्दिष्ट्ये –** प्रस्तुत संशोधन पेपरच्या अनुषंगाने खालील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आले आहे.

१) सायबर गुन्हेगारीबाबत व सुरक्षेबाबत माहिती जाणून घेणे.
२) सायबर गुन्ह्यांच्या संदर्भात समकालीन गुन्ह्यांचे स्वरूप जाणून घेणे.
३) सायबर गुन्ह्यांचे स्वरूप लक्षात घेवून त्यानुसार उपाययोजना राबविणे.

**शोधनिबंधाचे गृहीतके –**

१) सायबर गुन्हेगारी विघातक स्वरूपात वाढत आहे.
२) तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे व माहितीच्या अभावामुळे गुंतागुंतीचे गुन्हे निर्माण होत आहेत.
३) उच्च शिक्षित आणि संगणकाचे ज्ञान आहे, असे उच्च वर्गातील लोक हे गुन्हे करतात.

**संशोधन पद्धती –** प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अभ्यास पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला असून विविध विचारवंतांनी आपापल्या ग्रंथात व्यक्त केलेल्या विचारांचा आधार घेतलेला आहे. याशिवाय वर्तमानपत्रे, नियतकालिके व इंटरनेटवर उपलब्ध असणाऱ्या प्रकाशित माहितीचा आधार घेतला आहे.


**सायबर गुन्ह्याचा अर्थ व स्वरूप –** सायबर गुन्हा किंवा संगणकीय गुन्हा ही संज्ञा संगणक व इंटरनेटशीअसणाऱ्या या प्रत्यक्ष गुन्ह्यात संगणकाचा प्रामुख्याने वापर असणाऱ्या गुन्ह्याला उद्देशून वापरला जातो. सायबर गुन्हे विशेष करून हॅकिंग, प्रताधिकार, बाललैंगिक चित्रण इ. स्वरूपात दिसून येतात. याशिवाय व्यक्तिगत किंवा गोपनीय माहिती चोराने किंवा फोडणे हे देखील सायबर गुन्ह्यात मोडते. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रकाराबरोबर सायबर गुन्हेगारीमध्ये लक्षणीय वाढ झालेली दिसून येते.

**अर्थ –**

१) इंटरनेटद्वारे केल्या जाणाऱ्या गैरवापरास सायबर क्राईम म्हटले जाते.
२) सायबर स्पेसचे साधन वापरून केलेले कोणतेही बेकायदेशीर कृत्य म्हणजे सायबर गुन्हा होय.

इंटरनेट आणि सोशल मिडीयाने आपल्या दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणात आक्रमण केले आहे. संगणकीय क्षेत्रात सायबर क्राईमचा झालेला शिरकाव हा अनेक अनर्थ व संकटाना आमंत्रण देणारा आहे. साधारणतः सर्वसामान्य नागरिकांचा असा समज आहे की, सायबर क्राईमशी आपला काही संबंध नाही. या समजुतीमुळे नागरिक सायबर क्राईमबाबत अनभिज्ञ आहेत. परंतु जरा सूक्ष्म विचार करून पाहिले तर आपल्याला रोजच या सायबर क्राईमचा सामना करावा लागतो. आपल्या ई-मेलवर सॅम मेल येत असतात, मोबाईलवर अनावश्यक कॉल, मेसेजेस येतात. नेट बँकिंग अकाउंट असेल तर त्याचा पासवर्ड, आय. डी. हॅक होतो. हे सर्व प्रकार सायबर गुन्हेगारीशी मोडतात. संगणक, इंटरनेट यांच्या माध्यमातून एखाद्या व्यक्ती, संस्था आदींच्या संगणक प्रणालीमध्ये शिरून त्यातील माहिती चोरणे, त्याचा गैरवापर करणे, व्हाटसअप पाठविणे, मेलद्वारे फसवणूक, धमकी देणे, खंडणी मागणे अशा कारवायांना सायबर क्राईम म्हणता येईल. परंतु सायबर क्राईमची व्याप्ती व तंत्र हे रोज बदलत असल्याने त्याला विशिष्ट अशा रचनेत वा संकल्पनेत बसविणे थोडे जिकरीचे आहे.

सारांश, आज जगातील प्रत्येक क्षेत्र, व्यवसाय इंटरनेटने प्रभावित झालेला दिसून येतो. इंटरनेटच्या या मायाजालाचा हॅकर अतिशय क्लुप्तीने गैरवापर करतात. सायबर क्राईममधील आजची व उद्याची आव्हाने रोज नव्या स्वरूपात, नव्या आकारात व नव्या शस्त्रासह पुढे येत आहे. आज भारतात हॅकिंग, पोर्नोग्राफी व डाटा थेष्ट स्वरूपाचे गुन्हे आयटी सेक्शनखाली नोंदवले जातात. तथापि यात व्यापकता येऊन सायबर क्राईमखाली येणारे सर्व गुन्हे आयटी सेक्शनखाली नोंदविणे महत्वपूर्ण ठरेल.




**सायबर गुन्ह्याचे प्रकार** (Types of Cyber Crime) – सायबर गुन्हे करण्याचे अनेक प्रकार आहेत. वैयक्तीक स्वरूपातील संवेदनशील माहितीची चोरी किंवा परस्पर देवाणघेवाण, आर्थिक फसवणूक (फिशिंग, स्पूफिंग), हॅकिंग (डीनायल ऑफ सर्व्हिस), अश्लील मजकूर म्हणजे सायबर गुन्हेगारीच्या भाषेत पोर्नोग्राफी, कॉपीराईट व बौद्धिक संपदा हक्कांचे उल्लंघन असे सायबर गुन्ह्याचे प्रकार आहेत. यांची सविस्तर चर्चा पुढीलप्रमाणे –

**१) हॅकिंग (Hacking) – ही एक सोपी संज्ञा आहे. जी इतर कोणत्याही संगणकावर किंवा नेटवर्कला बेकायदेशीर सुचना पाठवण्याची व्यवस्था करते** – कोणत्याही संगणक, संगणक प्रणालीमध्ये अनधिकृत केलेला प्रवेश म्हणजे 'हॅकिंग' आणि तो करणारा 'हॅकर' सायबर गुन्ह्यामध्ये हॅकिंग किंवा हॅकर या दोन संज्ञा वारंवार पुढे येतात. ई-कॉमर्स साईटवर हॅकिंगचे प्रमाण अधिक आहे. इंटरनेटचा चुकीचा वापर करून अनधिकृत माहिती मिळवली जाते. उदा. एखादी वेबसाईट किंवा कंप्युटर सिस्टम हॅक करून अनधिकृत माहिती चोरणे, खराब करणे, हॅकर्स नेहमी मोबाईल नेटवर्क हॅक करतात. प्रयेक वेळी हॅकिंग हे पैशांसाठीच केले जाते असे नव्हे तर अनेकदा समाजात निव्वळ अस्वस्थता निर्माण करण्यासाठी किंवा विकृत आनंद मिळविण्यासाठी केला जातो. काही वेळा राजकीय हेतूने एखाद्या नेत्याच्या घरी बेहिशेबी मालमत्ता सापडण्याची पोस्ट व्हायरल केली जाते.

**२) बाल अश्लीलता आणि गैरवर्तन किंवा अनुचित गोष्टींचा किंवा अश्लील गोष्टींचा प्रादुर्भाव** – जगभरात मुलांचा लैंगिक अत्याचार करण्यासाठी इंटरनेटचा वापर केला जात आहे. हा एक सायबर गुन्हेगारीचा प्रकार आहे. ज्यात बाल अश्लीलतेच्या उद्देशाने गुन्हेगार अल्पवयीन मुलांना चॅट रूम्सद्वारे विनवणी करतात. यालाच पोर्नोग्राफी असेही म्हणतात. अश्लील चित्रफिती, छायाचित्रे, मजकूर इंटरनेटद्वारे डाऊनलोड करणे, प्रसारित करणे, पाहणे असे प्रकार पोर्नोग्रफीमध्ये मोडतात. थोडक्यात, सोशल मिडीयावर किंवा वेबसाईटद्वारे कायद्याने बंदी असलेल्या गोष्टी दाखविणे यामध्ये चाईल्ड पोर्नोग्राफीचा क्सामावेश जास्त आहे. या बाबींमुळे लहान मुलांच्या मनावर विपरीत परिणाम होतात आणि यामुळे मुले चुकीच्या वळणार जातात.

**३) चाची किंवा चोरी किंवा डेटा थेफ्ट** – या प्रकारात सायबर गुन्हेगार एखाद्या संगणकातील माहिती पेनड्राईव्ह, डेटा बँक, सीडीचा वापर करून चोरतो. या माहितीचा गैरवापर होतो किंवा विकला जातो. जेव्हा एखादा व्यक्ती कॉपीराईटचे उल्लंघन करतो आणि संगीत, चित्रपट, गेम्स किंवा सॉफ्टवेअर डाऊनलोड करतो. तेव्हा हा गुन्हा होतो. चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक बऱ्याचदा या गुन्ह्याचा बळी ठरतात. कॉर्पोरेट क्षेत्रात अशा प्रकारचे गुन्हे वारंवार घडतात. दुसऱ्याच्या एटीएमचा वापर करून पैसे काढणे किंवा खरेदी करणे तसेच अकाऊन्टचा पासवर्ड चोरणे आणि त्याचा गैरवापर करणे.

**४) व्हायरस अटॅक** – एखाद्या संगणक प्रणालीत ई-मेल, चॅटींग याद्वारे व्हायरस पाठवून संगणक प्रणाली हॅकरच्या नियंत्रणाखाली आणली जाते. व्हायरसचे विविध प्रकार आहे. संगणक यंत्रणा बिघडवणे, ठप्प करणे, नियंत्रण बाह्य करण्यासाठी हे व्हायरस कार्यरत असतात. ट्रोजनसारख्या व्हायरसद्वारे जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात बसून जगभरातील कोणत्याही संगणकावर नियंत्रण ठेवणे शक्य आहे. इतके याचे स्वरूप गंभीर आहे. प्रतिस्पर्धी राष्ट्रांतर्गत व्हायरस अटॅकचे प्रमाण वाढलेले आहे.

**५) ई-मेल, एसएमएस, चॅटींग याद्वारे फसवणूक किंवा ई-मेलद्वारे त्रास देणे** (Harassment via Emails) – या प्रकारच्या सायबर गुन्ह्यात आपल्याला ई-मेल येतो की, तुम्ही मोठी रक्कम जिंकली आहात तसेच आपणास लॉटरी लागली आहे आणि ती रक्कम तुमच्या पर्यंत पोहचवण्यासाठी काही खर्च (प्रोसेसिंग फी) आहे. ती तुम्ही आम्हाला तुमच्या बँक अकाउंटसह पाठवा. परंतु हे सर्व खोटे असते. अशा प्रकारचे मेल किंवा एसएमएस आपल्याला वारंवार येतात. हा 'नायजेरियन सायबर फ्रॉड' समजाला जातो.

**६) सायबर स्टॉकिंग** – इतरांच्या कामकाजावर ऑनलाईनरीत्या पाळत ठेवणे. हा एक प्रकारचा ऑनलाईन Pi आहे. ज्यामध्ये पिडीतेला ऑनलाईन संदेश किंवा ई-मेलच्या बॅरेजचा सामना करावा लागतो. तुमच्यावर लक्षपूर्वक पाळत ठेवून तुम्हा ई-मेल मोबाईल, वेब कॅमेरा, विडीयोद्वारे इंटरनेटचा वापर करून धमकी देण्यात येऊ शकते. ई-मेल अथवा फेसबुक, सोशल साईटद्वारा चॅटींग व सर्फिंगच्या माध्यमातून गुन्हेगार आपली संगणकीय ओळख (आय. डी.) पासवर्ड हॅक करतात. विशिष्ट व्हायरस आपल्या संगणकात डाऊनलोडसाठी पाठवून आपली संपूर्ण वैयक्तिक माहिती, संगणकात केल्या जाणाऱ्या सर्व क्रिया, बँक अकाउंट नंबर, पासवर्ड चोरून नागरिकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो.

**७) सायबर दहशतवाद** – याला माहिती युद्ध म्हणूनही ओळखले जाते. ज्यात संगणक व्हायरस वापरून संगणक नेटवर्कमध्ये जाणीवपूर्वक आणि मोठ्या प्रमाणात हल्ले करणे किंवा मालवेयर वापरून शारीरिक हल्ले करणे, व्यक्ती, सरकार आणि संस्था यांच्यामध्ये दहशतीची भावना निर्माण करणे हे दहशतवादाचे उद्दिष्ट असते. २६/११ चा मुंबईतील अतिरेक्यांनी केलेला हल्ला सायबर तंत्राचा वापर करून केला होता. रशियाने जॉर्जियावर केलेला हल्ला हा देखील दहशतवादाचाच प्रकार होता इ.

**८) मानहानी, निंदा** (Defaniation) – ई-मेलद्वारे एखाद्या व्यक्तीचे नाव खराब केले जाते तेव्हा हा गुन्हा मानला जातो. सार्वजनिक ठिकाणचा फोटो एखाद्याने तुमच्या संमतीविना व जाणीवपूर्वक वाईट पद्धतीने फोटो काढला तर व तो फोटो सन्मानजनक नसेल आणि तुमची प्रतिष्ठा घालवणारा असेल तर तुमच्या गुप्ततेचा भंग होतो. तसेच एखाद्याचे मेल अकाउंट हॅक करून त्या अकाउंटमधून दुसऱ्या व्यक्तीला खराब किंवा अश्लील ई-मेल पाठविणे हा सायबर गुन्हा ठरतो.

९) **क्रॅकिंग (Cracking)** – एखाद्याच्या कंप्युटरमधील खाजगी माहिती किंवा फाईल्स चोरणे.

१०) **उरीवळपस** – दुसऱ्याच्या TMचा वापर करून त्यातून पैसे काढणे किंवा खरेदी करणे.

११) Cheating Fraud – दुसऱ्याच्या अकाउंटचा पासवर्ड चोरणे आणि त्याचा वापर करणे.

**सायबर गुन्ह्याची कारणे** – माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसाराबरोबर सायबर गुन्ह्यांमध्ये लक्षणीय वाढ होताना दिसून येते. या गुन्ह्यांची कारणे पुढीलप्रमाणे

**१) पैसा मिळवण्यासाठी किंवा कमी वेळात श्रीमंत होणे** – सायबर गुन्हेगार नेहमीच पैसे कमविण्याचा सोपा मार्ग निवडतात. ते श्रीमंत लोक किंवा बँक, कॅसिनो किंवा वित्तीय संस्था सारख्या श्रीमंत संस्थांना लक्ष करतात.आर्थिक व्यवहार होतात व संवेदनशील माहिती हॅक करतात आणि त्याबदल्यात पैसे कमवतात किंवा माहिती विकतात. अशा गुन्हेगारांना पकडणे अवघड आहे. म्हणूनच जगभरातील सायबर गुन्ह्यांची संख्या वाढत आहे.

**२) समाजात अस्वस्थता निर्माण करण्यासाठी** – प्रत्येक वेळी हॅकिंग हे पैशांसाठीच केले जाते असे नव्हे तर अनेकदा समाजात निव्वळ अस्वस्थता निर्माण करण्यासाठी किंवा विकृत आनंद मिळविण्यासाठी केला जातो. काही वेळा राजकीय हेतूने एखाद्या नेत्याच्या घरी बेहिशेबी मालमत्ता सापडल्याची पोस्ट व्हायरल केली जाते. विविध आक्षेपार्ह व गुन्हेगारी स्वरूपाच्या पोस्ट टाकून समाजमन दुषित केले जाते.

**३) चिथावणी देण्यासाठी** – सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर फोटो किंवा चित्राची पोस्ट टाकणे, हा गुन्हा आहे. त्याशिवाय अन्य कोणीतरी पोस्ट टाकली आणि त्यामुळे कोणाच्या तरी भावना दुखावल्या जाऊ शकतात. त्यातून दोन समाजात तेढ निर्माण केले जाते. देशाची एकता आणि अखंडता सुरक्षितेच्या दृष्टीने व सार्वभौमत्वाला धक्का पोहोचणारी अथवा लोकांमध्ये दहशत पसरवणारी माहिती अनेकांना शेअर करणे गुन्हा आहे.

**४) पेटीएम केवायसी करण्यासाठी** – पेटीएम अद्ययावत करण्यासाठी केवायसीचा बहाणा करून सायबर गुन्हेगारांकडून नागरिकांना फोन, मेसेज व लिंक पाठवून आर्थिक फसवणूक केली जाते. दैनंदिन व्यवहारांसाठी पेटीएम व अन्य ई–वॅलेटचा सर्रास वापर होत असल्याने फोन, मेसेज किंवा लिंक पाठवून बँक खात्याची गोपनीय माहिती मिळवली जाते. त्यानंतर तुमच्या खात्यातील लाखो रुपये काही मिनिटातच लंपास केले जातात.

**५) n अपडेट करणे** – ॲप अद्यावत करावयाचे सांगून सायबर गुन्हे घडतात. जसे एनी डिस्क,टीमव्हीवर, क्विक सपोर्ट यासारखे मोबाईल प्लिकेशन डाऊनलोड करण्यास सांगून नंतर यूपीआयपीनसह एटीएम, क्रेडिट कार्डची गोपनीय माहिती विचारून आर्थिक फसवणूक केली जाते.

**६) एखाद्या व्यक्तीची प्रतिष्ठा कमी करण्यासाठी** – एखाद्या व्यक्तीच्या नकळत सार्वजनिक ठिकाणी फोटो काढून तिची छेडछाड करून त्या व्यक्तीला बदनाम करणे किंवा एखाद्या राजकीय व्यक्तीला बदनाम करण्यासाठी त्यांच्याकडे बेहिशेबी मालमत्तेचे घबाड सापडले, अशी पोस्ट टाकून राजकीय करिअर नष्ट करणे, यात त्याची समाजात प्रतिष्ठा कमी व्हावी हा हेतू असतो.

**७) त्रास देण्यासाठी** – ई–मेल किंवा फेसबुकवर मैत्री करून नंतर त्या व्यक्तीला त्रास दिला जातो. यात विशेष करून स्त्रियांना लक्ष्य केले जाते. त्यांचे इ–मेल अकाऊंट हॅक करून त्या अकाउंटमधून दुसऱ्या व्यक्तीला खराब किंवा अश्लील फोटो किंवा इमेल पाठविले जातात किंवा इतरांच्या कामकाजावर ऑनलाइनरित्या पाळत ठेवली जाते तसेच तुम्ही रक्कम जिंकला आहात लॉटरी लागली आहे.

**८) सुरक्षा प्रणाली मिळवण्यासाठी** – हॅकर क्सेस कोड, रेटिना प्रतिमा, प्रगत वोईस रेकॉर्डर इत्यादी चोरू शकतात. जे बायोमेट्रिक सिस्टीम सहजपणे मूर्ख बनवू शकतात. फायर वॉललाबायपास करून अनेक सुरक्षा प्रणाली मिळवण्यासाठी वापरता येऊ शकतात.

**९) लापरवाही** – दुर्लक्ष हे मानवी आचरणातील एक वैशिष्ट्य आहे. आपण संगणकाचा किंवा फेसबुकचा वापर करताना बऱ्याच वेळा अकाउंट बंद करण्याचे राहून जाते किंवा बऱ्याच वेळा आपण इतर कामात असल्यामुळे इतरांना आयडी व पासवर्ड देतो. त्याचा फायदा सायबर गुन्हेगार घेत असतात. तेव्हा संगणक प्रणालीकडे दुर्लक्ष करू नये.

**१०) डेटा चोरणे व स्वतःच्या फायद्यासाठी वापरणे** – संगणकात डेटा अगदी लहान जागेत संग्रहीत करण्याचे वैशिष्ट्य आहे. हे इतर कोणत्याही संचयनातून डेटा चोरणे आणि स्वतःच्या फायद्यासाठी त्याचा वापर करणे लोकांना अधिक सुलभ होतो. संशोधन कार्यामध्ये असे वांग्मयचौर्य मोठ्या प्रमाणात केले जाते.

**११) दहशतवादी कारवाया घडवून आणण्यासाठी** – आज माहिती तंत्रज्ञानामुळे जग फार जवळ आले आहे. आपला विचार किंवा प्रभाव निर्माण करण्यासाठी काही गुन्हेगार हे संगणकाचा किंवा संगणकप्रणाली व सॅटॅलाइटचा वापर करून आपल्या देशात बसून दुसऱ्या देशात आत्मघाती कृत्ये करतात. त्यामुळे माहिती तंत्रज्ञानाचा मानवाला जसा उपयोग झाला तसा काहींनी मानवी समाजाला धोका करण्यासाठी याचा वापर सुरू केलेला दिसून येतो. या सायबर दहशतवादातून अमेरिका देखील सूटली नाही .

अशा प्रकारे सायबर गुन्हेगारीची कारणे सांगता येतील.

**दक्षता** – शासन लोकांची फसवणूक होऊ नये म्हणून मोबाईलवर आणि टीव्हीवर वेळोवेळी सायबर सुरक्षेच्या बाबतीत सुचना देते. त्या सूचनांचे जनतेने काटेकोरपणे पालन केल्यास सायबर गुन्ह्यांचे प्रमाण कमी होऊन जनतेची होणारी फसवणूक टळू शकेल. डिजिटल व्यवहार करताना सजग राहणे आवश्यक आहे. कोणतीही बँक आपल्या खातेदारांकडून त्यांच्या बँक खात्याबद्दलची गोपनीय स्वरूपाची माहिती कधीही मागवीत नाही. आपण सावध राहिले पाहिजे. सायबर गुन्हेगाराला शिक्षा करण्यासाठी 'माहिती तंत्रज्ञान कायदा २००२' या कायद्यात विशेष तरतूद केली आहे.

**सायबर सुरक्षेचे सात स्तर** (7 Layers of Cyber Security)

| | | |
|---|---|---|
| १) | मानवी स्तर | The Human Layer |
| २) | परिमिती सुरक्षा | Perimeter Security |
| ३) | नेटवर्क सुरक्षा | Network Security |
| ४) | अंतिम बिंदू सुरक्षा | Endpoint Security |
| ५) | अनुप्रयोग सुरक्षा | Application Security |
| ६) | डेटा सुरक्षा | Data Security |
| ७) | मिशन क्रिटीकल असेटस | Mission Critical Assets |

**उपाययोजना –**

१) आपला पिन व आयडी किंवा ओटीपी व पासवर्ड कोणत्याही व्यक्तीशी शेअर करू नका.
२) लॉग-इन करताना रिमेंबर पासवर्ड हे ऑप्शन अनचेक करा.
३) सार्वजनिक ठिकाणी किंवा कॉमन कॉम्प्युटरवरून तुमचे ई-मेल किंवा अन्य संकेतस्थळांना भेट दिल्यानंतर ब्राउझिंग हिस्ट्री आणि कुकीज डिलीट करण्यास विसरू नका.
४) चॅट करताना कुठलीही महत्त्वाची माहिती टाईप करू नका. वेब कॅमेरा काम झाल्यानंतर बंद करा किंवा झाकून ठेवा.
५) दर दोन ते तीन आठवड्यांनी तुमचे पासवर्ड बदला. पासवर्डमध्ये तुमचा फोन नंबर, जन्मतारीख घरातल्या लोकांची नावे यांचा वापर टाळावा.
६) सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या बँक खात्यासंदर्भातील कोणतीही माहिती मोबाईल डिव्हाइसमध्ये स्टोअर करू नका.जसे खाते क्रमांक, डेबिट आणि क्रेडिट कार्ड पिन आपल्या मोबाईलमध्येस्टोअर करू नये.
७) मोबाईलच्या 'स्क्रीन लॉक'चा वापर करा. ऑनलाईन बँकिंगचा वापर करताना स्क्रीन लॉकचा वापर करावा.
८) इंटरनेट वापरताना आपला आयडी क्रमांक, नेट बँकींग अकाऊंट क्रमांक, पासवर्ड क्रमांक अथवा आपली वैयक्तिक माहिती उघड करताना सावधानता बाळगावी.
९) आपली संगणक सिस्टीम ऍन्टी व्हायरस, फायरवॉलने सुरक्षित ठेवावी. स्पॅम मेल,फसवे मेल यावर डबल क्लिक करून उघडण्याचा प्रयत्न करू नये. फसवे मेल डिलीट करणे हाच मोठा प्रतिबंधात्मक उपाय ठरतो.
१०) ऑनलाइन बँकिंग करताना संकेतस्थळे सुरक्षित असल्याची खात्री करा. ऑनलाईन व्यवहार होताक्षणी लॉग आऊट करा.
११) जातीय द्वेष, हिंसा, निंदानालस्ती, अपप्रचार, टिंगल, अफवा अशा स्वरूपाचे व आशयाचे मेसेजेस पोस्ट करू नका. अथवा फॉरवर्ड देखील करू नका. कोणाबद्दलही आक्षेपार्ह पोस्ट सोशल मीडियावर प्रदर्शित करू नका.
१२) डेटा सुरक्षेसाठी पीन लॉक किंवा फिंगर प्रिंट लॉकचा वापर करा.
१३) जो ईमेल आयडी बँक खाते, पैशाचे देवाणघेवाणीसाठी वापरतात,त्याचा वापर सोशल मीडियावर करू नका
१४) डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी कोणतीही वेबसाईट वापरल्यानंतर लॉग आऊट नक्कीच करा.
१५) ब्राउजरचा वापर केल्यानंतर तुमची माहिती ब्राउजरमधून डिलीट करत चला. शिवाय पासवर्ड कधीही सेव करू नका.

अशाप्रकारे सायबर गुन्हेगारी संदर्भात दक्षता घेता येईल व आपली होणारी फसवणूक टाळता येईल.

**संदर्भ**

१) Nina Godbole Sumit Belpure, Cyber Security Understanding Cyber Crimes, Computer Forensics and Legal Perspectives, Wiley.
२) Cyber Security R180521
३) Anti Hacker Tool Kit (Indian Edition) by Mike Shema, Publication MC Graw Hill.
४) Computer Forensics Kruse, Warren and Jay Heiser Addison Wesley, 2002.
५) भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या, प्रा. डॉ. प्रदीप आगलावे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
६) दै. लोकमत, दै. दिव्य मराठी, दै. सकाळ वर्तमानपत्रे
७) www.cybercellmumbai.gov.in

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# सातपुड्यातील आदिवासी संस्कृती आणि लोकजीवन

**प्रा. साळवे कल्पना सुदास**
मराठी विभाग
म. ज. पो. वळवी कला, वाणिज्य व श्री. वि. कृ. कुळकर्णी विज्ञान महाविद्यालय, धडगाव, जि. नंदुरबार

सातपुडाच्या निसर्गरम्य पर्वतरांगामध्ये पसरलेल्या समाज हा प्रामुख्याने आदिवासी समाज होय. महाराष्ट्रात ४७ आदिवासी जमाती आहेत. मुख्यत्वे करुन ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, बुलढाणा, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यातील आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. धुळे, नंदुरबार व जळगावमध्ये भिल्ल, पावरा, मावची, कोकणी अशा जमाती प्रामुख्याने आहेत. ठाण्यात कोकणी, कोकणा, महादेव कोळी तर बुलढाण्यापासून पूर्व विदर्भातील जिल्ह्यामध्ये गोंड, माडिया, गोंड भिल्ल, कोरकू, न्याहल यासह अनेक उपजमाती आहेत. त्यांची प्रत्येक जमातीची स्वतंत्र भाषाशैली आहे. त्यात भिलोरी, कोकणी, पावरी, मावची, कोटली, कायली, डागी, बागलाणी अशा बोली भाषांचा समावेश आहे. यातील काही भाषा या बोलता येत नसल्या, समजत नसल्या तरी बिगर आदिवासी समाजाला माहित आहेत.

महाभारत पूर्वकालीन आदिवासींच्या अलिखित इतिहासात सातपुड्यातील थंड हवेचे ठिकाण 'दाब' हे आदिवासी राज्याचे केंद्रस्थान होते.'दाब' वैधी भिलट ह्या आदिवासी आद्य पुरुषाच्या सल्ल्याने राजे तारमहाल, बाभोन्या पोरबदेव, कोलपासू , सिडगोवा इ. राजे राज्य कारभार करीत होते.

सातपुड्यात प्रामुख्याने पावरा, भिल्ल, परमार आदिवासी समाज वसलेला आहे यांची 'पावरी' ही भाषा मुख्यत्वाने बोलली जाते. आदिवासींची खास आणि वेगळी संस्कृती, परंपरा आहेत. आदिवासी समाज हा दऱ्याखोऱ्यात राहणारा आहे. त्यामुळे इतर नागर समाजापेक्षा हा समाज थोडा वेगळा दुर्लक्षित असा होता.परंतु अलीकडच्या काळात बऱ्याच मंडळींनी आदिवासी संस्कृती, लोकजीवन, परंपरा यांच्यावर प्रकाश टाकलेला आहे.

**याहा मोगी** – सातपुड्यातील आदिवासींचे सर्वात मोठे पूजनीय दैवत म्हणजे याहा मोगी (देवमोगरा माता) होय. आदिवासींच्या या देवतेला अलीकडच्या काळात अमाप प्रसिद्धी मिळत आहे. तिचे मूळ नाव 'मोगी' पण हे बदलून तिच्या तीर्थक्षेत्राच्या नावावरून तिचे नामकरण 'देवमोगरा' असे झाले आहे. आदिवासी श्रद्धेने देवमोगरा याहा मोगी अथवा 'मोडी याहा' याहा (आई) म्हणूनच श्रद्धायुक्त अंत:करणाने नतमस्तक होऊन आपली सुख दु:खाची गाऱ्हाणी घेऊन शरण येतात. हि देवी संपूर्ण आदिवासी स्त्रीच्या वेशात आणि अलंकारांनी नटलेली आहे. मोगीचा काल महाभारत कालीन मानला जातो. परंतु प्राचीन काळापासून आपण भिल्लांचे वास्तव्य भारतात होते असे म्हणतो. आर्य-द्रविड संघर्षाचा इतिहास अभ्यासतो. मात्र याहा मोगीचा कालखंड महाभारत पुर्वीचाही असू शकतो. हे कुलदैवत जेथे आहे तिथे महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश या तिन्हींच्या राज्याच्या सीमेवर असलेल्या देवमोगरा येथे आहे. याहा मोगी बांबूपासुन तयार केलेल्या कणगीत स्थानापन्न आहे. या बांबूच्या कणगीत टिकाऊ घाण्यात ती प्रतिष्ठापीत आहे. (भगर साब आदी.)

येथे देवीच्या यात्रोत्सवाला शिवरात्रीपासून सुरुवात होते. यात्रेला येताना भक्त देवीला अर्पण करण्यास भाताच्या ओंब्या, नारळ, अर्ध्य म्हणून दारू व नवस असल्यास बोकडे, कोंबड्या मारल्या किंवा सोडल्या जातात.

**वेशभूषा** – पुरुष धोतर, बंडी-मुंडासे, कानात एखादी रिंग अशी वेशभूषा करतात. अलीकडे सर्वच आधुनिक पोशाख वापरू लागले आहेत. स्त्रियांचा पोशाख दोन पातळ बहुदा नववारी पातळाचे दोन तुकडे करुन एक पातळ कमरेपासून पायापर्यंत तर दुसरे डोक्यावर पांघरायचे अंगात चोळी किंवा ब्लाउज आदिवासी स्त्रियांना रंगीबेरंगी काचमण्याच्या माळा, पांढऱ्या रंगाच्या चित्रविचित्र खड्यांच्या शिरीच्या माळा चांदीचे अलंकार आवडतात.

एकंदरीत आधुनिकीकरणाचा परिणाम आदिवासी समाजजीवनावरही सध्या होत आहे. राहणीमान, भाषा, समाजजीवन, शिक्षण याच्यावर त्याचा परिणाम होताना दिसत आहे. शिक्षणामुळे नागरी समाजाशी सध्याच्या आदिवासी समाजाचा संपर्क येत असल्यामुळे एकंदरीत आदिवासींचे जीवनमान बदलतांना जाणवत आहे.

**घरे** – तुरकाठ्या, बांबू जंगलात असणारी करावी,सोनकाडी यापासून त्यांच्या घराच्या भिंती उभारल्या जातात. भिंती शेण-माती सारवून लिंपून घेतल्या जातात.

**गेर नाचवणे** – होळीच्या पाच दिवसात ही गेर नाचवली जाते यात पुरुष स्त्री वेश धारण करुन गोल गोल डफाच्या तालेवर नाचत असतात. नाचणाऱ्या लोकांना गेऱ्या संबोधले जाते. गेऱ्या कोणीही होऊ शकतो. एखादा नवस होळी आईला बोलला जातो तो सफल झाल्यास आम्ही गेऱ्या म्हणून नाचू असा संकल्प व्यक्तीने केल्यास तो सफल झाल्यावर होळीच्या दिवशी पाच सात दिवसापर्यंत ते गेऱ्या होत असतात व स्त्री वेश धारण करुन समुदायाने सर्व गेरे नाचत असतात. घरोघरी जाऊन होळीचा फाग मागतात घरोघरी अन्नधान्य गोळा करुन प्रसाद तयार करतात व ती सर्व एकत्र खातात. सर्व गेरमध्ये पुरुष असतात. स्त्री यांचा यात सहभाग नसतो.

**भोंगऱ्या बाजार** – भोंगऱ्या हा होळी सणाच्या अगोदर येणारा व आदिवासीमध्ये विशेष लोकप्रिय असलेला बाजार हा बाजार म्हणजे आदिवासींची जत्राच असते. खेड्यापाड्यातील आदिवासी बांधव ढोल पावा घेऊन बाजाराच्या गावी नाचायला येतात. आदिवासी तरुण-तरुणी मोठ्या संख्येने या बाजारात सहभागी होतात. या बाजाराचा विशेष म्हणजे आदिवासी तरुण-तरुणी आपल्या मनपसंत वधु वराची निवड या बाजारात करतात.

**सण उत्सव** – सातपुड्यातील आदिवासींचा सर्वात मोठा सण म्हणजे होळी आदिवासीसह देशभरातील म्हणजे स्वत:च अनेकांना भुरळ घालणाऱ्या काठी ता. अक्कलकुवा येथील राजवाडी होळी ही खास प्रसिद्ध आहे. आदिवासींचा होळी उत्सव १०-१२ दिवस चालतो. गावोगावी होळी गौरव का पेटवली जाते. होळीला 'होलीमय' म्हणायची प्रथा आहे. या काळात ढोलाचा आवाज सातपुड्याच्या कानाकोपऱ्यात निनादतो. ढोलाच्या तालावर रात्रभर

होळी उत्सव साजरा सुरु असतो. कामानिमित्त तेव्हा आपण बाहेरगावी गेलेले आदिवासी बांधव होळी निमित्ताने एकत्र घरी येतात.

**गुलाम बाबा –** गुलाम बाबा हे ही आदिवासींच्या पूजनीय व्यक्तीपैकी एक गुलाम बाबा आदिवासी संत पुरुष होय, जेव्हा इंग्रज सरकारांचे भारतावर राज्य होते त्यावेळी इंग्रज शिपाई आदिवासी महिलावर दिवसाढवळ्या अत्याचार करत तेव्हा गुलाम बाबांनी हा सर्व प्रकार पाहिला आपल्या आजूबाजूच्या परिसरातील सर्व आदिवासी बांधवांना त्यांनी एकत्र केले. त्यांनी ३ लाख लोकांना एकत्र केले. त्यांनी आदिवासी समाजाला 'आपकी जय' असे एक नाव दिले. आणि सांगितले की पती–पत्नि यांनी एक दुसऱ्यांची आरती करावी एकमेकांचे चरण स्पर्श करावे म्हणजे स्वताचा गौरव स्वतः करावा तेव्हा आपण दुसऱ्यावर विजय प्राप्त करू शकू त्यांनी लोकांना विवेकी बनवले. त्याकाळी इंग्रज सरकार हैराण झाले एकट्या अडाणी माणसाने मोठ्या जनसमुदायाला एकत्र आणले होते.

**राणी काजल माता –** अलिराजपुर जिल्ह्यातील सोंडवा ब्लॉकमध्ये राणी काजल मातेचे प्रसिद्ध मंदिर आहे हे मंदिर नर्मदा नदीच्या किनारी आहे. या मंदिराविषयी अशी मान्यता आहे की जो श्रद्धाळू येथे येऊन एखादी नवस करतो तो पुर्ण होतो.

**अस्तंबा –** हे आदिवासींचे अजून एक दैवत, अस्तंबा म्हणजेच अश्वत्थामा ऋषींचा डोंगर म्हणजे, सातपुड्याच्या कुशीत असलेले चार हजार फुट उंचीवर असलेले ठिकाण नंदुरबार जिल्ह्यातील अक्राणी (धडगाव) तालुक्यात असलेला श्री. अस्तंबा ऋषी डोंगर म्हणजे शूलपाणी झादिमधील एक उंच शिखर आहे. शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या सातपुड्यातील अस्तंबा यात्रोत्सावास धनत्रयोदशीच्या दिवशी सुरुवात होते. या यात्रेचा विशेष म्हणजे हजारो भाविक पदयात्रेने येथे हजेरी लावतात शापस्थ अवस्थेत जखमांनी विव्हळणारा अश्वत्थामा आपल्या जखमांसाठी सातपुडाच्या दऱ्याखोऱ्यात तेल मागतो. आजही शिखरावर जाणाऱ्या यात्रेकरूना तो भेटतो व वेळप्रसंगी रस्ताहीन झालेल्या यात्रेकरूंना मार्गदर्शन करतो अशी अस्तंबा ऋषींची दंतकथा आहे. यात्रेकरू कोठार, देवनदी, असली नकट्यादेव, जुना अस्तंबा, भीमकुंड या मार्गाने चालत जातात. रानटी श्वापदांना दूर ठेवण्यासाठी ढोल, आगीसाठी टायर, दिवट्या टेंभे, मशाली अशा दीर्घ काळ जळणाऱ्या वस्तू या यात्रेत घेतल्या जातात. रात्रीचा प्रवास करुन अस्तंबा ऋषींच्या शिखरावर जाऊन धनत्रयोदशीला पहाटेच्या सुमारास दर्शन घेऊन ध्वज लावतात.

**संदर्भ**

१) आदिवासी संकृती भाषा आणि साहित्य, लेखिका प्रा. डॉ. पुष्पा गावित
२) महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, लेखक डॉ. गोविंद गारे
३) पश्चिम खानदेशातील आदिवासी लोकसाहित्य, लेखिका प्रा. डॉ. पुष्पा गावित

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातील महिलांचे राजकीय स्थान : विशेष संदर्भ महाराष्ट्र

**डॉ. माधव केरबा वाघमारे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
कै .न्हानाभाऊ म.तु.पाटील कला महाविद्यालय मारवड ता.अमळनेर जि.जळगाव
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**सारांश –**

भारतीय समाजात प्राचीन काळी महिलांना मानाचे स्थान होते. त्यावेळी समाजात मातृसत्ताक पध्दती होती पण पुढे पुरूषप्रधान व्यवस्था निर्माण झाली आणि स्त्रीयांना गौण स्थान मिळाले. स्त्रीयांचे कार्यक्षेत्र चुल आणि मूल यापुरते मर्यादित करण्यात आले. तिच्यावर समाजाने धर्माने विविध बंधने लादली. याविरोधात स्वातंत्र्यपुर्व कालखंडात समाज सुधारकांनी या स्त्रीयांवरील अन्याय, अत्याचारास वाचा फोडून व जागृती निर्माण केली. स्वातंत्र्यानंतर स्त्रीयांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून पुरूषांच्या बरोबरीने अधिकार मिळाले. परंतु समाजात म्हणावे तसे अधिकार स्त्रीयांना मिळत नव्हते. हे अधिकार मिळवून देण्याकरीता महिला सबलीकरण या संकल्पनेचा जन्म झाला. सबलीकरण म्हणजे महिलांना सक्षम करणे तिच्या अधिकारात वाढ करून अधिकाराची जाणिव करून देणे. हे अधिकार धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय स्वरूपाचे आहेत. या करीता समाजात वेगवेगळ्या समाज सुधारकांनी विचारवंतांनी आणि चळवळींनी प्रयत्न करून महिलांची प्रगती करण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतीय समाजात महिलांना मानाचे स्थान देण्याची वेळ आली की, पुरूषाकडून नेहमीच दुय्यम स्थान देण्यात येते. यामुळे महिलांना खऱ्या अर्थाने कधीही सन्मान मिळाला नाही. राजकारण हे तर महिलांच्या दृष्टीने दुरच होते. या क्षेत्रातही पुरूषांची मक्तेदारी होती. आजही संसदीय राजकीय प्रक्रियेत ती दिसून येते. भारतात महिलांच्या उन्नतीसाठी अनेक समाजसुधारकांनी कार्य केले त्यांच्यात जागृती घडवून आणली. स्वातंत्र्यानंतर संविधानाद्वारे समान हक्क आणि अधिकार आरक्षण मिळाले म्हणून राजकारणात महिलांचा सहभाग वाढला. महिलांनी याद्वारे स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. विशेषतः महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात महिलांचा सहभाग हा उल्लेखनिय आहे. आज देशाच्या केंद्रीय मंत्रीमंडळात ११ महिला मंत्री प्रभावीपणे काम करतांना दिसतात. या बरोबरच स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच देशाच्या संसदीय राजकारणात महिलांनी शंभरी पार केलेली आहे. महाराष्ट्रातही आज पुरूषांच्या बरोबरीने राजकीय क्षेत्रात महिलांचे स्थान महत्वाचे आहे, याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**सूचक शब्द** – महिला सबलीकरण, सुधारकांचे योगदान, संविधानीक तरतुदी, राजकीय सहभाग आणि महिलांचे स्थान

**उद्देश –**

१) भारतीय राजकारणातील महिलांचे स्थान अभ्यासणे.
२) भारतीय राजकारणातील महिलांच्या कार्याचा आढावा घेणे.
३) महाराष्ट्राच्या राजकारणातील महिलांच्या कामगिरीचा आढावा घेणे.
४) वर्तमान देशाच्या राजकीय प्रक्रियेत महिलांच्या स्थितीचे अध्ययन करणे.

**प्रस्ताविक –**

भारतीय समाजातील महिलांना मनुस्मृती, धर्मग्रंथ, पुरूषप्रधान समाज व्यवस्थेने वेगवेगळ्या बंधानात अडकून ठेवले होते. समाजात स्त्रीयांचे शोषण करणाऱ्या सतीप्रथा, बालविवाह, पडदापद्धत यासारख्या पद्धती होत्या. मनुस्मृती सारख्या शोषकांना पोषक ठरणाऱ्या ग्रंथामुळे स्त्रीयावरील अत्याचार वाढत होते. महिला ही मानव समाजाचा महत्वाचा घटक असूनही तिला पुरूषांच्या बरोबरीने हक्क मिळत नव्हते याचे कारण म्हणजे पुरूषप्रधान संस्कृती, धार्मिक कल्पना, रूढी, परंपरा या कारणामुळे स्त्रीयांकडे बघण्याचा दृष्टीकोन संकूचित बनला म्हणून हजारों वर्षापासून गुलामीचे जीवन वाट्याला आले. भारतातील स्त्रीयांची गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी अनेक सुधारकांनी प्रयत्न केले. त्यात स्त्री सुधारणेचे आद्य प्रवर्तक मानले जाणारे राजाराम मोहन रॉय यांनी सतीच्या चालीविरूद्ध आवाज उठवला. यामुळे १८२९ ला सती प्रथा कायद्यानुसार बंद झाली व स्त्रीयांची या प्रथेतून मुक्तता झाली. असेच स्त्री उद्धाराचे कार्य महाराष्ट्रात ज्योतीराव फुल्यांनी केले. त्यांनी आपल्या सामाजिक कार्याची सुरूवात १८४८ मध्ये मुलींची पहिली शाळा पुणे शहरात स्थापन केली व महिला शिक्षणाची सुरूवात केली. पुढे हेच कार्य डॉ. आंबेडकरांनी स्त्रीयांच्या वेगवेगळ्या प्रश्नावर आंदोलने करून अन्यायाचा प्रतिकार व न्यायासाठी संघर्ष करण्यास शिकवून त्यांचा स्वाभीमान जागृत केला. डॉ. आंबेडकर भारतीय समाजातील तमाम स्त्री वर्गांच्या उन्नतीचे आणि मुक्तीचे समर्थक होते. स्त्रीयांचा दर्जा उंचवावा यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा केली व स्त्रीयांना प्रतिष्ठा, अधिकार प्राप्त व्हावेत यासाठी हिंदु कोड बिल तयार केले, पण ते संसदेत नामंजूर झाल्याने केंद्रीय मंत्रीपदाचा राजीनामा दिला, दलित उद्धाराबरोबर स्त्रीयांच्या प्रबोधनालाही महत्व दिले व राज्यघटनेच्या माध्यमातून सर्वांना समान हक्क व अधिकार बहाल केले म्हणून स्त्रीयांच्या राजकीय सहभागाला चालना मिळाली. या संधीचे सोने करत महिलांनी देशाच्या राजकारणात आपल्या कार्याच्या आधारावर वेगळे स्थान निर्माण केले. प्रस्तूत शोधनिंबधाद्वारे त्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन पध्दती –** सदरील संशोधन पेपरसाठी दुय्यम साधनांचा आधार घेतला आहे. यासाठी भारतीय राज्यघटना, लोकशाही, महिला सबलीकरण, महिलांचा राजकीय सहभाग, निवडणूक विश्लेषण यावर आधारीत लेख, पुस्तके , ग्रंथ, मासिके, पाक्षिक, साप्ताहिक, इंटरनेट यावर आधारीत मांडणी

केली आहे.

**भारतीय समाजातील महिलांचे स्थान आणि समाजसुधारकांनी केलेले कार्य –** भारतीय समाजातील स्त्रियांना मनुस्मृती, विविध धर्मग्रंथ आणि पुरूषप्रधान सामाजिक व्यवस्थेने जखडून ठेवले होते. सतीप्रथा बालविवाह शिक्षणबंदी, पडदा पद्धत अशा अनेक परंपरेद्वारे स्त्रीयांना बंदिस्त केले गेले. यातून मुक्त करण्यासाठी राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथा बंद करून ही व्यवस्था नाकारली. महाराष्ट्रात म. फुले, न्यायमुर्ती रानडे, आगरकर, गोखले, महर्षी कर्वे यासारख्या समाजसुधारकांनी स्त्री पुरूष समतेचे विचार मांडून स्त्रीयांवरील अन्याय अत्याचार अमानुष प्रथेविरूध्द सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. म. फुले यांनी १८४८ ला पुणे शहरात मुलींसाठी शाळा काढून आपले विचार कृतीत आणले. त्यांनी सावित्रीबाई फुले यांना शिकवून महिलांना शिक्षण देण्याचा प्रारंभ केला पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या वेगवेगळ्या प्रश्नावर वेळोवेळी आंदोलने केली. महाड सत्याग्रह, मनुस्मृती दहन, काळाराम मंदिर सत्याग्रह यात महिलांना सहभागी केले. डॉ. आंबेडकरांनी स्त्रीयांसाठी केलेली सर्वात मोठी गोष्ट म्हणजे त्यांना अन्यायाचा प्रतिकार व संघर्ष करण्यास शिकविले. त्यांचा स्वाभिमान जागृत केला आणि संविधानाद्वारे हक्क मिळवून दिले. याचा परिणाम म्हणून हजारो वर्षाच्या गुलामीतून स्त्रियांची मुक्तता झाली आणि जीवनाच्या सर्वच क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढला याला राजकारणही अपवाद नाही.

**भारतीय संविधानातील महिलांचे स्थान –** स्वातंत्र्यानंतर २६ जानेवारी १९५० ला भारतीय संविधान लागू झाले. या संविधानांत भारतातील महिलांना डॉ. आंबेडकरांनी मताचा समान अधिकार देऊन राजकीय हक्क मिळवून देण्याचे कार्य केले. स्त्री-पुरूष समानता हा भारतीय संविधानाचा आधार आहे. धर्म, वंश, लिंग, भाषेच्या आधारावर भेदभाव केला जाणार नाही असे स्पष्ट आश्वासन दिले आहे व मार्गदर्शक तत्वामध्ये स्त्री पुरूषांना समान वेतनाची तरतूद केली आहे. यामुळे याचा परिणाम हजारो वर्षाच्या गुलामीतून स्त्रीयांची मुक्तता झाली आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढला याच कारणाने देशाच्या व महाराष्ट्राच्या राजकारणात महिलांचा राजकीय सहभाग वाढला.

**राष्ट्रीय राजकारणातील महिला –** स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच महिलांनी आपल्या कार्याचा ठसा राजकीय क्षेत्रात उमटविल्याचे दिसते. परंतु हा सहभाग उच्च वर्गातील स्त्रीयांचा आणि अपवादात्मक दिसून येतो. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा म्हणून सरोजिनी नायडू यांची निवड करण्यात आली व पुढे स्वातंत्र्यानंतर त्यांनी राज्यपाल म्हणूनही कार्य केले. १९५२ च्या पहिल्या लोकसभा निवडणूकीत २२ महिला निवडल्या होत्या. तसेच ही परंपरा पुढे चालू राहिली आणि १९६३ मध्ये उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री म्हणून सुचिता कृपलानी यांनी योगदान दिले. महिलांच्या राजकीय सहभागाला चालना मिळाली ती स्वातंत्र्यानंतर पहिल्या भारतीय महिला पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधीनी १९६६ ला देशाचा कारभार हाती घेऊन काँग्रेस पक्ष आणि देशाच्या राजकारणावर ठसा उमटविला. १९९८ ला सोनिया गांधी काँग्रेसच्या अध्यक्षा झाल्या आणि १० वर्ष युपीएच्या अध्यक्षा म्हणून कार्य केले. भारताच्या १३ व्या राष्ट्रपती पदासाठी जुलै २००७ मध्ये मतदान झाले आणि प्रतिभाताई पाटील या पहिल्या महिला राष्ट्रपती बनल्या. त्यानंतरच्या काळात मीराकुमारी आणि सुमित्रा महाजन यांनी लोकसभेच्या सभापती म्हणून उल्लेखनीय कामगिरी केली. वरील महिलांबरोबरच उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री कु. मायावती, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे, दिवंगत तामिळनाडूच्या माजी मुख्यमंत्री कु. जयललिता, मध्यप्रदेशच्या माजी मुख्यमंत्री उमा भारती आणि सध्याच्या मंत्रीमंडळातील देशाच्या अर्थमंत्री निर्मला सितारमन, स्मृती इराणी, भारती पवार, साध्वी निरंजन ज्योती, अनुप्रिया पटेल या सह ११ महिला मंत्री आपले योगदान देत आहेत. याबरोबरच लोकसभेत ८१ महिला खासदार आणि राज्यसभेत २५ महिला खासदार आपल्या विभागाचे प्रतिनिधीत्व करताना दिसतात. हे प्रमाण कमी जरी असले तरी महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्वाचा टप्पा आहे.

**महाराष्ट्राच्या राजकारणातील महिलांचा सहभाग –** प्राचीन काळापासून राजकीय प्रक्रियेत महिलांना सहभागी होण्याची म्हणावी तशी संधी मिळाली नव्हती. परंतु महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाबाई यांनी यशस्वी धुरा सांभाळली. त्यापुढील काळात अहिल्याबाई होळकर यांनी महाराष्ट्राबरोबरच महाराष्ट्राच्या बाहेरही राज्य सांभाळले. व ब्रिटीश कालखंडात राणी लक्ष्मीबाई यांनीही आपल्या कार्याचा ठसा उमटविला. देशपातळीवरील राजकीय सहभागाबरोबरच महाराष्ट्राच्या राजकारणाबरोबरच अनेक महिलांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे.

०१ मे १९६० ला महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि त्यानंतर झालेल्या १९६२ मध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या पहिल्या विधानसभा निवडणुकीत ३६ महिला उमेदवारांनी निवडणूक लढविली होती. त्यापैकी १३ महिला उमेदवार विजयी झाल्या होत्या. या निवडणुकीत माजी राष्ट्रपती महामहिम श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधीमंडळात प्रवेश केला आणि महिला प्रतिनिधी म्हणून कार्य केले राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढावा यासाठी १९९२ मध्ये ७२ व ७३ व्या घटना दुरूस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये १/३ आरक्षणाची तरतूद करण्यात आली परिणामी गावात सरपंच पदापासून राज्य पातळीवरील मंत्रीपदावर महिला दिसू लागल्या. पुढे महाराष्ट्र सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षणाची तरतूद करून क्रांतीकारक पाऊल उचलले. या निर्णयाने अधिकाधिक महिलांना सार्वजनिक जीवनात कर्तृत्व दाखवण्याची संधी मिळाली आणि यामुळे ग्रामिण भागातील राजकारणाचा चेहरा मोहरा बदलण्यास सुरूवात झाली. महिला जोमाने राजकारणात उतरल्या आणि निवडणूका लढवू लागल्या. पंचायत राज व्यवस्थेतील ५० टक्के आरक्षणामुळेच ही किमया साधली गेली असे म्हटले तर वावगे ठरू नये. या सर्व प्रक्रियेमुळे गावपातळीवरच्या सरपंच पदापासून आमदार, खासदार ही पदे महिलांनी काबीज केली आणि महाराष्ट्राच्या राजकारणावर ठसा उमटविला.

महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक महिलांनी महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे. त्यात माजी राष्ट्रपती महामहिम प्रतिभाताई पाटील, मृणाल गोरे, अहिल्या राजंणेकर, तारा रेड्डी, माजी केंद्रीय मंत्री सुर्यकांता पाटील, माजी खा. केशरकाकू क्षीरसागर, माजी शिक्षणमंत्री शरदचंद्रिका पाटील, माजी आ. शालीनीताई पाटील, स्व.विमलताई मुंदडा यांचे योगदान व कार्य महत्त्वाचे आहे.

**वर्तमान महाराष्ट्राच्या राजकारणातील महिला –** वर्तमान महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक महिला प्रभावीपणे काम करत आहेत. २००९ च्या विधानसभेत ११ महिला आमदार होत्या तर २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत विविध पक्षाच्या २० महिला आमदार निवडून आल्या होत्या आणि सध्या २०१९ च्या २४ महिला आमदार निवडून आल्या आहे. तर विधानपरिषदेत श्रीमती निलम गोरे उपसभापती आणि श्रीमती मनिषा कायंदे, डॉ. प्रज्ञा सातव या महिलांचे प्रतिनिधीत्व करत आहे. महाराष्ट्रातील राजकीय क्षेत्रातील महिलांचा राजकीय सहभागाचा विचार केल्यास तो कमी जरी असला तरी दिवसेंदिवस वाढत आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या मनिषा चौधरी, विद्या ठाकूर, डॉ. भारती लव्हेकर, यशोमती ठाकूर, प्रा. वर्षा गायकवाड,

प्रणिती शिंदे, मंदा म्हात्रे, सीमा हिरे, देवयानी फरांदे, मोनिका राजळे आणि इतर एकूण २४ महिला आमदार धडाडीने काम करत आहेत. तर महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात यशोमती ठाकुर, प्रा. वर्षा गायकवाड, अदिती तटकरे योगदान देत आहेत. या बरोबरच महाराष्ट्रातील महिला देशाच्या राजकारणातसुध्दा महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करत आहेत. यामध्ये केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री असणाऱ्या सौ. भारती पवार, खा. सुप्रिया सुळे, खा. पुनम महाजन, खा. प्रीतम मुंडे, खा. भावना गवळी, खा. नवनीत राणा, खा. डॉ. हिना गावित, खा. रक्षा खडसे या लोकसभेत तर फौजीया खान राज्यसभेत प्रभावीपणे कार्य करत आहेत. या संसदीय आणि विधीमंडळातील महिला बरोबर स्थानिक स्वराज्य संस्थेत २ लाखाच्या वर महिला प्रतिनिधी आज कार्यरत आहेत.

**निष्कर्ष –**

१. देशाच्या व राज्याच्या राजकारणात महिलांचा सहभाग वाढला आहे.
२. महिला प्रतिनिधीत्वामुळे महिला सक्षमीकरणास वेग मिळाला आहे.
३. राजकारणात महिलांनी कर्तृत्व सिद्ध केले आहे.
४. महिलांचे प्रतिनिधीत्व वाढल्यास त्यांच्यावरील अन्याय दूर होईल.
५. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच लोकसभा आणि राज्यसभेत महिला प्रतिनिधीनी शंभरी पार केली आहे.
६. संसदेत आणि विधीमंडळात ३३ टक्के आरक्षण मिळणे गरजेचे आहे.

**समारोप –**

महिला आज सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहेत आज महिला अबला राहिलेली नाही ती स्वंयपूर्ण बनली आहे. भारतीय राज्यघटनेतील आरक्षणाच्या आणि शासनाच्या विविध निर्णयामुळे महिला आज सरपंच, जिल्हा परिषद अध्यक्ष, सभापती, महापौर, नगराध्यक्ष या पदापर्यत पोहचल्या व हे पद चांगल्या पद्धतीने सांभाळू शकते हे सप्रमाण दाखवून दिले. या आधारावरच त्यांनी आमदार, खासदार व वेगवेगळ्या राजकीय पक्षात महत्त्वाचे स्थान मिळवले. तिथेही महिलांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आणि ग्रामपंचायतीच्या सरपंच पदापासून ते सर्वोच्च राष्ट्रपती पदापर्यंत मजल मारली. पण आजही देशात महिला मतदारांची संख्या निम्मे आहे. परंतु पुरूषांच्या बरोबरीने महिलांना अजूनही म्हणावी तशी संधी मिळत नाही. या करीता ३३ टक्के आरक्षण संसदेत मंजूर करून स्त्रीयांचा राजकारणात सहभाग वाढवणे गरजेचे आहे.

**संदर्भ**

१. भोळे भास्कर – (२००४) विसावे शतक आणि भारतातील समता विचार, सुगावा प्रकाशन, पुणे.
२. कडू डॉ. मोहिनी – (२००८ )भारतीय राजकारणातील स्त्रीया, विजय प्रकाशन, नागपूर
३. कुलकर्णी अंजली – (२०१०) स्त्री स्वत्वाचा शोध, आकांक्षा प्रकाशन, नागपूर
४. पवार दिपक – (२०१३) महिलांचे राजकीय सक्षमीकरण, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
५. देशपांडे नमिता – (२०१३) घुंगटाकडून राजसत्तेकडे, चतुरंग (लोकसत्ता), २१ डिसेंबर २०१३
६. कौल जनतेचा – नोव्हेंबर (२०१४) – लोकराज्य मासिक
७. पांडे अतुल – एप्रिल (२०१५) – विस्तारलेले आभाळ – लोकराज्य मासिक
८. तांबडे सुमित (२००९) – राजकारणातील रणरागिणी, दै.महाराष्ट्र टाईम्स

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# कोविड १९ चा महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम

**सहा. प्रा. कु. मनिषा राजेंद्र पारधी ( अर्थशास्त्र विभाग )**
JDMVP Co. Samaj's
Shri S. S Patil rts, Shri bhausaheb T. T Salunkhe commerce and Shri. G. R. Pandit Science College, Jalgaon 425001 (Maharashtra)

**पार्श्वभूमी –**

चीनच्या अधिकाराने २६ डिसेंबर २०१९ रोजी वुहान शहरात संक्रमण कोरोना व्हायरस असल्याची पुष्टी दिली. ३० जानेवारी २०२० रोजी जागतिक आरोग्य संघटनेने या विषाणूंचा उद्रेक हा सार्वजनिक आरोग्य विषयक आंतरराष्ट्रीय आणीबाणी असल्याचे जाहीर करण्यात आले. २९ जानेवारी २०२० रोजी भारतातील पहिला रुग्ण हा केरळमध्ये आढळला. महाराष्ट्रातील कोरोना व्हायरसची लागण झालेला पहिला रुग्ण पुण्यामध्ये ९ मार्च २०२० रोजी आढळून आला आणि पाहता पाहता संपूर्ण महाराष्ट्रभर धोरणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. Covid-19 ही एक महामारीचीची साथ आहे. याचा परिणाम अर्थव्यवस्था, शहरी समाज,गरीब, महिला कामगार, ग्रामीण भाग या वर परिणाम दिसून येतो. महाराष्ट्रातील २०२० मधील कोरोना विषाणूचा उद्रेक ९ मार्च २०२० रोजी सुरू झाला. या दिवशी भारताच्या महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणूचा प्रादुर्भावामुळे होणाऱ्या साथीच्या हजाराची पहिली नोंद झाली. १७ मार्च २०२० रोजी महाराष्ट्रात पहिल्या कोरोना बाधित व्यक्तीच्या मृत्यूची नोंद झाली आणि महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक कोरोनाचा प्रभाव असलेले राज्य ठरले. आणि राज्यात ३ मे २०२० पर्यंत १२९७४ जनांना याची लागण झाली त्यापैकी ५४८ जणांचा मृत्यू झाला आहे आणि २११५ जण पूर्ण बरे झाले आहेत. एकूण संसर्ग झालेल्या रोग्यांपैकी ४% लोकांचा मृत्यू झालेला आहे. महाराष्ट्रातील पहिला बळी १६ मार्च २०२० रोजी मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात उपचारादरम्यान झाला. जसा कोरोनाचा प्रसार झाला, तसा महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही परिणाम दिसून आला आणि महाराष्ट्रातील आर्थिक परिस्थिती ढसाळायला लागली. महाराष्ट्राची राजधानी असणारे मुंबई शहर व मुंबई शहरातील शेअर मार्केट घसरले, त्याच प्रमाणे शेती व्यवसाय असेल तर अजूनच नुकसान झालेले दिसून येते. त्याचप्रमाणे ग्रामीण अर्थव्यवस्थाही डबघाईला आलेली दिसून येते. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था ज्याप्रमाणे वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील व शहरातील कारखाने बंद पडले, बांधकाम व्यवसाय बंद झाला,लोकांचा रोजगार गेला, शहरी भागातील ग्रामीण भागाकडे स्थलांतर सुरू झाले आणि परिणामी शहरातील कोरोनाची लागण झालेले रुग्ण ग्रामीण भागात येऊन तेथील ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम झाले. शहरातील मोठे उद्योग बंद पडल्यामुळे कामगार वर्ग हा रोजगारासाठी ग्रामीण भागाकडे स्थलांतर करू लागले. परिणामी ग्रामीण खेडी गजबजली. या प्रकारे कोरोनाव्हायरस या संसर्गजन्य आजाराने आर्थिक परिस्थितीवर अनिष्ट परिणाम दिसून येतो.

**उद्दिष्टे –**

- महाराष्ट्रातील कोविड १९ चा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे
- महाराष्ट्रातील तोरणा व्हायरसचा ग्रामीण भागावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
- Covid-19 चा महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थे संबंधी विश्लेषण करणे.

**गृहीतके –**

१. कोरोना महामारीचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो.
२. कोरोनाव्हायरस मुळे महाराष्ट्राचा विकास दर कमी झाला आहे.
३. साथीच्या आजारांमुळे स्थलांतर घडते.
४. ग्रामीण जनतेला आर्थिक झळ सहन करावी लागते.
५. कोरोनामुळे आर्थिक व्यवसाय बंद पडतात.
६. शहरी भागातून ग्रामीण भागाकडे स्थलांतर होते .

**बिजसंज्ञा –** कोविड १९, कोरोनाव्हायरस, साथीचा आजार, संसर्गजन्य रोग, ग्रामीण अर्थव्यवस्था ,सार्स –कोव्ह –२, परिणाम, उपाययोजना

**माहितीस्रोत –** सदरील संशोधन पेपर हा द्वितीय स्वरूपाच्या माहितीचा वापर करून अनेक श्रोत्यांच्या आधार घेऊन तयार केला आहे. महाराष्ट्रात उद्भवणारी कोविड १९ च्या काळातील ग्रामीण अर्थव्यवस्थेवर आणि आर्थिक परिस्थितीवर कोरोना व्हायरसचा परिणामांचा अभ्यास करण्यासाठी वेगवेगळ्या संदर्भ ग्रंथांचा, विविध वर्तमानपत्रे, महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल, नियतकालिके, विकिपीडिया, मासिके इत्यादी संदर्भ ग्रंथांच्या आधारे हा संशोधन पेपर तयार केला आहे.

**अभ्यास पद्धती –** महाराष्ट्रातील covid-19 चा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम अभ्यास करण्यासाठी उपलब्ध माहितीच्या आधारे राज्यातील शेतीवर व शेती आधारित व्यवसाय, बँकींग सेवा, सेवा क्षेत्र, कृषी क्षेत्र , रोजगार, सामान्य नागरिक, उद्योग, ग्रामीण व्यवसाय इत्यादी घटकांवर झालेल्या परिणामांचे अर्थ विवेचन करून महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे

**अभ्यास क्षेत्र –** महाराष्ट्राचा विचार करता आपला महाराष्ट्र हा देशाचा पश्चिम–मध्य भागात असलेल्या एक त्रिकोणी आकाराचा भाग आहे. महाराष्ट्राच्या अरबी समुद्राच्या ७२० किलोमीटर लांबीचा विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला असून सह्याद्री व सातपुडा या पर्वतरांगांचे नैसर्गिक तटबंदी लाभली आहे. राज्याच्या वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्य प्रदेश, पूर्वेस छत्तीसगड आणि अग्नेस तेलंगणा व दक्षिणेस कर्नाटक, नैऋत्येस गोवा राज्य आहे. प्रशासकीय

सोयीसाठी राज्याची विभागणी ३६ जिल्हे व सहा महसूल विभागात करण्यात आलेली आहे. जनगणना २०११ नुसार ११.२ २४ कोटी लोकसंख्या असलेले महाराष्ट्र हे लोकसंख्येनुसार देशात दुसऱ्या क्रमांकाचे तर क्षेत्र फळानुसार तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्राचे क्षेत्र फळ ३.०८ लाख चौरस किलोमीटर असून भौगोलिकदृष्ट्या राजस्थान, मध्य प्रदेश नंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. मोठ्या प्रमाणात शहरीकरण झालेल्या देशातील राज्यांपैकी महाराष्ट्र एक राज्य आहे. त्याच प्रमाणे महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही फक्त अग्रेसर कार्पोरेट संस्थांच्या व कंपन्यांच्या मुख्य कार्यालयाचे माहेरघर नसून तर आशिया खंडातील सर्वात जुना शेअर बाजार व मुंबई शेअर बाजार हा देखील याच शहरात दिमाखात उभा आहे. उद्यान मूख क्षेत्रामध्ये विकास होण्याच्या दृष्टीने कृषी व अन्नप्रक्रिया घटक, वस्त्रोद्योग, यंत्रसामग्रीचे उत्पादन, माहिती तंत्रज्ञान, सहाय्यभूत सेवा, उद्योग इत्यादींना प्राधान्य क्षेत्रे म्हणून निश्चित करण्यात आलेली आहेत. महाराष्ट्र ही फक्त एक भौगोलिक संज्ञा नसून लोकांच्या एकत्रित प्रयत्नांनी उभे राहिलेले एक राज्य आहे राज्यात विविध चालीरीतीने व परंपरेने लोक गुण्यागोविंदाने राहतात. काळाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रगतीशील राहून आपले पुरोगामित्व सिद्ध करणाऱ्या महाराष्ट्र राज्याने शाश्वत विकासाच्या दिशेने आपली वाटचाल सुरू ठेवली आहे.

**विषय विवेचन** – नोवेल कोरोना हा एक विषाणू व्हायरस आहे. त्याच्या विषाणूचा प्रकार सार्स कोव्ह २ असून जागतिक आरोग्य संघटनेने या विषाणू मुळे होणाऱ्या आजाराला covid-19 हे नाव दिले आहे. या साथीच्या आजाराचा प्रथम उद्रेक सर्वात पहिल्यांदा चीन देशाच्या वुहान येथे आढळला. याला नोवेल म्हणण्यात येते. २०२० मधील महाराष्ट्रातील कोरोना विषाणू उद्रेक ९ मार्च २०२० रोजी सुरु झाला या दिवशी भारताच्या महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणूचा प्रादुर्भावामुळे होणाऱ्या साथीच्या आजाराचे पहिला झाली. १७ मार्च २०२० रोजी महाराष्ट्रात पहिल्या कोरूना बाधित व्यक्तीच्या मृत्यूची नोंद झाली ही बातमी वर्तमान पत्राच्या आधारे मिळाली. महाराष्ट्र हे देशातील कोरोनाचा सर्वाधिक प्रभाव झालेले राज्य ठरले आणि राज्यातील मे २०२० पर्यंत १२९७४ जणांना याची लागण झालेली असून त्यापैकी ५४८ जणांचा मृत्यू झालेला आहे आणि दोन हजार एकशे पंधरा जण पूर्ण बरे झालेले आहेत एकूण संसर्ग झालेल्या रोग्यांनी पैकी ४% लोकांचा मृत्यू झालेला दिसून येतो.

राज्यातील दोन–तृतीयांश पेक्षा जास्त रुग्ण मुंबई महानगर भागातून आढळून आलेले आहेत मुंबई, पुणे, ठाणे या जिल्ह्यांचा पट्टा हा देशातील कोरोना व्हायरस प्रादुर्भावाची साठीच्या दहा हॉटस्पॉट पैकी एक बनला आहे. १४ एप्रिल पर्यंतच्या आकडेवारीनुसार भारतातील एकूण रुग्णांपैकी एकट्या महाराष्ट्रात २३% रुग्ण असून एकूण मृत्यू पैकी ४६% मृत्यू राज्यात झालेले आहेत. १३ मार्च रोजी महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणूचा उद्रेक पाहता महाराष्ट्रात महामारी रोग अधिनियम १८९७ लागू करण्यात आला व राज्यात जमावबंदीचे कलम १४४ लागू करण्यात आला. राज्यात जमावबंदीचे कलम लागू करण्यात आले. मूलभूत अधिकारात सोबतच नागरिकांनी आपल्या मूलभूत कर्तव्य याबाबतही जागरूक असायला हवे असे मत मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वरळे यांनी व्यक्त केले.

**कृषी क्षेत्र** – दोन हजार वीस एकवीस या आर्थिक वर्षासाठी राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय यांनी सादर केलेल्या ताज्या आकडेवारी नुसार स्पष्ट होते की भारतीय अर्थव्यवस्था ही कोलमडलेली दिसून येते यामागील महत्त्वाचे कारण म्हणजे ग्रामीण भागातील मागणी आणि पुरवठा कमी होणे, शेती ही देशातील दोन तृतीयांश लोकसंख्या यांचे भरण–पोषण करते. २०२०–२१ मध्ये २०.४ २० लाख कोटी च्या सकल मुलांसह कृषी क्षेत्रात सकारात्मक वाढ झाली आहे परंतु २०१९–२० ते २०२०–२१ दरम्यान भारताचा जीडीपीमध्ये १०.५६ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. नकारात्मक वाढ – ७.३% आहे., मागणी–पुरवठाच्या असंतुलनामुळे अर्थव्यवस्था कोलमडून सामुहिक घट झाली आहे. राज्याचे सरासरी विहती क्षेत्र कृषी गणना २०१५–१६ नुसार १.३४ हेक्टर आहेतर कृषी गणना २०१०–११ नुसार ते १.४४ हेक्टर होते. अद्यापही विहती खातेदारांचे (२.० हेक्टर पर्यंत) एकूण क्षेत्र ९२.२० लाख हेक्टर असून एकूण विहती क्षेत्राच्या ४५.० टक्के होते, तर अहप व अत्यबप विहती खातेदारांची संख्या १२१.५५ लाख असून, ती एकूण विहती खातेदारांच्या ७९.५ %होती. सन २०२०–२१ च्या खरीप हंगामामध्ये १५६.८९ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली. गतवर्षीच्या तुलनेत तृणधान्ये, कडधान्ये, तेलिबया, कापूस व ऊस यांच्या उत्पादन अनुक्रमे ६० टक्के, १४ % व ४० %वाढ अपेक्षित आहे. सन २०२०–२१ च्या रब्बी हंगामामध्ये डिसेंबर अखेर ५३.६४ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूणर् करण्यात आली. गतवर्षीच्या तुलनेत तृणधान्येव कडधान्येयांच्या उत्पादनात अनुक्रमे एक टक्का व १२ %वाढ अपेक्षित असून तेलिबयांच्या उत्पादनात १८ % घट अपेक्षित आहे. सन २०१९–२० मध्ये फलोत्पादन पिकांखाली क्षेत्र १९.२० लाख हेक्टर असून २७८.७५ लाख मे. टन उत्पादन अपेक्षित आहे.त्याचप्रमाणे खांदेशातील जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यात धोरणामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था असलेली शेतीची नाळ संकटात असून शेतात उत्पादन आहे त्या प्रमाणात होत नाही. परंतु व्यापारी व खरेदीदार नाहीत शेतीतील उत्पादनाचे भाव कवडीमोल झाले आहेत शेतकरी मजुरां समूह आर्थिक टंचाईचे आव्हान उभे राहिले आणि तालुक्यात रब्बीच्या मोठ्या प्रमाणावर पेरा होतो., त्यामध्ये मका गहू हरभरा ज्वारी बाजरी भाजीपाला आदी पिकांचे मोठ्या प्रमाणावर लागवड केली जात असून रब्बीच्या उत्पादनात घेतला जातो, ग्रामीण भागाचा आर्थिक कणा शेती मानली जाते शेतीच्या उलाढालीवर शेतकरी मजुरांचे आर्थिक नियोजन असतील २१ मार्च पासून लॉक डाऊनमुळे सर्व काही थांबलेले होते त्यात शेतकऱ्यांचे संकट वाढले. लॉक डाऊन मुळे शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले असून व्यापारी नसल्याने शेती मालाचे भाव हे कवडीमोल झाले घरात मा ल पडून असल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडलेले आहेत.

**अ) दुग्ध व्यवसायावर परिणाम** – शेतीला दुग्ध व्यवसायाची जोड मिळाल्यामुळे शेतकरी तर अलेला आहे निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती उत्पादनात घट झाली तरी त्याची कसर ही जोडी व्यवसायातून भरून काढता आली आहे. काळाच्या ओघात शेतीला बाजूला सारून उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांनी दूध व्यवसायाला आज मुख्य व्यवसाय केले आहे मात्र आतापर्यंत दुष्काळामुळे जी परिस्थिती या व्यवसायावर वडवली नव्हती ती वेळे नुसार कोरोनामुळे आली आहे, कारण शिरपूर तालुक्यातील तहाडी, वरुड, भटाने, जवखेडा, तरहाड, कसबे येथील शेतकऱ्यांचा प्रमुख व्यवसाय हा शेती मात्र त्याला जोड होती दुग्ध व्यवसायाची वाढत्या उत्पादनामुळे या भागातील शेतकरी धवलक्रांती कडे पाहत होती. परंतु दुष्काळ आणि कोरणा चे ग्रहण लागल्याने तरहाडी परिसरातील शेतकऱ्यांची धवलक्रांती संपूर्णतः धोक्यात आलेली दिसते ग्रामीण भागातील दुपत्या जनावरांना भावी दुधाची आवक घटली आहे तर सध्याच्या स्थितीत या व्यवसायाचा केवळ आधार ग्रामस्थांना मिळत आहे. हे सर्वकाही कोरोना ने हिरावले आहे.

**१. ग्रामीण मजुरांवर होणारा परिणाम** – ग्रामीण भागात मजूर वर्गावर पुराणाचे अल्पकालीन आणि दीर्घकालीन असे दोन परिणाम होत आहेत

दुष्काळी आणि कोरडवाहु परिसरातील गावांकडे एक नजर टाकली तर हंगामी आणि शहरी भागातील स्थलांतरित मजुरांच्या कुटुंबांची आर्थिक परिस्थिती मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसते. या वर्षाचा ऑक्टोबर २०२० ते मार्च २०२१ ऊस तोडणीचा हंगाम संपल्यानंतर ऊसतोड मजूर आपापल्या गावी परत आले मात्र लॉक डाऊनलोड शेती क्षेत्र अडचणीत होते परिणामी ऊसतोड मजुरांना गावी आल्यानंतर मिळणारी शेतीतील आणि शेती संबंधित कामे मिळेनाशी झाली.

**२. बांधकाम क्षेत्रावर परिणाम –** मजुरांना मोठ्या प्रमाणात रोजगार पुरवण्यात कृषी क्षेत्र नंतर दुसरा क्रमांक या बांधकाम क्षेत्राचा आहे. याचाच अर्थ या क्षेत्रातील मंदी ही बेरोजगारी कडून येणारी ठरते. सिमेंट वर २८ %जीएसटी आहे. त्याचा परिणाम पायाभूत सुविधा, व सिमेंट कॉंक्रीटच्या रस्ते बांधकामावर झाला. निवारा ही सर्वांसाठी प्राथमिक गरज असून पंतप्रधानांनी २०२४ पर्यंत सर्वांसाठी घर पुरवण्याचा संकल्प केला या क्षेत्रात आलेल्या मंदीचा सिमेंट पोलाद विटा टाइल्स ग्रॅनाइट इलेक्ट्रिक वायरस आणि यासारख्या संबंधित इनपुट उद्योगावरही परिणाम जाणवतो.

**३. बेरोजगारीत वाढ –** पूर्ण भारतभराचा विचार करता, सर्व वयोगटातील बेरोजगारीचे प्रमाण, नेहमीच्या स्थितीनुसार, २०१७-१८ च्या तुलनेत २०१८-१९ मध्ये किंचित घटून ६.१ टक्क्यावरून ५.८ टक्क्यावर आले. कोरोनाचा वाढत्या संसर्गामुळे देशासमोर पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर बेरोजगारीचे संकट उभे राहिले आहे. कोरोना चा संसर्ग ग्रामीण भागात वाढताना दिसत आहे परिणामी खेड्यांमधील अर्थव्यवस्था ठप्प पडली आहे. आर्थिक उलाढाल जवळपास बंद आहे त्यामुळे बेरोजगारी वाढल्याचे दिसत आहे नुकत्याच हाती आलेल्या आकडेवारीनुसार गेल्या आठवड्यात ग्रामीण भागातील बेरोजगारी मध्ये ७.१ २९ %वरून १४.९ ३० %अशी वाढ नोंदविण्यात आली आहे. गेल्या वर्षभरातील ग्रामीण बेरोजगारीचा हा उच्चांकी दर आहे शहरांमध्ये ही वेगळी स्थिती नाही शहरातील बेरोजगारीचा दरही १४.१ का तर टक्क्यावर केला आहे तर देशभरातील एकूण बेरोजगारीचे प्रमाण १४ पॉईंट पंचेचाळीस %वर आले आहे.

**उपायोजना –**

१. महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्था पुन्हा स्थितीवर आणण्यासाठी आरबीआयने रेपो दरात सुधारणा करणे गरजेचे आहे.
२. अफवा पसरविणाऱ्या यांवर दंडात्मक कारवाई करावी.
३. सरकारने लहान उद्योजकांचे व्याज माफ करावे व कमी दराने कर्ज उपलब्ध करून द्यावे.
४. शेतकऱ्यांसाठी बाजार समित्यांचे विभाजन करून थेट ग्राहकांपर्यंत शेतकऱ्यांचा महाल पोहोचवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.
५. खेड्यातील सर्व स्थलांतरित कामगारांना अन्न निवारा आणि कपड्याची व्यवस्था करण्यासाठी प्रयत्न केले जावेत.
६. ग्रामीण भागात उद्योगधंद्यांची व्यवस्था करण्यात यावी..

**निष्कर्ष –**

- कोरोनाव्हायरस या जागतिक महामोर्चा महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम झाला.
- कोरोनाव्हायरस महाराष्ट्रातील ग्रामीण शेतीवर विपरीत परिणाम झाला.
- लॉक डाऊन काळात ग्रामीण मजुरांचा बेकारीचा प्रश्न वाढला.
- महाराष्ट्रातील दुग्ध व्यवसायावर कोरोनामुळे अनिष्ट परिणाम झाला.

अशाप्रकारे कोरोना या जागतिक महामारीचा महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील सर्व व्यवसाय, कारखानदारी रोजगार, शेती व्यापार बंद झाल्यामुळे महाराष्ट्राच्या महसुली खर्चात घट झाली राज्याची आर्थिक स्थिती कोलमडून पडली आणि महाराष्ट्राचा विकास दर घसरला आहे.

**संदर्भ**

१. महाराष्ट्र शासन जनगणना अहवाल- २०११
२. महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल २०२० - २१
३. डॉ. ए बी. सवदी. महाराष्ट्र निराली प्रकाशन सन - २०१९
४. पगारासाठी राज्य शासन कर्ज काढणार एबीपी माझा न्युज ११ एप्रिल २०२०
५. Orfonline. Org २३ एप्रिल २०२०
६. कोविड १९ चा अर्थव्यवस्थेवर परिणाम आणि उपलब्ध संधी दैनिक सकाळ ३ एप्रिल २०२२
७. कामगार सुधारणांबाबत २०१९ आणि २०२० ही वर्षे ठरली मैलाचा दगड PIB mumbai २९ जानेवारी २०२१
८. धोरणाचा उद्योग धंद्यावर परिणाम दैनिक सकाळ १३ एप्रिल २०२०

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# ब्रिटिश प्रशासकीय दडपशाहीच्या विरोधाला न जुमानता मिठाच्या सत्याग्रहात सहभागी जळगाव जिल्ह्यातील सत्याग्रहीनी नोंदविलेल्या प्रतिक्रिया

**मनोहर रूपचंद शिंदे**
संशोधक विद्यार्थी
इतिहास संशोधन केंद्र, प्रताप कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), अमळनेर,जि-जळगाव

**प्रा. डॉ. धनंजय रमाकांत चौधरी**
मार्गदर्शक
इतिहास संशोधन केंद्र, प्रताप कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), अमळनेर,जि-जळगाव

**प्रस्तावना –**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अंतिम टप्पा गांधीयुग अथवा गांधीपर्व (इ.स. १९२० ते इ.स. १९४७) या नावाने संबोधण्यात येतो. भारतीय इतिहासात या कालखंडास अनन्यसाधारण महत्त्व असलेले आपणास दिसून येते. या कालखंडात अनेक लहान-मोठे सत्याग्रह महात्मा गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली घडवून आणण्यात आले. या लढ्यामध्ये भारतातील सर्व स्तरातील स्त्री-पुरुषांनी उत्स्फूर्तपणे सक्रिय सहभाग घेतल्याचे निदर्शनास येते.इ स.१९३० च्या दरम्यान मिठाचा सत्याग्रह महात्मा गांधी आणि त्यांच्या अनुयायांनी शांततेच्या अहिंसात्मक मार्गाने चालवला होता. परंतु ब्रिटिश प्रशासनाने मात्र हा सत्याग्रह मोडून काढण्यासाठी 'दडपशाही धोरणाचाच' वापर केल्याचे स्पष्ट होते.

मिठाचा सत्याग्रहानंतर मात्रब्रिटिश प्रशासनाविषयीची जी थोडीफार भीती जनतेच्या मनात होती. ती पूर्णपणे दूर झाल्याने पुढील काळात मात्र महात्मा गांधी आणि त्यांच्याअनुयायानी निर्भीडपणे लहान-मोठे सत्याग्रह चालूच ठेवल्याने शेवटी ब्रिटिश प्रशासनाला हिंदुस्थानातील आपली सत्ता संपुष्टात आणणे भाग पडले.

थोडक्यात भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महात्मा गांधी यांनी चालवलेलामिठाचा सत्याग्रह एक प्रमुखआणि मोठा सत्याग्रह असल्याने यास अनन्यसाधारण महत्त्व आहे. या सत्याग्रहाला जळगाव जिल्ह्यातून मिळालेल्या प्रतिसादाची नोंद घेण्याच्या उद्देशाने सदर विषयाची निवड शोधनिबंधासाठी संशोधकाने केली आहे.

**मिठाचा सत्याग्रह आणि दांडी यात्रा –** दि. १४ फेब्रुवारी १९३० रोजी गुजरातमधील अहमदाबाद जिल्ह्यातील साबरमती येथे झालेल्या कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीत कायदेभंगाच्या लढ्याचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला. गांधीजींनी मिठाच्या सत्याग्रहाची कल्पना मांडली. निसर्गाने भरपूर प्रमाणात उपलब्ध करून दिलेल्या मिठावर ब्रिटिश प्रशासनाने आपला एकाधिकार प्रस्थापित करून मिठावर सक्तीचा कर बसविण्यात आला होता. मीठाच्या या कराने सर्वसामान्य गरिबांचे शोषण चालविले आहे. तेव्हा हा कर अन्याय्य मानला पाहिजे व या कायद्याचाभंग करण्यासाठी देशव्यापी चळवळ सुरु केली पाहिजे अशी गांधीजींची भूमिका होती. याच उद्देशाने स्वतः गांधीजी यांनी दांडी येथे जाऊन मिठाचा सत्याग्रह करण्याचे निश्चित केले. दांडी हे ठिकाण अहमदाबादपासून सुमारे दोनशे मैलांवर समुद्रकाठी होते. दि. १२ मार्च १९३० रोजी निवडक ७८ स्त्री-पुरुष स्वयंसेवकांसह साबरमती आश्रमापासून गांधीजींनी दांडी यात्रा सुरू केली. या निवडक स्वयंसेवकांमध्ये अमळनेरच्या हरी कृष्ण मोहिनी यांची महात्मा गांधीजीनी निवड केली होती हे विशेष होय. ही यात्रा पदयात्रा होती. या पदयात्रे दरम्यान प्रत्येक गावांमध्ये गांधीजीं आणि स्वयंसेवकांचे उत्स्फूर्त असे प्रचंड स्वागत होत असे. दांडी यात्रेचा खुप मोठा अभूतपूर्व असाभव्य सत्याग्रह पाहण्यासाठी परदेशातुन पत्रकारही आले. २४ दिवसांची पदयात्रा करून दि. ५ एप्रिल १९३० रोजी गांधीजी दांडी येथे पोहोचले. त्याठिकाणी त्यांनी समुद्रकाठाचे मीठ उचलून कायदेभंग केला. त्यांच्या पाठोपाठ गांधींच्या अनुयायांनी मीठ हातात घेऊन कायदेभंग केला. यानंतर मात्र संपूर्ण देशभर मिठाच्या सत्याग्रहाची मोहीम वेगाने सुरू झाली. कित्येक गावांमधून आणि शहरांमधून सत्याग्रहिंनी कायदेभंग केला. यावेळी ब्रिटिश प्रशासनाने दडपशाही धोरणाचा अवलंब करून सत्याग्रहींवर मोठ्या प्रमाणात लाठी हल्ले, गोळीबार, चाबकाचे फटके मारणे, घोड्यांच्या टाचां खाली सत्याग्रहींना तुडवणे आणि त्याचप्रमाणे बऱ्याच सत्याग्रहींना तुरुंगामध्ये डांबण्याचे सत्र सुरू केले. काही ठिकाणी ब्रिटिश प्रशासकीय दडशाहीच्या अतिरेकामुळे सत्याग्रहींचा संयम सुटल्याने अहिंसात्मक सत्याग्रहाचे रूपांतर उग्र आंदोलन झाले.

पं. जवाहरलाल नेहरू आदी प्रमुख कॉंग्रेस नेत्यांना सरकारने तुरुंगात टाकले. ब्रिटिश सरकारने कायदा हाती घेतला होता. व्हाईसरॉय यांनी खास वटहुकूम काढून पोलिसांचे हात बळकट केले. अशा परिस्थितीत सायमन कमिशनचा रिपोर्ट २७ मे १९३० रोजी प्रसिद्ध झाला. सायमन कमिशनने हिंदुस्थानच्या राजकीय भावना लक्षातच घेतल्या नाहीत. कोणत्याही राजकीय संघटनेने तो स्वीकारला नाही. सरकार आणि कॉंग्रेस यांच्यात तडजोड घडावी व देशातील अस्थिर परिस्थिती नाहीशी व्हावी म्हणून सर तेजबहादुर सप्रू व जयकर यांनी पुढाकार घेतला. तथापि, अशी तडजोड घडून येऊ शकली नाही. कायदेभंगाची चळवळ लोकांनी चालूच ठेवली.

**मिठाच्या सत्याग्रहात अवलंबलेले ब्रिटिश प्रशासनाची दडपशाही –** मिठाचा सत्याग्रह दडपून टाकण्यासाठी ब्रिटिशांनी सत्याग्रहींना अमानुष मारहाण, लाठीहल्ला, वेळप्रसंगी गोळीबार, घोड्याच्या टाचाखाली तुडवणे तुरुंगात टाकने, चाबकाचे फटके देणे आदि दडपशाही धोरणाचा अवलंब केला.

धरासना येथील मिठाचा सत्याग्रहाच्या घटनेची नोंद घेण्यासाठी आलेला परदेशी पत्रकार बेबमिलर (न्यू फ्रीमैनचा वार्ताहर) यांनी प्रत्यक्ष घटनेबाबत नोंद घेताना ब्रिटिश प्रशासनाने अवलंबलेल्या दडपशाहीचे विदारक स्वरूप विशद करताना म्हणटले की, मी आजपर्यंत अनेक उपद्रव, संघर्ष, उठाव बघितले पण धरासणा येथील अंगावर काटे उभे करणारे मर्मभेदी असे दृश्य कधीच बघितलेले नव्हते. काही वेळा त्यातील दृश्य इतकी भयानक होती की, ते पहाणे मला अशक्य झाले. मी त्या वेळी अक्षरशः डोळे बंद करून घेतले होते.

यावरून ब्रिटिश दडपशाहीची कल्पना येते. ब्रिटिशांनी सत्याग्रहींचे मनोबल खच्चीकरण करुन सत्याग्रह दडपून टाकण्याचा अतोनात प्रयत्न केलेला दिसून येतो.

**जळगाव जिल्हा –** ब्रिटिश प्रशासनाकडून 'बॉम्बे प्रेसिडेन्सी' अंतर्गत 'खानदेश' हा जिल्हा बनवण्यात आला. पुढे प्रशासकीय सोयीसाठी इ.स. १९०६ मध्ये खानदेश जिल्ह्याची दोन जिल्ह्यांमध्ये विभागणी करण्यात आली. पूर्व आणि पश्चिम खानदेश यातील पूर्व खानदेशाचे मुख्यालय जळगाव येथे होते. इ.स. १९४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्यानंतर 'बॉम्बे प्रेसिडेन्सी' हे 'बॉम्बे राज्य'बनले आणि इ.स. १९६० मध्ये 'महाराष्ट्र'आणि 'गुजरात' या भाषिक राज्यांमध्ये विभागले गेले.'पूर्व खानदेश' हा 'जळगाव जिल्हा' बनला आणि तो 'महाराष्ट्र' राज्याला जोडण्यात आला.

**ब्रिटिश प्रशासकीय दडपशाहीच्या विरोधाला न जुमानता मिठाच्या सत्याग्रहास जळगाव जिल्ह्यातूनप्राप्त झालेल्या प्रतिक्रिया –** प्रत्यक्ष सत्याग्रहात सहभागी सत्याग्रहींच्या घेतलेल्या मुलाखतीतून त्यांनी नोंदविलेला अनुभवाच्या प्राप्त झालेल्या नोंदींची दखल घेताना असे स्पष्ट होते की, जळगाव जिल्ह्यातील सत्याग्रहीनी मिठाच्या सत्याग्रहात सहभाग विविध मार्गांनी घेतला. त्याचा आढावा आपणास पुढीलप्रमाणे घेता येईल.

**मिठाचा सत्याग्रह करण्याच्या उद्देशाने जमलेल्या समुद्रकिनाऱ्यावरील सत्याग्रहीमध्ये सामील होऊन सत्याग्रहात सहभागी जळगाव जिल्ह्यातील सत्याग्रही –**

**मधुकर शांताराम सोनाळकर (शिंदाड, ता. पाचोरा) –** मिठाच्या सत्याग्रहासाठी पिंप्राळा,ता., जि.जळगाव येथे आश्रम बांधून सत्याग्रहीसाठी छावणी उघडण्यात आली. या छावणीत सहभागी सत्याग्रहींना एक महिना सत्याग्रहाविषयी बौद्धिक दिल्यानंतर जे तरुण तयार झाले. अशा तरुणांच्या १०० ते १२० तुकड्या तयार केल्या. यानंतर त्यांचे गट तयार केले. गट संघटित राहावा म्हणून गट नायकांकरिता देखील स्वतंत्र वर्ग चालविले. या गटनायकांमध्ये मधुकर शांताराम सोनाळकर, सिताराम नांदेडकर, सितारामभाऊ चौधरी, श्रीपाद कुलकर्णी, पितांबर सोमा चौधरी आदि २५ सत्याग्रही तयार झाले. यांना मुंबईत पाठविण्यात आले.

या सर्वांना विलेपार्ले येथील छावणीत भाईसाहेब कोतवाल, नरसिंग मेहता इत्यादींच्या मार्गदर्शनाखाली सविनय कायदेभंग व अहिंसात्मक कार्यक्रम यांची शिकवण देण्यात आली. तेथून ही सर्व मंडळी शिरोड्यातील (वेंगुर्ले) सत्याग्रही छावणीत गेले. येथे महाराष्ट्राच्या कान्याकोपऱ्यातून सत्याग्रही एकत्र आल्यावर गटागटाने मिठाचा सत्याग्रह करण्याचा निर्णय घेण्यात आला.

शिरोड्याच्या आसपास मोठ्या प्रमाणावर मिठागरे होते. 'मिठाचा कायदा रद्द करा, मीठ स्वस्त मिळू द्या,' अशा घोषणा देत सत्याग्रही सीमेवर जमत व गटागटाने सत्याग्रह करीत. सुरुवातीला पोलिसांनी लाठीमार केला, पण पुढे सोलापूर, कोल्हापूर व जळगाव यांच्या एकत्रित तुकड्या ज्यावेळी सत्याग्रहासाठी गेल्या त्यावेळी वरिष्ठ पोलीस अधिकारी चिडले व त्यांनी सत्याग्रहींना मरेस्तोवर मारण्याचा आदेश दिला. मिठाच्या पाण्यात चाबूक बुडवून उघड्या पाठीवर बेदम मारहाण करण्यात आली. अनेक सत्याग्रही ब्रिटिशांच्या या अमानुष मारहाणीने निस्तेज पडलेत.

**शामराव चांगो सावदेकर (असोदे, ता. जि. जळगाव) –** मिठाच्या सत्याग्रहात सहकाऱ्यांच्या प्रेरणेने सत्याग्रहात सामील होण्यासाठी शिरोडा, जि. रत्नागिरी येथील स्वयंसेवकांच्या छावणीत दाखल झालेत. यावेळी सत्याग्रही गोवा हद्दीत शिरून कररहित मिठ घेऊन येत. त्यावेळी बऱ्याच वेळा ब्रिटिश पोलिसांकडून होणारा लाठीमारही सहन करावा लागत होता.

याशिवाय प्रत्यक्ष समुद्रकिनाऱ्यावर जाऊन सत्याग्रहात सामील होणाऱ्या सत्याग्रहीमध्ये बापूसाहेब माधवराव गोटू पाटील (माजी आमदार, चोपडा), आनंदा महादू भोळे (असोदे, ता.जि.जळगाव), सिताराम भावजी चौधरी, सितारामभाऊ चौधरी (ममुराबाद, ता.जि.जळगाव), मल्हारी चिकाटे (अमळनेर जि.जळगाव) आदि बहुसंख्य सत्याग्रहीनी सहभाग घेतला.

**जळगाव जिल्ह्यातील महात्मा गांधींच्या अनुयायांनी गावोगावी जाऊन मिठाच्या सत्याग्रहाविषयी केलेली जनजागृती –** महात्मा गांधीजींच्या अनुयायांनी गावोगावी जाऊन प्रभात फेरी काढून व घोषणा देत जनजागृती केली. वंदे मातरम, इंग्रजांना हाकलून लावा, परदेशी वस्तू वापरू नका अशा घोषणांनी सर्व गावे गर्जून सोडली.

प्रभात फेरी काढून दारूबंदी, जातीयता निर्मूलन, खादीचा वापर, वस्त्र स्वावलंबन यासंबंधीची गाणी म्हणून खेडोपाडी फिरत असत. असा प्रचार करण्याऱ्या सभा गावोगावी घेत असत.

चरखा चलाचला के । लेंगे, स्वराज्य लेंगे ।।
नही रखनी नही रखनी । यह जालीम सरकार नही रखनी ।।

अशी गाणी म्हणून कार्यकर्त्यांना उत्साह यावा म्हणून मिरवणुकीच्या वेळी घोषणा देत असत.

**शंकर तुकाराम झांबरे (बामणोद, ता. यावल) –** महात्मा गांधींसोबत राहणाऱ्या शंकरराव देव यांनी ठीकठिकाणी जाहीर सभा घेऊन मिठाच्या सत्याग्रहात सहभाग घेण्याचे आवाहन केले. बामणोद येथील सभेत केलेल्या आवाहनावरुन शंकर झांबरे त्यांच्यासोबत जाऊन सत्याग्रहात सहभागी झाले. सत्याग्रहा दरम्यान पोलिसांच्या ताब्यात सापडले. अंगावरील कपडे काढून त्यांना लोखंडी साखळीने बांधण्यात आले आणि अमानुषपणे मारहाण करण्यात आली.

**भागिरथीबाई चौधरी (ममुराबाद, ता.जि. जळगाव) –** भागीरथीबाई यांनी आपल्या मैत्रिणी रुक्मिणीबाई, सरस्वतीबाई धनाजी चौधरी, सरलाबाई यांच्यासह मिठाच्या सत्याग्रहात सहभाग घेऊन गावोगावी प्रभातफेऱ्या काढीत असत. काळी निशाने घेऊन दारू दुकानांवर पिकेटिंग करीत, गाणे म्हणत. या कारवाया करीत असताना पोलिसांनी या तिन्ही मैत्रिणींना पकडले. या तिन्ही मैत्रिणींना न्यायालयाने सहा-सहा महिन्याची शिक्षा ठोठावली. परंतु भागिरथीबाई ह्या वयाने लहान असल्याने त्यांना सोडून देण्यात आले.

या सत्याग्रहीबरोबर गावोगावी मिठाच्या सत्याग्रहाचा प्रचार करणाऱ्या सत्याग्रहिंमध्ये बाबुराव दोधू महाजन (अकुलखेडा, ता.चोपडा), दोधूसिंग राघोसिंग परदेशी (पारोळा), ओंकार दशरथ पाटील (कडगाव, ता. जळगाव), मंगा शिवराम पिंपरकर (नांदेड, ता. अमळनेर), नथू संपत शिंदे उर्फ शिंदे गुरुजी (जळगाव), किसान चिंधू सोनार (चहार्डी, ता.चोपडा) आदि बहुसंख्य सत्याग्रहिंनी सहभाग घेतला.

**उपसंहार –** महात्मा गांधींनी घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून जळगाव जिल्ह्यातील सत्याग्रहिंनी मिठाच्या सत्याग्रहात उत्स्फूर्त सहभाग घेतल्याचे स्पष्ट होते. मिठाच्या सत्याग्रहाप्रसंगी ब्रिटीशांच्या जुलमी, अत्याचारी, दडपशाहीला न जुमानता कायदेभंगाची ही मोहीम जळगाव

जिल्ह्यात सत्याग्रहिंनी तेजवत ठेवण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी मोठ्या धैर्याने, संयमाने, अहिंसात्मक मार्गाने यशस्वीरित्या पार पाडलेली आपणास दिसून येते.

अंततः भारतीय स्वातंत्र्यलढ्यास ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सामील झालेल्या सत्याग्रहींच्या स्मृतींना उजाळा देण्याचा अल्पश: प्रयत्न संशोधकाने या शोधनिबंधाच्या माध्यमातून केला आहे.

**संदर्भ**


१. शीन विसेंट, (अनुवाद हेमेंड), गांधीजी, एक महात्मा की संक्षिप्त जीवनी, प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, पटियाला हाउस, नई दिल्ली,सितंबर, १९९४.

२. लेले केशव गोविंद (संपादक), स्वातंत्र्य लढ्यातील आमचा सहभाग, प्रकाशक, महात्मा गांधी राष्ट्रीय साहित्य भांडार खादी ग्रामद्योगभवन जिल्हा सर्व सेवा समिती, शास्त्री चौक, बळीराम पेठ,जळगाव, प्रथम आवृत्ती- २००२.

३. भोकरडोळे संजय (डॉ.), आठवणी स्वातंत्र्यसैनिकांच्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २०१२.

४. पवार जयसिंगराव (डॉ.), हिंदुस्तानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, निराली प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, फेब्रुवारी, १९९८.

५. देशपांडे प्र.न. ( प्रा., डॉ.), भारतीय स्वातंत्र्याचा लढा (इ. स. १८५७ ते इ. स. १९४७),विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, जुन, १९९४.

६. शहा जी.बी. (प्राचार्य, डॉ.), खानदेश मधील राष्ट्रवादाचा उदय आणि विकास ( खानदेशचा इतिहास ), प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथम आवृत्ती, १ जुलै, २०१४.

७. शहा जी. बी.(प्राचार्य, डॉ.), डी. एन. वाघ (डॉ.), भारताचा इतिहास (इ.स. १८५७ ते इ.स. १९५०), प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव,प्रथम आवृत्ती, १५ ऑगस्ट, २०१८.

८. कठारे अनिल (डॉ.), भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास (इ.स. १८५८ ते इ.स. १९४७), प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथम आवृत्ती, १ जानेवारी,२०१३.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# नवीन शैक्षणिक धोरण व भारतीय समाज

**डॉ. मुरलीधर पंडित गायकवाड**
सहयोगी प्राध्यापक व व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख
वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय मुरुड जंजिरा, जि. रायगड

**प्रस्तावना –**

आर्थिक सुधारणोत्तर काळात उत्पन्नवृद्धी ऐवजी मानवी विकासावर लक्ष केंद्रित करण्यात आल्याने सामाजिक क्षेत्राच्या विकासाची आर्थिक विकासातील अपरिहार्यता व सामाजिक क्षेत्रातील घटकांची भूमिका महत्वाची मानली गेली शिक्षण हे सामाजिक क्षेत्राचे महत्वाचा घटक आहे. दीर्घकालीन टिकाऊ विकासासाठी मानवी साधन संपत्ती आणि सामाजिक विकास यांची आवश्यकता आहे. जागतिक बँक UNO यांनी केलेल्या अभ्यासाद्वारे शिक्षणाचे मानवी विकास व आर्थिक विकासातील महत्व स्पष्ट झाले आहे. उच्च विकासदर गाठणाऱ्या पूर्व आशियातील देशांनी शिक्षणातील गुंतवणुकीमुळे तंत्रज्ञानाचा पाया घातला. आधुनिक काळात शिक्षणावरील खर्चाचा समावेश उत्पादक गुंतवणुकीत केला जातो. शिक्षणातील गुंतवणुकीमुळे १. नवीन तंत्रज्ञान सुलभतेने व जलद गतीने स्वीकारण्याची पार्श्वभूमी तयार होते. २. आधुनिक तंत्रज्ञान अधिकाधिक ज्ञान साधन होत जाणार आहे. ३. व्यवस्थापन कौशल्याच्या विकासासाठी देखील ही गुंतवणूक आवश्यक आहे. शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट सर्व क्षेत्रातील शिक्षणात सुधारणा व विस्तार शैक्षणिक संधीतील विषमता दूर करणे, गुणवत्ता सुधारणे ही आहेत. सर्वांना शिक्षण मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, निरक्षरतेचे संपूर्ण निर्मुलन, शिक्षणाचे व्यावसायिकरण, स्त्री शिक्षणावर विशेष लक्ष, तसेच दुर्बल घटक व अल्पसंख्यांक यांच्या शिक्षणास प्राधान्य हे शिक्षण धोरणाचे प्रमुख घटक आहेत.

देशातील तरुण पिढी देशाचे राजकीय, औद्योगिक आणि सामाजिक वैभव राखण्यास किंवा वाढविण्यास समर्थ होईल अशा प्रकारे त्यास शिक्षण देणे हे देशातील विद्याखात्याचे कर्तव्य आहे. भारतातील शिक्षण व्यवस्था हि जगातील मोठ्या शिक्षण व्यवस्थेमध्ये गणली जाते. देशात एकूण ९२० विद्यापीठे, १२६ अभिमत विद्यापीठे, ५० केंद्रीय विद्यापीठे, ३४० खाजगी विद्यापीठे, ५१,६४९ कॉलेज, ८,४०,५४६ प्राथमिक शाळा, ४, २९,६२४ उच्च प्राथमिक शाळा, १,३९,५३९ माध्यमिक शाळा, १,१२,६३७ उच्च माध्यमिक शाळा आहेत. एकूण २४,७८,५३,६८८ विद्यार्थी शालेय शिक्षण घेत आहेत. ९४,१६,८९५ शिक्षणाद्वारे शिक्षण प्रसाराचे पवित्र कार्य केले जाते. एवढ्या मोठ्या शिक्षण व्यवस्थेच्या विकासासाठी घटनेमध्ये ८% खर्च करावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्रावरील खर्च ९४,८५४ कोटी रुपये होता. सन २०२० -२१ चा अर्थसंकल्पात तो ९९,३०० कोटी करण्यात आला. सन २००५ मध्ये Right to Education Act पास करून सर्वांना शिक्षणाची हमी देणारा कायदा पारित केला त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाची हमी सरकारद्वारे देण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शाळा, शिक्षक, पायाभूत सुविधा पुरवण्याचे आव्हान सरकारकडून स्वीकारण्यात आले आहे.

संपूर्ण मानवी क्षमता साध्य करण्यासाठी आणि देशाचा आर्थिक विकास करण्यासाठी आणि राष्ट्रीय विकासाला चालना देण्यसाठी शिक्षण हे महत्वाचे आहे. भारताच्या नवीन उभारणीसाठी व आत्मनिर्भर भारत बनवण्यसाठी नवीन शैक्षणिक धोरण महत्वाची भूमिका बजावणार आहे. या नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी यशस्वीरीत्या होण्यासाठी सरकारी यंत्रणेबरोबरच सर्व सामान्यांनी ही प्रयत्न करणे गरजेचे आहे. कारण कोणतेही धोरण प्रभावीपणे यशस्वी होण्यासाठी त्या देशातील समाज व्यवस्था त्या धोरणाविषयी किती जागरूक आहे. यावर अवलंबून असते. नवीन शैक्षणिक धोरणाचा परिणाम भारताच्या सर्वांगीण विकासावर होणार आहे. या शैक्षणिक धोरणातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास पर्यायाने देशाचा विकास साध्य होणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणात चांगला भारतीय नागरिक बनवण्याच्या प्रयत्नावर भर दिला आहे. यात सर्वांचा सहभाग व सर्व स्तरांचा विचार अधिप्रेत आहे. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाच साधन असून यातून राष्ट्र उभारणी होत असते. हे लक्षात घेवून नवे शैक्षणिक धोरण स्वीकारण्यात आले आहे.

**नवीन आर्थिक धोरण –** सन १९९० च्या दशकातील वर्षाच्या सुरुवातीपासून भारताने नव्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. तेव्हापासून भारतीय शिक्षण क्षेत्रामध्ये महत्वाचे बदल झालेत हे दशक उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या आरंभ म्हणून ओळखले जाते. जागतिकीकरण ही उच्च शिक्षणाला गर्भित इशारे देणारी आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अशी बहुमुखी, बहुआयामी प्रक्रिया आहे. देशामध्ये उच्चशिक्षण देणाऱ्या खाजगी संस्था मोठ्या प्रमाणावर निर्माण होत असताना. त्यास मोठे नवीनच आव्हान निर्माण झाले आणि ह्या खाजगीकरणाच्या झपाट्याने विदयाभ्यास समुदायास शालेय, विद्यापीठीय शैक्षणिक निर्णय प्रक्रियेत संपूर्णपणे दुर्लक्ष झाले. त्यांच्याशी कोणतीही चर्चा केली जात नाही अशी आव्हाने हि केवळ संधी उपलब्धता, समन्याय, वित्तपुरवठा आणि गुणवत्ता यांनाच धोक्यात आणत नाहीत तर राष्ट्रीय सार्वभौमत्व, सांस्कृतिक, वैविध्य, दारिद्र्य आणि शाश्वत वा दीर्घकालीन विकासासाठी तेवढीच हानी पोचवतात ह्या सगळ्या गोष्टी मग अगदीच दुय्यम दर्जाच्या बनतात.

एकविसाव्या शतकाने पारंपारिक आणि व्यावसायिक उच्च शिक्षणाची अभूतपूर्ण मागणी केली. उच्च शिक्षणाची वाढती मागणी पुरविण्याऐवजी आणि त्याची त्या अनुषंगाने देशाची होणारी वृद्धी यांची कसलीच पुरेशी काळजी न घेता, भारतातील उच्चशिक्षण हे आजघडीला व्यापारीकरण्याच्या कचाट्यात सापडले आहे आणि आपणास हे वास्तव स्वीकारावेच लागेल, जरी ते कायदेशीररीत्या योग्य नसेल तरी त्याची अनेक कारणे आहेत. त्यामध्ये लागोपाठच्या केंद्रीय सरकारने स्वीकारलेली सामाजिक, आर्थिक धोरणे, प्रामुख्याने ऐशीच्या मध्यवर्तीपासून तसेच सत्ताधारी वर्गाच्या वैचारिक निष्ठा, न्याय वसंस्थेची सरकारधार्जिणी भूमिका आणि व्यापारी उद्योगधंदेवाल्यांचे छुपे हितसंबंध यांचा समावेश होतो. त्याला कायदेशीरपणाही प्राप्त झाला. कारण राज्य सरकार या अनुदानातील शिक्षण प्रणालीतून राज्याने हळूहळू अंग काढून घेतल्यामुळे ती अयशस्वी ठरली राज्याने हळूहळू लोकांच्या गरजा व सेवा यातूनही माघार

घेतल्यामुळे तर त्यास एक प्रकारची अवकळाच आली. उच्चश्रू , नवश्रीमंत आणि धनाढ्य वर्गाने खाजगी क्षेत्रातील स्थानिक व परदेशातील शैक्षणिक संस्थाना आपला अग्रक्रम केला त्यांचा तो ब्रँड बनला यामुळे तर त्या ह्या शिक्षणातील खाजगीकरणास अधिकच बळ मिळाले.

समाजातील दुर्बल घटकांचे आर्थिक व इतर अंगाने शोषण करणाऱ्या ह्या प्रबळ आंतरराष्ट्रीय व्यावसायिक संघटना सार्वजनिक शिक्षणाला विशेषतः उच्च शिक्षणाला त्यांनी नफा कमावण्यासाठी लक्ष्य केले आहे. शिक्षण ही तशी प्रामुख्याने सरकारी मदतीवर व अनुदानावर चालणारी सेवा आहे. पण अनेक सरकारे, ह्या नवीन आर्थिक सुधारणांमुळे, शिक्षण सेवेसारख्या महत्वाच्या सेवेतून माघार घेत आहेत. जबाबदारी झटकत आहेत. भारत सरकारने मोठ्या प्रमाणावर खाजगीकरण, बाजारीकरण व नियंत्रणमुक्त पद्धतीचा वापर करून ह्या प्रक्रियेत अधिकच प्रोत्साहन दिले आहे.

**राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० –** शिक्षण हे अत्यंत महत्वाचे असून त्याचे महत्व अनन्य साधारण आहे. जगात आणि भारतात ही अशी अनेक संशोधने झाली आहेत. शिक्षण हे जलद आणि सर्वांगीण विकासाचे प्रभावी साधन असल्याचे सिद्ध करते. शिक्षण आणि विकास यामधील संबंधाचा विचार करता प्राथमिक शिक्षण आवश्यक आहे. मात्र ते पुरेसे नाही. शिक्षणाचा विकासावरील प्रभाव अधिक व्यापक आणि जलद हे शिक्षण धोरणावर अवलंबून असते. २९ जुलै २०२० रोजी केंद्रीय मंत्री मंडळाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मान्यता दिली आणि शासनाच्या वतीने सदर शैक्षणिक धोरणाचा आराखडा देशवासीयांसमोर मांडण्यात आला. या शिक्षण धोरणामध्ये विद्यार्थ्यांचे नेमके काय व्हिजन आहे हे लक्षात घेऊन त्या दिशेने टाकलेले महत्वाचे पाऊल होय. म्हणूनच या शिक्षण धोरणाबरोबर भारत केंद्रित शिक्षण धोरण या देशात आणली जाणार आहे. त्यामुळे हे शैक्षणिक धोरण भारताचे संपूर्ण व शाश्वत परिवर्तन करेल या देशात अत्यंत प्रगल्भ व सतत बदलांचा वेध घेणारा असा ज्ञानाधीष्ठीत समाज निर्मिती करणे हेच नव्या शिक्षण धोरणाचे ध्येय आहे. हे करत असताना समज्ञायी दृष्टीकोन समोर ठेवला आहे. जेणेकरून सर्वाना याचा समान फायदा मिळेल आणि उत्कृष्ट गुणवत्तेचे ज्ञान समाजाच्या प्रत्येक घटकाला व प्रत्येक स्तरापर्यंत कसे पोहोचेल याचाही सखोल अभ्यास या शैक्षणिक धोरणामध्ये केला गेला आहे. म्हणजेच गुणवत्ता, पूर्ण शिक्षण देशातील प्रत्येकाला देणे हे या नवीन शैक्षणिक धोरणाचे ध्येय आहे.

सतत बदलांचा वेध घेण्यासाठी व ज्ञानाधिष्ठित समाज बनवण्यासाठी आपल्याला संशोधनाची कास धरावी लागेल. हे लक्षात घेऊन नवीन शैक्षणिक धोरणात संशोधनावर विशेष भर दिला आहे. गरज ही शोधाची जननी आहे. म्हणून गरजा निश्चित करणे, त्या गरजा एका समाजाच्या नसून संपूर्ण देशातील नागरिकांच्या असतात. हे लक्षात घेऊन संशोधन निर्मिती करणे आवश्यक आहे. म्हणून यात नाविन्यतेचा विचार करावा लागेल. संशोधनात नाविन्यता आली तर विविध प्रकारच्या सेवा, उत्पादने निर्माण होतील त्यातून भारताची आर्थिक प्रगती होईल. नवीन विषयांची ज्ञान निर्मिती होईल. सर्वांच्या सर्वांगीण विकासासाठी हे अत्यंत आवश्यक आहे. संशोधनात भाषा, जात, धर्म ई. विचार न करता नाविन्यतेला प्राधान्य देऊन चालना देणे आवश्यक आहे. तरच संपत्तीची निर्मिती होईल. हे सारे एकदाच होणार नाही. यासाठी बराच कालावधी जावा लागेल. म्हणजेच हा बदल टप्याटप्याने होणे अपेक्षित आहे. यासाठी नाविन्य, व संशोधन याला समाजाने प्रचंड महत्व देणे अपेक्षित आहे. विविध विद्याशाखेतील नवीन विषयांना गवसणी घालणारे हे संशोधन असावे आणि त्यासाठी भारतात सर्वात संशोधनाची एक चांगली रचना निर्माण होण्याची आवश्यकता आहे. हेच या नव्या शैक्षणिक धोरणात स्पष्ट केले आहे. यासाठी एका चांगल्या वातावरणाची गरज आहे. त्यासाठी भारतातील विद्यार्थी हा बहुभाषिक आणि विविध विद्याशाखेचा ज्ञान असणारा असणे गरजेचे आहे. याचाच उल्लेख नवीन शैक्षणिक धोरणात केला आहे.

**संशोधन निर्मित्तीला प्राधान्य –** माणसाच्या गरजा आणि मानवाला भेडसावणाऱ्या समस्या हा नेहमीच अंतरविद्याशाखीय असतात. त्यामुळेच अंतर विद्याशाखीय ज्ञान हीच संशोधनाची अट मानली जाते. याला एक सहरचनात्मक पद्धती लागत असते. नेमकी समस्या कोणती व ती कशी सोडवावी याबद्दल विद्यार्थामध्ये एक पद्धत व विकसित करणे आवश्यक आहे. त्यातूनच प्रयोगशीलता येईल. विद्यार्थी समस्या समजून घेऊन अभ्यास करून प्रयोग करतील त्यातून आलेले परिणाम तपासले जातील या सगळ्या प्रक्रियेचे वर्गीकरण व विश्लेषण करावे लागेल. यासाठी भावी पिढीत संशोधनाचे बीज रोवावे लागेल तरच संशोधनात प्रचंड पुढे जाणारा एक ज्ञानाधिष्ठित समाजाची रचना निर्माण होईल हे लक्षात घेऊन नव्या शैक्षणिक धोरणात सहावी पासूनच आमुलाग्र बदल केले आहेत. समाजाच्या उपयोगी संशोधन निर्मित्तीला प्राधान्य या शैक्षणिक धोरणात दिले आहे.

संशोधनात भारताची गुंतवणूक कमी आहे. हि गुंतवणूक वाढविण्यासाठी नव्या शैक्षणिक धोरणात भर दिला आहे. २००८ मध्ये संशोधनावर झालेली गुंतवणूक जी.डी.पी. च्या ०.८% एवढी होती तर २०१४ मध्ये हि गुंतवणूक वाढणे अपेक्षित होते. पण ती कमी झाली ०.६९% इतकीच झाली. याच कालावधीत भारताच्या तुलनेत अमेरिकेत २.८ तर चीनमध्ये २.१% दक्षिण कोरियामध्ये ४.१% आणि इस्त्राईलमध्ये ४.३५% इतकी गुंतवणूक केली गेली. २०१६-२०१७ च्या आकडेवारीनुसार भारतात एकलाख लोकांमागे फक्त १५ संशोधक आहेत. तर चीनमध्ये १११ अमेरिकेत ४२३ आणि इस्त्राईलमध्ये ८२५ एवढे संशोधक आहेत. WIPO हि संस्था जगभरातील पेंटेन्टचा मागोवा घेत असते. यानुसार चीनमधून १३,३८,५३० पेंटेन्टचे अर्ज दाखल झाले. अमेरिकेने ६५,५७१ इतके पेंटेन्ट फाईल केले तर भारताने ४५,०५७ इतके पेंटेन्ट फाईल केले पण यातील भारतीय हे भारतात न राहणारे पण मुळचे भारतीय असलेले इतर देशात संशोधन करणारे होते. याचाच अर्थ भारतात संशोधनाची स्थिती फारशी चांगली नाही याला मुख्य कारण मधल्या काळात भारतात संशोधनाची वृत्ती नष्ट होण्याच्या मार्गावर आणली गेली आणि संशोधनाची मनोवृत्ती निर्माण करण्यास पूर्वीचे शैक्षणिक धोरण अयशस्वी ठरले. मागील काळात मोठ्या प्रमाणात कॉपीपेस्ट संशोधन करणाऱ्या संशोधकाला संशोधनाच्या डिग्री वाटप केल्या गेल्या. संशोधनात नवीन विषयात संशोधन तयार करायला कोणी तयार नाही आणि नवीन संशोधन करण्याचा प्रयत्न करण्यास पुढे आले तर त्याला गाईड्स उपलब्ध नाहीत. किंवा इतर अडचणी सोडविण्यासाठी कोणाची मदत नाही त्यामुळे भारतातील नवीन संशोधन करणाऱ्याला इच्छुक संशोधकाला इतर देशांचा आधार घ्यावा लागतो. या समस्येतून बाहेर पडण्यासाठी काही विशेष प्रावधान या नवीन शैक्षणिक धोरणात केले आहे. त्यानुसार कोणी कोणताही विषय घेऊन संशोधन करू शकतो त्यासाठी संशोधनात नाविन्यता असावी.

राष्ट्रीय संशोधन करणाऱ्या संस्था आणि विद्यापीठे यांच्यात समन्वयाचा अभाव आहे. म्हणून संशोधनाची परिस्थिती फारशी ठीक नाही त्यामुळे भारतीय बुद्धीजीवी व्यक्ती आपल्या देशात संशोधन न करता इतर देशात जाऊन संशोधनाचे कार्य करताना दिसून येतात. पेंटेन्ट फाईल करतात कारण त्या ठिकाणी त्यांना सुविधा प्राप्त होतात आणि आपल्याकडे सुविधाचा अभाव दिसून येतो. आपल्या देशात इस्त्रोसारख्या संस्था आहेत. ज्याचा जगत सॅटेलाईट

लॉचिंग मध्ये कोणीही हात धरू शकत नाही. या संस्थेने विविध मिशन सफल केले आहेत. तरी भारतात संशोधनाची दुरावस्था दिसून येते. आपल्याकडे संशोधनाची क्षमता आहे. पण काळानुसार शिक्षण धोरणामध्ये बदल झाले नाहीत परकीय देशांचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती वाढली या नवीन शैक्षणिक धोरणाने संशोधनावर प्रमुख भर दिला आहे. त्यातील एक महत्वाचा भाग म्हणजे नॅशनल फाउंडेशनची स्थापना करणे होय. हि संस्था संशोधनाच्या कार्यात येणाऱ्या अडचणीवर उपाय करण्याचा प्रयत्न करेल व देशातील सर्व संशोधनात समन्वय साधण्याचे महत्वाचे कार्य करेल.

भारताने बौद्धिक संपदा हक्काबाबत चीनच्या तुलनेने कमी प्रमाणात प्रगती केलेली असली तरी बौद्धिक संपदा हक्काबाबत भारताने २००८ते २०१७ या कालावधीत केलेली प्रगती महत्वाची आहे. तसेच केंद्र सरकारने २०१६ चे नवीन बौद्धिक संपदा धोरण, नागरिकांमधील बौद्धिक संपदा हक्काबाबत वाढती जनजागृती सरकार आणि भारतातील विविध विद्यापिठे यांचे संशोधनाला दिले जाणारे प्रोत्साहन, भारतीय समाजाची वाढती संशोधक वृत्ती या सर्व कारणांनी येणाऱ्या काळात बौद्धिक संपदा हक्कांचा माध्यमातून भारतीय संशोधक आणि उद्योजक भारत देशाला निश्चितच एक आर्थिक महासत्ता म्हणून नवीन विकसित भारत निर्माण करतील.

**नवीन शैक्षणिक धोरणांची ठळक वैशिष्टे –** २९ जुलै २०२० या दिवशी डॉ. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली लिहिले गेलेल्या मसुदाच्या केंद्रीय मंत्रिमंडळाने नवीन राष्ट्रीय शिक्षण २०२० मान्यता दिली ३४ वर्षानंतर शिक्षण धोरण बदलेले आहे. नवीन शिक्षण धोरणाची प्रमुख वैशिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

- तीन ते १४ वर्ष वयोगटाचे विद्यार्थी शिक्षण हक्क कायद्याच्या कक्षेत आले आहेत. यापूर्वी हा वयोगट ६ ते १४ वर्ष होता पूर्व प्राथमिक शिक्षण वयाच्या तिसऱ्या वर्षापासून सुरु होईल. अंगणवाडी शिक्षण हे छोटा शिशु आणि मोठा शिशु या वर्गाबरोबर जोडले जाईल ६ व्या वर्षी मुल पहिलीच्या वर्गात प्रवेश घेईल.
- सध्याच्या ५+२+३ हा पॅटर्न रद्द करून उच्च माध्यमिक शिक्षण आणि माध्यमिक शिक्षण एकत्र करण्यात आले आहे. म्हणजे इयत्ता ९ वि ते १२ वि एकत्र करून चार वर्षाचा कोर्स प्रस्तावित आहे त्यात कला, वाणिज्य आणि शास्त्र अशा शाखानिहाय फरक रद्द केला असून एकूण ८ सेमिस्टरचा कोर्स असेल ज्यात भाषा, गणित, शास्त्र हे विषय बंधनकारक करून इतर कोणतेही विषय आपल्या आवडीनुसार निवडता येतील.
- बोर्ड फक्त १२ वीच्या वर्गाला असेल महाविद्यालयीन पदवी ४ वर्षाची दहावी मंडळ रद्द डडउ, एमफिल, चहिळश्र देखील बंद असेल.
- पाचवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना केवळ मातृभाषा, स्थानिक भाषा आणि राष्ट्रीय भाषा शिकवली जाईल. उर्वरित विषय जरी तो इंग्रेजी असला तरी एक विषय म्हणून शिकविला जाईल.
- बोर्ड परीक्षांचे महत्व कमी आता बोर्ड परीक्षा फक्त १२ वी मध्ये द्यावी लागेल यापूर्वी दहावीची बोर्ड परिक्षा देणे बंधनकारक होते ते आता होणार नाही
- ९ वी ते १२ वी च्या सत्र परीक्षा असतील शालेय शिक्षण ५+३+३+४ या सूत्रांच्या अंतर्गत शिकविले जाईल.
- महाविद्यालयातील पदवी ३ व ४ वर्षाची असेल म्हणजेच पदवीच्या पहिल्या वर्गात प्रमाणपत्र मिळेल दुसऱ्या वर्षी पदविका असेल तर तृतीय वर्षात डिग्री मिळेल.
- जे संशोधनासाठी उच्च शिक्षण घेऊ इच्छितात त्या विद्यार्थ्यासाठी चार वर्षाची पदवी अभ्यासक्रम तर जे विद्यार्थी पदवीनंतर नोकरी करू इच्छितात त्यासाठी तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल.
- विद्यार्थ्यांना यापुढे एमफिल (Mphil) करावे लागणार नाही म्हणजेच, रिसर्च करणाऱ्यांसाठी पदवी अधिक एक वर्षाचा मास्टर्स अभ्यासक्रम अशी चार वर्षाची पदवी असेल. त्यानंतर ते थेट पीएचडी PHD करू शकतील.
- दरम्यान विद्यार्थी इतर कोर्स करू शकतील. उच्च शिक्षणामध्ये Higher Education २०३५ पर्यंत एकूण सकल पटनोंदणी २०३५ पर्यंत ५०% पोहोचवण्याच उद्दिष्ट दुसरीकडे नवीन शिक्षण धोरणांतर्गत जर एखाद्या विद्यार्थ्याला कोर्सच्या मध्यभागी दुसरा कोर्स करायचा असेल तर तो मर्यादित काळासाठी पहिल्या कोर्समधून ब्रेक घेऊन दुसरा कोर्स करू शकतो.
- उच्च शिक्षणात अनेक सुधारणा केल्या आहेत. सुधारणांमध्ये श्रेणीबद्ध शैक्षणिक (Graded Academic) प्रशासकीय Administrative आणि आर्थिक स्वायत्तता Financial Autolomy समाविष्ट आहे. त्याशिवाय ई-कोर्सेस प्रादेशिक भाषांमध्येहि सुरु केले जातील. आभासी vertual लॅन विकसित केल्या जातील. राष्ट्रीय शैक्षणिक वैज्ञानिक मंच (NETF) सुरु होईल. देशात ४५,००० महाविद्यालय असल्याचे स्पष्ट आहे.सर्व सरकारी, खाजगी आणि मान्यता प्राप्त संस्थासाठी समान नियम असतील.
- मल्टीडीसीफीनरी अभ्यासक्रम एकाच वेळी एकत्रितपणे शिकता येणार आहेत. यात मेजर आणि मायनर असे विषयांचे विभाजन असेल. आर्थिक किंवा अन्य कारणांमुळे होणारे ड्रॉप आऊट यामुळे कमी होतील शिवाय ज्यांना एखादा विषय आवडीचा असेल तो विषय त्यांना शिकता येईल.
- बहुभाषिक शिक्षण - मुलांना शिकवताना एकाच भाषेच्या माध्यमातून अध्यापन न करता विविध प्रादेशिक भाषांचा वापर करता येणार
- शिक्षणातील गुंतवणूक जीडीपीच्या ६% करणार, सध्या हे प्रमाण ४.४३% आहे. विद्यार्थ्यांचे प्रगती-पुस्तक बदलणार शिक्षकांसोबतच विद्यार्थी देखील स्वतःचे मुल्यांकन करणार.
- सर्व महाविद्यालयासाठी एकच सामाजिक प्रवेश एनटीए ही परीक्षा घेणार मात्र ही परीक्षा ऐछिक असेल.

नव्या शैक्षणिक धोरणाच्या कक्षा खूप मोठ्या आहेत म्हणून विद्यार्थ्याचे भविष्य घडविणारे असे नवे शैक्षणिक धोरण आहे. या शिक्षण धोरणात तीन वर्षापासून ते पीएचडीपर्यंत विचार केला आहे. म्हणूनच हे धोरण सर्वसमावेश आहे. म्हणजेच सर्वांना शिक्षण व्यवस्थेत सामावून घेणे होय. हे धोरण सर्वस्पर्शी आहे शहरी व ग्रामीण भागाचा यात विचार केला आहे. तसेच भारत केंद्रित आहे. या शैक्षणिक धोरणाची प्रामाणिकपणे अंमलबजावणी झाली तर शेवटच्या स्तरापर्यंत अंमलबजावणी झाली तर भारत पुन्हा विश्वगुरूच्या पदापर्यंत पोहचेल. थोडक्यात या नवीन शैक्षणिक धोरणात संशोधनावर खूप भर

दिला आहे. त्यामुळे चांगली जीवनशैली प्रत्येकाला मिळेल यासाठी संशोधनाची कास धरावी लागेल याचा पूर्ण विचार या धोरणात केला आहे.

**भविष्यकालीन धोरण –** काही मोठ्या उच्चशिक्षण उच्च शिक्षण संस्था तशाच सुरु ठेवाव्यात आणि काही नवीन मोठ्या संस्था निर्माण कराव्यात मात्र सर्व नकोस. शिक्षणावरील सरकारी खर्च स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या किमान ८-१०% केला पाहिजे. कारण ६% हा आकडा १९६६ मधील आहे. वित्तीय स्थायत्तेचा आग्रह सोडून शैक्षणिक आणि प्रशासकीय स्वायत्तता द्यावी. भारत ग्रामीण विभाग असलेला देश असल्याने तेथील महाविद्यालये व संस्था बंद न करता विना अनुदानित व अनुदान द्यावे. आंतरशाखीय शिक्षण आणि संशोधनाचा सर्वव्यापी आग्रह न धरता निवडक करावे. त्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थी प्रवाहातून बाहेर न पडता शिक्षण भरती करता येईल. पटसंख्या वाढविण्यासाठी बहिस्थ आणि दूरशिक्षणावर अधिक अवलंबून न राहता पूरक म्हणून वापरावे. शिष्यवृत्ती, वसतिगृहे यांची आजची परिस्थिती खूप वाईट असून त्यांच्यात सुधारणा करावी. परकीय विद्यापीठे आणि संस्थांना देशात प्रवेश देतांना तो निवडक असावा कारण हे शिक्षण खूप महागडे आहे.

**सारांश –**

मेकॉलेचा लिपिकाची निर्मिती करणारा १८३५ चा आराखडा १०० टक्के अमलात आला होता. १९६८ आणि १९८६ च्या (सुधारित १९९२) शैक्षणिक आराखड्याच्या बाबतीत मिळालेले यश अर्धवट होते. भारतातील शिक्षण पद्धती व्यावसायिक व रोजगराभिमुख नसल्याकारणाने शिक्षण प्राप्त केलेल्या लोकांमध्ये सुद्धा कौशल्य विकासाचा अभाव आढळून आला आहे. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणातून कौशल्य विकास, बाजारातील श्रम मागणीनुसार शिक्षण देऊन मानवी साधन सामुग्रीचा शिक्षणाबरोबरच विकास करून आर्थिक विकासाला आवश्यक व उपयुक्त शिक्षणाचा स्वीकार भारतात केला जात आहे.

मानवी संसाधन विकास मंत्रालयाने २०१६ मध्ये नव्या शैक्षणिक धोरणाचा स्वीकार केला. त्यात आधुनिक जागतिक अर्थव्यवस्थेची आव्हाने पेलण्यासाठी कुशल व सक्षम मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन, नवप्रवर्तन, या विषयांना चालना देण्यासाठी तसेच संयुक्त राष्ट्रसंघटनेचे नवीन सहस्त्रकातील आव्हाने पेलण्यासाठी सक्षम नागरिक घडावा यासाठी नवे शैक्षणिक धोरण आखले. त्यामध्ये सर्वांसाठी शिक्षण हे उद्दिष्ट ठेवण्यात आले. धोरणातील प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राजकीय शक्ती त्या त्या वेळी कमी पडली. मोठमोठे प्रगत देश वगळता क्युबा, स्वीडन, नार्वे फिनलंड सारख्या आपल्या राज्याहून लहान लहान देशात सुद्धा जी.डी.पी.च्या ७ टक्क्याहून अधिक तरतूद शिक्षणाकरिता केली जाते. तशाच प्रकारच्या राजकीय इच्छाशक्तीचे प्रदर्शन यावेळी घडून आले आणि खरोखरच जी.डी.पी.च्या ६ टक्के आर्थिक तरतूद शिक्षणासाठी उपलब्ध झाली तर २०२० चे नवीन शिक्षण धोरण यशस्वी होऊ शकेल.

**संदर्भ**

१. राष्ट्रीय शिक्षण निती २०२० भारत सरकार
२. शर्मा विजेंद्र - नवउदारमतवादी धोरणाचा शिक्षणावरील परिणाम (जागतिकीकरण आणि भारत)
३. अट्रावलकर एस.एच. - व्यावसायिक अर्थशास्त्र - शेठ प्रकाशन मुंबई.
४. गोखले स.वा. व इतर - व्यावसायिक अर्थशास्त्र - विपुल प्रकाशन मुंबई.
५. बौद्धिक संपदा हक्क - स्वरूप आणि समस्या प्रशांत प्रकाशन, जळगाव
६. अर्थसंवाद - जाने - मार्च २०२० मराठी अर्थशास्त्र परिषद.
७. लोकप्रभा - जुलै २०२०
८. दै. पुढारी १४ ऑगस्ट २०२०
९. दै सामना - २६ ऑगस्ट २०२०.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत स्त्रियांच्या उच्च शिक्षणात येणाऱ्या वेगवेगळ्या समस्या व त्यांच्या पुढील आव्हाने

**डॉ. साहेब विरभद्रराव पडलवार,**
ज.जि.म.वि.प्र. सह. समाजाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,जळगाव.

**गोषवारा –**

जागतिकीकरण हा एक घटक आहे जो शिक्षण व्यवस्थेवर लक्षणीय परिणाम करतो. अलिकडच्या वर्षांत, जागतिकीकरण हा शब्द वैज्ञानिक अभिसरण आणि राजकीय कोशात दृढपणे प्रवेश केला आहे. जागतिकीकरणच्या संकल्पनेने अंतरनिर्भरता आणि आंतरराष्ट्रीयकरण सारख्या संकल्पनांची जागा घेतली आहेआणि आर्थिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय संबंधांच्या प्रणालीच्या विकासामध्ये गुणात्मकदृष्ट्या नवीन टप्पा दर्शविला आहे. नवीन प्रणालीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तिची आंतरराष्ट्रीयता. हे सर्वसाधारणपणे ओळखले जाते की जागतिकीकरण व्यापक आहे, मानवी क्रियाकलापांच्या सर्व पैलूंवर विस्तारित आहे आणि सामाजिक आणि वैयक्तिक जीवनाच्या सर्व क्षेत्रांना प्रभावित करते.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने संपूर्ण जगाला एक बाजारपेठ बनवून ठेवले आहे. उद्योग जगत आणि उच्चशिक्षण यांचा थेट संबंध प्रस्थापित झाला आहे.त्यामुळे शिक्षण क्षेत्राने उद्ययोगातील नोकऱ्यानुसार कौशल्य विकसित करण्यावर भर दिला आहे. तसे परिवर्तन शिक्षण व्यवस्थेमध्ये घडवून आणले आहेत. सद्यस्थितीमध्ये शुद्धशास्त्र व नैसर्गिकशास्त्राना म्हणावा तेवढा वाव उरला नाही. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उपयोजित शाखा व व्यवसायिक कौशल्य विकसित करणाऱ्या विषयांना मागणी मोठ्या प्रमाणात आहे. नवनवीन शोध व औद्योगिकरणाचा वाढता प्रभाव यामुळे सामाजिक शास्त्र, मानवी विद्याशाखांचे मूल्य कमी होताना दिसत आहे. १९९० च्या पूर्वीच्या दशकात स्त्रियांचा मानवी विद्याशाखा व सामाजिक शास्त्रांमध्ये प्रवेश घेण्याकडे कल होता पण १९९० नंतर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे हा कल बदललेला दिसून येत आहे. स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून स्त्रियांच्या शैक्षणिक पात्रतेकडे जर बघितल्यास त्यांचा उच्च शिक्षणात कमी सहभाग आहे. या शोधनिबंधाच्या माध्यमातून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत स्त्रियांच्या उच्च शिक्षणात येणाऱ्या वेगवेगळ्या समस्या व त्यांच्या पुढील आव्हाने या विषयी भाष्य करतो. भारतातील सांस्कृतिक आणि आर्थिकसामाजिक विषमतेच्या प्रभावामुळे उच्च शिक्षणाच्या नोंदी राज्यनिहाय वेगवेगळ्या आहेत. हा लघुशोधनिबंध स्त्रियांच्या शिक्षणाच्या पुढील आव्हाने व त्याच्याशी संबंधित कारणे शोधण्याशी संबंधित आहे भारतातील विविध राज्यातील सामाजिक आर्थिक सांस्कृतिक स्थितीचा प्रभाव महिलांच्या उच्च शिक्षणावर पडलेला आढळून येतो त्यामुळे स्त्रियांच्या उच्च शिक्षणाचे प्रमाण हे राज्यनिहाय वेगवेगळे दिसून येते. महिलांच्या उच्च शिक्षणातील टक्का वाढवायचा असेल तर महिलांच्या उच्च शिक्षणातील समास्यांना दूर करून त्यांना मुख्य प्रवाहात सामील करून घेणे गरजेचे आहे.

**प्रस्तावना –**

माहितीकरण प्रक्रियेमुळे मानवी संसाधन हे उद्योगांच्या स्पर्धात्मकतेचे नवीन मापदंड बनले आहे. वस्तू आणि सेवांची गुणवत्ता सुधारणे, त्यांचे विविधीकरण आणि घट यासारख्या निर्देशकांचा वाढता प्रभाव जीवनचक्र, स्पर्धात्मकता उद्योजकांना विकासाची रणनीती विकसित करण्यास भाग पाडते जी मूलभूतपणे नवीन तंत्रज्ञान, उत्पादन संस्थांचे प्रकार, व्यवस्थापन आणि प्रशिक्षण सादर करण्याच्या समस्यांचे अभिन्नपणे निराकरण करते. अशा प्रकारे शिक्षण आणि प्रशिक्षण हे उद्योगांच्या व्यावसायिक धोरणाचे कायमस्वरूपी घटक बनतात. वाढत्या जागतिकीकरणाच्या संदर्भात वाढती स्पर्धा व्यावसायिक मंडळांना शिक्षण प्रक्रियेत अधिक सक्रियपणे हस्तक्षेप करण्यास आणि त्यांच्या मागण्या शिक्षण व्यवस्थेसमोर मांडण्यास भाग पाडत आहे.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासूनच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने जागतिक व्यापारात, दळणवळणाच्या साधनात, शैक्षणिक उपक्रमात आणि आर्थिक संबंधात मोठ्या प्रमाणात बदल घडून आलेला आढळून येतो. उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता आता कुठल्याही देशाच्या सीमाचीं मर्यादा राहिली नाही. जागतिकीकरणाच्या युगात उच्चशिक्षणाकडे एक मोठी जागतिक व्यापारपेठ म्हणून बघितले जाऊ लागले आहे. नाट्यमयरित्या मध्यमवर्गीयांचा झालेला उदय आणि उच्चवर्गीयांकडे निर्माण झालेली संपत्ती याचा परिणाम असा झाला की या वर्गातील विद्यार्थ्यांचाविदेशी उच्चशिक्षण घेण्याकडे कल वाढू लागला आहे. तसेच वित्त आणि व्यापारामुळे सुद्धा जगभरातील देश एकत्र येऊ लागलेले दिसत आहेत. उद्योगजगत, कॉर्पोरेट वर्ल्ड आणि उच्च शिक्षण या तीन घटकात वैशिष्ट्यपूर्ण संबंध निर्माण झाले, त्यामुळे परिवर्तन असे झाले की नोकरीसाठी कौशल्याची आवश्यकता भासू लागली. परिणामी कला आणि शुद्ध शास्त्रे यांच्याकडे दुर्लक्ष होऊन व्यवहारिक विज्ञान आणि कौशल्य आधारित विषयांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढू लागला आहे. त्यातून मग नवनवीन कौशल्यावर आधारित शाखा निर्माण झाल्या जसे किमास मिडिया अँड कमुनिकेशन, फॅशन टेक्नॉलॉजी, मॅनेजमेंट, बायोटेक्नॉलॉजी, आर्किटेक्चर इत्यादी. नव्वदच्या दशकात सर्वसाधारणपणे महिला या कला, मानवविद्या, सामाजिकशास्त्रे यासारख्या शाखांमध्ये प्रवेश घेत असत आणि ते आजही काही प्रमाणात चालू आहे. तथापि ज्या शाखा ह्या फक्त पुरुषांसाठीच्या होत्या अशा शाखांमध्ये स्त्रिया शासकीय आणि खासगी संस्थेच्या माध्यमातून प्रवेश घेताना दिसत आहेत पण त्याचे प्रमाण मात्र कमी आहे. आपल्याला जर सामाजिक परिवर्तन आणि लिंगभाव समानता आणायची असेल तर प्रत्येक शाखेमध्ये स्त्रियांची संख्या कशी वाढेल याची जाणीव पूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. बहुतेक ठिकाणी आजही आपण बघतो की मुले ही सायन्स शाखेमध्ये प्रवेश घेतात तर मुली या कला शाखेत प्रवेश घेतात ही पुरुषी मानसिकता बदलणे गरजेचे आहे. समाजात संतुलन साधायचे असेल तर मात्र स्त्री पुरुष भेद न करता सर्वांना समान संधी दिली गेली पाहिजे.

**अभ्यासाचे गृहीतक –**

- देशाच्या विकासात स्त्रियांच्या उच्च शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.
- जागतिकीकरणाचा स्त्रियांच्या उच्च शिक्षणावर परिणाम घडून आलेला आहे.

**अभ्यासाचे उद्दिष्टे –**

- भारतीय स्त्रियांच्या उच्च शिक्षणाची सद्यस्थिती अभ्यासणे.
- भारतीय स्त्रियांच्या उच्च शिक्षण पद्धती वरील जागतिकीकरणाचा परिणाम अभ्यासणे
- भारतीय स्त्रियांच्या उच्च शिक्षण व्यवस्थेवरील समस्यांचा अभ्यास करणे

**शोधनिबंधाची अभ्यास पद्धती –** प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम माहितीवर आधारित आहे दुय्यम सामग्री मध्ये विविध वर्तमानपत्रातील लेख, मासिके, पुस्तके, इंटरनेट इत्यादीचा माहिती संकलित करण्याकरिता आधार घेतलेला आहे.

**जागतिकीकरणाची संकल्पना –** जागतिकीकरण म्हणजे आपल्या क्षेत्राच्या भौगोलिक क्षेत्र पलीकडे उत्पादन आणि वितरण याचा विकास आणि विस्तार होण्याची प्रक्रिया होय. या अंतर्गत भांडवल वस्तू उद्योजक व्यावसायिक व मनुष्यबळ यांचा जगभर मुक्त संचार घडून येतो. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेची जागतिक अर्थव्यवस्थेत परिवर्तन होण्याची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय. थोडक्यात आपल्या देशाच्या भौगोलिक मर्यादेच्या बाहेर आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करणे व ती टिकवण्याच्या प्रक्रियेला जागतिकीकरण म्हणता येईल. दुसऱ्या महायुद्धानंतर संगणकीय क्रांतीने झालेल्या अमर्याद उत्पादनामुळे ते उत्पादन जगात जिथे जास्त किंमत मिळेल त्या बाजारात विना अटकाव शिरता आला पाहिजे म्हणून, भांडवलशाही देशांनी आर्थिक व्यवस्थेचे नवी प्रतिमान आणले, ती खुली व्यापार व्यवस्था व जागतिक मुक्त व्यापार करार यातून सफल झाले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, मानसिक, तत्त्वज्ञानविषयक, धर्म भाषाविषयक, महिलाविषयक इत्यादी बरेच आयाम आहेत. या सर्व आयामाचा गाभा अनिर्बंध स्वातंत्र्याचा आहे. आजच्या जगात सर्वात प्रकर्षाने प्रकट होणारा आयाम म्हणजे शिक्षणाचे बाजारीकरण होय.

**उच्च शिक्षणातील महिलांची स्थिती –** १९९१ नंतर भारतीय समाजव्यवस्थेत अनेक बदल घडून येत आहेत. उच्च शिक्षणामध्ये आणि खाजगी संस्था, विदेशी संस्था आता प्रवेश करत आहेत, तसेच अनेक भारतीय विद्यार्थी शैक्षणिक कर्ज घेऊन विदेशी विद्यापीठातून उच्च शिक्षण घेत आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा प्रभाव थोडाफार का होईना महिलांच्या उच्च शिक्षणावरही पडू लागला आहे. महानगरांमधील स्त्री आता फॅशन डिझायनिंग सारख्या अभ्यासक्रमाला, संगणकशास्त्र, मानव संसाधन व्यवस्थापन या सारख्या शाखांमध्ये प्रवेश घेऊ लागल्या आहेत आहे. या लघुशोधनिबंधचा उद्देशच मुळात हा आहे की स्त्रियांची उच्च शिक्षणातील विविध शाखांमधील स्थितीचा शोध घेणे.

केवळ भारतीयच नव्हे तर जगात महिलांना शिक्षणाच्या, व्यवसायाच्या आणि त्या अनुषंगाने विकासाच्या संधी फार कमी प्रमाणात उपलब्ध होतात. पूर्वापार महिलांऐवजी पुरुषांना प्राधान्य मिळण्याची शक्यता सर्व ठिकाणी, सर्वकाळी दिसून येत असे आणि आजही त्याचे प्रमाण फारसे कमी झालेले नाही. भारतातील उच्चशिक्षण त्याला अपवाद कसे असेल?

२०१७-१८ मध्ये उच्च-शिक्षण घेणारे विद्यार्थी तीन कोटी ६६ लाख आहेत आणि त्यातील एक कोटी ७४ लाख, म्हणजेच ४७.६ टक्के मुली आहेत. २०११-१२ ते २०१७-१८ पर्यंतच्या सांख्यिकीचा आढावा घेतला तर ही संख्या एक कोटी ७४ लाखांपर्यंत पोहोचलेली दिसते. ही सहा वर्षांतली वाढ ३४ टक्के एवढी आहे. वाढीचे हे प्रमाण सुखवणारे आहे. १८-२३ या वयोगटाचा विचार केला, तर 'ग्रॉस एनरॉलमेंट रेशो' (जीआरई ) इतर विकसित देशांच्या मानाने खूपच कमी आहे. २०१६-१७ मधला २५.२ टक्के जीआई आता २०१७-१८ मध्ये २५.८ टक्के एवढाच वाढला आहे आणि २०२०पर्यंत तो ३० टक्के व्हावा, अशी अपेक्षा आहे. भारतात १८ ते २३ वयोगटातील केवळ २५ टक्के मुलीच उच्चशिक्षण घेत आहेत. मुलींचा ऋएठ २५.४ टक्के आहे, हे लक्षात घ्यावे लागेल.

आज एकूण ९०३ विद्यापीठांपैकी १५ विद्यापीठे ही 'महिला विद्यापीठे' आहेत (राजस्थान ४, तामिळनाडू २ व आंध्रप्रदेश, आसाम, दिल्ली, हरियाणा, कर्नाटक, महाराष्ट्र, ओडिसा, उत्तराखंड व पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये प्रत्येकी १). संख्या लहान असली तरी मुलींना केवळ मुलींच्या विद्यापीठात शिकण्याची संधी उपलब्ध आहे. महिला विद्यापीठांप्रमाणेच ११.४ टक्के महाविद्यालये ही 'महिला महाविद्यालये' आहेत. स्त्रियांच्या उच्चशिक्षणाशी निगडित असा एक मुद्दा म्हणजे ग्रामीण भागात बहुसंख्येने राहत असलेल्या स्त्रियांना महाविद्यालयांची उपलब्धता! ३५७ पैकी २०३ (४० टक्के) विद्यापीठे आणि ३९,०५० महाविद्यालयांपैकी ६० टक्के महाविद्यालये ग्रामीण भागात आहेत. अजूनही मुलींना फार दूरच्या ठिकाणी शिकण्यासाठी पाठवताना पालक सुरक्षेच्या कारणास्तव विचार करतात. अहवालानुसार भारतात सर्व शिक्षणसंस्थांमध्ये मिळून २३,१२१ मुलींची वसतिगृहे आहेत आणि त्यांची खपींरज्ञश क्षमता ३२ लाख ८१ हजार एवढी आहे. परंतु केवळ १९ लाख ४२ हजार विद्यार्थिनीच या वसतीगृहांचा लाभ घेताना दिसतात.

मुलींचे उच्चशिक्षणातील प्रमाण जरी वाढताना दिसले तरी त्या मुख्यतः 'आर्ट्स' आणि 'ह्युमॅनिटीज' या विषयातील पदवी अभ्यासक्रम पसंत करतात, असे असे चित्र दिसते. तीन कोटी ६६ लाख विद्यार्थ्यांपैकी ७९ टक्के विद्यार्थी हे पदवीचे शिक्षण घेतात. त्यापैकी बी.ए. चा अभ्यासक्रम स्वीकारणारे ९५ लाख म्हणजे सर्वाधिक विद्यार्थी आहेत आणि यांतील ५१ टक्के महिला आहेत. त्याखालील क्रमांकानुसार बी.कॉम अभ्यासक्रमात ४० लाख विद्यार्थी आहेत आणि त्यातील महिलांचे प्रमाण ४७.५ टक्के आहे. इंजिनिअरिंग अभ्यासक्रम ४० लाख विद्यार्थी करतात परंतु यातील महिलांचे प्रमाण अविश्वसनीय वाटावे एवढे कमी म्हणजे २८ टक्के आहे. अहवाल एक गोष्ट स्पस्टपणे नोंदवतो ती म्हणजे 'इन्स्टिट्यूट ऑफ नॅशनल इम्पॉर्टन्स' मध्ये स्त्रियांचे प्रमाण सर्वात कमी आहे. शैक्षणिक संस्थांमधील महिलांचे लाखांतील प्रमाणअसे का व्हावे?

आयआयटीसारख्या संस्थांमध्ये स्त्रियांचे प्रमाण १४ ते १६ टक्के करण्यासाठी मंत्रालयाला खास मोहीम राबवावी लागली. ७७९ जागा खास मुलींसाठी सर्व आयआयटींमध्ये निर्माण केल्या गेल्या. व्यवस्थापन अभ्यासक्रमात मात्र ३८ टक्के महिला दिसतात. वैद्यकीय अभ्यासक्रमात १०.९९ लाख एकूण विद्यार्थ्यांपैकी ६.७ लाख महिला विद्यार्थिनी आहेत.

वरील माहितीवरून महिला व्यावसायिक अभ्यासक्रमांकडे कमी प्रमाणात वळतात, असे दिसते. याला अनेक कारणे असू शकतात. उच्च शिक्षणाच्या

व्यावसायिक शिक्षणसंख्या या मोठ्या संख्येने खासगी संस्था आहेत. शासकीय आणि अनुदानित अशा दोन्ही प्रकारच्या संस्थांमध्ये १२ लाख मुली व्यावसायिक शिक्षण घेत आहेत, पण त्याच्या दुप्पट म्हणजे २४ लाख मुली खासगी संस्थांमध्ये व्यावसायिक शिक्षण घेत आहेत. व्यवसायिक शिक्षणाच्या सोयी फार कमी आहेत आणि आहेत त्या खासगी संस्थांनी सुरू केलेल्या असल्यामुळे अधिक खर्चिक असण्याची शक्यता! शिक्षणाच्या खर्चिक सुविधा मुलींपेक्षा मुलांना अधिक मिळवून देण्याची सामाजिक मानसिकता आजही आहेच. त्यामुळे व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण ३० टक्के देखील नाही.

**समानतेची धोरण** – भारतीय संविधानाने भेदभाव विरहित शिक्षणाची घटनात्मक सुरक्षा दिलेली आहे. दलित आदिवासी आणि महिलांना उच्चशिक्षणामध्ये संविधानात्मक संरक्षण दिलेले आहे. उच्च शिक्षणाकडे आर्थिक उन्नती, विज्ञानाचा विकास आणि समानतेचे साधन आणि विकासाची ऊर्ध्वगती प्राप्त करण्याचा मार्ग म्हणून बघितले जाते.समाजव्यवस्थेत सभोवताली असलेले दलित, आदिवासी, स्त्रिया, यांना सामाजिक न्याय प्राप्त करून देण्याचा एक मार्ग म्हणून उच्च शिक्षणाकडे बघितले जाते.हेस्वातंत्र्योत्तर शैक्षणिक धोरणात प्रतिबिंबित झाले होते.

१९९१ नंतर मात्र या स्थितीत नाट्यमय रीतीने बदल झालेले दिसून येते. राज्य उच्च शिक्षणाकडे तेवढ्या गंभीरतेने बघताना दिसून येत नाही. उच्च शिक्षणाचे खाजगीकरण करण्याकडे कल दिसून येतो. उच्च शिक्षणाची जबाबदारी शासन घेऊ इच्छित नाही. खाजगी विद्यापीठे निर्माण करण्याची परवानगी शासनाने दिलेली आहे. त्यामुळे उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात खाजगी संस्था येत आहेत. त्यामुळे जे मागासवर्ग, आदिवासी, दलित स्त्रिया उच्चशिक्षण शासनाच्या मदतीने घेऊ शकत होते, ती आता खाजगी विद्यापीठामुळे घेणे अशक्य झाले आहे. एक तर शिक्षण खूप महागडे झाले आहे. या खाजगी विद्यापीठांची शैक्षणिक शुल्क जास्त आहेत. भारताची लोकसंख्या आज १३५ करोडच्या आसपास आहे आणि उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या फक्त सहा टक्के आहे. त्याच तुलनेत अमेरिकेत ती ८८ टक्के आहे तर ब्रिटनमध्ये ती ५२ टक्के आहे. थायलंड सारख्या देशात त्यांची संख्या १९ टक्के आहे. तर इंडोनेशिया सारख्या देशांमध्ये ती अकरा टक्के एवढी आहे.

**उच्च शिक्षणामध्ये महिलांचे प्रमाण अधिक का हवे? –**

- उच्चशिक्षणामुळे स्त्रीला ज्ञानाची कवाडे खुली होतात. ती जगाकडे डोळसपणे पाहू शकते, पाहू लागते. अधिक अभ्यास करून नवीन ज्ञाननिर्मिती करण्याची उर्मी तिच्या मनात जागृत होऊ शकते. प्राथमिक, माध्यमिक शिक्षणापेक्षा उच्च शिक्षणानंतर नोकरी, स्वतःचा उद्योग सुरू करण्याची संधी अधिक असण्याची शक्यता वाढते. त्यामुळे अधिक आर्थिक संपन्नता येईल. अर्थात आर्थिक स्वातंत्र्य येण्यासाठी स्त्रीने स्वतः सजग, सभान व्हावे लागते. कुटुंबाची योग्य काळजी घेऊ शकेल, अशी मानसिकता व्यक्तिनिष्ठ असल्याने त्याचा शिक्षणाशी संबंध नसेलही; परंतु उच्चशिक्षणामधून सुजाणपण आलेले असते, यातूनच अधिक उत्तम प्रतीचे कौटुंबिक जीवन निर्माण होऊ शकते.
- बारावीनंतर तीन वर्षे उच्चशिक्षणासाठी दिल्यामुळे विवाहाचे वय वाढते आणि अर्थातच लहान वयात विवाह झाल्यामुळे येणाऱ्या अनपेक्षित कौटुंबिक जबाबदाऱ्या आपोआप दूर होतात.
- उच्च शिक्षण घेतलेली स्त्री अधिक चांगल्या पगाराच्या नोकरीची अपेक्षा करते आणि त्यामुळे लेबर मार्केटकडे वळत नाही.स्त्रीच्या शिक्षणाचा समाजाला होणारा एक महत्वाचा फायदा म्हणजे अर्भक मृत्यूमध्ये होणारी लक्षणीय घट. अशिक्षित महिलेच्या अर्भकांच्या मृत्यूची शक्यता ६५ टक्के तर उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रीसाठी हीच शक्यता २० टक्के असते. आरोग्यविषयक सोयी-सुविधांचा जाणीवपूर्वक लाभ घेण्याची महिलांची पात्रता वाढते.
- उच्च शिक्षण घेतलेली स्त्री अधिक चांगल्या पगाराच्या नोकरीची अपेक्षा करते आणि त्यामुळे लेबर मार्केटकडे वळत नाही.स्त्रीच्या शिक्षणाचा समाजाला होणारा एक महत्वाचा फायदा म्हणजे अर्भक मृत्यूमध्ये होणारी लक्षणीय घट. अशिक्षित महिलेच्या अर्भकांच्या मृत्यूची शक्यता ६५ टक्के तर उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रीसाठी हीच शक्यता २० टक्के असते. आरोग्यविषयक सोयी-सुविधांचा जाणीवपूर्वक लाभ घेण्याची महिलांची पात्रता वाढते.
- युनिसेफच्या मताप्रमाणे शिक्षण आणि आर्थिक सुबत्ता या दोन्ही घटकांमुळे मुलींचे विवाहाचे वय वाढलेले दिसते.
- स्त्रियांच्या उच्च शिक्षणातील सहभाग कसा वाढवता येईल?
- विद्यापीठांनी नवीन युगाला, चौथ्या औद्योगिक क्रांतीला टक्कर देण्यासाठी नवीन सुयोग्य अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत. मुलींना त्यांचे महत्व पटवून दिले पाहिजे. कारण नवीन अभ्यासक्रमांकडे साशंकतेने पाहण्याचा कुटुंबाचा दृष्टिकोन असतो.
- महाविद्यालयांमध्ये, विद्यापीठांमध्ये मुलींना सुरक्षितरीत्या राहण्याच्या योग्य सोयी असल्या पाहिजेत.
- सर्वच अभ्यासक्रमांमध्ये प्रत्यक्ष अनुभव घेण्याच्या संधींवर प्रामुख्याने भर हवा.
- स्त्रियांनी उच्च-शिक्षण घेण्यासाठी पुढे यावे, कुटुंबाने याकडे लक्ष पुरवावे, केवळ पदवी/ पदव्युत्तर पदवी घेण्यावरच भर न देता त्या ज्ञानाचा उपयोग स्वतःच्या, कुटुंबाच्या आणि पर्यायाने समाजाच्या विकासासाठी, उत्कर्षासाठी करावा हेच आजच्या युगातील सुखद स्वप्न ठरेल.

**जागतिकीकरणामुळे स्त्रियांच्या उच्च शिक्षणावरील परिणाम –** जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी भारताचे उच्च शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोण उदात्त होता तळागळातील समाजाचा विकास व्हावा ही उच्च शिक्षणाची भूमिका होती. उच्च शिक्षणविषयक आयोगाचे धोरणे असेच होते, नंतरच्या काळात कल्याणकारी भूमिकेला अपयश आले. दिवसेंदिवस ढासळत चाललेल्या भारतीय अर्थव्यवस्थेचे विकसित देशांना व जागतिक बँके सारख्या अर्थव्यवस्थांना आपली पाळंमुळं भारतात पसरवायला मुभा दिली. त्यातून उच्च शिक्षण क्षेत्रही सुटू शकले नाही. याचे गंभीर परिणाम आज शिक्षण क्षेत्रावर झालेले दिसून येत आहेत.

**उच्च शिक्षणाच्या मूळ उद्देश याकडे दुर्लक्ष** आपल्या देशाच्या घटनेने शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाकडे सोपवली आहे. सक्षम समाज उभारणी, ज्ञान, आर्थिक विकास ही या धोरणाची उद्दिष्टे होती. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे शाळा, महाविद्यालय या गोष्टीची व्याख्या बदलून सरकारी पर्यायी औपचारिक शिक्षण केंद्र अशी करू पाहत आहे. विद्यार्थ्यांना विचार करायला प्रवृत्त करणे त्यांच्यात संवेदना क्षमता निर्माण करणे आणि माणूसपण याचा विचार रुजवण्याचा प्रयत्न आजच्या शिक्षण व्यवस्थेत होताना दिसत नाही. तसेच त्यांच्यात कौशल्य वृद्धी व्हावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न

होताना दिसत नाहीत. प्रत्यक्ष हाताने काम करण्याचा अनुभूती शिवाय ज्ञानाची समज पक्की होणार नाही, परंतु हा विषय अभ्यासक्रमात नाही. विद्यार्थ्यांना संपूर्ण आकलनाऐवजी स्मरणशक्तीला महत्त्वाचे स्थान दिले आहे. यामध्ये त्यांच्या करणाची इतर अंगे, समग्रविचार तर्कसंगत विश्लेषण, परस्पर संबंध जोडणे त्यांना पूर्णपणे फाटा देण्यात आला आहे. प्रचलित परीक्षा पद्धतीने तर शिक्षणाच्या बाजारीकरणाच्या प्रक्रियेला आणखीनच बळकटी आणली आहे. मूल्यमापन पद्धती आधीच ठरलेली असल्यामुळे मुलांना काय शिकवले जाणार, काय प्रश्न विचारले जातील याचा साचा अगदी बालवाडीपासून ते अगदी उच्चशिक्षणा पर्यंत पक्का झाला आहे.बोर्डाच्या परीक्षाना असलेल्या महत्त्वामुळे कुठलीही शाळा शिक्षणात नवनवीन प्रयोग करण्याचे धाडस करत नाही.

**ज्ञान व समाधान यात तफावत** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उच्च शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे. यात बाजार व्यवस्था मजबूत करण्याचे साधन म्हणून विद्यार्थ्यांकडे पाहिले जाते. त्यावरून त्यांची किंमत ठरवली जाते. सुसंस्कृत मानवी समाज निर्माण व्हावा असा समग्र दृष्टीकोन नाकारला जात आहे. जागतिकीकरणाला आवश्यक तेवढेच उच्च शिक्षण महत्त्वाचे मानले जातेत्यामूळे समाजाच्या गरजा बाजूला सारल्या जातात आणि जागतिक बाजार व्यवस्थेत त्याला किंमत आहे अशाच उच्चशिक्षण अभ्यासक्रमाला व संशोधनाला आर्थिक मदत मिळू शकते. उच्च शिक्षणाच्या शाखा उपशाखा आणि कंपन्यासुद्धा ज्याना बाजार मूल्य नाही त्या टिकून राहणे अवघड आहे. उदाहरणार्थ मानवविद्या इतिहास समाजशास्त्र इत्यादी.

**सामाजिक सांस्कृतिक विविधता नष्ट झाली** जागतिकीकरणाला सामाजिक सांस्कृतिक विविधता सोयीची नाही. विविध ठिकाणी विविध प्रकारची राहणी, खाणेपिणे, सौंदर्य कल्पना असतील तर त्या त्या ठिकाणी स्थानिक पातळीवरच उत्पादन बाजारात असेल, ते सर्व नष्ट करून सर्वांनी एकाच प्रकारचे खाणे पिणे घ्यावं म्हणजे पैसा एकत्रितपणे ओढून घेता येतो, मात्र दुसऱ्या बाजूला धर्म, जाती, भाषा, लिंग या गोष्टी तश्याच राहाव्यात याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले आहे. विषमतेची उतरंड अबाधित राहणे बाजार व्यवस्थेला सोयीचे आहे. उदाहरणार्थ स्त्रियांच्या जाहिरातीतील वापर, इंग्रजीत ज्ञानाचा प्रसार, ठराविक आर्थिक गटांना मागास ठेवण्यास उपयोगी ठरतो.

**वंचितांना शिक्षणाच्या फायद्यापासून दूर ठेवणे** विविध सामाजिक कारणांमुळे विकासाच्या वाटेवर मागे राहिलेल्या सर्व मुला-मुलींना दर्जेदार उच्च शिक्षण मिळावे यासाठी अनेक योजना मांडल्या जाऊनही राजकीय इच्छाशक्तीच्या अभावी त्या प्रत्यक्षात येऊ शकल्या नाहीत. गेल्या ७५ वर्षात सरकारी शाळा, महाविद्यालयामध्ये संख्यात्मक वाढ झाली असली तरी दर्जा मात्र घसरला आहे. खाजगी महाविद्यालय वाढले, सरकारी महाविद्यालय बंद पडू लागले, खाजगी महाविद्यालय न परवडू शकणाऱ्या स्त्रिया ,मुलांसाठी काहीच पर्याय नाही. त्यामुळे जागतिक बँक व इतर वित्तीय संस्था यांना शिरकाव करायला संधी मिळाली. त्यामुळे कर्जाच्या मोबदल्यात उच्चशिक्षण खर्चात कपात करणाऱ्या अनेक योजनांचा आग्रह करण्यात येऊ लागला.

उच्च शिक्षणापासून दूर राहिलेल्या मुलीं, मुलांसाठी अनौपचारिक केंद्राचा पर्याय पुढे येऊ लागलेला आहे. त्यामुळे पंचतारांकित खाजगी महाविद्यालयापासून अगदी कमी पैशात सांगणाऱ्या सर्वसाधारण महाविद्यालयापर्यंत विषम आर्थिक गटांच्या विद्यार्थ्यांसाठी त्या-त्या दर्जाच्या महाविद्यालयांची अशी विषम व्यवस्था उभी राहिली आहे. समान अभ्यासक्रम समान परीक्षा असूनही उच्च शिक्षणातील दर्जा यात तफावत असल्यामुळे कमी आर्थिक गटातील मुलीं, मुलांसाठी तिथपर्यंत पोचणे देखील अशक्य झाले आहे. उच्च शिक्षणाचा पैसा इतरत्र वळविण्यात आल्या त्यामुळे उच्च शिक्षण व तंत्र शिक्षणाचे व्यापारीकरण झाले. त्यामुळे कनिष्ठ मध्यमवर्ग व वंचित गटातील लोकांना शिक्षणाच्या प्रक्रियेपासून दूर ठेवले गेले. उच्चवर्णीयांच्या हातात विज्ञानाचे फायदे व संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा कल भोगवादाकडे राहील.

**केंद्रीय सर्वोच्च संस्थांचे खच्चीकरण** केंद्र सरकारची नवीन शैक्षणिक धोरण फारच भयानक आहे. यूजीसी एआयसीटीई, आय एम सी एन सी, भारतातील सर्वोच्च केंद्रीय शिक्षण संस्था आज शिक्षणातील विविध क्षेत्रात महत्त्वाची भूमिका पार पडत आहे, वरील सर्व संस्थांच्या जागी एकच सर्वो च्च केंद्रीय संस्था म्हणून राष्ट्रीय उच्च शिक्षण व संशोधन आयोग करण्याचे धोरण अवलंबले जात आहे, हे धोरण फारच घाई गडबडीने व भविष्यातील परिणामांची चिंता न करता विचारशून्य पद्धतीने आखले आहे की, भविष्यात शिक्षणामध्ये या मूठभर लोकांची सत्ता राहील.

**परदेशी विद्यापीठांना भारतात मुक्त प्रवेश** २००५ सली भारताच्या संसदेने खाजगी विद्यापीठाचा कायदा मंजूर केला आणि भारतात विदेशी विद्यापीठांना प्रवेश करणे शक्य झाले. त्यामुळे विदेशी विद्यापीठांना फिरचना, प्रवेश प्रक्रिया करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य असेल. स्त्रिया,आदिवासी,मागासलेल्यांना कोणतेही आरक्षण नसेल. जर खाजगी व विदेशी विद्यापीठांना भारतीय शिक्षण क्षेत्रात मुक्त कार्यप्रणाली राबवायला मुभा दिली तर शिक्षण ही एक प्रकारची क्रम वस्तू बनवून विविध पदवी व पदविका प्रमाणपत्रना किंमतीचे लेबल लावावे लागेल. त्यामुळे शिक्षणाचे कंपनीकरण, व्यापारीकरण होऊन राष्ट्र उभारणीसाठी उच्च शिक्षणाचा उद्देश बाजूला पडेल. भारतामध्ये शिक्षण व्यवस्थेत येणाऱ्या या विदेशी विद्यापीठांना कोणीच हरकत घेऊ शकणार नाही. ही खाजगी व विदेशी विद्यापीठे भारतातील गर्भश्रीमंताना आपल्या पदव्या देतील त्यामुळे मोठ्या पगाराच्या नोकऱ्या श्रीमंतांनाच मिळतील. स्त्रिया, आदिवासी, मागासले, गरीब व मध्यमवर्गीय यापासून वंचित राहतील.

**निष्कर्ष –**

स्वातंत्र्यानंतर समाजाच्या विकासाला महत्त्व देणारी राष्ट्र उभारणीसाठी आवश्यक असणारी राष्ट्रप्रेमी पिढी निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारी शिक्षण पद्धती आपण स्वीकारली होती. स्वातंत्र्य भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना आझाद यांनी शिक्षण हे लोकशाही निधर्मी व राष्ट्रीय जडणघडणीसाठी लागणारे प्रभावी साधन आहे असे स्पष्ट केले होते, तर १९६४ चाली स्थापन झालेल्या कोठारी आयोगाने शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करताना म्हटले आहे की, देशाचे भविष्य शाळांच्या वर्गात ठरणार आहे. आपल्या शाळा आणि महाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येवर आणि गुणवत्तेवर देशाची जडणघडण सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावणे अवलंबून आहे. राष्ट्रीय आणि सामाजिक एकतेसाठी उच्च शिक्षण हाच उपाय आहे. देशात क्रांतिकारी शिक्षणाची गरज आहे. जे अतिशय महत्वाचा पण दुर्लक्षित अशा सामाजिक शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्याला गती देईल याच दिशेने शिक्षणाची दिशा सुरू होती. परंतु आता १९९० नंतर भारतात सुरू झालेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे गंभीर परिणाम प्रत्ययास येऊ लागले आहेत. या प्रक्रियेने शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे. शिक्षणही बाजारात विकाऊ वस्तू अगर सेवा झाली आहे. अंबानी, बिर्ला अहवालाने शिक्षणाच्या खाजगीकरणाच्या धोरणाचे समर्थन करून व गुणवत्ता हाच निकष ठरवून शैक्षणिक धोरणात आमूलाग्र बदल सुचवले आहेत. या धोरणाचे सर्वात मोठा फटका स्त्रिया,ग्रामीण भागातील तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल मागासवर्गीय विद्यार्थ्यांना बसणार आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेत खासगी ,सरकारी भागीदारीतून शिक्षण देण्याचे मॉडेल मांडले असून

त्यावर समाजाचा आणि सरकारचा काही ताबा असणार नाही. जनतेचा पैसा वापरून शिक्षणाचे खाजगीकरण, व्यापारीकरण करण्याचा डाव दिसतो आहे, महाराष्ट्र सरकारने २०११ मध्ये खाजगी विद्यापीठ विधेयक संमत करून परदेशी विद्यापीठांना महाराष्ट्रात प्रवेश करण्याची संधी दिली आहे. या विद्यापीठात राखीव जागा ठेवण्याची तरतूद नाही.फि आकारण्याचे कोणतेच नियंत्रण नाही. खाजगी महाविद्यालाचा प्रभाव वाढत असून सरकारी महाविद्यालायामधील विद्यार्थी संख्या कमी कमी होत आहे.

असे जरी असले तरी शासन विशेष करून केंद्र व राज्य शासनाने स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यासाठी काही पावले उचलली आहेत. स्त्रियांना बारावीपर्यंत मोफत शिक्षण, वारसदार म्हणून हक्क देणारा कायदा हळूहळू स्त्रियांच्या बाजूने होऊ लागला आहे. आत्ता सगळ्यात महत्वाचे म्हणजे, स्त्रियांनी आपल्या मुलांना किंवा मुलींना वाढवताना समानतेची वागणूक देऊन वाढविले पाहिजे. म्हणजे पुन्हा एकदा स्त्रियांनाच आपल्या मुला-मुलींना अधिक डोळसपणे व जागरूकतेने वाढविण्याची जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. आजपासूनच जर घराघरात मुला-मुलींच्या शिक्षणाला समान महत्त्व दिले, तर आज नाही परंतु पुढील दोन-तीन दशकांमध्ये आपल्या समाजामध्ये स्त्रीविरोधी भूमिकेचा जोर कमी झालेला दिसेल आणि कुटुंब व समाजामध्ये स्त्रिया आत्मविश्वासाने व निर्भीडपणे वावरताना दिसू लागतील. स्त्री शिक्षणाचे अनेक फायदे आहेत. शिक्षण प्राप्त करून स्त्रियांमध्ये आत्मविश्वास आणि आत्मसन्मान निर्माण होतो. या शिवाय महिलांना शिक्षित केल्यावर कुटुंबालात्याचे फायदे होतात. शिक्षीत महिला नोकरी करून आपल्या कुटुंबाला आर्थिक मदत करू शकते. शिकलेली स्त्री आपल्या मुलांना कधीही अशिक्षित राहू देणार नाही. लहानपणापासूनच ती आपल्या बाळामध्ये सद्गुणांचा संचार करेल. आज आपला भारत देश हा स्त्री शिक्षणात नित्य प्रगती करत आहे. भारताचा इतिहास अनेक शूरवीर महिलांनी भरलेला आहे. घरातील मुली चुलीपासून बाहेर निघून व्यवसाय, साहित्य, प्रशासन, पोलीस, सैन्य, खेळ इत्यादी क्षेत्रांमध्ये महिला पुढे आल्या आहेत.

**संदर्भ**


१.) nandkrishnan, M² (2004). Power Initiatives in higher education, SnehPrakashan andmity Foundation for learning, New Delhi, pp. 202-25.

२) Bal, (2004). Women scientists in India: Nowhere near the glass Ceilingin Economic and Political Weekly, August 7th, pp.3647-53.

३) Chanana, K (1988). Social change or social reform: the education ofwomen in Pre- independence India in K. Chanana (ed), Socialisation,Education and Women:Explorations in gender identity

४) Economic and Political Weekly (2007), Vol. XLII, No.7, February, 17-23..

५) University Grants Commission (2003). nnual Report 2002-03.University Grants Commission, New Delhi.

६) नीरज जैन, जागतिकीकरण की नवी गुलामगिरी, लोकायत प्रकाशन, २०१३, P.No.११-२७

७) कॉ. गोविंद पानसरे विवर्ण शिक्षणव्यवस्था, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, आंदोलन शाश्वत विकासासाठी, अंक जानेवारी-फेब्रुवारी २०१२

८) भाई वैद्य, संपूर्ण शिक्षण, समाजवादी अध्यापक सभा प्रबोधन प्रकाशन, ज्योती दीपावली विशेषांक, ऑक्टोबर २००७.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# अरविंद नारखेडे यांच्या साहित्यातील सामाजिक जीवनमुल्य आणि जाणीव

**डॉ. रेखा पाटील,**
सरदार वल्लभाई पटेल
कला व वाणिज्य महाविद्यालय, ऐनपुर

**डॉ. सिंधू भंगाळे,**
डी. एन. कॉलेज,फैजपुर

**श्री. संदीप मोतीराम पाटील,**
डी. एन. सी. व्ही. पी. शिरीष मधुकरराव चौधरी
कॉलेज, जळगाव

पुर्व खानदेश आणि खानदेश व विदर्भ यांच्या सिमावर्ती भागात लेवा पाटीदार समाजाचे वास्तव्य आहे. अल्पसंख्य असलेल्या या समाजात अनेक साहित्यीकांनी आपली साहित्यसेवा सरस्वतीच्या दरबारात रूजु केली आहे. जनमानसात आपला ठसा उमटविणारी थोर कवयित्री बहिणाबाई चौधरी, साहित्यातील ज्ञानपीठ हा सर्वोच्च पुरस्कार मिळवणारे पद्मश्री डॉ. भालचंद्र नेमाडे, प्राचीन व मध्ययुगीन साहित्याची समिक्षा व संशोधन करणारे वि. भि. कोलते ही साहित्यातील एवरेस्ट शिखरे जशी या समाजात निर्माण झाली तद्वतच शिखरे जशी या समाजात निर्माण झाली तद्वतच असंख्य साहित्यीक बेटं ही या समाजात निर्माण झालीत. यात के. नारखेडे, सोपानदेव दिवाकर चौधरी, गणेश चौधरी, भानु चौधरी, प्र. श्रा. चौधरी, श. रा. राणे, श्रीराम अत्तरदे, कुसुमताई चौधरी, रूक्मीणीबाई पाटील, शंकर नेमाडे, रामचंद्र चोपडे, कृष्णकुमार कोलते, रामचंद्र पाटील, पुरूषोत्तम नारखेडे, तु. बी. बेंडाळे, पद्ममावती जावळे, प्रमिला भिरूड, वि. भा. नेमाडे अशा अनेक लेवा पाटीदार साहित्यीकांनी खानदेश, विदर्भाची पृष्ठभूमी सुसंस्कृत केली आहे. अशा पैकी असाच एक साहित्यीक भादलीच्या महात्मा गांधी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्री. ए. के. नारखेडे होत.

लेखक हा लेखक असतो तो लहान किंवा मोठा नसतो या दृष्टिने नारखेडे सरांचे साहित्यीक मूल्यमापन करताना असे लक्षात येते की, नारखेडे सर हे हाडाचे शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवित असताना त्यांनी जे चिंतन केले त्याचेच उपफळ म्हणुन त्यांचे साहितय निर्माण झाले समाजात वावरत असताना डोळे उघडे ठेवुन, सजग मनाने वावरणाऱ्या सरांच्या लेखणीतुन प्रस्तुत साहितय रचवलेले आहे. सरांनी आजतागायत एकुण ९ पुस्तके प्रकाशि आहेत काही पुस्तके प्रकाशनांच्या मार्गावर आहेत.

''वृंदा वना विना'' अंगण सुन्ने हे छोटे खान्नी पुस्तक यात एक कथा नारखेडेंन्नी आगळ्या वेगळ्या पद्धतीने लिहीली आहे. कथेचे वौशिष्ट्य म्हणजे याच पुस्तकाच जशी प्रमाण मराठीत ही कथा लिहीलेली आहे तसेच लेवा पाटीदारी बोलीत ही ही कथा लिहीली आहे. लेवा समाजात काही वर्षापुर्वी स्त्री भ्रुणहत्येची लाटच आली होती, शिक्षित, अशिक्षित सर्वच मुलगा व्हावा म्हणुन प्रयत्नशील होते पहिला मुलगा व्हावा म्हणुन प्रयत्नशील होते. पहिला मुलगा असला तरी दुसरा ही मुलगाच हवा या आग्रहाचे काही लोक समाजात वावरत होते. किंबहुना मला दोन मुलेच आहेत, मुलगी नाही म्हणुन अभिमान बाळगणारे ही तथाकथील सुशिक्षित? समाजात होते. अशांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालण्याचे कार्य नारखेडेंच्या या कथेने केले आहे. वास्तवाला थेटपणे भिडणारी ही कथा ज्येष्ठ नागरीक संघाच्या माध्यमातून निर्माण झाली. कथेचा नायक दत्तुबुवा वय झाल्यान्ने अंथरूणावरच पडुन असतो त्याला दोन मुलेच असतात मुलांची शिक्षण करून दत्तुबुवाने त्यांना मार्गाला लावलेले असते त्यांची लग्नेही दत्तुबुवा करून देतो. मुलांच्या सुरवासीत जीवनामुळे त्यांची आई-वडिलांकडे आस्थेवाईकपणे पहाण्याची वृत्ती नाहीशी झालेली आहे. मुलं सुना, नातवंड असुन ही दत्तुबुवा व सोनाबाई हे जोडपं निराधारच आहे. मुलांच्या जन्मासाठी सोनाबाईने गर्भलिंग तपासुन दत्तुबुवाच्या आग्रहाने स्त्रीभृणहत्येचे पाप केलेल असते. म्हातारपणी दत्तुबुवा त्याचा पच्शाताप होतो. कारण सुना व मुले म्हाताऱ्या असहाय्य आई बापाला वागवायला तयार नसतात शेवटी थरथरत्या आवाजात आकाशाकडे पाहुन दत्तुबुवा जगात येवु न दिलेल्या गर्भातच खुडुन टाकलेल्या आपल्या लेकीला गर्भातच खुडुन टाकलेल्या आपल्या लेकीला म्हणतो, बेटी, मला क्षमा कर येथे कथा संपते कुटूंब व्यवस्थेतल्या अन्नेकपदरी विदारकतेचे प्रत्ययकारी चित्रण करण्यात नारखेडे सर कमालीचे यशस्वी झाले आहे.

''फिरस्ते फरिस्ते'' हे प्रवास वर्णन नारखेडेंनी फेब्रुवारी २०१६ मध्ये प्रकाशित केले या प्रवास वर्णनातून सरांची कल्पक, निसर्गात रमणारे, काव्यात्मक, भारतातील विविध प्रदेशांचा, संस्कृतींचा अनुभव घेणारे, संवाद- विरोध टीपणारे, चिंतनशिल, भावप्रधान, अनुभव समृद्ध व्यक्तीमत्व प्रकट होताना दिसते. शाळेतील सहअध्यापकांबरोबर सहकुटूंब ज्या सहली निघाल्या त्या अनुभवातून हे प्रवासवर्णन साकारले आहे. गोवा, दिल्ली, आग्रा, ऋषिकेश, हरीद्वार, पंजाब, चंदीगड, अमृतसर, जम्मु-काश्मीर, ओंकारेश्वर, खजुराहो, चित्रकुट, अहालाबाद, अयोध्या, पोखरा, काठमांडु, दार्जिलिंग, सिक्कीम, कलकत्ता, कोणार्क, जगनाथपुरी, ओरिसा, भिलई, हिराकुड, बडोदा, जुनागड, पोरबंदर, बेटद्वारका, जामनगर, मातृगया, मेहसाणा, अंबाजी, उदरयपुर, साबरमती, अहमदाबर, डाकोर ३० विविध ठिकाणी लेखकाने जो प्रवास केला त्याचे वर्णन खुमासदार शैलीत त्यांनी केले आहे. या प्रवासवर्णनात कोठे काय पाहिले, विविध प्रदेशातील लोकजीवन, त्यांचे रिती रिवाज तेथील लोकस्थिती, व्यापार, कला, कारखाने, उद्योगधंदे ३० ची स्थिती कशी आहे. इतिहास प्रसिद्ध स्थळे या गोंष्टीची इत्यंभुत माहिती मनोरंजक स्वरूपात नारखेडेंनी दिली आहे. सोबतीला असलेल्या सहप्रवाशांच्या लकबी सांगण्यासही सर विसरले नाही.

हे प्रवासवर्णन लिहीताना पर्यटन स्थळाचा इतिहास देवुन गतकाळाचे स्मरण व आजच्या स्थितीचे दर्शन त्यांनी घडवले आहे. वाचकांना प्रत्यक्ष त्या स्थळी घेवुन जाण्याची किमया नारखेडेंच्या लेखणीत दिसते ही स्थलवर्णने वाचतांना सत्यपुर्ण कात्येच वाचल्याचा भास वाचकांना होतो.

''खानदेशी खुडा'' आणि ''खमंग नाट्यघरा'' ही दोन पुस्तके लिहुन नाट्यघरा हा नामशेष होत असलेल्या साहित्य प्रकाराला संजिवनी देण्याचे काम नारखेडेंनी केले आहे. या नाट्यघरा डॉ. प्र. श्रा. चौधरींनी समर्पक प्रस्तावना आहे. त्यात ते म्हणतात एक संघ परिणाम गाठणे वाचक व श्रोत्यांत उत्कठंता निर्माण करणे ही तारेवरची कसरत असते. श्री. अरविंद नारखेडे यांनी तारेवरची कसरत यशस्वीपणे केली आहे. वारखेडेंच्या नाट्यछटांची शीषर्क मोठी समर्पक असुन त्यांच्या नाट्यघरा प्रारंभ मनावर जितका पगडा बसवतो तितकाच तिची मोहिनी मनावर दिर्घकाळ पगडा बसविते.

''खानदेशी खुडा'' हा लेवा पाटीदारी गणबोलीतील नाट्यघरा संग्रह यात एकुण १२ नाट्यघरा आहेत. या नाट्यघटांतून लेवा समाजातील विविध

चालीरितीवर व गणबोलीवर प्रकार टाकलेला आहे. इट्टला या नाट्यघरेत वारीला जावुन आले की विहीन कपडे आणते तो प्रसंग चित्रीन केला आहे दोन सुना असल्या तर सासु दोन्ही सुनांच्या माहेराहुन आलेल्या कपड्यांची तुलना करते याचे चपखल वर्णन लेवा पाटीदारी बोलीतुन केले आहे लेवा समाजात लग्नप्रसंगी बहुधा वरण पोळीचा मेनु असतो या पंगतीचे प्रकटचितन लेखकाने केले आहे विनोद विसंगती उपरोध याचा उपयोग करून समाजातील वृत्ती प्रवृतींचा वेध घेतला आहे. भौ आपन गहयरे नसिबवान या नाट्यछळेतून लेवा समाजात जन्मल्याचा अभिमान लेखकाने प्रकट केला आहे. बहिणाबाई चौधरी, भोरगाव लेवा पंचायतीचा निरपेक्ष न्याय निवडा,साप्ताहिक लोकदर्पण आणि समाजातील पूर्वसुरींनी तापी पुर्णा खो-यात वस्ती करून दाखलेला मुत्सदीपणा यामुळे लेखक या समाजात जन्म घेतल्याने नशिबवान आहे असे समजतो.

खमंग नाट्यछटा हा २४ नाट्यछटांचा संग्रह असुन तो प्रमाण मराठी भाषेत लिहिलेला आहे. सभोवतालच्या जगाकडे डोळस दृष्टिने पाहिले तर निसर्गसौंदर्या बरोबरच मानवी सौंदर्यनेही अनेक रमणीय गोष्टी मन वेधुन घेतांना दिसतात सरांनी अशा अनेक गोष्टी रसिक वाचक श्रोत्यांना या नाट्यछटांतुन दिल्या आहेत शिक्षणाचा दर्जा खालावयाय ही संग्रहातील पहिलीच नाट्यछटा शिक्षणासारख्या गंभीर विषयावर भाष्य करून जाते, सिव्हिकसेन्स मधुन नारखेडेंची विनोदबुध्दी प्रकट झाली आहे भारतीय लोकांत एकुणच सिव्हिक सेन्स कमी आहे. दुसऱ्याला स्वार्थासाठी ताटकळत ठेवणे हा बहुतेक लोक आपला अधिकारच मानतात स्वच्छता, स्त्री दाक्षिण्य यांची नारखेडेंनी योग्य ती चिरफाड केली आहे. मी लीगल मुख्याध्यापक मधुन पुस्तके शैक्षणिक पुस्तके कशी लिहीली जातात व लेखक म्हणुन समाजात कसे मिरवले जाते हे लेखकाने अचुकपण समर्पक शब्दांत व्यक्त केले आहे. मजकुरात शब्दांची अदला-बदल करून, परिच्छेद खालीवर करून, प्रकरण मागे पुढे करून या सर्वांना थोडा मीठ मसाला लावुन काही लेखक पुस्तके लिहीतात त्यावर उपहासात्मक टीका केली आहे मला कार्याध्यक्ष करा रे! या नाट्यछटेतून, मानवी स्वभावदर्शन मनोज्ञ झाल्यचे जाणवते काहींना विविध संस्थावर कार्याध्यक्ष होण्याची मोठी हौस असते. या नाट्यछटेतही अशांची खिल्ली उडवली आहे. शिक्षण संस्थांचे कार्याध्यक्ष, पतपेढीचे कार्याध्यक्ष यांच्या कार्यात केवळ सत्कार, भोजन देणे, संस्थांच्या स्मरणिका काढणे आणि ओळखीच्या माणसांना कामे देणे ही कामे कार्याध्यक्ष करतात हे मार्मिकतेने त्यांनी सांगितले आहे चमचा या नाट्यछटेतुन व्यक्त झालेले स्वभाव दर्शन ही मनोज्ञ आहे. प्रसंग पाय व संभाषण यांचे नमुनेदार रसायन नारखेडेंच्या नाट्य छटांतुन जाणवते या नाट्यछटांत प्रसंगातील एखादी छोटी घटना नाट्यात्मक रित्या रंगविली आहे. वेचक प्रसंग व घटना यांच्या संमिश्राणातुन मानवी समाजातील कंगोरे दाखविण्यात लेखक यशस्वी झाला आहे. त्यांच्या नाट्यछटांच्या पगडा आरंभापासुन शेवटपर्यंत मनावर दिर्घकाळ परिणाम करतो.

तपस्वी श्री क्षेत्र कुंडलेश्वराचा हे वै. ह. भ. प. झेंडुजी महाराज बेळीकर या अध्यात्मिक क्षेत्रातल्या एका आगळ्या वेगळ्या व्यक्तीचे चरित्र नारखेडेंनी लिहीले आहे. नारखेडेंना चरित्रविषय बनलेल्या व्यक्ती बद्दल आदराची आणि आपुलकीची भावना असल्याने हे चरित्र चांगले वठले आहे. संताची चरित्रे बहूधा चमत्कृतीपुर्ण असतात पण या चरित्रात १/२ अपवाद वगळता चमत्कार टाळलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या लेखणीतुन उतरलेले हे चरित्र वाचकांना बेळीकरांची खरीखरी ओळख करून देते.

चरित्राच्या सुरूवातीला लेखकाने कुठलेश्वराचे स्थान महात्म्य ज्ञानेश्वरीतील १६३ ते १८६ क्रमांकाच्या ओत्यांतुन सांगितले आहे. झेंडुजी महाराज बेळीकर हे खानदेश वारकरी संप्रदायाच्या परंपरेचे पहिले मठाधिपती झेंडुजी महाराजांचे सांडुबुवांनी केलेल मतपरिवर्तन लेखकाने कसदार पध्दतीने रंगविले आहे काशियात्रेला जात असतांना भेटलेल्या तेजपुज संन्याशाने बदलवलेली त्यांची वाट पंढरपुरच्या दिशेने वळते तेथुन ते पंढरपुरला येतात. तेथे विठाप्पा वासकरांनी त्यांना दिलेला अनुग्रह पंढरपूरहून आल्यावर अखंड हरीनाम सप्ताहाची सुरूवात, आषाढी- कार्तीकीला पायी दिंडी वारी नेण्याचा संकल्प, याचे सुंदर वर्णन लेखकाने केले आहे. महाराजांनी बालकांना लावलेले वळण हे आधुनिक मानसशास्त्राचे द्योतक वाटते. बालगोपाळात त्यांच्या प्रमाणे नाचून, त्यांच्यात मिसळून त्यांना लावलेले वळण व पूढे याच मुलांतून संप्रदायासाठी अनुयाथांची प्राप्ती होते. आदिशक्ती मुक्ताईच्या वारीतील तरूणाने वारीतील लोकांना दिलेल्या भोजनाचा प्रसंग मानवतेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. तसेच मुस्लिम धर्मियांची केलेली सेवाश्रुषा केल्याने मुस्लिम बादशाहाने पैठणच्या जागेचे बक्षिसपत्र महाराजांच्या हवाली करण्याचा प्रसंग या चरित्राला एका वेगळ्या उंचीवर नेऊन सोडते पैठण व पंढरपुर येथील जागांवर खानदेश वाड्यांची स्थापना करून जागेविषयी घटनाही त्यांची लिहुन ठेवली आहे. या घटनेत सदर जागा लेवा समाजातील भाविकांसाठी उपयोगात आणण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. समाजाप्रती महाराजांना असलेला आदरभाव या घटनेतुन लेखकाला ठसवायाचा आहे.

झेंडुजी महाराजांच्या अंतरगांचे उत्कृष्ट दर्शन लेखकाने घडवविले आहे. एखाद्या कुशल चित्रकाराप्रमाणे बारीक सारीक गोष्टी ध्यानात घेवुन नारखेडेंनी झेंडुजी महाराजांचे चरित्र उठावदार आणि आकर्षक पध्दतीने रेखाटले आहे. यासाठी त्यांनी महाराजांची भरपुर माहिती गोळा केली या चरित्रात सत्य आणि सौंदर्य याचा सुरेख संगम होण्यासाठी लेखकाने विविध घटना, नाना प्रसंग आणि अनेक व्यक्ती व त्यांच्या कृति यांचा एकजीव केलेला आहे. अध्यात्मिक क्षेत्रातली व्यक्ती प्रत्यक्ष कृतीशिल राहुन जनकल्याणासाठी आणि आपल्या पंथासाठी काय करू शकते हे या चरित्रावरून दिसते.

सातगोष्टी आणि खुदु खुदु हे दोन कथा संग्रह लिहुन नारखेडेंनी कथा हा साहित्य प्रकारही मोठ्या ताकदीन हाताळला आहे. साने गुरूजी कथा मालेशी ते निगडीत असल्याने संपुर्ण जिल्ह्यात असंख्य कथाकथनाचे कार्यक्रम गाजावाजा न करता उत्कृष्टपणे पार पाडले आहेत इतरांच्या कथा सांगत असतांनाच ते स्वरचीत कथाही सांगु लागले त्यातुनच मग सातगोष्टी हा संस्कारक्षम असा कथा संग्रह साकारला खुदु खुदु हा निखळ विनोदी कथा संग्रह नारखेडेंनी समाजातील त्यंत आणि दंभ शोधुन समाजसुधारणेचा वसा घेतल्याचे हा संग्रह वाचल्यावर लक्षात येते या कथा लेखकाने उगीच पाल्हाळ न लावत चटकदार शब्दांत एखाद्या कुशल नाटकाराप्रमाणे थोडी पात्रे व प्रसंगाच्या सहाय्याने लिहिल्या आहेत.

सातगोष्टी या कथा संग्रहात एकुण सात संस्कारक्षम कथा आहेत. सशाचे कान लांब का? या कथेत दूरदर्शन आणि किक्रेट या दोन गोष्टी विद्यार्थ्यांचा अनमोल केळ कसा कथा घालवतात हे ठसविले आहे. कासव व ससा या कथेचाचपरवल उपयोग येथे करून घेतला आहे. कासवाने शर्यंत जिंकुन सशाचे कान ओढले म्हणुन सशाचे कान लांब झाले असे लेखकाने म्हटले आहे. वाचवायचे कुणाला या कथेत कारखानदार, मंत्री, बागायतदार व शेतकरी या चार पैकी मानवतावादी शेतकऱ्याला शेवटच्या क्षणी आधार देवुन वाचवले जाते अशा आशयाची ही कथा पर्यावरण संरक्षणाचे मूल्य रूजवण्यास निश्चित सहाय्यभुत होणार आहे. निवडकुणाची कथेत राज्याचा वारस कुणाला नेमायचे या संदर्भात मूल्यवान ताट, द्रव, वनस्पती व खडा आणणाऱ्यास वारस नेमण्याचे ठरविले जाते. धनराज सोन्याच्या ताटात, पारा, चंदन, हिरा आणतो तर भोजराज काशाच्या थाळीत पाणी, कडुनिंब, मीठाचा खडा आणतो.

भोजराजने उपयुक्त वस्तु आणल्याने त्याची निवड निधी असते पण लेखकाने ही निवड वाचकांवर सोपविली आहे.

खुदुखुदु हा विनोदी कथा संग्रह असुन मनातील दुःख आणि खिनता विसरायला लावणाऱ्या या कथा मनोरंना बरोबरच समाजातील व्यंगावर ही घणाघात करतात विनोदी कथा लिहीणाऱ्यास उज्वल प्रतिभेची आवश्यकता असते. अशी प्रतिभा नारखेडेंना लाभली असल्याचे खुदुखुदुची भट्टी चांगलीच जमलेली आहे. त्या जोवतीने रूढी, संस्था व व्यक्ती यांचे हसत हसत दोष दर्शन करणे हा नारखेडेंच्या विनोदी कथांचा विशेष सांगता येईल. लाकुडतोड्या या युगातला ही निवळ विनोदी कथा असुन लाकुडतोड्या कथेला एक वेगळे वळण यात दिले आहे. स्पंजथोर कथेत एस टीच्या सिटमधील स्पंज चोरांच्या मुळे होणाऱ्या गंमती जमती लेखकाने सादर केल्या आहेत. हेडमास्तरने घेतला फास या कथेतुन संस्थात्मक राजकारणाची शल्यचिकित्सा विनोदाचा आधार घेवुन केली आहे शाळेसमोरील गर्दी पाहुन एक चौकस प्रवासी त्याबऐल चौकशी करतो तेव्हा त्यास हेडमास्तराने फास घेतला हे कळते पण गाडी निघाल्याने चौकस प्रवासी हेडमास्तराने फास का घेतला याबद्दल तऱ्हे तऱ्हेचे विचार करतो. जमाखर्चात कारकुनाने हेडमास्तरला अडकवले असेल संस्थाचालकाने शाळेचा पैसा खर्च करून हेडमास्तरवर आळ आणला असेत, स्टाफशी खटकले असेल, पत्नीशी खटका उडाला असेल, ३० अनेक विचार त्या प्रवाश्याच्या मनात येतात शेवटी उलगडा होतो की हेडमास्तराने शाळेच्या कुंपणासाठी काट्यांचा फास घेतलेला असतो. फास या शब्दाच्या दृयर्थी योजने मुळे मोठी गंमत निर्माण झाली आहे. विनोद हे वाङ्याचे महत्वाचे अंग असुन त्याचा योग्य प्रकारे उपयोग केला तर समाजमन स्वस्थ ठेवण्यासाठी चांगला फायदा होऊ शकतो हे नारखेडेंच्या विनोदी कथांतून जाणवते. या कथांतून लोकांन सद्भिरूची उत्पत्ती करून समाजातले दोष सहानुतीपुर्वक मांडुन ते नाहिसे करण्याचे कार्य या कथांनी केले आहे.

खराटा हा काव्यसंग्रह लिहुन डॉ. अरविंद नारखेडे यांनी मराठी काव्याच्याक्षेत्रात ही आपला झेंडा रोवला आहे. या संग्रहात एकुण ७१ कविता असुन ७२ वी कविता ही झेरॉक्स करून चिकटवलेली आहे, ती बायको नावाची या काव्यसंग्रहात निसर्ग कविता, सामाजिक काव्य, प्रेमकविता, व्यक्तीविशेषपर काव्ये, कृषिवल गिते, भारूडे, भजने ३० अनेक काव्यप्रकार नारखेडेंनी हाताळते आहे. पण कवीची लेखणी रंगली आहे. समाजप्रबोधनात्मक काव्यात काव्यसंग्रहाच्या सुरूवातीलाच कवी म्हणतो, हाती घेतलेला खराटा साफसफाई करतो आणि उलटा धरलेला खराटा हे त्यांनी दिलेले शिर्षकही मोठे मार्मिक आहे.त्सुनामी या कवितेतून नाटकांना वळणीवर आणण्यासाठी त्सूनामी कशी सहाय्यभुत होते ते सांगितले आहे तशा सूनामा या कवितेत आजच्या सूनांना पाहून त्यांची लेखणी लिहिते,

घरी येता सासू सासरे,
भाळी जाळी किती पसरे,
नाराजीचा सुरही भरे,
स्वगृही परके केले कोणी !!

हे राजहंसा या कवितेत राजकारण्यांवर आसुड ओढतांना ते म्हणतात,

हे राजहंसा हे सहकार सरोवरातील राजहंसा !
शुभ्रपंरवी सवंगडी सोबत घेवुन मनसोबत विहार कर !
तृषाशमनार्थ चुपचाप चंचु चंचु जलप्राशन कर !-

जर बोंबा बोंब केलीच कुणी तर ठणकावुन सांग त्याला तळे राखील तो पाणी चाखील विना अपहार नरी उध्दार व्यक्ती विशेषपर कवितांत बालकवी, महात्मा फुले, आचार्य अत्रे नसते तर, डॉ. सुभाषराव पाटील, दगडु विठोबा पाटील, विठ्ठल कामजी चौधरी, ना. मो. बढेसर, डायरी तुकाराम भोळेंची, मालतीकांत, स. सो. सुतार, एसेन चौधरी नारखेडे यांचा समावेश आहे. त्यांना हायकु हा जपानी काव्य प्रकार ही हाताळता आहे. मराठी काव्यदालन अनेक अनेक ज्येष्ठ श्रेष्ठ कविनी सजवले आहे त्याला भोडा हातभार नारखेडेंचा ही लाभला आहे मनुष्याला अंतःकरण सदवृत्ती व सद्भावना जागृत करणारी त्यांची कविता आहे.

कुचुंम्रा हा लेवागण बोलीची लज्जत कळावी या उद्देशाने हे पुस्तक नारखेडे सरांनी लिहिले आहे. लेवा समाजात जेवणात तोंडी लावतांना कुचुंम्रा वाढतात. यात थोड्या थोड्या सर्वच भाज्यांचा समावेश असतो. मुळ्याची पाने, मेथीची पाने, पालकाची पाने, कांदा लुसुणीची पात काकडी अशा सर्व भाज्या कापून एकत्र करून त्यावर कोथिंबीर, मीठ, लिंबु व हिरवी मिरची घालुन हा पौष्टिक पदार्थ तयार करतात या संग्रहातही नाट्यछटा, कविता, स्फुट लेख, कथा ३० साहित्य प्रकार एकत्र करून कुसुंम्रा साकारला आहे. खानदेश गीतात नारखेडे आपल्या लेवा गणबोलीचा अभिमान बाळगुन म्हणतात.

बोली अहिरानी, गनबोली लेवा !
किती याले गोडी, न्यारा रानमेवा

लेवा समाजातील सर्व सामान्यांना परवडणारा मेनुचे वर्णन करतांना ते म्हणतात

कळण्याची भाकर, मिरचीचा खुडा!
भरीत वांग्यापायी, जीव व्हतो येडा

या लेखसंग्रहातुन लेवा पाटीदारी बोलीचे सहज सौदर्य जसे लक्षात येते तसेच लेवा गणबोलीतील शब्द व वाक्यप्रचार उलगडणाऱ्या घटना ही लक्षात येतात या संग्रहात केवळ लेवा समाजात वापरले गेलेले अनेक अर्थपुर्ण शब्द आहेत. आसोदा, भादलीच्या भूसांस्कृतिक प्रदेशातील संस्कृती या कुचुंम्रात अविष्कृत होते. अनुभव ज्या भूसांस्कृतिक प्रदेशातुन तो त्याच भाषेतून आला तर अधिकर परिणामकारक होतो. कुचुंम्रा याला अपवाद नाही. लेवा समाजाला परिपुष्ट करण्याचे कार्य कुचुंम्राने केले आहे.

नारखेडेंच्या समग्र साहित्याचा अतिशय ओरक आढावा या लेखात घेतला आहे. वास्तविक हे साहित्य M Phil /Ph D चा अभ्यास विषय होऊ शकता. पण ज्या लेखकावर भरपूर लिखाण झालेले आहे. असच साहित्यक अभयाला विद्यार्थी घेतात कारण लिहिणे सोपे होते. नारखेडेंच्या साहित्यावर अन्यांचा प्रभाव असला तरी त्या बरोबरच साने गुरूजींचाही प्रभाव दितसे अन्यांची घणाघाती शैली व गुरूजींची शांत शैली यांचा मधुर संगम त्यांच्या

साहित्यात झाला आहे. समाजातील दांभिकता आणि भंकपणा यावर कुठारा घात जसा त्यांच्या लेखणीने केली आहे. तसाच समाजाला उनत करण्यासाठीचे प्रबोधन ही त्यांच्या साहित्यात आहे. नारखेडे सर एक साहित्यिक तर आहेत ते समाजसेवक ही आहेत. म्हणूनच अनेक सस्थांनी त्यांना गौरविले आहे. २००७ मध्ये लेवागणबोली साहित्य रत्न पुरस्कार देवुन त्यांना गौरविले आहे. १९९६ मध्ये जळगांव जिल्हा शिक्षक पुरस्कार देवुन त्यांचा गौरव झाला आहे. २००० मध्ये महाराष्ट्र शासनाचा महाराष्ट्र राज्य शिक्षक पुरस्कार त्यांना मिळाला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळावर सदस्य म्हणुन त्यांचे कार्य महत्वाचे आहे. दैनिक जनशक्तीतून सतत तीन वर्षे त्यांनी मराठी विषयाची एस.एस.सी लेखन माला चालविली आहे. माझ्या सारख्या असंख्य विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य त्यांच्या हातून झाले आहे.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# गौरी देशपांडे यांच्या कथेमधील अभिव्यक्ती शैली

**प्रा. रिना भाऊराव पवार**
मराठी विभाग
ज. जि. म. वि. प्र. सह संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव

**प्रस्तावना –**

प्रस्तुत शोधनिबंधात कथा या मराठी वाङमयातील मराठी कथांनी मराठी साहित्याला व भाषेला सर्वस्वी नवी दिशा मिळाली. मराठी वाङमयातील इतर वाङमय प्रकारांबरोबरच 'मराठी कथा' या वाङमय प्रकारामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून आलेले दिसते. कथा हा कथात्मक साहित्याच्या प्रदीर्घ परंपरेशी अतूट जोडला गेलेला वाङमय प्रकार आहे. आपण जेव्हा वाङमय प्रकाराच्या अंगाने साहित्याचे वर्गीकरण करतो, तेव्हा दोन पातळ्या संभवतात. एक मूलभूत भेदाची आणि दुसरी उपभेदांची असे म्हणता येईल. ज्याला आपण स्वतंत्र वाङमय प्रकार म्हणतो तो या दोन्ही पातळीपैकी एक पातळी म्हणजे कविता, कथात्मक साहित्य आणि नाटक असे साहित्याचे तीन मुख्य भेद करता येतात. कथात्मक साहित्याचे उपभेद महाकाव्य, अरेबियन नाइट्ससारख्या शृंखला कथा, कादंबरी, दीर्घकथा, लघुकथा असे मानले जातात. रूपदृष्ट्या हे उपप्रकार एकमेकांपासून वेगळे साहित्यप्रकार ठरत असले तरी कथात्मक, नाट्यात्मक या मूलभूत वैशिष्ट्यांनी ते एकमेकांशी जोडले जातात, म्हणून कथा हा वाङमय प्रकार काव्य किंवा नाटक यांच्यापासून जेवढा वेगळा तेवढा तो महाकाव्य, कादंबरी यापासून वेगळा किंवा स्वतंत्र करता येत नाही.

कथात्मक साहित्यात निवेदक घटनांचे कथन करीत असतो. या घटना घडून गेलेल्या असतात. कथात्मक साहित्यातील घटना घडून गेलेल्या म्हणजे भूतकाळातील असतात. निवेदन करणारा घडून गेलेल्या घटना आपल्या हेतूनेपुनर्संघटीत करून सांगत असतो. त्यातून कथानक उभे राहत जाते. या कथानकात घटना, व्यक्तिरेखा आणि निवेदकाचा हेतू यांच्यातून कथेला अस्तित्व प्राप्त होते. कथात्मक साहित्यात लेखक कल्पित वास्तवाची निर्मिती करीत असतो. या कल्पित वास्तवात स्थल-कालबद्ध वातावरणात पात्रे घटना घडवित असतात. हे कल्पित वास्तव प्रत्यक्ष वास्तवांशी संबंधित असतेच असे नाही. लेखकाची जीवनदृष्टी, त्याचा अनुभव यातून कल्पित वास्तव निर्माण होत असते. या कल्पित विश्वातील घटना मालिकेतून कथानक आकार घेत असते. कथात्मक साहित्यकृतीची संहिता निवेदनाच्या माध्यमातून घडत असते.

**उद्देश –**

१) कथा म्हणजे काय? हे थोडक्यात सांगणे.
२) गौरी देशपांडे यांच्या कथेतील शैली पाहणे.
३) कावळा-चिमणी रूपकातून स्त्री-पुरुष तुलना कशी करण्यात आलीते पाहणे.

**व्याख्या –**

१) ''एका विशिष्ट स्थलकाली पात्रांच्या परस्पर संबंधातून घडलेल्या घटनांचे एका दृष्टिकोनातून केलेले चित्रण म्हणजे लघुकथा होय.''[१]
२) **इंदुमती शेवडे यांच्या मते,** ''एकात्म अशा कथात्म अनुभवाची अर्थपूर्ण संघटना म्हणजे कथा.''[२]

**विषय विवेचन –** कथा या वाङमय प्रकाराच्या उदयाला अनेक वर्षे उलटली असली तरी तिची नेमकी व्याख्या करणे शक्य झालेले नाही. कारण कथेच्या विषयाला मर्यादा नाही. पूर्णतः भावना विरहित आणि वस्तुनिष्ठ अशा कथांपासून तो अत्यंत भावघन अशा सामाजिक मनाचे चित्रण करणाऱ्या कथा एकाच व्यक्तीच्या अंतर्मनातील खळबळीचे, आर्ततेचे चित्रण करणाऱ्या कथेपर्यंत नाना प्रकारच्या कथा लिहिलेल्या दिसतात. जी गोष्ट विषय विविधतेची तीच विस्ताराची कथेविषयी काही अभ्यासकांनी तिचे जे विशेष सांगितले आहेत. त्याआधारे तिच्या स्वरूपाबाबत चर्चा करावी लागते. कथेच्या स्वरूपाबाबत निष्कर्षात्मक लिहितांना इंदुमती शेवडे म्हणतात, स्वतंत्र वाङमय प्रकार म्हणून कथेचे अस्तित्व अबाधित आहे. तिची पृथगात्मकता कायम राहिली आहे. एक पृथगात्म वाङमय प्रकार म्हणून तिची व्यवच्छेदक लक्षणे दोन आहेत. १) कथेतील अनुभवाची एकात्मता, एकजिनसीपणा, एकविविधता, २) गुणांशी संलग्न असलेले तिचे एक संस्कारित्व.[३]

कथा या वाङमय प्रकाराचे एक अन्य वैशिष्ट्य असे की, त्याच्या विशिष्ट प्रवृत्तीमुळे कथा वाचकांच्या अंतरंगाचा ठाव लवकर व सहजगत्या घेते. कल्पित व जीवन यामधील सीमारेषा इतर वाङमय प्रकारात इतक्या लवकर कोसळत नाहीत. कथेत जीवनाचे विशिष्ट धोरणाने केलेले चित्रण, त्यामागील भाव-भावना, संवेदना, संघर्ष इ. नी सधन बनविलेला जीवनानुभव व्यक्ती वर्तन व ही सारी अंगे समूर्त करताना लेखकाने कथा या वाङमय प्रकाराच्या वैशिष्ट्यांची तंत्रदृष्ट्या बुद्ध्यावा सहजगत्या ठेवलेली जाण या गोष्टी कथेची एकात्मता भंग होऊ न देता विश्लेषणात्मकतेचा अवलंब करून कथेचे वेगळेच बहुपरिणामयुक्त रूप उभे करावे लागते.[४]

भाषिक पातळीवरचे वेगळेपण घेऊन गौरी देशपांडे यांच्या कथा जशा अवतरतात. तसे लोककथेचा बाज घेऊनही अवतरतात. प्रत्येक साहित्यप्रकाराची एक वैशिष्ट्यपूर्ण संकेत व्यवस्था असते. या संकेतव्यवस्थेत परिवर्तन शक्य असते. अशा प्रयोगशीलतेमुळेच साहित्यातील संकेतव्यवस्थेत राहून परंपरेवर आधुनिकतेचे कलम करणे शक्य होते. हीच साहित्यातील नवी दृष्टी व नवी सृष्टीही असते. या नव्या दृष्टीतून रुपबंधाच्या शैलीतही परिवर्तन घडते. असेच वैशिष्टे घेऊन गौरी देशपांडे यांनी पारंपारिक 'कहाणी' संकेत व्यवस्थेला संस्कारित करून आपल्या आधुनिक जीवनाशयाला साहित्यरूप दिले. कहाणी ही स्त्रियांच्या कथाविष्काराचे साधन होय. व्रतकथा ही स्त्रीयांची कहाणी बीजरूपात दिसून येते. कहाणीही निवेदक व श्रोता यांच्यात सांगितली व ऐकली जाते.

कहाणीचे श्राव्यपण महत्त्वाचे म्हणजे कहाणी हा निवेदक व श्रोता, वाचक यांच्याशी संवाद असतो.

श्रोत्यांचे अवधान ढळू नये म्हणून श्रोत्याला अधूनमधून विश्वासात घेत त्याला कहाणीशी बांधून ठेवावे लागते. कहाणीचा घेतलेला वसा न टाकता दुसऱ्याला देत कहाणीची मार्गक्रमणता होत असते. गौरी देशपांडे यांनी कहाणीचा हा लोककथेचा पारंपरिक रूपबंध स्वीकारला आहे.'कावळ्या-चिमणी'ची गोष्ट, विनाकपाशीनं उले, मंग काय झालं, आहे हे असं झालं, जावे त्याच्या वंशा, एकदा काय झालं ?, पाऊस आला मोठा याच्या शीर्षकाततूनही लोककथेच्या बाजाशी या गोष्टीचं नातं जाणवतं.

कावळ्या चिमणीची गोष्ट ही मराठी साहित्यातील आद्य लोककथा ही लोककथा महानुभाव साहित्यातील लीळाचरित्रात आढळते. श्री चक्रधरांनी एका मुलीची समजूत काढताना ही कथा/लीळा सांगितली आहे, अशी परंपरेने लोककथेतून पाझरत ही कथा आजही आई आपल्या बाळाला सांगते. गौरी देशपांडे यांनी कावळ्या-चिमणीची गोष्ट पारंपारिक लोककथेतून बीजकथेच्या रूपात स्वीकारली पण या कथेच्या संकेतव्युहातस्वतःच्या अनुभूतीच्या आशय तत्त्वाप्रमाणे परिवर्तन करून तिला ट्विस्टी करून एक आशयसमृद्ध आधुनिक कथा सांगितली. परंपरा आणि नवता यांचा हा संबंध आहे. नवता एकदम अवतरत नाही. तर परंपरेला कवेत घेत तिच्याशी नाते सांगत त्यावर नवे कलम करीतच ती अवतरते. परंपरेतील परिवर्तनातूनच परंपरा समोर जाते व समृद्ध होते. स्त्रीयांच्या भावविश्वातील बदलांचे स्वरूप स्पष्ट करण्याकरिता परंपरा जोपासत हि नवता येते. एकाच वेळी जुन्या आशयातून नवता प्रक्षेपित होते आणि एक समृद्ध जीवनानुभव प्रकट होतो. परंपरा कथेत घेत ही स्त्री आधुनिकतेला सामोरे जाते. परंपरेच्या पायावर ही स्त्री नवता व आधुनिकता स्वीकारते. अनुभवाने शहाणी होते. स्त्री मनाच्या मानसिक संघर्षाचे सांस्कृतिक मूळ शोधून तिची परिवर्तनात्मक मानसिकता स्पष्ट करण्यासाठी तिच्या स्वतंत्र व स्वयंपूर्ण अस्तित्वाचा शोध घेण्यासाठी लोककथेतील हा कहाणीचा आदिबंध स्वीकारून त्यातून आधुनिक स्त्रीचे भावविश्व नव्या रूपबंधात बांधले आहे.[५]

चिऊताई, चिऊताई, दा....र, उघड!, चिमणी म्हणाली,'थांब, माझ्या बाळाला न्हाऊ घालते'. हा मूळ लोककथेचा आकृतिबंध तसाच्या तसा कायम ठेवीत गौरी देशपांडे यांनी या कथेला नवा बाज प्रदान केला आहे.[६]

या ठिकाणी चिमणा-चिमणी ही प्रतिक पांढरपेशा मध्यमवर्गाच्या रूपात आलेली आहेत. एका बाजूला आपल्या बायकोशी नीटनेटका संसार करणारे, तिचे मन राखणारे पुरुष, दुसऱ्या बाजूला मात्र बाहेर उकिरडे हुंगीत फिरतात. पुरुषाचा हा दुटप्पीपणा यातून स्पष्ट करीत गौरी देशपांडे मध्यमवर्गीय स्त्रियांची पतीच्या या सवयींची थोडावेळ तक्रार, आदळ आपट करणे आणि असं चालायचंच म्हणत गप्प राहात त्याचीही सवय करुन घेण्याची मनोवृत्तीही स्पष्ट करतात.[७]

अशा मध्यमवर्गीय जीवनात 'तुला मी न् मला तू' ची स्वार्थी स्वयंकेंद्रि बंदिस्त चौकट कायम राहते. याच कावळीची मात्र फरफट होते. कशाचाही आधार असणाऱ्या या कावळीला आधार आहे, तो श्रद्धेचा आणि अभिमानाचा. पण तो फार हाणलं, मारलं की मदतीस येणार. प्रवाहपतित असणारी ही कावळी चिमण्याशी दोस्ती करते, संग करते. पण थोडा वेळची मजा उपभोगणारा दुटप्पी, स्वार्थी, लंपट चिमणा मात्र तिची बांधिलकी नाही. स्वतःच्या लंपटपणाची वस्तू एवढेच तिचे स्थान त्याच्या लेखी असते. तेच तिचे मूल्य. पण हीच कावळी मग स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व घेऊन स्वतःच्या हिमतीने स्वतंत्र संसार थाटते. तेव्हा पुन्हा चिमणा तिच्या आयुष्यात येऊ बघतो. या कथेतून पांढरपेशी वृत्ती, त्यांचा स्वार्थीपणा, स्वयंकेंद्रितता, आपमतलबीपणा आणि कावळीची प्रवाहपतितता व पुन्हा स्वयंप्रेरणेने, थोड्या अभिमानाने उभी राहण्याची धडपड गौरी देशपांडे यांनी प्रतीकात्मकतेने चित्रित केली आहे. त्यामुळे ही लोककथा मूळ कथेपेक्षा रूपककथेचा बाज घेऊन नवीनतीने अवतरते व मूळ आशयाला बगल देत नव्या प्रसरणशील आशय अभिव्यक्त करते. स्त्रीनिविष्ट भाषेत शैलीचा वापर करून पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्री भावपूर्ण संवेदनक्षम स्पंदने त्यांनी या स्त्रीनिविष्ट भाषाशैलीतुन अभिव्यक्त केली आहेत. त्यातून आधुनिक जीवनजाणिवांची स्त्रीनिष्ठ भावरुपे आकाराला आली आहेत.[८]

**निष्कर्ष –**

१) गौरी देशपांडे यांच्या कथांमधून येणाऱ्या या स्त्रिया उपहासाने आपल्या जीवनाकडे पाहतात. त्या सर्वच आर्थिक दृष्टीने सबळ नाहीत. त्यातल्या बऱ्याच गृहिणी आहेत. पण या सर्वच स्त्रियांचा 'स्त्री-पुरुष' संबंधाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा पारंपरिक आहे.
२) गौरी देशपांडे यांचे साहित्य नवसाहीत्यांच्या टप्प्यावरचे साहित्य आहे.
३) गौरी देशपांडे या मराठी साहित्यात एक नवे पर्व निर्माण करणाऱ्या आहेत.
४) गौरी देशपांडे आपल्या अनुभवांना उजागर करण्याचा प्रयत्न केला आहे.
५) गौरी देशपांडे यांनी आधुनिक जीवन जाणिवांची स्त्रीनिष्ठ भावरूपे आकाराला आली आहेत.

**संदर्भ**

१) मराठी विश्वकोश, खंड ३
२) लांडगे शिरीष, पवार दिलीप आणि सांगळे संदीप – समकालीन मराठी कथा, अक्षरबंध प्रकाशन, पुणे,२०१९ (पान क्र.७)
३) शेवडे इंदुमती – मराठी कथा : उगम आणि विकास, मुंबई १९७३(पान क्र.२८)
४) प्रा.नलगे चंद्रकुमार – मराठी साहित्याचे उदयरंग (पान क्र.५२-५३)
५) डॉ. अमृते संध्या – मुक्तगौरी, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २०१३(पान क्र.६८)
६) देशपांडे गौरी – आहे हे असं आहे (कथासंग्रह) मौज प्रकाशन गृह, मुंबई – ४, प्रथमावृत्ती, ऑगस्ट १९८६(पान क्र.४३)
७) डॉ. अमृते संध्या – मुक्तगौरी, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती,२०१३ (पान क्र.६९)
८) माझे साहित्य : स्त्रीकेन्द्री, महाराष्ट्र टाइम्स,१९नोव्हेंबर १९९६.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी पावरा जमातीचे आर्थिक जीवन एक अभ्यास

**सुनील रोलजी खर्डे**
संशोधक विद्यार्थी,
इतिहास विभाग
श्रीमती पी. बी. बागल कला आणि वाणिज्य, महाविद्यालय, दोंडाईचा

**प्रो. डॉ. खासेराव हिंमतराव पाटील**
मार्गदर्शक
इतिहास विभाग
श्रीमती पी. बी. बागल कला आणि वाणिज्य, महाविद्यालय, दोंडाईचा

**प्रस्तावना –**

खानदेशातील उत्तरेकडील सातपुड्याच्या पायथ्याशी आदिवासी पावरा जमातीच्या वस्ती आढळतात. यामध्ये नंदुरबार जिल्ह्यातील अक्राणी, शहादा, तळोदा धुळे जिल्ह्यातील शिरपूर तर जळगाव जिल्ह्यातील चोपडा, यावल, रावेर या तीन जिल्ह्यांचा समावेश होतो. आदिवासी पावरा जमात हि निसर्गावर अवलंबून असून ते निसर्ग देवतेची पूजा करीत असतात. आदिवासी पावरा जमात निसर्गपूजक आहे निसर्गाच्या सानिध्यात पावरांचे वास्तव्य राहिले आहेत. त्यांचे आर्थिक जीवन हे निसर्गावर अवलंबून आहे नैसर्गिक पद्धतीने व निसर्गाच्या सानिध्यात वास्तव्य करण्याचा कल आदिवासी पावरा जमातीमध्ये आहे.

आदिवासी पावराजमात ह्या आर्थिकदृष्ट्या मागास असून वनांमधील कंदमुळे गोळा करणे, फळे, फुले गोळा करणे, मध गोळा करणे, वनऔषधी गोळा करणे, तेंदूच्या पानांपासून बिडी तयार करणे तसेच शेतीसाठी लागणारे साहित्य तयार करणे, दैनंदिन जीवनासाठी लागणाऱ्या वस्तू उदा.बांबू पासून टोपल्या तयार करणे, घरगुती मातीची भांडी तयार करणे,अंबाडीच्या सालीसह इतर वनस्पतींच्या सालीपासून दोर विणणे इत्यादी कामाच्या स्वरूपावरून त्यांचे आर्थिक जीवन हे निसर्गावर आधारित असल्याचे आढळून येते.

**उद्दिष्टे –**

१) आदिवासी पावरा जमातीचे आर्थिक जीवनाच्या स्वरूपाचे अध्ययन करणे.

२) आदिवासी पावरा जमातीचे निसर्गातील व्यवसायांचा अभ्यास करणे.

**गृहितके –**

१) आदिवासी पावरा समाज आर्थिकदृष्ट्या मागास आहे.

२) आदिवासी पावरा जमातीचा उदरनिर्वाह शेतीबरोबरच निसर्गाच्या स्रोतांवर अवलंबून आहे.

**संशोधनाची व्याप्ती –** प्रस्तुत लघु शोधनिबंधाअंतर्गत संशोधकाने नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी पावरा जमातीचे आर्थिक जीवनाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची पद्धती –** प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करून द्वितीय साधनांचा वापर केला आहे,उदा. संदर्भग्रंथ, मासिक पत्रिका, इंटरनेट, दैनिक समाचार पत्र इत्यादी मधून माहिती गोळा केली.

**तथ्य विश्लेषण –** आज भारताच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवात (७५) पदार्पण झालेलेआहे, तरीदेखील आदिवासी जमातीचा पाहिजे तसा आर्थिक विकास झालेला दिसून येत नाही. आदिवासी जमाती ह्या आधीपासून निसर्गाच्या सान्निध्यात राहत होत्या आणि आज देखील ते निसर्गाच्या सानिध्यात राहून आपले आर्थिक जीवन व्यतीत करतांना आढळतात.आदिवासींचेव्यवसाय हे निसर्गावर अवलंबून आहे म्हणूनच आदिवासी पावरा जमातीच्या आर्थिक विकास का होत नाही? याचा अभ्यास संशोधकाला करून घ्यायचा आहे.

**आदिवासी पावरा जमातीचे आर्थिक जीवन आणि व्यवसाय –** आदिवासी पावरा जमातीचे आर्थिक जीवन निसर्गावर अवलंबून आहे, आदिवासी पावरा जमातीचा उदरनिर्वाह हा निसर्गावर आधारलेला आहे, वनांमधील खाद्य संकलन करणे,शिकारकरणे,मासेमारी, पशुपालन व कुक्कुटपालन, शेत करणे, मजुरी करणे व गृहउद्योग इत्यादी घटकांवर आदिवासी पावरा यांचे आर्थिक जीवन अवलंबून आहे. सातपुड्याच्या दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या आदिवासी जमातीचे आर्थिक जीवन हे प्रामुख्याने जंगलात आढळणाऱ्या पशुपक्षी, वृक्ष फळे-फुले, नद्या-नाले इत्यादींशी निगडित असते. उदरनिर्वाहाची साधने गोळा करण्यासाठी आदिवासी लोकांना कठोर परिश्रम करावे लागतात. त्यामुळे त्यांचे आर्थिक जीवन हे अधिकच संघर्षमय असते. आदिवासी पावरा लोक डोंगराळ व पर्वतीय जंगलव्याप्त भागात राहतात. त्यांची अर्थव्यवस्था प्राथमिक व्यवसायावर अवलंबून आहे, त्यांचे आर्थिक जीवन निसर्गावर निर्भर आहे, निसर्गात ज्या गोष्टी उपलब्ध असतात. त्या गोष्टींचे संकलन करून ते आपला उदरनिर्वाह करतात. आदिवासींच्या आर्थिक जीवनात शिकारीस विशेष महत्त्व असल्याचे दिसते. सातपुड्याच्या कुशीत राहणाऱ्या आदिवासी जमाती ह्या उपजीविकेसाठी पशुपक्षी यांची शिकार करीत होत्या. शेतीही स्थलांतरित व स्थिर या दोन्ही प्रकारे केली जात होती. शेती व्यवसायावर दुष्काळ, अतिवृष्टी, अल्पवृष्टी, नदी नाल्यांवर धरण निर्मिती इत्यादी मुळे त्यांचे आर्थिक जीवन मोठ्या प्रमाणात प्रभावित अथवा अस्थिर झालेले असल्याचे आढळून येते.

**आदिवासी पावरा जमातीचेव्यवसाय –**

**१) शेती –** आदिवासी पावरा जमातीचा प्रमुख व्यवसाय हा शेती असून आपला उदरनिर्वाह करण्यासाठी शेतीतून गहू, ज्वारी, बाजरी, मका, कडधान्ये इत्यादींचे उत्पादन शेतीतून अधिक प्रमाणात घेतले जाते. शेतीतून मिळालेल्या उत्पन्नातूनवर्षभर पुरेल अशा पद्धतीने साठवून ठेवतात.

**२) पशुपालन/कुकुटपालन –** शेतीबरोबर पशुपालन व कुक्कुटपालन हे आदिवासींचे दुय्यम व्यवसाय होते. प्रत्येक आदिवासी कुटुंबाकडे गुरे व बकऱ्या, कोंबड्या असतात. त्यांच्या आर्थिक जीवनात पशुपालन व्यवसायामुळे मोठ्या प्रमाणावर हातभार लागत असल्याचे आढळून आले.

३) **मजुरीवर आधारित जीवन** – आदिवासी पावरा लोकांच्या शेतीतून वर्षभर पुरेल इतके अन्नधान्याचे पिक येईल याची नाही. तसेच कुटुंबातील सदस्य संख्या अधिक असल्यामुळे उदरनिर्वाह करण्यासाठी पावरा लोक इतरांच्या शेतात रोजंदारीवर मोलमजुरी करीत असतात. त्यातून त्यांना अल्प स्वरूपाचा मोबदला मिळत असतो. त्यातून फक्त दैनंदिन गरज भागविलीजावूशकते. परिणामी सदर जमातीची आर्थिक स्थिती हलाखीची झालेली येते.

४) **वनसंपदेवरआधारित व्यवसाय** – प्रस्तुत जमातीतील लोकांचे जीवनमान हे निसर्गाच्या सानिध्यात असल्यामुळे वनसंपत्तीवर त्यांचा अधिकार असतो. झाडांची तोड करून कोळसा करणे, कात तयार करणे, लाकूड तोडणे, गवत कापून ते विकणे, डिंक, लाख गोळा करणे, मोहाची फुले व फळे गोळा करून विकणे, बिडी बनवण्यासाठी तेंदुचे पाने तोडणे यावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. तसेच आमसूल, चारोळी, सीताफळे व वनऔषधी विकून ते आपली गुजराणकरीत असतात.

५) **लघुउद्योग** – आदिवासी पावरा जमात ही लघु उद्योगाचे देखील काम करताना आढळतात. त्यात विणकाम, बांबूपासून विविध वस्तू तयार करणे, माती पासून भांडी तयार करणे, टोपल्या बनवणे, घरगुती साहित्य बनवणे इत्यादी व्यवसाय पावरा लोक करताना आढळतात. या सर्व व्यवसायातून ते दैनंदिन उदरनिर्वाह करताना आढळून येतात.

**निष्कर्ष** –

उपरोक्त विषयसंदर्भावरून सातपुड्याच्या डोंगररांगांमध्ये वसलेली आदिवासी पावरा जमात ही निसर्गावर आधारित जीवन जगत असल्याचे आढळून येते. प्रस्तृत जमात ही नागर संस्कृतीपासून दूर असल्यामुळे त्यांच्यावर नागर संस्कृतीच्या फारसा प्रभाव अद्याप पडल्याचे दिसून येत नाही. ते अद्यापि निसर्गाच्या पावसावर आधारित शेती कसतात. जंगल परिसरातून फळे-फुले, रानभाज्या, कंदमुळे शिकार करणे इत्यादींवर आधारित दैनंदिन गरजा भागवितात. परिसरातील नद्या-नाले किंवा नैसर्गिक तलाव इत्यादींमधून मासेमारी करून आवश्यक गरजा भागविताना आढळून येतात. तसेच मिळेल त्या कामातून मजुरीचे कामे करताना दिसून येतात. आर्थिक स्रोतांच्या अभावी त्यांचे हे जीवन अतिशय कष्टमय आहे, हे स्पष्ट होते.

**संदर्भ**

१) पटले भरतसिंग, परिवर्तनीय आदिवासी पावरा समाज, अथर्व पब्लिकेशन जळगाव.
२) शहा. मु. ब, खानदेशाचा सांस्कृतिक इतिहास, खंड १,२, का. स. वाणी आणि मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, २००४
३) पाटील डी. जी, पावरा समाज व संस्कृती, भाषा संशोधन प्रकाशन केंद्र, बडोदा.
४) पाटील के. बी. आदिवासी पावरा समाजाची सामाजिक आणि आर्थिक सुरक्षा, अथर्व पब्लिकेशन, जळगाव.
५) पवार प्रमोद व बोरसे बळवंत, आदिवासी पावरा जमात, अथर्व पब्लिकेशन, जळगाव.
६) गारे गोविंद, सातपुड्यातील भिल्ल ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा, प्रकाशन, कॉन्स्टँटिनोपल पुणे.
७) चौधरी बी. एन, लोक साहित्य और पावरी भाषा, कानपूर१९७८.
८) मुनघाटे प्रमोद, आदिवासी जीवन कथा आणि व्यथा, सुगावा प्रकाशन, पुणे २००३.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# २१ व्या शतकातील सार्वजनिक ग्रंथालयाचे आव्हाने आणि संधी

**श्री. विजय कडू वाडे**
संशोधक विद्यार्थी
नुतन मराठा महाविद्यालय, जळगाव

**प्रा. डॉ. चंद्रशेखर डी. वाणी**
संशोधन मार्गदर्शक व ग्रंथपाल
मा. घ. पालेशा वाणिज्य महाविद्यालय, धुळे.

२१ व्या शतकामध्ये सार्वजनिक ग्रंथालयापुढे मोठे आव्हान आहे. ह्या डिजीटल युगाबरोबर चालण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांना आव्हानांचे संधीत कसे रूपांतर करता येईल हे महत्त्वाचे आहे. गाव तेथे ग्रंथालय या संकल्पनेनुसार सार्वजनीक ग्रंथालयांची प्रत्येक गाव, खेड्यापर्यंत पोहचल्यस गावाच्या विकासाला चालना मिळेल. या शोधनिबंधात नवीन ग्रंथालय कशी सुरू करावीत, नवीन सुरू केलेली व जुनी सार्वजनिक ग्रंथालये कशी वाढवावीत, वर्ग कसा मिळवावा व पुढील वर्गात कसे जावे, निधी कसा उभारता येईल, शासनाच्या कोणकोणत्या योजना आहेत, शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना कलकत्ता येथील राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कडून वेगवेगळ्या योजनांद्वारे अनुदान कसे मिळविता येईल या गोष्टीचे सविस्तर वर्णन ह्या शोधनिबंधात केलेले आहे.

महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम, १९६७ मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, प्रत्यक्ष शसनाच्या मालकीची फारच थोडी ग्रंथालये असतील. ती म्हणजे मध्यवर्ती एक, प्रत्येक विभागासाठी एक अशी शासकीय ग्रंथालये असतील. इतर सर्व ग्रंथालये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीची असतील. अशी ग्रंथालये स्थापन करण्यास मार्गदर्शन व सहकार्य करणे, त्यांना मान्यता देणे व त्यांच्या उत्कर्षासाठी सर्वतोपरी मदत करणे हा त्या कायद्याचा उद्देश आहे.

**नवील ग्रंथालय कसे सुरू करावे –** नवीन ग्रंथालय सुरू करताना त्या गावातील किंवा त्या भागातील लोकसंख्या, सामाजिक व आर्थिक परिस्थिती, शैक्षणि सोयी इ. बाबींचा विचार करावा लागतो. ग्रंथालयाची गरज तेथे आहे की नाही हे तेथील लोकांच्या विचारातूनही कळेल. यासाठी होतकरू, अनुभवी, जिज्ञासू व इच्छूक ग्रंथालय प्रेमींची एक बैठक घ्यावी व त्यात सार्वजनिक ग्रंथालय काढण्याबाबत कच्ची रूपरेषा ठरवावी.

यानंतर त्या भागातील नागरिकांची, 'गावात सार्वजनिक ग्रंथालय काढणे' हा विषय निमंत्रण पत्रिकेत लिहून व्यापक सभा बोलवावी. तशा अशयाचे जागोजागी फलक लावावेत. तिला ग्रामसभेचे स्वरूप आणावे. त्यासाठी नियोजित ग्रंथालय क्षेत्रातील सर्वांना निमंत्रण करावे. सरपंच/नगरसेवक व पदवीधरांनी तर पुढाकार घ्यावाच शिवाय प्रतिष्ठित नागरिक, त्या भागातील मोठ्या हुद्यावरील नागरिक, शिक्षक, राजकीय नेते यांना खास निमंत्रित करावे. शक्यतो ग्रंथालय क्षेत्रातील जिल्हा पातळीवरील एखाद-दुसरी व्यक्ती निमंत्रित करावी. सदर बैठकीमध्ये चांगले वक्तृत्व असणाऱ्यांनी ग्रंथालयाचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न करावा. शिक्षणाचे फायदे त्याचप्रमाणे ग्रंथालयाचे फायदे, शिक्षणाच्यावेळी व नंतर ग्रंथालयाचा उपयोग, जगातील माहिती ग्रंथालयामुळे आपणाला कशी मिळते याचे महत्व नागरिकांना पटवून द्यावे. अत्यल्प म्हणजे साधारण १०-१५ रूपयांमध्ये आपण महिनाभर ग्रंथालयात जाऊन हक्काने वर्तमानपत्रे, नियतकालिके वाचू शकतो, आपल्या आवडीची एक-दोन पुस्के आठ दिवसासाठी घरी नेऊ शकतो, आठ दिवसात आपण ती पुस्के कधीही बदलून आणू शकतो, आपली मुले/भावंडे तेथे जाऊन अभ्यास करू शकतात इ. गोष्टी पटवून द्याव्यात. सुरूवातीला नागरिकांनी थोडा खर्च केल्यानंतर शासनाचे अनुदान मिळेते व ते वाढत जाते याची कल्पना द्यावी.गावात ग्रंथालय नाही हे मागासलेपणाचे व कमीपणाचे आहे हे पटवून द्यावे. थोडक्यात सर्व वातावरण 'ग्रंथालयमय ' करावे..

या सभेत एक अस्थायी समिती नेमावी व त्यात खालील ठराव करावेत.

१) गावात/ शहरातील या भागात ग्रंथालय काढणे,
२) कार्यक्षेत्र ठरविणे
३) ग्रंथालयाचे नाव निश्चित करणे (पहिल्याच सभेत नाव निश्चित करता आले नाही तरी चालेल, मात्र नंतर नावात झालेला बदल संबंधित अधिकाऱ्यांना कळवावा)
४) ग्रंथालयासाठी मध्यवर्ती जागा निवडणे.
५) अस्थायी समिती निवडणे (ती साधारणपणे ११ किंवा विषम संख्येत असावी.)
६) सदर समितीस धर्मदाय आयुक्ताकडे नोदणीस व शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्याचा अधिकार देणे.
७) सभासदांची अनामत रक्कम, प्रवेश फी, मासिक फी, आजीव सभासद वर्गणी ठरविणे.
८) ग्रंथालयाचा व्याप ठरविणे (विविधि विभाग, वर्तमानपत्रे, नियकालिके ठरविणे इ.)
९) ध्येय धोरण ठरविणे.
१०) ग्रंथालयाचे उद्घाटन व त्या अनुषंगाने इतर बाबी निश्चित करणे.

प्रत्येक ठरावाला वेगवेगळे सूचक व अनुमोदक घ्यावेत. त्यामुळे त्यात सर्वांचा सहभाग दिसून येईल.

अस्थायी समितीमध्ये प्रतिष्ठितांचा समावेश असावाच शिवाय सर्वच भागाला प्रतिनिधित्व मिळेल याची दक्षता घ्यावी. ग्रंथालय स्थापनेबाबत कार्यवाही व निर्णय घेण्याचे अधिकार त्यांना द्यावेत. शक्य झाल्यास काही उपसमित्या स्थापाव्यात व त्यात आणखी इच्छुक व होतकरू कार्यकर्त्यांचा समावेश करावा, जेणेकरून या उपक्रमात जास्तीत जास्त लोकांचा सहभाग होईल. ग्रंथालयासाठी जागेचा शोध, सभासद फी व नोंदणी, उद्घाटनाची तयारी, पैशाची व वस्तुच्या रूपाने देणग्या गोळा करणे इ. बाबतीत स्थायी समितीला मदत होईल. सार्वजनिक ग्रंथालयांच्या उभारणीत अशा होतकरू कार्याकर्त्यांचा फार

उपयोग होतो असा ग्रंथकर्त्यांचा अनुभव आहे. ग्रंथालयासाठी लागणाऱ्या वस्तुरूपाने म्हणजे कपाट, बाक, पेटी, खुर्ची, टेबल, घड्याळ, पिंप, तांब्या, सतरंजी इ. देणग्या जमविणे व त्यावर देणगीदारांच्या इच्छेप्रमाणे नाव लिहिणे इ. महत्वाची कामे उपसमितीतील कार्यकर्ते उत्तम प्रकारे पार पाडू शकतात.

शासनाच्या मान्यतेसाठी सार्वजनिक ग्रंथालयांची मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० नुसार किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० नुसार धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी करावी लागते. ग्रामपंचायत, नगरपालिका किंवा तत्सम शासनमान्यताप्राप्त संस्थाना सार्वजनिक ग्रंथालय काढता येते. अशा संस्थाना वेगळी नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. अशा आशयाचा ठराव मात्र करावा लागतो. नोंदणीसाठी घटनेची अत्यंत आवश्यकता असल्याने ग्रंथालयाची घटना तयार करावी. याच दरम्यान विविध प्रकारच्या नोंद वह्या तयार करून घ्याव्यात. या सर्व बाबतीत जिल्हा ग्रंथालय संघाचे सहाय्य घ्यावे.

यानंतर एक स्थायी समिति नेमाची किंवा सर्वानुमते अस्थायी समितीचेचे स्थायी समितीत रूपांतर करावे. ही स्थायी समितीच सदर ग्रंथालयाची पहीली कार्यकारिणी असेल.

ग्रंथालयाच्या दर्शनी भागात पुढीलप्रमाणे फलक लावावेत.

अ) ग्रंथालयाच्या नावाचा फलक, त्यावर ग्रंथालयाचे नाव, नोंदणी क्रमांक, ग्रंथालयाची वेळ, सुटीचा दिवस आणि सरकारमान्य व मुक्त हा मजकूर असणे आवश्यक आहे.
ब) ग्रंथालयाच्या कार्यकारी सदस्यांची नांवे, पद दर्शविणारा फलक.
क) ग्रंथालयात येणारी वृत्तपत्रे व नियतकालिके यांचा फलक.
ड) ग्रंथालयांच्या नियमांचा फलक, ग्रंथालयाच्या नावाचा फलक आकर्षक करावा. इमारतीच्या समोरील जागेची साफसफाई करावी. शक्य असल्यास आकर्षक सजावट करावी.

अशा तऱ्हेने सर्व तयारी झाल्यानंतर सर्व लोकांना हजर राहता यावे म्हणून सुटीच्या दिवशी व योग्य वेळेला, जाहीर फलक लावून किंवा निमंत्रण पत्रिका छापून उद्घाटन करावे.

**शासनाची मान्यता कशी मिळवावी –** लोकसंख्येच्या आधारावर सार्वजनिक ग्रंथालयाची संख्या ठरविता येते. साधारणपणे १०,००० लोकसंख्येसाठी एक ग्रंथालय २५,००० लोकसख्येसाठी दोन ग्रंथालये, ५०,००० साठी तीन ग्रंथालये, १,००,००० लोकसंख्येसाठी चार ग्रंथालये या प्रमाणात ग्रंथालये काढणे श्रेयस्कर असते.

शासनाचे अनुदान मिळण्यासाठी सदर सार्वजनिक गंथालयाला शासनाची मान्यता मिळणे आवश्यक आहे. शासनाच्या विविध योजना आहेत. शासनामार्फत काही पुरस्कारही दिले जातात तसेच राजा राममोहन रॉय प्रतिष्ठानाकडूनही अनेक अनुदाने मिळू शकतात. यासाठी शासनाच्या काही अटी आहेत त्या पूर्ण कराव्या लागतात. स्थायी समितीने याबाबत योग्य ती कार्यवाही करून ग्रंथालयाला शासनाची मान्यता मिळविली पाहिजे. त्यासाठी संबंधित विभागाच्या सहाय्यक ग्रंथालय संचालक यांच्याकडे प्रस्तावासह आवश्यक ती सर्व कागदपत्रे पाठवावीत. ग्रंथालय संचालकाकडे मागणी केल्यास आवश्यक त्या सर्व अर्जाचे नमुने मिळू शकतात. प्रस्ताव पाठविण्यापूर्वी स्थायी समितीने खालील ठराव मान्य करून घेतले पाहिजेत. या ठरावाच्या प्रती प्रस्तावासोबत पाठवाव्यात.

१) सार्वजनिक ग्रंथालय सुरू करण्यासंबंधीचा ठराव व
२) महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय नियम, १९७० मधील शर्ती मान्य असल्याचा ठराव.

महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय नियम, १९७० च्या तरतुदीनुसार नियम क्र.३ ते ५, ७, १० ते १८ अन्वये सार्वजनिक ग्रंथालयांनी शासनाकडे नोंदणी करण्यासाठी व दर्जा ठरविण्यासाठी विहित नमुन्यातील प्रस्ताव खालील प्रमाणपत्रांच्या व दाखल्यांच्या सत्यप्रतीसह पाठवावा.

१) अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी.
२) ग्रंथालय मान्यतेचा अर्ज
३) सार्वजनिक ग्रंथालय सुरू करण्यासंबंधीचा ठराव.
४) महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय नियम, १९७० मधील शर्ती मान्य असल्याचा ठराव.
५) ग्रंथालय जेथे काढावयाचे तया कार्यक्षेत्रातील लोकसंख्येचा दाखला. (गावाचा किंवा शहराच्या त्या भागाचा)
६) ग्रामपंचायत किंवा नगरपालिका, महापालिका यांचा ना हरकत दाखला.
७) संस्थेच्या घटनेची प्रत
८) संस्थेची उद्दिष्टे
९) बँक खाते,
१०) ग्रंथालयाची माहिती
११) ग्रंथालयाचा वर्ग ठरविणारे प्रपत्र
१२) ग्रंथालयाच्या नियमावलीची प्रत
१३) संस्था नोंदणी प्रमाणपत्र
१४) कार्यकारी मंडळाची यादी
१५) ग्रंथालयाच्या जागेचा कच्चा आराखडा
१६) वर्गणी भरून ग्रंथालयात येणाऱ्या नियतकालिकांची यादी. (दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके इ)
१७) जागा भाड्याची किंवा मोफत असल्यास मालकाचे सम्मती पत्र.

१८) सभासदांची (वर्गणीदारांची) पत्त्यासह यादी
१९) सेवकवर्गाची सविस्तर यादी.
२०) उपलब्ध सामानाची यादी
२१) ग्रंथालयाच्या स्थापनेपासून जमाखर्चाचे पत्रक.

वरील सर्व कागदपत्रांसह प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या विभागीय ग्रंथालय संचालकाकडे पाठवावा.

अशा प्रकारे प्रस्ताव पाठविल्यानंतर सहाय्यक ग्रंथालय संचालक किंवा त्यांचा प्रतिनिधी ग्रंथालयाला प्रत्यक्ष भेट देऊन कागदपत्रांची व इतर बाबींची तपासणी करून शासन मान्यता व वर्ग देण्याबाबतची कार्यवाही करतील.

**खालच्या वर्गातील ग्रंथालयांनी वरच्या वर्गात कसे जावे –** खालच्या वर्गातील जुन्या व नव्या ग्रंथालयांना वरच्या वर्गात जाता येते. एका वर्षात पुढच्या वर्गात जाता येते. मात्र एका वर्षात पुढच्या दोन वर्गात जाता येत नाही. यापूर्वी चर्चा केल्याप्रमाणे व वर्गवारीच्या अटींची पूर्तता केल्यानंतर पुढील वर्ग मिळू शकतो. कार्यकारी मंडळाने व कार्यकर्त्यांनी ग्रंथालय पुढच्या वर्गात नेण्यासाठी सतत प्रयत्न केले पाहिजेत. त्या निमित्ताने ग्रंथालयाची प्रगती होतेच शिवाय पुढच्या वर्गाप्रमाणे अनुदानात वाढ होते व ते प्रतिवर्षी मिळत जाते. त्याशिवाय शासनाच्या विविध योजनांचाही लाभ मिळू शकतो.

महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय नियम, १९७० च्या तरतुदीनुसार नियम क्र. ३८ अन्वये ग्रंथालयाचा पुनर्वर्गीकरण बाबतचा विहित नमुन्यातील प्रस्ताव पाठवावा लागतो. त्यासाठी १) ग्रंथालयाच्या उन्नतीचा मूळ अर्ज त्या सोबत २) ग्रंथ परिगणन अहवाल ३) ग्रंथालयांत वर्गणी भरून येणाऱ्या दैनिकांचा व नियतकालिकांचा तपशील, ४) वर्ग बदल अर्ज ५) वर्ग उन्नतीसंबंधी कार्यकारी मंडळाचा ठराव ६) ग्रंथालयाच्या जागेचा कच्चा नकाशा व आराखडा ७) ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या साहित्याची यादी ८) अद्ययावत अंकेक्षण अहवाल (बॅलन्स शीट) इ. कागदपत्रे व्यवस्थित भरून पाठवावीत.

**निधी कसा उभारावा –** कोणत्याही सार्वजनिक संस्थेला म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थेला निधीची अत्यंत आवश्यकता असते. निधीशिवाय त्यांची प्रगती होऊ शकत नाही. अन्यथा त्यांची अवस्था खुरट्या रोपट्यासारखी होते. मग ती संस्था व्यापारी असो, सहकारी असो, शैक्षणिक असो व पतसंस्था असो. सार्वजनिक ग्रंथालयांची अवस्था त्याहीपेक्षा वेगळी आहे. इतर संस्थेत गुंतलिला पैसा व्याज किंवा वस्तुरूपाने परत मिळणारा असतो. मात्र सार्वजनिक ग्रंथालयाचा देणगीदार वर्ग मर्यादित असतो तो म्हणजे 'वाचक' होय.

देणगी मिळविणे हे सर्वस्वी ग्रंथालय कार्यकर्त्यांच्या व पदाधिकाऱ्यांच्या मेहनतीवर संबंधावर अवलंबून असे. निधी अभावी ग्रंथालयाचा विकास थांबू नये म्हणून कार्यकर्त्यांनी स्वस्थ न बसता आपल्या परीने निधी गोळा करण्याचे प्रयत्न करावेत. अर्थातच देगण्या मिळविण्यासाठी ग्रंथालयाचे भरीव कार्य लोकांपुढे येणे आवश्यक आहे. त्यासाठी कार्यकर्यांनी आपापल्या संबंधित देणगीदाराशी व देणगीदार संस्थांशी संपर्क ठेवून ग्रंथालयाच्या सामाजिक कार्याचा परिचय त्यांना करून दिलेल्या प्रत्येक पैशाचा उपयोग ग्रंथालयाच्या हितासाठीच प्रामाणिकपणे केला जातो असा समज झाला पाहिजे. ग्रंथालयामध्ये सतत म्हणजे निदान दरमहा एक लोकोपयोगी सामाजिक कार्यक्रम आयोजित करून ग्रामस्थांना ग्रंथालयाकडे आकृष्ट करावे. सर्व कार्यक्रम मोफत करावेत. कार्यक्रमाच्या उद्घाटनाला गावातील प्रतिष्ठिताना बोलवावे. सर्व कार्यक्रमांना मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी द्यावी. सेवकांनी, पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी अतिशय नम्रतेने वागावे. या प्राथमिक चर्चेनंतर आपण निधी संकलनाबाबत चर्चा करूया–

**अ) वर्गणी –** सर्वच सार्वजनिक ग्रंथालयांत अवलंबिला जाणारा हा मार्ग आहे. वर्गणी खालीलप्रमाणे करता येते

**१) आजीव सभासद –** साधारणपणे रू. ५०१/– आजीव वर्गणी ठेवण्यास हरकत नाही. ग्रंथालय कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त आजीव सभासद करावेत व त्यांनी स्वत:ही वर्गणी भरून आजीव सभासद व्हावे. अशाप्रकारे जमा झालेली रक्कम बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवल्यास कायम स्वरूपी व्याजरूपाने चांगले उत्पन्न मिळू शकते.

**२) प्रवेश फी –** ग्रंथालयाचे सभासदतव स्वीकारतेवेळीच सर्व प्रकारच्या सभासदांकडून प्रवेश फी घेतली जाते. मात्र ती रू. ५/– किंवा रू. ११/– इतकी अल्प असते. ती ना परतावा असते.

**३) मासिक वर्गणी –** सर्वच सार्वजनिक ग्रंथालयात मासिक वर्गणीच आकारली जाते. मासिक वर्गणीची रक्कम रू. १०/– ते १५/– असल्याने ती सवर्ज्ञांना सोयीस्कर आहे. यातून बरेच उत्पन्न मिळू शकते.

**४) वार्षिक वर्गणी –** काही ठिकाणी मासिक वर्गणीऐवजी वार्षिक वर्गणीची पद्धत आहे. मात्र वार्षिक वर्गणी पद्धत मासिक वर्गणी इतकी लोकप्रिय नाही. कारण एकाच वेळेला रू. १२५/– ते १५०/– देणे बरेच वाचक पसंत करत नाहीत.

**५) विलंब शुल्क –** सार्वजनिक संस्था यशस्वीपणे चालवायची झाल्यास काही दंडक/निर्बंध घालावेच लागतात. सार्वजनिक ग्रंथालये याला अपवाद नाहीत. उपलब्ध वाचन साहित्यात सवर्ज्ञांना लाभ घेता यावा म्हणून नेलेले पुस्तक/ मासिक आठ दिवसा सुस्थितीत परत करणे आवश्यक आहे. अन्यथा प्रत्येक पुस्तकाला एक दिवसाला रू. १/– विलंब शुल्क आकारावे. काही वाचक तर नेलेले पुस्तक कित्येक महिने परत करत नाहीत. विलंब आकाराची कडक अंमलबजावणीही करता येत नाही, अन्यथा सभासद कमी होण्याची भिती असते. अशा वेळी नियमानुसार दंडाची आकारणी करावी. तशी संबंधिताला कल्पना द्यावी. मात्र वसूली १/४ इतकीच करावी. यामुळे उत्पन्न मिळेल व तो वाचक सहसा पुस्तक देण्यास विलंब करणार नाही हा ग्रंथकर्त्यांचा अनुभव आहे.

**६) अनामत रक्कम –** ग्रंथालयाचे सभासदत्व स्वीकारतेवेळी अनामत रक्कम घेतली जाते. ती एकदाच घेतली जाते. ती वाचकांच्या व ग्रंथालयाच्या परिस्थितीवर अवलंबून असते. एका पुस्तकासाठी बाल वाचकांकडून रू. ५०/– व इतर वाचकांकडून रू. १००/– अनामत रक्कम घेण्यास हरकत नाही. गहाळ पुस्तकाची प्रत संबंधित वाचकालाच आणून देण्यास सांगावे. त्यांनी ते आणून देण्यास आणि पुस्तकाची किंमतही भरण्यास टाळाटाळ केल्यास सदर रक्कम अनामत रकमेतून वसूल करावी. सदस्यत्व रद्द करतेवेळी वाचकाने अनामत रक्कम परत मागितल्यास ती रक्कम देणगी म्हणून देण्यास विनंती करावी.

**ब) देगण्या –** सार्वजनिक ग्रंथालयासाठी देगण्या जशा पैशाच्या रूपाने गोळा करता येतात तशा वस्तूच्या रूपानेही गोळा करता येतात. देगण्या रोख किंवा वस्तूरूपाने गोळा करणे हे स्थानिक परिस्थितीवर अवलंबून असते. त्यात येणारे यश हे सर्वस्वी कार्यकर्त्यांचा प्रामाणिकपणा व चिकाटी तसेच

E-ISSN : 2348-7143
April : 2022

संस्थेबद्दल वाटणारी अपुलकी व विश्वास यावर अवलंबून असते. त्यासाठी कार्यकर्त्यांची योजकता, संघटितपणा व संस्थेचे कार्य हे घटक महत्वाचे आहेत.

**देणग्या खालीलप्रकारे गोळा करता येतात –**

**१) आर्थिक स्वरूपी देणग्या –** वाचक, हितचिंतक, उद्योगपती, व्यापारी, राजकीय पुढारी, वकील, डॉक्टर, कंत्राटदार इ. कडून लहान मोठ्या देणग्या गोळा करता येतात. देणगी कितीही लहान असली तरी ती नाकारू नये. मोठ्या देणगी इतकेच लहान देणगीदारांचेही नम्रतेने आभार मानावे. दर्शनी भागात किंवा वाचन कक्षात देगणीदारांच्या नावाची यादी लावावी. त्यामुळे देणगीदाराला समाधान लाभेलच शिवाय इतरांनाही प्रोत्साहन मिळेल.

**२) वस्तुरूपी देणग्या –** ग्रंथालयात कपाट, रॅक, टेबल, खुर्ची, बाक, सूचना फलक, घड्याळ, पिंप, वाटी, तांब्या यासारख्या बऱ्याच सामानाची आवश्यकता असते. यापैकी सुस्थितीत कोणीही जुनी किंवा नवीन वस्तू कोणी भेट म्हणून दिली तर स्वीकारावी. त्या वस्तूवर देणगीदाराचे नाव लिहावे व लेखी स्वरूपात आभार मानावे, यामुळे ग्रंथालयाचा बराच पैसा वाचतो.

**३) पुस्तकरूपी देगण्या –** वाचकांना विवाह, विवाहाचा वाढदिवस, मुलांचा वाढदिवस, पालकांची साठी किंवा पंच्याहत्तरी, नोकरी लागणे, बढती मिळणे, घर प्रवेश, मुलांनी विशेष प्राविण्या मिळविणे इ. अशा शुभकार्याच्या निमित्ताने एक पुस्तक ग्रंथालयास भेट म्हणून देण्यास आवाहन करावे. तसेच परिसरातील व ग्रंथालयाला भेट देणाऱ्या लेखकांनाही त्यांच्या पुस्तकाची एक प्रत भेट म्हणून देण्यास आवाहन करावे. याला पन्नास टक्के जरी प्रतिसाद मिळाला तरी उत्तम ग्रंथ संग्रह होईल. काही लोकांनी आपल्याकडील काही ग्रंथ ग्रंथालयाला देणगीदाखल देऊ केल्यास तो तपासून सुस्थितीत व उपयोगी असेल तर अवश्य स्वीकारावेत. प्रत्येक पुस्तकावर किमान पाच ठिकाणी देगणीदाराच्या नावाची चिठ्ठी चिकटवावी आणि एक जरी पुस्तक असले तरी लेखी स्वरूपात आभारत मानावे.

**४) अटींच्या स्वरूपात मिळू शकणाऱ्या मोठ्या देणग्या –** व्याजाच्या रकमेतून प्रत्येक वर्षी उत्कृष्ठ वाचकाला बक्षिस देण्यासाठी, प्रत्येक वर्षी उत्कृष्ठ सेवकाला बक्षिस देण्यासाठी काही दानशूर, ग्रंथालयप्रेमी काही रक्कम ग्रंथालयाला बँकेत ठेव ठेवण्यासाठी देतात. अशी रक्कम मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच बालविभाग, महिला विभाग, वर्तमानपत्रे व नियतकालिक विभाग, सभागृह अशा विविध विभागांना व ग्रंथालयाला नाव देण्याच्या अटीवर अनुक्रमे रू. २५ हजार ते ५० हजार आणि रू. १ लाख ते २ लाख अशा मोठमोठ्या देणग्या मिळविता येतात. अशा देणग्यांना चांगला प्रतिसाद मिळाल्यास निधीचा कायमचा प्रश्नही सुटू शकतो.

**५) जागेच्या किंवा इमारतीच्या रूपाने देणगी –** मोकळ्या जागेच्या रूपाने किंवा इमारतीच्या रूपाने देणगी मिळाल्यास ते एक भाग्यवान ग्रंथालय म्हणण्यास हरकत नाही. अगदीच मध्यवर्ती ठिकाणी नसली तरी ग्रंथालय कार्यक्षेत्रात ३-४ गुंठे रिकामी जागा किंवा डागडुजी करून वापरता येण्यासारखी जुनी इमारत मिळविण्याचा प्रयत्न अवश्य करावा. कारण जागा विकत घेऊन इमारत बांधणे फार खर्चाचे आहे. अशा प्रकारच्या देणगीच्या मोबदल्यात ग्रंथालयाला देणगीदाराच्या इच्छेनुसार नाव देण्यास हरकत नाही.

**६) स्वायत्त संस्थांकडून देणग्या –** ग्रामपंचायत, नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद यांच्या फंडातून व पतसंस्था, बँका, ट्रस्ट,कारखाने, विविध व्यवसायिक संस्था यांच्या नफ्यातून काही रक्कम सार्वजनिक संस्थाना देणगी देण्याची सोय आहे. अशा संस्थांकडे लक्ष ठेवून त्यांच्या प्रत्येक वार्षिक सभेपूर्वी आठ दिवस अगोदर मदत मागणारे ठराव स्वरूपातील पत्र पाठवून जास्तीत जास्त देणगी देण्याबद्दल विनंती करावी व त्यासाठी व्यक्गित व वरिष्ठ पातळीवर प्रयत्नही करावेत.

**३) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत निधी –** महाराष्ट्र शासन सार्वजनिक ग्रंथालयांना आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत निधीतून १९८४-८५ पासून अनुदान देत असून सदर निधी सर्व वर्गातील सार्वजनिक ग्रंथालयांना मिळू शकतो. सार्वजनिक ग्रंथालयांचे बांधकाम या नावाने सदर निधी मिळत असला तरी त्यापैकी १० टक्के रक्कम पुस्के ठेवण्यासाठी कपाटे व रॅक्स घेण्यासाठी वापरता येतो. सदर अनुदानातून बांधलेली इमारत पूर्णपणे शासनाच्या मालकीची राहील व वर्षातून एकवेळ इमारत व कपाटे सुस्थितीत असल्याचा अहवाल शासनाला सादर करावा लागतो. दुर्दैवाने ग्रंथालय बंद पडल्यास सदर सर्व मालमत्ता शासनाला परत करण्याची हमी लेखी स्वरूपात द्यावी लागते.

या योजनेखाली खालीलप्रमाणे अनुदान मिळू शकते-

| अ.क्र. | ग्रंथालयाचा वर्ग | कमाल मर्यादा |
|---|---|---|
| 1 | महापालिका हद्द | रू. 10,00,000/- |
| 2 | अ वर्गातील सार्वजनिक ग्रंथालय | रू. 6,00,000/- |
| 3 | ब वर्गातील सार्वजनिक ग्रंथालय | रू. 4,00,000/- |
| 4 | क वर्गातील सार्वजनिक ग्रंथालय | रू. 2,00,000/- |
| 5 | ड वर्गातील सार्वजनिक ग्रंथालय | |

**क)मुख्यमंत्री निधी –** मुख्यमंत्री निधीतून सार्वजनिक ग्रंथालयांना विशेष प्रयोजनासाठी म्हणजे रजत, सुवर्ण, शताब्दी महोत्सवासाठी मदत मिळण्याची सोय आहे. त्यासाठी ग्रंथालय संचालनालयाच्या विहित नमुन्यातील अर्ज भरून त्यात नमूद केलेल्या आवश्यक त्या प्रमाणपत्रासह शासनाला प्रस्ताव पाठवावा. सदर प्रस्तावासोबत ग्रंथालयाबाबतच्या नेहमीच्या माहिती सोबत विशेष अनुदानाचे प्रयोजन, कार्यक्रमाचे स्वरूप म्हणजे ग्रंथप्रदर्शन, व्याख्यान, कथाकथन, परिसंवाद, सम्मेलन, ग्रंथखरेदी, फर्निचर खरेदी, नाट्यप्रयोग इ. माहिती सोबत जोडावी. कार्यक्रमाच्या अंदाजित खर्चाबरोबरच केलेल्या कार्यक्रमासंबंधीच्या बातम्या, फोटो, कात्रणे इ. माहिती पाठवावी. सहाय्यक ग्रंथालय संचालक किंवा ग्रंथालय संचालक किंवा त्यांचा प्रतिनिधी किंवा त्यांचे प्रतिनिधी मंडळ ग्रंथालयाला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी दप्तराची तपासणी केल्या नंतर अनुदान मंजूर केले जाते.

**ड) रद्दी, कात्रण सेवा व झेरॉक्स –** रद्दी विकणे हा काही उत्पन्नाचा मार्ग नाही. साधारणपणे रू. २००/- ची खरेदी किंमतीची वर्तमानपत्रे व

नियकालिके रद्दीत विकल्यास रू. २०/– इतकेच उत्पन्न मिळेल. त्यापेक्षा गरजूंना त्यातील कात्रणे, पुरवणी लेख किंवा वर्तमानपत्रच विकत दिले तर रद्दीपेक्षा कितीतरी अधिक रक्कम मिळेल. सार्वजनिक ग्रंथालयाना झेरॉक्स मशिन किंवा कॉपीअर घेणे परवडणारा नाही. परंतु ही सुविधा उपलब्ध करून दिल्यास बाहेरील कामाबरोबर ग्रंथालयाततील अभिलेखांचे झेरॉक्स काढून देऊन उत्पन्न वाढविता येईल. यासाठी वेगळी नेमणूक करण्याची आश्यकता नाही.

**इ) प्रयोजकांचे सहकार्य –** ग्रंथालयात आपण नवीन पुस्तके, र्वमानपत्रे व नियतकालिके घेत असतो. तयातील काही वर्तमानपत्रांना व नियतकालिकांना प्रायोजक मिळविले तर ग्रंथालयाचा बराच पैसा वाचेल. तयावर स्पष्टपणे ‘सदर नियतकालिक... यांचे कडून या ग्रंथालयाला भेट‘ असा शिक्का मारावा. असेच पुस्तकाबाबतही करता येईल.

**शासकीय अनुदाने –** सार्वजनिक ग्रंथालयांना विशिष्ट नियमांच्या अधीन राहून महाराष्ट्र शासनाकडून व राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानकडून भरघोस अनुदाने उपलब्ध आहेत. राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानाकडून मिळणारे विविध अर्थसहाय्य ग्रंथालय संचालनालयाच्या शिफारशीनंतर मिळू शकतात. याची स्वतंत्र व सविस्तर चर्चा याच ग्रंथात केली आहे.

**१) महाराष्ट्र शासनाची अनुदाने –** महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ कलम २० अन्वये महाराष्ट्र शासनाकडून रू. २५ लाख किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम प्रतिवर्षी ग्रंथालय निधीस मिळण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. या अधिनियमाच्या कलम २६, पोट कलम (१) आणि (२) चे खंड ४, ५ आणि ७ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधन सामुग्री यासाठी मान्यता), नियम, १९७० तयार केले. त्यानुसार मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांना खालीलप्रमाणे अनुदान मिळण्याची सोय उपलब्ध झाली आहे.

**२) परिरक्षण अनुदान –** शासनमान्य सर्व सार्वजनिक ग्रंथालयांना परिरक्षण अनुदान मिळू शकते. नियम क्र. ११, १२, १३, १४, १५ व १८ च्या अटी पूर्ण केल्यास अनुज्ञेय खर्चाच्या ९० टक्के परिरक्षण अनुदान कमाल मर्यादेच्या अधीन राहून खालील सुधारित दराप्रमाणे देण्यात येते.

शासनमान्य ग्रंथालयासाठी अनुदानाचा दर

| ग्रंथालयाचा वर्ग/ दर्जा | कमाल वर्षिक वेतन रू. | परिरक्षण अनुदान वेतनेतर रू. | एकूण अनुदान रू. |
|---|---|---|---|
| जिल्हा □अ□ | 2,40,000 | 2,40,000 | 4,80,000 |
| जिल्हा □ब□ | 1,28,000 | 1,28,000 | 2,56,000 |
| तालुका □अ□ | 1,28,000 | 1,28,000 | 2,56,000 |
| तालुका □ब□ | 96,000 | 96,000 | 1,92,000 |
| तालुका □क□ | 48,000 | 48,000 | 96,000 |
| इतर □अ□ | 96,000 | 96,000 | 1,92,000 |
| इतर □ब□ | 64,000 | 64,000 | 1,28,000 |
| इतर □क□ | 32,000 | 32,000 | 64,000 |
| वर्ग □ड□ | 10,000 | 10,000 | 20,000 |
| फिरते ग्रंथालय | 4,000 | 4,000 | 8,000 |
| (जास्तीत जास्त 4 शाखा प्रत्येकी शाखा घटकासाठी □अ□ व □ब□ वर्ग ग्रंथालयांना लागू) | | | (प्रति केंद्र) (4 केंद्रासाठी रू. 32,000) |

इतर अनुदानाप्रमाणे हेही अनुदान मंजूर करून वितरीत करण्याचे अधिकार विभागाच्या सहाय्यक ग्रंथालय संचालकांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

**३) तदर्थ अनुदान –** सार्वजनिक ग्रंथालयांना मान्यतेच्या प्रथम वर्षासाठी मागील वर्षाचा खर्च विचारात न घेता किमान रू. ५००/– चे तदर्थ अनुदान मिळण्याची तरतूद नियमात आहे. निधी उपलब्ध असल्यास इतर ‘अ‘ वर्गास रू. ९६,०००/–, इतर ‘ब‘ वर्गास रू. ६४,०००/–, इतर ‘क‘ वर्गास रू. ३२,०००/– व ‘ड‘ वर्गास रू. १०,०००/– कमाल तदर्थ अनुदान मिळू शकते.

**४) प्रोत्साहन अनुदान –** मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांना खालील प्रयोजनासाठी प्रोत्साहन अनुदाने मिळू शकतात.

**५) अतिरिक्त सभासदांच्या नाव नोंदणीसाठी –** ग्रंथालयाच्या वर्गीकरणासाठी ज्या अटी आहेत तयामध्ये ‘अ’, ‘ब’, ‘क’ व ‘ड’ वर्ग ग्रंथालयासाठी आवश्यक सभासदांची संख्या निश्चित केलेली आहे. आवश्यक सभासद संख्येपेक्षा ग्रंथालयास अतिरिक्त सभासदाच्या नावे नोंदणीसाठी रू. ६/– किंवा वार्षिक वर्गणी रू. ६/– पेक्षा कमी असेल तर त्या वर्गणी इतके प्रोत्साहक अनुदान नियम २२–अ च्या अटीस अधीन राहून ग्रंथालयास मिळू शकते.

**६) पुस्तकांच्या खरेदीसाठी –** मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयाने ग्रंथालयास मिळणाऱ्या अनुदानांच्या २५ टक्के रक्कमेची ग्रंथ खरेदी प्रतिवर्षी करणे आवश्यक आहे. ही ग्रंथ खरेदी त्या वर्षामध्ये संचालकांकडून आलेल्या पुस्तकांच्या याद्यातील ग्रंथावर होणे अपेक्षित आहे. याशिवाय ग्रंथालयाने अतिरिक् खरेदी केल्यास खालील दराने अतिरिक्त अनुदान नियम २२–ब च्या अधीन राहून ग्रंथालयास प्राप्त होऊ शकते.

| ग्रंथालयाचा वर्ग | ज्या दराने जादा अनुदान देय असेल तो दर |
|---|---|
| ब. | जादा खरेदी केलेल्या पुस्तकांच्या खर्चाच्या 25 टक्के परंतु 15,000/- किंवा त्यापेक्षा अधिक पुस्तके असलेले, सार्वजनिक ग्रंथालय, पुस्तके खरेदी करण्यासाठी असलेल्या प्रोत्साहक अनुदानास पात्र असणार नाही. |
| क. | जादा खरेदी केलेल्या पुस्तकांच्या खर्चाचा 50 टक्के परंतु 5,000/- किंवा त्यापेक्षा अधिक पुस्तके असेलेले, सार्वजनिक ग्रंथालय, पुस्तके खरेदी करण्यासाठी असलेल्या प्रोत्साहक अनुदानास पात्र असणार नाही. |
| ड. | जादा खरेदी केलेल्या पुस्तकांच्या खर्चाच्या 75 टक्के परंतु 1,000/- किंवा त्यापेक्षा अधिक पुस्तके असलेले, सार्वजनिक ग्रंथालय, पुस्तके खरेदी करण्यासाठी असलेल्या प्रोत्साहक अनुदानास पात्र असणार नाही. |

**७) विशेष प्रयोजनासाठी अनुदान –** राज्य ग्रंथालय परिषदेने शिफारस केल्यानंतर एखाद्या मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयास रू. १०,०००/– हून अधिक नसेल इतक्या रकमेचे विशेष अनुदान खालील प्रयोजनासाठी प्राप्त होऊ शकते.

i) संचालकांच्या मते महान असेल अशा एखाद्या लेखकाच्या शताब्दी महोत्सवाच्या विशेष प्रसंगी पुस्तके खरेदी करण्यासाठी.
ii) मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयाने अनेक वर्षे केलेल्या सेवांच्या स्मरणार्थ रजत, सुवर्ण किंवा शताब्दी इ. सारखे महोत्सव समारंभ आयोजित करण्यासाठी.
iii) मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये संचालकांच्यामते महान असलेल्या किंवा असामान्य गुणवत्ता असलेल्या ग्रंथकाराच्या किंवा व्यक्तीच्या स्मृतिप्रित्यर्थ एखादा विशेष विभाग उघडण्यासाठी.

**८) इमारत अनुदान –** निधी उपलब्धतेनुसार मान्यताप्राप्त ग्रंथालय, ग्रंथालयासाठी इमारत बांधण्यासाठी, किंवा तीत वाढ करण्यासाठी तसेच ती विकत घेण्यासाठी अनुदान प्राप् करू शकेल. त्यासाठी ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाने नियम २६ च्या सर्व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये, नियम १९७० मधील मनियम २६ च्या अटी पूर्ण करून तसेच नियम २८, २९ आणि ३५ च्या अधीन राहून खालील दराने ग्रंथालय इमारत अनुदान प्राप्त करू शकेल.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये खालील दराने ग्रंथालय इमारत अनुदान प्राप्त करू शकतील.

| वर्ग | अनुदानाचा दर | अनुदानाची कमाल मर्यादा रक्कम रुपये | कमाल अनुदान प्राप्तीसाठी कमीत कमी रकमेचा प्रस्ताव | ग्रंथालयाचा हिस्स टक्के/ रक्कम |
|---|---|---|---|---|
| □अ□ | जमिनीची किंमत धरून प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या 50 टक्के | 75,000/- | 1,50,000/- | 50% 75,000/- |
| □ब□ | जर ग्रंथालय 20,000 पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ठिकाणी असेल तर जमिनीची किंमत धरून प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या 50 टक्के | 48,000/- | 96,000/- | 50% 48,000/- |
| | जर ग्रंथालय 5000 ते 20000 लोकसंख्या असलेल्या ठिकाणी असेल तर जमिनीच्या किंमत धरून प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या 60 टक्के | 48,000/- | 80,000/- | 40%, 32,000/- |
| | जर ग्रंथालय 5000 पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ठिकाणी असेल तर जमिनीची किंमत धरून प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या 60 टक्के. | 48,000/- | 73,846/- | 35% 25,846/- |
| □क□ | जर ग्रंथालय 20,000 पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ठिकाणी असेल तर जमिनीची किंमत धरून प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या 50 टक्के | 24,000/- | 48,000/- | 50% 24,000/- |
| | जर ग्रंथालय 5000 पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ठिकाणी असेल तर जमिनीची किंमत धरून प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या 60 टक्के | 24,000/- | 36,923/- | 35% 12,923/- |

**९) साधन सामग्री अनुदान –** निधी उपलब्ध असल्यास मान्यताप्राप्त ग्रंथालयास नवीन फर्निचर खरेदी करणे, विद्यमान फर्निचरऐवजी दुसरे घेणे, पुस्तकांचे पुन:स्थापन करणे, वेगवेगळ्या वर्गातील ग्रंथालयाकरिता ग्रंथालय संचालकाकडून वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी साधन सामुग्री खरेदी करणे किंवा दुर्मिळ ग्रंथ व नियतकालिके यांचा संग्रह करणे व त्याचे जतन करणे यासाठी साधन सामुग्री अनुदान प्राप्त होऊ शकेल.

ग्रंथालयाची निगा राखली जावी व ग्रंथालयाचा विकास व्हावा यासाठी सदर प्रकल्प खरोखरच आवश्यक आहे आणि अंदाजित खर्च अत्याधिक

नाही अशी संचालकांची खात्री पटल्यास प्रकल्पाच्या अंदाजित खर्चापैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम साधन सामग्री अनुदान म्हणून ग्रंथालय नियम ३३, ३४ व ३५ च्या अधीन राहून प्राप्त करू शकेल.

ग्रंथालयास प्राप्त होणारी साधन सामुग्री अनुदान रक्कम ग्रंथालयाचा दर्जा / वर्गानुसार मिळणाऱ्या परिरक्षण अनुदानाच्या कमला मर्यादेपेक्षा अधिक असणार नाही.

**१०) संशोधनासाठी अनुदान –** मान्यताप्राप्त संशोधन व साहित्य संस्थांच्या ग्रंथालयांना वार्षिक परीरक्षण अनुदान मागील वर्षी ग्रंथालयांवर केलेल्या अनुज्ञेय खर्चाच्या ७५ टक्के कमाल रू. ५००/- मर्यादेच्या अधीन राहून देण्यात येते.

**११) पुरस्कार –** मान्यताप्रात सार्वजनिक ग्रंथालयांनी व ग्रंथालय कार्यकर्त्यांनी व सेवकांनी केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठी शासनाने खालील योजना सुरू केल्या आहेत.

**अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार योजना –** मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयामध्ये निकोप स्पर्धा निर्माण करून ग्रंथालय चळवळीला चालना देण्यासाठी ही योजना १९८४-८५ पासून सुरू करण्यात आली आहे. राज्यातील 'अ', 'ब', 'क' व 'ड' वर्गातील शहर तसेच ग्रामीण विभागातील ग्रंथालयांना खालील दराने पुरस्काराची रक्कम रोख स्वरूपात व गौरव प्रमाणपत्र देऊन करण्यात येते.

अ वर्ग ग्रंथालय – रू. ५०,०००/- ब वर्ग ग्रंथालय – रू ३०,०००/-

क वर्ग ग्रंथालय – रू. २०,०००/- ड वर्ग ग्रंथालय – रू. १०,०००/-

ग्रामीण व शहर विभागासाठी प्रत्येक वर्गातील एक-एक ग्रंथालय निवडण्यात येते.

आतापर्यंत एकूण १३५ ग्रंथालयांना पुरस्कार दिले आहेत. अर्ज व तयासोबतची सर्व कागदपत्रे तीन प्रतीत सादर करावी लागतात.

**ब) डॉ. एस. आर. रंगनाथन ग्रंथमित्र पुरस्कार –** ग्रंथालय कायदा अंमलात येऊन व ग्रंथालय संचालनालयाची स्थापना होऊन २५ वर्षे झालेली असल्याने राज्यातील उत्कृष्ठ ग्रंथालय सेवक व कार्यकर्ता यांना पुरस्कार देण्यात येतो. त्याप्रमाणे १९९४-९५ या वर्षापासून राज्यातील मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयातील एक उत्कृष्ठ ग्रंथालय सेवक व एक उत्कृष्ठ ग्रंथालय कार्यकर्ता यांना प्रत्येकी रू. ५,०००/- चा डॉ. एस.आर. रंगनाथन ग्रंथमित्र पुरस्कार देण्या येत आहेत. या पुरस्काराचे वितरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ठ ग्रंथालय पुरस्कार वितरण समारंभात करण्यात येते. सन २००३-०४ पासून हे पुरस्कार विभागीय व राज्यस्तरावर देऊन पुरस्कार रकमेत वाढ करण्यात आली आहे. राज्यस्तरावरील पुरस्कार प्रत्येकी रू. २५,०००/- चे व विभागीय स्तरावरील पुरस्कार प्रत्येकी रू. १५,०००/- इतक्या रकमेचे आहेत.

**विविध प्रस्ताव पाठविण्याचे अंतिम दिनांक –** सार्वजनिक ग्रंथालय योजनेअंतर्गत येणाऱ्या विविध योजनांसाठी सादर करावयाच्या अर्जाचे अंतिम दिनांक खालीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| १) | शासन मान्यतेसाठी नवीन ग्रंथालयाचा प्रस्ताव सादर करणे | ३१ ऑक्टोबर |
| २) | परिरीक्षण अनुदानासाठी प्रतिवर्षी अहवाल पाठविणे | ३० जून |
| ३) | सनदी लेखापालाचा अहवाला पाठविणे | ३१ ऑक्टोबर |
| ४) | साधनसामुग्रीसाठी प्रस्ताव पाठविणे | ३१ डिसेंबर |
| ५) | इमारत अनुदानासाठी प्रस्ताव पाठविणे | ३१ डिसेंबर |
| ६) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार योजनेसाठी प्रस्ताव पाठविणे | ३१ ऑक्टोबर |
| ७) | राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या योजनेसाठी प्रस्ताव पाठविणे | ३० सप्टेंबर |

**निष्कर्ष –**

सार्वजनिक ग्रंथालयाच्या स्थापनेसाठी आवश्यक ती माहिती शोधनिबंधात मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. सर्वसामान्य व्यक्तींना ह्या सर्व घटकांची माहिती नसते तरी मी सविस्तर आपणासमोर मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. गावोगावी सार्वजनिक ग्रंथालय तयार होऊन समाजात जनतागृती होऊन प्रत्येकाचा विकास कसा होईल याकडे लक्ष देणे महत्वाचे आहे.

**संदर्भ**

१) महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय संचालनालय, www.dol.maharashtra.gov.in अधिकृत वेबसाईट
२) पाटील सी. श्री. (२००५). विश्व महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालये, स्नेहल एजन्सीज, सिंधुदुर्ग.
३) महाजन, शा. न. (२००१). महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयाचे व्यवस्थापन, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# ऑनलाइन विपणन, आधुनिक काळाची गरज

प्रा. आर. जी. बडगुजर

**गोषवारा –**

इंटरनेट तंत्रज्ञानाने जवळजवळ प्रत्येक व्यक्ती आणि संस्थांच्या कार्यपद्धतीत बदल केला आहे. हे मिश्रित एजंट म्हणून वावरत आहे, सकारात्मक तसेच नकारात्मक, सामाजिक तसेच असामाजिक, रचनात्मक तसेच विचलित इत्यादी प्रकारचे डेटा–माहिती, मजकूर, ऑडिओ, व्हिडिओ आणि चित्र स्वरूपात आहे. इंटरनेट तंत्रज्ञानाद्वारे, व्यवसाय सर्व ग्राहकांना विविध ई-सेवा प्रदान करत आहेत.

आज ऑनलाइन बाजारपेठा त्यांच्या उत्पादनाची आणि सेवांची माहिती जगभर पसरवण्यासाठी इंटरनेट प्लॅटफॉर्म वापरत आहेत. ऑनलाइन विपणन विक्रेते आणि ग्राहक दोघांनाही किमतीचे फायदे देत आहे.

हे संशोधन आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगात ऑनलाइन विपणनची गरज दर्शवते. ऑनलाइन विपणनला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारचा सहभाग, बाजारपेठाद्वारे वापरल्या जाणाऱ्या वेबसाइट्स आणि ऑनलाइन टूल्स, डिजिटल विपणनची माहिती, डिजिटल विपणनचा इतिहास आणि कार्ये आणि उत्पादने खरेदी करताना ग्राहकांची जागरूकता दाखवते.

Key Words : e-technology, e-marketing, SEO, Digital marketing, etc..

**परिचय –**

आज ऑनलाइन विपणन ही काळाची गरज आहे. हे व्यवसाय आणि उद्योगांना स्थानिक सीमा ओलांडण्यास मदत करते. डिजिटल/ऑनलाइन विपणन हा विपणनचा एक घटक आहे जो इंटरनेट आणि ऑनलाइन आधारित डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, उत्पादने आणि सेवांचा प्रचार करण्यासाठी करतो, जसे डेस्कटॉप संगणक, मोबाइल फोन आणि इतर डिजिटल मीडिया. १९९० आणि २००० च्या दशकात त्याच्या विकासामुळे विपणनसाठी ब्रँड आणि व्यवसाय तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या पद्धतीत बदल झाला.

डिजिटल प्लॅटफॉर्म विपणन योजनांमध्ये आणि दैनंदिन जीवनात वाढत्या प्रमाणात समाविष्ट होत गेले आणि लोक भौतिक दुकानांना भेट देण्याऐवजी डिजिटल उपकरणे, डिजिटल विपणन मोहिमा प्रचलित झाल्या. शोध इंजिन ऑप्टिमायझेशन (SEO), शोध इंजिन विपणन (SEM), सामग्री विपणन, प्रभावक विपणन, सामग्री ऑटोमेशन, मोहीम विपणन, डेटा–चालित विपणन, ई–कॉमर्स विपणन, सोशल मीडिया विपणन, सोशल मीडिया ऑप्टिमायझेशन, ई–मेल विपणन, प्रदर्शन जाहिरात, ई–पुस्तके आणि ऑप्टिकल डिस्क आणि गेम हे महत्त्वपूर्ण घटक बनले.

१९९० च्या दशकात, डिजिटल विपणन हा शब्द प्रथम वापरला गेला, सर्व्हर/क्लायंट आर्किटेक्चरच्या पदार्पणासह आणि वैयक्तिक संगणकांच्या लोकप्रियतेसह, ग्राहक संबंध व्यवस्थापन (CRM) अनुप्रयोग हे विपणन तंत्रज्ञानातील एक महत्त्वपूर्ण घटक बनले.

सोप्या भाषेत, डिजिटल विपणन म्हणजे इंटरनेट किंवा कोणत्याही प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे उत्पादनांची जाहिरात. डिजिटल विपणन इन्स्टिट्यूटच्या मते, डिजिटल विपणन म्हणजे लक्ष्यित ग्राहक आणि व्यवसायांना उत्पादने आणि सेवांचा प्रचार किंवा विपणन करण्यासाठी डिजिटल चॅनेलचा वापर.

लोक दररोज डिजिटल सामग्री वापरत आहेत. लवकरच, पारंपारिक विपणन प्लॅटफॉर्म नाहीसे होतील आणि डिजिटल बाजार पूर्णपणे ताब्यात घेईल. डिजिटल विपणनमध्ये अनेक फायदे आहेत. पारंपारिक विपणनच्या विपरीत, डिजिटल विपणन अधिक परवडणारे आहे.

लोक टॅब्लेट, फोन आणि कॉम्प्युटरकडे वळले आहेत, ही अशी क्षेत्रे आहेत जिथे डिजिटल मार्केटर्सना सर्वाधिक स्थान मिळाले आहे.

**ऑनलाइन विपणनचा इतिहास –**

| क्रमांक | वर्ष | शोध |
|---|---|---|
| 1 | 1990 | डिजिटल विपणन हा शब्द प्रथम वापरला गेला |
| 2 | 1993 | पहिला क्लिक करण्यायोग्य बॅनर थेट झाला, त्यानंतर HotWired ने त्यांच्या जाहिरातींसाठी काही बॅनर जाहिराती खरेदी केल्या. |
| 3 | 1994 | नवीन तंत्रज्ञानाने डिजिटल मार्केटप्लेसमध्ये प्रवेश केला. त्याच वर्षी याहू (yahoo) लाँच करण्यात आले.<br>याहूला पहिल्या वर्षात जवळपास 1 दशलक्ष हिट्स मिळाले. यामुळे डिजिटल विपणनच्या जागेत घाऊक बदल घडवून आणले, कंपन्यांनी उच्च शोध इंजिन क्रमवारीत खेचण्यासाठी त्यांच्या वेबसाइटला अनुकूल केले. |
| 4 | 1996 | HotBot, LookSmart आणि Alexa सारखी आणखी काही शोध इंजिने आणि साधने लॉन्च झाली. |
| 5 | 1998 | Google चा जन्म झाला. मायक्रोसॉफ्टने एमएसएन सर्च इंजिन लाँच केले आणि याहूने याहू वेब सर्च बाजारात आणले. |
| 6 | 2006 | डिजिटल विपणन जगामध्ये पहिली मोठी वाढ झाली. मायक्रोसॉफ्टने MSN ला बॅकबर्नरवर ठेवले आणि Google आणि Yahoo शी स्पर्धा करण्यासाठी लाइव्ह शोध सुरू केला. |
| 7 | 2014 | सोशल मीडियावर डिजिटल सामग्री पोस्ट करणे सुरू झाले |

https://www.simplilearn.com/history-and-evolution-of-digital-marketing-article या वेबसाइटवर उपलब्ध आकडेवारीनुसार –

- ९९% डिजिटल मार्केटर्स मार्केटसाठी फेसबुक वापरतात,
- ९७% ट्विटर वापरतात,
- ६९% Pinterest वापरतात आणि
- ५९% इंस्टाग्राम वापरतात.
- ७०% B2C मार्केटर्सनी फेसबुकद्वारे ग्राहक मिळवले आहेत.
- ६७% Twitter वापरकर्ते ते Twitter वर फॉलो करत असलेल्या ब्रँड्सकडून खरेदी करतात.
- ८३.८% लक्झरी ब्रँडची Pinterest वर उपस्थिती आहे.
- मार्केटर्सद्वारे वापरल्या जाणार्या शीर्ष तीन सोशल नेटवर्किंग साइट्स लिंक्डइन, ट्विटर आणि फेसबुक आहेत.

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की जगभरात डिजिटल विपणनचा सतत विस्तार होत आहे.

**साहित्य पुनरावलोकन** (Literature revew) – साहित्य समीक्षा म्हणजे विशिष्ट विषयावरील अभ्यासपूर्ण स्त्रोतांचे सर्वेक्षण. हे वर्तमान ज्ञानाचे विहंगावलोकन प्रदान करते, तुम्हाला संबंधित सिद्धांत, पद्धती आणि विद्यमान संशोधनातील अंतर ओळखण्याची परवानगी देते.

एक चांगली साहित्य समीक्षा केवळ स्त्रोतांचा सारांश देत नाही तर, त्या विषयावरील ज्ञानाच्या स्थितीचे स्पष्ट चित्र देण्यासाठी ते विश्लेषण, संश्लेषण आणि समीक्षक मूल्यांकन करते.

साहित्य पुनरावलोकन लिहिण्यामध्ये संबंधित प्रकाशने (जसे की पुस्तके आणि जर्नल लेख) शोधणे, त्यांचे समीक्षक विश्लेषण करणे आणि तुम्हाला काय सापडले हे स्पष्ट करणे समाविष्ट आहे.

या उद्देशासाठी, खालील साहित्याचे पुनरावलोकन केले आहे. वेबसाइट्स, ब्लॉग्स आणि पोर्टल्स, वेबपेजेस, सोशल मीडिया इत्यादींवरून सोयीनुसार जास्तीत जास्त डेटा गोळा करण्यात आला.

१) डिजिटल विपणन हे ८ मुख्य श्रेणींमध्ये मोडले जाऊ शकते ज्यात समावेश आहे: शोध इंजिन ऑप्टिमायझेशन, पे-पर-क्लिक, सोशल मीडिया विपणन, सामग्री विपणन, ईमेल विपणन, मोबाइल विपणन, विपणन विश्लेषण आणि संलग्न विपणन. https://www.snhu.edu/

२) उच्च स्तरावर, डिजिटल विपणन म्हणजे शोध इंजिन, वेबसाइट, सोशल मीडिया, ईमेल आणि मोबाइल ॲप्स यांसारख्या डिजिटल चॅनेलद्वारे वितरित केलेल्या जाहिराती. या ऑनलाइन मीडिया चॅनेलचा वापर करून, डिजिटल विपणन ही एक पद्धत आहे ज्याद्वारे कंपन्या वस्तू, सेवा आणि ब्रँडचे समर्थन करतात. https://www.marketo.com/digital-marketing

३) नवीन तंत्रज्ञानाने डिजिटल मार्केटप्लेसमध्ये प्रवेश केला. त्याच वर्षी याहू (yahoo) लाँच करण्यात आले. याहूला पहिल्या वर्षात जवळपास १ दशलक्ष हिट्स मिळाले. यामुळे डिजिटल विपणनच्या जागेत घाऊक बदल घडवून आणले, कंपन्यांनी उच्च शोध इंजिन क्रमवारीत खेचण्यासाठी त्यांच्या वेबसाइटला अनुकूल केले. https://www.simplilearn.com/history-and-evolution-of-digital-marketing-article

४) इंटरनेटवरील विपणनचा वापर करून तुम्ही अंतराच्या सर्व अडथळ्यांवर मात करू शकता. स्थानिक स्टोअर्स स्थापित केल्याशिवाय, तुम्ही देशाच्या कोणत्याही भागात किंवा त्यापलीकडेही उत्पादने विकू शकता. हे आपले लक्ष्य बाजार लक्षणीयरीत्या विस्तृत करते. तसेच, विविध देशांमध्ये वितरकांचे नेटवर्क न उघडता, आपण निर्यात कंपनी तयार करू शकता. clicktecs.com/6-benefits-of-internet-marketing

५) आज लोक ऑनलाइन मीडियावर अधिक वेळ घालवतात, संभाव्य खरेदीदारांपर्यंत पोहोचण्यासाठी व्यवसायांनी त्यांचे डिजिटल चॅनेल

E-ISSN : 2348-7143
April : 2022

ऑप्टिमाइझ करणे महत्त्वाचे आहे. https://www.cardinaldigitalmarketing.com/blog/top-9-benefits-of-digital-marketing/

**उद्दिष्टे –**

१. नवीन विपणन संधी शोधणे.
२. विद्यमान विपणन धोरणे विकसित करण्याचे मार्ग शोधणे.
३. विक्री वाढवण्याचे मार्ग शोधणे.
४. ब्रँड बिल्डिंग तंत्र शोधणे.
५. ग्राहकांच्या बाजूने किंमत घटक कमी करण्याचे मार्ग शोधणे.
६. सुधारित इंटरनेट रहदारी तंत्रज्ञान शोधणे.

उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी आणि आवश्यक परिणाम प्राप्त करण्यासाठी, उपलब्ध अभ्यास साहित्य, पुस्तके, जर्नल्स, मासिके, वर्तमानपत्रे, साहित्य, इंटरनेट आणि विविध इलेक्ट्रॉनिक माध्यमे जसे की स्मार्ट फोन/टीव्ही, गॅझेट्स इ. यांचा विचार करून दुय्यम डेटा गोळा करण्यासाठी व्यापक अभ्यास केला गेला. सोयीनुसार आणि २४७ उपलब्धतेनुसार, मोठ्या प्रमाणात डेटा अस्सल, आणि विश्वासार्ह वेबसाइट्स, ब्लॉग आणि ॲप्समधून गोळा केला गेला.

**अभ्यास क्षेत्र** – सदर संशोधनात, बाहेती महाविद्यालय, जळगाव येथील विद्यार्थी व कर्मचारी यांची सदर विषयाबाबत त्यांची मते जाणून घेण्यात आली.

Google फॉर्म ॲप्लिकेशनद्वारे तयार केलेल्या प्रश्नावली पद्धतीने विद्यार्थी आणि कर्मचारी सदस्यांकडून प्राथमिक डेटा गोळा केला, जो पुढे विद्यार्थी आणि कर्मचारी सदस्यांच्या विविध whatsapp groups मध्ये पोस्ट केला गेला.

पुनरावलोकन सत्रात संशोधकाच्या लक्षात आले की प्रतिसादकर्त्यांनी या विषयावर त्यांचे सकारात्मक तसेच नकारात्मक प्रतिसाद दिले.

**संशोधन कार्यपद्धती** – या प्रकल्पासाठी, विश्लेषणासाठी आवश्यक डेटा संकलित करण्यासाठी प्रश्नावली आधारित सर्वेक्षण पद्धत तयार करण्यात आली. Google फॉर्म सुविधेद्वारे एक प्रश्नावली तयार केली जाते आणि संबंधित गटांमध्ये पाठविली जाते.

Google फॉर्मद्वारे विद्यार्थ्यांच्या १३२ क्रमांकांना प्रतिसाद देण्यात आला, त्यापैकी विश्वासार्ह डेटा असलेली १०० प्रश्नावली विश्लेषणाच्या उद्देशाने निवडण्यात आली, पुढे सारणी स्वरूपात रूपांतरित केली गेली आणि MS-Excel सॉफ्टवेअरद्वारे विश्लेषण केले गेले आणि अर्थ लावले.

**डेटा संग्रह** (Data collection) – संशोधन आराखडा संशोधनातील समस्या सोडवण्यासाठी मोठ्या प्रमाणात मदत करते, ज्याचा हेतू कल्पनेवर आधारित नसून सत्य शोधणे हा आहे .डेटा संकलनाची पद्धत मुख्यत्वे चौकशीचे स्वरूप, उद्देश, व्याप्ती आणि उपलब्धता यावर अवलंबून असते.

डेटा संकलनाच्या दोन पद्धती आहेत

१. प्राथमिक डेटा संकलन
२. दुय्यम डेटा संकलन

**१) प्राथमिक डेटा संकलन** – प्राथमिक डेटा म्हणजे संशोधकाने विशेषतः संशोधन असाइनमेंटसाठी गोळा केलेली माहिती. येथे निरीक्षण, सर्वेक्षण, प्रश्नावली पद्धती इत्यादी विविध स्त्रोतांकडून प्राथमिक डेटा गोळा केला जातो.

**२) दुय्यम डेटा संकलन** – विषयाचे योग्य आकलन होण्यासाठी पुस्तके, जर्नल्स, नियतकालिके इत्यादी विविध स्रोतांद्वारे तपशीलवार अभ्यास करण्यात आला आणि त्यातून भरपूर डेटा देखील गोळा करण्यात आला. सोशल मीडिया आणि गुगल, याहू इत्यादी विविध सर्च इंजिन वापरले होते.

**संशोधन नमुना** – गुगल फॉर्मच्या स्वरूपात प्रश्नावली, विविध व्हॉट्स ॲप ग्रुपमध्ये पोस्ट केली. १३२ विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला, त्यापैकी विश्वासार्ह डेटा असलेल्या १०० प्रश्नावली विश्लेषणासाठी निवडल्या गेल्या, टॅब्युलर फॉर्ममध्ये रूपांतरित केल्या गेल्या आणि चड–एुलशश्र सॉफ्टवेअरद्वारे विश्लेषण करण्यात आले.

**संशोधन साधन** – गुगल फॉर्मच्या स्वरूपात एक संरचित प्रश्नावली तयार करण्यात आली.

**नमुना आकार** – १००

**डेटा विश्लेषण आणि व्याख्या** (Data analysis and interpretation) – महाविद्यालयीन विद्यार्थी आणि कर्मचारी सदस्यांसह १०० प्रतिसादकर्त्यांच्या सर्वेक्षणाच्या विश्लेषणावर आधारित खालील तक्ते आणि आलेख, यादृच्छिकपणे निवडलेले आणि ुेेसश्रश फॉर्म वापरून तयार केलेल्या प्रश्नावलीद्वारे आणि महाविद्यालयात पोस्ट केलेल्या लिंकद्वारे डेटा गोळा केला गेला. गुगल फॉर्मद्वारे केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे, ९६.८१% विद्यार्थ्यांनी तर केवळ २.३९% कर्मचारी सदस्यांनी प्रतिसाद दिला. प्रतिसादाच्या आधारे खालील विश्लेषण केले गेले आणि निष्कर्ष काढण्यात आला.

*TABLE : **व्यवसाय / नोकरी**

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | शिक्षक | 5 | 5 | 5 |
| | विद्यार्थी | 93 | 93 | 98 |
| | इतर | 2 | 2 | 100 |
| | एकूण | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

वरील सारणी व्यवसाय/व्यवसायानुसार प्रतिसादकर्त्यांच्या संख्येची वारंवारता दर्शवते. ५% उत्तरदाते शिक्षक होते, ९३% विद्यार्थी होते तर २% उत्तरदाते इतर होते (ना शिक्षक किंवा विद्यार्थी). इतर पर्यायांच्या तुलनेत विद्यार्थ्यांच्या प्रतिसादाचे प्रमाण जास्त आहे.

वरील आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की, विद्यार्थ्यांनी प्रश्नावलीला प्रतिसाद दिला आहे आणि स्वेच्छेने उत्तर दिले आहे. शिक्षक आणि इतर गट सदस्य संख्येने कमी आहेत कारण गटातील शिक्षकांच्या तुलनेत विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त आहे.

आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ९३% प्रतिसादकर्ते विद्यार्थी श्रेणीतील आहेत.

*TABLE 1 : ऑनलाइन विपणन पारंपारिक विपणनची जागा घेत आहे हे तुम्ही मान्य करता का?

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | Yes | 94 | 94 | 94 |
| | N o | 2 | 2 | 96 |
| | Maybe | 4 | 4 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

ऑनलाइन विपणन पारंपारिक विपणनाची जागा घेत आहे हे तुम्ही सहमत आहात का? या प्रश्नासाठी ९४% उत्तरदात्यांनी होय पर्यायाला उत्तर दिले, २% उत्तरदात्यांनी नाही पर्यायाने उत्तर दिले तर ४% उत्तरदात्यांनी कदाचित पर्यायासाठी उत्तर दिले. होय म्हणणार्यांचे प्रमाण खूप मोठे म्हणजे ९४% आहे.

आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ९४% प्रतिसादकर्ते मान्य करता की, ऑनलाइन विपणन पारंपारिक विपणनची जागा घेत आहे.

*TABLE 2 : वाणिज्य आणि व्यवसाय शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाद्वारे ऑनलाइन विपणन ज्ञान देण्यास मदत करते हे तुम्ही सहमत आहात का?

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | Y es | 53 | 53 | 53 |
| | N o | 26 | 26 | 79 |
| | Maybe | 21 | 21 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

वाणिज्य आणि व्यवसाय शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाद्वारे ऑनलाइन विपणन ज्ञान प्रदान करण्यास मदत करते हे तुम्ही सहमत आहात का? या प्रश्नासाठी ५३% उत्तरदात्यांनी होय पर्यायाला उत्तर दिले, २६% उत्तरदात्यांनी नाही पर्यायाने उत्तर दिले तर २१% उत्तरदाते कदाचित पर्यायासाठी गेले. होय म्हणणार्यांचे प्रमाण खूप मोठे आहे, म्हणजे इतर दोन पर्यायांपेक्षा ५३%.

आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ५३% प्रतिसादकर्ते मान्य करता की, वाणिज्य आणि व्यवसाय शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाद्वारे ऑनलाइन विपणन ज्ञान देण्यास मदत करते.

*TABLE 3 : ऑनलाइन विपणनमुळे ग्राहकांना किमतीचे फायदे मिळतात हे तुम्ही सहमत आहात का?

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | Y es | 90 | 90 | 90 |
| | N o | 7 | 7 | 97 |
| | Maybe | 3 | 3 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

ऑनलाइन विपणन ग्राहकांना किमतीचे फायदे हे तुम्ही सहमत आहात का?

या प्रश्नासाठी, ९०% उत्तरदात्यांनी होय पर्यायाने उत्तर दिले, ७% उत्तरदात्यांनी नाही पर्यायाने उत्तर दिले तर ३% प्रतिसादकर्त्यांनी कदाचित पर्यायासाठी उत्तर दिले. होय म्हणणार्यांचे प्रमाण खूप मोठे आहे.

आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ९०% प्रतिसादकर्ते मान्य करता की, ऑनलाइन विपणनमुळे ग्राहकांना किमतीचे फायदे मिळतात.

| *TABLE 4 : ऑनलाइन विपणन व्यवसायांना किमतीचे फायदे देते हे तुम्ही सहमत आहात का? | | | | |
|---|---|---|---|---|
| | | % | Valid % | Cumu.% |
| Valid | Yes | 77 | 77 | 37 |
| | N o | 23 | 23 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

ऑनलाइन विपणन व्यवसायांना किमतीचे फायदे देतात हे तुम्ही सहमत आहात का? या प्रश्नासाठी, ७७% उत्तरदात्यांनी होय पर्यायाने उत्तर दिले, तर २३% प्रतिसादकर्त्यांनी नाही उत्तर दिले,

आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ७७% प्रतिसादकर्ते मान्य करता की, ऑनलाइन विपणन व्यवसायांना किमतीचे फायदे देते.

| *TABLE 5 : ऑनलाइन विपणन इको फ्रेंडली आहे हे तुम्ही मान्य करता का? | | | | |
|---|---|---|---|---|
| | | % | Valid % | Cumu.% |
| Valid | Yes | 78 | 78 | 78 |
| | N o | 13 | 13 | 91 |
| | Maybe | 9 | 9 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

ऑनलाइन विपणन इको फ्रेंडली हे तुम्हाला मान्य आहे का? या प्रश्नासाठी, ७८% उत्तरदात्यांनी होय पर्यायाचे उत्तर दिले, तर १३% उत्तरदात्यांनी नाही पर्यायाने उत्तर दिले तर ९% उत्तरदात्यांनी कदाचित पर्यायासाठी उत्तर दिले. होय म्हणणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण खूप मोठे आहे, म्हणजे ७८% इतर दोन पर्यायांपेक्षा. आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ७८% प्रतिसादकर्ते मान्य करता की, ऑनलाइन विपणन इको फ्रेंडली आहे .

| *TABLE 6 : तुम्ही सहमत आहात का की SEO टूल व्यवसायांना त्यांच्या वेबसाइट्सना शोध क्रियाकलापांमध्ये शीर्ष स्थानावर रँक करण्यात मदत करते? | | | | |
|---|---|---|---|---|
| | | % | Valid % | Cumu.% |
| Valid | Yes | 74 | 74 | 74 |
| | N o | 19 | 19 | 93 |
| | Maybe | 7 | 7 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

तुम्ही सहमत आहात की डएज टूल व्यवसायांना त्यांच्या वेबसाइट्सना शोध क्रियाकलापांमध्ये शीर्ष स्थानावर रँक करण्यात मदत करते? या प्रश्नासाठी, ७४% उत्तरदात्यांनी होय पर्यायाला उत्तर दिले, तर १९% उत्तरदात्यांनी नाही पर्यायाने उत्तर दिले, तर ७% प्रतिसादकर्त्यांनी कदाचित पर्यायासाठी उत्तर दिले. होय म्हणणार्यांचे प्रमाण खूप मोठे आहे, म्हणजे इतर दोन पर्यायांपेक्षा ७४%.

आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ७४% प्रतिसादकर्ते मान्य करता की, डएज टूल व्यवसायांना त्यांच्या वेबसाइट्सना शोध क्रियाकलापांमध्ये शीर्ष स्थानावर रँक करण्यात मदत करते

| = TABLE 7 : ऑनलाइन विपणन व्यवसाय, संस्थांना उज्ज्वल भविष्य कसे देऊ शकते? | | | |
|---|---|---|---|
| | | Valid % | Cumulative % |
| Valid | 1) Through Website marketing | 61 | 61 |
| | 2) Through Blogs and Portal | 12 | 73 |
| | 3) Through Social Medias | 27 | 100 |
| | Total | 100 | |

ऑनलाइन विपणन व्यवसाय, संस्था उज्वल भविष्य कसे देऊ शकते? या प्रश्नासाठी, ६१% लोकांनी वेबसाइट विपणनद्वारे, १२% प्रतिसादकर्त्यांनी ब्लॉग आणि पोर्टलद्वारे चिन्हांकित केले, तर उर्वरित २७% लोकांनी सोशल मीडियाद्वारे पर्यायाला मत दिले.

वरील आकडेवारी दर्शवते की सर्वाधिक टक्केवारी म्हणजे ६१% प्रतिसादकर्त्यांनी वेबसाइट विपणनद्वारे पर्याय निवडला.

*TABLE 8 : तुम्हाला माहीत आहे का की गैर-व्यावसायिक देखील ऑनलाइन विपणन चॅनेलद्वारे त्यांची उत्पादने आणि सेवांचे विपणन करू शकतात?

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | Yes | 55 | 55 | 55 |
| | N o | 24 | 24 | 79 |
| | Maybe | 21 | 21 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

वरील प्रश्नासाठी, ५५% उत्तरदात्यांनी होय पर्यायाने उत्तर दिले, २४% उत्तरदात्यांनी नाही पर्यायाने उत्तर दिले तर २१% उत्तरदात्यांनी कदाचित पर्यायासाठी उत्तर दिले.

आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ५५% प्रतिसादकर्ते मान्य करता की, गैर-व्यावसायिक देखील ऑनलाइन विपणन चॅनेलद्वारे त्यांची उत्पादने आणि सेवांचे विपणन करू शकतात ----

*TABLE 9 : ऑनलाइन विपणन धोरण उत्पादने आणि सेवांचा प्रचार करण्याचा पारंपारिक मार्ग बदलू शकते हे तुम्ही सहमत आहात का?

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | Yes | 85 | 85 | 85 |
| | N o | 8 | 8 | 93 |
| | Maybe | 7 | 7 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

वरील प्रश्नासाठी, ८५% उत्तरदात्यांनी होय पर्यायाने उत्तर दिले, ८% उत्तरदात्यांनी नाही पर्यायाने उत्तर दिले तर ७% उत्तरदाते कदाचित पर्यायासाठी गेले.

होय म्हणणाऱ्यांचे प्रमाण खूप मोठे आहे, म्हणजे इतर दोन पर्यायांपेक्षा ८५%.

आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ८५% प्रतिसादकर्ते मान्य करता की, ऑनलाइन विपणन धोरण उत्पादने आणि सेवांचा प्रचार करण्याचा पारंपारिक विपणन धोरण बदलू शकते.

*TABLE 10 : ऑनलाइन विपणनला भविष्यात वाव आहे हे तुम्ही सहमत आहात का?

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | Yes | 71 | 71 | 71 |
| | N o | 5 | 5 | 76 |
| | Maybe | 24 | 24 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

वरील प्रश्नासाठी, ७१% उत्तरदात्यांनी होय पर्यायाने उत्तर दिले, ५% उत्तरदात्यांनी नाही पर्यायाने उत्तर दिले तर २४ उत्तरदात्यांनी कदाचित पर्यायासाठी उत्तर दिले.

होय म्हणणाऱ्या प्रतिसादकर्त्यांचे प्रमाण इतर दोन पर्यायांपेक्षा खूप जास्त आहे, म्हणजे ७१%.

आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ७१% प्रतिसादकर्ते मान्य करता की, ऑनलाइन विपणनला भविष्यात वाव आहे.

| *TABLE 11 : ग्रामीण आणि अशिक्षित लोकांना ऑनलाइन विपणनबद्दल पुरेसे ज्ञान आहे हे तुम्हाला मान्य आहे का? | | | | |
|---|---|---|---|---|
| | | % | Valid % | Cumu.% |
| Valid | Yes | 41 | 41 | 41 |
| | No | 23 | 23 | 64 |
| | Maybe | 36 | 36 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

वरील प्रश्नासाठी, ४१% उत्तरदात्यांनी होय पर्यायाने उत्तर दिले, २३% उत्तरदात्यांनी नाही पर्यायाने उत्तर दिले तर ३६% प्रतिसादकर्त्यांनी कदाचित पर्यायासाठी उत्तर दिले. येथे आम्हाला होय आणि कदाचित पर्याय (म्हणजे ४१ आणि ३६) द्वारे संमिश्र प्रतिसाद मिळाला. होय आणि कदाचित म्हणणार्यांचे प्रमाण एकमेकांच्या जवळ आहे.

आकडेवारी दर्शवते की ४१% प्रतिसादकर्ते मान्य करता की, ग्रामीण आणि अशिक्षित लोकांना ऑनलाइन विपणनबद्दल पुरेसे ज्ञान आहे.

| *TABLE 12 : ऑनलाइन विपणनला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार सुविधा देत आहे हे तुम्ही मान्य करता का? | | | | |
|---|---|---|---|---|
| | | % | Valid % | Cumu.% |
| Valid | Agree | 68 | 68 | 68 |
| | Disagree | 32 | 32 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

वरील प्रश्नासाठी, ६८% उत्तरदात्यांनी सहमत पर्यायाला उत्तर दिले, तर केवळ ३२% प्रतिसादकर्त्यांनी असहमती पर्यायाने उत्तर दिले.

येथे आपण असे निरीक्षण करू शकतो की मोठ्या संख्येने म्हणजे ६८% प्रतिसादकर्त्यांनी हे मान्य केले की, उत्पादने खरेदी करताना कोणतीही समस्या उद्भवल्यास सरकार त्वरित कारवाई करत आहे तर केवळ ३२% प्रतिसादकर्त्यांनी प्रश्नाशी असहमत आहे.

आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ६८% प्रतिसादकर्ते मान्य करता की, ऑनलाइन विपणनला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार सुविधा देत आहे.

**गृहीतके –**

१) H0 : ऑनलाइन विपणन पारंपरिक विपणनची जागा घेत नाही.
H1 : ऑनलाइन विपणन पारंपरिक विपणनची जागा घेत आहे.

२) H0 : ऑनलाइन विपणन, समाजाला कोणतेही फायदे देत नाही.
H1: ऑनलाइन विपणन, समाजाला अनेक फायदे प्रदान करते.

**गृहीतके चाचणी –**

१) H0 : ऑनलाइन विपणन पारंपरिक विपणनची जागा घेत नाही.
H1 : ऑनलाइन विपणन पारंपरिक विपणनची जागा घेत आहे.

**तक्ता क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे,** ९४% प्रतिसादकर्त्यांनी हे मान्य केले की, ऑनलाइन विपणन पारंपारिक विपणन प्रणालीची जागा घेत आहे. येथे विश्लेषणानुसार आम्ही शून्य गृहितक नाकारतो आणि असा निष्कर्ष काढतो की ऑनलाइन विपणन पारंपारिक विपणनची जागा घेत आहे.

**तक्ता क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे,** ५३% प्रतिसादकर्त्यांनी हे मान्य केले की, वाणिज्य आणि व्यवसाय शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाद्वारे ऑनलाइन विपणन ज्ञान देण्यास मदत करते. येथे विश्लेषणानुसार आम्ही शून्य गृहितक नाकारतो आणि असा निष्कर्ष काढतो की ऑनलाइन विपणन पारंपारिक विपणनची जागा घेत आहे.

**तक्ता क्र. १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे,** ७१% प्रतिसादकर्त्यांनी हे मान्य केले की, ऑनलाइन विपणनला भविष्यात वाव आहे. येथे विश्लेषणानुसार आम्ही शून्य गृहितक नाकारतो आणि असा निष्कर्ष काढतो की ऑनलाइन विपणन पारंपारिक विपणनची जागा घेत आहे.

**तक्ता क्र. ११ मध्ये नमूद केल्याप्रमाणे,** ४१% प्रतिसादकर्त्यांनी हे मान्य केले की, ग्रामीण आणि अशिक्षित लोकांना ऑनलाइन विपणनबद्दल पुरेसे ज्ञान आहे, तर ३६% प्रतिसादकर्त्यांनी कदाचित पर्यायासाठी उत्तर दिले. येथे विश्लेषणानुसार आम्ही शून्य गृहितक नाकारतो आणि असा निष्कर्ष काढतो की ऑनलाइन विपणन पारंपारिक विपणनची जागा घेत आहे.

२) H0 : ऑनलाइन विपणन, समाजाला कोणतेही फायदे देत नाही.
H1: ऑनलाइन विपणन, समाजाला अनेक फायदे प्रदान करते.

**तक्ता क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे,** ९०% प्रतिसादकर्त्यांनी हे मान्य केले की, ऑनलाइन विपणनमुळे ग्राहकांना किमतीचे फायदे मिळतात. येथे विश्लेषणानुसार आम्ही शून्य गृहितक नाकारतो आणि असा निष्कर्ष काढतो की ऑनलाइन विपणन, समाजाला अनेक फायदे प्रदान करते.

**तक्ता क्र. ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे,** ७७% प्रतिसादकर्त्यांनी हे मान्य केले की, ऑनलाइन विपणनमुळे व्यवसायांना किमतीचे फायदे मिळतात. येथे विश्लेषणानुसार आम्ही शून्य गृहितक नाकारतो आणि असा निष्कर्ष काढतो की ऑनलाइन विपणन, समाजाला अनेक फायदे प्रदान करते.

**तक्ता क्र. ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे,** ७८% प्रतिसादकर्त्यांनी हे मान्य केले की, ऑनलाइन विपणन इको फ्रेंडली आहे. येथे विश्लेषणानुसार आम्ही शून्य गृहितक नाकारतो आणि असा निष्कर्ष काढतो की ऑनलाइन विपणन, समाजाला अनेक फायदे प्रदान करते.

**तक्ता क्र. ७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे,** ७८% प्रतिसादकर्त्यांनी हे मान्य केले की, वेबसाइट, ब्लॉग, पोर्टल, आणि सोशल मीडिया, व्यवसाय, संस्थांना उज्ज्वल भविष्य प्रदान करते.

**तक्ता क्र. ८ मध्ये** ७८% प्रतिसादकर्त्यांनी हे मान्य केले की की गैर-व्यावसायिक देखील ऑनलाइन विपणन चॅनेलद्वारे त्यांची उत्पादने आणि सेवांचे विपणन करू शकतात

येथे विश्लेषणानुसार आम्ही शून्य गृहितक नाकारतो आणि असा निष्कर्ष काढतो की ऑनलाइन विपणन, समाजाला अनेक फायदे प्रदान करते.

**तक्ता क्र. ९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे,** ८५% प्रतिसादकर्त्यांनी हे मान्य केले की, ऑनलाइन विपणन धोरण उत्पादने आणि सेवांचा प्रचार करण्याचा पारंपारिक मार्ग बदलू शकते. येथे विश्लेषणानुसार आम्ही शून्य गृहितक नाकारतो आणि असा निष्कर्ष काढतो की ऑनलाइन विपणन पारंपारिक विपणनची जागा घेत आहे.

**निष्कर्ष** (Conclusions) – विश्लेषणानुसार, सारण्या तयार केल्या आहेत आणि खालील निष्कर्ष काढले आहेत.

- मोठ्या संख्येने प्रतिसादकर्त्यांनी सहमती दर्शवली की ऑनलाइन विपणन पारंपारिक विपणनाची जागा घेत आहे
- वाणिज्य आणि व्यवसाय शिक्षण प्रदाते विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाद्वारे ऑनलाइन विपणन ज्ञानासाठी मदत करतात.
- मोठ्या संख्येने प्रतिसादकर्त्यांनी हे मान्य केले की ऑनलाइन विपणनमुळे ग्राहकांना किमतीचे फायदे मिळतात.
- मोठ्या संख्येने प्रतिसादकर्त्यांनी हे मान्य केले की ऑनलाइन विपणन व्यवसायांना किमतीचे फायदे प्रदान करते.
- मोठ्या संख्येने प्रतिसादकर्त्यांनी हे देखील मान्य केले की ऑनलाइन विपणन इको फ्रेंडली आहे.
- शोध इंजिन ऑप्टिमायझेशन साधन व्यवसायांना त्यांच्या वेबसाइटला शोध क्रियाकलापांमध्ये शीर्ष स्थानावर रँक करण्यात मदत करते.
- वेबसाइट्स, पोर्टल्स, ब्लॉग्स आणि सोशल मीडिया व्यवसायांना उज्ज्वल भविष्य प्रदान करण्यासाठी व्यवसायांना मदत करत आहेत.
- गैर-व्यावसायिक लोकांना त्यांची उत्पादने आणि सेवांचे विपणन करण्यासाठी ऑनलाइन विपणनचे फायदे देखील मिळतात.
- ग्रामीण आणि अशिक्षित लोकांना ऑनलाइन विपणनबद्दल पुरेसे ज्ञान आहे.
- उत्पादने आणि सेवांचा प्रचार करण्याचा पारंपरिक मार्ग बदलण्यासाठी ऑनलाइन विपणन उपयुक्त आहे.
- विश्लेषणातून असे दिसून आले आहे की ऑनलाइन विपणन भविष्यात व्यवसाय आणि ग्राहकांसाठी खर्च, वेळ आणि पर्यावरण वाचवण्यासाठी फलदायी ठरेल.

**सूचना** (Recommendations) – निष्कर्षांच्या आधारे खालील शिफारसी सुचवल्या आहेत.

- ऑनलाइन विपणनचे फायदे वेब, सोशल मीडिया, एसएमएस/एमएमएस, ई-मेल, टीव्ही इत्यादींद्वारे संप्रेषित आणि प्रसारित केले जावे.
- सध्याचा शैक्षणिक अभ्यासक्रम अद्ययावत ई-तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासक्रमासह अद्ययावत करावा.
- व्यवसायांनी ग्राहकांचे फायदे वाढवण्याकडे लक्ष दिले पाहिजे.
- व्यवसायांनीही त्यांचे फायदे वाढवण्याकडे लक्ष दिले पाहिजे.
- इंटरनेट तंत्रज्ञानाच्या मोठ्या प्रमाणावर वापरामुळे उद्भवणारे प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी सरकारी संस्था आणि व्यवसायांनी पुढाकार घेतला पाहिजे.
- ऑनलाइन विपणन व्यवसायाला उज्ज्वल भविष्य देण्यासाठी वेबसाइट्स, पोर्टल्स, ब्लॉग आणि सोशल मीडियामध्ये गरजेनुसार सतत अपडेट्स केले पाहिजेत.
- ऑनलाइन विपणनवर ग्राहकांचा विश्वास वाढवण्यासाठी ग्राहकांच्या फीडबॅकचाही विचार केला पाहिजे.
- ऑनलाइन विपणनचे ज्ञान देण्यासाठी ग्रामीण भागात, शैक्षणिक संस्थांमध्ये विशेष प्रशिक्षण सत्रे आयोजित करावीत.
- सोशल मीडिया ग्रुप्सद्वारे ऑनलाइन विपणनचे ज्ञान देण्यासाठी सेमिनार, कार्यशाळा आणि वेबिनार ऑनलाइन आयोजित केले पाहिजेत.
- ऑनलाइन विपणनला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारच्या संस्थांनी पुढाकार घ्यावा.

**संदर्भ**

१. https://www.omnicoreagency.com/digital-marketing-statistics/
२. https://www.marketo.com/digital-marketing/
३. https://www.snhu.edu/
४. https://www.simplilearn.com/history-and-evolution-of-digital-marketing-article
५. clicktecs.com/6-benefits-of-internet-marketing
६. https://www.cardinaldigitalmarketing.com/blog/top-9-benefits-of-digital-marketing/

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# मिश्रित शिक्षण

**लक्ष्मी सदाशिव कदमबांडे**
पी. ई. एस. बी. एड्. महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे

**सारांश –**

सद्यस्थितीत आपण डिजीटल युगात राहतो. जिथे सर्व माहिती एका क्षणात आपल्या समोर उपलब्ध होऊ शकते. आपण आपल्या शिक्षण प्रक्रियेचा अभ्यास केला असता असे आढळते की, पारंपारिक शिक्षण पद्धतीचा वापर आजही अध्ययन – अध्यापन प्रक्रियेत दिसून येतो. वर्तमानकाळात नाविण्य आणि अद्ययावतता ही प्रमुख गरज आहे. म्हणूनच मिश्रित शिक्षण ही एक अभिनव संकल्पना अध्यापनशास्त्रात उपयुक्त ठरलेली आहे. ज्यात पारंपारिक शिक्षण (ऑफलाइन शिक्षण) आणि आधुनिक शिक्षण(ऑनलाइन शिक्षण)यांचा सुवर्णमध्य साधून अध्ययन उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी विविध कार्यनीतीचा वापर करून फलनिष्पत्ती प्राप्त केली जाते. भारतीय शैक्षणिक व्यवस्थेतही आज मिश्रित शिक्षण उपयुक्त ठरत आहे. मागील वर्षांच्या कोविड – १९ च्या पार्श्वभूमीचा विचार करता अध्यापनशास्त्रासाठी मिश्रित शिक्षण उपयुक्त ठरले आहे. हा मिश्रित शिक्षणाचाप्रभाव आणि त्याचा शिक्षण प्रक्रियेत चढता आलेख बघता ह्या दृष्टिकोणाचे सर्वदूर अवलंब होणे आवश्यक आहे.

**कळ शब्द (Key Word) –** अध्ययन – अध्यापन प्रक्रिया,अध्यापनशास्त्र, मिश्रित शिक्षण, पारंपरिक शिक्षण, ऑनलाईन शिक्षण

**प्रस्तावना –**

शिक्षण व्यवस्था सध्या संक्रमणाच्या टप्प्यात आहे. सध्या त्यात सतत बदल होणे ही सर्वसामान्य बाब आहे. भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी एक सजग नागरिक वर्गात घडवण्याची जबाबदारी शाळेवर असते. त्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न शैक्षणिक संस्था करत असतात. आज तंत्रज्ञानाची जोड ही शिक्षण व्यवस्थेला मिळाली आहे, तिच्या मदतीने विद्यार्थी आणि शिक्षक दोन्हीही आपले ज्ञान अद्ययावत करत आहे. हा सकारात्मक बदल अध्ययन – अध्यापन प्रक्रियेसाठी आणि अध्यापानशास्त्रासाठी अतिशय महत्त्वपूर्ण ठरतो. दर्जेदार शैक्षणिक ध्येय गाठण्यासाठी नेहमीच नवीन मार्ग अवलंबले जातात. त्यातीलच एक मार्ग म्हणजे मिश्रित शिक्षण होय. डिजिटलची स्वरूपातील उत्क्रांतीही नेहमीच शैक्षणिक संस्थांमध्ये खूप मोठा प्रभाव पाडत आहे. तंत्रज्ञान आणि पारंपारिक शिक्षण पद्धती यांचे एकत्रीकरण ही शिक्षण आणि तंत्रज्ञान दोन्ही क्षेत्रानी मिळून केलेली प्रगती आहे.पारंपारिक वर्गात समोरासमोर शिक्षणासह तंत्रज्ञानाधारीत शिक्षण साधने एकत्र करणे या संकल्पनेने मिश्रित शिक्षण या शब्दाला जन्म दिला. हे शैक्षणिक क्षेत्रातील एक महत्वाचे परिवर्तन आहे.

शैक्षणिक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा उदय लक्षात घेताशाळा ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व स्तरांवर अध्ययन – अध्यापनासाठी तंत्रज्ञान अत्यावश्यक आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, मिश्रित शिक्षणतील कार्यनीतीच्या वापरासाठीची शिफारस करतो.

**मिश्रित शिक्षण –** मिश्रित शिक्षण हा शिक्षणाचा एक दृष्टीकोन ऑनलाइन शैक्षणिक साहित्य आणि पारंपारिक स्थान-आधारित वर्ग पद्धतींसह ऑनलाइन परस्परसंवादाच्या संधी एकत्र करतो. यासाठी वेळ, ठिकाण, मार्ग किंवा वेग यावर विद्यार्थ्यांच्या नियंत्रणाच्या काही घटकांसह शिक्षक आणि विद्यार्थी दोघांची शारीरिक उपस्थिती आवश्यक असते.


मिश्रित शिक्षणालाच Blended Learning, Hybrid Learning, Mix mode learning, Technology Mediated Instruction, Web - enhanced Instruction असे म्हंटले जाते.

मिश्रित शिक्षण ही एक शैली आहे ज्यात विद्यार्थी इलेक्ट्रॉनिक आणि ऑनलाइन माध्यमांद्वारे तसेच पारंपारिक पद्धतीनेही समोरासमोर शिकतात. ऑनलाईन अनुदेशनाच्या सहाय्याने विद्यार्थ्याचे अध्ययन-अध्यापन होते. औपचारिक शिक्षणात/पारंपरिक अध्ययन पद्धती यात ऑनलाईन शिक्षणाचा सहभाग करणे ह्या तत्वावर मिश्रित शिक्षण कार्य करते.

मिश्रित शिक्षणामुळे शिकण्याची प्रक्रिया अधिक मनोरंजक होते. कारण त्यात विद्यार्थ्यांचा सक्रियसहभाग असतो.. मिश्रित शिक्षणामुळे विद्यार्थी स्वत: काय शिकतात आणि ते शिकण्यासाठी किती वेळ लागतो यावर विद्यार्थ्यांना अधिक नियंत्रण मिळवता येते आणि त्यासाठी प्रयत्नही करता येतात.

**व्याख्या –**

१. Blended learning, also known as hybrid learning, is an approach to education that combines online educational materials and opportunities for interaction online with traditional place-based classroom methods. - Wikipedia
२. Blended learning is not just a trend, and we're starting to see technology integrated in really intentional ways. - Katie Linder.
३. A style of education in which students learn via electronic and online media as well as traditional face-to-face teaching. - Oxford Dictionary




आकृती क्र. १ मिश्रित शिक्षणाचे घटक

थोडक्यात संमिश्र शिक्षणात विद्यार्थी वर्गात उपस्थित राहून तंत्रज्ञानाधारीत माध्यमांचा वापर करून शिक्षकांशी आंतरक्रिया साधत असतो. परंतु मिश्रित शिक्षणाचा वापर करताना शिक्षक नियोजन करत असतो. नियोजन करत असताना विद्यार्थ्याना कोणती माहिती द्यावयाची आहे, अध्यायनांसाठी माध्यमे पुरेशी आहेत का? तंत्रज्ञान माध्यमांची निवड करताना येणारे अडथळे, तसेच कोणत्या अध्ययन कृतींची मांडणी करावयाची या सर्वांचा विचार करणे गरजेचे असते. मिश्रित शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांस दररोज वर्गात येणे शक्य नसल्यास तो घरी राहून ऑनलाईन पाठ, प्रकल्प, गृहकार्य इ. द्वारे अध्ययन करू शकतो. परंतु या दरम्यान शिक्षकांना भेटून अध्यायनाचा विकास कसा होत आहे हे प्रश्न विचारून, चर्चा करून कठीण संकल्पना समजून घेण्यासाठी शिक्षकांची मदत घेऊन, जाणून घेणे गरजेचे असते. अन्यथा विद्यार्थी पारंपरिक रीतीने वर्गात उपस्थित राहून ऑनलाईन किंवा तंत्रज्ञानधारित माध्यमांच्या सहाय्याने वैयक्तिक अध्ययन करू शकतो.

**मिश्रित शिक्षणाचे वैशिष्ट्ये –**

१. **विद्यार्थ्यांना दोन पद्धतींचा पर्याय** – पारंपारिक आणि तंत्रज्ञान हे दोन पर्याय अध्यायनासाठी विद्यार्थ्यांकडे उपलब्ध असतात.

२. **शिक्षकांना या दोन्ही पद्धतींची उत्तम जाण** – मिश्रित शिक्षणाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. शिक्षक अतिशय गतिमान, तंत्रज्ञ आणि पूर्णत: सक्षम असतात. त्यामुळेच पारंपारिक वर्ग आणि तंत्रयज्ञानाधारीत वर्ग या दोघांमध्ये कार्यक्षमतेने काम करू शकतात. त्यायोग्य प्रशिक्षण त्यांना प्राप्त असते.

३. **आभासी जगातील परस्पर आंतरक्रिया** – अध्ययनाच्या या प्रक्रियेत विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांशी संवादसाधण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो. आकाराने मोठा आणि विविधतेने पूर्ण असलेल्या गटात ज्ञानाचे देवाणघेवाण होते.

४. **विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञान वापरण्याचा अनुभव** – सध्याचे शतक हे आयसीटीचे शतक आहे. आज ज्याला तंत्रज्ञानाचे ज्ञान नसलेल्या व्यक्तीला निरक्षर म्हणून ओळखले जाते. पण हे तंत्रज्ञान शिकण्याची संधी एकप्रकारे मिश्रित शिक्षण प्रदान करत असते. मिश्रित शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना अनुभव समृद्ध करण्यासाठी मदत होते.

५. **विविध कौशल्यांचे प्रशिक्षण** – निर्णय क्षमता, आंतरक्रिया, संप्रेषण कौशल्य, स्व-व्यवस्थापन, चिकित्सक विचार, तार्किक विचार, तंत्रज्ञान, वेळेचे व्यवस्थापन या कौशल्याच्या विकसनाची संधी मिळते.

६. **बहुसांस्कृतिक आणि बहुआयामी दृष्टिकोण** – मिश्रित शिक्षण हे विद्यार्थ्यांना संप्रेषणाची आणि त्यांचे विचार एकमेकांशी देवाणघेवाण करण्याची विद्यार्थ्यांना संधी देतो. त्यामुळे जागतिक स्तरावर आपण विचार, कल्पना, माहिती, अनुभव यांची देवाणघेवाण करू शकतो.

७. **विद्यार्थीकेंद्रित शिक्षण** – विद्यार्थ्याच्या गरजा जाणून घेऊन त्याप्रमाणे अध्ययन अनुभव देण्यासाठीच्या कार्यनीतीची योजना यात केलेली असते, त्यामुळे विद्यार्थ्याला केंद्रस्थानी ठेऊन सर्वोत्तम अध्ययन अनुभव पुरविले जातात.

८. **विद्यार्थ्यांचेअध्यायनातील वाढलेले अवधान** – आधुनिक तंत्रज्ञान आणि विविध साधनांच्या मदतीने केलेले अध्यापन हे मनोरंजक होते. तसेच विद्यार्थ्यांचे लक्ष टिकवून ठेवते त्यामुळे विद्यार्थ्याची अवधान कक्षा वाढण्यासाठी मदत होते.

९. **लवचिकता** – क्लिष्ट विषय वर्गात समाविष्ट केले जाऊ शकतात आणि अध्ययन सामग्रीचा एक भाग ऑनलाइन उपलब्ध असल्याने, विद्यार्थी दिलेल्या वेळेत विषय शिकण्याचे काम करू शकतात.

१०. **कार्यक्षम** – सुनियोजित योजनेमुळे शिक्षक अधिक कार्यक्षमतेने आणि त्वरीतरितीने मोठ्या प्रेक्षकांपर्यंत अध्ययन विषय पोहचवू शकतात. तसेच, व्हिडिओ, रेकॉर्डिंग आणि ई-पुस्तके यासारख्या डिजिटल सामग्रीचा पुनर्वापार वापर केला जाऊ शकतो.

११. **वाढलेला अध्ययन विस्तार** – मिश्रित शिक्षणामुळे वर्गातील अध्यापनाचा वेळ कमी होतो. प्रतिभावान शिक्षक किंवा विषय तज्ञ त्यांच्या कौशल्याचा उपयोग करून, अध्ययन सामग्रीच्या सहय्याने ठराविक भागपूरतच मर्यादित न रहाता जगभरातील विद्यार्थ्यांना शिकवता येते.

१२. **सहयोगची संधी** – ऑनलाइन कार्य, चर्चा, यामुळे विद्यार्थ्यांच्या सहकार्य भावनेस प्रोत्साहन मिळते.त्यामुळे त्यांना ऑनलाइन आणि

ऑफलाइन/समोरासमोर वर्गात असताना दोन्ही पद्धतीने आंतरक्रियेची संधी मिळते.

१३. **वैयक्तिक शिक्षणास समर्थन** – प्रत्येक व्यक्ती अनोख्या पद्धतीने शिकत असते आणि मिश्रित शिक्षण त्यास समर्थन देते.

**मिश्रित शिक्षण वातावरणाची महत्त्वाची वैशिष्ट्ये –**


१. विद्यार्थ्यांची शिकण्याच्या प्रक्रियेतील गुंतवणूक वाढते.
२. शिक्षक आणि विद्यार्थी आंतरक्रिया सुव्यवस्थित होते.
३. विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोणाचा स्वीकार केल्यामुळे विद्यार्थी शिकण्याची जबाबदारी घेतात.
४. लवचिकता राखून वेळचे व्यवस्थापन करता येते.
५. अध्ययन फलनिष्पत्तीत वाढ दिसून येते.
६. शिकण्यासाठीचे वातावरण हे पूरक असते.
७. अनुभवात्मक शिक्षणासाठी उत्तम संधी दिली जाते.

**मिश्रित शिक्षणासाठीची तंत्रज्ञानाधारीत माध्यमे –**




आकृती क्र. २मिश्रित शिक्षणाची तंत्रज्ञानाधारीत माध्यमे

**मिश्रित शिक्षणाची वर्गातील अंमलबजावणीच्या पायऱ्या –**




आकृती क्र. ३ मिश्रित शिक्षणाची वर्गातील अंमलबजावणीच्या पायऱ्या

**मिश्रित शिक्षणाचे फायदे –**

**१. विद्यार्थी अध्ययनात लवचिकता –** पारंपरिक पद्धतीने अध्ययन करण्यासाठी विद्यार्थ्यांना वर्गात उपस्थित राहणे गरजेचे असते. परंतु संमिश्र अध्ययनात विद्यार्थी त्याच्या ज्ञान, कौशल्ये, वेळ यानुसार तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाईन अध्ययन कृ शकतो. तसेच विद्यार्थी अध्यायनासाठी स्वयंनिर्भर होऊन वैयक्तिक अध्ययन करू शकतो.

**२. तंत्रज्ञानाचा अध्यायनासाठी वापर –** संमिश्र अध्यायनासाठी विद्यार्थ्याने समोरसमोर उपस्थित राहून तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून ऑनलाईन अध्ययन कीने गरजेचे असते. आशय व उद्दिष्टाना अनुसरून आशय सदरीकरणांसाठी नवीन तंत्रज्ञानाचे उपयोजन संमिश्र शिक्षणात केले जाते.

**३. प्रगत तंत्रज्ञान वापराच्या कौशल्यात वाढ –** शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कोणत्या आशयाचे ज्ञान द्यावयाचे आहे, त्या आशयानुरूप प्रभावी आंतरक्रिया घडून येण्यासाठी, प्रगत तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. मिश्रित अध्ययनात विद्यार्थी स्वत: तंत्रज्ञानाची हाताळणी करत असल्याने विद्यार्थ्याच्या तंत्रज्ञान वापरण्याच्या ज्ञान व कौशल्यात वाढ होते.

उदा. – ब्लॉग्स, विकी, ऑनलाईन पाठ, इंटरनेट, ऑनलाईन कॉन्फ्रेंस, इ – मेल इ. वापराचे ज्ञान प्राप्त होण्यास मदत होते.

**४. एकाचवेळी अधिकाधिक विद्यार्थ्यांशी आंतरक्रिया –** पारंपरिक पाठ घेतानाशिक्षकांना एकाच वेळी आशयाद्वारे सर्व विद्यार्थ्यांशी आंतरक्रिया साधने अडचणीचे जाते. परंतु मिश्रित शिक्षण करत असताना विद्यार्थी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वैयक्तिक ऑनलाईन अध्ययन करतो. त्यामुळे शिक्षक, विद्यार्थी व आशय यामध्ये प्रभावी आंतरक्रिया साधने सोपे जाते.

**५. किफायतशीर अध्ययन –** अध्यापन प्रक्रिया शक्य – शिक्षकांस मिश्रित शिक्षणाद्वारे प्रत्येक विद्यार्थ्यांशी कमी वेळ, कमी खर्च व कमी श्रमात सहजपणे प्रत्यक्ष आंतरक्रिया साधने शक्य होते. कमी वेळ, कमी श्रम व कमी पैशात प्रभावीपणे अध्ययन निष्पत्ती करण्यासाठी संमिश्र शिक्षण कायदेशीर आहे.

**६. विद्यार्थ्यांना पूर्ण वेळ अध्यायनाची संधी प्राप्त –** मिश्रित शिक्षणात अधिकाधिक प्रगत व ऑनलाईन साधनांचा वापर केल्याने विद्यार्थी २४x७ वेळेत वैयक्तिक अध्यायनाद्वारे अक्षय ज्ञान व कौशल्य प्राप्त करू शकतो. म्हणून विद्यार्थ्यास पूर्ण वेळ अध्यायनाची संधी मिळते.

**७. परिणामकारक अभ्यासक्रमपूर्ती –** शिक्षक आपला अक्षय प्रगत तंत्रज्ञानाद्वारे विद्यार्थ्यांसामोर परिणामकारक रीतीने सादर करू शकतो. तसेच विद्यार्थी आपली गती, ज्ञान, बौद्धिक क्षमता याद्वारे तंत्रज्ञानाची हाताळणी करून आशयाचे ज्ञान प्राप्त करू शकतो. म्हणून शिक्षणाद्वारे शिक्षक व विद्यार्थी दोन्ही घटक एकाच वेळी परिणामकारक रीतीने अभ्यासक्रमाची पूर्तता करू शकतात.

**मिश्रित शिक्षणाचे तोटे –**

१. मिश्रित शिक्षणात काही प्रमाणात विद्यार्थ्यांशी शिक्षकांचा प्रत्यक्ष संपर्क न आल्यामुळे आशयाचे ज्ञान मिळवण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात.
२. तंत्रज्ञान हाताळणीमध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात, तसे झाल्यास ज्ञान मिळण्यासाठी विद्यार्थ्यांना सोयीचे होणार नाही.
३. मिश्रित शिक्षणामुळे विद्यार्थी काही प्रमाणात निष्क्रिय राहू शकतात.
४. ई – अध्ययन प्रणालीमध्ये अध्ययन परिस्थितीला कमी महत्त्व प्राप्त होते.
५. विद्यार्थ्यांना अध्यायनासाठी प्रेरणा, प्रबलन कमी प्रमाणात दिले जाते.
६. विद्यार्थ्यांना अध्यायनाच्या वाईट सवाई लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.
७. कदाचित काही कारणास्तव प्रत्यक्ष अध्यायनापेक्षा संमिश्र शिक्षण कमी परिणामकारक ठरू शकते.
८. मिश्रित शिक्षणासाठी विद्यार्थी तंत्रज्ञानाच्या बाबतीत पूर्णत: साक्षर असणे गरजेचे असते. परंतु सर्वच विद्यार्थ्यांना प्रगत तंत्रज्ञान हातळता येईलच असे नसते.
९. मिश्रित शिक्षणाच्या परिमाणकारकतेसाठी विद्यार्थ्यांनी सराव करणे गरजेचे असते.
१०. प्रगत तंत्रज्ञान सर्वच विद्यार्थ्यांकडे उपलब्ध असेलच असे नाही.

**मिश्रित शिक्षणात शिक्षकाची भूमिका –** शिक्षण क्षेत्रात होणाऱ्या उत्क्रांतीमुळे शिक्षकाच्या भूमिका ही बदलत आहेत. म्हणूनच मिश्रित शिक्षणात शिक्षकाची भूमिका ज्ञानदाता यावरून प्रशिक्षक आणि मार्गदर्शक अशी बदलत जाते. यामुळे शिक्षककेंद्री दृष्टिकोण हा विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोणाकडे नेण्यास मदत होते. पारंपरिक पद्धती ही बहुधा शिक्षककेंद्रिततसेच संपूर्ण वर्गासाठी एकच अध्यापन पद्धती किंवा कार्यनीती या तत्वावर चालते. वैयक्तिक भेदाकडे दुर्लक्ष होते. परंतु मिश्रित शिक्षणात विद्यार्थ्यांमधील भेद व त्यांचीअध्ययन शैली, गती लक्षात घेऊन तंत्रज्ञानाच्या आधारे त्यांना त्याच्या गतीने सहजरित्या शिकण्याची संधी देते.मिश्रित शिक्षणात शिक्षक ऑनलाइन सूचनांदरम्यान विद्यार्थ्यांना वैयक्तिक शैक्षणिक अनुभव देऊन अध्ययन प्रक्रियेत व्यस्त ठेवतात. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान प्रेरणा, प्रोत्साहन, मार्गदशन देण्यासाठी शिक्षकाची आवश्यकता मिश्रित शिक्षणात असते.मिश्रित शिक्षणाच्या गतिमानतेमुळे विद्यार्थी आणि शिक्षकांना फायदा होतो. सक्रिय विद्यार्थी घडविण्याच्या उद्देशाने शिक्षक विद्यार्थ्यांना अध्ययन – अध्यापनाच्या प्रक्रियेत समाविष्ट करून घेतात. त्यातून विद्यार्थ्यांना स्वतंत्र, स्वत:च्या गती आणि शैलीने अध्ययन करता येते. विद्यार्थ्यांच्या काही आवश्यक बाबींवर नियंत्रण ठेऊन त्याच्यात स्वावलंबन विकसित करण्यात मदत केली जाते. त्याचबरोबर शिक्षकाच्या इतर भूमिका –

१. अशयास व विद्यार्थ्यांस अनुरूप अध्ययन आराखडा तयार करणे.
२. विविध माध्यमांची निवड करून त्यांचे योग्य एकत्रीकरण करणे.
३. विद्यार्थ्यांना योग्य गती व दिशा देणे.
४. अध्यायनासाठी प्रेरणा देणे.
५. अध्यायनादरम्यान विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीविषयी मार्गदर्शन करणे.

६. विद्यार्थी अध्ययन करत असताना त्यांचे सातत्याने मूल्यमापन करून विद्यार्थी योग्य दिशेने जात आहे की नाही त्याची तपासणी करणे.
७. विद्यार्थ्यांना स्वागतीने स्वयंपूर्ण रीतीने अध्ययन करण्याची संधी उपलब्ध करीन देणे.

**मिश्रित शिक्षणात विद्यार्थ्यांची भूमिका –**

१. **विद्यार्थ्यांची आवड किंवा अभिरुची –** जेव्हा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञान समाकलित केले जाते, तेव्हा शिकणाऱ्यांची शक्यता जास्त असते.ते ज्या विषयांचा अभ्यास करतात त्याबाबत ते उत्साही असतात व त्या विषयात स्वारस्य ही दाखवतात.
२. **स्वायत्तता –** ई-लर्निंग सामग्रीचा वापर केल्यानेविद्यार्थ्यांमध्ये प्राप्त करण्याचीउद्दिष्टे ठरवण्याची क्षमता प्राप्त होते. त्यामुळे ते स्वतःच्या शिक्षणाची जबाबदारी घेतात आणि आपल्या गतीने शैक्षणिक अनुभव प्राप्त करतात.
३. **निदान आणि अभिप्राय –** कामाचे विश्लेषण, पुनरावलोकन आणि अभिप्राय देण्याची क्षमता शिक्षकांना प्राप्त होते.
४. **स्वत:च्या गतीने शिकण्यास प्रोत्साहन –** मिश्रित शिक्षणातील लवचिकतेमुळे आणि इंटरनेट संसाधनांमुळे विद्यार्थ्यांनास्वत: च्या गतीने शिकता येते.
५. **विद्यार्थी स्वयं-चालित** वृत्तीने काम करत असल्याने जबाबदार होतात. ते स्वत:च्या संपादणुकीचा अंदाज स्वत: घेऊ शकतात.
६. **विद्यार्थ्यांना भविष्यासाठी** तयार करते. वास्तविक जीवनात उपयुक्त ठरणारी कौशल्ये विकसित करण्यास मदत करते. –

- संशोधन कौशल्ये
- स्वयं-शिक्षण
- स्व-मग्नता
- आंतरिक प्रेरण
- निर्णय क्षमता
- जबाबदारीची जाण
- संगणक साक्षरता

**निष्कर्ष –**

१. मिश्रित शिक्षण ही एक अशी संकल्पना आहे ज्यामध्ये योजना/मांडणी समाविष्ट आहे. ज्यात समोरासमोरील अध्यापन प्रक्रिया आणि तंत्रज्ञानाआधारित साधने यांची सांगड घातली जाते. प्रत्यक्ष सूचना व अप्रत्यक्ष सूचना, सहयोगी शिक्षण, वैयक्तिक संगणक सहाय्य यात दिसून येते.
२. हे विद्यार्थ्यांना वेळेची लवचिकता आणि सुधारित शिक्षण परिणाम प्रदान करते.
३. मिश्रित शिक्षण अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणातील भौतिक आणि सांस्कृतिक अडथळ्यांमधून बाहेर पडण्याचा खुला मार्ग प्रदान करते.
४. वर्गात तंत्रज्ञान वापरण्यास शिकून, शिक्षक आणि विद्यार्थी दोघेही २१ व्या शतकासाठी आवश्यक कौशल्ये विकसित होतात.
५. भविष्यात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेली चिकित्सक विचारसरणी आणि कामाच्या ठिकाणी आवश्यक असलेली कौशल्ये विकसित करण्यास मदत होते.
६. शिक्षण हे केवळ तथ्ये-आकडे शिकणे आणि लक्षात ठेवणे इतकेच मर्यादित राहिलेले नाही; हे इतरांशी सहयोग करणे, जटिल समस्या सोडवणे, विविध प्रकारचे आंतरक्रिया करणे, नेतृत्व कौशल्ये विकसित करणे, प्रेरणा देणे आणि शैक्षणिक उत्पादकता सुधारणे याच्याशीही निगडीत आहे.
७. प्राथमिक स्वरूपाचे अडथळे आणि आव्हाने असूनही, भारतासारख्या विकसनशील देशात मिश्रित शिक्षणाचा अवलंब मोठ्या प्रमाणात दिसून येतो. किंबहुना, सध्याचा मिश्रित शिक्षण वापराच्या वाढीचा दर असाच सुरू राहिल्यास, भारत लवकरच मिश्रित शिक्षण पद्धती वापरात पाश्चात्य देशांना मागे टाकू शकेल.
८. उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये मिश्रित शिक्षणाची अंमलबजावणी करण्याचे आव्हान सध्या आहे. ते वेळेशी संबंधित आहे. मोठ्या संख्येसाठी मिश्रित शिक्षण अभ्यासक्रमाचे नियोजन आणि विकास करण्यासाठी सामान्यत: पारंपारिक स्वरूपात समान अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी लागणाऱ्या वेळेपेक्षा दोन ते तीन पट वेळ लागतो.
९. करोनाकाळात ऑनलाइन शिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. यामुळे त्या काळात मिश्र शिक्षणपद्धतीचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात आला.

**संदर्भ**

१. डॉ. सीमा दामले व प्रा. सुवर्णा भागवत, (२०१६ जानेवारी), 'प्रगत अध्यापनशास्त्र व माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचे उपयोजन', सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे.
२. सूर्यवंशी. डी. ए.,(२०१५ जून), 'शैक्षणिक तंत्रविज्ञान', प्रशांत प्रकाशन, पुणे.
३. डॉ. शैलजा भंगाळे,डॉ. जयश्री नेमाडे आणि डॉ. पिंगला धांडे, (२०१७ जानेवारी), 'माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचे चिकित्सक आकलन, प्रशांत प्रकाशन, पुणे.
English References -
१. rulsamy, S. and Sivakumar, P. (2009). pplication of ICT in Education, Neelkamal Publications Pvt. Ltd, Hyderabad.
२. Best, J.V. and Khan, J. Researched by prentice hall of India Pvt. Ltd., New Delhi. 110001
Internet References -
१. Blended learning: https://en.wikipedia.org/wiki/Blendedšlearning
२. Blended learning. http://edutechwiki.unige.ch/en/blendedšlearning
३. The Role of Teacher in Blended Learning Classroom - www.edgenuity.como>

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील तंत्रविज्ञान वापर एक अभ्यास

**सौ. क्रांती संदेश क्षीरसागर.**
शारीरिक शिक्षण संचालक, महात्मा गांधी शिक्षण मंडळ,
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चोपडा जि. जळगाव

**सारांश –**

प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांमध्ये ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील खउढ तंत्रविज्ञान वापर या घटकाच्या तुलनात्मक अभ्यास केला असून संशोधनात ५० विद्यार्थी निवडले माहिती संकलन करण्यासाठी स्वयंनिर्मिती चाचणीचे विकसन करण्यात आले होते. माहितीचे विश्लेषण व अन्वयार्थ लावण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन,'ी'मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब केला आहे.

**निष्कर्ष –** ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील टेलिव्हिजन तंत्रविज्ञान वापर या घटकाच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**प्रास्ताविक –**

मानवी जीवनामध्ये खेळाला अतिशय महत्त्व आहे. शरीर आणि मन आनंदी ठेवण्याचे कार्य खेळ करते. व्यायाम हा ही एक महत्त्वाचा भाग आहे. शारीरिक श्रमाच्या खेळामध्ये खूप व्यायाम होते. भारतामध्ये प्राचीन काळापासून खेळाला महत्त्व देण्यात आले आहे. वैदिक काळात किंवा रामायण, महाराभारताच्या काळामध्ये अनेक प्रकारचे खेळ खेळले जात असे. खेळाला आपल्या व पाश्चात्य देशातही फार मोठा इतिहास आहे खेळ ही मुलाची नैसर्गिक प्रवृत्ती असल्यामुळे मुले सहजपणे खेळ खेळतात त्यामुळे त्याच्या विविध शारीरिक हलचाली झाल्यामुळे त्यांच्यावरील ताणतणाव कमी होतो. असे तणाव रहीत मुले अधिक कार्यक्षम बनतात म्हणूनच मुलांना शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर खेळाचे फार महत्त्व आहे. कारण अशा खेळामुळे सुप्त गुण विकसीत होतात त्यामुळे व्यक्तीमत्त्व विकासात शारीरिक क्षमता वाढवतात त्यामुळे खेळाला महत्त्व दिले जाते.विविध डिजिटल व्यासपीठे, सोशल मिडिया आणि आभासी विश्वात संवाद साधण्यासाठी असलेले तंत्रज्ञान, ज्यांना माहिती व प्रसारण तंत्रज्ञान (information and communication technology AWdm ICT) असे संबोधले जाते, ते सर्व आता विविध खेळांचा अविभाज्य घटक बनले आहेत.

भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई येथील डॉ. विद्या सुब्रमण्यन आणि इन्स्टिट्युट फॉर रिसर्च अँड इनोवेशन इन सोसायटी (IFRIS), फ्रांस येथील डॉ. मारिआन नोएल यांच्या नेतृत्वाखाली संशोधकांच्या गटाने नुकत्याच केलेल्या अभ्यासात असे दिसून आले की ICT हा खेळाचा केवळ एक निष्क्रिय भाग नसून त्याचा संबंधित लोकांच्या जीवनावर आणि त्याच्याशी निगडित असलेल्या अर्थव्यवस्थेवर देखील परिणाम होतो.

तंत्रज्ञानाचा वापर आज प्रत्येक क्षेत्रात होत असून त्यामध्ये देखील तंत्रविज्ञानाचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे खेळाडू प्रत्यक्ष खेळण्यापूर्वी सराव करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करतात तसेच विरोधी स्पर्धकाला हरविण्यासाठी कोणते डावपेच वापरावे याची निश्चिती कशी करावी यासाठी देखील तंत्रविज्ञान आज उपयोगी होतं ज्या पद्धतीने शिक्षण क्षेत्रात तंत्रविज्ञान समावेश झालेला आहे त्याच पद्धतीने क्रीडा क्षेत्रातील विविध सराव करण्यासाठी तंत्रविज्ञान हे स्पर्धकाला अत्यावश्यक वाटणारी महत्त्वपूर्ण बाब आहे. विविध स्पर्धांचा सराव करण्यासाठी अथवा विविध क्रीडा खेळांचा सराव करण्यापूर्वी खेळाडू नेमक्या कोणकोणत्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आज करतात त्याविषयीची सद्यस्थितीचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधनाचे कार्य हाती घेण्याचे ठरविले होते.

**समस्या विधान –** ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील खउढ तंत्रविज्ञान वापर या घटकाच्या तुलनात्मक अभ्यास करणे.

**उद्दीष्ट् –**

१. ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील यूट्यूब तंत्रविज्ञान वापर या घटकाच्या तुलनात्मक अभ्यास करणे.
२. ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील फेसबुक तंत्रविज्ञान वापर या घटकाच्या तुलनात्मक अभ्यास करणे.
३. ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील टेलिव्हिजन तंत्रविज्ञान वापर या घटकाच्या तुलनात्मक अभ्यास करणे.
४. ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील ICT तंत्रविज्ञान वापर या घटकाच्या तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिकल्पना –**

१. ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील यूट्यूब तंत्रविज्ञान वापर या घटकाच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
२. ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील फेसबुक तंत्रविज्ञान वापर या घटकाच्या मध्यमान

गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

३. ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील टेलिव्हिजन तंत्रविज्ञान वापर या घटकाच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.


४. ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील खउढ तंत्रविज्ञान वापर या घटकाच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

संशोधनाची कार्यपद्धती

| **संशोधन पद्धती** - सर्वेक्षण पद्धती | |
|---|---|
| **जनसंख्या** | ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयात प्रथम व दुसऱ्या वर्षाला प्रवेश सर्व विद्यार्थी |
| **न्यादर्श** | लॉटरी व सहेतुक नमुना निवड पद्धती- महाविद्यालयातील प्रथम व दुसऱ्या वर्षाला प्रवेशित सर्व विद्यार्थी - ग्रामीण (20) + शहरी (30) = 50 |
| **संशोधन साधने** | स्वनिर्मित खेळाडूंच्या सरावातील तंत्रविज्ञान वापर मापिका' **विधाने**- 20, **प्रतिसाद**- होय, नाही व सांगता येत नाही. **घटक**- फेसबुक तंत्रविज्ञान, यूट्यूब तंत्रविज्ञान, टेलिव्हिजन तंत्रविज्ञान. |
| **संख्याशास्त्रीय परिमाणे**- मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य | |

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन –** ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील तंत्रविज्ञान वापर एक अभ्यास संदर्भात स्वनिर्मित शोधिका देण्यात आली होती. त्यास दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण करून पुढील प्रमाणे परिकल्पना परीक्षण करण्यात आले होते..

| खेळांचा सरावातील तंत्रविज्ञान वापर | | N | M | SD | Table 't' value | Obtained 't' value | Decision |
|---|---|---|---|---|---|---|---|
| फेसबुक तंत्रविज्ञान | ग्रामीण विद्यार्थी | 20 | 9.10 | 1.25 | 2.00 | 1.10 | स्वीकार |
| | शहरी विद्यार्थी | 30 | 9.20 | 1.11 | | | |
| यूट्यूब तंत्रविज्ञान | ग्रामीण विद्यार्थी | 20 | 12.11 | 1.07 | | 1.21 | स्वीकार |
| | शहरी विद्यार्थी | 30 | 11.78 | 1.13 | | | |
| टेलिव्हिजन तंत्रविज्ञान | ग्रामीण विद्यार्थी | 20 | 98.4 2 | 1.23 | | 1.43 | स्वीकार |
| | शहरी विद्यार्थी | 30 | 8.89 | 1.32 | | | |
| ICT | ग्रामीण विद्यार्थी | 20 | 11.23 | 1.27 | | 1.20 | स्वीकार |
| | शहरी विद्यार्थी | 30 | 11.00 | 1.23 | | | |




**विश्लेषण व अर्थनिर्वचन –**

**परिकल्पना ०१ –** स्वाधीनता मात्रा (४८) साठी ०.०५ सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य २.०० आहे. प्राप्त मूल्य १.१० असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील फेसबुक तंत्रविज्ञान वापर या घटकाच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**परिकल्पना ०२ –** स्वाधीनता मात्रा (४८) साठी ०.०५ सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य २.०० आहे. प्राप्त मूल्य १.२१ असून ते टेबल 't'

E-ISSN : 2348-7143
April : 2022

मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील यूट्यूब तंत्रविज्ञान वापर या घटकाच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**परिकल्पना ०३** – स्वाधीनता मात्रा (४८) साठी ०.०५ सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य २.०० आहे. प्राप्त मूल्य १.४३ असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील टेलिव्हिजन तंत्रविज्ञान वापर या घटकाच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**परिकल्पना ०४** – स्वाधीनता मात्रा (४८) साठी ०.०५ सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य २.०० आहे. प्राप्त मूल्य १.२० असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील खउढ वापर या घटकाच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**निष्कर्ष** –

१. ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील यूट्यूब तंत्रविज्ञान वापर या घटकाच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

२. ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील फेसबुक तंत्रविज्ञान वापर या घटकाच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

३. ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचा सरावातील टेलिव्हिजन तंत्रविज्ञान वापर या घटकाच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**संदर्भ**

१) Best Kahn. (2006). Research in Education (9th Ed). Delhi: Prentice Hall of India.
२) Garrett, H .E. (2006). Statistics in Psychology Education (1st Ed. Indian Reprint). Delhi: Sage Publication.
३) Kumar, Ranjit. (2011). Research Methodology a step by step guide for beginners (3rd Ed). New Delhi: Sage Publication.
४) Raja Kumar, P.G. (2013). Research Methodology (1st Ed). Delhi: PH Publishing Corporation.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# कोविड- १९ चा भारतीय शेतीवरील परिणाम

**प्रा. शुभम मनोहर सुरवाडे**
अर्थशास्त्र संशोधन केंद्र, डी.डी.एन.भोळे कॉलेज, भुसावळ जिल्हा - जळगाव

**प्रा. डॉ. जयश्री पुरोषोत्तम सरोदे**
अर्थशास्त्र संशोधन केंद्र, डी.डी.एन.भोळे कॉलेज, भुसावळ जिल्हा - जळगाव

**प्रस्तावना -**

कोरोना हे एक विषाणू समुहाचे नाव आहे. कोरोना विषाणू पहिल्यांदा १९३० च्या दशकात प्राण्यांमध्ये सापडल्याचे दिसून येते. त्यानंतर १९६० च्या दशकात मानवामध्ये कोरोना विषाणू आढळला. भारतात २००३ मध्ये आढळलेला सार्स व २०१२ मध्ये आढळलेला मार्स हे सुद्धा कोरोना पासून आढळलेले आजार आहेत; परंतु २०१९ मध्ये चीनमधील हुबेई प्रांतातील वुहान शहरात आढळलेला करोना विषाणू हा इतर कोरोना विषाणूपासून वेगळा आहे, म्हणून त्याला जागतिक आरोग्य संघटनेने नॉवेल म्हणजेच नवीन कोरोना विषाणू संबोधीत करून या आजारास COVID १९ असे नाव दिले.या विषाणूची सुरवात चीन मधील वुहान या शहरात डिसेंबर २०१९ पासून झाली व त्यानंतर या विषाणूचा प्रसार संपूर्ण जगात झाला.

भारतात कोरोनाचा पहिला रुग्ण २७ जानेवारी २०२० रोजी तृशुर, केरळ मध्ये सापडला व त्यानंतर भारतासह इतर देशांतही कोरोनाचा प्रसार झपाट्याने झाला.३१ जानेवारी २०२० रोजी जागतिक आरोग्य संघटनेने जागतिक आणीबाणी घोषित केली. जगातील सर्वच देशांना त्याचा परिणाम भोगावा लागला. भारतातहीसामाजिक, आर्थिक, राजकीय घटकांवर परिणाम झालेला आपल्याला दिसून येतो. या सर्व गोष्टी विचारात घेता सरकारने या उद्रेकावरील उपाययोजना म्हणून काही निर्णय घेण्यात आले. भारत सरकारने मार्च २०२० पासून लॉकडाऊनची घोषणा केली व महामारी अधिनियम १८९७ लागू केला. जमावबंदी कलम १४४ लागू करण्यात आले. यामुळे अनेक गोष्टींवर त्याचा विपरि त परिणाम झाला. लोकांचे जीवनमान विस्कळीत झाले, वाहतुकीच्या सुविधा बंद झाल्या, बाजारपेठ बंद झाल्या, शेयर मार्केटमध्ये उतार झाला, अनेक लोकांना आपल्या गावी परत जावे लागले. एकंदरीत या सर्व गोष्टींचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवरही झालेला दिसून येतो. त्याचप्रमाणे जागतिक अर्थव्यवस्थेवर दिसून येतो. १९२९ च्या महामंदीनंतर आपल्याला २०२० मध्ये जागतिक आर्थिक महामंदी बघायला मिळते.

कोविड १९ मुळे झालेले परिणाम हे काही अल्पकालीन आहेत तर काही दीर्घकालीन आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्र, उद्योग क्षेत्र व सेवा क्षेत्र यांचावरही झालेले परिणाम हे काही अल्पकालीन आहेत, तर काही दीर्घकालीन आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार करता कोरोना महामारीच्या अगोदरही भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर हा कमी होता. २०१९ मध्ये जागतिक बँकेने जाहीर केलेल्या अहवालात (Global GDP Ranking of 2018) २०१८ मध्ये भारतीय GDP २.७३ मिलीयन डॉलरहोता.२०१७ ला हा GDP २.६५ डॉलर होता. २०१७ व २०१८ ची तुलना करता त्यात ०.८ % केवळ वाढ झालेली दिसते व ५ व्या क्रमांकावरील वरील अर्थव्यवस्था ७ व्या क्रमांकावर आलेली दिसते.मागील काही वर्षातील जीडीपी वृद्धी दर -

| वर्ष | जीडीपी % |
|---|---|
| २०१२ - २०१३ | ५.५ % |
| २०१३ - २०१४ | ६.४ % |
| २०१४ - २०१५ | ७.४ % |
| २०१५ - २०१६ | ८.०० % |
| २०१६ - २०१७ | ८.३ % |
| २०१७ - २०१८ | ६.८ % |
| २०१८ - २०१९ | ६.५ % |
| २०१९ - २०२० | ४.० % |
| २०२० - २०२१ | -७.३ % |

स्रोत : (बालाजी सुरणे, दिव्या महाले-सुरणे (२०२२) 'सिम्प्लिफाईड चालू घडामोडी डायरी', सिम्प्लिफाईड पुब्लिकेशन,सोलापूर पृ.क्र. ३९)

मागील काही GDP च्या वृद्धी दराची टक्केवारी पाहता आपल्या असे लक्षात येते, की कोरोना महामारीच्या काळाच्या अगोदरही भारताचा वृद्धी दर हा कमी होता व महामारीनंतर खूपच कमी होऊ न उणे -७.३ % पर्यंत गेलेला दिसतो.

**भारतातील कृषी क्षेत्र का? -** भारत हा कृषीप्रधान देश असून शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतातील आज ७०% लोकसंख्या ग्रामीण भागातील आहे व त्यांचा मुख्य व्यवसाय शेती असून त्यांचा उदरनिर्वाह हा शेतीवर अवलंबून आहे. आज भारतात औद्योगिक व सेवा क्षेत्राला मोठा विकास झाला असला तरी त्यासाठी लागणारे पूरक घटक हे शेती व त्या संलग्नित क्षेत्राकडून पुरविले जातात. म्हणजेच कृषी क्षेत्र अविकसित राहिले, तर बाकी क्षेत्रांच्या विकासावरही मर्यादा येतात. राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी क्षेत्राचा हिस्सा स्वतंत्र्य प्राप्तीच्या वेळी ५०% होता. नंतर ही टक्केवारी जरी घसरलेली असली, तरी हा घटता कृषी क्षेत्राचा हिस्सा अर्थव्यवस्थेतील सकारात्मक संरचनात्मक बदल प्रदर्शित करतो. ह्या सर्व गोष्टी लक्षात घेता जागतिक महामारीच्या वेळी जसा अर्थव्यवस्थेवरील इतर घटकांवर परिणाम झालेला दिसतो. तसा कृषी क्षेत्रावरही त्याचा परिणाम झालेला आहे, म्हणून त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**शेती क्षेत्रावरील विविध परिणाम –** भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधान अर्थव्यवस्था असून शेतीला महत्वाचे स्थान आहे. कोरोना विषाणूने जगात थैमान घातल्यामुळे बऱ्याच देशात लॉकडाऊन करण्यात आले होते. भारतातही लॉकडाऊनचा समाजातील प्रत्येक घटकावर परिणाम झाला. यातील एक महत्वाचा घटक म्हणजे शेती, शेतकरी व कामगार. लॉकडाऊनमुळे बऱ्याच कामगारांनी आपल्या गावी स्थलांतरण केले. शेतमजुरांचा पुरवठा कमी झाला. तसेच वाहतूक व दळणवळण सुविधा विस्कळीत झाल्यामुळे शेती मालावर व शेतीसाठी लागणाऱ्या अदानावर त्याचा परिणाम झाला, बाजारपेठा बंद असल्याने शेतकऱ्यांनी घेतलेल्या पिकांवर व त्याच्या किंमतीवर परिणाम झाला. अर्थात शेतीसंबंधी अनेक घटकांवर त्याचा परिणाम झालेला आपल्याला दिसून येतो.

**किंमतीवरील परिणाम –** कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे राज्यात वाहतूक निर्बंध लावण्यात आल्याने अन्नधान्याचा पुरवठा करण्याचे प्रश्न निर्माण झाले. पुरवठा कमी व मागणी जास्त, त्यामुळे किंमतीत चढ उतार झाल्याचे दिसून येते. कारण संकटामुळे लादलेली अनिश्चितता, आंतरराज्यीय हालचालींवरील निर्बंध आणि वाहतुकीच्या अनुपस्थितीमुळे अन्न पुरवठा साखळी विस्कळीत झाली आणि अन्नाच्या किमती वाढल्या (Kalsi et al., 2020) आणि शेतीच्या कामकाजावर परिणाम झाला. (तक्ता १). ०१.११.२०१९ ते १०.०८.२०२० पर्यंतच्या २८४ दिवसांच्या अधिकृत टाइम सीरीज किमती डेटाचा वापर करून आमच्या विश्लेषणात असे दिसून आले आहे, की लॉकडाऊन नंतरच्या एका महिन्यात डाळी, गव्हाचे पीठ आणि दुधाच्या घाऊक आणि किरकोळ किमती १–५% जास्त होत्या; खाद्यतेल आणि मुख्य तृणधान्ये (तांदूळ आणि गहू) च्या किमती ४–९% कमी झाल्या. कारण आयात निर्बंध आणि अन्नधान्याचे मोफत वितरणसारख्या सरकारी हस्तक्षेप काढून टाकले. एका आठवड्यात टोमॅटोच्या किमती ७७–७८% आणि लॉकडाऊननंतर महिन्याला ११४–११७% वाढल्याने भाज्यांच्या किमती वाढल्या (अधिक तपशीलांसाठी करिअप्पा et al., २०२०र पहा). त्रासदायक विक्री आणि बाजारातील सुधारणांमुळे शेतकऱ्यांना कमी किमतीपासून दूर ठेवल्यामुळे मे महिन्यात बाजारात आवक वाढली (वार्शने एट अल., २०२०). लहान शहरे आणि ग्रामीण भागात शहरी भागांपेक्षा जास्त किमती वाढल्या (करिअप्पा एट अल., २०२०; नारायणन आणि साहा, २०२०). (Impact of COVID-19 on the Indian agricultural system: 10-point strategy for post pandemic recovery - G deeth Cariappa1, Kamlesh Kumar charya1,Chaitanya shok dhav1, R Sendhil2 and P Ramasundaram)

**उत्पादनावरील परिणाम –** कोरोना महामारीत लागलेल्या लॉकडाऊनमुळे व संसर्गाच्या भीतीने अनेक राज्यातील कामगारांनी स्थलांतरण केले. शेती उत्पादाकेतेतील मोठ्या राज्यामधील शेतमजूर आपल्या गावी परतल्याने शेतीतील कामांसाठी या राज्यांना मजुरांचा अभाव निर्माण झाला. त्याचा परिणाम उत्पादकेतेवर दिसून येतो. ज्या राज्यांमध्ये उलटे स्थलांतरण झाले त्या राज्यांमध्ये संसर्गाच्या भीतीने अनेक मजूर हंगामाच्या वेळी उपलब्ध नव्हते. शेतीतील कामात अडथळे निर्माण झालीत व त्याच्या परिणाम शेती उत्पादकतेवर झाला. तसेच शेतीसाठी लागणाऱ्या आदनांच्या पुरवठ्यातील अडथळ्यामुळे उत्पादकतेत घट झालेली दिसते.

कृषी क्षेत्रातील सर्वोच्च वित्तीय संस्था असलेल्या नाबार्ड संस्थेच्या आर्थिक विश्लेषण व अनुसंधान विभागामार्फत ऑगस्ट २०२० मध्ये केलेल्या सर्वेक्षणातून Impact Assessment of COVID-19 on Indian Agriculture and Rural Economy अहवाल सादर केला, त्यात कृषी उपक्षेत्रात, बहुतेक राज्यांमध्ये उत्पादनात घट झाली आहे. छत्तीसगड (१३%) आणि हिमाचल प्रदेश (१५%) या राज्यांमध्ये कृषी उत्पादनात मोठी घट झाली आहे. तथापि, तेलंगणा (२३% वाढ), पंजाब (५%), राजस्थान (४.४%) आणि गुजरात (६.७%) यासारख्या काही मोठ्या कृषी राज्यांनी प्रत्यक्षात कृषी उत्पादनात वाढ दर्शविली आहे. ज्याचे श्रेय रब्बी हंगामामुळे दिले जाऊ शकते. महामारी आणि लॉकडाऊन सुरू होण्यापूर्वी अनेक राज्यांमध्ये बंपर पीक उत्पादन आणि पिकांची कापणी पूर्ण झाली होती. ही वस्तुस्थिती नोंदविली आहे.

**विपणनावरील परिणाम –** सुरवातीच्या काळात भारतात सर्वत्र कडक निर्बंध व लॉकडाऊन घोषित करण्यात आले होते. त्यामुळे वाहतूक व्यवस्था पूर्णपणे बंद झाली होती. नंतरच्या काही दिवसांमध्ये वेगवेगळ्या प्रदेशांमधील असलेले लॉकडाऊन व निर्बंध हे त्या प्रदेशातील असलेल्या कोरोना रुग्ण संख्येवर अवलंबून होते. ज्या प्रदेशात कोरोना रुग्ण संख्या जास्त आहे, अशा भागात कडक निर्बंध लादण्यात आले होते व ज्या भागात रुग्ण संख्या कमी आहे किंवा नाहीत, अशा भागात निर्बंध थोडे शिथिल केले होते, परंतु संसर्गाच्या भीतीने त्या गावातील लोकांनी गावात प्रवेशित रस्ते बंद करून ठेवली होती. जेणेकरून कोणी बाहेरील व्यक्ती गावात येणार नाही व कोरोनाचा प्रसार होणार नाही.तसेच जास्त संख्या असलेल्या शहरी क्षेत्रातही प्रवेश बंदी होती. त्यामुळे सर्वत्र रस्ते वाहतूक विस्कळीत झालेली असल्याने शेतकऱ्यानी पिकविलेला माल, तसेच दैनंदिन जीवनातील (अत्यावश्यक वस्तू सोडून)वस्तूंचा पुरवठा हा इतर प्रदेशांपर्यंत होऊ शकला नाही.

शेतकऱ्यांना माल वाहतूकीसाठी उपलब्ध नसलेल्या सुविधा, संचारबंदी,संसर्गाची भीती, रस्ते बंद,मालाच्या साठवणुकीसाठी अपुऱ्या सुविधा या सर्व गोष्टीमुळे शेतकऱ्यांना आपला माल कृषी उत्पन्न बाजार समितीपर्यंत पोहचवता न आल्याने तो बाजारातच टाकून देऊन आर्थिक नुकसान सहन करावे लागले. स्थानिक बाजारपेठा व ग्रामीण आठवडे बाजार यांच्यावरही प्रतिकूल परिणाम झाला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना जरी जवळील स्थानिक बाजारपेठ उपलब्ध असली तरी त्या त्या भागातील स्थानिक अधिकाऱ्यानी गर्दी न जमन्याच्या हेतूने कडक निर्बंध लादल्याने ग्रामीण भागातही विपनानावर प्रतिकूल परिणाम झालेला आहे.वस्तूंची उपलब्धता नसल्याने त्याचा उपभोगावरही परिणाम दिसून येतो.नाबार्ड संस्थेच्या आर्थिक विश्लेषण व अनुसंधान विभागामार्फत ऑगस्ट २०२० मध्ये केलेल्या सर्वेक्षणातून Impact Assessment of COVID-19 on Indian Agriculture and Rural Economy अहवाल सादर केला.

E-ISSN : 2348-7143
April : 2022




Figure 3.10: Impact of COVID-19 on Marketing of Agricultural Produce (Proportion of Districts)

Source:https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/1211203145Impact%20Assessment%20of%20COVID.pdf

या केलेल्या सर्वेक्षणात विवध राज्यातील काही जिल्ह्यांचे विपणनावरील परिणाम दर्शविण्यात आले आहे. त्यातून असे लक्षात येते कि, भारतीय राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये विपणनावर जास्त परिणाम झाले आहेत तर काही जिल्ह्यांमध्ये खूपच कमी परिणाम झाले आहेत.

**उपभोगावरील परिणाम** – कोविड १९ च्या महामारीत अनेक भागात लॉकडाऊन, संचारबंदी, वाहतुक सुविधा बंद, बाजारपेठा बंद, उलट स्थलांतरण, नोकऱ्या गमावणे ही परिस्थिती निर्माण झाल्यामुळे लोकांच्या दैनदिन जीवनावर व त्यांच्या उपभोगात बदल झाल्याचे दिसून येते. अनेक कंपन्या, औदोगिक क्षेत्र बंद पडल्याने तसेच अनेक लोकांच्या नोकऱ्या गेल्याने त्यांना गावाकडे परतावे लागले. हातकामगार, शेतमजुरांना काम नसल्याने त्यांनीही गावाकडे उलट स्थलांतरण केले. त्यांच्या उत्पन्नाचे साधन नाहीसे झाले. त्यांच्या उत्पन्नावर नकारात्मक परिणाम झाल्याने उपभोग व राहणीमानातही बदल झाला. अनावश्यक गोष्टीचा वापर कमी करून आवश्यक उपभोगाच्या गोष्टीवरच भर देण्यात आला. एक वर्ग असाही होता की या महामारीचा त्यांच्या नोकरीवरती व उत्पन्नावरती परिणाम झालेला दिसत नाही.

ग्रामीण भागात अनेक ठिकाणी घरपोच भाजीपाला व अन्नाधाण्याचा पुरवठा होत असल्याने अन्नधान्य भाजीपाला, फळ, दुध यांच्या उपभोगात जास्त फरक जाणवत नाही. कोरोना विषाणू हा प्राण्यांमार्फत माणसाला होऊ शकतो अशा गोष्टींमुळे मांसाहारावर म्हणजेच कुकुटपालन, मस्त्यपालन, मेंढी, शेळीपालन या क्षेत्राला त्याचा मोठा आर्थिक फटका बसलेला असून मागणीत भरपूर प्रमाणात घट निर्माण झाली होती.तसेच अनेक हॉटेल, रेस्टोरांट, बिकानेर सारखी दुकाने बंद असल्याने दुधाची मागणी कमीझाल्याचे आढळते.

**भारत सरकारची धोरणे व उपाययोजना** – कोविड १९ मुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर लक्षणीय आर्थिक, सामाजिक परिणाम झालेले आपल्याला दिसून येतात. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेले कृषी क्षेत्रावरही त्याचा प्रतिकूल परिणाम झालेत. ग्रामीण भागातील शेतीवर अवलंबून असलेले कुटुंब, शेतमजूर, हातकामगार शेती संलग्नित व्यवसाय करणारे व्यवसायिक यांना भरपूर प्रमाणात नुकसान सहन करावे लागले. अनेक ठिकाणी पिक कापणीवर आली असताना लॉकडाऊनमुळे शेतमजुरांची कमतरता भासू लागली. या सर्व गोष्टी लक्षात घेता सरकारने सुरवातीच्या काळात कृषी क्षेत्रासंबंधित निर्बंध काही प्रमाणात शिथिल केले. जेणे करून पिक कापणीच्या वेळी जी शेतमजुरांची कमतरता आहे ती भरून निघेल. शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही तसेच अन्नधान्याची टंचाई निर्माण होणार नाही.हा त्यामागील हेतू होता. सरकराने निर्बंध शिथिल करण्याव्यतिरिक्त शेतमजूर व कामगारांसाठी बऱ्याच उपाययोजना केल्या.लॉकडाऊन व संचारबंदीमुळे वाहतूकव्यवस्था ठप्प झाली, त्यामुळे अनेक भागात शेतमजूर व कामगार अडकून पडले. अशा कामगारांसाठी सरकराने गावी परतण्यासाठी वाहतूक सुविधा उपलब्ध करून दिल्या. तसेच स्थानिक पातळीवर त्यांच्या राहण्याची व अन्नधान्याच्या सुविधा करून दिल्या.

भारत सरकराने मार्च २०२० मध्ये कोविड महामारीच्या काळात असुरक्षित लोकांसाठी दिलासा म्हणून प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना राबविली. या योजने अंतर्गत १.७० लाख कोटी रुपयाचे अर्थसहाय्य जाहीर करण्यात आले. ही योजना शेतकरी व ग्रामीण भागातील कुटुंबाना अर्थसहाय्य प्रदान करते. प्रधानमंत्री गरीब कल्याण योजने अंतर्गत प्रमुख पाच योजनांचा अभ्यास केला गेला आहे. त्या म्हणजे १. प्रधानमंत्री अन्न वितरण योजना २. प्रधानमंत्री जन धन योजना ३. प्रधानमंत्री किसान सम्मान निधी ४. प्रधानमंत्री उज्वला योजना ५. मनरेगा (MNREGA). प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत सरकराने केलेल्या तरतुदी –

- Insurance cover of Rs 50 Lakh per health worker fighting COVID-19 to be provided under Insurance Scheme.
- 80 crore poor people will to get 5 kg wheat or rice and 1 kg of preferred pulses for free every monthfor the next three months
- 20 crore women Jan Dhan account holders to get Rs 500 per month for next three months
- Increase in MNREG wage to Rs 202 a day from Rs 182 to benefit 13.62 crore families
- n ex-gratia of Rs 1,000 to 3 core poor senior citizen, poor widows and poor disabled
- Government to front load Rs 2,000 paid to farmers in first week of pril under existing PM² Kisan Yojana to benefit 8.7 crore farmers
- Central Government has given orders to State Governments to use Building and construction Workers Welfare Fund to provide relief to ConstructionWorkers (https://pib.gov.in/PressReleaseIframePage.aspx?PRID=1608345)

भारतीय मध्यवर्ती बँकेने महामारीच्या काळातआपल्या चलनविषयक धोरणात काही बदल केलेत. रेपो रेट व रिव्हर्स रेपो रेटमध्ये कपात करून गुंतवणूकदरांना व सर्वसामान्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. तसेच भारतीय मध्यवर्ती बँकेने काही कालावधीसाठी कृषी कर्जावरील निर्बंध शिथिल केले. सरकारने योजना आखून, सरकारी संस्था तसेच सरकारी कंपन्यामार्फत विविध मार्गांनी सहाय्य करण्याचे काम केले.

**निष्कर्ष –**

१) कोरोना विषाणूने मानवी जीवनात समावेश करून संपूर्ण जगभर थैमान घातले. त्यामुळे जागतिक महामंदी निर्माण झाली.

२) संपूर्ण देशांच्या अर्थव्यवस्था कोळमडल्या. या महामारीमुळे काही अल्पकालीन परिणाम झालेत तर काही दीर्घकालीन परिणाम आहेत. इतर राष्ट्रांप्रमाणे भारतालाही या महामारीला सामोरे जावे लागले.

३) भारताचीही अर्थव्यवस्था पूर्णपणे ढासळली. भारताचा आर्थिक वृद्धी दर उणे झालेला आपण बिघितला. भारतातील ७०% लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या कृषी क्षेत्रावरही त्याचा प्रतिकूल परिणाम झालेला दिसतो.

४) लॉकडाऊन लागल्याने रोजगारासाठी दुसऱ्या शहरात किंवा राज्यात गेलेल्या कामगारांचे उलटे स्थलांतरण झाले. त्यामुळे कामगारांचा पुरवठा कमी झाला. शेतीतील पिक कापणीला आले असल्याने कामगारांची, शेतमजुरांची टंचाई निर्माण झाली.शेतकऱ्याना आर्थिक नुकसान सहन करावे लागले.

५) वाहतूक व्यवस्था ठप्प असल्याने शेतकऱ्यांना माल मंडईपर्यंत पोहचविता न आल्याने शेतकऱ्यांच्या पिकाची नासाडी झाली. त्याचाच प्रतिकूल परिणाम विपणनावर झाला. अन्नधान्याच्या बाबतीत मागणी स्थिर; परंतु अनेक कारणास्तव पुरवठा न झाल्याने अन्नधान्याच्या किंमतीत वाढ झाल्याची आपल्याला दिसून येते.

६) कामगारांची टंचाई, शेतीसाठी लागणारे आदानांची कमतरता यामुळे काही राज्यांमध्ये शेती उत्पादकतेत घट झालेली दिसते तर उपभोगाचा विचार करता अत्यावश्यक गोष्टीना कडक निर्बंध नसल्याने त्यांच्यावर कोणताही परिणाम झालेला दिसत नाही. हा विषाणू प्राण्यामार्फत फैलाव करतो या अफवामुळे मांसाहारामध्ये अतिशय घट निर्माण झाल्याचे दिसते.

७) शेतीशी संबंधित उत्पादन,विपणन, उपभोग, किंमती व शेतमजूर/कामगार यांच्यावर विविध राज्यात महामारीमुळे कमी अधिक प्रमाणात प्रतिकूल परिणाम झालेला दिसतो.

**संदर्भ**

१. बालाजी सुरणे, दिव्या महाले-सुरणे (२०२२), 'सिम्प्लिफाईड चालू घडामोडी डायरी', सिम्प्लिफाईड पुब्लिकेशन,सोलापूर
२. https://journals.sagepub.com/doi/full/10.1177/0030727021989060::text= Survey%20findings%20indicate%20that%20the,commodities%20affecting%20the%20consumption%20pattern.
३. https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/1211203145Impact%20ssessment%20of%20COVID.pdf
४. https://pib.gov.in/PressReleaseIframePage.aspx?PRID=1608345
५. https://www.esakal.com/marathwada/corona-farming-and-farmers-changed-lives-278490
६. https://www.orfonline.org/marathi/impact-of-covid-19-on-rural-lives-and-livelihoods-in-india-65101/o>

# Covid-19 च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्याच्या ऑनलाईन खरेदीच्या वर्तणुकीवर झालेल्या बदलांचा तुलनात्मक अभ्यास

**सरला कडू महाले**
जी.डी.एम. कला, के. आर. एन. वाणिज्य एम. डी. विज्ञान महाविद्यालय, जामनेर, जि. जळगाव

**सारांश –**

प्रस्तुत संशोधनात covid-19 च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्याच्या ऑनलाईन खरेदीच्या वर्तणुकीवर झालेला बदलांचा तुलनात्मक अभ्यास केला असून संशोधनात ६० ग्राहक निवडले. माहिती संकलन करण्यासाठी स्वयंनिर्मिती चाचणीचे विकसन करण्यात आले होते. माहितीचे विश्लेषण व अन्वयार्थ लावण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन,'t' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब केला आहे.

**निष्कर्ष –** ग्रामीण आणि शहरी भागातील उपभोक्त्याच्या ऑनलाइन प्रणालीचा वापर covid-19 च्या काळात सारखाच केलेला दिसून येतो.

**प्रास्ताविक –**

ग्राहक हा जगातील सर्व विपणन क्रियाकलापांचा केंद्रबिंदू आहे. आज मार्केटिंगच्या क्षेत्रात जे काही केले जात आहे त्याच्या केंद्रस्थानी कुठे तरी ग्राहक असतो. त्यामुळे ग्राहकाला बाजाराचा राजा किंवा बाजाराचा मालक म्हटले जाते. एकविसाव्या शतकामध्ये सर्व विपणन संस्थांनी ग्राहकांच्या गरजा, इच्छा, आवडी-निवडी याकडे पुरेसे लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. एवढेच नाही तर, मार्केटर ग्राहकाचे वर्तन जाणून घेण्यात आणि समजून घेण्यात गुंतलेला असतो. ग्राहकाची वागणूक ग्राहकाच्या कृती आणि प्रतिक्रियांचा संदर्भ देते जे तो उत्पादनाच्या खरेदी आणि वापरापूर्वी किंवा नंतर करतो. ग्राहक वर्तन विविध वस्तू आणि सेवा खरेदी करण्याबाबत निर्णय घेण्याच्या संदर्भात ग्राहक घेत असलेल्या कृतींचा संदर्भ देते. या घटनेचा अभ्यास अनेकदा मानसिक आणि इतर घटकांवर लक्ष केंद्रित करेल जे लोकांना उत्पादन विकत घेण्यास प्रवृत्त करतात किंवा दुसऱ्या पर्यायाच्या बाजूने ते नाकारतात.

एक यशस्वी विपणन मोहीम तयार करण्यासाठी, हे घटक समजून घेणे आणि ग्राहकांना खरेदी करण्यास प्रवृत्त करणाऱ्या वर्तनांचा उपयोग करणे आवश्यक आहे. कोविड-१९ च्या संकट काळामध्ये लोक घराबाहेर पडू शकत नव्हते अशावेळेस ऑनलाईन खरेदी करणं ग्राहकांच्या पसंतीसाठी महत्त्वपूर्ण होतं. संकट काळामध्ये ग्राहकांच्या वर्तनातील बदल हा पूर्वी देखील झालेला आपल्याला दिसून येतो यात प्रामुख्याने 'आर्थिकदृष्ट्या लवचिक वर्तन' ची प्रवृत्ती दर्शविली आहे जिथे लोकांनी त्यांच्या खर्चात कपात केली आहे आणि मुख्यतः जीवनावश्यक वस्तू खरेदी करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. वापर कमी झाल्यामुळे, लोकांनी किंमत आणि उत्पादनाच्या मूळ देशाकडे देखील अधिक लक्ष दिले. अशा प्रकारे, साथीच्या रोगाने केवळ ग्राहकांनी काय खरेदी केले हेच नाही तर त्यांनी कोठून खरेदी केले हे देखील ठरवले. या बदललेल्या मानसिकस्थितीचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने covid-19 च्या काळातील उपभोक्त्याच्या वर्तणुकीवर झालेला बदलांचा तुलनात्मक अभ्यास हा संशोधनाचा विषय हाती घेतलेला होता

**समस्याविधान –** Covid-19 च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्याच्या ऑनलाईन खरेदीच्या वर्तणुकीवर झालेला बदलांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**उद्दीष्ट –**

१. Covid-19 च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्याच्या ऑनलाइन शॉपिंग झालेला बदलांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
२. Covid-19 च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्याच्या ऑनलाइन बिल पेमेंट झालेला बदलांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
३. Covid-19 च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्याच्या ऑनलाईन खरेदीच्या वर्तणुकीवर झालेला बदलांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिकल्पना –**

१. Covid-19 च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्याच्या ऑनलाइन शॉपिंग झालेला बदलांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
२. Covid-19 च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्याच्या ऑनलाइन बिल पेमेंट झालेला बदलांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
३. Covid-19 च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्याच्या ऑनलाईन खरेदीच्या वर्तणुकीवर झालेला बदलांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**संशोधनाची कार्यपद्धती –**


| **संशोधन पद्धती** – सर्वेक्षण पद्धती | |
|---|---|
| **जनसंख्या** | ग्रामीण व शहरी भागातील ग्राहक |
| **न्यादर्श** | लॉटरी व सहेतुक नमुना निवड पद्धती- ग्राहक - ग्रामीण (30) + शहरी (30) = 60 |
| **संशोधन साधने** | **स्वनिर्मित** उपभोक्त्याच्या ऑनलाईन खरेदीच्या वर्तणुक **मापिका' विधाने-** 20, **प्रतिसाद** - होय, नाही व सांगता येत नाही. **घटक –** ऑनलाइन शॉपिंग, ऑनलाइन बिल पेमेंट, ऑनलाईन खरेदी, टिकाऊ आणि स्थानिक उत्पादनांना प्राधान्य |
| **संख्याशास्त्रीय परिमाणे-** मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य | |

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन –** covid-19 च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्याच्या ऑनलाईन खरेदीच्या वर्तणुकीवर झालेला बदलांचा तुलनात्मक अभ्यास संदर्भात स्वनिर्मित शोधिका देण्यात आली होती. त्यास दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण करून पुढील प्रमाणे परिकल्पना परीक्षण करण्यात आले होते.

**परिकल्पना –**

१. covid-19 **च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्याच्या ऑनलाइन शॉपिंग झालेला बदलांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.**

| covid-19 च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्या | | N | M | SD | Table 't' value | Obtained 't' value | Decision |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑनलाइन शॉपिंग | ग्रामीण उपभोक्ता | 30 | 12.17 | 2.10 | 2.00 | 1.08 | स्वीकार |
| | शहरी उपभोक्ता | 30 | 11.89 | 2.15 | | | |





**विश्लेषण व अर्थनिर्वचन –**

**परिकल्पना ०१ –** स्वाधीनता मात्रा (५८) साठी ०.०५ सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य २.०० आहे. प्राप्त मूल्य १.०८ असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, covid-19 च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्याच्या ऑनलाइन शॉपिंग झालेला बदलांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही. ग्रामीण आणि शहरी भागातील उपभोक्त्याच्या ऑनलाइन प्रणालीचा वापर covid-19 च्या काळात सारखाच केलेला दिसून येतो

२. covid-19 **च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्याच्या ऑनलाइन बिल पेमेंट झालेला बदलांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.**


| covid-19 च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्या | | N | M | SD | Table 't' value | Obtained 't' value | Decision |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑनलाइन बिल पेमेंट | ग्रामीण उपभोक्ता | 30 | 11.24 | 2.45 | 2.00 | 1.14 | स्वीकार |
| | शहरी उपभोक्ता | 30 | 11.89 | 2.75 | | | |




**परिकल्पना ०२ –** स्वाधीनता मात्रा (५८) साठी ०.०५ सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य २.०० आहे. प्राप्त मूल्य १.१४ असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, covid-19 च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्याच्या ऑनलाइन बिल पेमेंट झालेला बदलांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही. ग्रामीण आणि शहरी भागातील उपभोक्त्याच्या ऑनलाइन बिल पेमेंट वापर covid-19 च्या काळात सारखाच केलेला दिसून येतो

३. covid-19 **च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्याच्या ऑनलाईन खरेदीच्या वर्तणुकीवर झालेला बदलांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.**

| covid-19 च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्या | | N | M | SD | Table 't' value | Obtained 't' value | Decision |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑनलाईन खरेदी | ग्रामीण उपभोक्ता | 30 | 10.45 | 1.23 | 2.00 | 1.17 | स्वीकार |
| | शहरी उपभोक्ता | 30 | 10.10 | 1.32 | | | |




**परिकल्पना ०३ –** स्वाधीनता मात्रा (५८) साठी ०.०५ सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य २.०० आहे. प्राप्त मूल्य १.१७ असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, covid-19 च्या काळातील ग्रामीण व शहरी उपभोक्त्याच्या ऑनलाईन खरेदीच्या वर्तणुकीवर झालेला बदलांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही. ग्रामीण आणि शहरी भागातील उपभोक्त्याच्या ऑनलाईन खरेदी वापर covid-19 च्या काळात सारखाच केलेला दिसून येतो

**निष्कर्ष –**

१. ग्रामीण आणि शहरी भागातील उपभोक्त्याच्या ऑनलाइन प्रणालीचा वापर covid-19 च्या काळात सारखाच केलेला दिसून येतो
२. ग्रामीण आणि शहरी भागातील उपभोक्त्याच्या ऑनलाइन बिल पेमेंट वापर covid-19 च्या काळात सारखाच केलेला दिसून येतो
३. ग्रामीण आणि शहरी भागातील उपभोक्त्याच्या ऑनलाईन खरेदी वापर covid-19 च्या काळात सारखाच केलेला दिसून येतो

**संदर्भ**

१) Best Kahn.(2006). Research in Education (9th Ed). Delhi: Prentice Hall of India.
२) Garrett, H .E. (2006).Statistics in Psychology Education (1st Ed. Indian Reprint). Delhi: Sage Publication.
३) Kumar, Ranjit. (2011). Research Methodology a step by step guide for beginners (3rd Ed). New Delhi: Sage Publication.
४) Raja Kumar, P.G. (2013).Research Methodology (1st Ed). Delhi: APH Publishing Corporation.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# म. गांधींच्या सत्य आणि अहिंसेची प्रासंगिकता

**प्रा.भालचंद्र देशमुख**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
वरणगाव, ता.भुसावळ, जि.जळगाव

म. गांधी हे भारताच्या इतिहासातील महत्वाचे व तितकेच प्रभावी असे व्यक्तिमत्व आहे. त्यांचे विचार व त्यांचे कार्य हे अतिशय प्रभावी व भरीव स्वरूपाचे आहे. गांधी विचारात जगाला भेडसावणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरे आहेत. म्हणून गांधी विचार हे अत्यंत प्रासंगिक असून त्यांची आवश्यकता आजही तितकीच प्रभावीपणे जाणवते.

सध्या असणारी जगाची आणि विशेषतः भारताची अवस्था पाहिल्यानंतर असे लक्षात येते की, आपण जीवन जगत असलेल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, तांत्रिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक इ. विविध क्षेत्रातील समस्या पाहिल्यावर अंत:करणातून एकच एक आवाज येतो 'आज महात्मा गांधी हवे होते'. गांधींच्या विचाराशिवाय या देशाला, नव्हे जगाला कोणीही वाचवू शकणार नाही. म. गांधी म्हणजेच सत्य, अहिंसा, सत्याग्रह, निती, सदाचार ज्यांची आजच्या युगाला ऑक्सिजनप्रमाणे गरज आहे. अन्यथा इथला प्रत्येक जीव मृत होईल.

**दहशतवादाला सत्य आणि अहिंसा हेच उत्तर** – म. गांधींचे जीवन म्हणजे सत्याचे प्रयोग होते. म्हणुनच त्यांनी आपल्या आत्मचरित्राचे नावही 'माझे सत्याचे प्रयोग' असे ठेवले होते. अहिंसा हीच आजच्या सर्व संघर्षाचे उत्तर आहे. जगातील सर्व राष्ट्रांची वाटचाल ही भयानक अशा विनाशकारी शस्त्रास्त्रांच्या निर्मितीकडे सुरू आहे. संपूर्ण जगात दहशतवादाने थैमान घातले आहे. सद्यस्थितीत रशिया आणि युक्रेन या एकेकाळच्या एकच राष्ट्र असलेल्या राष्ट्रात युद्धाचा भडका उडालेला आहे व सर्व जगात तिसरे महायुद्ध होते की काय, अशी परिस्थिती आहे. पूर्वी झालेल्या दोन महाविनाशकारी महायुद्धाचा विसर जगाला पडलेला आहे, असे दिसते. युद्धातून विनाशच घडत असतो. म्हणून गांधींना अपेक्षित असलेल्या अहिंसेनेच जगातील प्रश्न सुटू शकतील. गांधी म्हणतात,'अहिंसा हे तत्त्व मी सर्वप्रथम सांगत नाही. या देशातील हिमालय जेवढा जुना आहे, तेवढेच अहिंसा हे तत्त्व जुने आहे.' महात्मा गांधीनी या तत्त्वाचा स्वीकार केला तो भगवान गौतम बुद्धांपासून.हिंसेतून कोणालाही काहीही प्राप्त होणार नाही, यावर गांधीजींचा दृढ विश्वास होता. म. गांधींचे मोठेपण याच्यात आहे की, त्यांनी अहिंसा, सत्य ही तत्त्वे सर्वप्रथम सार्वजनिक जीवनात, राजकारणात आणले.

**राजकारणाचे नितीकरण आणि सदाचरण** – महात्मा गांधीजींच्या मते, राजकारण हा गुंडांचा खेळ नाही तर सेवेचे माध्यम आहे. राजकारण आणि नीती या एकाच नाण्याच्या दोन बाजू बनल्या पाहिजेत. राजकारण हे काही प्राप्त करण्याचे साधन नाही ऐतर राजकारण आणि सदाचार हातात हात घालून चालले पाहिजे. सध्या वाढत असलेल्या राजकारणाच्या गुन्हेगारीकरणावर यासारखा वैचारिक उपाय दुसरा कोणताही नाही.

म. गांधी ज्या-ज्या ठिकाणी हिंसा आहे, त्या सर्व घटकांना विरोध करतात. गांधीजींनी हिंसेचे शारीरिक, मानसिक व वाचिक असे प्रकार सांगितलेले आहेत. त्यांच्यामते, एखाद्यावर हल्ला करणे ही हिंसा आहेच, पण एखाद्याच्या भावना दुखावतील असे वक्तव्यही हिंसाच आहे. एखाद्याच्या मनावर शब्दांनी केलेला वार कधीही बरा होऊ शकत नाही. इतकेच नाही तर एखाद्याची वाईट होण्याची इच्छा बाळगणे तसे चिंतन करणे ही देखील हिंसाच आहे. अशा सर्व हिंसेचा त्याग करून अहिंसेने जीवन जगले पाहिजे, असे गांधी सांगतात.

**हृदय परिवर्तन** – म. गांधींचा हृदय परिवर्तनावर विश्वास होता. त्यांच्यामते गुन्हा नष्ट झाला पाहिजे, गुन्हा करणारा नव्हे. म्हणूनच ते म्हणतात Hit the Sin, Not the Sinner असा अतिशय मूलभूत व समस्या पूर्णपणे नष्ट करणारा विचार गांधी मांडतात. त्यांच्या मते, व्यक्ती परिस्थितीने गुन्हेगार बनतो व गुन्हेगाराचे हृदय परिवर्तन होऊ शकते. मात्र हृदय परिवर्तन करणाऱ्याचे व्यक्तिमत्व व अंत:करण शुद्ध असावे.

**अहिंसा** – गांधींनी अहिंसेचे दोन मुख्य प्रकार सांगितलेले आहेत. शुरांची अहिंसा व दुर्बलांची अहिंसा. गांधींच्या मते, दोघांपैकी एकाची निवड करावयाची असल्यास मी शुरांची हिंसा निवडेल. माझा सत्याग्रही दुर्बल, भेकड असता कामा नये. माझी अहिंसा ही शुरांची अहिंसा असेल. माझ्या मते, जो भेकड असतो तोच हिंसक असतो.

सध्याच्या काळात दहशतवादाचे वाढते प्रमाण, होणारे बॉम्बस्फोट, हत्या, अपहरण, वाढते गुन्हेगारीकरण पाहिल्यानंतर म. गांधींच्या विचारांना कोणताही पर्याय नाही. गांधींच्या विचाराचे पुन्हा स्वीकृतीकरण हेच या संकटांचा मुकाबला करू शकते व समस्या मुळापासून नष्ट होईल.

**चंगळवादाला साधी राहणी हाच पर्याय** – सध्या जगात सर्वत्र चंगळवाद बोकाळलेला दिसतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेरोजगारी, वाढते शहरीकरण, गुन्हेगारी, पर्यावरणाची हानी, ग्लोबल वार्मिंगसारखे प्रश्न निर्माण होत आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे संपत्तीचे केंद्रीकरण होते. त्यामुळे आर्थिक विषमता निर्माण होते. गांधींच्या मते, या पृथ्वीवर एवढी साधनसंपत्ती आहे की, इथे राहणाऱ्या प्रत्येक माणसाच्या मूलभूत गरजांची पूर्तता होऊ शकेल. मात्र एकाही माणसाचा अधाशीपणा पूर्ण करणारी साधनसंपत्ती या पृथ्वीवर नाही. म्हणून गांधी म्हणतात, विकास झाला पाहिजे पण विकासामुळे आनंदाची निर्मिती झाली पाहिजे. जो विकास आनंद निर्माण करू शकत नाही, तो व्यर्थ आहे. गांधी विचारांचा केंद्रबिंदू माणूस आहे. माणसाला सुखी, संपन्न, आनंदी, नीतिमान बनवण्यासाठी गांधी विचार हे दीपस्तंभ आहेत. बदलत्या आर्थिक, सामाजिक व राजकीय वातावरणात प्रत्येक जण लोभी झाला आहे. या लोभी वृत्तीबदल गांधीजी म्हणतात, लोभीपणा हा माणसाला कधीही आनंद, सुख, समाधान देऊ शकत नाही. गांधीजींचे साधी राहणी, उच्च विचारसरणीचे तत्व या गळेकापू स्पर्धेच्या दुष्परिणामांना संपवू शकते.

**खेड्याकडे चला** – म. गांधींनी 'खेड्याकडे चला' हा संदेश दिलेला आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे. ग्रामस्वराज्य या संकल्पनेचा पुरस्कार

त्यांनी केला. खेड्यांमध्ये लघु उद्योग, कुटिरोद्योग, स्वयंरोजगार या माध्यमातून रोजगाराची निर्मिती झाली पाहिजे. खेड्यातील माणूस ओढला जाता कामा नये. अन्यथा खेडी ओस पडतील आणि शहरी परिसर बकाल वस्त्या आणि गुन्हेगारांचे अड्डे बनतील. गांधींनी मोठ्या अवजड उद्योगांना व यंत्राना विरोध केला होता. यांत्रिकीकरणामुळे मानवता संपून जाईल व सर्व जीवनच यांत्रिक बनेल. मानवी आत्मा नावाचा घटक या वाढत्या यांत्रिकीकरण व शहरीकरणामुळे सापडणार नाही.

**व्यसनाधीनता व गुन्हेगारी वृत्ती –** आजच्या काळात व्यसनाधीनता फॅशन बनली आहे. व्यसनामुळे कित्येक कुटुंब देशोधडीला लागले आहेत. संसूचन माध्यमातून अमली पदार्थांचे, द्रव्याचे सर्रास प्रदर्शन मांडले जात आहे. म. गांधी व्यसनाधीनतेवर सडकून टीका करतात. गांधी म्हणतात, शुद्ध माणसाच्या मनाला कोणत्याही व्यसनाची गरज नसते. सर्व गुन्हे व्यसन करूनच केल्या जातात. सध्याच्या काळात तरुण व्यसनांमुळे दिशाहीन व गुन्हेगारी वृत्तीकडे वळत आहे. त्यामुळे तरुण पिढी पोखरल्या जात आहे. त्यामुळे प्रेम, सदाचार व शांतीचा संदेश देणाऱ्या गांधींची पदोपदी आठवण येते.

**धर्माद्वारे राजकारणात नीती यावी –** भारतातील आणि जगातील महत्त्वाची समस्या म्हणजे विविध धर्मियात उद्भवणारे वाद (हिंदू-मुस्लीम वाद) गांधींनी धर्माला निती निर्माण करणारे माध्यम मानले. म. गांधींनी धर्माला उच्च स्थान दिलेले आहे. धर्म आणि राजकारणाच्या एकत्रीकरणाबद्दल गांधीजींचे विचार चिंतनीय आहेत. धर्माशिवाय राजकारण म्हणजे हाडाचा सापळाच आहे. धर्म आणि राजकारण एकत्र असावे. मात्र धर्माने राजकारणाला मार्गदर्शन करावे. धर्मातील नीती, सदाचार, आदर्श यांचा समावेश राजकारणात केला जावा. राजकारणाने धर्माला मार्गदर्शन करू नये. राजकारणातले असामाजिक तत्त्व अनाचार धर्मामध्ये मिसळल्या जाऊ नये. या अर्थाने गांधीजींनी धर्म आणि राजकारण यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. गांधी धर्माकडे कर्तव्य या भावनेने पाहत असल्याने धर्म आणि राजकारण यांना वेगळे मानले नाही आणि म्हणूनच गांधींना 'राजकारणातील संत वसंतांमधील राजकारणी' असे म्हटले जाते.

**निष्कर्ष –**

म. गांधी म्हणजे 'एका माणसाचे सैन्य' असा आदरपूर्वक उल्लेख केला जातो. १८५७ ते १९४७ अनेक महापुरुषांनी बलिदान दिले. मात्र गांधींनी संपूर्ण समाजाला आपल्या आंदोलनात सहभागी करून घेतले. देशात स्त्रीया सर्वप्रथम बहुसंख्येने सहभागी झाल्या व सर्व देश रस्त्यावर उतरला व इंग्रजांचे साम्राज्य हादरले होते. सत्याग्रहाचे शस्त्र गांधींनी जगाला दिले. भारत देश गांधींचा देश म्हणून जगभर ओळखला जातो. मात्र हाच देश गांधीजींच्या विचारांपासून दुरावत चालला आहे की काय? म. गांधीजींच्या देशाने म. गांधींना नीट समजून तरी घेतले आहे की नाही, अशी चिंता निर्माण होत आहे. म्हणूनच आज पुन्हा पुन्हा आठवण येते. गांधी पुन्हा अवतरले पाहिजे अशी इच्छा प्रबळ होत आहे.

गांधीजींच्या विश्वव्यापी विचारांमुळेच रोमा रोलो या सुप्रसिद्ध फ्रेंच विचारवंत यांनी त्यांना 'येशू ख्रिस्ताचा अवतार' म्हटले आहे. एक समर्थ आणि संपन्न माणूस म्हणून जीवन जगण्यासाठी गांधी विचारांची गरज आहे. कस्तुरीच्या शोधात निघालेल्या हरणासारखी अवस्था होऊ शकते. म्हणून आवश्यकता आहे ती गांधी विचारांना समजून कृती करण्याची.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# भारतीय राजकारणात प्रसार माध्यमांची भूमिका : एक अध्ययन

**कु. देशमुख पौर्णिमा लक्ष्मण**
एम.ए. .सेट, सहाय्यक प्राध्यापक,
राज्यशास्त्र विभाग, सामाजिकशास्त्रे प्रशाळा, क.ब.चौ.उ.म.वि जळगाव.

**गोषवारा –**

भारतीय राजकारणात प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची आहे, त्यात तिळमात्रही शंका नाही. आज समाजातील अनेक प्रश्न सोडविण्याकरिता मीडियाचा उपयोग होतो. राजकीय क्षेत्रात प्रत्येक पक्ष मोठ्या प्रमाणात सोशल मीडियाचा वापर करीत आहेत. मागील १० वर्षापासून सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. जगात सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था असलेल्या भारतात प्रसार माध्यमांचे स्थान आणि भूमिका महत्त्वाची आहे त्यामुळे प्रसार माध्यमांना लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणतात लोकशाही शासनव्यवस्थेत जनता, लोकप्रतिनिधी, प्रशासन, कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्याय मंडळ, दबाव गट याबरोबरच प्रसार माध्यमे महत्वाची बजावत असतात. प्रसारमाध्यमे हे केवळ जनमतावर प्रभात नाही, तर जन्मत घडवून लोकांना जागृत करण्याचे कार्य करतात म्हणून यासंदर्भात थॉमस जेफरसनचे वाक्य खूप महत्त्वाचे आहे. थॉमस जेफरसन असे म्हणतात की, लोकशाहीला सर्वात महत्त्वाचे संरक्षण कोणते असते असे मत कराल तर मी प्रसारमाध्यमे चांगले कवच आहे कारण लोकशाही किंवा राजकारणाचा मीडिया व प्रसारमाध्यमे हा आधारस्तंभ आहे. आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे असे असले तरी आजच्या युगात जाहिरातींचे युग देखील म्हटले जाते कारण प्रसार माध्यमांचा वापर करून हिरा तिच्या माध्यमातून लोकांवर प्रभाव टाकला जातो. जाहिरातींचा अर्थ 'च्याकडे मन वळविणे'महिमान जनतेचे मिळवण्यात प्रसार माध्यमे महत्वाची भूमिका पार पाडत आहेत.

**मुख्य शब्द –** राजकारण, मिडीया, प्रसार माध्यमे, लोकशाही, नेटवर्किंग, सोशल मीडिया, जागतिकीकरण.

**प्रस्तावना –**

भारतातील लोकशाही शासन व्यवस्था असल्याने भारतात लोकशाही प्रस्थापित करण्यात प्रसारमाध्यमांची भूमिका अनन्यसाधारण असते. यात तिळमात्रही शंका नाही. शतकापासूनच म्हणजे अमेरिकन स्वातंत्र्याची चळवळ व फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात प्रसारमाध्यमांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. कार्यकारी मंडळ, विधिमंडळ बरोबरच लोकशाही देशांमध्ये प्रसारमाध्यमांना चौथा आधारस्तंभ म्हणून मान्यता आहे. जगात मुक्त मिडिया शिवाय लोकशाही व्यवस्थेचे अस्तित्व शून्य आहे. देशाच्या चौथ्या स्तंभाची जबाबदारी सांभाळणाऱ्या बरोबरच प्रसारमाध्यमे आधुनिक प्रकारच्या राजकारणाच्या आधुनिक अद्यावत करण्याकरता परिवर्तक म्हणून कार्य करत आहे राजकारणामध्ये राजकीय पक्षाकडे आपला हेतू साध्य करण्यासाठी जनतेचे मत बदल दाखवण्या मागे प्रसारमाध्यमे प्रभावी भूमिका बजावणार असल्याचे प्रकर्षाने निदर्शनास आले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात राजकीय पक्षांना मीडियामुळे अनेक फायदे होतात. कधी कधी नुकसान सहन करावे लागते. मीडिया आणि राजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एक दुसरे शिवाय टिकू शकत नाही. जागतिकीकरणाच्या काळात राजकीय क्षेत्रात माध्यमांच्या आधुनिक स्वरूपात मोठा बदल झालेला आहे. भारतीय लोकशाही राज्यव्यवस्था प्रसारमाध्यमांना महत्त्वाचे स्थान आहे. ज्या देशात हुकूमशाही किंवा लष्करी शाही असते त्या देशात प्रसारमाध्यमांना मुक्तता नसते. लोकशाही खर्या अर्थाने पत्रकारितेतही पूर्वअट आहे. भारतात लिखित राज्यघटना ध्येयधोरणे आहेत. त्यानुसार लोकप्रतिनिधी, न्याय यंत्रणा व शासन यंत्रणा काम करतात. या सर्वांच्या चौकटीत माध्यमांना काम करावे लागते. भारतात अभिव्यक्तिस्वातंत्र्य आहे भारताच्या स्वातंत्र्य आणि प्रसारमाध्यमांनी मोठी कामगिरी बजावली आहे. सरकार, राजकीय, पक्ष, राज्यकारभार, राजकारण, अर्थकरण, परराष्ट्रीय धोरण, संरक्षण, समाजकारण प्रसारमाध्यमांचे अनन्यसाधारण महत्त्व आधुनिक काळात वाढत आहे. आज प्रसारमाध्यमांना समाजाचा विना आणि समाजाला माध्यमं विना जगता येत नाही. काहीसे राजकीय बाबतीतही झालं आहे. राजकारण्यांना देखील दररोज माध्यमांचा वापर केल्याशिवाय चैन पडत नाही. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आज हे बघायला मिळते, ते पूर्वी कधीच मिळत नसे. घरबसल्या मनुष्याला आज सारे जग सहज पाहायला मिळते. माध्यमे माणसांचे विचार बदलून टाकतात. राजकारणात प्रत्येक राजकीय पक्ष जास्तीत जास्त लोकांपर्यंत माध्यमांच्या सहाय्याने पोहोचत असतात. आपल्याला राजकीय पक्षांचे ध्येय-धोरणे पोहोचवण्याचे कार्य माध्यमांच्या सहाय्याने केले जाते.

प्रसारमाध्यमेही आजच्या युगात फार महत्त्वाची मानली जातात. त्यात मराठी भाषेचे महत्त्व फार महत्त्वाचे आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात की, आपली प्राचीन मातृभूमि आता नूतन स्वरूप धारण करीत आहे आणि पूर्वीपेक्षा अधिक तेजस्वी रूपात जागेवर प्रकाश टाकत आहे. जगाला आपल्या शांततापूर्ण व मंगळवारीने विश्वाला नवा संदेश देत आहे. विवेकानंदांच्या या विचारावर ऊन भारताला भविष्यात पार पाडाव्या लागणाऱ्या वैश्विक भूमिकेचे दर्शन घडते. भारताला स्वातंत्र्य मिळवून ७० वर्ष झाली आज लोकशाही प्रजासत्ताक म्हणून नवे रूप धारण करीत आहे. जवळच्या भविष्यकाळात मूल्याधिष्ठित राजकारण, समाजकारण, तंत्रज्ञान या स्तरावर कसे प्रस्थापित होईल. यासाठी प्रसारमाध्यमांची भूमिका फार महत्त्वाची मानली जाते. यात मराठी भाषेचे कार्य महत्त्वाचे आहे. महात्मा गांधी म्हणाले होते की, भारतीय वृत्तपत्रांनी पाश्चात्त्य पत्राचे अनुकरण करताना चांगल्या कल्पनेनेच अनुकरण करायला हवे व कालबाह्य कल्पनांचा त्याग करायला हवा लोकांना पाहिजे ते द्या पण त्यापेक्षा अधिक काहीतरी घ्या असा गांधीजींचा आग्रह होता.

**उद्दिष्टे –**

- भारतीय राजकारणात प्रसारमाध्यमांचे महत्व कसे आहे हे जाणून घेणे.

- भारतीय लोकशाहीत सद्यस्थितीतील प्रसारमाध्यमांची भूमिका स्पष्ट करणे.
- सोशल मीडिया निवडणूक प्रचाराचे एक महत्त्वाचे साधन म्हणून त्याचे महत्त्व अभ्यासणे.
- राजकीय पक्षाकडून माध्यमांचा वापर कसा होतो याचा अभ्यास करणे.

**गृहितके –**

- भारतीय राजकारणात सोशल मीडिया महत्त्वाची भूमिका निभावत आहे.
- भारतीय राजकारणात प्रचाराचे एक महत्त्वाचे साधन म्हणून सोशल मीडिया महत्त्वाची भूमिका बजावत आहे.
- सोशल मीडियाच्या वापरामुळे निवडणूक प्रचार सोपा झाला आहे.
- माध्यमे राजकीय पक्षांसाठी जनमत तयार करतात.

**विषयाची निवड –** सध्याच्या परिस्थितीत जगातील अनेक लोक सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणावर वापर करताना आपल्याला दिसतात. भारतीय राजकारण आणि लोकशाही यांचा सहसंबंध आहे. राजकारणातील प्रचार व प्रसार काळात सोशल मीडिया चा वापर होत असतो त्याचप्रमाणे लोकहित सोशल मीडियाच्या वापरामुळे होत असलेले बदल जाणून घेणे महत्त्वाचे आहे. लोक माध्यमे, मुद्रित माध्यमे व नवीन माध्यमे राजकीय घडामोडीवर चांगला वाईट परिणाम घडवून आणत असतात. या सर्व बाबींचा सविस्तरपणे अभ्यास करण्यासाठी संशोधकाने या विषयाची निवड केली आहे.

**विषयाचे महत्त्व –** सध्या जगात सगळीकडे सोशल मीडियाचा बोलबाला सुरू आहे. जगातील एक तृतीयांश लोक सोशल मीडियाचा वापर करीत आहे. गेल्या काही वर्षात जागतिक राजकारणात सोशल मीडियाचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढत आहे. सन २००२ च्या अमेरिकेतील राष्ट्रपती निवडणूक, ब्राझीलचे राष्ट्रपती जैर बोलसनारो यांचं मोठं व्हाट्सअप अभियान व फिलिपाईन्सचे राष्ट्रपती रोड्रिगो यांनी केलेला मोठ्या प्रमाणात फेसबुक प्रचार यांनी जगात सोशल मीडियाची वेगळी ओळख निर्माण केली. याच निमित्ताने सोशल मीडियाच्या माध्यमातून राजकीय प्रचार, प्रसार व त्याचा फायदा लोकांच्या लक्षात आल्याने भारतातसुद्धा यात कसा मागे राहणार? जगातील सगळ्यात मोठी लोकशाही आणि जगातील दुसऱ्या क्रमांकाचा ऑनलाईन बाजार असलेल्या भारतातही सोशल मीडियाचा सर्व स्तरावर वापर होत आहे. लोकसभा, विधानसभा इतर प्रत्येक निवडणुकीत देशातील सगळेच राजकीय पक्ष मोबाईल ॲप्स, वेबसाईट, ब्लॉक आणि सोशल नेटवर्किंग साईटचे हत्यार घेऊन निवडणुकीच्या राजकीय आखाड्यात उतरले, आणि या शहराच्या सहाय्याने निवडणुकीचे युद्ध जिंकणे सोपे झालं म्हणून भारतीय राजकारणात सोशल मीडियाचे महत्त्व आणि सोशल मीडियाची भूमिका अभ्यासने महत्त्वाचे आहे.

**संशोधन पद्धती –** प्रस्तुत लघुशोध निबंधात संशोधन कर्त्याने विश्लेषणात्मक वर्णनात्मक पद्धतीचा वापर केला आहे.

**उदाहरणार्थ –** वर्तमानपत्रातील लेख, मासिके, त्रिमासिके, टीव्ही वाहिनीवरील ब्लॉक, इंटरनेट वेबसाईट, संदर्भ ग्रंथ इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**विषय विवेचन –**

**प्रसारमाध्यमे म्हणजे काय? –** इंग्रजीतील Media चे भाषांतर म्हणून माध्यम हा शब्द वापरला जातो. त्याआधी press (प्रेस) शब्द वापरला जात होता. ही संकल्पना अतिप्राचीन आहे. तर दूरध्वनी, टपाल सेवा, पुढे नभोवाणी चित्रपट, वृत्तपत्रे आणि त्यातही पुढे मास मीडिया हा शब्दा पुढे आला. आणि सध्या सोशल मीडिया ही संकल्पना आली. साधारणपणे प्रसारमाध्यमे या एकाच शब्दात वृत्तपत्रे, मासिके, दूरदर्शन, आकाशवाणी, इंटरनेट, उपग्रह, विविध इलेक्ट्रॉनिक्स वाहिन्या, डिजिटल चॅनलच्या सर्व गोष्टी यात समाविष्ट होतात. माध्यमेही अनेक वचनी रूप असून याचा अर्थ काही साध्य करण्याचा मार्ग होय, तसेच माध्यमे म्हणजे माहिती, कल्पना, विचार, मते इ. चा प्रसार करणारी विविध साधने म्हणजे माध्यमे होय.

**विविध काळात प्रसारमाध्यमांची भूमिका –**

**स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रसार माध्यमे –** भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची आहे. टिळक, आगरकर, गांधी, नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर किंबहुना त्यांच्याही आगोदर राजाराम मोहन रॉय, बाळशास्त्री जांभेकर यांनी वृत्तपत्रे चालवली. पण त्यातही राजकीय व सामाजिक भूमिका लोकांपर्यंत या उद्देशाने चालवली जात असे, त्यात बातम्या नव्हत्या. स्वातंत्र्य पूर्वी ब्रिटिशांच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी देशभक्तांनी लेखणीचा वापर केला. त्यातून अनेक देशभक्त व क्रांतिकारक उदयास आले. त्यावेळी वृत्तपत्रे आणि भाषणे प्रभावी माध्यम होती व त्याचे योगदान स्वातंत्र्यलढ्यात महत्वाचे ठरले.

**स्वातंत्र्योत्तर काळातील प्रसार माध्यम –** १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर १९५० ला राज्यघटना अस्तित्वात आली. राज्य घटनेने अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिलाने वृत्तपत्रे व इतर प्रसारमाध्यमे निर्माण करण्याची चालना मिळाली. पुढे आकाशवाणीला महत्त्व प्राप्त झाले व दूरदर्शन उदयास आले. दूरदर्शन पाहण्यासाठी लोक तासन्तास टीव्हीसमोर बसत. १९९० च्या नंतर भारतात जागतिकीकरणाला सुरुवात झाली. प्रसार माध्यम क्षेत्रात अमुलाग्र बदल झाला. दोन वाजण्याच्या सोयीमुळे बातम्यांचे प्रसारण होऊ लागले व प्रसार माध्यमांची संख्या वाढली. याबरोबरच काळाच्या ओघात तंत्रज्ञानात प्रगती झाली, साक्षरता आली व इंटरनेट व सोशल मीडिया यांनी सर्व चित्र बदलले. यातून मोबाईल युगाला सुरुवात झाली. छोटे झाले. माध्यमातून फेसबूक, मेसेज, ट्विटर, व्हॉटसअप, इंस्टाग्राम इंटरनेटवर आधारलेले सोशल मीडियाने माहितीचे आदान-प्रदान यावर भर दिला यामुळे लोकांमध्ये जनजागृती आज भारतात मोबाईल धारकांची संख्या १२० कोटी झाली, त्याच बरोबर ८०० पेक्षा जास्त वृत्तवाहिन्या आणि सर्वात शहरात वृत्तपत्रे आहेत. यांच्या जोडीला समाज माध्यमांचा धडाका सुरू आहे याचे योगदान लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी महत्वाचे दिसून येते.

**प्रसार माध्यमांची आवश्यकता –**

- लोकशाही व्यवस्थेचे प्रमुख आधारस्तंभ प्रसारमाध्यम आहे, त्यामुळे लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी जागृत असणे आवश्यक आहे.
- प्रसार माध्यमांमध्ये क्रांती घडवून आणण्याची ताकद आहे, यामुळे लोकशाहीतील दोष दूर करण्यासाठी प्रसारमाध्यम नि:पक्षपातीपणे कार्य करणे आवश्यक आहे. जागृत पारदर्शक प्रसारमाध्यमांमध्ये सरकार बदलांची ताकत असते.
- भ्रष्टाचार, राजकीय, सामाजिक व आर्थिक भेदभाव दूर करून लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी चौथा महत्त्वपूर्ण आधारस्तंभ म्हणून प्रसारमाध्यमांची

आवश्यकता आहे.

- आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात जग जलद गतीने बदलत आहे. दिवसेंदिवस प्रसारमाध्यमे आपले स्वतःचे स्वरूप बदलत आहे. त्यामुळे सध्या स्थिती मतदारांना योग्य माहितीच्या आधारे जागृत करण्याची ताकत माध्यमांमध्ये आहे.

लोकशाहीत अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करताना दिसतात. परंतु यासाठी प्रसारमाध्यमांवर राजकीय दबाव असू नये. परंतु आज खेदाने नमूद करावेसे वाटते की, काही वर्तमानपत्रे, चॅनलवरील बातम्या राजकीय पक्षाच्या प्रभावावर वावरताना दिसतात. त्यामुळे माध्यमांच्या स्वातंत्र्याची गळ पेच होत आहे.

**प्रसारमाध्यमांचे स्वरूप –**

**लोकमाध्यम –** पूर्वी प्रसारमाध्यमांना मास मीडिया म्हणजे लोकमाध्यम म्हणून समजले जात असे. अलीकडील उपग्रह आले. खाजगी चॅनल्स, केबलवाले, डिश अँटिना, मोबाईल व त्यावरील सोशल मीडिया या सर्वांनाच लोक माध्यमे म्हणावे का, याचे उत्तर होय व नाही अशा दोन्ही प्रकारे देता येईल. ज्यामध्ये लोकांचा सहभाग असेल, तेच लोकांमध्ये होऊ शकते, हा विचार रूढ झाला. मग पुन्हा प्रश्न पडतो, पोवाडे, किर्तन, प्रवचन, व्याख्याने, सप्ताह, सांस्कृतिक कार्यक्रम, तमाशा हे लोक माध्यमांचे प्रकार आहेत का? तर त्याचेही उत्तर हो असेच येईल, कारण त्यामध्ये संवाद असतो. लोकांचे मत अजमावले जातात. लोकांना प्रश्न विचारून त्यांच्याकडून उत्तर घेतली जातात. छत्रपती शिवाजी महाराजांनी लोकमाध्यमांचा वापर प्रभावीपणे केला. भारुड, जागरण गोंधळ, पोवाडे अशा लोककलांना प्रोत्साहन देत लोकांचे मनोरंजन प्रबोधन घडवून आणले. गनिमिकावा करतानाही अशा माध्यमांचा प्रभावी वापर केला. संतांनी कीर्तनाचा भारुडाच्या माध्यमातून लोकांचे प्रबोधन केले. लोकांशी संवाद साधून त्यांचे प्रश्न जाणून घेतले मात्र त्याला केव्हा परमार्थाच्या रूपाने उत्तर देऊ शकेल. अलीकडील काळात लोक माध्यमांचा वापर राजकारणासाठी केला जातो. राजकीय फायद्यासाठी लोक माध्यमांचा वापर करण्याची प्रथा दिवसेंदिवस वाढत आहे. लोककला सादरीकरणाने बहुतेकदा 'उदरनिर्वाह' हे कारण असले, तरी 'प्रबोधन' हा त्यामागचा महत्वाचा उद्देश आहे. कीर्तनकार पैशासाठी नव्हे, तर आपलं देवावरील श्रद्धा व आपले कर्तव्य म्हणून कीर्तन करतात. सध्याचे कीर्तनकार कीर्तनासाठी घेण्याचे पैसे घेत असले, तरी त्यामागे त्यांचा संसार व खर्चही कारण आहे. अनेक महाराज गोशाळा, अनाथआश्रम आदी सामाजिक उपक्रमांसाठी पैसे घेतात. हे पैसे देण्याचे काम संबंधित भागातील राजकीय नेते आवर्जून करतात. राजकारण करण्याचा त्यांचा हेतू असो किंवा नसो खर्च उचलून लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम करतात. सहाजिकच मतदारांपर्यंत जाण्याचा त्यांचा उद्देश असतो. मोठमोठ्या सप्ताहाना आमदार, खासदार, नगरसेवक भरभरून दान करतात. त्यानिमित्ताने राजकारणाचा हेतूही साध्य होतो. पूर्वी संतांनी किर किर्तनाकडे आर्थिक लाभ म्हणून म्हणून कधीच पाहिले नाही. विठ्ठलाच्या भक्तीचा एक मार्ग म्हणून ते आपले कर्तव्य बजावत असतात. कीर्तनकारांना त्यावेळी मुक्कामाची सुविधा, जेवण दिले, तरी त्यात ते समाधानी असत.

**मुद्रित माध्यमे –**

खिंचो न कमनो को, न तलवार निकालो ।
जब तोप मुकाबिल हो, तो अखबार निकालो ।।

या उक्तीप्रमाणे प्रमाणे वृत्तपत्रांचे महत्त्व अपार आहे. डिजिटल च्या पटलावर असलेले बातमी वाचून सोडून दिली जाते. त्याचा संग्रह केला जात नाही. मात्र , प्रिंट झालेला पेपर जपून ठेवला जातो. त्याची कात्रणे तयार करून फायलिंग केली जातात. छापून येणारा अजूनही महत्त्व आहे. नेत्यांची सभा गाजली, त्या सगळ्याचा डिजिटल किस पडला, तरी संबंधित बातमी छापून आली नाही, तर त्याने त्याचे समाधान होत नाही. मारुतीच्या पारावर बसून आपला मतदारांनी (शेतकरी, सर्वसामान्य व्यक्ती) ही बातमी वाचली पाहिजे. चर्चा लोकांमध्ये चर्चा केली पाहिजे, त्या बातमीचा परिणाम दिसून येतो, असे नेत्याला वाटते. डिजिटलमध्ये वाचलेली बातमी संबंधित वाचन एकदा वाचतो आणि तो विषय तिथेच सोडून कामाला लागतो. आपल्या बातम्यांचे मात्र कधीकधी सामूहिक वाचनही होते. छापून आलेल्या बातमीचे महत्व अधिक आजही टिकून आहे.मीडिया हा प्रसार माध्यमाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रे व स्वातंत्र्यानंतरची वृत्तपत्रे फार मोठा फरक पडू लागला आहे. तंत्राला प्रिंट मीडियाने आत्मसात केले. काळाबरोबर हे वृत्तपत्र ही बदलले. त्यामुळे इंटरनेट आवृत्ती सुरू करून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न सध्याची माध्यमे करीत आहेत. प्रिंट मीडिया चे महत्त्व अजूनही टिकून आहे.

**प्रसार माध्यमे –** प्रसार माध्यमे आणि राजकारण यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. राजकारणातील योजना प्रसार माध्यमांशी संबंधित बाबींसाठी स्वतंत्र विभाग असतो. त्यांचे जनसंपर्क विभाग असे नाव असते. हा जनसंपर्क विभाग संबंधित राजकारणाचे संबंधित नियोजन करतो. संबंधित खासदार किंवा आमदार यांचे सहकार्य हे काम करत असत. वृत्तपत्रात बातमी बातमी प्रसिद्धीस देणे, प्रेस कॉन्फरन्स आयोजित करणे, चांगला फोटो पत्रकाराकडे देणे. असे कामे पूर्वी त्यांचे सहाय्यक करीत असत. आता मात्र मोठा बदल झाला आहे. तज्ञ पत्रकार किंवा तसे जाण असलेल्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. राजकारणाचा जनसंपर्क विभाग स्वतंत्र असतो. सहाय्य करणारे २–३ कर्मचारी असतात. फोटोग्राफीची नियुक्ती केलेली असते. सोशल मीडियावर बातम्या वायरल करण्यासाठी स्वतंत्र व्यक्ती असते.

**राजकारणाच्या जनसंपर्क विभागाची कामे –**

- मतदारसंघातील, जिल्यातील किंवा राज्यातील पत्रकाराशी संबंध वाढवणे.
- आपलं नेत्याचा कार्यक्रमाची बातमी तयार करून छायाचित्रासह होती संबंधित वृत्तपत्रात पोहोचवणे.
- पोहोचवल्या बातमीचे खातरजमा करून त्या प्रसिद्ध करून घेण्याच्या प्रयत्न करणे.
- जाहिराती साठी ठराविक रक्कम निश्चित करुन कोणत्या वृत्तपत्राला किती रुपयांची जाहिरात द्यायची त्याचे नियोजन करणे.
- नेत्याचा दौरा निश्चित करणे.
- त्याच्या ठिकाणी योग्य सुविधा आहे की नाही याची खातरजमा करणे.
- संघातील प्रत्येक गावात कार्यकर्त्याचे नेटवर्क तयार करण्यासाठी सहा करणे व त्याची यादी अद्यावत करणे.

- नेत्याची सर्व प्रसार माध्यमांचे संपादकांशी वारंवार चर्चा घडवून आणणे.
- संपादकांशी बोलून यांची मुलाखत नियोजित करणे.
- प्रसिद्ध झालेला बातम्यांची कात्रणे फाईलला लावून त्यांचे जतन करणे.

**नवीन माध्यमे –**

- राजकारणी मंडळींकडून नवीन माध्यमांचा वापर –आपण केलेले काम समाजासमोर मांडण्यासाठी नवीन माध्यमांचा वापर केला जातो.
- आपले मत मांडून त्यावर प्रतिक्रिया घेण्यासाठी माध्यमांचा वापर केला जातो.
- आपले ट्रोल कोण आहे हे जाणून घेण्यासाठी ही माध्यमे वापरली जातात.
- आपल्यात कशा सुधारणा व्हाव्यात हे समजून घेण्यासाठी या माध्यमांचा वापर केला जातो.
- कार्यक्रमाच्या बातम्या मतदारांपर्यंत पोहोचवण्यासाठी नवीन माध्यमे वापरली जातात.
- चित्रांची देवाणघेवाण करण्यासाठी हे प्रभावी माध्यम आहे.
- आपला मतदार आपल्याशी बांधून ठेवण्यासाठी या माध्यमांचा आधार घेतला जातो.
- कामकाज सुरळीत राहण्यासाठी या माध्यमांचा चांगला उपयोग होतो.

**काही नवीन माध्यमे –**

• **फेसबूक –** २०१९ लोकसभा निवडणुकीत फेसबुकचा मोठ्या प्रमाणात वापर झाला सोशल मीडियावरून प्रचार करण्यास काही बंधने असली तरी उत्साही कार्यकर्ते मात्र प्रचार जोरदार करीत आहेत.

• **फेसबूक लाईव्ह –** राजकारणातील अनेक नेते फेसबूक पेजवर लाईव्ह करतात. बहुतेक सर्वच मोठ्या सभा लाईव्ह बघतात २०१४ च्या निवडणुकीत ही पद्धत होती. त्यावेळी फेसबुक वापरले जात असले तरी फेसबुक लाईव्ह करता येत नव्हते. २०१९ चं लोकसभेच्या निवडणुकीत मात्र फेसबुक लाईव्ह सर्व नेत्यांनी वापरले. जनसंपर्क विभागातील सोशल मीडिया सभाळणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे ती जबाबदारी दिली जाते इ. नवीन साधने राजकारणावर प्रभाव पडतात.

**राजकीय प्रश्नांवर जनमत तयार करण्यात माध्यमांची भूमिका –**

**पक्षांतर्गत गटबाजी –** प्रत्येक पक्षात गटबाजी असते. ती निवडणुकांच्या निमित्ताने उफाळून येते. त्याचा परिणाम संबंधित उमेदवारावर होतो. एखादा कार्यकर्ता पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात जातो. त्यामुळे त्या भागातील संबंधित पक्षाची ताकद कमी होते. कारण त्याच्यासोबत इतर कार्यकर्तेही दुसऱ्या पक्षात गेलेले असतात. गट – तट पक्षाला पोखरून टाकणारी गोष्ट आहे. त्यामुळे पक्षाध्यक्षला किंवा प्रदेशाध्यक्ष आपल्या पक्षात गटबाजी दूर करणे हे मोठे काम असते. त्यातून झालेली नाराजी दूर करण्यासाठी विविध पदांवर संबंधित नियुक्ती करावी लागते . यामध्ये माध्यमांची भूमिका कशी असते हे हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. अनेकदा ही गटबाजी उघड करण्याचे काम माध्यमे करतात. गटबाजी थांबविण्यासाठी वरिष्ठ मंडळी प्रयत्न करीत असली तरी माध्यमांमधून त्याचे प्रदर्शन केल्याने ते अधिक वाढते खरे तर संबंधित पक्षाला गटबाजी दाखवून देण्याची व त्यात सुधारणा करण्यासाठी संधी देण्याचे मोठे काम माध्यमे करीत असतात.

**उदाहरणार्थ –** २० फेब्रुवारी २०१९ रोजी माजी मुख्यमंत्री व कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण यांचे होमटाऊन असलेल्या नांदेडमध्ये कॉंग्रेस–राष्ट्रवादी आघाडीचा मेळावा झाला लोकसभा निवडणुकीचा नारळ तेथे फुटला. पण कॉंग्रेसमधील विधानसभेतील विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील आणि अशोक चव्हाण हे दोघेही या मेळाव्याला अनुपस्थित राहिले. या मेळाव्याचे वार्तांकन करताना माध्यमांनी मेळाव्यात काय झाले, यापेक्षा गटबाजी कशी उघडकीस आली, हे दाखवून दिले.

**बंडखोरी –** राजकीय पक्षाची बंडखोरी ही त्यांच्या दृष्टीने वाईट असते, तर काही गोष्टी मिळाले नसल्याने त्या मिळवण्यासाठी तो पक्ष नेत्यांच्या विरोधात जाऊन बंडखोरी करत असतो. तिच्या बंडखोरीच्या बातम्या सर्वच माध्यमे अधिक रंगवतात. माध्यमं आणि हे एक प्रकारचे चांगले खाद्य मिळते असे म्हटल्यास वावगे ठरू नये. बंडखोरी केल्यास त्यांचे परिणाम माध्यमे लगेच विश्लेषण करून सांगतात. पुढे काय होईल, याचा अंदाज बांधतात. निवडणुकीत पक्षाने उमेदवारी दिली नाही, तर एखादा नेता बंडखोरी करून अपक्ष उमेदवारी जाहीर करतो. त्यावेळी पक्षाने दिलेल्या उमेदवाराच्या विरोधात उमेदवारी असतो. परिस्थितीत उमेद निवडूनही येतात.दरम्यान शिस्तभंगाची कारवाई म्हणून त्यांची पक्षातून हकालपट्टी केली असते किंवा लक्षात ठेवू नये त्याला काही मदत केली जात नाही. लोक असल्यास ते पुन्हा संबंधित पक्षात सन्मानाने जातो, असेही होते. बंडखोरी केल्याने अनेक शोधतात प्रश्न उधबवतात. त्यांना संबंधित पक्षाला तोंड द्यावे लागते.

उदाहरणार्थ २०१९ निवडणुकी शिर्डी लोकसभा मतदारसंघात भाजपचे नेते तथा माजी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना पक्षाने उमेदवारी जाहीर केले. त्याचे माध्यमांनीही भांडवल केले. याच प्रमाणे पद मिळवण्यासाठीचे प्रयत्न, कार्यकर्त्यांची पळवा पळवी, उमेदवारीवरून वाद, आंदोलने त्यांचीही राजकीय पक्षांवर जनमत तयार करण्यात महत्वाची भूमिका आहे.

**राजकीय जाहीरनामा तयार करण्यात माध्यमांची भूमिका –** राजकीय जाहिरनामा म्हणजे काय हे आधी समजून घ्यावे. सर्वच पक्ष किंवा उमेदवार निवडणुकीसाठी मतदानाच्या आधी प्रचाराच्या दरम्यान जनतेला विकासकामांचे आश्वासने देतो. त्याचे पत्र लोकांमध्ये वाटतो, तो जाहीरनामा असतो. एक जाहीरनामा निवडणुकीच्या आधी किमान महिनाभर प्रसिद्ध करतात. लोकसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली की, पक्षाकडून जाहीरनामा तयार केला जातो. त्यांच्याप्रती नेत्यांमध्ये देऊन आपल्या भाषणात सांगितले जाते. कटनी ह्यात जाहीरनाम्याच्या आधारे प्रचार करण्याचे आदेश दिले जातात. मामा लोकांसमोर सादर करताना तो काही स्टॅम्प पेपरवर दिला जात नाही. पक्ष आश्वासन देतो. ती कामे होतील याची हमी नसते. लोकहित यावर पूर्ण विश्वास ठेवत नाही. फ्री झालेल्या निवडणुकीत जाहीरनामे प्रसिद्ध केले गेले, त्यानुसार त्यातील अनेक कामे झाली नाहीत. सर्वच आश्वासनांची पूर्तता होईल याची शाश्वती नसते. उदा.–२०१४ बंदुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी शेतकऱ्यांना पेन्शन सुरू करण्याचे आश्वासन जाहीरनाम्यातून दिले होते. मात्र पाच

वर्षात कोणत्याही शेतकऱ्याला पेन्शन मिळाली नाही. मनातून दिलेले आश्वासन पूर्ण काय झाले नाही, उत्तर सरकार करत तांत्रिक बाबींमध्ये दडलेले असते. कोणतेही असो, पूर्ण होत नाहीत. निवडणुकी पुरता नसतो. कोणतेही पक्ष काम करत नाही.

**प्रसार माध्यमांचे बदलते स्वरूप –** १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणानुसार अर्थव्यवस्थेच्या उदारीकरणामुळे हाऊस मध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक झाली. उद्योगपती, राजकीय नेते ज्यांनी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे.यामध्ये मोठ्या प्रमाणात स्पर्धा असल्यामुळे राजकीय व आर्थिक फायद्यानुसार मीडियाचा वापर होत असलेला दिसून येतो. यासाठी महत्त्वाच्या विषयावर शिक्षण देणे व समाजपरिवर्तन घडवून आणणे हा मीडियाचा मुख्य उद्देश असतो. सरकारी संस्था भ्रष्ट, हुकूमशाही ठरतात यावर आवाज उठवण्याचे कार्य करावे लागते. आज भारतात मीडिया ही विविध राजकीय पक्ष किंवा संस्था आणि व्यवसायिक उद्योगपतींचे मुख्य पत्र बनली आहेत.मीडिया देशाच्या हिताचा करता कार्य न करता मालकाच्या हिताकरिता कार्य करताना आपण नेहमी पाहतो. त्यामुळे भारतीय माध्यमांची विश्वासार्हता कमी होत आहे. इंडियातील राजकीय पक्षांच्या वाढत्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहोचणार या बातम्यांच्या गुणवत्तेत घट झालेली आहे. माध्यमांनी पक्षांना त्यांच्या सरकारच्या कामांना प्रोत्साहन देण्यासाठी व्यासपीठ म्हणून काम केले आहे. राजकारणाच्या बदलत्या गतिमान अपेक्षा मीडियाकडून वाढवली.सध्या देशातील तरून तंत्रज्ञान आणि सोशल मीडिया च्या माध्यमाने जगात अधिक रस घेत आहेत. टी. आर. पी. वाढवण्याकरता प्रसारित करीत असलेली माहिती पक्षपाती आहे का याची खात्री करून घेणे माध्यमांसाठी महत्त्वाचे ठरते. मीडियावर किती विश्वास ठेवावा हे सुद्धा जनतेने जाणून घ्यायला पाहिजे.कोणत्याही प्रकारची असली तरी राजकारण्यांना समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्यासाठी मीडियाचा वापर करावा लागतो. चल मीडियाच्या माध्यमातून राजकारणी आज मात्र त्यांच्या सतत संपर्कात राहत आहेत. पक्षाच्या आपल्या स्वतंत्र वेबसाइट आहेत. त्यावरून सुद्धा आपल्याला राजकीय पक्षाची ध्येयधोरणे किंवा विचार लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य राजकीय पक्ष करीत असतात.

प्रत्येक वेळेस पक्षांच्या कार्यकर्त्यांची भेट न घेता प्रसारमाध्यमांचे सहाय्याने त्यांच्या संपर्कात राजकीय नेत्यांना राहाता येते. वेळेची व पैशाची बचत होते. राजकीय पक्षांनी लोकांशी संवाद साधण्यासाठी मीडियाच्या सर्व साधनांचा वापर करताना दिसून येतो. सोशल मीडियाच्या वापरामुळे अनेक प्रकारचा सकारात्मक विकास झाला आहे की, तरुण राजकीय विषयावर बोलताना दिसून येतात. सोशल मीडियामुळे भारतीय राजकीय क्षेत्रात जागृकता निर्माण झाली आहे असे लक्षात येते.

**शिफारशी –**

- व्हिडिओ शिवाय राजकारण नाही राजकारणाशिवाय लोकशाही नाही म्हणून मोठी जबाबदारी पार पाडणे त्यात देशातील मीडियाची गरज आहे.
- नागरिकांना जागरूक करण्यासाठी माध्यमांना सकारात्मक बाजू मांडण्याचा प्रयत्न करायला हवा.
- माध्यमे आणि राजकारण यांचा जवळचा संबंध आहे.माध्यमांचा वापर राजकारण न करता सकारात्मक तसेच विधायक कार्य करता करण्यात यावा.
- प्रसार माध्यमांचा वापर करण्यापूर्वी लोकांना त्याबाबत शिक्षित केले जाणे आवश्यक आहे त्यामुळे मीडियाचा प्रभाव योग्य प्रकारे पडले.

**निष्कर्ष –**

- माध्यमांनी राजकीय दबावात न येता काम करणे आवश्यक आहे.
- राजकारणात सोशल मीडिया महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सोशल मीडियामुळे राजकीय प्रचार व प्रसाराचे तंत्रच बदलले आहे.
- पूर्वीच्या निवडणूक प्रचार तंत्रामध्ये व आताच्या निवडणूक प्रचार तंत्रामध्ये खूपच फरक जाणवतो.
- निवडणुकीच्या प्रचार साधनांचा प्रवास पारंपारिक ते कडून आधुनिकतिकडे होत आहे.
- सोशल मीडियाचा अचूक व प्रभावी वापर करणाऱ्या राजकीय पक्षाला यश मिळताना दिसते.

**संदर्भ**


- राजकारण आणि माध्यमे – डॉ. बाळ पाटील. पान क्र. १९ ते ३५ आणि पान क्र.–६९ ते ७५.
- प्रसार माध्यमे आणि समाज – research journey – पान क्र. –२१ ते २३, पान क्र. –३७, ३८, पान क्र. –९९ते १०१, पान क्र.–१३३,१३४.
- http://www.yourstory.com
- वर्तमानपत्र लेख दैनिक लोकसत्ता– दि– २३ फेब्रुवारी१२०१४ सोशल मीडियाचे प्रचार युद्ध.

Websites -

- https://www.dictionary.com/browse/media::text=noun,are%20covering%20the%20speech%20tonight.
- https://en.wikipedia.org/wiki/SocialšmediašandšpoliticalšcommunicationšinšthešUnitedšStates.
- https://www.google.com/search?sxsrf=LeKk02mTPZkwD02UF4gJHšGlXpi8eDw:1587559745427q=What+is+mass+media+in+politics%3Fsa=Xved=2ahUKEwiGg771iPzo hWozTgGHcfPBB0 Qzmd6BgNEB8biw=1366bih=657
- https://www.ethicssage.com/2016/10/the-role-of-the-media-in-politics.
- https://www.bbvaopenmind.com/en/articles/the-new-media-s-role-in-politics/
- https://www.google.com/search?q=media+and+politics+pdfsxsrf=Pq-WBvzy465aBv5mzNT-cTbM²-0YelBvpQ%31648917680949ei=sHxIYobJOY6PseMPocqWmgoq=mediagsšlcp=Cgdnd3Mtd216E EY-zIECCMQJzIECCMQJzIECCMQJzIECQQzIECQQzIECQQzIECQQzIICQg QQsQMyCggEIEEIcCEBQyCgEI-EELEDOgcIIxCwxnOgUIBCBDoHCCMQ6gIQJzoHCC4Q6gIQJ0oECEEY EoECEYYFDjBljDO2CgdWgCc-F4BIBrQOIcoUkgEIMi0xMC4wLjGYQCgQGwQrIQHQEsclient=gws-wiz

# शीतयुद्धत्तर काळात व्यापारी संघाचे वाढलेल्या महत्त्वाचे विश्लेषणात्मक अध्ययन

**कु. देशमुख पौर्णिमा लक्ष्मण**
एम. ए. सेट. सहाय्यक प्राध्यापक,
राज्यशास्त्र विभाग, सामाजिकशास्त्रे प्रशाळा, क.ब.चौ.उमवि जळगाव.

**प्रस्तावना –**

१९९२ मध्ये सोव्हियेट संघाचे विघटन होऊन जगाच्या पाठीवर रशिया एक प्रबळ दावेदार म्हणून उदयास आले आणि नंतर साम्यवादी साम्राज्याचा अंत झाला त्याचबरोबर शीतयुद्ध ही संपले. शीतयुद्ध दुसऱ्या महायुद्धाच्या नंतरच्या काळात आंतरराष्ट्रीय संबंधाच्या केंद्रस्थानी होते. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर अमेरिकेच्या नेतृत्वाखाली साम्यवादी राष्ट्राचा गट व सोविएत रशियाच्या नेतृत्वाखाली साम्यवादी राष्ट्राचा गट यांच्यामध्ये सुरू झालेला सामाजिक व राजकीय संघर्ष म्हणजे शीतयुद्ध होय. शीत युद्धाच्या दरम्यान राष्ट्रांच्या दोन गटांमधील संबंध अत्यंत तणावाचे होते त्यातील प्रत्येकजण स्वतःला मजबूत करून दुसऱ्याला कमकुवत करण्यासाठी डावपेच आखत होता. दोन्ही गटाचा एकमेकांवर काडीचाही विश्वास नव्हता दोन्ही गट सतत राजनैतिक डावपेच खेळण्यात मग्न होते. लष्करी स्पर्धा, शस्त्रास्त्रांची स्पर्धा, हेरगिरी हे सर्व चालू होते.

शीतयुद्धाच्या काळात अमेरिका व सोव्हिएत गटांमध्ये प्रचंड संघर्ष तणाव व स्पर्धा होती. या काळात आंतरराष्ट्रीय राजकारणाची दिशा या दोन गटांमध्ये आणि विचार प्रणाली मधील तीव्र संघर्षाच्या आधारावरच ठरत होती. अमेरिकन गट भांडवलशाहीचा पुरस्कार करत होती तर रशिया गट साम्यवादी विचार सरणीचा पुरस्कार करत होती. तर रशिया गट साम्यवादी विचार सरणाचा पुरस्कार होती.

**विषयाची निवड –** प्रस्तुत लघुशोध निबंधात शीतयुद्धात अमेरिका व सोव्हिएत रशिया याचा सामाजिक व राजकीय बदल या काळात होत होते आणि त्यानंतर म्हणजेच शीतयुद्धत्तर फळात अनेक महत्त्वाचे राष्ट्र मध्ये असलेली सामाजिक, राजकीय व व्यापारी संबंध अभ्यासासाठी सदर विषयाची निवड केली आहे.

शीतयुद्धत्तर काळात वाढलेले व्यापारी अभ्यास करून जागतिकीकरणाच्या संबंधाच्या माध्यमातून जग जवळ आले व व्यापारी संबंध वृद्धिंगत झाली आहे. एकूण जगाचा राजकीय सामाजिक व व्यापारी संबंधावर देखील परिणाम झाले या व्यापारी संघाचे अध्ययन करण्यासाठी सदर विषयाची निवड केली आहे.

**विषयाचे महत्त्व –** जागतिक पातळीचा विचार केला असता सोव्हिएट रशिया व अमेरिका यांच्यात १९९१ मध्ये शीतयुद्ध समाप्त झाले परंतु या शीतयुद्धाचे पडसाद शीतयुद्धत्तर काळात सामाजिक राजकीय व आर्थिक तसेच व्यापारी संघावर देखील पडले या सर्व बाबींचा अभ्यास करणे या विषयाच्या अनुषंगाने महत्त्वाचे ठरते.

**उद्दिष्टे –**

१) शीतयुद्ध म्हणजे काय शीतयुद्ध काळातील व्यापारी संघाचा अभ्यास करणे.
२) शीतयुद्धत्तर काळानंतर जगातील मोठ्या राष्ट्रावर झालेल्या वाढत्या व्यापारी संघाच्या परिणामाचा अभ्यास करणे.
३) जागतिक व्यापारी संघाचे (WTO) वाढलेले महत्त्व सामाजिक, राजकीय, आर्थिक, घटकात झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.
४) शीतयुद्ध काळात अमेरिका व सोव्हिएत रशिया यांच्यात झालेल्या व्यापारी दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.
५) शीतयुद्धत्तर काळात व्यापारी संघाचे वाढलेले महत्त्व व वैशिक (जागतिक) व्यापाराचा मागोवा घेणे.

**गृहीतके –**

१) शीतयुद्ध काळात अमेरिका व सोव्हिएत रशिया या दोन राष्ट्रांमध्ये व्यापारी दृष्टिकोनातून अनेक बदल झाले आहेत.
२) शीतयुद्धत्तर काळात सामाजिक राजकीय व आर्थिक घटकांचा परिणाम व्यापारी संघावर झालेला आहे.
३) शीतयुद्धत्तर काळात व्यापारी संघाचे महत्व व वैश्विक (जागतिक) व्यापारात अनेक बदल झाले.

**संशोधन पद्धती –** संशोधन करत असताना संशोधकाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागले काही गोष्टीचा सहजासहजी शोध लागत नाही. संशोधकाला विविध गोष्टींचा अवलंब करावा लागत असतो प्रस्तुत लघुशोध निबंधात संशोधन करताना संशोधनकर्त्याने विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करून दुय्यम साधनाचा वापर केलेला आहे.

**उदा –** दैनिक वृत्तपत्रे, मासिके, त्रैमासिक, संदर्भग्रंथ, इंटरनेट इत्यादी घटकांचा समावेश केला आहे.

**विषय विवेचन –**

**एकध्रुवीय व्यवस्था –** ज्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये केवळ एकच राष्ट्राच्या हाती बहुतांश सांस्कृतिक आर्थिक लष्करी सेवा एकवटली असते त्या व्यवस्थेला एकध्रुवीय व्यवस्था असे म्हणतात. आधुनिक युगाच्या आधी जगभर प्रभाव असलेली एक द्रव्य व्यवस्था निर्माण होणे कठीण होते या काळात इतर राष्ट्रांबद्दल माहिती उपलब्ध होणे शक्य नव्हते. उदा. १५ ते १७ व्या शतकातील तुर्कांची राज्य १८ व्या व १९ व्या शतकातील ब्रिटिश साम्राज्य व शीतयुद्ध काळातील अमेरिका व सोव्हिएत संघ ही याची उदाहरणे आहेत.

**द्विध्रुवीय व्यवस्था –** या व्यवस्थेमध्ये सांस्कृतिक आर्थिक व लष्करी सत्ता दोन राष्ट्रांमध्ये विभागली होती ही राष्ट्र जगाच्या सर्व भागात आपला

प्रभाव क्षेत्र निर्माण करतात. उदा - शीतयुद्धाच्या काळात पश्चिम युरोपातील बरीच राष्ट्रे अमेरिकेच्या प्रभावाखाली होती, तर पूर्व युरोपातील राष्ट्रे सोव्हिएत रशियाच्या प्रभावाखाली होती. दोन्ही सत्ता कोणाच्याही प्रभावाखाली नसलेल्या राष्ट्रांना आपल्या बाजूला खेचण्याचा प्रयत्न करीत राहतात.उदा - अमेरिका व रशिया शीतयुद्धाच्या काळात अलिप्ततेचे धोरण मानणाऱ्या भारताला नेहमीच आपल्या बाजूला खेचण्याचा प्रयत्न करीत होते.

**बहुध्रुवीय व्यवस्था –** विसाव्या शतकाच्या सुरुवातीला बहु ध्रुवीय व्यवस्था अस्तित्वात होती. दुसऱ्या महायुद्धानंतर द्वितीय व्यवस्था निर्माण झाली. अमेरिका व सोव्हिएत रशिया या दोन महासत्ता उदयाला आल्या. शीत युद्ध संपल्यानंतर व सोव्हिएट रशिया चा अंत झाला व त्यानंतर द्विध्रुवीय व्यवस्थेची जागा एकध्रुवीय व्यवस्थेने घेतली. आज ही व्यवस्था अमेरिकेच्या ताब्यात आहे अनेक अभ्यासकांच्या मते शीत युद्धा नंतर अमेरिका एक मोठी ताकद म्हणून उदयास आली आहे. तिच्याकडे आंतरराष्ट्रीय व्यवस्थेला पाहिजेत असा आकार देण्याची अभूतपूर्व ताकद निर्माण झाली आहे. अमेरिकेकडे जगावर ताबा मिळविण्याची महत्त्वाकांक्षा आहे. वाढत जाणारी अर्थव्यवस्था आणि वस्त्रे विचारप्रणाली व तंत्रज्ञान आहे. या सर्वांच्या जोरावर अमेरिका एक मोठे राष्ट्र सत्ताकेंद्र महान बराच काळ टिकून राहू शकते.

**अमेरिकेचे धोरण –** शीत युद्ध संपल्यानंतर अमेरिकेने नेहमीच आपले प्रथम स्थान टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला ज्या देशांनी अमेरिकेला आवाहन करण्याचा प्रयत्न केला त्यांना अमेरीकेने धडा शिकवला. १९९२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या संरक्षण नियोजन मार्गदर्शिका मध्ये अमेरिकेने स्पर्धक निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी असे स्पष्ट नमूद केले होते.

शीतयुद्धानंतरच्या कालखंडात अमेरिकेने काही राष्ट्रीय दर्जा दहशतवाद व संरक्षणात्मक शास्त्राच्या विरुद्ध चालू केलेल्या युद्धाला राष्ट्रीय हिताच्या दृष्टिकोनातून बरेच महत्व दिले आहे. शीत युद्धानंतर अमेरिकेच्या सत्तेला आव्हान देऊ शकेल अशी सत्ता अस्तित्वात नसल्यामुळे अमेरिकेने आपले राष्ट्रीय हितसंबंध जपण्यासाठी लष्करी बळाचा वापर उघडपणे करण्यास सुरुवात केली. अमेरिकेचे राजनीतिक धोरणही आक्रमक बनले. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका केवळ छोट्या राष्ट्रांमध्ये सत्ताबदल घडवून आणण्याचे प्रयोग करत होता. या प्रयोगात स्वतः थेट सामील न होता छुप्या मार्गाने हस्तक्षेप करण्यावर भर दिला गेला परंतु शीत युद्धा नंतर अमेरिकेने अफगाणिस्तानवर (ऑक्टोबर २००१) इराकवर (मार्च २००३) एकतर्फी आक्रमण केले.अनेक विचारवंतांच्या मते केवळ एक द्रव्य व्यवस्थेमुळे अमेरिकेने ही वर्चस्वाची धोरणे स्वीकारली आहेत.

अमेरिकेने संभाव्य धोकादायक शक्तींना आपल्या नेतृत्वाखाली राजकीय व आर्थिक संस्थांमध्ये गुंतवून घेतले त्याचबरोबर विविध पातळीवर संबंध प्रस्थापित करून त्यांना नियंत्रणात ठेवण्याचे धोरण अमेरिकेने आखले आहे.उदा - रशियाला जी - ८ राष्ट्रांच्या गटात सामील करून घेण्यात आले साम्यवादी चीन हा सध्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये सामावून घेण्यासाठी अमेरिकेने विशेष प्रयत्न केले चीनला भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे नियम स्वीकारण्यासभाग पाडले चीनबरोबरच संरक्षण क्षेत्रातील सहकार्य वाढवण्यात आले. त्याचप्रमाणे अमेरिकेने आपल्या संभाव्य स्पर्धकांना लष्करी ताकदीच्या जोरावर सामावून घेतले.

**दक्षिण-उत्तर संबंध –** शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर तिसरे जग या संज्ञेला अनेक विश्लेषकांनी आव्हान दिले. भांडवलशाही राष्ट्राचे पहिले जग व साम्यवादी राष्ट्राचे दुसरे जग यांच्यामधील संघर्ष संतापले होते. त्यापेक्षा साम्यवादी राष्ट्रांचे दुसरे जग लयाला गेले त्यामुळे तिसरे जग या संज्ञेचा अर्थ उरत नाही. १९५० च्या दशकात आशिया, आफ्रिका व दक्षिण अमेरिकेतील विकसनशील राष्ट्रांचे वर्णन करण्यासाठी तिसरे जग ही संज्ञा वापरण्यात आली. या भागातील बरेच देश दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झाली हे देश म्हणजे युरोपातील वसाहतवादी राष्ट्रांच्या व वसाहती होत्या. दुसऱ्या महायुद्धानंतर मुख्यतः आर्थिक समस्यांनी ग्रासलेल्या वसाहतवादी राष्ट्रांनी आपल्या वसाहती स्वतंत्र केल्या. अनेक वर्ष आर्थिक शोषण झाल्यामुळे नव्याने स्वतंत्र झालेले देश आर्थिकदृष्ट्या मागास झाले. मुख्यता ही देश दक्षिण भागात होती त्यामुळे या देशांना दक्षिण असे संबोधण्यात येते. तर जगाच्या उत्तरेकडील औद्योगिक दृष्ट्या संपन्न राष्ट्रांना उत्तर असे संबोधण्यात येते. शीतयुद्ध संपले तरी दक्षिण व उत्तरेकडील देशांमधील राजकीय फरक पडला नाही. अमेरिकेने इराकवर केलेला हल्ला इजराइल-पॅलेस्टाईन संघर्ष, आंतरराष्ट्रीय व्यापारावरील संघर्ष व निर्बंध परकीय गुंतवणूक संपदा हक्क पेटंट्स इत्यादी विषयावरील उत्तर व दक्षिणेकडील देशांच्या मतांमध्ये प्रचंड फरक असल्याचे दिसून येते. शीतयुद्धत्तरकाळानंतर या प्रश्नांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**आर्थिक क्षेत्र –** शीतयुद्धादरम्यान पश्चिम व पूर्वेकडील देशांमध्ये तिसऱ्या जागतिक अधिकाधिक देश आपल्याकडे खेचून घेण्याकडे स्पर्धा सुरू होती. या काळात अमेरिका उदारमतवादी आर्थिक धोरणाचा पुरस्कार करीत होती या धोरणामुळे आर्थिक विकास घडवून येईल असा अमेरिकेचा अंदाज होता याउलट सोविएत युनियनने साम्यवादी अर्थव्यवस्थाचा पुरस्कार केला होता. केवळ ही व्यवस्था स्वीकारल्यावर नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना वेगाने विकसित होणे शक्य होईल. १९८९ नंतर सोव्हिएट युनियन व त्याच्या नेतृत्वाखाली साम्यवादी व्यवस्था एकापाठोपाठ एक नष्ट होत दिली त्यामुळे १९८९ नंतर जगामधील नव उदारमतवादी व्यवस्थेला स्पर्धा उरली नाही या व्यवस्थेला गती प्राप्त झाली त्यामुळे जागतिकीकरणाची प्रक्रिया वेगाने घडून आले.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, जागतिक व्यापार संघटना या जागतिक अर्थसंस्था व श्रीमंत व बलवान राष्ट्राचा प्रभाव आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान या देशांत आर्थिकदृष्ट्या संपन्न राष्ट्रांनी एकत्र येऊन जी - ७ ग्रेट ही संघटना उभी केली. साम्यवादी रशिया चा विरोध व भांडवलशाही राष्ट्रांच्या हिताचे रक्षण या संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट होते. शीत युद्धा नंतर रशियाला संघटनेमध्ये सामील करून घेण्यात आले त्यामुळे या संघटनेला असा जी -८ असे संबोधले जाते. या संघटनेचा जागतिक राजकारणावर मोठा प्रभाव पडतो तसेच व्यापारी दृष्टीकोनानेही महत्व प्राप्त झाले आहे.

**सार्क संघटना –** सार्क संघटना म्हणजेच दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार संघटना (SAARC) होय. ही संघटना दक्षिण आशिया खंडामधील ८ देशांची एक आर्थिक व राजकीय सहाय्यक संघटना आहे. दक्षिण आशियामध्ये आर्थिक व सामाजिक प्रगती करण्याच्या उद्देशाने तसेच सांस्कृतिक विकास व विकसनशील देशांबरोबर सहकार्य करण्याच्या उद्देशाने सार्क संघटना उभारण्यात आली. सार्क सदस्य राष्ट्रांची एकत्रित अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकावर दिसून येते आणि जगाच्या लोकसंख्येच्या २१% लोक सार्क संघटनेच्या क्षेत्रात राहतात. भारत हा सार्क मधील सर्वात बलाढ्य देश आहे. सध्या दक्षिण आशियातील आठ देश सार्क चे सदस्य आहेत. सहा जानेवारी २००६ रोजी सार्क सदस्य राष्ट्रांनी प्रादेशिक व्यापाराला चालना देण्यासाठी दक्षिण आशियाई मुक्त करार करण्याची निर्मिती केली.

शीतयुद्धत्तर काळात खनिज तेलाला जगात अधिक महत्त्व प्राप्त झाल्यामुळे खनिज तेलाच्या व्यापारामध्ये स्पर्धा असलेली दिसून येते. यासाठी खनिज

संपन्न देशावर अमेरिका रशिया चीन इत्यादी राष्ट्रांशी व्यापारी संबंध जोडून आहेत.

**जागतिक व्यापारी संघटना** (WTO) – जागतिक व्यापारी संघटना ही एक आंतरराष्ट्रीय संघटना आहे. जगामधील देशादरम्यान होणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर देखरेख ठेवण्याचे काम ही संघटना करते सदस्य राष्ट्रांमधील वाणी त्याला चालना देणे त्याचे निवारण करणे इत्यादी जागतिक व्यापार संघटनेचे प्रमुख कामे आहे.

जागतिक व्यापार संबंधी सर्वसाधारण करार विकसित देशांचे हितसंबंध टिकवणारा असल्यामुळे विकसनशील देशांनी अनेक वेळा आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटना स्थापन करण्याचा प्रयत्न केला मात्र विकसित देशांनी ते सर्व प्रयत्न हाणून पाडले. संयुक्त राष्ट्रसंघाने १९६३ मध्ये संस्थात्मक रचना उभारण्यासाठी एक समिती स्थापन केली होती या समितीच्या सल्ल्यानुसार १९६४ मध्ये. (UNCTAD) UNITED NATIONAL CONFERENCE ON TRADE AND DEVELOPMENT संस्था उभारणेकडे लक्ष केंद्रित केले व ही संस्था उभारण्यात आली. उरुग्वे राऊंडच्या मर्शकेश करारानुसार १ जानेवारी १९९५ ला जागतिक व्यापार संघटनेची स्थापना करण्यात आली. २९ जुलै २०१६ रोजी अखेर भारतासह जगातील १६४ देश या संघटनेत समाविष्ट झाले तर २५ देशांनी सदस्यत्व मिळवण्यासाठी उत्सुकता दाखवली. १४ देश WTO चे सदस्य नाहीत.

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या वाटाघाटीसाठी व्यासपीठ उपलब्ध असणे. आंतरराष्ट्रीय व्यापार वृद्धिंगत करणे, व्यापार विषयक मतभेद हाताळणे, राष्ट्रांच्या व्यापारी धोरणावर देखरेख ठेवणे, विकसनशील देशासाठी तांत्रिक सहाय्य व प्रशिक्षण उपलब्ध करून देणे अशी अनेक कार्य या संघटनेद्वारे केली जातात व्यापारासंबंधी चा सर्वसाधारण करार हा तात्पुरत्या स्वरूपाचा होता. जागतिक व्यापार संघटना मात्र सदस्य देशांनी मान्य केलेली कायमस्वरूपी संघटना आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे आंतरराष्ट्रीय नाणेविधी, जागतिक बँक या संयुक्त राष्ट्र संघाच्या संलग्न संस्था आहेत. जागतिक व्यापार संघटना मात्र एक स्वतंत्र संस्था आहे.

**जागतिक व्यापार संघटनेची रचना** – जागतिक व्यापार संघटना अंतर्गत एक साधारण परिषद कार्य करीत असते. या परिषदेत प्रत्येक सदस्य देशाचा एक प्रतिनिधी असतो साधारणता दर महिन्यात परिषदेची एक बैठक भरते. जागतिक व्यापार संघटनेची मंत्रिस्तरीय परिषद ही अंतिम निर्णय घेणारी परिषद असते साधारणपणे ही परिषद दोन वर्षांनी भरत असते.

**सिंगापूर परिषद** – ९ ते १३ डिसेंबर १९९६ दरम्यान जागतिक व्यापार संघटनेची पहिली मंत्रिस्तरीय परिषद सिंगापूर येथे पार पडली. सिंगापूर परिषदेत विकसित व विकसनशील देशांमध्ये वाद निर्माण झाले या वादाचे दोन प्रमुख मुद्दे होते.

१) सामाजिक परीक्षेत

२) सिंगापूर मुद्दे

**जिनिव्हा परिषद** – १८ ते २० मे १९९८ दरम्यान जिनिव्हा येथे दुसरी मंत्रिस्तरीय परिषद पार पडली. गॅट कराराला ५० वर्षे झाल्याबद्दल विशेष सभा घेण्यात आली. उरुग्वे राऊंडमध्ये करार तसेच सिंगापूर मुद्द्यावर चर्चा करण्यात आली.

**सिएटर परिषद (१९९९)** – प्रचंड निदर्शने आणि विरोधामुळे जागतिक व्यापार संघटनेची सिएटल परिषद गाजली. जागतिक व्यापार संघटना मुळे मानव विकास पर्यावरण यावर गंभीर परिणाम होईल असे निर्देशकांचे म्हणणे होते.

**दोहा परिषद** – ९ ते १४ नोव्हेंबर २००१ दरम्यान दोहा येथे चौथी मंत्रिपरिषद भरली. जागतिक व्यापार पुढारी करण्यासाठी आगामी कराराचा २१ विषयाचा द्वितीय संच तयार करण्यासाठी या परिषदेने महत्त्वाची पावले उचलली होती.

**जागतीक व्यापार संघटनेचे प्रमुख संचालक** –

| अ.क्रं | नांव | पासुन | पर्यंत | देश |
|---|---|---|---|---|
| १ | पीटर सदरलॅड | १ जानेवारी १९९५ | १ मे २९९५ | आसलॅंड |
| २ | सिनेटो रुगीईरो | १ मे २९९५ | १ सप्टेंबर १९९९ | इटली |
| ३ | माईक मूर | १ सप्टेंबर १९९९ | १ सप्टेंबर २००२ | न्युझीलंड |
| ४ | सुपाई पनीटचपकडी | १ सप्टेंबर २००२ | १ सप्टेंबर २००५ | थायलंड |
| ५ | स्पाकल लॅमी | १ सप्टेंबर २००५ | १ सप्टेंबर २०१३ | फ्रान्सं |
| ६ | रॉबर्डो झेवेडो | १ सप्टेंबर २०१३ | | ब्राझील |

**जागतीक व्यापार संघटनेच्या मंत्रीस्वंरिय परिषदा पुढील प्रमाणे –**

| अ.क्रं | ठिकाण | कालावधी | भारतीय प्रंतिनीधी |
|---|---|---|---|
| १ | सिंगापूर | ९ ते १३ डिसेंबर १९९६ | श्री.बी.बी.रामय्या |
| २ | जिनिव्हा | १८ ते ३० मे १९९८ | श्री.रामकृष्णं हेडगे |
| ३ | सिएटल | ३० नोंव्हेबर ते ३ डिसेंबर १९९९ | श्री.मारन मुरोसली |
| ४ | दोहा | ९ ते १४ नोंव्हेबर २००१ | श्री.मारन मुरोसली |
| ५ | कॅनफून | १० ते १४ डिसेंबर २००३ | श्री.अरुण जेटली |
| ६ | हॉगकॉग | ३० नोंव्हेबर ते २ डिसेंबर २००५ | श्री.कमलनाथ |
| ७ | जिनिव्हा | १५ ते १७ डिसेंबर २०१९ | श्री.आनंद शर्मा |
| ८ | जिनिव्हा | १५ ते १७ डिसेंबर २०११ | श्री.आनंद शर्मा |
| ९ | बाली | ३ ते ७ डिसेंबर २०१३ | श्री.आनंद शर्मा |
| १० | नैरोबा | १५ ते १९ डिसेंबर २०१५ | श्रीमती निर्मला सितारमण |

**निष्कर्ष –**

१) शीत युद्ध काळात अमेरिका व सोव्हिएत रशिया या दोन राष्ट्रांमध्ये सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीत त्यांना निर्माण झाले. आणि त्याचे परिणाम हे शीतयुद्धत्तर काळात पाहायला मिळाले.थोडक्यात जागतिक व्यापार स्पर्धा निर्माण झालेली दिसून येते.
२) अमेरिका या देशाने एक द्रव्य व्यवस्थेचा स्वीकार केला व भांडवलशाही व्यवस्थेला बळ देण्याचा प्रयत्न केला.
३) सोव्हिएत रशियाचे विघटन होऊन लहान राष्ट्रांमध्ये त्याचे रूपांतर झाले तसेच रशियाचे व्यापारी महत्त्व तुलनेने कमी झाले.
४) उत्तर-दक्षिण संबंधात समतोल साधण्याचा प्रयत्न करण्यात आला.
५) शीत युद्धा नंतर चीन एक आर्थिक महासत्ता म्हणून उदयास आली.
६) जागतिक व्यापार संघटना स्थापन करून जागतिक व्यापार याला महत्त्व प्राप्त झाले.
७) जागतिक व्यापारात विकसित राष्ट्रांना आर्थिक स्थान मिळाले व जगात सापेक्षवादाची प्रक्रिया सुरू झाली.

**संदर्भ**

१) प्रदीप आगलावे – संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र-प्रथम आवृत्ती ०१ जानेवारी २०००
२) रुम की बसू – आंतरराष्ट्रीय राजकारण २०१७ SAHE publications India.
३) संयुक्त राष्ट्र आंतरराष्ट्रीय राजकारणाचे बदलती समीकरणे आणि संयुक्त राष्ट्रांची भूमिका – डॉ. शैलेंद्र देवळाणकर प्रथम आवृत्ती – २००८ विद्या बुक पब्लिकेशन औरंगपूर, औरंगाबाद.
४) भारताचे परराष्ट्र धोरण – डॉ. वा. भा. पाटील प्रथम आवृत्ती २१ एप्रिल २०१५ प्रशांत पब्लिकेशन.

Websites -
1) http://www.namegypt.org/en/Pages/default.aspx15 ì`m Zm‘ {eIa n[afXoMo g§Ho$VñWi
2) http://en.wikipedia.org/wiki/ListšofšUnitedšStatesšmilitaryšbases http://www.g20.org
3) US military bases world wide http://en.wikipedia.org/wiki/ListšofšUnitedšStatesšmilitaryšbases
4) US military base in ustralia Satellite tracking facility http://en.wikipedia.org/wiki/PinešGap
5) Diego Garcia http://en.wikipedia.org/wiki/BritishšIndianšOceanšTerritories http://en.wikipedia.org/wiki/DiegošGarcia
6) Defence journal http://www.defencejournal.com/2009-3/index.asp

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# खानदेशातील जंगल सत्याग्रह आदिवासींचा सहभाग- १९२०-१९४७

**प्रो. डॉ. जुगलकिशोर वि. दुबे**
इतिहास विभाग, मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव

१९२० ते १९४७ भारतीय राष्ट्रीय चळवळीच्या या शेवटच्या सत्तावीस वर्षाच्या पर्वातील भारतीय राष्ट्रीय संग्रामाचे नेतृत्व महात्मा गांधींनी केले. अत्यंत सोप्या व सहज भाषेत त्यांनी आपल्या राजकीय तत्त्वज्ञानाची मांडणी करून अगदी सामान्य भारतीयासही राष्ट्रीय चळवळीकडे आकर्षित केले. गोपाळ कृष्ण गोखले यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार काँग्रेसमध्ये प्रवेश करण्यापूर्वी महात्मा गांधींनी संपूर्ण भारताचा दौरा केला आणि या दरम्यानच्या काळात त्यांनी चंपारण्य सत्याग्रह चे नेतृत्व, अहमदाबाद येथील गिरणी कामगारांचा संप, गिरमिटीया (Agreement) सारख्या जाचक करारातून परदेशस्थ सामान्य भारतीय श्रमिकांना मदत इत्यादी सर्वसामान्यांच्या प्रश्नांना हाताळून त्यांनी आपल्या राजकीय जीवनाचा प्रारंभ केला. गांधीजींनी असहकार आंदोलन आरंभ करताना त्यात आपल्या १८ कलमी कार्यक्रमाद्वारे अस्पृश्यता निवारण व आदिवासींना चळवळीत सहभागी करून त्यांना मुख्य प्रवाही राजकारणात सहभागी करण्यासाठी व या वर्गांना समानतेची वागणूक देऊन सामाजिक एकात्मता साधणाऱ्या विधायक कार्यक्रमाचा आरंभ केला. गांधी युगापासून राष्ट्रीय काँग्रेसने खऱ्या अर्थाने भारतीय समाजाच्या विभिन्न धर्म आणि आतापर्यंत राष्ट्रीय राजकारणातील मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या प्रत्येक वर्गाचे प्रतिनिधित्व करण्याचे प्रयत्न केले.

मुंबई प्रांतात इ.स. १८७१ मध्ये गुजरात या ठिकाणी भिल्ल सेवा मंडळाची स्थापना झालेली होती आणि त्या माध्यमातून भिल्ल समूहाच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांना मंच उपलब्ध होऊन त्यांच्या सामाजिक उत्थानासाठी कार्याचा प्रारंभ हा झालेला होता विसाव्या शतकात आदिवासींसाठी कार्यरत असणाऱ्या अमृतलाल विठ्ठलदास ठक्कर (ठक्कर बाप्पा)यांच्या सोबत संपर्क आल्यानंतर गांधींनी खानदेशातील भिल्ल व सोबतच समस्त भारतातील विविध आदिवासी समूहांना राष्ट्रीय आंदोलनाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न केले वर्तमान झारखंड येथील ताना भगत या नावाने सुरू झालेल्या आदिवासींच्या आंदोलनातील (इ.स. १९१२ पासून) अहिंसात्मक तत्त्वांशी त्यांचा परिचय आलेला होता महात्मा गांधींनी या समूहांना काँग्रेस सोबत जोडण्यासाठी अनेक विधायक प्रयत्न केलेत व तशा सूचना काँग्रेसलाही दिल्यात ताना भगत प्रामुख्याने छोटा नागपूर मधील रांची जिल्ह्यात राहणारा उरांव आदिवासी समाज होता. १९२२ पासून ते आजतागायत हा समाज गांधीवादी विचारांवर विश्वास ठेवून आपले प्रश्न मांडत आलेले आहे आदिवासींच्या समग्र उत्थानासाठी स्पष्ट करण्यात आलेल्या गांधीवादी धोरणांना डॉ.राजेंद्र प्रसाद, ठक्करबाप्पा, पंडित जवाहरलाल नेहरू सारख्या महान नेत्यांनी पुढील काळात राबविले.[१] गांधींच्या राजकीय विचारांचा प्रभाव मुंबई प्रांतातील तत्कालीन खान्देश क्षेत्रात (जळगाव धुळे व नंदुरबार जिल्हा) वास्तव्यास असणारे भिल्ल, छोटा नागपूर मधील उरांव आणि संथाल परगण्यातील सध्याच्या साहिबगंज जिल्ह्यातील पहारीया आदिवासींवर पडला. १९२८ मध्ये साहिबगंज काँग्रेस कमिटीने द्वारकाप्रसाद मिश्रा आणि त्यांचे सहयोगी असलेल्या सुंदरसिंग पहारिया यांच्या प्रयत्नांनी सविनय कायदेभंग आंदोलनाच्या दरम्यान झारखंडमधील संथाल व पहारीया आदिवासी समाजातील लोकांना राजकारणात सक्रिय केले.[२] त्याचप्रमाणे १९४०-४१ च्या दरम्यान झालेल्या वैयक्तिक सत्याग्रहातही पहारिया आदिवासींनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. पहारिया संस्थान समितीद्वारा प्रकाशित एका अहवालानुसार या समूहातील लोक गवई गोधरा पहारीया यांच्या नेतृत्वात इ.स. १८८५ मध्येच काँग्रेसमध्ये सामील झालेले होते.[३] अस्पृश्यता निवारण हे १९२० पासून महात्मा गांधी यांच्या विधायक कार्यक्रमाचा एक प्रमुख भाग राहिलेला होता, त्यांनी तत्कालीन काळातील अस्पृश्यांना हरिजन आणि वन क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासींना गिरिजन म्हणून संबोधित केले. १९२० पर्यंत महात्मा गांधींचा भारतीय राजकारणात एक प्रमुख नेता म्हणून उदय झालेला होता. त्यांना १९१४ ते १९२० दरम्यान भारतातील चंपारण्य सत्याग्रह, बारडोली येथील शेतकऱ्यांचा सत्याग्रह आणि अहमदाबाद येथील सूत गिरणी कामगारांच्या हरताळ इत्यादी राजकीय आंदोलनांचा आणि दक्षिण आफ्रिकेतील वीस वर्षाच्या राजकीय जीवनाचा दांडगा अनुभव होता. या संपूर्ण काळातील अनुभवातून त्यांना एक ठळक बाब लक्षात आली ती म्हणजे भारतीय स्वातंत्र्य चळवळ समस्त भारतीय लोकांच्या सहभागानेच यशस्वी होऊ शकते आणि त्यामुळे अद्यापावेतो या आंदोलनापासून वंचित असलेले समूह जर जोडले गेलेत तर निश्चितच काँग्रेसच्या शक्तीत प्रचंड वाढ होईल, त्यांनी भारतीय समाजातील प्रत्येक वर्गाचा सहभाग वाढविण्यासाठी विधायक कार्यक्रमाची मांडणी केलेली होती.समाजव्यवस्थेतील अंतिम घटक असलेल्या प्रत्येक व्यक्तीस प्रतिष्ठा प्राप्त व्हावी आणि त्याचा उत्कर्ष व्हावा यासाठी अंत्योदय च्या विचाराने त्यांनी असे सामाजिक कार्यक्रम आखले. हिंद-स्वराज्य मधून त्यांनी आदिवासींच्या विपन्नावस्थेचा उल्लेख केलेला आहे व त्या काळात दिलेल्या असंख्य भाषणांतून, यंग इंडिया आणि हरिजन या वर्तमानपत्रामधून लिहिलेल्या अनेक लेखांमधून त्यांनी अंत्योदय (Rise to the last man) व सर्वोदय (Welfare of all) या शब्दांचा वारंवार वापर केला. आफ्रिकेतील २१ वर्षाच्या राजकीय जीवनात तेथील वासाहतिक शासनव्यवस्थेत झुलू आदिवासींच्या शोचनीय स्थितीप्रमाणे भारतीय आदिवासींची स्थितीही तेवढीच विदारक असल्याने आदिवासी व अस्पृश्य या सामाजिक दृष्ट्या शोषित पण लक्षणीय संख्येने असलेल्या समूहांच्या प्रश्नांना हाताळल्यास एकीकडे त्यांचा सामाजिक व राजकीय उत्कर्ष साधून राष्ट्रीय एकात्मतेचे पोषण तर दुसऱ्या बाजूस हे वर्ग राष्ट्रीय चळवळीशी जोडले जाऊन स्वातंत्र्य चळवळीचा पाया अधिक विस्तृत होणार होता असे मत प्रख्यात इतिहासकार रवींद्रकुमार यांनी व्यक्त केलेले आहे.

झारखंड येथील उरांव आदिवासी हे ताना भगत या नावाने प्रसिद्ध होते त्यांनी १९२२ पासून गांधीप्रणीत चळवळीत सहभाग घेण्यास प्रारंभ केला. स्वराज्य आणि चरखा सारखे शब्द आणि घटक हे या आदिवासी समाजात आधीपासून प्रचिलित असल्याचा उल्लेख अनेक इतिहासकारांनी केलेला आहे आदिवासींच्या जीवनशैलीत सामूहिकतेस अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले जाते.ताना भगत आंदोलनाच्या माध्यमातून उरांव आदिवासींनी इ.स. १९१२ पासून

इंग्रजांविरुद्ध कायदेभंगाची चळवळ सुरू केलेली होती. त्यांच्यासारखे अनेक आदिवासी समूह हे भारतातल्या अनेक क्षेत्रांमध्ये वास्तव्यास होते. वासाहतिक राजवटीच्या आरंभापासूनच मुंडा, भिल्ल,रामोशी, कोळी यासारख्या अनेक समूहांनी धीरोदात्तपणे इंग्रज विरोधात सशस्त्र विद्रोह केले होते असे अनेक विद्रोह भारतीय इतिहासात अत्यंत प्रसिद्ध आहेत. गांधींजींच्या काळापासून या समूहांनी सशस्त्र बंडा ऐवजी राष्ट्रीय काँग्रेसच्या मुख्य प्रवाही चळवळीत सहभाग घेत अहिंसात्मक तत्वांनुसार आपले योगदान दिले.

मीठासारख्या सामान्य व्यक्तीच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या घटकास महत्त्व देऊन महात्मा गांधींनी मिठावरील ब्रिटिश मक्तेदारीच्या विरोधात आणि त्याबरोबर अनेक जाचक कायद्यांना भंग करण्यासाठी सविनय कायदेभंग आंदोलन उभारले १२ मार्च ते ६ एप्रिल १९३० च्या दरम्यान साबरमती ते दांडी दरम्यान झालेल्या यात्रेने व ६ एप्रिलला त्यांनी केलेल्या कायदेभंगाच्या कृतीने संपूर्ण देशभर एक उत्साह संचारला. कायदेभंगाच्या अशाच प्रतिक्रिया संपूर्ण देशभर सुरू झाल्या परंतु मिठाचा सत्याग्रह हा केवळ मिठापुरते मर्यादित नव्हते तर ज्या ठिकाणी सागरी किनारा नव्हता अशा ठिकाणच्या शेतकऱ्यांनी सरकार तिजोरी शेतसारा भरण्यास नकार दिला तर दुर्गम वनक्षेत्रातील आदिवासीही त्यात सहभागी झालेत. ब्रिटिशांनी जंगलांना राष्ट्रीय संपत्ती घोषित करून विविध अधिनियमांच्या माध्यमातून वनसंपत्ती वर अनेक कर लावलेले होते त्यातून आदिवासींच्या उदरनिर्वाहाचा अत्यंत जटिल असा प्रश्न निर्माण झालेला होता. वनक्षेत्रातील या समूहांनी जंगल सत्याग्रह आरंभिले. मुंबई प्रांतात खानदेशातील काही प्रमुख जंगल सत्याग्रहाचा इतिहास हा यापूर्वीच समोर आलेला आहे पण प्रस्तुत शोध पत्रात मौखिक इतिहासाच्या प्रश्नावली व मुलाखत सारख्या तंत्राचा वापर करीत नावीन्यपूर्ण माहिती हाती आल्याने खानदेशातील दिवळ्यामाळ,जयनगर,भिलवाड आणि डांभुर्णी येथील सत्याग्रहात सामील झालेल्या आदिवासी स्वातंत्र्य सैनिकांची नावे व त्यांच्या योगदानाबद्दल प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

मुंबई प्रांतात गुजरात मधील ठक्कर बाप्पा आणि जुगतराम दवे यांच्या संपर्कातून गांधींना या भागातील आदिवासींच्या विपन्नावस्थेची माहिती मिळाली, जंगल क्षेत्रात राहणारे आदिवासी हे ब्रिटिशांच्या जाचक कायद्यांमुळे तर ग्रामीण क्षेत्रात अल्पसंख्येत राहणारे आदिवासी कुटुंब हे स्थानिक प्रभावशाली समूह व इंग्रज राजवटीद्वारा केल्या जाणाऱ्या दुहेरी शोषणाचे बळी ठरलेले होते. खानदेशाशी गांधींचा अनेक वेळेस संबंध आला पण त्यांच्या दोन राजकीय कार्यक्रमाच्या निमित्ताने ते येथे काही दिवस थांबले होते. इ.स. १९२७ मध्ये ९ ते १५ फेब्रुवारी दरम्यान एका आठवड्याच्या राजकीय दौर्यात गांधीजींनी खानदेशातील अंतर्गत व दुरुस्थ क्षेत्रांत जाऊन आपल्या राजकीय कार्यक्रमाचा परिचय लोकांना करून दिला. त्यामुळेच सविनय कायदेभंग चळवळी दरम्यान या क्षेत्रातील ग्रामीण आणि आदिवासी समाज हे मोठ्या संख्येत सहभागी झालेत.[४] त्यांचा दुसरा खानदेश दौरा आधुनिक भारतीय इतिहासात प्रसिद्ध असलेल्या फैजपूर काँग्रेस अधिवेशन दरम्यान झाला हा काँग्रेसचा पन्नासावा अधिवेशन होता आणि येथील प्रसिद्ध स्वातंत्र्यसेनानी श्री. धनाजी नाना चौधरी यांच्या प्रयत्नांमुळे ग्रामीण क्षेत्रात प्रथमच काँग्रेसचा हा तीन दिवसीय अधिवेशन २७ ते २९ डिसेंबर १९३६ ला संपन्न झाला त्यात सहभागी होण्यासाठी आलेले गांधीजी २० ते २९ डिसेंबर असे साधारणतः दहा दिवस खानदेशात वास्तव्यास होते.[५] निश्चितपणे वास्तव्याच्या प्रभावातून या भागातील लोक हे मोठ्या संख्येने काँग्रेसच्या राजकीय कार्यक्रमांशी जोडले गेलेत. इ.स. १९३० ला गांधींच्या नेतृत्वात सुरु झालेल्या सविनय कायदेभंग चळवळ व १९४२ मधील छोडो भारत चळवळीत येथील लोक हे बहूसंख्येने सहभागी झालेत.

सविनय कायदेभंग दरम्यान खानदेशात दिवळ्यामाळ, लळींग, कोळनावळ, डांगुर्णे फत्तेपुर–आमोदे, तर्हाड, नांदरखेडा, वडेल, कुडावल सारख्या आदिवासी भागात अनेक प्रसिद्ध जंगल सत्याग्रह घडून आलेत.दिवळ्यामाळ हे या भागातील पहिले सत्याग्रह होय. जयनगर आणि डांभुर्णी मध्ये झालेल्या सत्याग्रहात मोठ्या संख्येत आदिवासी महिला व पुरुषांनी सहभाग घेतल्याने या सत्याग्रहांना मुंबई प्रांतात मोठी प्रसिद्धी मिळाली. मुंबई प्रांतात इ.स.१८१८ पासून वासाहतिक राजवटीच्या स्थापनेनंतर कंपनी सरकार द्वारा लागू करण्यात आलेल्या वेगवेगळ्या महसूल पद्धतीमुळे व त्यांनी राबविलेल्या इतर अनेक धोरणांमुळे या भागातील लोकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला होता ग्रामीण भागात शेतकरी व भूस्वामी सावकाराच्या रूपात शोषक आणि शोषित हे दोन वर्ग काही काळातच निर्माण झालेत. कॉर्नवालीसच्या काळापासून भूमी ही एक विक्रीयोग्य वस्तू म्हणून समोर आले भूमी स्वामित्वाचा स्थापनेतून शेतकऱ्यांमध्ये अधिक उत्पादन घेण्याची प्रेरणा निर्माण होईल असे इंग्रजांना वाटत होते पण वैयक्तिक मालकी प्रस्थापित करण्याबरोबरच इंग्रजांनी द्वारा या क्षेत्रात रयतवारी प्रणाली लागू केल्याने ग्रामीण भागात सावकारांचा एक नवीन वर्ग अस्तित्वात आला व असे संपूर्ण भारतात घडून आले ताराचंद यांच्या मतानुसार जमिनीतून स्वकष्टातून निर्मिलेले संपूर्ण अतिरिक्त उत्पन्न हे सावकारांनी हडप केले, एका कर्जबाजारी शेतकऱ्यांकडे फक्त जिवंत राहण्यापुरतेच अन्न शिल्लक राहत असे.[६] महसूल व्यवस्थेच्या या नवीन पद्धतीतून अस्तित्वात आलेल्या या खालच्या पातळीवरील सावकारांनी अत्यंत कमी रकमेवर सुद्धा प्रचंड व्याजाची आकारणी केली आणि त्यामुळे शेतकरी व आदिवासी वर्गाकडून केला जाणारा कृषी व्यवसाय हा अल्पकाळातच नुकसानीचा ठरू लागला, कधीही न संपणाऱ्या ऋणग्रस्ततेने ग्रामीण भागात सावकार आणि शेतकरी यांच्यात एक सातत्यपूर्ण असा संघर्ष सुरू झाला हे सावकार शेतकऱ्यांनी कष्टातून मिळविलेल्या उत्पन्नाचा मोठा भाग स्वतःकडे ठेवण्याचा प्रयत्न करू लागले. महसूल व्यवस्थेविषयक नियम आणि विविध इंग्रजी कायद्याच्या आधारे या सावकारांनी आपल्या या उद्देशांची पूर्तीसाठी सहजपणे करून घेतली.[७] मुंबई प्रांतात ग्रामीण शेतकऱ्या प्रमाणेच वनक्षेत्रात राहणारे आदिवासी समूहपण इंग्रजांच्या या व्यवस्थेचा बळी ठरलेत त्यांच्यावर तर या महसूलपद्धती व्यतिरिक्त लागू करण्यात आलेल्या विविध वन अधिनियमांचा पण अत्यंत विपरीत असा प्रभाव पडला. जंगलांना राष्ट्रीय संपत्ती घोषित करून आदिवासींना तिथून काहीही घेऊन जाण्यास प्रतिबंध करण्यात आला. मराठाकाळात असलेल्या परंपरागत अधिकारांपासून त्यांना वंचित केले गेले, झूम शेती प्रतिबंधित करण्यात आल्याने आणि त्यांना गुन्हेगार जातीचा शिक्का मारल्याने आदिवासींच्या उदरनिर्वाहाचा भयंकर असा प्रश्न उभा टाकला या असंतोषातून या क्षेत्रात वेळोवेळी सशस्त्र असे उठाव घडून आलेत परंतू कालबाह्य युद्धपद्धती व अद्ययावत शस्त्रास्त्रांच्या अभावी इंग्रजांनी आदिवासींच्या उठावांचे दमन केले. काँग्रेसचे स्थापनेनंतर विशेषतः गांधींच्या प्रयत्नांनी राष्ट्रीय चळवळीच्या मुख्य प्रवाहात आदिवासी समाज जोडला गेल्याने त्यांनी वेगवेगळ्या आंदोलनात सक्रियपणे सहभाग घेऊन आपल्यावर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात राजकीय मार्गाने संघर्ष केला.

**भिलवाड जंगल सत्याग्रह** – भिलवाड हे गाव नाशिक जिल्ह्यात असून खानदेशातील पिंपळनेर (साक्री, तहसील) जवळ आहे. ५ ऑगस्ट १९३० ला भिलवाडमध्ये घडून आलेल्या जंगल सत्याग्रहात मोठ्या संख्येत आदिवासी बांधवांनी सहभाग घेतला पिंपळनेर येथील हरिभक्त परायण राजाराम महाराज

देशपांडे यांच्या नेतृत्वात २५७० सत्याग्रहींना या आंदोलनात सहभागी झालेत त्यांनी जंगलातून गवत कापून जंगल कायद्याचा प्रतिकात्मक विरोध केला व तदनंतर पिंपळनेर गावात एक मोठा मोर्चा काढण्यात आला.[८] इंग्रजांनी वेगवेगळ्या नियमानुसार वनसंपत्तीवर एकाधिकार प्राप्त केल्याने आदिवासींच्या पाळीव गुराढोरांना चरण्यास मनाई करण्यात आली त्यासोबत तेथून आयुर्वेदिक जडीबुटी, गवत, मध, डिंक इत्यादी वस्तूंच्या संकलनावर ही बंदी घालण्यात आलेली होती या प्रतिबंधित कायद्यांचे सविनय उल्लंघन केले गेले. पिंपळनेर जवळ मोठ्या संख्येने आदिवासी पाडे असल्याने त्या गावातून काढण्यात आलेल्या या मोर्चात सत्याग्रहात आदिवासी बांधवांनी लक्षणीय संख्येत सहभाग घेतला लोलिया नायक व बुधा कुंवर हे अल्पवयातच या आंदोलनात सामील झालेले होते त्यांच्याच गावातील सुक्राम पवार व शांताबाई पवार यांनीही या आंदोलनात उल्लेखनीय असे योगदान दिल्याची माहिती प्राप्त होते.[९].

**दिवळ्यामाळ जंगल सत्याग्रह –** भिलवाड सत्याग्रहातील कायदेभंगांच्या बातमीने खानदेशातील अन्य स्थानांवर अशा प्रकारचे सत्याग्रह घडून आले. त्याची पहिली प्रतिक्रिया दिवळ्यामाळ मध्ये १७ ऑगस्ट १९३० च्या सत्याग्रहात दिसून येते त्यात मोठ्या संख्येने भिल्ल समुदायातील आदिवासी स्त्रिया–पुरुष लहान मुलांसह आपले पारंपारिक वाद्य व राष्ट्रवादी भावनेस अनुसरून देशभक्ती युक्त गीत गाऊन या आंदोलनात सहभागी झालेत.[१०] या क्षेत्रात आदिवासी समाजात राष्ट्रीय चळवळीत सहभागी होण्यासाठी जागृतता निर्माण करण्यात म्हसदी या गावातील पांडू भिल्ल तथा शामभाऊ भिल्ल हे अग्रेसर होते. त्यांनी यापूर्वीही सरकार विरोधी अनेक आंदोलनात सहभाग घेतलेला होता इ.स. १९३० सालच्या सविनय कायदेभंग आंदोलनात सहभागी होऊन कोंडवाडा मुक्ती आंदोलन कथा जंगल सत्याग्रहात सहभाग घेतल्याने त्यांना दोन महिने तुरुंगवास व पंचवीस रुपयाचा दंड लावलेला होता.[११] दिवळ्यामाळ सत्याग्रहात आदिवासी स्त्रिया मोठ्या संख्येत सामील झाल्या श्रीमती ठाकर, श्रीमती सीताबाई तथा चंपाबाई भावसार यांच्या सोबत अष्टाणे गावातील सुमारे ७०० ते ८०० आदिवासी स्त्रिया या सत्याग्रहात सामील झालेल्या होत्या.[१२] यावेळेस शिक्षणाच्या अभावी वा निरक्षरतेचा कारणाने या सत्याग्रहाच्या अग्रणी म्हणून त्यांनी नेतृत्व केलेले नसेल पण आत्माराम कुंडलिक कुळकर्णी यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होऊन राष्ट्रभक्तीपर गीत, पारंपरिक वाद्यांचा निनादात किर्तने, घोषणा देत ब्रिटिशांचा विरोध करणारे मुख्य नायक तेच होते. खानदेशात घडून आलेल्या या पहिल्या सत्याग्रहात सुमारे २० ते २५ हजार एवढ्या प्रचंड संख्येने सामील झाल्याने या सत्याग्रहास मुंबई प्रांतात मोठी प्रसिद्धी मिळाली.

**जयनगर जंगल सत्याग्रह –** शहादा तहसील मध्ये जयनगर याठिकाणी ३१ ऑगस्ट १९३० ला या भागातील दुसरा प्रसिद्ध सत्याग्रह घडून आला. या गावाजवळ राहणाऱ्या आदिवासी पाड्यातील समाजबांधव हे पुंजू धनाजी भिल्ल यांच्या नेतृत्वात कोंडवाडा मुक्ती आंदोलनात सहभागी झालेत त्यामुळे पुंजू भिल्ल यांना तीन महिने सश्रम तुरुंगवासाची शिक्षा देण्यात आली.[१३] त्यांच्यासोबत या क्षेत्रात विखरण गावाचे मडा भिल्ल आणि हिराजी भिल्ल यांनी आदिवासी समाजांत राजकीय जागृती निर्माण करून त्यांना सविनय कायदेभंग आंदोलनात सहभागी होण्यास प्रेरित केले.

**डांभुर्णे जंगल सत्याग्रह –** २५ सप्टेंबर १९३० ला खानदेशात डांभुर्णे गावात जंगल सत्याग्रह करण्यात आला. या सत्याग्रहात केवळ दहा व्यक्तीच सामील होतील असा निर्णय घेण्यात आला असला तरीही सुमारे दोन ते तीन हजार लोक स्वयंप्रेरणेने त्यात सहभागी झाले.[१४] रामदास भिल्ल यांच्यासोबत त्यांचे सुपुत्र बाबू भिल्ल तथा त्यांच्या कुटुंबातील सदस्य खंडू, सोमा, दलपत भिल्ल आणि सरूबाई, दयाबाई, तेजाबाई या स्त्रियांसह संपूर्ण कुटुंब त्या सत्याग्रहात सामील झाले. रामदास दौलत भिल्ल यांच्या नेतृत्वात या क्षेत्रातील आदिवासी सातत्याने यापुढील आंदोलनातही सहभागी झाले आणि त्यांनी देशसेवेत आपले योगदान दिले.[१५]

इ.स.१९४२ च्या छोडो भारत चळवळीत रामदास भिल्ल यांनी त्यावेळी भूमिगत पद्धतीने कार्यरत असणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांना मदत करत सोबत आश्रयही दिला तसेच या आंदोलनाच्या काळात सरकारी संपत्तीचे नुकसान केल्याच्या कारणावरून त्यांना अटक करण्यात आली व त्यावेळेस त्यांना पोलिसांच्या छळास सामोरे जावे लागले.[१६]

**निष्कर्ष व निरीक्षणे –**

१) सविनय कायदेभंग आंदोलनांच्या दरम्यान आदिवासी समाजाच्या सामूहिक शक्तीच्या अविष्कार प्रकट झालेला दिसतो,पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचा लक्षणीय संख्येतील सहभाग हे या सत्याग्रहाची मुख्य वैशिष्ट्य असले होते. तत्पूर्वी या भागातील अनेक सशस्त्र उठावात अनेक धाडसी स्त्रियांनी सहभाग घेतलेला होता. जंगल सत्याग्रहात स्त्री–पुरुषांनी मोठ्या संख्येत सहभाग घेऊन आंदोलनास यशस्वी केल्याचे श्रेय त्यांना द्यावे लागते.

२) इंग्रज राजवटीच्या स्थापनेपासून खानदेशात घडून आलेले अनेक सशस्त्र उठाव ते राष्ट्रीय चळवळीतील अहिंसात्मक सत्याग्रहांचे मुख्य नायक या क्षेत्रातील आदिवासी समाज बांधव राहिलेले होते.

३) मौखिक साधनात व्यक्तिनिष्ठतेचा दोष काही ठिकाणी जाणवत असला तरीही शोषित–अंकित समूहातील जे अनेक व्यक्ती आंदोलनात सहभागी झालेत अशा अज्ञात आदिवासी स्वातंत्र्य सैनिकांची नावे यातून समोर येतात.

४) या आंदोलनात अल्पवयात सहभागी झालेल्या व हयात असलेल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या मुलाखती व प्रश्नावलींच्या माध्यमातून भरून घेण्यात आलेल्या माहितीत काळ व वयोमानानुसार विस्मृती व अतिशयोक्तीचे काही दोष असले तरीही त्यांची पडताळणी इतर ऐतिहासिक दस्तऐवजांशी करण्यात येऊन अधिकाधिक सत्य इतिहास प्रकट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

५) सविनय कायदेभंग,छोडो भारत यासारख्या राष्ट्रीय काँग्रेसच्या नेतृत्वात घडून आलेल्या चळवळीत सहभागी झाल्याने व मुख्य प्रवाही राष्ट्रीय राजकारणाचा अनुभव आल्याने त्याकाळात व स्वातंत्र्योत्तर काळातील राजकारणात खानदेशातील आदिवासी भागातून अनेक प्रसिद्ध नेते उदयास आले.

**संदर्भ**

१) Narayan Sachindra, Perspective on Tribal Development, commonwealth publishers, New Delhi, 1997, pp-06
२) कित्ता, पृ.–५५
३) कित्ता,पृ.–५४

४) संपा. बृजेश सिंह, महाराष्ट्र आणि महात्मा गांधी, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई, अक्टूबर २०१८, पृ.-१२२)
५) कित्ता-पृ.-१२२
६) ताराचंद, भारतीय स्वतंत्रता आंदोलन का इतिहास खंड-१, प्रकाशन विभाग, सूचना व प्रसारण मंत्रालय,नई दिल्ली, फरवरी २००४,पृ.-३१४...
७) कित्ता-पृ.-३२२
८) पांडे मधुकर नीलकंठ, धुळे जिल्हा स्वातंत्र्यलढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई,१९९८, पृ.- ४३
९) बुधा देवजी कुंवर, मुलाखत व प्रश्नावली,दि.८, नोव्हेंबर,२०१६,भिलवाड.(भिलवाड जंगल सत्याग्रहात सहभागी स्वातंत्र्यसैनिक.)
१०) शहा जी. बी., खानदेश मधील राष्ट्रवादाचा उदय आणि विकास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०१४, पृ.-२४८
११) कुंटे भ. भ.(संपा.),स्वातंत्र्यसैनिक चरित्रकोश, खंड -१, दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई, पुनर्मुद्रण २०१६ पृ.-१७५
१२) प्रबोध, साप्ताहिक, धुळे, दि. २०, ऑगस्ट १९३०, पृ.-३
१३) पूर्वोक्त,कुंटे भ. भ. (संपा.), पृ. -१७५
१४) बाबू रामदास भिल्ल, मुलाखत व प्रश्नावली,दि.१६, सप्टेंबर,२०१९,डांगूर्णे. (डांगूर्णे जंगल सत्याग्रहात सहभागी स्वातंत्र्यसैनिक.)
१५) कित्ता, प्रश्नावली
१६) पूर्वोक्त कुंटे.पृ.-३

**संदर्भ टीप –** बाबू रामदास भिल्ल, डांगुर्णे आणि बुधा देवजी कुंवर, भीलवाड यांची मुलाखत व त्यांच्याकडून प्रश्नावली भरून घेण्याचे कार्य संशोधक विद्यार्थी श्री.लक्ष्मण काशीराम गायकवाड यांनी २०१६ व २०१९ या दरम्यान केलेले आहे, सदरच्या मुलाखतीतुन मिळविलेली माहिती व प्रश्नावली त्यांच्याकडे संग्रहित आहे.

# धडगाव तालुक्यातील आदिवासी भिल्ल बोलीभाषा (नंदुरबार जिल्हा)

**सहा. प्रा. राकेश गोरसे**
ज. जि.म. वि. प्र.सह. समाजाचे, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव

**प्रस्तावना –**

भारत हा बहुभाषिक देश आहे. भारतात इतक्या भाषा बोलल्या जातात की, जगातील अन्य कोणत्याही देशात बोलल्या जात नाही.म्हणजेच भारत हा विविधतेने नटलेला देश म्हणून ओळखला जातो.विविध धर्म भारतात वास्तव्य करून राहतात. आदिवासी हा निसर्गपूजक आहे.भारतात विविध आदिवासी जमाती वास्तव्य करून राहतात आणि ह्या जमाती विविध बोलीभाषा बोलतात. साधारणतः चारशे बोलीभाषा भारतातील आदिवासी जमातीमध्ये बोलल्या जातात, असा उल्लेख डॉ. गोविंद गारे यांनी केला आहे.

महाराष्ट्रातील खानदेशात सुमारे १७ आदिवासी जमाती असून २० बोलीभाषा आहे.आदिवासी बोलीभाषेची लिपी नाही. अलिखित स्वरूपाची भाषा आहे.आदिवासी बोलीभाषेतील लोकगीते, कथा, म्हणी, उखाणे, वाक्प्रचार आणि कादंबरी लिहिण्यासाठी देवनागरी लिपीचा वापर केला जातो. पण हे साहित्य लिहिण्यापूर्वी आणि रसिकांपर्यंत पोहोचवण्याकरिता त्यांना समजावून घेता यावे, याकरिता या बोलीभाषेचे स्वरूप, ध्वनी व्यवस्था, बोली भाषेवरील इतर भाषांचा प्रभाव हे समजून घेणे आवश्यक आहे.महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्हा हा 'आदिवासींचा जिल्हा' म्हणून ओळखला जातो. त्यात अक्कलकुवा, तळोदा, धडगाव, शहादा आणि नवापूर या तालुक्यात आदिवासी समाज हा मोठ्या प्रमाणात वास्तव्य करून राहतो. नंदुरबार जिल्ह्यात भिल्ल, पावरा, मावची, कोकणी, कोटला, नोयरा, निबाडी, बारेला, नहाल, देहवाली या प्रमुख आदिवासी जमाती वास्तव्य करून राहतात.तसेच नंदुरबार जिल्ह्यात वळवी, पाडवी, गावित, मावची, वसावे ही कुळनामे आढळून येतात.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे –** प्रस्तुत संशोधन पेपराच्या अनुषंगाने खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहे.

१) आदिवासी जमातीच्या भाषेचा आढावा घेणे.
२) आदिवासी भिल्ल जमातीच्या भाषा व बोलीभाषेतील शब्दाची व वाक्याची माहिती मिळवणे.
३) धडगाव येथील भौगोलिक प्रदेशानुसार भिल बोलीभाषेवरील परिणाम अभ्यासणे.

**धडगाव तालुक्यातील आदिवासी –** नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुका हा सातपुडा पर्वतात वसलेला आहे.नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी लोकांना 'निसर्गपूजक' म्हणून ओळखले जाते. धडगाव तालुक्याच्या पूर्वेलातोरणमाळहेमहाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचे थंड हवेचे ठिकाण आहे. धडगाव तालुक्याच्या उत्तरेला नर्मदा नदी आहे व पश्चिमेला गुजरात राज्य आहे. त्यामुळे गुजरात व मध्यप्रदेशाचा अगदी जवळचा संबंध आहे. धडगाव परिसरात विखरित वस्ती आढळते.धडगाव तालुक्यात भिल्ल, पावरा, नोयरा, पाडकी आणि नहाल या बोलीभाषा प्रामुख्याने बोलल्या जातात. तसेच पावरा, वळवी, पाडवी, वसावे, तडवी, पराडके ही कुळनामे दिसून येतात. धडगाव तालुक्यातील पावरा ही आदिवासी जमात कुळनामाप्रमाणे पावरा भाषा बोलतात आणि पाडवी, वसावे, तडवी, पराडके, वळवी या कुळनामातील लोक भिल्ल बोलीभाषा बोलतात. तसेच या भागातील आदिवासी नृत्यकला व वाद्यकला या परंपरागत चालत आलेल्या कलेला विशेष महत्त्व आहे. आदिवासी नृत्यकलेत लग्ननृत्य, होळीनृत्य, गेरनृत्य आणि पावानृत्य (मोठी बासरी) या नृत्यांच्या समावेश होतो. आदिवासी वाद्यकलेत ढोल, कांगल, मांदल आणि टुपण या पारंपारिक वाद्याचा समावेश होतो.

**धडगाव तालुक्यातील बोलीभाषा –** धडगाव तालुक्यातील भिल्ल व पावरा या प्रमुख बोलीभाषा आहेत. तसेच नोयरी, पाडकी, नहाल या बोलीभाषासुद्धा बोलल्या जातात. यात बोलीभाषा ही प्रदेशानुसार व उच्चारणातील चढ-उतारतुन शब्द हे वेगळे आढळतात

**१. भिल (भिल्लोरी) बोलीभाषा –** भिल ही धडगाव तालुक्यातील एक महत्त्वाची भाषा आहे. भिल भाषेलाच 'भिलोरी' असेही म्हटले जाते. भिल भाषेत नोयरी या बोलीभाषेचा समावेश होतो. भिल या बोलीभाषेचा प्रा. डॉ. पुष्पा गावित या संशोधिकेने आपल्या संशोधनात 'डोंगरी भिल' असा उल्लेख केलेला आहे. भिल भाषेतील शब्द खालीलप्रमाणे :

| भिल शब्द | मराठी रूपांतरितशब्द | भिल शब्द | मराठी रूपांतरित शब्द |
|---|---|---|---|
| त्याह | त्याचे हे क्रियापद | साळ | झाड |
| डोगोअ | डोंगर / जंगलात | जुग | आकाश |
| वेहवाल | विवाह | ताअ | तुझं |
| बिलाडो | मांजर | पाही | भाऊ |
| वोडी याही | आजी | हावह | सासू |
| होवरुह् | सासरा | | |

असे शब्द आहेत. या शब्दावरून 'आदिवासी भिल' बोलीभाषेचा अंदाज येतो.

**भिल बोली भाषेतील वाक्य –**

१) भिल – ताअ कोअ का होय ?

मराठी भाषांतर – तुझं घर कुठे आहे?
२) भिल – तू का रतुलू?
मराठी भाषांतर – तू कुठे राहतोस?
३) भिल बोलीभाषेतील म्हण – गोवांदी पाडी किडा
मराठी भाषांतर – गोवांदी– दोन किंवा अनेक जणांनी मिळून एकत्रित केलेले काम
पाडी– म्हैस, किडा– किडा (जंतू)
मराठी भाषांतर – दोन किंवा तीन जणांनी मिळून एकत्रित केलेले काम कधीही यशस्वी होत नाही.
असे काही वाक्य भिल बोली भाषेत आढळतात.

**२. पाडकी बोलीभाषा –** पाडकी ही आदिवासी भिल्ल जमातीतील एक बोली भाषा आहे. पाडकी ही बोलीभाषा धडगावहुन २९ किलोमीटर अंतरावर असलेल्या मोलगी व काठी या भागात बोलली जाणारी भाषा आहे. तसेच अक्कलकुव्यातील वाण्याविहीर या गावाजवळील भागात सुद्धाही बोलीभाषा आढळून येते.या बोलीभाषेचा जवळचा संबंध नवापूरकडे बोलली जाणारी भिल्ल वगुजरात सीमेवरील देहवाली भाषेशी आहे.या भाषेत काही शब्दांच्या उच्चारणात व चढ–उतारात भिन्नता दिसून येते.

**३. नोयरी बोलीभाषा –** नोयरी ही बोलीभाषा प्रामुख्याने नर्मदा नदी जवळील प्रदेशात बोलली जाते. ही बोलीभाषा आदिवासी भिल्ल जमातीचा एक भाग आहे. या बोलीभाषेत धडगावकडील भाषा यात समानता दिसून येते. पण उच्चारणातील चढ–उतार यात मात्र वेगळेपणा दिसून येतो.प्रामुख्याने नोयरी या बोली भाषेत 'काग'या शब्दाचा जास्त वापर होतो.

**नोयरी या बोली भाषेतील वाक्य –**
१) नोयरी – काग वाणीरो?
मराठी – कोणत्या प्रकारचाआहे?
२) नोयरी – काग गोयनु रो ?
भिल – का गोल्यूओरा?
पावरा – काहरी गोयलू युरा?
मराठी – कुठ गेला होतास?
असे काही शब्द किवा वाक्य बोलीभाषेत बोलले जातात. वरील वाक्यात भिल, पावरा व मराठी अशी तुलना सुद्धा केलेली दिसून येते.

**४. नहाल बोली भाषा –** नहाल ही बोलीभाषा महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचे थंड हवेचे ठिकाण तोरणमाळ या भागात बोलली जाते. या भाषेत पावरा बोलीभाषेतील शब्द प्रामुख्याने दिसून येतात. तसेच तोरणमाळ या भागाबरोबरच लेघापाणी,मोडलगाव या शेजारील गावातही पावरा,भिल मिश्रित बोलीभाषा आढळून येते.

**नहाल बोली भाषेतील वाक्य –**
१) नहाल – काय किरतीली ह रे?
भिल – की कोअतुअलू?
पावरा – काय कोरतुलू?
मराठी – काय करतो आहेस?
२) नहाल – कोल भूख आविल रे?
पावरा – केत्यार आवलू रा?
भिल – केतीवेले आवलूअ रा?
मराठी – कोणत्या वेळी/ केव्हा आलास?
नहाल बोलीभाषेतील पावरा व भिल या बोलीभाषेपेक्षा काही वेगळे शब्द दिसून येतात. तर काही शब्द हे पावरा व भिल मिश्रित आहेत. नहाल या लोकांबद्दल सांगायचे झाल्यास या भागातील पावानृत्य प्रसिद्ध आहे. पावा म्हणजे बासरीचा प्रकार पावा हे वाद्य बासरीपेक्षा मोठे व लांब असते आणि त्या बासरीच्या सुरात नहाल लोक नृत्य सादर करीत असतात.

**सारांश –**

नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी बोलीभाषा परंपरागत चालत आलेली बोलीभाषा आहे. या तालुक्यातील भिल्ल, पावरा, नोयरी, पाडका आणि नहाल ही सर्व आदिवासी जमात एकत्र वास्तव्य करून आहे. त्यामुळे या जमातीत सण, चालिरिती, राहणीमान हे सारखे आहेत. त्याचबरोबर या सर्व लोकांची भाषा ही काही प्रमाणात भिन्न आहे. तरी भिन्नतेत एकता आढळून येते. या बोलीभाषेत इतर भाषेतील शब्द आढळून येतात. म्हणजेच नंदुरबार जिल्ह्यातील शब्दांचा प्रभाव हा भिल व पावरा बोलीभाषेवर दिसून येतो. यामागचे कारण असे की, आदिवासी भिल्ल तमाशा मंडळाचे सादरीकरण हे पूर्ण नंदुरबार जिल्ह्यात सादर केले जाते आणि त्या तमाशा मंडळातील भाषा नवापूरकडील आहे. या तमाशा मंडळात 'आदिवासी रोडाली' हे लोकगीते प्रसिद्ध आहे. त्याचा प्रभाव हा धडगाव तालुक्यातील बोलीभाषेवर आढळून येतो.

निष्कर्ष –
१. आदिवासी बोलीभाषेत पावरा व भिल या दोन्ही प्रमुख बोली आहेत.
२. धडगाव तालुक्यातील भिल व नोयरी या भाषेत सारखेपणा आहे.

३. पाडकी भाषेत गुजरात सीमेवरील व नवापूर कडील भाषाचा शब्दाचा वापर जास्त आहे.
४. काठी संस्थानाकडील आदिवासी पाडकी बोली भाषेत धडगाव कडील बोलीभाषेत उच्चार व शब्दात काही प्रमाणात भिन्नता आहे.

**संदर्भ**

१. आदिवासी संस्कृती : भाषा आणि साहित्य, प्रा. डॉ. पुष्पा गावित, अथर्व पब्लिकेशन, जळगाव.
२. भारतातील आदिवासी : समाज आणि संस्कृती, डॉ. गोविंद गारे, आदिम प्रकाशन, पुणे.
३. आदिवासी जमातीचा सांस्कृतिक इतिहास : अक्कलकुवा परिसर १९५० ते २०००, प्रा.डॉ.एन डी.भामरे, अथर्व पब्लिकेशन, जळगाव.
४. सातपुड्यातील भिल्ल, गोविंद गारे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# संसदीय लोकशाहीची वाटचाल : महाराष्ट्राचा विशेष संदर्भ

**श्री. पी. एन कपले**
संशोधक
जी. व्ही. एम. ज्यु. कॉलेज, मलकापुर

**श्री. डॉ. श्रीराम येरणकर**
मार्गदर्शक
जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा

**सारांश –**

भारताच्या संसदीय लोकशाहीच्या यशस्वी वाटचालीतील महाराष्ट्र राज्याच्या संसदीय लोकशाहीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्याची १९६६० पासूनची राजकीय प्रकिया, राजकारण,विधिमंडळाचे कामकाज,अध्यक्षांची भूमिका व कार्य अभ्यासणे विशेषत: संसदीय लोकशाहीचा संदर्भात चिकित्सक विश्लेषण करणे क्रमप्राप्त ठरते.

**प्रस्तावना –**

आपण सर्व भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्ष पूर्ण झाल्याने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहोत. भारतात आज एकूण २८ घटकराज्ये आहेत. संसदीय लोकशाही नुसार संपूर्ण भारतीय संघराज्यात शासनकारभार सुरू आहे. संविधनात्मक तरतूदीनुसार महाराष्ट्र या राज्यात देखील अशा प्रकारे संसदीय लोकशाहीनुसार शासनकारभार व राज्यव्यवस्थाआहे. महाराष्ट्र हे भारतातील एक प्रगत, संपन्न व पुरोगामी राज्य म्हणून ओळखलेजाते. १ मे १९६० रोजी नव्या महाराष्ट्र राज्याचा उदय झाला. मराठी भाषिक समाज एक आहे. तो एका विस्तीर्ण प्रदेशात राहतो.भारताचा तो एक अविभाज्य घटक असला तरी त्याचे स्वत:चे वेगळे व्यक्तिमत्व आहे. या व्यक्तिमत्वाला राजकीय स्वायत्ततेची जोड मिळावी अशी इथल्या लोकांची इछा होती. त्यानुसार१ मे १९६० रोजी स्वायत्त राज्यव्यवस्थेचे स्वप्न पूर्ण झाले. म्हणजेच महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. विदर्भ, मराठवाडा, खान्देश, कोकण, मुंबई या कुठल्याही भागातल्या माणसाला हे राज्य आपले आहे., त्यावर आपला अधिकार आहे. अशी कमी अधिक जाणीव झाली आहे. मराठी भाषा, वारकरी सांप्रदाय आणि इतिहासकालीन परंपरा या वौशिष्ट्यांमुळे महाराष्ट्राला स्वत:चे वेगळे व्यक्तिमत्व प्राप्त झाले आहे. राजकीय व सामाजिक चळवळी तसेच विविध राष्ट्रीय स्वरुपाचे नेते, समाजसुधारक, संत परंपरा हे महाराष्ट्राच्या भूमीने भारताला दिलेले योगदान आहे.

अशा या वैशिष्ट्यपूर्ण महाराष्ट्र राज्याची भारतीय राजकीय व्यवस्थेच्या, संघराज्याच्या, संसदीय लोकशाहीच्या पार्श्वभूमीवर वाटचाल अभ्यासणे. महाराष्ट्रातील विधिमंडळ, निवडणुका, राजकीय पक्ष, विधानसभा, विधानसभा अध्यक्षांची पक्षातीत न्याय्य व समतोल भूमिका, आघाडीचे राजकारण ई. संपूर्ण आढावा व अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधातूनकेला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये –** प्रस्तुत संशोधनाची पुढील उद्दिष्ट्ये आहेत.

१) संसदीय लोकशाहीचा अभ्यास करणे.
२) १९६० पासून महाराष्ट्राची राजकीय स्थिति अभ्यासणे.
३) महाराष्ट्र विधिमंडळच्या संविधानिक तरतूदिंची चर्चा करणे.
४) महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांची पक्षातीत न्याय्य व समतोल भूमिका अभ्यासणे.
५) महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांची परंपरा अभ्यासणे.
६) महाराष्ट्रातील राजकीय पक्षांच्या बदलत्या वैचारिक भूमिकेचे अध्ययन करणे.

**गृहीतके –**

१) महाराष्ट्रात संसदीय लोकशाही यशस्वी झाली आहे.
२) १९६० ते २०२१ महाराष्ट्रात पक्षपद्धतीत परिवर्तन होत गेले.
३) संविधानिक तरतुदिनुसार महाराष्ट्रात विधिमंडळाचे कामकाज चालत आहे.
४) महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष हे संसदीय परंपरा व तत्वानुसार पक्षातीत, न्याय्य व समतोल भूमिका नुसार कार्य करतात.
५) महाराष्ट्राला विधानसभेला अध्यक्षांची आदर्श परंपरा आहे.
६) आघाडीच्या राजकरणात राजकीय पक्षांच्या तडजोडी महत्वाच्या झाल्या पक्षांची धोरणे व विचारप्रणालीचेमहत्व कमी झाले.

**तथ्यसंकलन –** प्रस्तुत शोधनिबंधाच्या लेखनासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतिचा उपयोग केला आहे. भारतीय संविधान, भारतीय शासन व राजकारण, महाराष्ट्राचे शासन व राजकारणावरील संदर्भग्रंथ महाराष्ट्राची संसदीय लोकशाही, निवडणुकावरील विश्लेषकांचे लेख, मराठी विश्वकोष, इंटरनेट, वेबसाईड आदि तथ्यांचा उपयोग केला आहे.

**संशोधन पद्धती –** प्रस्तुत शोध निबंध हा संसदीय लोकशाहीची वाटचाल महाराष्ट्राचा विशेष संदर्भ या शीर्षकाच्या अनुषंगाने सादर करण्यात आला आहे. सामाजिक संशोधन पद्धतीतील विश्लेषणात्मक, वर्णनात्मक व ऐतिहासिक शोध पद्धतीचा उपयोग या शोध निबंधातात केला आहे.

**शोधनिबंधाची व्याप्ती –** प्रस्तुत शोधनिबंधात महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्ष, त्यांची सत्तास्पर्धा, निवडणुका, विधिमंडळ तरतुदी, विधानसभेचे अधिकारी एकंदर महाराष्ट्रातील संसदीय लोकशाहीच्या वाटचालीची मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संसदीय लोकशाही –** लोकशाही ही जगातील बहुतांश ठिकाणी स्विकारलेली प्रभावशाली विचारप्रणालीआहे. एकविसाव्या शतकात या प्रभुत्वाचा अविष्कार वेगवेगळ्या रूपांनी होत आहे. जगभरातले लोकशाही शासनपासून दूर राहिलेले प्रदेश लोकशाहीच्या प्रभाव कक्षेतयायला लागली आहे. शासन व्यवहारांच्या लोकशाही करणांचे नवे प्रयोग करण्याविषयीप्रयत्न सुरू आहे. लोकशाही म्हणजे, प्रौढ मतधिकाराच्या आधारे, खुल्या व निःपक्षपाती निवडणुकांद्वारा लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींद्वारे चालणारे राज्य. लोकशाही हा 'डेमॉक्रसी' या इंग्रजी संज्ञेचा मराठी प्रतिशब्द. डिमॉस म्हणजे सामान्य लोक आणि क्रसी म्हणजे सत्ता. अथेन्समध्ये लोकशाही राज्यपद्धतीचं बीज आढळतात ग्रीकांप्रमाणे प्राचीन रोमनांनी प्रजासत्ताकाद्वारे रोममध्ये लोकशाहीचा प्रयोग केला. लोकशाहीचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष लोकशाही असे दोन प्रमुख प्रकार सामान्यतः मानले जातात. आधुनिक काळात 'लोकशाहीचे' हा शब्दप्रयोग सामान्यपणे अप्रत्यक्ष लोकशाही या अर्थानचे केला जातो. पण स्वित्झर्लंड आणि ऑस्ट्रेलिया या दोन देशातून मात्र प्रत्यक्षलोकशाही अस्तित्वात आहे.

India is a Parliamentary Democratic Republic in which the President of Indiais the head of state and the Prime Minister of India is the head of government. It isbased on the federal structure of government, although the word is not used in theConstitution itself. अशी संसदीयलोकशाही भारतात आढळते.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी –** महाराष्ट्र राज्याची निर्मिती १९६० मध्ये झाली. पण त्यापुर्वीच्या काळातील अनेक विचारप्रवाह, घडामोडी यांचा प्रभाव साठ नंतरच्या राजकारणावर आढळतो. एकोणिसाव्या शतकातील सुधारणा चळवळ आणि महात्मा फुले यांच्यापासून सुरु झालेली जातीविरोधी चळवळ यांचा महाराष्ट्रातील राजकीय जीवनावर खोलवर परिणाम झाला. जातीविरोधी चळवळ, ब्राम्हण व ब्राम्हणेत्तरांची राजकीय आघाडी आणि संयुक्त महाराष्ट्र समितीची राज्यनिर्मितीची चळवळ हे १९६० पूर्वीच्या महाराष्ट्राच्या राजकारणातले प्रमुख टप्पे होते. १९६० नंतरच्या महाराष्ट्राच्या राजकीय वाटचालीला जी पार्श्वभूमी लाभली, ती याप्रमाणे व्यक्त होते.

**महाराष्ट्र विधानसभेची रचनासंवैधानिक तरतुदी –** राज्य विधानमंडळ हेराज्यपाल व प्रत्येक राज्याकरता क) आंध्रप्रदेश, बिहार,तेलंगना, महाराष्ट्र, कर्नाटक आणि उत्तरप्रदेश या राज्यामध्ये दोन, ख) अन्य राज्यामध्ये एक सभागृह मिळून ते बनलेले असेल. जेथे राज्याच्या विधानमंडळास दोन सभागृहे असतील तेथे एक विधानपरिषद म्हणून आणि दुसरे विधानसभा म्हणून ओळखले जाईल आणि जेथे केवळ एक सभागृह असेल तेथे ते विधानसभा म्हणून ओळखले जाईल. राज्यांमधील विधान परिषदा नाहीशा करणे किंवा निर्माण करणे. १६९(१) अनुच्छेद १६८ मध्ये काहीही असले तरी विधानपरिषद असलेल्या राज्यात अशी विधानपरिषद नाहीशी करण्याकरीता आपण अशी विधानपरिषद नसलेल्या राज्यात अशी विधानपरिषद निर्माण करण्याकरीता त्या राज्याच्या विधानसभेने सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने आणि सभागृहातील उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या दोन तृतीयांशाहून कमी नाही इतक्या बहुमताने तशा आशयाचा ठराव पारित केल्यास संसदेस कायदयाद्वारे उपबंध करता येईल. (३) कलम ३६८ च्या प्रयोजनाकरीता पूर्वोक्त असा कोणताही कायदा हा या संविधानाचे विशोधन असल्याचे मानले जाणार नाही. विधानसभांची रचना कलम १७०. (१) अनुच्छेद ३३३ च्या उपबंधाच्या अधिनतेने प्रत्येक राज्याची विधानसभा राज्यामधील क्षेत्रीय मतदार संघामधून प्रत्यक्ष निवडणूकीद्वारे निवडलेले जास्तीत जास्त पाचशे व कमीत कमी साठ इतके सदस्य मिळून बनलेली असेल, (२) खंड (१) च्या प्रयोजनार्थ प्रत्येक राज्य अशा रितीने क्षेत्रीय मतदार संघामध्ये विभागण्यात येईल की, प्रत्येक मतदारसंघाचा लोकसंख्या व त्यास वाटून दिलेल्या जागांची संख्या यांचे गुणोत्तर,व्यवहार्य असेल तेथवर राज्यात सर्वत्र सारखेच असेल. महाराष्ट्र राज्य विधिमंडळात वरील तरतुदीनुसार राज्यपाल, विधानसभा व विधानपरिषद यांचा समावेश होतो.

**महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष भूमिका व कार्य –** संविधानाच्या १७८ कलमातील तरतुदीप्रमाणे प्रत्येक राज्याची विधानसभा निवडणुकीनंतर लवकरच दोन सदस्य अनुक्रमे अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून निवड करेल.संविधानिक तरतुदी व संसदीय लोकशाहीच्या तत्त्वाप्रमाणे तसेच भारतीय संसदेतील आदर्श परंपरा नुसार महाराष्ट्र विधानसभेत देखील अध्यक्षांनी पक्षातीतपणे, समतोल व न्याय्य भूमिकेतून कार्य करावे अशी रास्त अपेक्षा संविधान निर्माण करताना होती. महाराष्ट्र राज्यामध्ये आजपर्यंत १९३७ पासून जवळजवळ १९ विधानसभेचे अध्यक्ष होऊन गेलेले आहेत. १९ जुलै १९३७ रोजी तत्कालीन बॉम्बे स्टेट विधानसभेची पहिली बैठक संपन्न झाली त्यानंतरच्या सुमारे ८५ वर्षांच्या या गौरवशाली कारकिर्दीमध्ये सर्व श्री. गणेश वासुदेव मावळकर, कुंदनमल फिरोदिया, डि. के. कुंटे, सयाजी सिलम, बाळासाहेब भारदे, शेषराव वानखेडे, बाळासाहेब देसाई, शिवराज पाटील, प्राणलाल व्होरा, शरद दिघे, शंकरराव जगताप, मधुकरराव चौधरी, दत्ताजी नलावडे, अरुणभाई गुजराथी, बाबासाहेब कुपेकर, दिलीप वळसे-पाटील, हरीभाऊ बागडे, नाना पटोले, भास्करराव जाधव अशा सर्वांची विधानसभा अध्यक्ष म्हणून थोर परंपरा महाराष्ट्र विधानसभेला लाभली आहे. यासर्वांनी आपल्या कार्याने महाराष्ट्र विधानसभेत संस्मरणीय व आदर्श परंपरा निर्माण करुन विधीमंडळाची, राज्याची, संसदीय लोकशाहीची एकुणच संपूर्ण भारत देशाची प्रतिष्ठा वाढवली आहे.

**महाराष्ट्राची राजकीय वाटचाल –** महाराष्ट्र राज्याची स्थापना १९६० मध्ये झाल्यामुळे तेथपासून राजकारणाचे नवे पर्व सुरु झाले असले, तरी खरे तर १९५६-५७ पासूनच महाराष्ट्राच्या राजकारणातील काँग्रेस वर्चस्वाची चौकट उदयाला येत होती. काँग्रेसचे हे वर्चस्व अखिल भारतीय पातळीवरही होते. १९६७ मध्ये उत्तर भारतात काँग्रेसच्या वर्चस्वाला धक्के बसू लागले, तरी महाराष्ट्रात १९७५-७६ पर्यंत काँग्रेस वर्चस्व अबाधित राहिले. १९५७ मध्ये यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्रातील काँग्रेसची सत्ता बळकट करण्यावर भर दिला.तसेच ''बहुजन समाजाची सत्ता'' आणि ''बेरजेचे राजकारण'' या दोन वैशिष्ट्यांनी काँग्रेस वर्चस्व टिकून राहिले. एकंदर १९५७ ते १९७५-७६ या काळात महाराष्ट्रातील राजकीय स्पर्धा ही मराठा समाजाचे पुढारीपण, सहकारी संस्थांचा आधार व बहुजन समाजाची सत्ता अशी वैचारिक भूमिका यांच्या चौकटीत घडली. त्यामुळेच १९७१-७२ च्या सुमारास इंदिरा गांधींच्या नेतृत्वाची वावटळ येऊनही मराठा नेतृत्व, सहकारी संस्थांचे जाळे, स्थानिक राजकारणाचा पाया इ. महाराष्ट्राच्या राजकारणाची वैशिष्टये चिवटपणे टिकून राहिली.

इंदिरा गांधींच्या व्यूहरचनेत राज्यपातळीवरील मजबूत नेतृत्वाला स्थान नव्हते. शरद पवार यांनी त्यावर मात करण्यासाठी इंदिरा गांधींचे नेतृत्व झुगारुन देण्याचामार्ग १९७८ ते १९८५ या काळात स्विकारला. नेमक्या या प्रयत्नातच मराठा नेतृत्वात फुट पडून इंदिरानिष्ठ, वसंतदादांचे अनुयायी व पवारांचे अनुयायी असे तीन गट पडले. त्यातून १९७७-७८ नंतर महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी मिळाली व पुढे जवळजवळ आघाडीच्या राजकारणाला प्रारंभ झाला.

१९७८ मध्ये महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षात फूट पडून इंदिराविरोधक गटाचे ६९ आमदार निवडून आले. त्यापैकी ४८ आमदार हे मराठा समाजाचे

होते (२/३). इंदिरानिष्ठ आमदारांची संख्या ६२ होती व त्यात २१ आमदार मराठा होते. जनता पक्ष या नव्यानेच स्थापन झालेल्या पक्षात महाराष्ट्रातील समाजवादी व जनसंघाचे पाठीराखे हे प्रामुख्याने होते. या पक्षाला तेव्हा ९९ जागा मिळाल्या. पण पुढे या पक्षाला आपले बळ टिकविताआले नाही.

१९७८ नंतरच्या बदलत्या राजकीय परिस्थितीत महाराष्ट्राचे राजकारणातील स्पर्धात्मकता प्रचंड प्रमाणावर वाढली. कोणत्याही पक्षाचे यश गृहीत धरुन चालता येणार नाही अशी स्थिती उद्भवली. सत्ता आलटून पालटून विविध पक्षांकडे जात राहिली हेच भारताच्या संसदीय लोकशाहीचे यश आहे. प्रथमच बिगर काँग्रेस पक्ष १९७८ मध्ये सत्तेत सहभागी झाले. जनता पक्षाखेरीज शे. का. पक्ष हाही वाटेकरी झाला. उलटपक्षी १९७८ ला प्रथमच काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना सरकार विरोधाचे राजकारण करावे लागले. प्रथम इंदिरा काँग्रेसला (१९७८-८०) तर १९८० पासून दिर्घकाळ पवारांच्या अनुयायांना महाराष्ट्रात विरोधी पक्षाच्या भूमिकेत वावरावे लागले. त्यामुळे काँग्रेस विरोधी म्हणजे बिगर काँग्रेसवादाचे राजकारण बाजूला पडून नवे राजकीय आकृतीबंध साकार होत राहिले.

**महाराष्ट्र विधानसभा निकाल-२००४, २००९, २०१४ व २०१९ (प्रमुख राजकीय पक्ष)**

| पक्ष | २००४ | २००९ | २०१४ | २०१९ |
|---|---|---|---|---|
| काँग्रेस | ७१ | ८२ | ४२ | ४४ |
| राष्ट्रवादी | ७१ | ६२ | ४१ | ५४ |
| भाजपा | ५४ | ४६ | १२१ | १०५ |
| शिवसेना | ६१ | ४५ | ६३ | ५६ |

महाराष्ट्रविधीमंडळसचिवालय, विधानभवन, मुंबई.

**आघाडीचे राजकारण –** १९८६ नंतर शरद पवार व त्यांचा काँग्रेस पक्ष इंदिरा काँग्रेसमध्ये सामील झाला. त्याच सुमारास शिवसेनेचा राज्य पातळीवरील पक्ष म्हणून उदय झाला. परिणामी काँग्रेस (एस) च्या गैरहजेरीमुळे निर्माण होऊ पाहणारी पोकळी शिवसेनेने (भाजपाबरोबर) भरुन काढली. मुख्यतः मराठवाडा व विदर्भात सेनेचा विस्तार झाला व १९९० मध्ये शिवसेना हा सर्वात मोठा विरोधी पक्ष बनला. स्पर्धात्मक राजकारणाचा व बहुपक्षीय, आघाडीच्या राजकारणाचा हा पुढचा टप्पा मानता येईल. तिसरा टप्पा १९९५ मध्ये सेना-भाजपच्या विजयाने गाठला गेला. याच वेळी काँग्रेस पक्षात अभूतपुर्व बंडाळी होऊन बंडखोर काँग्रेस आमदार मोठ्या संख्येने (३५) निवडून आले. महाराष्ट्रात इतर पक्षांची वाताहत झाली, परंतु दोन्ही काँग्रेस पक्ष आणि सेना-भाजप एवढेच प्रमुख पक्ष राज्यात अस्तित्वात राहिले.

वाढत्या स्पर्धात्मकतेमुळे एकपक्षीय सरकारांचा जमाना मागे पडला. प्रथम दोन पक्षांचे सरकार (१९७८), मग पुरोगामी लोकशाही दलाचे बहुपक्षीय सरकार (१९७८-८०), त्यानंतर काँग्रेस व रिपब्लीकन पक्ष यांचे सरकार (१९९०-९५), सेना-भाजप आणि अपक्ष यांचे युती सरकार (१९९५-९९), दोन्ही काँग्रेस, शे. का. पक्ष, बहुजन महासंघ, अपक्ष इत्यादींचे लोकशाही आघाडीचे सरकार (१९९९) व पुन्हा दोन काँग्रेस पक्षांचे सरकार (२०००, २००४, २००९) त्यानंतर पुढे सेना-भाजप युतीचे सरकार (२०१४) व आज दोन्ही काँग्रेस पक्षांसह शिवसेनेचे महाविकास आघाडी सरकार (२०१९) अशी आघाडयांची सरकारे येत राहिली. अर्थातच आघाडयांच्या राजकारणामुळे राजकीय तडजोडी महत्वाच्या बनल्या. राजकीय पक्षांची ध्येयधोरणे, कार्यक्रम, भूमिका आणि विचारप्रणाली यांचे महत्व कमी झाले. तीव्र सामाजिक विषमता असलेल्या समाजात अशा प्रकारचे आघाड्यांचे राजकारण व सहमतीचे राजकारण हे वर्चस्वाच्या व्यवहारांना फायदेशीरच ठरते. एकीकडे आघाडीच्या राजकारणाने स्पर्धात्मकता तीव्र होतानाच धोरण विषयक बाबी संकुचित होत जाऊन लोकशाही अवकाश प्रत्यक्षात सिमीत होतो. हे बहुपक्षीय आणि आघाडयांच्या राजकारणात एक वैशिष्ट्य असते (पळशीकर-देशपांडे २००३). त्याची प्रचिती महाराष्ट्राच्या बदलत्या राजकारणातून येते.

Today the three-party alliance forming the government is surely a turning point in Maharashtra politics. The Sena has an urban face, while the Congress, NCP are largely rural parties. Hence they can have a strong combination. The BJP, on the other hand, will get the benefit of occupying the entire opposition space, said Hemant Desai, a political analyst. (Hindustan Times).

**समारोप –**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भारतीय संसदीय लोकशाहीची वाटचाल महाराष्ट्राचा विशेष संदर्भ अभ्यासताना महाराष्ट्र राज्याची एकूणच राजकीय स्थिती मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्रात विविध राजकीय पक्षांनी १९६० पासून निवडणुकीच्या माध्यमातून संसदीय लोकशाहीची वाटचाल यशस्वी केलेली आहे. सुरुवातीला १९७८ पर्यंत काँग्रेस वर्चस्वाचा काळ असून त्यानंतर मात्र आघाडीचे राजकारणाची सुरुवात झाली ती आजही कायम आहे. संसदीय लोकशाहीच्या तत्त्व व परंपरेनुसार विधानसभेचा ही कारभार सुरू असून लोकप्रतिनिधींनी महाराष्ट्रात विविध आदर्श परंपरा निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. अलीकडे मात्र आघाडीच्या राजकारणामुळे विचारप्रणालीचा अंत झालेला दिसतो आहे. तत्त्वशून्य तडजोडी, पक्षांतर, धोरणाची अस्थिरता सतत महाराष्ट्राच्या राजकारणात दिसत आहे. वैचारिक वारसा, धोरण विश्व आणि लोकशाही राजकारण या बाबतीत महाराष्ट्राने चांगले योगदान दिले आहे. आज महाराष्ट्राचे राजकारण, शासन व्यवहार आणि एकूणच राज्याची स्वप्न या सर्वांची नवकल्पना करण्याचा क्षण आहे. अशी कल्पकता दाखवण्याची क्षमता आपल्या राजकारणात आहे का? हा खरा प्रश्न आहे. कोरोना महामारीत दगावलेल्या व्यक्तींचे स्मरण ठेवून आरोग्य, शिक्षण, उपजीविका आणि पोलीस या अशा विविध क्षेत्रांमध्ये तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. राज्याच्या राजकारणातील स्पर्धा वाढल्यामुळेही सर्व पक्ष आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात साधारणपणे एक सारखेच वर्तन करताना दिसतात. त्यामुळे महाराष्ट्राचं राजकारण हे बिनचेहऱ्याचं ही बनू पाहात आहे असं वाटते. महाराष्ट्र विधानसभेचे संदर्भात अध्यक्षांची भूमिका ही गौरवास्पद आहे. विधानसभेचे कामकाज पाहताना अध्यक्षांनी समतोल, पक्षातीत व न्याय्यअशा प्रकारची भूमिका ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो अलीकडे मात्र यामध्ये कमी अधिक पक्षीय अभिनिवेश आलेला दिसतो. खऱ्या अर्थाने संसदीय लोकशाही यशस्वी होण्यासाठी विधानसभेचे कामकाजही अधिक योग्य पद्धतीने चालणे आवश्यक आहे.

**संदर्भ**

१) पळशीकर सुहास,१९९८, ( २००३ ), जात व महाराष्ट्रातील राजकारण,पुणे,सुगावा.
२) सुहास पळशीकर,नितीन बिरमल,२००४ (२००९),महाराष्ट्राचे राजकारण,पुणे,प्रतिमा प्रकाशन.
३) ११ वी. १२ वी,१३. वी,१४ वी विधानसभा,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधान भवन,मुंबई.
४) प्रदीप गायकवाड, २००० (२०१४),भारताचे संविधान, इ.जी. प्रिंटिंग प्रेस, नागपुर
५) विधान मंडळातील निवडक भाषणे व लेख, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
६) https://marathivishwakosh.org/author/vishal, विशाल पतंगे,आघाडी सरकार.
७) https://www.hindustantimes.com/cities/3 party-coalition-new-chapter-in state-s-history / story.
८) https://maharashtratimes.com/editorial/ravivar-mata/suhas-palshikar-artical-onmaharashtra-day-and-politics-challanges-of-maharashtra.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# भारतीय इतिहासातील स्त्रियांची कामगिरी

**प्रा. संतोष पंढरीनाथ कारभारी**
बाबुरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी, पुणे

**प्रा. शैलेश कुशेंद्र भालेराव**
पी.ई.एस. बी.एड महाविद्यालय, शिवाजीनगर पुणे.

**प्रस्तावना –**

प्राचीन कालखंडापासून आपण जर पाहिले तर भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रीयांचे स्थान हे आपणास महत्वाचे दिसते. मात्र उत्तरवैदिक कालखंडापासून स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले. चूल आणि मुल हेच तिचे कार्यक्षेत्र ठरविले गेले. वैदिक कालखंडातील स्त्रीजीवनावर पुढे अनेक बंधने आली गेली. मध्ययुगात ती बंधने अधिक दृढ होत गेली. स्त्री कर्तबगार असून सुद्धा पुरुषी अहंकारामुळे तिचे कर्तव्य लोप पावले.

आधुनिक कालखंडामध्ये आल्यानंतर ब्रिटिश कालखंडात स्त्रियांना त्या त्या भागातील समाजसुधारकांच्या प्रयत्नांनी मतदानाचा अधिकार मिळाला. स्त्री पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून भारतीय स्वातंत्र्य संग्रामात योगदान दिले. प्रसंगी प्राणाची आहुति देण्यासदेखील स्त्रिया मागे राहिल्या नाही. बंगाल महाराष्ट्र यासारख्या भागात स्त्रियांनी क्रांतिकारी आंदोलनात भाग घेतला. प्राचीन कालखंडापासून ते आधुनिक कालखंडपर्यंत स्त्रीयांचे कार्य आणि स्त्रीजीवनात घडलेले बदल याचा अभ्यास आपण प्रस्तुत शोधनिबंधात करणार आहोत.

**शोधनिबंधाचा उद्देश –**

१) प्राचीन कालखंडापासून ते आधुनिक काळापर्यंतच्या स्त्रियांच्या कार्यावरप्रकाश टाकणे.
२) प्राचीन काळ ते आधुनिक काळापर्यंत स्त्रियांच्या राहणीमानात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.
३) भारतीय महिलांची सामाजिक व आर्थिक स्थिती अभ्यासाने.
४) स्त्रियांचा सामाजिक,आर्थिक व राजकीय क्षेत्रातील योगदानाचा आढावा घेणे.
५) स्त्री परिस्थितीचा प्राचीन ते आधुनिक काळ असा तुलनात्मक अभ्यास करणे.

**विषय विवेचन –** कोणत्याही समाज किंवा राष्ट्राचा विकास घडवून आणण्यात स्त्री–पुरुषांचा समान वाटा असतो. पुरुष हा घराबाहेरील कार्य करून विकासाचे कर्तव्य बजावतो तर स्त्रिया घरातील सर्व कामे करून आपले कर्तव्य पूर्ण करतात ही दोन चाके समान चालली तरच जीवन आनंदमय होते. वैदिक साहित्यात स्त्री व पुरुषाला पृथ्वी दयूलोकाची उपमा दिली आहे. सदर शोधनिबंधात आपण प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडातील स्त्री कार्याचा अभ्यास करणार आहोत.

**प्राचीन कालखंड –** ऋग्वेद काळात आर्यसमाज स्थिर झाला होता म्हणून कुटुंब संस्थेचा उदय झाला. वैदिक कालखंडात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान होते. वैदिक काळात अनेक स्त्रिया विद्वान म्हणून जन्माला आल्या. वैदिक कालखंडात सभा व समितीत स्त्रिया सहभागी होत. विधवेला पुनर्विवाहाचा अधिकार होता. धार्मिक विधीमध्ये पुरुषाच्या बरोबरीने स्त्रिया सहभागी होत. घोषा, लोपमुद्रा, सिकता, श्रद्धा व निवासी या स्त्रियांनी ऋग्वेदातील काही मंत्ररचना केली होती. स्त्रिया या साहसी होत्या. मुलाबरोबर पत्नी मुग्लानी ही युद्धात सारथ्य करण्यास गेली होती. 'विष्पला' हिने लढाईत भाग घेतला होता. ती जखमी झाल्यावर 'अश्विन' या स्त्रीने तिच्यावर उपचार केले होते. ऋग्वेदात स्त्रीला अग्निदेवता व उषादेवी म्हणून गौरविले आहे. ऐतरेय ब्राम्हण ग्रंथात मुलीला 'कृपण' म्हणले गेले. उत्तर वैदिक कालखंडात मात्र स्त्रियांवर बंधने लादली गेली. याकाळात काही स्त्रिया विद्वान म्हणून प्रसिद्ध झाल्या. गार्गी, मैत्रेयी व विदुषी या स्त्रिया विद्वान होत्या. उपनिषिद आणि सूत्रकाळातील स्त्रीयांचे स्थान व दर्जा यामध्ये अधोगती झाली.

मौर्य काळात स्त्रियांना समाजात व कुटुंबात सन्मान होता. कौटिल्य आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात म्हणतो की, स्त्री आपल्या पतीच्या परवानगीशिवाय बाहेर गेल्यास तिला ६ पण दंड एवढेच नाही तर स्त्रिया फक्त पुत्रप्राप्तीसाठीच असतात १) याचा अर्थ मौर्य काळात स्त्रियांना संपूर्ण स्वातंत्र्य नव्हते. अशोकाची कन्या संघमित्रा ही बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी सिलोनला गेली होती, तर चंद्रगुप्त मौर्याच्या अंगरक्षकात महिलांची नियुक्ती केली जात होती. सातवाहनांच्या कालखंडात सातवाहन राजे त्यांच्या मातेचे नाव लावत यावरून मातृसत्ताक कुटुंबपद्धती अस्तित्वात असलेली दिसते. सातकर्णी पहिल्यानंतर त्याचे दोन पुत्र वेदश्री व शतश्री गादीवर आले. त्यांचे प्रशासन हे पित्याच्या मदतीने त्यांची माता राणी नागनिका चालवित असे. महाराष्ट्राच्या इतिहासातील राज्यकारभार चालविणारी ही पहिली नाणेघाटातील शत्यश्री सम्राज्ञी ठरते. वाकाटकांच्या कालखंडात वाकाटक राजा रुद्रसेन दूसरा याने वैश्यवर्णीय चंद्रगुप्त विक्रमादित्याची कन्या प्रभावती हिच्याशी विवाह केला होता.गुप्त काळात सातवाहन राणी नागनिका, सम्राट चंद्रगुप्ताच्या पत्नी कुमारदेवी दत्तदेवी, कुबेरनागा, ध्रुवदेवी, प्रभावती गुप्ता, शील भट्टारीका, वसंतसेना, लिलावती व अवंती अशा अनेक स्त्रियांच्या योगदानाचे वर्णन आहे. काही राजघराण्यातील स्त्रियांनी युद्धात कर्तबगारी दाखविली होती. कल्याणीचा राजा सहावा विक्रमादित्य याची राणी लक्ष्मीदेवीने कल्याणीहून काही काळ राज्यकारभार पाहिला. अक्कादेवी सारखी चालुक्य राजकन्या व होयसळ राणी उमादेवी ही युद्धभूमीवर लढताना आढळले. २) अयोध्येचा राजा दशरथ याची पत्नी कैकयी ही पतीसोबत युद्धात गेली होती.

गुप्तकाळात आपणास स्त्रियांची परिस्थिति समाधानकारक दिसते. गुप्तकाळात बहुपत्नित्वाची चालप्रचलित होती. चंद्रगुप्त दुसरा याच्या दुसऱ्या पत्नीचे नाव 'चेलना' होते. समुद्रगुप्ताला अनेक सामंती राजांनी आपल्या मुली भेट दिल्या होत्या. या काळात स्वयंवर प्रथा प्रचलित होती. आपल्या पतीची उपेक्षा करणाऱ्या स्त्रियांसाठी याज्ञवल्क्याणने व कौटिल्याने नाक व कान कापण्याची शिक्षा फर्मावली तर मनुने तिला मृत्युदंडाची शिक्षा फर्मावली. स्त्रियांची अशाच प्रकारची स्थिती हर्षवर्धन राजपूत, चालुक्य, राष्ट्रकुट व यादवांच्या काळात होती.

**मध्ययुगीन कालखंड –**

**सल्तनत कालखंड –**

हिंदू समाजातील स्त्रियांच्या परिस्थितीत फारसे बदल घडून आले नाहीत. मुलींचे बालवयात विवाह करणे, पत्नीने पतीची निष्ठेने सेवा करणे या जुन्या बाबी तशाच पुढे चालू राहिल्या. मात्र चौकटीतच जीवनमान मर्यादित राहिले. या काळात सर्वसाधारणपणे मुस्लिम व हिंदू समाजात स्त्रियांना दुय्यम दर्जाचे स्थान होते. त्याकाळात स्वतंत्रपणे सामाजिक संपर्क (व्यवहार) नव्हता. उच्च व मध्यवर्गीय स्त्रियांना नृत्य व संगीतात मौजमजा करण्यावर प्रतिबंध होता. तथापि, शाही घराण्यातील व अभिजात वर्गातील काही स्त्रियांनी राजकीय सत्तेचा वापर केल्याचे उदाहरण दिसते. अल्तमश नंतर रुकनुद्दीन फिरोजला सत्ता प्राप्त करून देण्यात त्याची आई शाह तुर्कनचा प्रभाव होता. रझिया सुलतानानेतर जनतेच्या संमतीने रुकनुद्दीन फिरोजची सत्ता समाप्त करून गादी प्राप्त केली. रझिया सुल्ताना ही मध्ययुगीन इतिहासातील पहिली स्त्री राज्यकर्ती ठरते. राजपदी आल्यानंतर रझियाने 'प्रशासनाची पुनर्रचना' करण्याचे कार्य चालू ठेवले. मिन्हाजच्या म्हणण्यानुसार, राज्यात शांतता निर्माण झाली आणि राजसत्तेचा अंमल मोठ्या प्रमाणात प्रस्थापित झाला. लखनौती ते देबलपर्यंतच्या विस्तीर्ण प्रदेशातील सर्व मलिकांनीव अमिरांनी राजसत्तेच्या आज्ञापालनास व प्रभुत्वास मान्यता दिली ३) प्रशासनाशी थेट संपर्क साधता यावा म्हणून रझिया स्त्री वेशाऐवजीपुरुषी वेशधारण करत होती. आपला चेहरा न झाकता हत्तीवरून राजरोस जाऊ येऊ लागली. सुलतान कैकुबादवर मलिक निजामुद्दिनच्या पत्नीचा मोठा प्रभाव होता. तिने सुलतानच्या 'हरेम' ला आपल्या नियंत्रणाखाली आणल्याचा उल्लेख डॉ. चिटणीस यांनी केला आहे. ४) निजामुद्दीन औलियाची आई बीबीजुलेखा, शेख हमीद नागोरीची पत्नी बीबी फातिमा यांनी भारतात कुलीन मुस्लिम स्त्रीत्वाचे प्रतिनिधित्व केले. बीबी हाफिजा जमाल या स्त्रीला कुराण तोंडपाठ असल्याचे डॉ. चिटणीस यांनी संगितले आहे. तसेच काही स्त्रियांनी 'मजलिस' मध्ये भाग घेतल्याचं

**मुघल काळ –** मुघल काळ पाहताना सुलतान काळातील स्त्रियांची परिस्थिति त्यात काही जास्त फरक पडला नाही. मुघल कालखंडात स्त्रियांनी राजकीय क्षेत्रात आपले योगदान दिले. हुमायूनच्या आईने मीर कल्लनने रचलेला कट आपला परकाष्टेचा प्रभाव वापरुन उलटवला आणि आपल्या मुलासाठी गादीचे संरक्षण केले. अकबराची मुख्य दाई माहम अनगाने राज्यावर आपले प्रभुत्व स्थापन केले. अहमदनगरच्या इतिहासात चांदबिबीचे नाव प्रसिद्ध झाले. जहांगीरची पत्नी नूरजहान ही एक प्रभावी व्यक्तिमत्वाची स्त्री होती. नूरजहानबाबतचे एक वेगळे वर्णन मुहम्मद यासीन या लेखकाने 'सोशल हिस्ट्री ऑफ इस्लामिक इंडिया' या ग्रंथात केले आहे. नूरजहान प्रेमळ पतिव्रता, पतीप्रिया, सांसारिक,काटकसरी, अनाथांची आश्रयदाती, स्त्रियांचे नेतृत्व करणारी या सर्वगुणसंपन्न गुणांमुळे ती एक आदर्श स्त्रीत्वाचे प्रतिक बनली आहे. ५) मुमताजमहलचा पती शहाजहानवरील प्रभाव सर्वविदित आहे. शहाजहानची मुलगी रोशनआरा ही आपल्या सूडबुद्धी स्वभावामुळे ओळखली गेली तर तिची बहीण जहानआरा ही धार्मिक स्वभावाची होती व वडिलांच्या शेवटच्या काळात त्यांना सांत्वन व दिलासा देणारी ठरली. औरंगजेबाची मुलगी झीनत-उन-निसाने तर कैदेत असलेल्या शाहू व त्याची आई येसूबाई यांच्या जीविताचे रक्षण केले. बंगालमध्ये अलिवर्दीखानाची पत्नी एक महत्वाची, प्रभावी व्यक्तिमत्वाची स्त्री होती. तिने राजकीय अधिकारांचा मोठा वापर करून रघुजी भोसल्याच्या नेतृत्वात मराठ्यांच्या बरोबरीच्या युद्धात आपल्या पतीला मार्गदर्शन केले.

मराठा कालखंड पाहता स्वराज्यस्थापनेत शिवरायांना मार्गदर्शनाचे काम जिजाऊंनी केले. शिवरायांच्या मार्गदर्शक व प्रेरक म्हणजे जिजामाता ह्याच होत्या. छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व ताराबाई हिने केले. इ.स. १७१० मध्ये तिने कोल्हापुरला मराठ्यांची स्वतंत्र गादीची स्थापना केली. ताराबाई ही छत्रपतींचे सेनापती हंबीरराव मोहिते यांची कन्या होय. ताराराणीने धनाजी जाधव, संताजी घोरपडे, नेमाजी शिंदे इ. अनेक सरदारांना एकत्र घेऊन मुघलांविरोधात लढा दिला. डॉ. अप्पासाहेब पवार यांनी 'ताराबाईकालीन कागदपत्रे' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. ताराराणी नंतर मराठ्यांच्या इतिहासात नाव ज्या स्त्रीचे घेतेले जाते ते म्हणजे अहिल्याबाई होळकर होय. विरोधकांचा कट उधळून लावून तिने महिलांचे सैन्य उभारले व नर्मदेच्या काठावर महेश्वर येथे नवीन राजधानी उभारली.

**आधुनिक भारत –** ब्रिटिश कालखंडामध्ये स्त्रीसुधारणा विषयक अनेक कायदे पास झाले. सुधारणा चळवळींमुळे भारतीयांना आपल्या जुन्या, टाकाऊ, खोट्या प्रथा-परंपरांचा त्याग करण्याची संधी मिळाली. सत्यशोधक समाज, ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, रामकृष्ण मिशन यांच्या माध्यमातून समाजसुधारणा चळवळी सुरू झाल्या. महात्मा फुलेंनी स्त्रियांसाठी १ ली शाळा पुण्यात सुरू केली. सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, काशीबाई कानीटकर यासारख्या स्त्रियांनी समाजसुधारणा चळवळीत योगदान दिले. ताराबाई शिंदे यांनी महात्मा फुलेंच्या कार्यपासून प्रेरणा घेऊन स्व:ताचे स्वतंत्र्य विचार 'स्त्रि-पुरुष' तुलना हा ग्रंथ लिहिला. पुरुषी वर्चस्व संपल्याशिवाय समाजाची निकोप वाढ होणार नाही असे मत मांडले. ज्या ईश्वराने पुरुष व स्त्रियांना समान संधी नाही का? असा प्रश्न त्यांनी पुस्तकात विचारला. त्या ग्रंथात म्हणतात स्त्रियांचे पायी दुर्दशा होऊन देशोधडीस लागलेले पुरुष फार थोडे सापडतील; पण स्त्रिया किती सापडतील हे सांगवत नाही. ६) पुरुषांनी स्त्रियांना दाबून ठेवले आहे असे ते सांगतात. ताराबाई शिंदे यांच्या नंतर पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे यांसारख्या अनेक स्त्री सुधारकांनी आपापल्या परीने योगदान दिले.

समाजसुधाणेबरोबरच भारतीय स्वातंत्र्ययुद्धात स्त्रियांनी महत्वाची कामगिरी केली आहे. १८५७ चा उठाव म्हणला की आपल्याला झाशीची राणी लक्ष्मीबाईची आठवण येते. राणी लक्ष्मीबाईने फक्त युद्धाचे नेतृत्व केले नाही तर मध्यप्रदेशातील स्त्रियांना युद्धाच्या कामात सहभाग करण्यास प्रेरणा व उत्तेजन दिले. १८५७ च्या उठावात बेगम हजरत महलचे कार्य महत्वाचे ठरले. अवधवर ब्रिटीशांनी ताबा घेतल्यावर बेगम हजरत महलने लढणे पसंद केले. १८५७ च्या उठवानंतरही १८५९ पर्यन्त तिने ब्रिटीशांविरोधात लढा दिला. नानासाहेब पेशवा व तात्या टोपे सारखी मातब्बर मंडळी बेगमच्या आश्रयास आली होती. यावरून बेगम हजरत महलचे महत्व समजते. महात्मा गांधीजींच्या आंदोलनातदेखील स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. महात्मा गांधीजींनी पडदा प्रथेवर टीका केली होती. पडदा सोडून चरखा चालववावा असे मत गांधीजींनी व्यक्त केले होते. असहकार चळवळीत व सविनय कायदेभंग चळवळीत स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात भाग घेतला. यावर एक विदेशी पत्रकार म्हणतो,If the civil Disobedience Movement accomplioshed nothing else but the emancipation of women in India,it would have fully justified itself. ७) याचाच अर्थ चळवळीला यशस्वीता महिला सहभागामुळे प्राप्त झाली. क्रांतिकारी चळवळीत प्रीतीलता दास, कल्पना दत्त, प्रीतीलता वडेदार, शांतीघोष व सुनीती चौधरी यांनी योगदान दिले. सुभाष चंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेत आपल्याला कॅप्टन लक्ष्मी सेहगल, एम. चिदंबरम, प्रतिमा सेन, बेला मुखर्जी, शकुंतला शहा, गुरुदयाल कौर

यांचा सहभाग आपल्याला दिसतो.

**निष्कर्ष –**

१) प्राचीन काळ ते आधुनिक कालखंडापर्यंत स्त्रीयांचे सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात भरीव असे कार्य दिसते.

२) प्राचीन ते आधुनिक कालखंडापर्यंत स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत बादल झालेला दिसतो.

३) आधुनिक काळात स्त्रियांच्या आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात प्रगती झालेली दिसते.

**सारांश –**

प्राचीन काल ते आधुनिक काळापर्यंत स्त्रियांच्या कामगिरीचा विचार करता आपणास दिसते की पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचेही कार्य आपणास दिसते. स्त्रियांची कामगिरी प्रेरणादायी अशीच आहे. सामाजिक सुधारणा चळवळीत स्त्रीयांचे काम दिसते. १८५७ चा उठाव ते क्रांतिकारी चळवळीत स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. महात्मा गांधीजींच्या सत्याग्रहाच्या चळवळीत कामगारांबरोबर स्त्रियांनीही सहभाग घेतला. आपल्या परीने त्यांनीही योगदान दिलेले दिसते.

**संदर्भ**

१) डॉ. कठारे अनिल, डॉ. अंबादास मंजुळकर, डॉ. ढेरे रामकृष्ण, भारताचा इतिहास, अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर, पृ. क्र. १५७.

२) प्रा. नेवासकर अशोक, प्रा. पाटोळे भावना, प्राचीन भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन नागपूर, पृ. क्र. १८७.

३) चंद्र सतीश, अनुवाद काळे अनिल, मध्ययुगीन भारत दिल्लीची सुलतानशाही, के सागर प्रकाशन पुणे, पृ. क्र. ४९.

४) डॉ. पाटील पद्मजा, डॉ. जाधव शोभना, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृ. क्र. १४१.

५) कित्ता, पृ. क्र. १४६.

६) शिंदे ताराबाई, स्त्रिपुरुष तुलना, श्री शिवाजी प्रकाशन, बुलढाणा, पृ. क्र. ४४.

७) डॉ. ग्रोवर. बी. एल., डॉ. एन. के. बेल्हेकर, आधुनिक भारताचा इतिहास, एस. चंद प्रकाशन, नवी दिल्ली, पृ. क्र. ३३७.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# रशिया युक्रेन वाद व त्याचा भारतावर तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणावर होणारा परिणाम

**प्रा. मुंडे रविकांत प्रकाशराव**
राज्यशास्त्र विभाग
ज.जि.म.वि.प. समाज संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जळगाव

**प्रस्तावना –**

जागतिकीकरणानंतर जग एकमेकावर फार मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहिले आहे. जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात कुठलीही उलथापालथ झाली तर त्याचे परिणाम तात्काळ जगावर घडून येतात. २०१९ मध्ये आलेला करोना नंतर लगेच तालिबान्यांनी अफगाणिस्तानात केलेली सत्ता प्राप्ती ते संपत नाही तोपर्यंत रशिया युक्रेन वादाने जगावर एक मोठे अरिष्ट ओढवले आहे.

पहिल्या महायुद्धानंतर १९१७ मध्ये रशियन साम्राज्य पासून युक्रेनला स्वातंत्र्य मिळाले व १९१७ मध्ये पीपल्स रिपब्लिकन आर्मीची स्थापना झाली परंतु बोल्शेविक क्रांती १९१७ नंतर रशियन गृहयुद्ध १९१७ ते २२ दरम्यान रशियन रेड व आणि व्हाइट्समध्ये झालेल्या संघर्षात यु एन आर टिकू शकले नाही कारण दोन्ही गटांनी यांना मान्यता दिली नव्हती परंतु युक्रेनी स्वातंत्र्य महत्त्वाकांक्षेने बोलशेविकाना गणराज्य निर्मितीला भाग पाडलं.

रशियाने २०१४ मध्ये घेतलेला क्रिमिया चा भाग पुढे चालून रशियाने युक्रेन वर केलेल्या आक्रमणाचे पडसाद भारतावर तसेच जगावर होणार आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

१) रशिया युक्रेन वादाचे मूळ कारण शोधणे
२) रशिया युक्रेन वादाचे भारतावर तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणावर होणारा परिणाम अभ्यासणे

**संशोधनाची गृहितके –**

१) रशिया हे बलाढ्य राष्ट्र असून युक्रेनच्या स्वातंत्र्यावर आक्रमण करत आहे
२) युक्रेन पश्चिमी देशांच्या नाटो चे सदस्यत्व घेण्यास उत्सुक आहे
३) रशिया युक्रेन वादामुळे जगात तेलांच्या किमती वाढतील
४) दुसऱ्या महायुद्धानंतर जगाच्या नकाशात बदल घडण्याचा धोका आहे


**संशोधनाची पद्धती –** वर्णनात्मक व विश्लेषणात्मक.

**रशिया युक्रेन वादाची कारणे –**




Source:- www.icirnigeria.org

१९२२ मध्ये युक्रेन परत सोव्हिएत संघाचा भाग बनले मात्र १९९१मध्ये सोव्हिएत संघांचे विघटन होऊन पंधरा देशामध्ये विखरला यातच क्षेत्रफळानुसार रशिया आणि यूक्रेन युरोपातील सर्वात मोठी राष्ट्रे उदयास आली. सोव्हियेत संघापासून उदयास आलेली बरीचशी राष्ट्रीय नाटो या गटात सामील झाले आहेत. त्यात एस्टोनिया, लूटविनिया, लाटविया या देशांचा समावेश आहे याच पावलावर पाऊल ठेवून रशिया नन्तर मोठा देश असलेल्या युक्रेन नाटोमध्ये सामील होण्यास उत्सुक आहे आणि हे रशियाला मान्य नाहीये.




Source:- Crimea voting commission

२०१४ मध्ये रशियाने युक्रेनचा भाग असलेल्या क्रीमीयावर आक्रमण करून जिंकून घेतले अठरा दिवसानंतर आणण फाणण केलेल्या सार्वमत त्यानंतर ब्लादिमीर पुतीन यांनी औपचारिकरित्या क्रिमिया विलीनीकरनावर सही केली. अशा प्रकारे १८ मार्च २०१४ रशिया व क्रिमिया च्या स्वयंघोषित गणराज आणि रशियामध्ये क्रिमिया गणराज्य सेव्हस्टोपोल परिग्रहण संधीवर स्वाक्षरी केली नंतर लगेच संयुक्त राष्ट्राने युनोने (६८/२१२) प्रस्ताव पारित करून याचे उत्तर दिले प्रस्तावामध्ये असे म्हटले की सार्वमत अमान्य आहे व युक्रेनची सार्वभौमत्व अबाधित राहिले पाहिजे या प्रस्तावाच्या विरोधात फक्त रशियाने मत दिले परंतु हा प्रस्ताव लागू होऊ शकला नाही. कारण सुरक्षा परिषदेत जेव्हा हा प्रस्ताव स्वाक्षरीसाठी आला तेव्हा रशियाने नकाराधिकार वापरला.

१९९० च्या दशकाच्या सुरुवातीला आर्थिक सुधारणा थांबन्या बरोबर बोरिस येल्टसेन व युक्रेनी सांस्कृतिक नितिची आलोचना केली आणि क्रिमिया च्या हस्तांतरना वर प्रश्नचिन्ह निर्माण केले.

१९९७ मध्ये रशिया व युक्रेन मध्ये एक व्यापक करार झाला व त्या आधारे युक्रेन च्या सार्वभौमत्वाची पुष्टी केली गेली. या कराराची गॅरंटी रशिया व पश्चिमी अण्वस्त्रसज्ज राष्ट्रांनी दिली त्यामुळे युक्रेन स्वतःची सोवियत अनवस्त्रे आत्मसमर्पण करण्यास तयार झाला हा करार ३१ मार्च २०१९ ला समाप्त झाला.

१९९० च्या दशकाच्या मध्यानंतर युक्रेन नाटोच्या बाहेर अमेरिकेचा एक सामरिक भागीदार राहिला आहे यू एस युक्रेन चार्ट २००१ मध्ये नव्याने करारावर सही अंतर्गत एक औपचारिक रूप दिले वर्तमान चार्टमध्ये रशियाच्या आक्रमणाचा मुकाबला करण्यासाठी एकूण यांची सुरक्षा वाढवण्यासाठी अमेरिका प्रतिबद्ध राहील असे ठरले होते परंतु युक्रेननी सेनेमध्ये सुधारणा व डाटा देवाण-घेवाणमध्ये मदत करण्यापुरतेच मर्यादित होते सध्याच्या करारान्वये युक्रेनची संरक्षण करण्याचे बंधन अमेरिकेवर नाही.

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर अमेरिका व तत्कालीन सोव्हिएत संघ या दोन राष्ट्रांमध्ये शीतयुद्धाला सुरुवात झाली.

उत्तर अमेरिका व युरोपियन राष्ट्रानी रशियन संघाचा वाढता प्रसार रोखण्यासाठी १९४९ मध्ये नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन (नाटो) ची स्थापना केली हा एक लष्करी गट आहे. हा गट सामूहिक संरक्षण या तत्त्वावर काम करतो सध्या या तीस राष्ट्रीय समाविष्ट आहेत त्यात बरेच सोवियेत संघाच्या विघटनानंतर उदयास आलेल्या राष्ट्रांचा सुद्धा समावेश आहे. २००८ मध्ये युक्रेनला सदस्यत्व देण्यासंबंधी चर्चा झाली तेव्हा जर्मनी व फ्रान्सने विरोध करत तो प्रस्ताव मोडीत काढला या कारणासाठी की, रशियाला आक्रमक होण्यासाठी निमित्त देऊ नये मागच्या दोन दशकापासून युक्रेन ची पाच्छिमात्य देशाशी असलेली मैत्री ब्लादमिर पुटीन च्या राष्ट्रवादी रशिया ला आवडलेले दिसत नाही.

**युक्रेन नाटो चा सदस्य झाला तर रशियावर काय परिणाम होईल ? –** जर युक्रेन नाटोच्या सदस्य झाला तर रशियावर याचे सामाजिक आर्थिक फार मोठे परिणाम होतील सध्या युक्रेन हा रशिया व नाटो देशांमध्ये बफर स्टेट चे काम करत आह जर युक्रेन नाटो चा सदस्य झाला तर नाटोचे सैन्य युक्रेन रशिया सीमेवर येईल युक्रेन मध्ये नाटोचे लष्करी तळ निर्माण होतील त्याचा रशियाच्या राष्ट्रीय सुरक्षेवर परिणाम होईल. शीत युद्ध काळात १९६२ मध्ये उद्भवलेल्या क्युबन मिसाईल सारखे अनेक संकटे उदभवतीलयाचा परिणाम जागतिक शांतता व सुरक्षेवर होईल.

रशिया साठी सामरिक व आर्थिक दृष्ट्या महत्वाच्या असलेल्या काळ्या समुद्रावर नाटो चा प्रभाव वाढण्यास सुरुवात होईल रशिया भुमध्य सागरीय आणि त्यापलीकडे प्रवेशासाठी काळा समुद्र वर अवलंबून आहे रशिया त्याच्या जवळच्या भागा बाहेरील लष्करी ऑपरेशन्स आनी रशिया च्या मुख्य वस्तू (हायड्रोकार्बन्स) निर्यातीसाठी काळा समुद्र वर अवलंबून आहे जर यावर नाटोचे प्रभुत्व वाढले तर येणाऱ्या काळात रशियाला मोठ्या अरिष्टाचा सामना करावा लागेल जेव्हा २०१४ मध्ये रशिया समर्थक विक्टर यानुकोणीचला लोकप्रिय क्रांतीने सत्तेतून बेदखल करत पश्चिमी राष्ट्रीय समर्थक लोकशाही सत्तेत आली तेव्हा २०१४मध्ये क्रिमियामध्ये एक घोर संकट निर्माण झाले तसेच द न्यू यारकरला दिलेल्या मुलाखतीत युक्रेन इतिहासकार 'सेरेही फ्लोखी' ने युक्रेनमध्ये एक मोठा जनसमूह रशिया समर्थक आहे असे सांगितले.

रशियाने युक्रेनची लोहणस्क आणि दोनस्टेक नावाच्या दोन रिजन वर कब्जा करून तेथील रिबल ग्रुपसना मदत करून त्यांना वेपण दिले दोनस्टेक पीपल्स रिपब्लिकन व लोहनस्क पीपल्स रिपब्लिकन आशि या देशाची नावे आहेत त्या पाठोपाठ सीरियाने पण या दोन स्वतंत्र देश्याना मान्यता दिली. या घटनेनंतर युनायटेड नेशन ची आपत्कालीन बैठक बोलावण्यात आली.

रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांनी या नव्या देशाचे तथाकथित पंतप्रधानांसोबत '' मैत्री सहकार्य आणि परस्पर सहा यावरील करारकेला. या करारानुसार रसिया लोहनस्क व दोनस्टेक मध्ये दहा वर्षासाठी मिलिटरी तळ ऑपरेट करू शकतो आणि प्रत्येक पाच वर्षांनी हा करार वाढतच राहणार या घटनेनंतर यूएस ए नेदोनस्टेक पीपल्स रिपब्लिकन लोहनस्क पीपल्स रिपब्लिकन यांच्यावर आर्थिक प्रतिबंध लावण्यास सुरुवात केली तसेच युरोपियन युनियन व यू. के आर्थिक प्रतिबंध लावण्याच्या तयारीत आहेत.

**जगावर आणि भारतावर काय परिणाम होतील ? –** रशिया युक्रेन वादामुळे जगावर आर्थिक सामाजिक राजकीय व सामाजिक परिणाम होतील

आपली ऊर्जेची गरज भागविण्यासाठी युरोपियन देश रशियावर अवलंबून आहे ३० टक्के कच्चे तेल ३५ टक्के नैसर्गिक वायूची आयात युरोपियन देश रशियाकडून करतात त्यामुळे युरोप मध्ये एक ऊर्जा संकट आले तर त्याचे परिणाम पूर्ण जगावर होणार यामुळे कच्च्या तेलाचे भाव वाढणार.

अगोदरच करोनामुळे आर्थिक अर्थचक्र विस्कटलेले आहे त्यात कच्च्या तेलाची वाढणारे भाव भारतासारख्या देशाचे अर्थकारण पूर्णपणे विस्कटून टाकणार यात दुमत नाही अनेक देशांनी आपल्या नागरिकांना युक्रेन सोडण्यास सांगितले आहे यात भारताचा सुद्धा समावेश आहे १८ ते २० हजार विद्यार्थी युक्रेन मध्ये शिकत आहेत भारताने पण त्यांना तात्पुरते युक्रेन सोडण्यास सांगितले आहे.

भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणात लष्करी उपकरणाचे आयात करतो जरा अमेरिकेने सांगितल्याप्रमाणे रशिया वर निर्बंध लादले तर भारताच्या लष्करी आधुनिकीकरणावर मोठा परिणाम होईल व याचा सर्वस्वी फायदा चीनला होणार रशिया युक्रेन व वाढत चीन रशियाच्या बाजूला आहे तसेच चीन हा रशियाला इंडो पॅसिफिकमध्ये आपलाव सहकारी समजतो जर जर अमेरिकेने रशियावर आर्थिक निर्बंध लादले तर चीन रशियाला प्रतिबंधातुन बाहेर काढण्यास मदत करणार. २०२१ मध्ये चीनशी रशियाचा १३८ अरब डॉलरचा व्यापार झाला आहे. या गोष्टीवरून रशिया- चीनची वाढत चाललेली जवळीकता भारतासाठी चिंतेची बाब आहे

**निष्कर्ष –**

१) नाटो व पश्चिमी राष्ट्रांच्या अडेल स्वभावामुळे रशिया-युक्रेन हा वाद हा सुटण्या पेक्षा गुंतागुंतीचा बनला आहे
२) सीरिया इराक लिबिया लेबनॉन वेनेझुईला यासारख्या देशात पश्चिमी समर्थक सरकारांना सत्तेत आणण्याचा दुराग्रही हट्ट पश्चिमी राष्ट्रांनी केला आहे त्याचे दुष्परिणाम फार भयंकर आहेत
३) रशिया व यूक्रेन वादामुळे भारतात कच्च्या तेलाच्या किमती वाढतील
४) रशिया व युक्रेनमधील वाद शांततेच्या मार्गाने व युनायटेड नेशन्स द्वारे सोडवला जावा हे जागतिक सुरक्षा व शांततेसाठी गरजेचे आहे
५) जग अजुन करुणा महामारी तुन पूर्णपणे सावरले नाही त्यात हा वाद असाच सुरू राहिला तर जागतिक शांतता व सुरक्षेसाठी खूप हानिकारक होईल
६) तिसऱ्या महायुद्धाचा धोका टाळण्यासाठी रशिया व युक्रेन यांनी परस्पर सामंजस्य द्वारे हा द्वारे हा वाद सोडवावा.

**संदर्भ**

१) मटा प्रतिनिधी युक्रेन रशियाची भाऊबंदकी महाराष्ट्र टाइम्स २४ मार्च २०२२ ८.०५रा
२) लेखक शान कश्यप दृष्टी आई एस रुस युक्रेन विवाद का इतिहास वर्तमान संकट २६ फेब्रुवारी २०२२
३) अनिरुद्ध जोशी धगधगते युक्रेन देशदूत २४ फेब्रुवारी २०२२,५.५२
४) मीरा पटेल व्हॉट रसिया मीन्स टू युक्रेन इंडियन एक्सप्रेस ५मार्च २०२२ ९.१२:५०रा
५) शैलेंद्र देवळाणकर समकालीन जागतिक राजकारण
६) डेव्हिड योस्ट नाटोस बॅलेंसिंग ऍक्ट (णडखझ र्शिींि(२०१३)
७) natoilieyenUkren and Russia fraternalrivalry(USIPpress1999)

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# नंदुरबार जिल्ह्यातील भिल्ल जमातीतील स्त्रीच्या समाजशील अभ्यास

**सहा.प्रा. पराडके विनोद कागडा**
इतिहास विभाग,
ज.जि.म.वि.प्र.सह समाज संचलित
श्री. एस. एस. पाटील कला श्री. भाऊसाहेब टी. टी. साळुंखे वाणिज्य, आणि श्री. जी. आर. पंडित विज्ञान महाविद्यालय, जळगाव.

**प्रस्तावना –**

'आदिवासी' हा शब्द अगदी हजारो वर्षांपासून वापरला जातो. अदिवासी म्हणजे विशिष्ट अशा माणसाच्या समूहाला 'आदिवासी' म्हटले गेले आहे. या आदिवासींमधील लोकांच्या चालीरिती इतर समाजाहून वेगळ्या आहेत. समाजातील स्त्रियांचे राहणीमान, समस्या, दैनंदिन जीवन यात इतर समाजातील स्त्रियांपेक्षा खुप तफावत असल्याचे दिसून येते. भारत हा कृषिप्रधान देश असला तरी छोट्या–छोट्या घटकापासून भारत देश कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. भिल्ल समाजातील प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. या आदिवासी समाजातील लोकांचे जीवन हे शेतीवर अवलंबून असल्याचे दिसून येते. शेतकरीवर्ग आपल्या शेतामधून वेगवेगळ्या प्रकारचे पिक काढत असल्याचे दिसते. मका, ज्वारी गहू, ऊस, कापूस, केळी, पपई अशा प्रकारच्या पिकांचे उत्पन्न घेतले जातात. या भिल्ल स्त्रियांना समाजामध्ये दुय्यम स्थान मिळालेले आहेत. समाजामध्ये दुय्यम स्थान मिळाले असले तरी या स्त्रियांना पुरुषाच्या कोणत्याही निर्णयामध्ये सहभाग घेण्याचा अधिकार आहे. पुरुष–स्त्रीयांमध्ये समानतेची भावना आढळून येते. या आदिवासी समाजातील स्त्रियांना अगदी कष्टमय जीवन जगावे लागत असल्याचे दिसून येते. या समाजातील स्त्रियांना अनेक संकटांना सामोरे जावे लागत असल्याचे दिसून येते.

आदिवासी समाज हा कोणत्याही धर्माचा नसून आदिवासी हाच त्याचा धर्म आहे. भारतीय घटनेचा ३६६ (२५) या कलमाद्वारे अनुसूचित जमातीची व्याख्या करण्यात आलेली आहे. संविधानाचा उद्दिष्टांकरिता संविधानाचा ३४२ कलमाखाली 'अनुसूचित जमाती' म्हणून मान्यता दिलेली आहे. या नंदुरबार जिल्ह्यातील भिल्ल जमातीतील स्त्रियांचे राहणीमान आणि आरोग्य खूप हलाखीचे दिसून येते. नंदुरबार जिल्हयातील आरोग्य सुविधा अद्यापही मिळत नसल्याचे दिसून येते. तरी मागील काही प्रमाणात आता सुधारणा झालेल्या दिसून येतात. भिल्ल जमात हे सातपुड्यातील डोंगर, दऱ्याखोऱ्यात वास्तव्यास आहे. डोंगररांगेतील अनेक झाडांचा, पानांचा वापर जेवणामध्ये भाजी म्हणून वापर केला जातो. तसेच शेतामधील अनेक फळभाज्यांचा भाजी म्हणून वापर केला जातो. त्यामुळे आदिवासींचे जेवण इतरांपेक्षा थोडे वेगळे असल्याचे दिसून येते. आदिवासी या भिल्ल समाजातील मुलीचे लग्न वय १८ ते २१ या दरम्यान केले जाते. आदिवासी समाजातील लग्न पद्धती ही इतर समाजापेक्षा वेगळी असल्याचे निदर्शनास येते. भिल्ल समाजातील लोकांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक अशा अनेक घटकांना स्त्रीयांना या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे दिसून येते.

**शोध निबंधाचा उद्देश –**

१) नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी भिल्ल समाजातील स्त्रीयांच्या अभ्यास करणे.
२) आदिवासी भिल्ल समाजातील गरिबीचे मुख्य कारण शोधणे.
३) नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी भिल्ल जमातीच्या बालकांच्या कुपोषणाचा अभ्यास करणे.

**शोध निबंधाचा गृहितके –**

१) नंदुरबार जिल्ह्यातील भिल्ल जमातीतील स्त्रियांमध्ये शिक्षणाचे प्रमाण खूप कमी असल्याने दिसूनयेते.
२) नंदुरबार जिल्हयातील भिल्ल जमातीतील स्त्रियांना शासनाच्या सर्व सोयी–सुविधाचा फायदा मिळत नसल्याचे दिसून येते.
३) भिल्ल जमातीचे स्त्रियांचे सांस्कृतिक जीवन हे इतरांपेक्षा वेगळे आहे.

**आदिवासी स्त्री जीवन –** आदिवासी समाजामध्ये स्त्रियांच्या दर्जाबाबत मानववंशशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञ यांच्यामध्ये एकमत नसल्याचे दिसून येते. या समाजामध्ये मातृसत्ताक व पितृसत्ताक कुटुंबपद्धती यांच्यामध्ये स्त्रियांचा दर्जा श्रेष्ठ असल्याचा दावा एका गटाकडून होतो तर त्यांचा दर्जा कनिष्ठ असल्याचा दावा दुसऱ्या गटाकडून होतो. जरी असे असले तरी इतर समाजापेक्षा आदिवासी भिल्ल जमातीमध्ये कुटुंबांमध्ये कोणताही निर्णय घ्यायचा असेल तर पुरुष व स्त्री दोन्ही मिळून निर्णय घेतात. भिल्ल जमाती नंदुरबार जिल्ह्यातील अनेक दऱ्याखोऱ्यात, टेकड्यात वास्तव्य करणारे आहेत. अनेक प्रकारचा समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे आढळून येते. काही स्त्रियांना पाणी नदीवर किंवा विहिरीवर घ्यायला जावे लागत असल्याचे दिसून येते. आदिवासी समाजामध्ये भिल्ल जातीमध्ये लहान बाळ जन्म घेत असताना कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जात नाही. मुलगा असो वा मुलगी दोघांनाही समानतेच्या भावनेने स्वीकार केला जातो.

**जमातीतील विवाह –** भिल्ल जमातीमध्ये मुलीचे विवाह हे १८ ते २१ या वयामध्ये प्रामुख्याने होताना दिसून येते. मुलीचे विवाह करत असताना मुलीचे विचारपूस करून मुलाकडून मुलीची मागणी केली जाते. जर मुलीला आई वडील, नातेवाईक यांची सहमत असल्यास विवाह जर मुलीची इच्छा नसेल किंवा मुलीचे आई–वडील, नातेवाईक यांच्यापैकी कोणाशी तरी इच्छानसेल तर मुलीकडून विवाहाचा प्रस्ताव नाकारला जातो. जर दोन्हीकडे इच्छा असेल तरच विवाह जुळत असल्याचे दिसून येते. जर मुलीचा विवाह करायच असेल तर साखरपुडा करतात किंवा काही लग्न साखरपुडा न करताच विवाह करताना आढळून येते. विवाह केल्यानंतर त्या मुलीचे किंवा स्त्रीचे पती हे कमी वयात असताना मृत्यू पावल्यास त्या मुलीला किंवा त्या स्त्रीला आपलं जीवन कसं जगाव यांचा स्वतः निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्या मुलीला किंवा त्या स्त्रीला पुढील प्रमाणे असते.

१) पतीच्या घरी राहणे पसंत करते.

२) दुसरे लग्न करून नवीन संसाराला सुरुवात करते.

३) आई वडिलांच्या घरी जाऊन तिथेच पूर्ण आयुष्य जगते.

**जमातीतील स्त्रियांचा पोशाख –** आदिवासी स्त्रियांमध्ये प्रमुख्याने वेगळ्या प्रकारचा पोशाख आढळून येतो. अगदी प्राचीनपासून ते आधुनिकपर्यंत या आदिवासी भागातील जमातीतील लोकांच्या पोशाखात अनेक बदल झालेले दिसून येतात. प्राचीन काळी हे आदिवासी लोक आपल्या पोषाखासाठी झाडाच्या पानाचा वापर करत असेल. परंतु मध्ययुगीन कालखंडापासून कापडाचा वापर मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याने अनेक वेगळ्या प्रकारचा पोशाख घालताना दिसतात. प्रामुख्याने भिल्ल जमातीतील स्त्री कार्यक्रमाला जाताना सजावट करून अनेक प्रकारचे दागिने हातात, पायात, नाकात, पायाच्या बोटात घालून जाताना दिसून येतात. आदिवासी संस्कृतीमध्ये दागिन्यांना खूप मोलाचे स्थान किंवा महत्व असल्याचे दिसून येते. त्यामुळेच आदिवासी समाजातील भिल्ल स्त्री कार्यक्रमाला जाण्यासाठी दागिन्याचा उपयोग करताना दिसून येते.

**पशुपालन अवस्थेतील भिल्ल जमातीतील स्त्रियांचे जीवन –** आदिवासी भिल्ल जमातीतील उदरनिर्वाहाच्या अवस्थेतील स्त्रीयांना महत्त्वाची भूमिका करावी लागते. कारण कौटुंबिक व व्यावहारिक अशा दोन्ही पातळ्यांवर स्त्रियांना आपल्या भूमिका पार पाडाव्या लागतात. कुटुंबातील सदस्यांची भोजनाची व्यवस्था करणे आणि पशुपालनाच्या कार्यात पुरुषांना मदत करणे, अशा विविध भूमिका आदिवासी स्त्रियांना कराव्या लागतात. जनावरे आणि त्यांचा योग्य सांभाळ करणे, जनावरांसाठी वैरण आणि दूध काढणे, दुधाचे पदार्थ बनवणे, जनावराचे मांस व कातडी, केस याचा उपयोग करून घेण्याचे काम करावे लागत. कौटुंबिक कामकाज सांभाळून पशुपालनाचा कामकाज स्त्रिया करतात.

**सण–उत्सवात स्त्रीयांचा सहभाग –** आदिवासी भागांमध्ये प्रामुख्याने आदिवासी संस्कृती जोपासण्यासाठी प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अनेक वेगळ्या प्रकारचे उत्सव साजरे केले जातात. या उत्सवामध्ये आदिवासी महिलांचा सहभाग प्रामुख्याने महत्त्वाचा मानला जातो. या उत्सवामध्ये पोळा, दसरा, होळी हे प्रामुख्याने उत्सव या आदिवासी समाजामध्ये साजरे करताना आढळून येतात. आदिवासी संस्कृतीमध्ये होळी हा सण प्रामुख्याने सर्वांना आकर्षित करणारा आहे. होळीमध्ये आदिवासी भिल्ल स्त्रिया सोन्याचे आणि चांदीचे दागिने घालून होळीमध्ये सहभाग घेताना दिसून येतात. आदिवासी होळीमध्ये खूप मोठ्या संख्येने पुरुष आणि स्त्रिया सहभाग घेताना दिसून येतात. कार्यक्रमांमध्ये फिरण्याचे स्वातंत्र्य महिलांना समजाकडून प्राप्त झालेला आहे. आदिवासी समाजातील भिल्ल स्त्रीला कोणत्याही कार्यक्रमांमध्ये जाण्यास पायमल्ली समाजाकडून केलेली दिसून येत नाही. महिलेला प्रत्येक क्षेत्रामध्ये निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आहे. जर एखादा निर्णय पुरुषांना घेताना अडचण येत असेल तर तो पुरुष निर्णय घेण्यामध्ये त्या स्त्रीची मदत घेतो.

**आदिवासी महिलांचे समस्या –**

१. **अपूर्ण सोय–सुविधा –** आदिवासी भागामध्ये जर एखाद्या माणसाचे अचानकपणे तब्येत बिघडली तर दवाखान्यात घेऊन जाण्यासाठी दवाखान्याची व्यवस्था खूप दूर असते. दवाखान्यात जाण्यासाठी वाहनाचा उपयोग करावा लागतो. पण अजूनही अशी काही गावे आहेत की, तिथे गाड्यांची व्यवस्था नाही. रस्त्याची व्यवस्था नाही. अशा ठिकाणी जर एखाद्या महिला डिलिव्हरी पेशंट असेल तर त्या महिलेला झुला बांधून घेऊन जावे लागत असते कारण तिथपर्यंत जाण्यासाठी रस्त्याची किंवा वाहनाची सोय नसते.

२. **बाल कुपोषणाचे प्रमाण भिल्ल जमातीमध्ये मोठ्या प्रमाणात –** महाराष्ट्रामध्ये कुपोषणाचे प्रमाण बघायला गेलं तर सगळ्यात जास्त नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा आणि धडगाव या तालुक्यांमध्ये असल्याचे दिसून येते. याचे मुख्य कारण म्हणजे तेथील गरोदर मातांना मिळणाऱ्या अपूर्ण सुविधा. यामुळे गरोदर मातेचे योग्य संगोपन होत नाही. त्यामुळे त्या महिलेवर झालेले परिणाम त्या लहान बाळावर होतो. आईला चांगला आहार मिळत नसल्यामुळे मुलाचे पोषण करणे, हे त्या स्त्रीला कठीण असते. त्यामुळे लहान बाळाचे कुपोषणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात दिसून येते.

३. **भिल्ल जमातीमधील वाढती बेरोजगारी –** भिल्ल जमातीचा व्यवसाय हा शेती असून पूर्णपणे कृषीवर आधारित जमात आहे. वर्षातून एकदाच पावसाळी पीक हे घेतले जाते. त्यानंतर त्या भागातील जमातीतील स्त्रीया या मोठ्या प्रमाणात बेरोजगार राहतात. हिवाळा आणि उन्हाळा या दोन्ही ऋतूमध्ये स्रीया घरी राहतात.त्यांचा पती कुठेतरी काम करण्यासाठी बाहेर दुसऱ्या शहरांमध्ये जात असतो.

**निष्कर्ष –**

आदिवासी समाजामध्ये प्रमुख्याने आपल्याला असे दिसून येते की, या समाजामध्ये स्त्रिया अशिक्षित आहे. अशिक्षिताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात नंदुरबार जिल्हयात दिसून येते. २० व्या शतकाच्या शेवटी या महिलांचे जन्म झालेले असून २१ व्या शतकामध्ये वावरत असताना या स्त्रियांना अशिक्षित म्हणून संबंधित समजले जाते. तसेच सगळ्यात जास्त कुपोषणाचे प्रमाण नंदुरबार जिल्ह्यामधील अक्कलकुवा आणि धडगाव तालुक्यामध्ये आपल्याला दिसून येते. त्याचे मुख्य कारण म्हणजे अशिक्षितता होय.तसेच भारत सरकार, राज्य सरकार यांनी राबवलेल्या योजना या स्त्रियांपर्यंत पोहोचत नाही. यामुळे कुपोषणाचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. तसेच या आदिवासी भागांमध्ये फक्त पावसाळ्यामध्ये पीक घेतले जाते. त्यामुळे हिवाळा, उन्हाळा या ऋतुमध्ये मोठ्या प्रमाणात आदिवासी क्षेत्रामध्ये स्त्रियांना बेरोजगार राहावे लागते. एकंदरीत विचार केला तर या २१ व्या शतकापर्यंत नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी लोकापर्यंत भारत सरकार व राज्य सरकार यांच्या योजना त्यांच्यापर्यंत पोचत नाही. त्यामुळे या स्त्रीयाचे सामाजिक, आर्थिक, राजकीयक्षेत्रामध्ये जीवन जगणे कठीण झालेले दिसून येते.

**संदर्भ**

१) आदिवासी समाज: संस्कृती आणि आरोग्य, डॉ. जयश्री महाजन, प्रा. सागर बडगे, अथर्व पब्लिकेशन, जळगाव

२) महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, डॉ. गोविंद गारे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, नागपूर

३) अक्कलकुवा परिसरातील आदिवासी जमातीचा सांस्कृतिक इतिहास (१५२० ते २०००), प्रा. डॉ. एन. डी. भामरे, अथर्व पब्लिकेशन, जळगाव.

४) सातपुड्यातील भिल्ल, गारे गोविंद, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, नागपूर

५) आदिवासी समाजाचे समाजशास्त्र,डॉ. प्रदिप आगलावे, साईनाथ प्रकाशन, नागपूर

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# पाटणच्या लढाईत मराठा सरदार महादजी शिंदे यांनी अवलंबलेली यशस्वी युद्धनीती

**घन:शाम गंगाराम पाटील**
संरक्षण आणि संरिक्षत्र विभाग मु.जे.महाविद्यालय जळगाव

**प्रा. डॉ. लक्ष्मण पोपटराव वाघ**
संरक्षण आणि संरिक्षत्र विभाग मु.जे.महाविद्यालय जळगाव

**प्रस्तावना –** महादजी शिंदे यांचे नाव मराठ्यांच्या इतिहासात शिवाजी महाराज, संभाजी महाराज, महाराजा रघुजी भोसले यांच्यानंतर महान सेनानी म्हणून घेतले जाते. पानिपतच्या भीषण रणसंग्रामातून जिवंत परत आलेले महादजी शिंदे १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात मराठेशाहीचे प्रमुख आधारस्तंभ बनले. त्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर पानिपतात नामशेष झालेली मराठयांची सत्ता व दरारा उत्तर भारतात पुन्हा पूर्ववत प्रस्थापित केला. मराठेशाहीच्या उत्तरकाळात कर्तृत्ववान मराठा सरदारांची संख्या बोटावर मोजता येण्यासारखी होती. त्यातही बरेचशे सरदार आपआपली जहागीर व वतने सुरक्षित ठेवण्यासाठीच प्रामुख्याने घडपड करीत होते. त्यांच्या एकंदर वर्तणूकीवरून व कार्यवाहीवरून असे स्पष्ट दिसून येते की, त्यांची बांधिलकी, मराठयांच्या राज्याशी नसून ती प्रामुख्याने त्यांच्या जहागिरीशी होती. त्या जहागिरी सुरक्षित ठेवण्यासाठी ते वेळप्रसंगी मराठा राज्याच्या शत्रुशीही संधान बांधण्यास कचरत नसत. परंतु याला अपवाद महादजी शिंदे होते. मराठा राज्याला धोका निर्माण होईल, असे कोणतेही कृत्य महादजींच्या हातून घडले नाही. महादजी शिंदे यांनी आपल्या पराक्रमा बरोबरच मराठा राज्याबद्दल अढळ निष्ठेमुळे मराठयांच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्व प्राप्त केले आहे. पानिपतच्या पराभवाला प्रामुख्याने जबाबदार असलेल्या नजीबखान रोहिल्याचा सूड घेऊन पानिपतातील पराभवाचा कलंक धुऊन काढला. ३० ऑगस्ट १७७३ रोजी झालेल्या नारायणराव पेशव्यांच्या खुनानंतर मराठा राज्यावर जी संकटाची परंपरा कोसळली. त्या संकटातून मराठा राज्याला उर्जितावस्थता प्राप्त करून देण्यासाठी ज्या प्रमुख सरदारांनी अमूल्य कामगिरी केली त्यात महादजी शिंदे यांचा क्रम प्रथम लागतो. पानिपतच्या आघातातून मराठेशाही सावरते न सावरते तोच मराठयांना इंग्रजांशी युद्ध करावे लागले. इ. स. १७७५–१७८२ या काळात झालेल्या इंग्रज–मराठा युद्धात उत्तरेतील लष्करी धुरा महादजींनी यशस्वीपणे आणि खंबीरपणे सांभाळली. १७ मे १७८२ रोजी झालेल्या सालबाईच्या तहाच्या वाटावाटीत मराठयांतर्फे महादजींनी घेतलेल्या पुढाकारामुळे भारताच्या राजकारणात महादजींची प्रतिष्ठा आणि सन्मान वाढला. उत्तर भारतात मराठयांचे वर्चस्व कायम टिकविण्यासाठी दिल्लीवर मराठयांचा अधिकार असणे अत्यंत आवश्यक आहे हे महादजींनी अचूक ओळखले होते. डी–बायन या फ्रेंच सेनापतीला आपल्या नोकरीत रूजू करून आधुनिक पद्धतीचे कवायती सैन्य महादजींनी तयार केले. पारंपारिक पद्धतीची लष्करी व्यवस्था इंग्रजांविरूद्ध लढा देण्यास असमर्थ आहे. म्हणून आधुनिक पद्धतीची कवायती लष्कर व्यवस्था मराठेशाहीत पाहिजे, अशी दूरदृष्टी असलेले आणि परिस्थितीनुरूप यथायोग्य निर्णय घेणारे पहिले दूरदृष्टीचे मराठा सरदार म्हणजे महादजी शिंदे होते. महादजीनी आपल्या आयुष्यात ज्या काही लढाया केल्या, त्यामध्ये उत्तर मराठेशाहीतील पाटण हि अत्यंत महत्वाची लढाई होती. या लढाईचे वैशिष्ट्य म्हणजे या लढाईच्या विजयासाठी महादजींनी आपल्या पूर्वापार चालत आलेल्या घोडदळाचा व नव्या युरोपिअन कवायती फौजेचा सुरेख संगम घडवून आणला होता.

**पाटणच्या लढाईची पार्श्वभूमी –** राजस्थानमधील जयपुरच्या उत्तरेला ८० मैलावर तर नारनोलच्या दक्षिणेस ३० मैलावर वसलेले एक छोटे गाव. १७८७ च्या जुलैअखेर झालेल्या लालसोटच्या लढाईतील मराठ्यांच्या माघारीनंतर राजपूत राजे मराठ्यांना जुमानेसे झाले होते. लालसोटच्या लढाईनंतर आक्रमक होऊन जोधपूरच्या बिजेसिंगने अजमेरमधून मराठ्यांना हुसकून देऊन तेथील प्रदेश ताब्यात घेऊन दरवर्षी खंडणी देणे बंद केले होते. यापूर्वी अजमेर प्रांत मराठ्यांच्याकडे असण्याचे कारण म्हणजे काही वर्षांपूर्वी महादजीचा थोरला भाऊ जयाप्पा यास राजपुतांनी नागोर येथे कपटाने ठार मारले होते. म्हणून त्या घृणास्पद कृत्याची शिक्षा म्हणून जोधपूरच्या राजांवर 'मुंडकाटी' नावाचा कर मराठ्यांनी बसवला होता. या कराबद्दल बिजेसिंगाने अजमेरचा प्रांत मराठ्यांना लावून दिला होता. लालसोटच्या पश्चात जयपूरच्या राजाने देखील मराठ्यांना खंडणी देणे बंद केले होते. जोधपूर व जयपूरचे राजे अनेक वर्षे मराठ्यांचे वर्चस्व मान्य करून देत असणारी खंडणी बंद पडल्याचे शल्य महादजीच्या मनात टोचणी करून राहिले होते. तसेच आपले थोरले बंधू जयाप्पा आणि दत्ताजी यांनी मोठे शौर्य दाखवून जिंकलेले अजमेर शहर आपण तुल्यबळ असून सुद्धा आपल्या हातातून जाणे ही घटना महादजींच्या दृष्टीने खेदजनक होती. त्यामुळे महादजीच्या मनात राजपुताना एक धडा शिकवावा असे होते.

**दोन्ही सैन्याची जमवाजमव व डावपेच –** महादजींचे हे मनसुबे राजपुतांच्या लक्षात आल्यावर जोधपूरच्या बिजेसिंगाने आपले हजारो शूर राठोड व जयपूरकरांनी कच्छवाह सैनिक महादजींच्या विरुद्ध लढण्यास उभे केले. मराठ्यांचा पूर्वापार शत्रू मोंगल सरदार इस्माईलबेग हा सुद्धा आपले सैनिक महादजीच्या विरुद्ध घेऊन आला. राजपूत व मोंगल सरदार यांच्याविरुद्ध दोन हात करायला महादजीने डी बॉयन, गोपाळराव भाऊ, लखबादादा इत्यादी मातब्बर सेनापती सैन्यासहित मार्च १७९० मध्ये राजस्थानात रवाना केले. मे १७९०च्या सुमारास ही फौज राजस्थानातील पाटणच्या आसपास पोचली. पाटणच्या आसपास असणाऱ्या अनेक लहान मोठ्या टेकड्यांचा भूभाग लढाईच्या दृष्टिकोनातून फायदेशीर असल्याने राजपूत फौजेने तेथे आसरा घेतला होता. मोंगल सरदार इस्माईल बेगकडे मोठा तोफखाना होता व टेकड्यांच्या माथ्यावरून त्याने केलेला तोफांचा मारा मराठ्यांची डोकेदुखी झाला होता. सुरुवातीला मराठ्यांच्या आणि राजपुतांच्या तोफखान्यात थोडीफार मारामारी झाली, परंतु ही लढाई निर्णायक होईना कारण उंचीवरील सुरक्षित जागी बसलेले राजपूत लढाईसाठी मोकळ्या मैदानात येईनात.

**पाटणच्या लढाईतील परस्परांच्या सैन्यबळाची तुलना –** शत्रूच्या सैन्यातील बारा हजार घोडेस्वारांपैकी सहा हजार जयपूरचे होते. दिल्लीचा सरदार इस्माईल बेगच्या नेतृत्वाखाली चार हजार मोंगल होते आणि अलिहारबेग खान याच्या हाताखाली आठ हजार लोक होते तसेच पायदळामध्ये बारा हजार सैनिकांची फौज त्यांच्याकडे होते आणि एक हजार तोफखान्यातील सैनिक होते. याशिवाय इस्माईल बेग याजकडे पांच हजार तेलंगी सैनिक, एकवीस

तोफेसहीत अनेक बंदूकधारी सैनिक, चार हजार रोहिले व पांच हजार फकीर असे सैन्य होते. याशिवाय शत्रुपक्षाकडे आठ तोफेसहीत राजपूत लोकांची शिबंदी आणि किल्ल्याच्या लढाईतील निष्णात अशी ही चार हजार माणसे असे प्रचंड सैन्यबळ होते. अशाप्रकारे एकूण ५१ हजार सैनिक, २९ तोफा शत्रूकडे होत्या.मराठ्यांच्या कवायती ब्रिगेडमध्ये दहा हजार सैनिक होते. मराठ्यांचे घोडदळ सुमारे १० हजारच्या आसपास असेल. या लढाईतील मराठ्यांचा विजय एकाप्रकारे आश्चर्यचकित करणारा होता. कारण मराठ्यांकडील सैन्य शत्रूसंख्येपेक्षा तुलनेने खूपच कमी असूनसुद्धा शत्रूच्या अवाढव्य फौजेला त्यांनी चितपट केले.

**पाटणच्या लढाईचे वर्णन –** महादजीकडील काही ज्योतिषांनी अधिक मास आषाढ शुद्ध अष्टमीच्या रविवारनंतर लढाई केल्यास तुम्हाला त्यात हमखास यश मिळेल, असे भविष्य महादजींना सांगितले. त्यानुसार महादजींनी रविवार हा चढाई करण्याचा दिवस ठरविला. त्यानुसार गोपाळराव रघुनाथ व जिवाबादादा बक्षी यांनी आपापल्या फौजेची व कंपूची तयारी करून लढाईचा बंदोबस्त केला. नंतर त्यांनी डोंगराच्या आत शिरून डोंगरात लपून व आसरा घेऊन बसलेल्या शत्रूवर हल्ला चढवला. हल्ला झाल्यावर साहजिकच राठोड सैनिक मराठ्यांवर चालून आले. तेव्हा दोन्ही बाजूने तोफखान्याचे युद्ध लागले. परंतु काही केल्या राजपुतांची फौज लढाई करण्यास सपाट मैदानात येईना. त्यांची फौज डोंगराच्या आतच लपून राहिली. तेव्हा मराठ्यांनीही आपली पुढे गेलेली फौज मागे घेतली. मराठे माघार घेतात, असे समजून राठोडांची काही पथके बाहेर पडून मराठ्यांशी लगट करू लागली. तेव्हा मारवाड्यांची आणखी फौज सुरक्षित जागेतून बाहेर येऊन मराठ्यांच्या सेनेसंगत दोन हात करू लागली. ही परिस्थिती मराठ्यांनी न्याहाळून त्यांनी शत्रूची फौज आपल्या पाठीवर घेऊन पाठीमागे सरकत सरकत आपले फौजेत आतपर्यंत त्यांना येऊ दिले. तेव्हा उदयपूरच्या मारवाडी फौजेला वाटले की मराठे आता घाबरले आहेत व लढाई सोडून मराठ्यांची फौज पळू लागली असे वाटून त्यांनी मराठ्यांच्या पथकावर जोरदार हल्ला चढवला. उदयपूरची फौज पुरेशी पुढे आलेली पाहून मराठ्यांनी त्यांच्यावर अचानक तोफांचा मारा सुरु केला. दुसरे बाजूने जिवाबादादा आणि लखबा दादा यांनी त्यांच्या हाताखालील सैन्याची उठावणी केली. ही लढाई मैदानाच्या उजवे बाजूस मारवाडी सैनिकांबरोबर चालू होती. तेव्हा डावीकडे इस्माईल बेगची फलटण व मोगल फौज सुद्धा लढाईस तयार होती. त्यांनी मराठ्यांच्या फौजेवर चाल केली. त्यावेळी जयपूरकर, मारवाडी आणि इस्माईल या त्रिवर्गाचे फौजेतून शेसव्वाशे तोफा एकाच वेळी सुरु झाल्या आणि मराठ्यांच्या सैन्यावर तोफगोळे बरसू लागले. त्या प्रसंगी दि बॉयन याने उजवे बाजूस मारवाडी सेनेशी लढाई सांभाळून डावे बाजूस तोफांचा जबरदस्त मारा केला. दि बॉयनचा तोफखाना सुरु झाल्यावर शूरवीर राजपुतांनी थेट बॉयनच्या तोफखान्यावर बेधडक हल्ला चढवला. आग ओकणाऱ्या तोफांच्या माऱ्यातून बॉयनचा तोफखाना गाठणे शत्रूला केवळ अशक्य होते. पण जीवावर उदार झालेल्या राजपुतांनी हे प्राणावरचे धाडस केले. राजपुतांचा असा हल्ला चालू राहिला असता तर बॉयनचा तोफखाना बंद पडून राजपुतांच्या ताब्यात गेला असता. तेव्हा लखबादादाने अचानक त्यांच्यावर तलवारीने हल्ला चढवला. लखबादादा, जगोबा, राणेखान, दि बॉयन यांनी जोरदार प्रतिहल्ला चढवीत चोहोकडून एकदम जोर करून शत्रूवर हल्ला करून त्यांना उधळून लावले. तेव्हा इस्माईल, मारवाडी व जयपूरकर यांचे सैनिक लढाई सोडून पळू लागले. तेव्हा महादजीच्या फौजेने त्यांचा पाठलाग केला. जिवाजी बल्लाळ, अंबुजी इंगळे, शिवाजी विठ्ठल यांची व इतर अनेक पथके राजपूत व मारवाडी फौजेच्या पाठीस लागली. जिवाजी बल्लाळने शत्रूचा बारा कोसपर्यंत पाठलाग केला. परंतु इस्माईल बेग त्यांच्या हाती लागला नाही. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन तो जयपूरकडे पळून गेला. मारवाडी लोकांचा मुख्य सरदार गंगाराम या लढाईत पडला. शत्रूच्या शंभर तोफा मराठ्यांच्या ताब्यात आल्या. चौदा-पंधरा हत्ती मराठ्यांनी पकडून आणले. मराठ्यांच्याकडील लहान मोठे सरदार यांनी एकत्रित होऊन ही पाटणची लढाई जिंकली. डी बॉयनची या लढाईत चांगली छाप पडली. राजपूत सेनेचे १२ हजार लोक कैद झाले. निशाणे, तोफा, हत्ती, घोडे, उंट इत्यादी अगणित सामान मराठ्यांस मिळाले. शत्रूच्या तळाचा संपूर्ण नाश करण्यात आला किंवा तो जाळून टाकला गेला. नंतर पाटण गावाला वेढा घालून तेथील २००० घोडे ताब्यात घेतले गेले.

**मानहानीकारक पराभव –** पाटणच्या लढाईत इस्माईल बेग याचा सपशेल पराभव झाला. त्यानंतर त्याची अवस्था एखाद्या गणंग भिकाऱ्यासारखी झाली. अंगावरच्या कपड्यानिशी पळून जाऊन तो जयपूरच्या राजाच्या आश्रयाला गेला. नंतर तो बिजेसिंगच्या आश्रयासाठी नागोरला पळून गेला. ३ दिवसांनी पाटण शहर मराठ्यांनी जमीनदोस्त करून तेथील संस्थानिकास कैद केले. या लढाईत मराठ्यांचे ८०० लोक कामी आले असे इतिहासात एके ठिकाणी नमूद केले आहे. पाटणच्या विजयाने मराठ्यांच्या शौर्याची कीर्ती सर्वत्र पसरली त्यायोगे आजही पाटणमध्ये मराठ्यांच्या शौर्याबद्दल अनेक गीते म्हंटली जातात त्यापैकी हे एका प्रसिद्ध लोकगीतातील ओळी अशा आहेत –

घोडा, जोडा, पागडी, मुछा अरु तलवार ! पांच रकमा मेलदिनी, पाटणमे राठोर !!

राठोडांनी या पराभवात त्यांच्या मानाच्या पांच गोष्टी गमावल्या. त्या म्हणजे त्यांचा घोडा, जोडा, पगडी, मिशी व तलवार. पाटणच्या विजयामुळे महादजी शिंदे यांचे वर्चस्व राजपुतानामध्ये पुनर्प्रस्थापित झाले. या मोहिमेच्या आधी बिजयसिंगाने डी बॉयन याला लाच देऊन महादजी शिंदेपासून फोडायचा प्रयत्न पण केला.पण स्वामिनिष्ठ डी बॉयन याने उलट निरोप बिजयसिंग याला पाठवला की आपले जोधपूर शहर मला जहागिरी म्हून मिळणार आहे.

**समारोप –** महादजीनी आपल्या आयुष्यात ज्या काही लढाया केल्या, त्यामध्ये पाटण ची लढाई हि सर्वात महत्वाची होती. या लढाईमध्ये शिंद्यांचा एकनिष्ठ युद्धनिपुण फ्रेंच सेनापती डी बॉयन याने चांगलीच मर्दुमकी गाजवली व शिंद्यांना या लढाई मध्ये विजय मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला. येथील वैभवशाली विजयामुळे महादजी शिंदे यांची ताकद राजपुतानामध्ये सर्वांना समजली आणि त्यांच्या आयुष्याच्या अंतापर्यंत त्यांना राजपुताकडून कधीही त्रास झाला नाही त्यानी लष्करी महत्वकांक्षा विस्तारित जनरल डी बॉयन यांस अजून दोन ब्रिगेडची उभारणी करायला सांगितले. या ब्रिगेडने महादजी शिंदे यांना इंग्रजांना न जुमानता हिंदुस्थानातील सर्वशक्तिशाली सत्ताकेंद्र बनवले. केवळ हिंदुस्थानातच नव्हे तर हिंदुस्थानच्या बाहेर सुद्धा महादजी शिंदे यांच्या लष्करी हालचालींचा मागोवा घेतला जाऊ लागला.

**संदर्भ**

१. महादजी सिंदिया, मुकुंद वामन बर्वे
२. मराठी रियासत, खंड ७, सरदेसाई गो. स.
३. महादजी शिंदे यांचे चरित्र, नातू वि. र
४. शिंदे, महादजी, मराठी विश्व कोष
५. मराठ्यांचा इतिहास : साधन परिचय, प्रा. अ. रा. कुलकर्णी

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# रशिया–युक्रेन युद्धाचे युक्रेन देशातील पर्यावरणावर झालेला परिणाम

**प्रा. वैशाली मोतीलाल सपकाळे**
संरक्षण शास्त्र विभाग
ज.जि.म.वि.प्र.सह संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव

**प्रस्तावना –** युद्ध हा एक चालू आणि प्रदीर्घ संघर्ष आहे. जो फेब्रुवारी २०१४ मध्ये सुरू झाला होता. ज्यामध्ये एकीकडे रशिया आणि रशियन सैनिक आणि समर्थकांचा समावेश होता आणि दुसरीकडे युक्रेनचा भाग म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळखल्या जाणाऱ्या किमिया आणि डोनवातच्या काही भागांवर हे युद्ध केंद्रित आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यातील तणाव विशेषतः २०२१ ते २०२२ पर्यंत उफाळून आला आहे. युक्रेनवर रशियाच्या हल्ल्यामुळे जीवित आणि मालमत्तेच्या हानीबरोबरच हवा, पाणी आणि जमीन तसेच प्रदूषणही पसरत आहे. जे बराच काळ प्रभावी राहण्याची शक्यता आहे. याशिवाय अणु प्रकल्पांच्या परिसरात संसर्गाचा धोका आणि आरोग्याच्या समस्याही निर्माण झाल्या आहेत. पर्यावरणाचे होणारे नुकसान मोजण्यासाठी अनेक वर्षे लागतील. मॉस्को १९ मार्च कोणत्याही देशातील युद्धाच्या भीषणतेचा परिणाम केवळ आर्थिक आणि भौतिक होत नाही तर बाधित देश आणि आजूबाजूच्या पर्यावरणावरही त्याचा परिणाम होतो. हे लक्षात घेऊन जगातील ७५ देशातील एक हजाराहून अधिक लोक आणि संस्थांनी पर्यावरण शांतता निर्माण संघटनेला खुले पत्र दिले आहे. याद्वारे त्यांनी रशिया युक्रेन युद्धामुळे पर्यावरण आणि मानवीय हानीबद्दल चिंता व्यक्त केली आहे.त्यांनी या युद्ध विरोधात एकजूट दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे तज्ज्ञांचे म्हणणे आहे की या युद्धामुळे झालेल्या नुकसानीचे पूर्ण मूल्यांकन करण्यासाठी अनेक वर्षे लागतील.

**संशोधनाची उद्दिष्ट –** रशिया आणि युक्रेन यांच्यातील सुरू असलेल्यायुद्धामुळे पर्यावरणावर काय परिणाम होत आहे तसेच जगातील सर्व देशांच्या पर्यावरणावर या युद्धाचा परिणाम होत आहे.

**संशोधनाची गृहितके –**

१) रशिया हा देश बलाढ्य असून युक्रेनसारख्या देशावर आपले वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करीत आहे.
२) युक्रेन आणि रशिया युद्धामुळे संपूर्ण जगावर तसेच पर्यावरणावर याचा खूप मोठा परिणाम दिसत आहे.
३) युक्रेन देश नाटो संघटनेत सामील होण्यास तयार आहे. परंतु रशियाचा संपूर्ण विरोध आहे.

**युक्रेनचा इतिहास –** 'यूक्रेन' शब्दाचा अर्थ राजनगरीचा विभाग किंवा सीमावर्ती प्रदेश असा आहे. सोळाव्या शतकात युक्रेन हे नाव प्रचारात आले. असे असले तरी त्याचा उगम अकराव्या शतकातील आहे. सोळाव्या शतकापूर्वी 'रस' या नावाने तर त्यातूनच रशिया हा शब्द रूढ झाला. छोटा रशिया असाही उल्लेख केला जातो. पुढे सतराव्या शतकात 'जेझुईट' मिशनऱ्यांनी येथे कॅथेनिक एक धर्मप्रसाराची सक्ती करण्याचा प्रयत्न केला होता. पुढे रशियन राज्यक्रांतीपर्यंत (१९१७) छोटा रशिया म्हणून युक्रेनचे प्रतीक स्थान टिकून होते. नव्या शतकात निर्माण झालेले वयीवन रुस हे राज्य मध्य युगा दरम्यान एक बलाढ्य राष्ट्र होते. एकोणिसाव्या शतकामध्ये युक्रेनचा मोठा हिस्सा रशियन साम्राज्याचा तर उर्वरित भाग ऑस्ट्रीया, हंगेरीच्या अधिपत्याखाली होता. पहिल्या महायुद्ध व रशियन यादवीनंतर ३० डिसेंबर १९२२ रोजी सोव्हियत संघामध्ये सामील होणारा युक्रेन हा आघाडीचा देश होता. तेव्हापासून १९९१ सालामधील सोव्हियत संघाच्या विघटनापर्यंत युक्रेनियन सोव्हियत साम्यवादी गणराज्य हे सोव्हियत संघातील आघाडीचे गणराज्य होते. २४ ऑगस्ट १९९१ रोजी युक्रेनला स्वातंत्र्य मिळाले. युक्रेन हा पूर्व युरोपमधील एक सुंदर देश आहे. ज्याचे क्षेत्रफळ ६,०३५५० चौरस किलोमीटर आहे. युक्रेनची राजधानी 'कीव'आहे. हीला या देशातील सर्वात मोठे शहर असे सुद्धा मानले जाते. युक्रेन हा जगातील ४६ वा सर्वात मोठा देश आहे.युक्रेन या देशाची अधिकृत भाषा 'युक्रेनियन' आहे. तरीही या देशांमध्ये अनेक भाषा बोलल्या जातात.

**लोक व समाज जीवन –** युक्रेनियन लोक हे मूळ स्लाव्ह वंशाचे असून युक्रेनच्या प्रदेशातील होते. इ. स. पूर्व दुसऱ्या व तिसऱ्या शतकात आले. राज्यातील सुमारे ७४.९ टक्के लोक हे वांशिकदृष्ट्या युक्रेनियन, १९.४ टक्के लोक रशियन, १६ टक्के लोक ज्यू, ०.१ टक्के लोक बेलोरशियन, ०.६ टक्के लोक मोल्डेव्हीयन व तेवढेच पॉल आणि २.१ टक्के इतर होते. युक्रेनियन लोक युक्रेनियन भाषा व इतर बहुतेक सर्व लोक रशियन भाषा बोलतात. बिगर युक्रेनियनांची लोक वस्ती प्रामुख्याने शहरात आढळतात. दुसऱ्या महायुद्धानंतर राज्यात फक्त रशियन ऑर्थोडॉक्स चर्चलाच शासकीय संमती होती. सुंदर भरतकाम केलेली वस्त्रप्रावरणे हे युक्रेनियन लोकांचे परंपरागत वैशिष्ट्य होय. त्याठिकाणी युक्रेनियन लोकगीतांचे खास वैशिष्ट्य आहे. लोकनृत्य तसेच चीजजवनिका, मृत्पात्री, काष्ठशिल्प जी युक्रेनियन लोककलेची खास क्षेत्रे आहेत. मौखिक परंपरेने चालत आलेले लोकसाहित्य युक्रेनियन संस्कृतीचा मौलिक ठेवा आपणास दिसतो. त्याठिकाणी ग्रामीण परिसरातूनही या पारंपारिक लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. (जाधव रा.ग.)

**भाषा साहित्य –** इ. स.१२ व्या ते १६ व्या शतकापर्यंत लिखित युक्रेनियन वाङमय हे चारच स्लाव्होनीक भाषेत व धार्मिक स्वरूपाचे आहे. पुढच्या शतकात युक्रेनियन चर्च स्लाव्होनिक अशा संमिश्र भाषेत लौकिक स्वरूपाचे काव्य नाटक व गद्य साहित्य निर्माण झाले. १८ व्या शतकात युक्रेनियन ही युक्रेनची साहित्य भाषा बनली. (कुलकर्णी म.र.)

**कला –** मध्ययुगीन आयकॉन आणि भित्तीलेपनाचे या युक्रेनियन कलाविष्कारात बायझंटिन आणि स्थानिक कला विशेषांचे संमिश्रन आढळते. युक्रेनियन वास्तुकलेची परंपरा ही जुनी आहे. ज्ञान विज्ञानाच्या क्षेत्रातही काही श्रेष्ठ युक्रेनियन शास्त्रांचा उल्लेख आवश्यक ठरतो.

**उद्योग –** युक्रेनमधील लोह धातू उद्योग फार मोठा असून पोलाद उत्पादनात यांचा मोठा वाटा आहे.

**नैसर्गिक वायू आणि तेल –** एकटा रशिया संपूर्ण युरोपची ३५ टक्के नैसर्गिक वायूची गरज भागवतो. त्यामुळे हे युद्ध चालूच राहिले तर जगातल्या विज उद्योगांवर त्याचा मोठा परिणाम होऊन तेलाच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता दर्शवते.

**शेती** – युक्रेनमध्ये रशियातील काही सर्वोत्कृष्ट सुपीक जमिनी आढळतात.

**आर्थिक स्थिती** – युक्रेनची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात विकसित झालेली आहे. १९२९ पासून मध्य रशिया, उरल,सायबिरीया, कझाकस्तान इ. प्रांताच्या अर्थव्यवस्थेचा विकास युक्रेनमधील भांडवल व श्रम यांच्या सहाय्याने करीत राहण्याचे रशियन शासनाचे धोरण आढळते. आर्थिकदृष्ट्या युक्रेनचे महत्त्व पूर्वीसारखे राहिले असल्याचे दिसत नाही.

**पर्यावरण संघटना** – पहिली जागतिक पर्यावरण परिषद ५ जून १९७२ साली स्वीडनमधील स्टॉकहोम येथे झाली. जगातील सर्वच राष्ट्रांच्या पर्यावरणविषयक समस्यांचा विचार करण्यात आला. रशिया आणि युक्रेन यांच्यामध्ये युद्ध चालू आहे. ते जर का दुसऱ्या महायुद्धासारखे रूप धारण करणार लागले तर पर्यावरणाचा आर्थिक-सामाजिक या सर्व बाबींचा विचार पर्यावरण परिषदेत करावा लागणार आहे. जगभरातील बारा देशांनी एकत्र येऊन नाटोची स्थापना केली असून त्यामागे उद्देश असा आहे की, या संस्थेतील कोणत्याही देशावर हल्ला झाला तर उर्वरित देश त्या देशाच्या बाजूने उभे राहतील. जगभरातील लष्करी घडामोडींचा पर्यावरणावर प्रभावाबद्दल जागरूकता वाढविण्यासाठी समर्पित संस्था कॉन्फ्लीक्ट आणि एन्व्हायरमेंट ओब्झर्व्हेटरीसाठी संशोधन आणि धोरणात्मक संचालक डांग वेअर यांनी सांगितले. प्रत्येक संघर्षाचे विशिष्ट पर्यावरणीय वर्णन असते.युक्रेनच्या बाबतीत हे युद्ध उद्योग आणि ऊर्जा क्षेत्रातील तांत्रिक आणि मनुष्यहानीचे नुकसान आहे आणि दर्शविते.

**रशिया-युक्रेनवर युद्धाचे ढग** – रशिया आणि युक्रेन यांच्यामध्ये भांडणाचा मुख्य मुद्दा म्हणजे युक्रेनने मागितलेल्या तेथील सदस्यत्वाचा युक्रेनला सदस्यत्व पाहिजे आहे. परंतु रशियाला युक्रेनने नाटोचा भाग होणे अजिबात मान्य नाही. नाटो हे पाश्चात्त्य देश आणि अमेरिकेने उभारलेले लष्कर आहे. या देशांनाही रशियाची ढवळाढवळ नको आहे. म्हणून हे देश युक्रेनच्या बाजूने मजबूत उभे आहेत. रशिया युक्रेन संघर्षामुळे सर्वांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आणि त्याचबरोबर संपूर्ण जगावर संभाव्य युद्धाचे मोठे परिणाम होऊ शकतात. जर का युक्रेन आणि रशिया युद्ध चालूच राहिले तर या दोन्ही देशांवर आणि त्याचबरोबर संपूर्ण आजूबाजूच्या जगावर त्याचा परिणाम होणार आहे. तसेच संपूर्ण जगातील पर्यावरणावर सुद्धा या युद्धाचा परिणाम जाणवेल. अन्नधान्य महाग होईल. रशियाने युक्रेनवर केलेल्या हल्ल्यामध्ये आतापर्यंत युक्रेनचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी आणि वित्तहानी झाली आहे. युद्धाच्या भीतीपोटी आतापर्यंत लाखो लोकांनी युक्रेनसोडून शेजारील देशात आश्रय घेतला आहे. युद्ध सुरु होऊन महिना झाला तरी युद्ध थांबण्याचे नाव घेत नाही आहे. या युद्धामध्ये रशियाने युक्रेनविरुद्ध मानसिक युद्धाचा आधार घेवून युक्रेनवर हल्ला करीत आहे. त्यामुळे युक्रेनच्या लोकांवर व लहान मुलांवर मोठा परिणाम होत आहे. जर का रशियाने अणुबॉम्ब टाकण्याचा प्रयत्न केला तर तिसरे महायुद्ध होण्याची दाट शक्यता आहे. (दै.लोकमत, दि. २८ मार्च २०२२) आधीच कोविडमुळे जगभर महागाई वाढली आहे. पर्यावरणात बदल झालेला आहे. त्यातच आता काळ्या समुद्रातून धान्य आणि खासकरून गव्हाची वाहतूक अडकेल आणि महागाई वाढणार.युक्रेन आणि रशिया दोन्ही देश गव्हाचे मोठे निर्यातदार देश आहेत. त्यामुळे जर का असेच वातावरण राहिले तर संपूर्ण जगाची आर्थिक, सामाजिक स्थिती ढासळू शकते.

१) **युद्धामुळे दोन प्रकारचे परिणाम** – युद्धाचे तत्कालीन आणि दूरगामी परिणाम होतात. तत्काळ पर्यावरणीय आणीबाणीमुळे ऊर्जा किंवा इंटरप्राईजेस प्रणाली नष्ट होऊ शकते. परंतु दीर्घकाळात प्रदेशाचे पर्यावरणीय प्रशासन कमकुवत होऊ शकते. तसेच पर्यावरणीय मुद्द्यांमुळे संघर्ष होऊ शकतो

२) **दोन्ही देशांबाहेर नुकसान** – जर का रशियाने युक्रेनचा ताबा कायमचा घेतला तर त्याच्या जलस्रोतांच्या निमंत्रणावरून सीमापार वाद होऊ शकतात, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. तसेच दोन्ही देशांच्या सीमा ओलांडून त्याचा पर्यावरणावर परिणाम होऊ शकतो.युक्रेनच्या औद्योगिक क्षेत्राला झालेल्या नुकसानामुळे हवा आणि पाण्याची गुणवत्ता बिघडण्याचा धोकाही वाढू शकतो.

**औद्योगिक क्षेत्रात युद्धाचा हानीकारक परिणाम** – औद्योगिक क्षेत्रामध्ये युद्धामुळे विषारी संसर्ग होण्याची शक्यता असते. कारण तेच अधिक ऊर्जा संयंत्रे, रासायनिक संयंत्रे धातूचे कारखाने आहेत. त्यांचा नाश किंवा नुकसान अधिक प्रदूषण पसरविते. त्यात तेल, पेट्रोलियम हानीकारक रसायने आणि ज्वलनशील पदार्थ असतात. जे हवा, पाणी इ. मध्ये पसरतात. त्यामुळे पर्यावरणाचे जलद आणि दूरगामी नुकसान होते. युक्रेनमध्ये जलविद्युत धरणे फुटल्यास पूर येण्याचा धोका आहे. अशा उद्योगांवर हल्ला करणे युद्धामध्ये गुन्हा मानला जातो. याशिवाय अणुउर्जा प्रकल्पावर हल्ला किंवा त्याकडे होणारे नुकसान, गंभीर आरोग्य बाब आणि पर्यावरणीय धोका असू शकतो. या सर्व गोष्टींमुळे प्रदूषणाचा धोका वाढण्याची भीती आहे.

**पर्यावरणीय आव्हाने** – पर्यावरणीय कामगिरी निर्देशांकानुसार युद्धापूर्वी युक्रेनमध्ये अनेक उद्योगांमुळे हवा, जैवविविधता उत्पादन, पर्यावरणीय आरोग्य इ. पर्यावरणीय निर्देशांकाची पातळी कमी होणार. पूर्व युक्रेनचा डोनबाण प्रदेश खाण, खनिजे आणि रासायनिक उत्पादन इत्यादीमुळे आधीच सर्वाधिक लोकसंख्या असलेले क्षेत्र मानले जाते. या युद्धामुळे संपूर्ण जगापुढे एक प्रकारचे आव्हान आले आहे. त्यासाठी सर्व नाटो सदस्य देश प्रयत्न करीत आहे.

**निष्कर्ष** – जर का रशिया आणि युक्रेन युद्ध सुरूच राहिले तर भविष्यातील वाद संपुष्टात आला नाही तर याचा पर्यावरणावर खूप मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे आणि संपूर्ण जीवनमान विस्कळीत होईल आणि दुसरे महायुद्ध ज्याप्रमाणे झाले होते तसेच तिसऱ्या महायुद्धाची सुरुवात होऊ नये यासाठी त्यांना शांतता मार्गाने प्रश्न सोडविला पाहिजे.जरका तिसऱ्या महायुद्धाची सुरुवात झाली तर संपूर्ण जगावर खूप मोठा हानिकारक परिणाम होऊ शकतो. वरील चालू असलेल्या युद्धावरून असे लक्षात येत आहे की, युक्रेन, रशिया आणि संपूर्ण जगाला सामोरे जावे लागणार आहे.

**संदर्भ**

१) आंतरराष्ट्रीय सुरक्षा समस्या, डॉ.देवेंद्र जि. विसपुते, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, सप्टेंबर २०२०.
२) विसपुते, तोडकर, धर्माधिकारी, जागतिक सुरक्षा, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०१५, पृ. १६८.
३) अनिरुद्ध जोशी, धगधगते युक्रेन, २४ फेब्रुवारी २०२२
४) Bilinsky.ygros/ar The Second Soviet Republic
५) The Ukrain fter World War II, New Brunswick, 1964.
६) युक्रेन वाद Published by š Rahul Pande, First Published, March १९, २०२२
७) दै. लोकमत, २८ मार्च २०२२

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# भारताचा स्वातंत्र्य लढा आणि खानदेशातील राष्ट्रवाद

**श्री. शिवाजी देविदास सुर्यवंशी**
संशोधक विद्यार्थी
क. ब. चौ. उ. म. वि. जळगाव

**प्राचार्य. डॉ. पी. एस. सोनवणे,**
संशोधन मार्गदर्शक
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील , कला महाविद्यालय साक्री ता.जि.धुळे.

**प्रस्तावना –**

राष्ट्र, राष्ट्रीयत्व, राष्ट्रवाद ह्या संकल्पना परस्परांशी संलग्न आहेत. विशिष्ट भूप्रदेशात कायमस्वरुपी वस्ती करुन राहणाऱ्या लोकांचा समुदाय जेव्हा सार्वभौम सरकार स्थापन करतो. तेव्हा त्यास राज्य म्हणतात. अशा राज्यातील लोकांना आपल्या प्रदेशाविषयी प्रेम अभिमान वाटतो तेव्हा त्यास राष्ट्र असे म्हणतात आणि राष्ट्रविषयी प्रेम, निष्ठा, अभिमान असणे म्हणजे राष्ट्रवाद होय.

इ.स. १७५७ साली प्लासीची लढाई झाली ह्या लढाईत फितुरी ने विजय मिळवून भारतातील राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवणाऱ्या ब्रिटीशांना भारत ही वसाहत आकाशात सुर्य व चंद्र असे पर्यंत आपल्या ताब्यात राहिल असे वाटु लागले. ब्रिटीशांकडुन भारतीय जनतेला आणि राजपदांना त्रास देण्याचे कार्य सुरू झाले ब्रिटीशांकडून आपल्यावर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात लढण्यासाठी भारतीयांनी १८५७ चा उठाव घडवून आणला. त्यात भारतीयांना अपयश आले असले तरी ह्या लढ्यातुन भारतीयांमध्ये राष्ट्रवादाची प्रेरणा निर्माण झाली[१] परिणामी ब्रिटीशांना हे कळून चुकले की यापूढे भारतीयांवर अन्याय करून चालणार नाही तर त्यांना शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात पुढे आणावे लागेल तरच आपली सत्ता अबाधित राहील अन्यथा भारतीयांमधील राष्ट्रवादाची भावना ब्रिटीश सत्तेला उलथावून लावल्याशिवाय राहणार नाही.

१८५७ पासून भारतातील वेगवेगळ्या प्रांतातुन ब्रिटीशांना जोरदार विरोध केला गेला, त्यावेळी खानदेशातही राष्ट्रवादाचे वारे वाहू लागले आणि भारताच्या स्वातंत्र्यासाठी झटण्याची प्रेरणा खानदेश वासियांच्या मनात रोवली गेल्याचे दिसून येते. यासंदर्भात खानदेशातील राष्ट्रवादाचा अल्पसा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधातुन केला आहे.

**खानदेशातील भिल्ल आदिवासी आणि १८५७ चा उठाव –** खानदेशातील भिल्ल आदिवासी लोकांनी १८५७ च्या उठावात सहभाग घेतला. काझिसिंग उर्फ खाज्या नाईक हा भिलांचा नायक[२] होता. १८३१ ते १८५१ पर्यंत तो ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरीत होता. १८५१ पर्यंत त्याने सेंधवा ते शिरपूर ह्या ४० मैलाच्या रस्त्याच्या परिसरात एक ही गुन्हा घडू दिला नाही, परंतु अनावधानाने १८५१ साली एका गुन्हेगाराचा कबुली जबाब नोंदविताना त्या गुन्हेगाराचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूचा ठपका काझिसिंग वर ठेवून सदर अदालतने त्याला १० वर्षाची कैदेची शिक्षा दिली.[३] काझिसिंगने यापूर्वी कंपनी सरकारची चांगली सेवा केलेली असल्यामुळे काही ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून त्याची पाच वर्षातच तुरूंगातुन मुक्तता करण्यात आली आणि पुन्हा त्याला ईस्ट इंडिया कंपनीच्या सेवेत घेण्यात आले.

त्याच वेळी उत्तरेत उठावाच्या वार्ता येवून मिळाल्याने ब्रिटीशांची सेवा करूनही आपल्याला तुरूंगात जावे लागले त्यापेक्षा येथे आपली सत्ता राहिली असती तर असे घडले नसते, असे वाटल्यामुळे त्याने नोकरीचा राजीनामा देवून दिल्लीच्या बादशहाच्या वतीने ब्रिटीशांविरोधात बंड पुकारले. इंदौर वरून मुंबईकडे जाणारा सात लाख रुपयांचा खजिना त्याने सेंधवा घाटात लुटला. ह्या घटनेने ब्रिटीश सरकार हादरले काझिसिंगच्या कार्यामुळे खानदेशातील जनतेच्या मनात राष्ट्रवाद वाढीस लागला.

**ब्रिटीशांचे शैक्षणिक धोरण –** खानदेशात राष्ट्रवादाला चालना देण्यासाठी अप्रत्यक्षपणे ब्रिटीशांनी केलेल्या सुधारणा कारणीभूत ठरल्या. भारतीयांना शिक्षण देवून त्यांचा राज्यकारभारासाठी उपयोग करून घ्यावा, ही मेकॉलेची निती होती. या नितीप्रमाणे ११ ऑक्टोंबर १८५३ रोजी धुळे येथे गरूड हायस्कूल ची स्थापना झाली.[४] हेच गरूड हायस्कूल पुढे राष्ट्रवादाची प्रेरणा देणारे केंद्र ठरले, कारण गरूड हायस्कूल मधून मॅट्रीकची परीक्षा पास होवून उच्च शिक्षणासाठी पुण्याला गेलेले विद्यार्थी लोकमान्य टिळकांची भेट घेत त्यातुन टिळकांशी भावनिक संबंध निर्माण होऊन धुळ्यात १८९३ साली सत्कार्योत्तेजक सभा स्थापन झाली. ह्या सभेच्या माध्यमातून खानदेशात राष्ट्रवादाची बीजे रोवली गेली.

**महात्मा गांधीजीचा खानदेश दौरा –** १९२० साली लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर भारतीय राजकाणाची सूत्रे खऱ्या अर्थाने महात्मा गांधीच्या हाती आली. १९२७ साली महात्मा गांधीजींचा खानदेश दौरा झाला. पूर्व आणि पश्चिम खानदेशात त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. खानदेशच्या दौऱ्यात गांधीजींनी खादीच्या प्रचाराला विशेष महत्व दिले[५] त्यामुळे थोड्याच कालावधीत शंकर श्रीकृष्ण देव, आप्पासाहेब दास्ताने, बाळूभाई मेहता, सानेगुरूजी या व्यक्तींनी खादी प्रचाराचे कार्य सुरू केले. गांधीजींच्या आगमानामुळे खानदेशात स्वदेशी वस्तुंचा वापर वाढला. राष्ट्रप्रती प्रेमभाव वाढला म्हणून हा दौरा खानदेशात राष्ट्रवादाला चालना देणारा ठरला.

**सविनय कायदेभंग चळवळ आणि खानदेश –** १९३० साली गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. या चळवळीत सहभागी होण्यासाठी पश्चिम खानदेशातून नवल आनंदा पाटील, रंगनाथ टोणगावकर, रामचंद्रबाबा मोहाडीकर हे तीन तरूण मॅट्रीकची परीक्षा न देता दांडीयात्रेत सहभागी झाले.[६] या यात्रेत पायी चालत असतांना जी भजने म्हटली जात असत त्यातुन ब्रिटीश सरकार जोवर आमच्या मागण्या मान्य करत नाही तोवर त्यांच्याकडून येणाऱ्या मालावर बहिष्कार करू व त्यांना सहकार्य करणार नाही.अशा साध्या गोष्टी भजनातून शिकविल्या जात असत, त्यामुळे साध्या सरळ बाबींमधून ब्रिटीश शासनाचा विरोध करण्याची भावना बळावली. अमळनेर येथील काशिनाथ निकम नावाचा शिंपी विदेशी वस्त्र शिवायलाही घेत नसे म्हणून त्याला काँग्रेस टेलर म्हणून ओळखले जावू लागले. यावरून खानदेशात राष्ट्रवादाचा सामान्य जनतेतही मोठ्या प्रमाणावर प्रचार आणि प्रसार झाला असे दिसून येते.

**फैजपूर कॉंग्रेस अधिवेशन आणि खानदेश –** १८८५ साली भारतीय आणि ब्रिटीश यांच्यात चर्चा विनीमय करण्यासाठी स्थापना झालेले भारतीयांचे राजकीय व्यासपीठ म्हणजे कॉंग्रेस ह्या कॉंग्रेसच्या स्थापनेपासून एकही अधिवेशन खेड्यात भरले नव्हते १९३६ साली भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे अधिवेशन खेड्यात भरविले पाहीजे अशी गांधीजींची इच्छा होती.[७] ह्या गोष्टीला बऱ्याच राकीय पुढाऱ्यांनी विरोध केला परंतू गांधीजी आपल्या मतावर ठाम असल्यामुळे खानदेशातील फैजपूर ह्या ठिकाणी अधिवेशन घेण्याचे ठरले. आजपर्यंत भरलेल्या एकाही अधिवेशनाला नव्हता एवढा जनसमुदाय ह्या अधिवेशनाला जमला होता. खानदेशातील शेकडो महिला ही त्या ठिकाणी हजर राहील्या ह्या अधिवेशनामुळे ग्रामिण व नागरीवाद संपूष्टात आला असे पंडीत नेहरू म्हणाले. सानेगुरूजींनी प्रचाराच्या माध्यमातून लोकांना एवढे प्रेरीत केले की हिंदुस्थानातुन सर्वात जास्त म्हणजे १०,००० हजार सभासद त्या काळात खानदेशातून कॉंग्रेसला जोडले गेले.[८] यावरून खानदेशातील जनतेत फैजपूर कॉंग्रेस अधिवेशनामूळे राष्ट्रवाद वाढीस लागला असे दिसून येते.

**चलेजाव चळवळ आणि खानदेश –** १९४२ च्या कॉंग्रेस आधिवेशनात ९ ऑगष्ट रोजी रोजी मुंबई येथील गवालिया टॅंक मैदानावर गांधीजी कोणती घोषणा करतात. याची संपूर्ण राष्ट्राला उत्सुकता लागलेली असतांना आदल्या दिवशी पहाटेच गांधीजींना ब्रिटीश सरकारने अटक केली. तुरूंगात जातांना महात्मा गांधीजींनी 'करा किंवा मरा' हा संदेश दिला मुंबईतील वातावरण अतिशय स्तब्ध होते. लोकांचा समुदाय मैदानावरून हटण्यास तयार नव्हता, तेव्हा ब्रिटीशांनी जमाव पांगविण्यासाठी गोळीबार सुरू केल्यावर जनसमुदाय पांगू लागला या समुदायात पश्चिम खानदेशातील बाळूभाई मेहता व शंकर विनायक ठकार हे कॉंग्रेसचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून हजर होते.[९]

संपूर्ण देशभरात गांधीजींच्या अटकेची बातमी वाऱ्यासारखी पसरली. खानदेशात करा किंवा मरा ह्या घोषणेचा हिंसक आणि अहिंसक गटाने आपपल्या परीने अर्थ लावून चळवळ सुरू ठेवली अमळनेर येथे रेल्वे स्टेशनला आग लावली गेली, मामलेदारचा टांगा जाळून टाकला. विविध हिंसक घटना घडल्या. नंदूरबार येथे शाळकरी मुलांनी ५ सप्टेंबर १९४३ रोजी ब्रिटीश सरकारचा निषेध करण्यासाठी शांततेत मिरवणुक काढली ह्या मिरवणुकीवर गोळीबार करून ब्रिटीशांनी शिरीषकुमार सह पाच शाळकरी मुलांची हत्या केली.[१०] हे प्रकरण पूर्ण हिंदूस्थानभर गाजले. लहानशा मुलांमध्येही राष्ट्रवादाची भावना ह्या काळात वाढलेली दिसून आली. चले जाव आंदोलनाच्या काळात क्रांतिकारी लोकांना पैसा अपुरा पडू लागला म्हणून सरकारी खजिना लुटण्याचे सत्र खानेदशात चालु झाले, त्यात चहार्डी व कमखेडा येथील खजिनालुटीत खुप कमी पैसा हाती लागला. एका गाडीतील प्रवाशांनी स्वत:च्या खिशातील पैसे देवु केले असता, क्रांतिकारकांनी सामान्य जनतेचा पैसा आपण लुटत नाही तर सरकारी पैसा घेतो असे सांगून पैसे परत केल्यामुळे जनतेच्या मनात क्रांतिकारकांविषयी प्रेमाची भावना वाढीस लागली. चिमठाणा येथील खजिना लुट ही देशातील खुप मोठी घटना होती. साडेपाच लाखाच्या ह्या खजिना लुटीत व्यंकटराव रणधीर, शंकर पांडू माळी, धोंडूराम तुकाराम माळी कृष्णराव विष्णू पवार, रामचंद्र भाऊराव पाटील, विष्णू सिताराम पाटील, शिवाजी शिवराम सावंत हे क्रांतिकारक पकडले गेले त्यांच्यावर शिंदखेडा आणि धुळे कोर्टात दोन वर्ष खटला चालला[११] ह्या खजिना लुटीने साऱ्या हिंदूस्थानात मोठी खळबळ उडवून दिली, भर दिवसा अनेक प्रवासी असलेल्या गाडीतुन दोन रायफलधारी पोलीस संरक्षणासाठी असतांना खजिना लुटला गेला या सारखी मोठी चपराक त्या काळात ब्रिटीशांसाठी दुसरी कोणतीही नसेल. विशेष म्हणजे क्रांतिकारकांना ही लुट करून ही पळून जाण्यासाठी सर्वसामान्य जनतेने मदत केली, कारण खानदेशातील जनतेच्या मनात राष्ट्रवादाची भावना बळावली होती ह्या राष्ट्रवादाची फलश्रुती म्हणजे भारताला मिळालेले स्वातंत्र्य होय, पण त्याचे आता सुराज्य होणे आवश्यक आहे.[१२]

**समारोप –**

ब्रिटीश शासनकर्त्यांच्या विरोधात देशात वाढलेली राष्ट्रवादाची भावना देशातील वेगवेगळ्या प्रांतातील सर्व जनतेच्या मनात बळावली होती. मुंबई ,दिल्ली, कलकत्ता, मद्रास सारख्या मोठ्या शहरांप्रमाणे रस्ते आणि विजेची कोणतीही सुविधा नसलेल्या बहुल आदिवासी जमाती असलेल्या खानदेशात वाढलेला राष्ट्रवाद असिम राष्ट्रप्रेमाचे किंवा राष्ट्रभक्तीचे प्रतिक मानावे लागले. खऱ्या अर्थाने भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कामात खानेदशात वाढलेला राष्ट्रवाद कारणीभूत ठरलेला आहे.

**संदर्भ**


१. पाटील संजय जिभाऊ, भारताचा इतिहास, अथर्व पब्लीकेशन्स धुळे, पृष्ठ क्र. ४५.
२. प्राचार्य डॉ. शहा जी. बी, खानदेशातील राष्ट्रवादाचा उदय आणि विकास, प्रशांत पब्लीकेशन्स प्रथम आवृत्ती २००४, पृष्ठ क्र. ८४
३. प्राचार्य डॉ. शहा जी. बी, खानदेशातील राष्ट्रवादाचा उदय आणि विकास, प्रशांत पब्लीकेशन्स प्रथम आवृत्ती २००४, पृष्ठ क्र. ८४
४. देव गणेश शंकर (संपादक) सुवर्ण महोत्सवी ग्रंथ, सत्कार्योत्तेजक सभा धुळेची स्थापना लेखक कृष्णाजी शंकर दिक्षित बी. अे. पृष्ठ क्र. ६
५. पाटील भी. ना. खानदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ, १९०० ते १९५०, प्रकाशक भूषण भिमराव पाटील , प्राध्यापक वसाहत पाचोरा प्रथम आवृत्ती २००५, पृष्ठ क्र. ४४०
६. माझा देश , स्वातंत्र्य सैनिक विशेषांक १५ ऑगष्ट १९५८, पृष्ठ क्र. ६
७. मंगळवेढेकर राजा, सानेगुरूजींची जीवनगाथा, साधना प्रकाशन पूणे द्वितीय आवृत्ती १९९२, पृष्ठ क्र. २१२
८. मंगळवेढेकर राजा, सानेगुरूजींची जीवनगाथा, साधना प्रकाशन पूणे द्वितीय आवृत्ती १९९२, पृष्ठ क्र. २१४
९. स्वतंत्र भारत, दिपावली विशेषांक , बेचाळीसचा स्वातंत्र्य लढा व साडेपाच लाखाची खजिना लुट , लेखक विष्णू सिताराम पाटील, पृष्ठ क्र. ३३
१०. साप्ताहिक भारत अंक ३८, २१ सप्टेंबर १९४३, पृष्ठ क्र. २
११. पांडे मधुकर निळकंठ , धुळे जिल्हातील स्वातंत्र्य लढा, प्रकाशक ऑगष्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती मुंबई पृष्ठ क्र. १३६
१२. प्राचार्य डॉ. शहा जी. बी, खानदेशातील राष्ट्रवादाचा उदय आणि विकास, प्रशांत पब्लीकेशन्स प्रथम आवृत्ती २००४, पृष्ठ क्र. ४९६

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# संस्कृती आणि साहित्य अनुबंध

**प्रा. डॉ. सुषमा विश्वरत्न तायडे (अहिरे)**
नुतन मराठा महाविद्यालय, जळगाव

**प्रा. डॉ. के. के. अहिरे**
पु. ओ. नहाटा महाविद्यालय, भुसावळ

**प्रस्तावना –**

'विश्वातील मानव हा एक होय.''विश्व हे एक कुटुंब आहे.''सभी भूमी गोपाल की' ही सुवचने ऐकावयास मिळतात. त्याचवेळी भारतीय, अमेरिकन, जपानी, तिबेटी शब्दही कानी पडतात. मानवा-मानवातच प्रादेशिक, भौगोलिक,राजकीय विभागणी झालेली आहे. गोलार्धापासून विभागणी होत होतएका चार-दोन खोपटे असलेल्या आदिवासी पाड्यांपर्यंत विभागणी केली जाते. त्या विभागणीत मूलतः 'संस्कृती' समाविष्ट असते. देश, राज्य, जिल्हा, तालुका, गाव यांच्यापासून जाती, व्यवसाय, उपजाती इत्यादीपर्यंत भिन्न-भिन्न संस्कारातून निर्माण झालेली भिन्न-भिन्न स्वरूपाची 'संस्कृती' असते. संस्कृती हा शब्दच सर्वसमावेशक आहे. तिचे निश्चितच स्पष्ट असे स्वरूप दर्शविणे अत्यंत कठीण आहे.'संस्कृती' हा शब्द अनेकदा आपल्या कानांवर पडत असतो. हा शब्द निरनिराळ्या प्रसंगी, निरनिराळ्या निमित्ताने आपण वापरत देखील असतो. परंतु ह्या शब्दाचा नेमका अर्थ काय ? हे चटकन सांगणे आपल्याला जमत नाही. बऱ्याचदा संस्कृती म्हणजे संस्कार असे आपण म्हणतो. पण त्यातून संस्कृतीचे नेमके व नेटके स्वरूप, तिची वैशिष्ट्ये व्यक्त होतात, असे म्हणता येत नाही. त्यामुळे संस्कृती म्हणजे काय ? तर 'संस्कृती' हा शब्द इंग्रजीतील 'Culture' आणि 'Civilization' यांचा पर्यायी प्रतिशब्द आहे. संस्कारांनी ज्याची सिद्धी झालेली असते ती संस्कृती. म्हणून संस्कार आणि संस्कृती या दोघांचा अविभाज्य संबंध आहे. हे दोन्ही शब्दसंस्कृतमधील 'सम + कृ' धातूपासून सिद्ध झालेले असतात. वाच्यार्थाने 'संस्कार' हा शब्द धर्म, नीती इत्यादी क्षेत्रापुरता मर्यादित राहिला आणि धर्मासह समग्र अंतर्बाह्य जीवनाच्या अवस्थेसाठी संस्कृती हा शब्द रूढ झाला. संस्कृतीचा अर्थ खूप व्यापक आहे.

**उद्देश/उद्दिष्टे –**

१) संस्कृती म्हणजे काय हे थोडक्यात स्पष्ट करता येईल.
२) संस्कृतीच्या स्वरूपाचे ज्ञान होईल.
३) संस्कृती आणि साहित्य यांचे परस्परसंबंध समजेल.
४) संस्कृती ही साहित्याच्या निर्मितीचे कारण कसे ठरते ते कळेल.

**विषय विवेचन –**

**व्याख्या –**

१) **इरावती कर्वे,** ''संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल विशिष्ट रीत म्हणजे संस्कृती होय.''[१]
२) **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,** ''मनुष्य व्यक्तीशः व समुदायशःजी जीवनपद्धती निर्माण करतो आणि जीवन साफल्यार्थ स्वतःवर व बाह्य विश्वावर संस्कार करून जो अविष्कार करतो. ती पद्धती व तो अविष्कार म्हणजे संस्कृती होय.''[२]
३) **डॉ. आ. ह. साळुंखे,** ''सम्यक कृती म्हणजे संस्कृती.''[३]
४) **हार्ट आणि हंट,** ''संस्कृती म्हणजे समाजाच्या शिकण्याच्या आणि समाज सहभागाच्या सर्व बाबी होत.''[४]
५) **हरस्कोव्हिट्स,** ''संस्कृती हा मानवनिर्मित पर्यावरणाचा भाग आहे.''[५]

'संस्कृती'ची व्याख्या करण्याचा अनेक विद्वानांनी प्रयत्न केला. अचूक, तंतोतंत व्याख्या करणे अत्यंत कठीण आहे. प्रत्येक व्याख्या संस्कृतीच्या लक्षणांचाच निर्देश करणारी होय. देश, काल, पर्यावरण, परिस्थिती, हवामान, अन्नपाणी, भूभाग इत्यादींचा मानवावर विशिष्ट प्रकारचा संस्कार होतो. होणारे संस्कार हा त्या संस्कृतीचा आत्मा ठरतो. शतकानुशतके होत जाणाऱ्या संस्कारातून संस्कृती विकसित होते. काळाच्या ओघात तिचे स्वरूप बदलत जाते. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संस्कृतीचे वहन होते. संस्कृतीला एक परंपरा लाभलेली असते. स्थल, काल, विज्ञान, सहवास,संपर्क, जागतिकीकरण, दोन वंश एकत्र येणे इत्यादींच्या प्रभावामुळे संस्कृतीत बदल होत जातो.फुलातल्या सुगंधाप्रमाणेच संस्कृतीचे मानवी जीवनात स्थान आहे. मानवी जीवनाचे 'संस्कृती' हे एक अभिन्न अंग आहे. माणूस आहे तेथे त्याची एक विशिष्ट आणि वैशिष्ट्यपूर्ण 'संस्कृती' आहे.

संस्कृती-संस्कृतीमधील आणि मानवा-मानवातील सुसंवादाचे साधन भाषा होय. भाषा मानवी संस्कृतीचा महत्त्वाचा घटक आहे.'भाषा' संदेशवहनाचा एक प्रकार आहे. संस्कृती आणि भाषा यांच्यातील अन्योन्य संबंधाविषयी श्री.डॉ. प्रल्हाद लुलेकर लिहितात,भाषेच्या माध्यमाने समूहजीवन आणि समूह जीवनातील ज्ञानसाधना,ज्ञान संघटनेतून मानवी संस्कृती साकार झाली. या मानवी संस्कृतीचे अनुभवविश्व अनुभवविश्वाने घडविलेले विचार, विचाराने निर्मिलेले कल्पनाविश्व, कल्पना विश्वातून साकारलेले भावनाविश्व म्हणजे भाषिक प्रारूपातील साहित्य आणि अन्य कला आहेत. संस्कृतीचे प्रदान केलेले सारे ज्ञान भाषेत समाविष्ट आहे.[६] भाषा आणि संस्कृती यांच्यातील संबंध अतूट आहे. भाषेच्या माध्यमातूनच साहित्यकलांची निर्मिती होते. भाषेमुळे संस्कृतीची जपणूक, संवर्धन, वहन, विकास होत असतो. विकसित प्रगत भाषेतूनच प्रगत साहित्य निर्मिती होते. मानवी संस्कृतीच्या विकासात भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जशी संस्कृती तसे साहित्य म्हटले जाते. तसेच 'जसे साहित्य तसेच संस्कृती' असे म्हटले जाते. श्री.रा.ग. जाधव म्हणतात,भाषा हे साहित्याचे माध्यम आणि साहित्यिक हा समाजाचा घटक. यामुळे संस्कृती निरपेक्ष अशी साहित्यकृती असणे शक्य नाही.[७]

**संस्कृती व साहित्य संबंध –** संस्कृती व साहित्य यांचा परस्परांशी असणारा संबंध हा तसा सर्वमान्य आहे. विविध भाषा व प्रदेश यांमधील साहित्याचा असणारा वेगळेपणा, त्यांची वैशिष्ट्यपूर्णतायांचा बहुतांशी संस्कृती भिन्नतेशीच संबंध असतो.'पाश्चात्य साहित्य', 'भारतीय साहित्य' असा भेद करीत असताना आपण सांस्कृतिक वैशिष्ट्यालाच प्राधान्य दिलेले असते. हे सहज ध्यानात घेण्यासारखे आहे. संस्कृती आणि साहित्य यांचे नाते दुहेरी असते. एका बाजूने साहित्य ही एक सांस्कृतिक शक्ती ठरुण संस्कृतीच्या जडणघडणीत सहभागी होत असते तर दुसऱ्या बाजूने संस्कृती ही साहित्याच्या निर्मितीचे कारण ठरत असते.

साहित्य म्हणजे ललित साहित्यकृती. हा एक जीवनानुभव असतो, असे म्हणता येईल. परंतु केवळ जीवनानुभव असणे एवढेच साहित्याचे वैशिष्ट्ये नसते. साहित्यातील अनुभवांच्या ठायी एक प्रकारची काल्पनिकता असते. ते कल्पनाप्राप्त अनुभव असतात किंवा कोणत्या ना कोणत्या प्रकारे त्यांच्या ठायी कल्पकतेचा प्रत्यय येत असतो. ज्या भाषेच्याद्वारे हे अनुभव व्यक्त होतात. ती भाषा केवळ वर्णनात्मक कधीच नसते. तर प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे मूल्यमापनाकडे तिचा कल असतो. थोडक्यात साहित्य म्हणजे भाषेच्याद्वारे व्यक्त झालेला वैशिष्ट्यपूर्ण जीवनानुभव आणि संस्कृती म्हणजे विशिष्ट मानवी समाजाची एकंदर जीवनपद्धती असे मानले तर सांस्कृतिक संदर्भाशिवाय साहित्य संभवतच नाही, असे म्हणता येते. मुळात कोणत्या अनुभवांना साहित्य म्हणावे याविषयीचे काही संकेत परंपरेने आलेले असतात. म्हणजे कोणत्याही समाजातील 'साहित्य' ही कल्पनाच त्या समाजाचे सांस्कृतिक अंग असते.

साहित्यिक आपल्या साहित्यनिर्मितीसाठी जीवनानुभवातूनच विषयांची किंवा अनुभवांची निवड करीत असतो. परंतु कोणत्याही समाजात येणारे हे जीवनानुभव म्हणजे त्या समाजाच्या संस्कृतीचे अंग ठरत असल्यामुळे साहित्याची सामग्रीच सांस्कृतिक ठरते. या मागणीतून साहित्य घडविण्याचे साधन म्हणजे भाषा आणि भाषा हे संस्कृतीचे एक प्रमुख वाहन असते. या भाषेने अंगभूत सामर्थ्य व शक्ती लेखकाला सांस्कृतिक वारसा म्हणून प्राप्त होत असतात. या भाषेतील इतर साहित्यिकांनी योजलेली वृत्ते, योजलेले छंद, अलंकार निर्माण करण्याच्या पद्धती इत्यादी साधने लेखकाला परंपरेने प्राप्त होतात. उदा. ओवी हा अस्सल मराठी छंद व अभंग हा रचनाबंध सांस्कृतिक वारसा म्हणून मराठी कवींनाच प्राप्त होऊ शकतो.ओवी, अभंगाचे सामर्थ्य मराठी कविता जेवढे आणि जसे जाणवते तेवढे आणि तसे ते इतरांना जाणवण्याची शक्यता नाही. संस्कृतीच्या अभिव्यक्तीचे भाषिक रूप म्हणजे साहित्य असे म्हणण्यात साहित्य आणि संस्कृती यांचा अन्योन्य संबंध स्पष्ट होतो.

लेखन व मुद्रण कलांनी मानवी जीवनात पर्यायाने संस्कृतीत जीवन क्रांती घडविली. मानवाच्या ज्ञात इतिहासाचा शोध त्याच्या लेखनकलेचा काळापासून धरला जातो. मानवी संस्कृतीचा विकासाचा आढावा निश्चित स्वरूपात घेता येतो. प्राचीन काळात जागतिक पातळीवर सर्वत्र सांस्कृतिक समाजरचना, समाजसंस्कृती सारखीच होती. समाजात प्रगत–अप्रगत, राबणारे–राबवणारे, ज्ञानी–अज्ञानी लोक आहेत. त्याचाच परिणाम अशा समाजरचनेतले साहित्यही अत्यंत कमी दर्जाचे निर्माण होणे सहाजिकच होते. मानवाच्या बुद्धीची, ज्ञान–विज्ञानाची प्रगती, पर्यायाने संस्कृतीचा विकास त्यावेळी श्रेष्ठ साहित्याची निर्मिती होते.

आधुनिक काळात विज्ञान युग निर्माण झाले. उद्योग प्रधान संस्कृती निर्माण झाली. मानवी जीवन भौतिकवादी झाले. विविध देशात क्रांत्या झाल्या. इंग्लंडची राज्यक्रांती, रशियन–अमेरिकन राज्यक्रांती त्याचप्रमाणे लोकशाही, समाजवाद, साम्यवाद इत्यादी तत्त्वप्रणाली निर्माण झाल्या.फ्राइड,युंग, डलर यांचे मानसशास्त्रीय संशोधन, राष्ट्रवाद, व्यक्तिवाद, नाझीवाद, पहिले महायुद्ध, दुसरे महायुद्ध इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम, प्रभाव होऊन समाजातील वर्गकलह, वर्णकलह, मालक–नोकर भेद, उच्च–कनिष्ठ–मध्यमवर्ग भेद या सगळ्यांच्या प्रतिक्रियांचे स्वरूप साहित्यातून दिसू लागले. साहित्यात विविध प्रणाली, अभिव्यक्तीची प्रयोगशीलता, विविध प्रवाह, चळवळी निर्माण झाल्या. तात्पर्य 'जशी संस्कृती तसे साहित्य' हे म्हणणे अतिशयोक्त ठरणार नाही.

साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्यात अन्योन्य संबंध असतो. जीवनाचे सर्व विषय, सगळी अंगे साहित्याशी संबंधित असतात. साहित्य हे राष्ट्रीय विचार, परंपरा, सामाजिक विचार, समाजातील महत्वाच्या घटना, प्रसंग, चळवळी यांच्याशी अविभाज्यपणे एकरुप झालेले असते. साहित्य समाजाच्या, राष्ट्राच्या, संस्कृतीच्या अस्मितेचा एक आविष्कार होय. संस्कृती–साहित्य समाजाविषयी श्री रा. ग. जाधव म्हणतात की,वाङमयीन संस्कृती म्हणूनच समग्र संस्कृतीचीच पण एक स्वायत्त अशी सतत घडत राहणारी उपसंस्कृती आहे. साहित्य हे समाजाच्या सर्जनशीलतेचे एक सुंदर रूप आहे. सामर्थ्यवान रूप आहे. शक्तिरूप आहे आणि ते समाजाचे श्रद्धास्थानही आहे. समाज आणि संस्कृतीच्या अनेक गोष्टींची अपेक्षा साहित्याकडून करणे स्वाभाविक ठरते. पण त्या अपेक्षांची परिपूर्ती करण्यासाठी साहित्याने आपली प्रतिष्ठा व स्वायत्तता गमावण्याची गरज नाही.८ संस्कृतीही परिवर्तनशील असल्यामुळे साहित्यातही परिवर्तने घडतात. संस्कृती –साहित्य–समाज हे घटक परस्पराश्रयी, परस्पर संबद्धआहेत. साहित्यातून घडणारे समाजदर्शन म्हणजेच समाजसंस्कृती, व्यक्तींची संस्कृती दर्शन घडते.

साहित्य हा समाजाचा आरसा आहे. साहित्य म्हणजे समाजाचे प्रतिबिंब होय. त्याचप्रमाणे 'समाज जीवनाच्या आशयातील कलाकृतीला जन्ममूल्यच प्राप्त होत नाही' हे पॉल कले यांचे म्हणणे समाज आणि साहित्य यांचा संबंधच अधिक यथार्थपणे मांडून दाखवीत आहे. साहित्यिक हा मानव प्राणी समाजामध्ये जन्माला येतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वाला समाजामध्ये आशय आणि आकार प्राप्त होतो. समाजाच्या संस्कारशाळेतच त्याच्या मनाला नाना पैलू पडत असतात. साहित्यात माणसाचा स्वभाव, कृती,उक्ती, भावना, विचार, कल्पना यांची अभिव्यक्ती असते. साहित्य ही एका अर्थी अभिव्यक्ती असते. तसेच साहित्य हे संप्रेषण असते. भावना, विचार व कल्पना प्रकट करताना त्यासंबंधी विधान केलेले असते अथवा घटना–प्रसंगादीतून त्यांचे प्रकटीकरण होते. घटना, प्रसंग, व्यक्ती, कृती,उक्ती, भावना, विचार व कल्पना इत्यादी घटकातून अनुभव सिद्ध होतो. भाषिक रूपातून या विविध घटकांची संघटना होते. तेव्हा अनुभवाच्या अमूर्त स्वरूपाचे मूर्तिकरण होते. म्हणून साहित्य म्हणजे अमूर्त अनुभवाचे भाषेद्वारे होणारे मूर्तिकरण होय.

साहित्य व समाज यांच्या परस्परसंबंधाला आणखी एक परिमाण असते. सामान्यपणे समाजाचे भूषण किंवा अलंकार म्हणून साहित्याकडे समाज बघत असतो. आपल्या रसिकतेचे, कलाभिरुचीचे संवर्धन करणारी एक निर्मिती म्हणून सामान्यपणे साहित्याकडे आदरपूर्वक पाहिले जाते. कधी अलंकार म्हणून तर कधी अस्त्र म्हणून समाज साहित्याकडे बघत असतो. समाज ज्या ऐतिहासिक टप्प्यावर उभा असतो, त्या टप्प्यावर कालमानाच्या ज्या प्रेरणा असतात.त्यांचा प्रभाव समाजाच्या साहित्यविषयक भूमिकेवर पडत असतो. तसेच समाजाच्या दृष्टीने साहित्य हे क्वचितच एक साध्य म्हणून संमत केले जाते. कुठल्या तरी जीवनमुल्याचे एक साधन म्हणूनच समाज प्राधान्याने व प्रसंगपरत्वे साहित्यीकाकडे बघत असतो. साहित्यिक हा समाजातच जन्मतो

पण समाजाजवळ नसलेली, समाज देऊ शकत नसलेली प्रतिभेची शक्ती तो घेऊन येतो. साहित्यिकाचे मूलभूत स्वातंत्र्य म्हणजे प्रतिभाशक्ती स्वातंत्र्य होय. स्वातंत्र्याला मर्यादा वा अन्य परिमिती असत नाहीत. साहित्यिकाचा समाज संस्कृतीमुळे पिंड घडत असतो. साहित्यिकाचे साहित्य समाजसंस्कृतीचा आरसा असतो. म्हणून साहित्य आणि संस्कृतीचा अन्योन्य अनुबंध प्रस्थापित होत असतो.

**निष्कर्ष –**

१) संस्कृतीतील विविधतेमुळेच मराठी साहित्यालाही विविध सांस्कृतिक पार्श्वभूमी लाभलेली आहे.
२) संस्कृतीची एकच व्याख्या करता येत नाही.
३) संस्कृती ही एक व्यापक संकल्पना आहे.
४) मानवी कृती, उक्ती व वर्तन यातून संस्कृती आकाराला येत असते.
५) संस्कृतीतील काही भाग परंपरागत असला तरी संस्कृती निम्न परिवर्तनीय आहे.
६) संस्कृती ही साहित्याच्या निर्मितीला कारणीभूत ठरत असते तर संस्कृतीच्या विकसनात साहित्याचा वाटा असतो.
७) संस्कृती आणि साहित्य यांचे संबंध अन्योन्य स्वरूपाचे असतात.

**संदर्भ**

१) डॉ.बी.एन. पाटील – प्राचीन महाराष्ट्र वाङमय वैभव, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, पृ.१५.
२) उपरोक्त, पृ.१५.
३) उपरोक्त, पृ.१६.
४) उपरोक्त, पृ. १६.
५) उपरोक्त, पृ. १६.
६) डॉ. प्रल्हाद लुलेकर – साहित्याचे सांस्कृतिक संचित, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, नोव्हेंबर २००५, पृ.१८.
७) श्री रा.ग. जाधव – मराठी वाङमयाचा इतिहास, खंड ७,भाग १ ते ४, पृ.५०.
८) उपरोक्त, पृ. २३.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# जागतिकीकरण आणि उत्तम कांबळे यांच्या कवितेतील महानगरीय जाणीव

**प्रा. सौ. ललिता सिद्धार्थ हिंगोणेकर**
ज.जि. म. वि. प्र.सह. समाजाचे
श्री. सा.स. पाटील कला, श्री. भाऊसाहेब टी.टी. साळुंखे वाणिज्य आणि श्री. जी. आर. पंडित विज्ञान महाविद्यालय, जळगाव

भारतात खाजगीकरण, उदारीकरण आणि त्या जागतिकीकरणाचे नवीन औद्योगिक धोरण २४ जुलै १९९१ रोजी स्वीकारण्यात आले. भारत हा कृषीप्रधान देश असल्याने याचे विध्वंसक परिणाम दिसत आहेत. जागतिकीकरण या संकल्पनेचा विचार प्रामुख्याने आर्थिक संदर्भात केला जात असला तरी या संकल्पनेचा संबंध मानवी जीवनाच्या अनेक अंगांची आहे. मानवी जीवनावर चांगले वाईट परिणाम करणारी ही संकल्पना आहे. समाज, साहित्य, संस्कृती, कला, विज्ञान, धर्म ,शिक्षण, आरोग्य, रोजगार या मानवी जीवनावर जागतिकीकरण या संकल्पनेचा प्रभाव पडताना दिसत आहे.

जागतिकीकरणामुळे संपूर्ण उपेक्षित समाजाचे जीवन-मरणाचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. 'जागतिकीकरण म्हणजे विकसित राष्ट्रांनी जाणीवपूर्वक स्वतःकरिता बाजारपेठ खुली व्हावी यादृष्टीने स्वीकारण्यास लावलेले जागतिक धोरण होय'. इंग्लंड, अमेरिका, युरोप यासारख्या भांडवलशाहीचा पुरस्कार करणाऱ्या साम्राज्यवादी देशांनी आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी हा एक प्रकारे कट रचलेला आहे. जागतिकीकरणाची व्यवस्था सामान्य माणसाच्या जीवनाला उद्ध्वस्त करीत आहे. जागतिकीकरणाचा प्रचंड परिणाम समाजातील उपेक्षित घटकांवर होत आहे. शेतमजूर, शेतकरी, कामगार ,अकुशल कामगार, बाल कामगार, दलित, आदिवासी इत्यादी घटकांवर याचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम होत आहेत.

उत्तम कांबळे जागतिकीकरण या संकल्पनेबद्दल म्हणतात, जागतिकीकरणामुळे गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी अधिक रुंदावत आहे नव्या नव्याने विषमता जन्माला येत आहेत, 'जो सक्षम असेल तोच जगेल' असे सांगणारी ही व्यवस्था गरिबांचे अधिक शोषण करणारी आणि त्याला अधिक अस्थिर बनविणारी आहे.

जागतिकीकरणामुळे आर्थिक क्षेत्राबरोबर सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय इत्यादी क्षेत्रावरही परिणाम होत आहे .तसेच साहित्यावर, भाषेवरसुद्धा त्याचा परिणाम दिसू लागलेला आहे.आज जागतिकीकरण अटळ झाले आहे आणि त्यापासून कोणालाही वेगळे राहणे शक्य नाही. प्रस्तुत शोधनिबंधात जागतिकीकरणातील मराठी कवितेत उत्तम कांबळे यांच्या कवितेत महानगरीय जाणिवा कशा व्यक्त झाल्या आहेत ,त्याचे स्वरूप काय आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

**महानगरीय जाणीव –** शहरी व महानगरीय जीवनाशी, समस्यांशी निगडीत जाणिवेला महानगरीय जाणीव असे म्हटले जाते. महानगरीय जीवनामध्ये वास्तव करणारा कवी महानगरीय जाणीवेशी मोठ्या ताकदीने समरस होऊ शकतो. कारण तो ते जीवन जगत असतो आणि डोळसपणे बघत असतो. त्यामुळे महानगरीय शब्दरचना मोठ्या प्रमाणात आले म्हणजे ती महानगरीय कविता होत नाही, तर त्या कवितेत महानगरीय जीवनाचं जाणिवेसह प्रतिबिंब उमटणे गरजेचे आहे. वसंत पाटणकर म्हणतात, महानगरातील विशिष्ट परिस्थितीमुळे येथे दीर्घ काळ वास्तव्य करणाऱ्या माणसाची मानसिक घडण बदलते. या विशिष्ट मानसिक घटणीलाच आपण महानगरीय संवेदनशीलता म्हणतो. वसंत पाटणकर यांचे हे म्हणणे महानगरीय जाणीवेबद्दल भाष्य करते. मराठी कवितेत निखळ महानगरीय जाणिवेने लेखन करणारे कवी कमी आहेत. त्यासंदर्भात नितीन रिंढे म्हणतात, महानगरी परिघाबाहेरचे अरुण काळे, भुजंग मेश्राम, प्रवीण बांदेकर, वीरधवल परब, अजय कांडर किंवा महानगरातले वर्जेश सोळंकी, नितीन कुलकर्णी, महेंद्र भवरे हे कवी जागतिकीकरणाला सामोरे जाताना अत्यंत चिकित्सक दृष्टिकोन बाळगून आहेत. हे त्यांच्या कवितेतून जाणवते. त्यांच्या कवितेतून त्यांचे दृष्टिकोन, भूमिका उभ्या राहतात. नितीन रिंढे यांचे म्हणणे जागतिकीकरणासोबत महानगरीय जाणवेबद्दल भाष्य करताना दिसते. म्हणजेच महानगराबाहेरचे व महानगरीय कवी जागतिकीकरणाशी तेवढ्याच ताकदीने भिडताना दिसतात. फरक फक्त त्यांच्या भूमिका आणि दृष्टीकोन यामध्ये दिसून येतो.

**उत्तम कांबळे यांच्या कवितेतील महानगरीय जाणीव –** १९९० नंतर लिहिल्या जात असलेल्या समकालीन कवितेला अन्य संदर्भासह जागतिकीकरणाचा विशेष संदर्भ आहे. नव्वदोत्तर कवितेत समकाळात घडून गेलेल्या ताज्या महानगरीय घडामोडींचाही संदर्भ आहे. या महानगरीय घडामोडीमध्ये मानवी भाव-भावना, संवेदना सहवेदना, वैचारिक दृष्टी, जीवनविषयक दृष्टी, आपले शेजारी, कुटुंबातील आजी-आजोबा, आई-वडील, काका-काकी, बहिण- भाऊ, तसेच मित्रत्व या सगळ्यांकडे पाहण्याच्या दृष्टीत फार मोठा बदल झालेला दिसतो. नव्वदोत्तर कालखंडातील ही महानगरी संवेदनशीलता प्रामुख्याने श्रीधर तिळवे, हेमंत दिवटे, मंगेश नारायण काळे, संजीव खांडेकर ,वर्जेश सोलंकी, महेंद्र भवरे, मन्या जोशी, सलिल वाघ, सचिन केतकर, अविनाश गायकवाड यांच्या कवितेत निखळ स्वरूपात प्रकट होते. तसेच भुजंग मेश्राम, अरुण काळे, संतोष पवार, दिनकर मनवर, वीरधवल परब, अजय कांडर, उत्तम कांबळे, प्रज्ञा लोखंडे, मल्लिका अमर शेख, दासू वैद्य, प्रवीण बांदेकर, अजीम नवाज राही, लोकनाथ यशवंत, धम्मपाल रत्नाकर, रोहन नागदिवे यांच्या कवितेत जाणीव किंवा सहजाणिवेने ही महानगरीय संवेदना व्यक्त होताना आढळते.

नव्वदोत्तर कालखंडातील उत्तम कांबळे हे एक कवी आहेत. त्यांच्या गद्य लेखनातही कवित्वाची जाणीव होते. त्यांचे 'जागतिकीकरणात माझी कविता 'आणि 'नाशिक तू एक सुंदर कविता' हे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे संपूर्ण जग जवळ आले आहे. जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात संपर्क साधणे सहज शक्य झाले आहे. याचा परिणाम महानगरात जीवन जगणाऱ्या माणसांवर होऊ लागला. माणूस माणसावर विश्वास न ठेवता यंत्रमानवावर विश्वास ठेवू लागला हे सत्य उत्तम कांबळे 'जागतिकीकरणात माझी कविता' या कवितेमध्ये मांडताना म्हणतात –

सारं जग जवळ आलंय म्हणतात

पण माणसं माणसांपासून
दूर धावताहेत
रोबोटच्या गळ्यात
गळा घालताहेत
माणसाऐवजी कुत्र्यांवर
कुत्र्याऐवजी यंत्रावर
विश्वास टाकताहेत

महानगरीय जीवनाचा प्रभाव म्हणून माणसाने आपल्या जाणिवा बदलल्या. व्यापक असलेल्या जाणिवा संकुचित बनविल्या. त्यामुळे त्याला माणसापेक्षा यंत्र जवळची वाटू लागली. म्हणून तो माणसाऐवजी कुत्र्यांवर किंवा कुत्र्यांऐवजी यंत्रावर विश्वास ठेवायला लागला. ही महानगरीय जीवनाचे मर्यादा कवी आपल्याला करून देतात.

जागतिकीकरणाच्या या रेट्यात महानगरीय माणसाच्या संवेदना अतिशय बोथट व्हायला लागल्या आहेत. माणसातील माणुसकी नष्ट होत चाललेली आहे. संगणकामुळे माणूस एकमेकांपासून दूर चालला आहे आणि शेवटी माणूस संगणकाच्या खांद्यावरच शेवटचा श्वास घेईल अशी अवस्था निर्माण होत असल्याचे चित्र उत्तम कांबळे यांनी आपल्या कवितेत रेखाटले आहे. ते म्हणतात –

कुणी सांगावं...
नव्या शतकातला माणूस
संगणकाच्या खांद्यावर
मान ठेवून
शेवटचा श्वास घेईल

अशा प्रकारे शेवटचा श्वास घेतलेल्या माणसांना संगणक श्रद्धांजली वाहताना ते म्हणतात...

आता आमचे नम्र निवेदन
माणसाकडून मिळालेला मेंदू
दयाळूपणाने वापरावा
माणसासाठी लढेल
असा माणूस पुन्हा
जन्माला घालण्याचा
प्रामाणिक प्रयत्न करावा
नामशेष होऊ पाहणाऱ्या
मनुष्य प्राण्याला
हीच खरी श्रद्धांजली

माणसांच्या जगात संगणकाने केलेले आक्रमण, त्यामुळे माणसांची झालेली स्थिती उत्तम कांबळे यांनी अतिशय मार्मिकपणे रेखाटलेली आहे. माणूस नष्ट झाल्यास संगणकच शोकसभेत भाषण देतील. माणसा कडून मिळालेल्या मेंदूचा दयाळूपणे वापर करण्याची हमी देतील. माणसासाठी लढेल असा माणूस पुन्हा निर्माण करू हीच माणसाला खरी श्रद्धांजली ठरेल.

उत्तम कांबळे यांनी आपल्या कवितेतून माणूसपण हरवत चाललेल्या माणसांचे चित्र रेखाटले आहे. इथली माणसं माणसांसाठी कधीच लढली नाही. याची जाणीव त्यांना आहे म्हणून ते म्हणतात...

पृथ्वीवरच्या पाठीवरील
माणूस नावाची जमात
किती चिवट होती
किती गूढ होती
ती खूप लढवय्यी होती
ती धर्मासाठी लढली
ती जातीसाठी लढली
प्रदेश आणि पंथासाठीही लढली
दुःख एवढंच की, माणसासाठी
कधीच लढली नाही

धर्मासाठी, जातीसाठी, प्रदेश आणि पंथासाठी लढणारी माणसे माणसासाठी कधीच लढत नाहीत. त्यामुळे हा अनर्थ ओढवला आहे माणसे जात, धर्म, पंथ, प्रदेश यामुळे अधिक आक्रमक होत आहेत.

जागतिकीकरणातून भांडवली व्यवस्था लादण्याची प्रक्रिया सुरू आहे. माणसांचे श्रम विकत घेणारी कंत्राटी पद्धत आली आहे. माणूस माणसाचे शोषण करीत आहे. शोषणामुळे माणसांचे अस्तित्व संपते आणि अप्रतिष्ठा होते. अशा स्थितीचे वर्णन करताना उत्तम कांबळे म्हणतात...

श्रमाबरोबर सारा माणूसच
विकत घेऊ पाहणारी दूनिया
परवा
ती गुलाम विकत घेत होती
काल
भूदास विकत घेत होती आज
श्रमदास विकत घेत आहे

ही प्रवृत्ती जागतिकीकरणातून आलेल्या भांडवली व्यवस्थेने निर्माण केलेली आहे. कंत्राटदार माणसे विकत घेतो. माणसांचा हा अनाचारी बाजार अन्यायी आहे. म्हणून उत्तम कांबळे यावर विद्रोही भूमिकेतून ही भांडवलशाही शोषण व्यवस्था संपवण्याची भाषा करतात. ते म्हणतात...

तू असं कर
दिवसाचा रोजगार घे
आणि रात्री माझ्याकडे ये ....
कंत्राटदाराचं वाक्य संपण्यापूर्वीच
कवितेने त्याच्या गालावर
जीव एकवटून
थप्पड मारली!
सायरनपेक्षा
मोठा आवाज निघाला
बाजारातल्या
बाया-बापड्यांच्या गालावर
दिवसा चंद्र उगवला

समाजातील शोषक आणि भांडवलदारांविरुद्ध हा विद्रोह आहे. ग्राहक शोधणाऱ्या व्यवस्थेला मारलेली ही थप्पड आहे.

अशा या भांडवलशाही व्यवस्थेत जागतिकीकरणामुळे महानगरातील माणसांच्या संवेदना बोथट होत चालल्या आहेत. त्यांचे जगणे लाचारीचे झालेले आहे. एकीकडे माणसाने विज्ञान-तंत्रज्ञानाने प्रगती केली. संगणक, एटीएम, पासवर्ड, ई-मेल, मोबाईल, इम्पोर्ट, एक्सपोर्ट यासारखे प्रगतीचे नवनवीन दालने खुली होत असतानाच माणसाचा भाकरीचा संघर्षही अटळ आहे. वर्तमान परिस्थितीत सामान्य माणसाने कसे जगावे? हा प्रश्न निर्माण झालेला आहे म्हणून उत्तम कांबळे म्हणतात...

भाकरी
छीनाल असते
घोड्याची लगाम असते
टाटाची गुलाम असते भाकरी
मारवाड्याचा माप असते
पोटात लपलेलं पाप असते
युगायुगाचा शाप असते
भाकरी
इतिहास असते आणि भूगोलही
गळ्यातला फास आणि श्वासही
कोडं भरलेलं आकाश आणि भासही

भाकरीचा हा संघर्ष सामान्य माणसासाठी अटळ आहे. वर्तमान बदलण्यासाठी इतिहासाने आपल्याला एक भूमिका दिली आहे. त्या भूमिकेशी प्रामाणिक राहावे लागेल. त्यासाठी आपल्या सामर्थ्यानुसार कृतिशील व्हावे लागेल. असे उत्तम कांबळे यांना वाटते.

बिस्लेरीच्या बाटलीतून पाणी पिणे ही महानगरीय संस्कृती आणि प्रतिष्ठा झाली आहे. हे भीषण वास्तव रेखाटताना उत्तम कांबळे म्हणतात...

आमच्याच पंचक्रोशीतलं पाणी
टँकरमधनं नेत्यात३
बाटलीत भरून पाठवत्यात
दहा बारा रुपयाला एक बाटली
या भावानं
आम्हालाच घ्या म्हणत्यात
बाटलीभर पाण्यात
एवढं पैकं असतील

हे आम्हाला कधी समजलंच नाही

निसर्गाने मानवाला दिलेले पाणी आज महानगरातील झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्यांना मिळेनासे झाले आहे. कारण या पाण्यावर कोकाकोला, पेप्सी यासारख्या कंपन्यांनी ताबा मिळविला आहे. उर्वरित पाणी बिस्लेरीच्या बाटलीत बंद होत आहे. महानगरी जीवनाच्या खोट्या प्रतिष्ठेसाठी हे पाणी वेगवेगळ्या कंपन्या बिस्लेरीच्या बाटल्या भरून आपला धंदा जोरात चालवत आहेत .या संदर्भात उत्तम कांबळे म्हणतात,एकीकडे घोटभर पाण्यासाठी १५ रूपये मोजणारे आणि दुसरीकडे टँकरची वाट पाहणारे ग्रामस्थ अशी एक विलक्षण लढाई आहे. ही लढाई जशी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे निर्माण झाली आहे तशीच ती महानगरीय संस्कृतीच्या खोट्या प्रतिष्ठेमुळे फोफावलेली आहे. उत्तम कांबळे यांचे भाष्य म्हणूनच या दोन्ही प्रक्रियेवर प्रकाश टाकते.

महानगरीय संवेदनशीलतेविषयी प्रतिक्रिया व्यक्त करताना वसंत पाटणकर म्हणतात,कवींच्या महानगरीय वास्तवाला झालेल्या प्रतिक्रियांचे साधारणपणे तीन गटआहेत. यातील पहिल्या गटातील महानगरीय वास्तवाला झालेली प्रतिक्रिया ही अस्वस्थतेचे आहे. तेथे या महानगरीय वास्तवात बदलणाऱ्या मानवी जगण्याबद्दलची चिंता, तडफड, आकांत मोठ्या प्रमाणात आहे, दुसऱ्या गटातील प्रतिक्रिया ही या परिस्थितीचे विडंबन करणारी आहे. येथे अनेकदा आत्मविडंबनही पहावयास मिळते. तिसरी प्रतिक्रिया ही परिस्थितीबद्दल आकांत व्यक्त करीत नाही किंवा या परिस्थितीचे विडंबनही करीत नाही. ती महानगरीय वास्तवामुळे मानवी जीवनात होणाऱ्या बदलांचा त्यातील वेगवेगळ्या सगळ्या अवस्थांचा वेध घेते. माझ्या मते, वसंत पाटणकर यांनी केलेल्या भाष्यावर आधारित तीनही प्रकारची प्रतिक्रियात्मक कविता उत्तम कांबळे यांच्या कवितेतून दिसते.

**सारांश –**

जागतिकीकरणातील मराठी कवितेचा कल महानगरीय जीवनाकडे झुकलेला दिसतो. उत्तम कांबळे यांच्या कवितेतूनही ही महानगरीय जाणीव दिसून येते. त्यांच्या कवितांमधून माणसाला जाणवणारे महानगरातील एकाकीपण, तुटलेपणा, दांभिकता, स्वार्थीपणा, संवादशून्यता, संवेदनहीनता, अमानुषता, यांत्रिकपणा, यंत्राचे प्राबल्य, संगणकाचे वाढते प्रस्थ चित्रित झालेले आहे. जागतिकीकरणामुळे माणूस माणसापासून दुरावत आहे. माणूसकी नामशेष होत चालली आहे. हीच भावना उत्तम कांबळे यांनी आपल्या कवितांमधून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि ते महत्वपूर्ण आहे. त्यांच्या कवितेतून महानगरीय जीवन समर्थपणे प्रकट झालेले आहे.

**निष्कर्ष –**

१) नव्वदोत्तर कालखंडातील कवींच्या कवितेत महानगरीय जीवन केंद्रस्थानी असल्याचे दिसून येते.
२) उत्तम कांबळे यांच्या कवितेत महानगरीय संवेदनशीलतेचा अविष्कार वेगवेगळ्या प्रकारे आणि वेगवेगळ्या स्वरूपात साकारला आहे.
३) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे घडून आलेल्या प्रचंड सामाजिक बदलाचे प्रतिबिंब उत्तम कांबळे यांच्या महानगरीय कवितेत उमटलेले आहे.
४) बदलत्या महानगरीय जाणिवेमुळे नात्यांमधील जिव्हाळा, प्रेम, आपुलकी संपत चालली असून मानवी नाते वस्तुत परावर्तित होत आहे. संस्कृतीचे बाजारीकरण होत आहे आणि मानवी संवेदनेची धार बोथट होऊन ती संवेदना यंत्रमानवामध्ये बदलत आहे.
५) महानगरातील माणूस आत्यंतिक स्वयंकेंद्री, स्वार्थी बनला. या स्वार्थामुळे व अमाणूष जगण्यामुळे मानवी मूल्यांचा ऱ्हास झालेला दिसतो.
६) महानगरीय जीवनामुळे माणसांना वस्तू सोबत खेळण्याची, वस्तूंना निष्ठा अर्पण करण्याची ,वस्तूला सर्वस्व मानण्याची सवय जडलेली दिसते .
७) उत्तम कांबळे यांच्या कवितेत महानगरीय संवेदना, जाणीव आणि सहजाणिवेसह समर्थपणे प्रकट झालेल्या आहेत.

**संदर्भ**

१) जागतिकीकरणात मराठी कविता – संपादक, उत्तम कांबळे, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई
२) वाघमारे जनार्दन – साहित्य: संकल्पना, वाद आणि चळवळी (संपादक – डॉ. मनोहर जाधव – समीक्षेतील नव्या संकल्पना )
३) गायकवाड शरद व इतर (संपा.) 'जागतिकीकरण आणि मराठी साहित्य' स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे
४) निवडक उत्तम कांबळे – संपादन प्रा. डॉ. प्रल्हाद जी. लुलेकर, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद
५) जागतिकीकरण आणि मराठी भाषा – संपादक डॉ.सौ. सूर्यकांता अजमेरा,प्रा. विनोद उपर्वट ,अथर्व पब्लिकेशन्स, धुळे

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# कोकायना कोंबडा कुकुचकु या अहिराणी गीताचा आशय आविष्कार विशेष

**प्रा रत्नाकर खंडू कोळी**
संशोधक विद्यार्थी
नूतन मराठा महाविद्यालय जळगाव

**प्रस्तावना –**

अलिकडच्या काळात यु टयुब च्या माध्यमातून अनेक अहिराणी, भिलाऊ, आणि विविध भाषेतील अनेक गाण्यांची निर्मिती होताना दिसत आहे. मनोरंजन आणि विरंगुळा हा जरी प्रधान हेतू या निर्मितीमागील असला तरी अनेक गाण्यातून सामाजिक जाणिवा, कौटुंबिक नातेसंबंध, प्रीतिभाव, देशभक्ती, निसर्गप्रेम, कष्टकरी जीवन, कृषी जीवन अशी जीवनमूल्ये आविष्कृत होताना तसेच जोपासली जाताना दिसत आहेत. सदर निबंधात चारा विकून व शिकार करुन आपली उपजीविका भागविणाऱ्या जात समुहाचे नेतृत्व करणाऱ्या नायक नायिकांचा दिनक्रम कसा सुरु होतो, त्यांची जगण्यासाठी चाललेली धडपड आणि त्या धडपडीत देखील आनंदाने गाणे गात निर्माण होणारा उज्वल भविष्याचा आशावाद याचे चित्रण दादासाहेब वाघ लिखीत तथा त्यांनीच गायिलेल्या, हेमंत चौधरी निर्मित/दिग्दर्शीत, राजू शिरसाट यांनी संगीतबद्ध केलेल्या तसेच प्रविण ठाकूर व उपासना कापुरे यांच्या मुख्य भुमिकेत चित्रीकरण झालेल्या आणि कृणाल म्युझिक या मराठी कॅसेट कंपनीने ''माले लगीन करानं यंदा'' या २००७ मध्ये तयार केलेल्या अहिराणी अल्बममधील ''कोकायना कोंबडा कुकुचकु'' या अहिराणी गीतातून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

सदर गीत सिद्धार्थ निकम या नावाने अकाउंट असलेल्या यु टयुब चॅनल वर देखील १३ मार्च २०१८ रोजी अपलोड करण्यात आले आहे.

**उद्देश –** मराठी साहित्यक्षेत्रात मराठी भाषेतून अथवा मराठीच्या इतर समृद्ध बोलीभाषेतून लिहिल्या गेलेल्या कथा, कविता, कादंबरी, नाटक आणि इतर कलाकृतींवर संशोधनात्मक चर्चा तथा संशोधन होताना दिसून येते तद्वतच खानदेशातील अहिराणी बोलीभाषेतून लिहिल्या जाणाऱ्या गीतांत देखील सामाजिक आणि वाङ्मयीन जीवनमूल्ये दडलेली आहेत, त्या गीतांनी देखील एक स्वतंत्र अशी ओळख निर्माण केली आहे आणि त्यांचा देखील संशोधनाच्या अंगाने विचार व्हावा एवढाच एक प्रामाणिक प्रयत्न सदर लेखनाच्या निमित्ताने सांगता येईल.

कोकायना कोंबडा कुकुचकु या गीतातील नायक आणि नायिका यांचा चारा विकण्याचा व्यवसाय आहे, या व्यवसायाला जोड व्यवसाय म्हणून शिकार करुन आपली दिनचर्या भागविणाऱ्या एका ग्रामीण भागातील दांपत्याचा संघर्ष प्रस्तुत गीतातून समोर आलेला आहे. सकाळचे चार वाजले आहेत आणि नायक आपल्या नायिकेला उद्देशून म्हणतोय...

उठना लवकर वाजनात च्यार
सुटना वारा गुलाबी गार
लिईसन दोरी,हातमा ईय्या
गवत कापाले चालवं तू
कोंबडा कुकुचकु...कुकुच कु रे कुकुच कु कोकाययना कोंबडा कुकुचकु...

नुकताच कोंबडा आरवलेला आहे म्हणजे सकाळचे चार वाजले आहेत, सकाळचा गार गार गुलाबी वारा वाहू लागला आहे, आता लवकर झोपेतून उठून उभी रहा आणि दोरी व विळा घेऊन माझ्या सोबत चारा घेण्यासाठी जंगलात यायची तयारी कर असे गाण्याच्या माध्यमातून सांगतोय.

वरील पहिल्या चरणातून ग्रामीण भागातील चित्रण आलेलं असून भल्या पहाटे चार वाजता उठून आपली दिनचर्या सुरु करणाऱ्या कष्टकरी कुटुंबाचा संघर्ष त्यातून प्रतीत झालेला आहे. कोंबडा आरवला की सकाळचे चार वाजतात हा तत्कालीन सामाजिक संकेत देखील ग्रामीण कृषीजीवनाचे दर्शन घडवतो आणि त्याचबरोबर, घड्याळ आणि मोबाईल पासून वंचित असलेला तो काळ कसा असेल हे देखील चुटकीसरशी डोळ्यासमोर येवून उभे राहते.

पुढील कडव्यात नायक नायिकीणीला उद्देशून म्हणतो की,

झोपमाई लवकर उठवं तारा
लयनासे आपले गवत ना भारा
राहू दे पाणी भराना मयझारा
तथाई येता वाजतीन बारा
बाजरीनी भाकर, बोंबिल ना खुडा
न्याहरी बांधाले कर वं तू
कोंबडा कुकुचकु,कुकुच कु रे कुकुच कू कोकायना कोंबडा कुकुचकु..

सकाळची चारची वेळ म्हणजे अगदी साखरझोपेचा टाईम आणि अशा परिस्थितीत नायिकीणीचे डोळे उघडता उघडत नाहीत अन् नायक तिला मात्र पुन्हा पुन्हा आपल्या प्रापंचिक जबाबदारीची जाणीव करून देत उठवण्याचा केविलवाणा प्रयत्न करतोय, तो म्हणतोय झोपेतून लवकर उठ तारा, आपल्याला गवताचा भारा आणायचा आहे म्हणून आताच पाणी भरायचा उगीच मयझारा करु नकोस कारण तिकडून यायला आपल्याला बारा तरी वाजतील म्हणून फटक्यात बाजरीची भाकरी आणि बोंबील चा ठेचा बनव आणि न्याहरी बांधून जंगलाच्या दिशेने जायच्या तयारीला लाग.

वरील चरणात आलेला मयझारा म्हणजे उगीच एका महत्त्वाच्या कामात वाया गेलेला प्रयत्न किंवा खोळंबा या अर्थाने आलेला वाक्प्रचार अहिराणी भाषेतील व्याकरणीक सौंदर्य वाढवणारा आहे. बाजरीची भाकर आणि बोंबील चा खुडा त्यांच्या वाट्याला आलेल्या अठरा विश्व दारिद्र्याचं प्रतीक आहे, गीतातून आलेल्या तारा, भारा, मयझारा या यमक साधणाऱ्या शब्दातून गीताची गेयता आणि गोडवा याची एक वेगळीच अनुभूती मिळते.

अलिकडे जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले आहेत तरी देखील ग्रामीण भागातील मजूर शेतकरी कष्टकरींचे जीवन पूर्णतः निसर्गावर अवलंबून आहे हे पुढील चरणातून दिसून येते तो पुढे म्हणतो की,दडक्या पाणी पडना यंदा

जंगल हिरवा व्हयना समदा
गवत ईकाना आपला धंदा
नही राव्हाव पैसास ना वांधा
लयस मी साखर चहानी पत्ती
पाणी चुल्हावर ठेव वं तु
कोंबडा कुकुचकु कुकुच कू रे कुकुच कू कोकायना कोंबडा कुकुचकु..

ह्या वर्षी भरमसाठ आणि जोरदार पाऊस झाला असून अख्खे जंगल हिरवेगार झाले आहे म्हणून यंदा आपला धंदा तेजीत राहणार आहे आणि पैशा अडक्याचा देखील वांधा राहणार नाहीये, म्हणून लवकर तयारी कर मी चहा साखर आणतो तोवर तू चुलीवर पाणी ठेव...

वरील चरणात पुन्हा दडक्या पाणी म्हणजे जोरदार आणि भरमसाठ पाऊस असा अर्थ आलेला वाक्प्रचार गीतातील वाङ्मयीन सौंदर्य अधोरेखित करतो. निसर्गाच्या कुशीत राहणाऱ्या आणि अहिराणी भाषेत सयेन सये आणून खाणाऱ्या म्हणजे तेल,साखर, चहा पावडर अशा रोज लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंचा ठोक किराणा करण्याची ऐपत नसलेल्या, दररोजचा किरकोळ किराणा तो ही कसाबसा उधार उसनवार करुन सांज धकवणाऱ्या कष्टकरी कुटुंबाचा निसर्गच वाली असून त्याने साथ दिली तर आलेल्या परिस्थितीवर मात करता येईल अन्यथा जगण्याचे वांधेच वांधे असा एकंदरीत सगळ्या कष्टकरी जात समुहाचा संघर्ष प्रस्तुत गीतातून पदोपदी जाणवतो.

चारा विकणे या सोबतच शिकार करणे हा देखील या कुटुंबाचा जोडधंदा म्हणून पुढे येताना खालील एका कडव्यातून दिसून येते. नायक पुढे तिला सांगतोय की,

कापीसन गवत करु शिकार
ससा धरानं ले वाघूर
व्हत नही शिकार खंड्या बिगर
लेनं पडी त्याले बी बरबर
लवकर उठना गल्ली मा देखना
बलाव तेले यु यु यु
कोंबडा कुकुचकु कुकुच कू रे कुकुच कु कोकाययना कोंबडा कुकुचकु...

तारा चारा कापून झाल्यावर आपण शिकार देखील करणार आहोत म्हणून ससा पकडण्यासाठी लागणारं वाघूर पण सोबत घे आणि हो शिकार करायला आपला खंड्याची म्हणजे कुत्र्याची आवश्यकता भासणार आहे त्याच्याशिवाय शिकारीची कल्पनाच होऊ शकत नाही म्हणून तू उठ आणि त्याला इकडे तिकडे गल्लीत बघ त्याला आवाज दे.

वरील कडव्यातून ग्रामीण कृषी संस्कृतीत पाळीव प्राण्यांचं महत्त्व आणि त्यांच्या बद्दल असलेली आत्मियता, आपुलकी,भुतदया प्रकट झाली आहे, शिकारीसाठी आवश्यक असे साधन म्हणून 'वाघूर' या शब्दाचा परिचय नव्याने आलेला आहे जो भाषेच्या समृद्धीच्या अंगाने विचार करण्यास भाग पाडायला लावणारा आहे गीतातील दडक्या पाणी,मयझारा यासारखे शब्द देखील नोंद घेण्यासारखे आहेत.

आजच्या स्पर्धेच्या युगात उदरनिर्वाहासाठी जसा जोडव्यवसाय आवश्यक झालेला आहे त्याचाच प्रत्यय या दांपत्याचा त्यावेळच्या या चारा विकण्याचा व्यवसायासोबत शिकारीच्या जोड व्यवसायातून जाणवतो

गाण्याच्या उत्तरार्धात नायक ताराला सांगतोय की,

आवर आथरुन उचल खाट
उकाई दे माले च्याहा ना घोट
भाकर खावानी लावू नको नाट
धरुत जल्दी जंगल नी वाट
तांबडं फुटनं उजाये पडणं
कोकाई राह्यन्यात चिमण्या चिव
कोंबडा कुकुचकु कुकुच कू रे कुकुच कू कोकायना कोंबडा कुकुचकु...

कामाची धांदल आणि वेळेचं बंधन या सगळ्या गोष्टींचा विचार करून नायक आपल्या नायिकेला म्हणतोय की आधी आथरुन आवर खाट उचल आणि मला घोटभर चहा उकळून दे आणि हो उशीर खुपच झाला आहे म्हणून मला जेवणाची नाट लावू नको बाहेर तांबडं फुटलंय उजेड पडलाय आणि चिमण्या देखील चिव चिव करायला लागलेल्या आहेत आता सगळं राहू दे आणि माझ्यासोबत जंगलाची वाट धर.

वरील कडव्यातून नाट लागणे या शब्दातून शकुन अपशकून मानणाऱ्या तत्कालीन समाजव्यवस्थेचं दर्शन घडते आणि सोबतच नाट लावणे या शब्दातून म्हणजे नाट लावणारी पत्नी अर्थात नाट लावणं हा तीचा मुळ उद्देश नसून आपल्या पतीवरील आत्यंतिक प्रेम आणि जिव्हाळ्याचं दिग्दर्शन करतो म्हणून

नाट हा बोलीतील शब्द इथं व्यक्तीसापेक्ष आलेला आहे यावरूनच या गीताची उंची आभाळाला स्पर्श करणारी आहे याची आपण कल्पना करू शकतो.

चार वाजेपासून आपल्या प्रिय पत्नीला झोपेतून उठवतांना शेवट उजेड पडला चिमण्या चिव चिव करायला लागल्या तरीही नायकाच्या तोंडून एकही अपशब्द बाहेर येत नाही तर तो तीला वारंवार आपल्या जबाबदारीची जाणीव अतिशय प्रेमपूर्वक आणि पोटतिडकीने सांगतोय यावरून या गीतातील पती-पत्नीमधील प्रेमळ आणि पवित्र नात्याची झलक गाण्याच्या प्रत्येक कडव्यातून प्रकट होताना दिसते.

चिमण्या, ससा, कोंबडा, कुत्रा या पाळीव आणि प्राण्यांचा आवश्यकतेनुसार गीताची गेयता सांभाळून चपखलपणे केलेला समर्पक उपयोग, दडक्या पाऊस, हिरवा जंगल, तांबडा उजेड अशा विविध विशेषणांनी नटलेला निसर्ग, निसर्गावरील श्रद्धा, त्याच्याबद्दलची कृतज्ञता अशा अंगांनी विचार केल्यास दादासाहेब वाघ लिखीत या अहिराणी गीताची वांङ्मयीन चर्चा महत्त्वपूर्ण ठरते.

**निष्कर्ष –**

१) ज्या प्रमाणे लोकसाहित्यातील पारंपरिक लोकगीतांत साहित्यिक मुल्ये आढळून आले त्याचप्रमाणे या बोलीभाषेतील विशिष्ट हेतूने प्रेरित होउन तयार केल्या गेलेल्या गीतांत देखील साहित्यिक मूल्ये शोधता येतात

२) या गीताप्रमाणेच इतरही बरीच गीतं अलिकडच्या काळात यु टयुब च्या माध्यमातून प्रदर्शित होत आहेत त्यांचा देखील संशोधनाच्या अंगाने विचार करता येईल.

३) अहिराणी भाषा ही मराठी भाषेची समृद्ध बोली आहे तीच्या गीतातील गोडवा साहित्यिक कसोटीवर तपासून घेता येईल.

४) गीतातील मनोरंजन आणि विरंगुळा सोडला तर इतरही अनेक बाबींवर अभ्यासकांचे लक्ष वेधता येईल.

५) अहिराणी भाषा बहुदा खेड्या गावात अधिक प्रमाणात बोलली जाते त्या अनुषंगाने ग्रामीण जीवन आणि कृषी संस्कृतीतील बरेच संदर्भ या गीतांच्या माध्यमातून अभ्यासता येतील

**संदर्भ**

१) कृणाल म्युझिक कॅसेट निर्मित – माले लगीन करानं यंदा या अहिराणी गीतांचा अल्बम २००७
२) सिद्धार्थ निकम या यु टयुब चॅनल वर – अपलोड तारीख १३/३/२०१८

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# शेती व शेतकरी समस्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी, एक अध्ययन

**डॉ. बामणे एम. एम.**
समाजशास्त्र विभागप्रमुख
वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय देगलूर

**प्रस्तावना –**

शेती व शेतकऱ्यांचा प्रश्न केवळ अलीकडल्या काळात निर्माण झालेला नसून या प्रश्नाला सुद्धा इतिहास आहे. सोळाव्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीला सुरुवात होऊन या देशात नवनवीन कारखाने निर्माण झाले. या कारखान्याचा फायदा भरभराट व्हायचा असेल तर कारखान्याला लागणारा कच्चा माल स्वस्तात स्वस्त मिळायला पाहिजे. अशा स्वरूपाची कच्च्या मालाचं शोषण करणारी व्यवस्था निर्माण झाली. यासंदर्भात शरद जोशी म्हणतात, कच्च्या मालाचे जे शोषण होते त्याचा विचार आजपर्यंत जगामध्ये फार थोड्या प्रमाणात झाला. कच्च्या मालाचे शोषण थांबावा म्हणून कोणत्याही स्वरुपाची संघटना प्रभावीपणे उभी राहिली नाही. म्हणजे भांडवलशाही आणि साम्यवादी देशामध्ये सुद्धा शेतीमध्ये तयार होणारा माल कमीत कमी किंमतीत मिळून घेतला पाहिजे व भांडवल तयार केला पाहिजे अशा स्वरूपाच्या फायदे वादी विचारातून शेतकऱ्यांचे शोषण करण्यात आले. भारतात सुरुवातीला इंग्रज व्यापारी म्हणून आले आणि नंतर राज्यकर्ते बनले. त्यांनी शेती व शेतकरी शोषणाची व्यवस्था सुव्यवस्थितपणे तयार केली. यासंदर्भात संत तुकडोजी महाराज आपल्या अभंगात म्हणतात, जगाचा पोशिंदा म्हणविशी तू, तुझे पाठीला रे पोट ऐतखाऊच्या घरी, दह्या दुधाचे लोट. किंवा कच्चामाल मातीच्या भाव, पक्का होता चौपटीने घ्यावे! कसे सुखी होतील ग्रामजन पिकवुनिया उपाशी. सुरवातीला शेतीचा शोध लागल्यानंतर शेती करण्याच्या पद्धतीत बदल होत गेला. या बदलाच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या हाती बैललागले आणि लुटारूच्या हाती घोडे. शेतकरी हा बैलाच्या माध्यमातून वर्षभर काबाडकष्ट करून वर्षाच्या शेवटी रास तयार करायचा आणि ती रास लुटारूंनी घोड्याच्या माध्यमातून एका दिवसात लुटून घेऊन जात होते. नंतर लुटारू चे वेगवेगळे संघ तयार झाले, त्याचा प्रमुख तयार झाला. त्यांनी शेतकऱ्यांना लुटण्यासाठी वेगवेगळे प्रांत (विभाग) वाटून घेतले, यांच्या शक्तीच्या, बळाच्या प्रभावामुळे नाईलाजाने समाज मान्यता मिळाली आणि ऐतखाऊप्रवृतीची व्यवस्था निर्माण करणारी राज्यशाही,हुकूमशाही निर्माण झाली (याला अपवाद रयतेचा राजा शिवाजी महाराज आहेत). म्हणून आपल्याला असे म्हणता येईल की आजपर्यंतचा इतिहास राजा-महाराजा चा नाही (अपवाद शिवाजी महाराज), वर्ग संघर्षाचा नाही, कामगाराच्या शोषणाचा नाही (कामगारांचे शोषण काही कार्यकाळ पुरते मर्यादित होते) तसेच शेती व शेतकरी शोषणाचा इतिहास आहे. म्हणून शेती व शेतकरी शोषणाची व्यवस्था कोणत्या आहेत? या व्यवस्थेतून शेतकऱ्यांना च्या संदर्भात कोणकोणत्या समस्या निर्माण झालेले आहेत? या प्रश्नांची उकल करण्याच्या या उद्देशाने प्रस्तुत शोध निबंधाचा विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

**संशोधनाचा उद्देश –**

१. शेती समस्येचे अध्ययन करणे.
२. शेतकरी समस्येचे अध्ययन करणे.
३. शेती व शेतकरी यांच्या संदर्भात शासकीय धोरणांचा ऐतिहासिक आढावा घेणे.

**संशोधनातील गृहीतकृत्य –**

१. शेती समस्या ऐतिहासिक काळापासून निर्माण झालेली असल्याचे निदर्शनास येते.
२. शेतकरीसमस्येला इतिहास असल्याचे आढळून आले.
३. शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे शेती व शेतकरी समस्या निर्माण झालेली दिसून येते.

**संशोधन पद्धती –** प्रस्तुत शोध विषयाच्या संदर्भात प्राथमिक व द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग करून, प्राथमिक साधना अंतर्गत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे निरीक्षण करुन, विषयाच्या संदर्भात त्याचे संकलन करण्यात आले. तेसेच द्वितीय साधनाच्या अंतर्गत संदर्भ ग्रंथ, पुस्तक, साप्ताहिक, वर्तमान पत्र, सामाजिक माध्यमे इत्यादींद्वारे विषयाशी संबंधित तथ्याचे संकलन करण्यात आलेले आहे.

**संशोधन विषयाचे महत्त्व –** शेती व शेतकरी समस्येची ऐतिहासिक पार्श्वभूमी या विषयाच्या संदर्भात विविध पद्धतीने अध्ययन करण्यात आलेले असून, म्हणून या अध्याय विषयाचे महत्त्व निश्चितच आहे ते खालील प्रमाणे सांगता येतात.

१. शेती समस्येची सोडवणूक करण्यासाठी महत्त्व आहे.
२. शेतकरी समस्यांची तीव्रता कमी करण्यास महत्त्व आहे.
३. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी उपयुक्त आहे.
४. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची समस्या सोडविण्यास उपयुक्त आहे.

**तथ्याचे विश्लेषण व अर्थनिर्वचन –** विषयाशी संबंधित प्राप्त तथ्याचे वर्गीकरण विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आलेले आहे.

**१. शेतीची समस्या आणि शासनाचे धोरण –** शेती समस्यांच्या अनुषंगाने आपण ऐतिहासिक काळाचा आढावा घेतल्यास आपणास असे निदर्शनास येते की ऐतिहासिक काळापासून दोन सर्जेक घटकांचे शोषण करणारी व्यवस्था निर्माण झालेली दिसून येते. (सर्जेक म्हणजे नवनिर्मिती करणारा) ते सर्जेक म्हणजे जमीन आणि स्त्री, एका दाण्याचे १०० दाणे निर्माण करणारी भूमी आणि त्याचा निर्माता असणारा शेतकरी आणि एकीकडे शंभर किलो

लोखंड टाकून ९० किलोची वस्तू निर्माण करणारा उद्योगपती खऱ्या अर्थाने सुखी, समाधानी, संपन्न कोण असायला पाहिजे होता? याचे तार्किक उत्तर शेतकरी सांगता येतो पण प्रत्यक्षात खरा संपन्न, सुखी उद्योगपती आहे. याचे कारण आतापर्यंत विविध शासन व्यवस्थेत सर्व धोरणे शेती व शेतकऱ्यांच्या विरोधामध्ये आखण्यात आलेले दिसून येतात.शेती व शेतकऱ्यांवर आलेल आरिष्ट्य, यातून शेतकरी कुटुंबाचे बिघडलेले अर्थकारण, यातून निर्माण झालेला कर्जबाजारीपणा, यातुन होत असलेली शेतकऱ्यांची आत्महत्या हे एका प्रदीर्घ राजकीय, सामाजिक, आर्थिक विकासात्मक धोरणाचा परिपाक आहे. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचे मूळ नैसर्गिक आपत्तीपेक्षा राजकीय अर्थकारणात दडलेले आहे हे अनेक उदाहरणासह महात्मा जोतीबा फुलेनी स्पष्ट केले आहे.जेव्हा भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारताच्या राजकीय, आर्थिक धोरणात तेवढया प्रमाणात बदल झालेला दिसून येत नाही. महात्मा गांधीजीचे पट्टशिष्य स्व. विनोबाजीनी फारच समर्पक शब्दात आपल्याला काय मिळवायचे आहे ते स्पष्ट केले आहे. ते म्हणाले मोगल इथे येण्यापूर्वी भारत स्वतंत्र गावाचा स्वतंत्र देश होता. मोगल आल्यानंतर भारत स्वतंत्र गावांचा गुलाम देश झाला. इंग्रज आल्यानंतर भारत गुलाम गावाचा गुलाम देश झाला. इंग्रज गेल्यानंतर भारत गुलाम गावाचा स्वतंत्र देश आहे. आम्हाला स्वतंत्र गावाचा स्वतंत्र देश बनवायचे आहे. स्वातंत्र्यानंतर ७० वर्षांनी या देशाला स्वतंत्र गावाचा स्वतंत्र देश वनवू शकलो नाही. दुर्भाग्य हे आहे की, इंग्रजांच्यानंतरही आपली आर्थिक नीती इंग्रजाप्रमाणेच चालत राहिली. स्वतंत्र झाल्यानंतर भारताला कल्याणकारी राज्य निर्माण करण्याच्या उद्देशाने पंचवार्षिक योजनेची आखणी करण्यात आलेली होती. ती पचवार्षिक योजना तयार होताना जी बनवण्यात कृष्णाम्माचारीचा फार मोठा सहभाग होता. यात जवळजवळ असा विचार मांडण्यात आला की या देशाचा विकास व्हायचा असेल तर शेतीचं उत्पादन वाढलं पाहिजे आणि शेतीमालाच्या किमंती योग्य अशा खालच्या पातळीवर अस्थिर राहिल्या पाहिजेत. म्हणजे शेतकऱ्यांचा माल स्वस्तात स्वस्त विकत घेतला जातो आहे. हे थांबायला पाहिजे हा विचार मागे राहिला. पंचवार्षिक योजनेकडे दृष्टिक्षेप टाकल्यास असे निदर्शनास येते की, काही पंचवार्षिक योजना अपवाद वगळता, या योजनांमध्ये शेतीसाठी गुंतवणूक कमी-कमी होत गेलेली आहे. यासंदर्भात भारताचे माजी शेतीमंत्री डॉ. अण्णासाहेब शिंदे यांनी 'भारतातील कृषी समस्या व अन्न समस्या' या ग्रंथात भारतीय शेतीचे सर्वात अधिक नुकसान भारतीय शेतमालाच्या किमती मंदितच राहतील, अशा आर्थिक धोरणाचा अवलंब करूनच ब्रिटिशांनी केले ब्रिटिश कारखानदारीला स्वस्त कच्चामाल सातत्याने मिळत राहील अशा तऱ्हेने आर्थिक धोरणाची ब्रिटिशांनी दिशा ठेवली. ब्रिटिशांचे राज्य केले तरी आजही यादुष्टचक्रातून भारतीय शेतकरी बाहेर पडला असे म्हणता येत नाही

**२. शेतकऱ्यांच्या समस्या आणि शासनाचे धोरण –** शेती आणि शेतकरी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. शेतीच्या समस्या बरोबर शेतकऱ्यांच्या समसेला सुद्धा इतिहास आहे. या समस्या सुद्धा शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे निर्माण झालेली असून या धोरणाची शेवट शेतकरी आत्महत्याझालेलादिसून येते म्हणून शरद जोशी म्हणतात, शासनाचे धोरण म्हणजे शेतकऱ्यांची मरण आतापर्यंत विविध शासनव्यवस्था शेती आणि शेतकऱ्यांच्या विरोधात आखण्यातआल्यामुळे ही समस्या जास्तीच तीव्र बनली आहे. शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न जागतिक असले तरी विकसनशील अविकसनशील देशातयाचे स्वरूप सारखे नाही.विकसित राष्ट्रांनी आपल्या शेतकऱ्यांना भरमसाठ सबसिडी देऊन या समस्येची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण भारतात त्याचे स्वरूप उलटे आहे. 'डंकेल प्रस्तावामध्ये शेतकऱ्यांची सबसिडी कमी केली पाहिजे असा प्रस्ताव होता. यासाठी गँटमध्येसहभागी प्रत्येक देशाच्या सरकारने आपल्या देशातील शेतकऱ्यांना सबसिडी किती दिली जाते हे सांगितले पाहिजे.तेव्हा जपानच्या सरकारने सांगितले कि, आमच्या देशात शेतकऱ्यांना ९० टक्के सबसिडी आहे. म्हणजे खुल्या बाजार मध्ये शेतकऱ्याला १०० रुपये मिळाले असते तर आम्ही धोरण असे चालवतो की शेतकऱ्याला १९० रुपये मिळावेत. युरोपियन देशांनी लिहून दिले की आम्ही ३५ टक्के सबसिडी देतो. भारत सरकारवर असं लिहून देण्याची वेळ आली, तेव्हा त्यांनी लेखी निवेदन दिले की, आमचे धोरण असे आहे की खुल्या बाजारात शेतकऱ्याला शंभर रुपये मिळाले असेल तर त्याला फक्त २८ रुपये मिळावेत. म्हणजे भारतातील शेतकऱ्यांना ७२ टक्के उणे सबसिडीमुळे शेतीमालाला उत्पादन खर्च भरून निघेल एवढी सुद्धा भाव मिळत नसल्यामुळे शेतकरी कुटुंबात समस्या निर्माण होऊन, या अनुषंगाने अनेक प्रश्न निर्माण होऊन आजपर्यंत देशात ३८५००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेली आहे.

**निष्कर्ष –**

१. शेतीच्या समस्यांना इतिहास असून यासमस्येची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे.
२. शेती समस्या निर्माण करण्यामध्ये त्या-त्या शासन पद्धतीतील विविध धोरणे कारणीभूत आहेत.
३. शेती व शेतकरी समस्या या परस्पर संबंधित आहेत.
४. शेतकरी समस्या निर्माण होण्यास शासनाचे चुकीचे धोरण कारणीभूत आहे.
५. शेती आणि शेतकरी समस्या कल्याणकारी राज्याच्या धोरणाचा परिणाम आहे.
६. शेतकरी संघटित नसल्यामुळे या समस्यांची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे.
७. स्वामीनाथन आयोग लागू न केल्यामुळे शेती व शेतकरी समस्येत दिवसेंदिवस वाढत असल्याचे निदर्शनास येते.

**उपाय –**

१. शासनाने तात्काळ स्वामीनाथन आयोग लागू करणे.
२. शासनाने शेती व शेतकऱ्यांच्या संदर्भात धोरणे योग्य पद्धतीने राबवावी.
३. शेतकर्यांनी शेती सोबत इतर जोडधंदे, उद्योग करावा.

**संदर्भ**

१. आगलावे प्रदीप (२०१०) सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे प्रकाशक, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर -१०, तिसरी आवृत्ती.
२. आगलावे प्रदीप (२०१५) समाजशास्त्र एमपीएससी/नेट/सेट, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती.
३. देशमुख, यळणे 'योजना' (जानेवारी२०११) अंक०६ जागतिकीकरण कृषी क्षेत्रातील बदल व शेतकऱ्यांच्या आत्महत्या.
४. लाजेवार नरेंद्र शेतकऱ्यांच्या आत्महत्या, चिंतन आणि उपाय. सुमेरू प्रकाशन, डोंबिवली भोळे भास्कर जोतिरावांचे शेती विषयक धोरण उपेक्षिल्याचे परिणाम.
५. लाजेवार नरेंद्र (संपादक) शेतकऱ्यांच्या आत्महत्या : चिंतन आणि उपाय, सुमेरू प्रकाशन, डोबिवली जावंश्रियाविजय- शेतकरी आणि अर्थव्यवस्थेतील बाजार.

६. जोशी शरद (नोव्हेंबर२००८) शेतकरी संघटना विचार आणि कार्यपध्दती जनशक्ती वाचक चळवळ औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती.
७. मोहिते शेषराव (नोव्हेंबर२००९) शेती व्यवसायावरील अरिष्ट, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, दुसरीआवृत्ती.
८. जोशी शरद (नोव्हेंबर २००८) शेतकरी संघटना विचार आणि कार्यपध्दती जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती.
९. जोशी शरद (नोव्हेंबर२०१०) पोशिंद्याची लोकशाही, प्रकाशन जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, प्रथामवृत्ती पोशिंद्या लोकशाहीसाठी स्वतंत्र भारत पहा.
१०. ढोबळे विष्णू (जानेवारी२००९) शेतकऱ्यांच्या आत्महत्या जागतिकीकरणातील शोकांतिका, सुगावा प्रकाशन, सदाशिवपेठ, पुणे, प्रथमावृत्ती.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मॅडम भिकाजी कामा यांचा सहभाग- एक ऐतिहासिक अभ्यास

**सौ. वंदना एम. पाटील,**
सहाय्यक प्राध्यापिका, इतिहास विभाग
ज. जि. म. वि. प्र. सह. समाजाचे
श्री. सा. स. पाटील कला, श्री. भाऊसाहेब टी. टी. साळुंखे वाणिज्य आणि श्री. जी. आर. पंडित विज्ञान महाविद्यालय, जळगाव

**प्रस्तावना –**

भारतीय स्वातंत्र्य आंदोलन हा प्रदीर्घ चाललेला लढा होता इसवीसन अठराशे सत्तावनच्या पूर्वीपासून या आंदोलनाची पार्श्वभूमी तयार होत होती. पहिला उद्रेक इसवीसन अठराशे सत्तावन ना झाला. यात पुरुषांबरोबर रणरागिनी स्त्रियांनीही सहभाग घेतला होता स्वातंत्र्यचळवळीत स्त्रियांचा सहभाग सुरू झाला आणि विचारांची देवाणघेवाण वाढत गेली शिक्षण प्रसार, आधुनिक वाहतूक दळणवळणाची साधने, आधुनिक जीवन पद्धतीचा, समाजसुधारकांचे प्रयत्न स्वीकार इत्यादींमुळे समाजजीवनावर जे परिणाम दिसून आले त्यातून स्त्री जीवनावर स्थित्यंतरे घडून येत गेली. आपले प्रश्न, होणारा अन्याय, याला तोंड देण्यासाठी स्त्री पुढे सरसावली. आपण दुर्लक्षित, उपेक्षित आहोत आपल्या गुणांना, कौशल्यांना, बुद्धिमत्तेला, व्यक्तिमत्व विकासाला पुरेसा वाव मिळत नाही याची जाणीव स्त्रीला होत गेली इसवीसन अठराशे सत्तावनच्या स्वातंत्र्यलढ्यात राणी लक्ष्मीबाईचे योगदान फार महत्त्वाचे समजले जाते.

**महत्व –** पहिल्या महायुद्धकाळात पुरुष मोठ्या संस्थेने सैन्यात भरती झाले त्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या कामांची त्रुटी भरून काढण्याची जबाबदारी स्त्रियांवर येऊन, पडली स्त्रियांचा पुरुषांच्या पारंपरिक क्षेत्रात प्रवेश झाला याच काळात भारतात अहिंसेच्या मार्गाने ब्रिटिशांची सत्ता धुडकावून स्वातंत्र्य मिळवण्यासाठी महात्मा गांधीजींचे प्रयत्न सुरू झाले होते. त्यांच्या कार्यात पुरुषांच्या बरोबरीने महिलांचाही मोठ्या संख्येने सहभाग वाढत गेलेला दिसून येतो त्यांच्या कार्याचे क्षेत्र विस्तारले गेले.

**मॅडम भिकाजी कामा –** भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या ३५ वर्षाच्या काळात युरोपातील अनेक देशांच्या राजधान्या जसे लंडन पॅरिस बर्लिन येथे एका पारशी स्त्रीने आपल्या प्रखर वाणीने भारताच्या स्वातंत्र्याकरिता विश्वजनमत तयार केले व ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना आत अंकित केले ती क्रांतिकारी स्त्री म्हणजे मॅडम भिकाजी कामा होय.

मॅडम भिकाजी कामा यांचा जन्म २४ सप्टेंबर १८६१ ला मुंबई येथे झाला. ती सोराबजी पाटील यांची नववी अपत्ये होती. त्यांचे शिक्षण अलेक्झांड्रिया गर्ल्स स्कूल येथे झाले होते. इंग्रजांद्वारे होणारे भारतीयांचे शोषण व अपमानाने प्रभावित होऊन त्यांनी देशसेवा करण्याचा निश्चय केला. कॉंग्रेसची स्थापना झाल्यावर त्या कॉंग्रेसची सक्रिय कार्यकर्ता म्हणून कार्य करू लागल्या. आपल्या प्रभावी भाषणाने विदेशी शासन विरुद्ध उभे राहण्यास स्त्रिया व पुरुष यांना आवाहन करून त्यांच्यातील स्वाभिमान जागृत करण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. इस. १८८५ ला त्यांचा विवाह रुस्तमजी कामाशी यांच्याशी झाला. परंतु रुस्तमजी त्यांना देशसेवेपासून परावृत्त करू शकले नाही शेवटी त्यांनी घटस्फोट घेतला. स्वतःला ब्रिटिशांविरोधात क्रांतिकारी चळवळीत झोकून दिले त्यांना पाच मुले होती.

मॅडम कामा यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःची ३ लाख रुपयांची मालमत्ता खर्च करून भारतीय तरुणांना स्फूर्ती दिली व त्यांना क्रांतिकारी कार्यासाठी प्रोत्साहन देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केलेले दिसून येते. इसवी सन १९०२ मध्ये चिकित्सेच्या निमित्ताने इंग्लंडला गेले असता तेथे दादाभाई नवरोजी यांच्या त्या सचिव बनल्या. प्रवासी देशभक्तांना बरोबर कार्य करू लागल्या, त्याच काळात क्रांतिकारक श्यामजी कृष्ण वर्मा यांच्या कार्यात सामावल्या गेल्या लंडनमध्ये इस १८५७ चा जो उत्सव झाला त्यासाठी त्यांनी राणाजी बरोबर संदेश देणगी सहाय्य पाठविले होते. वि. दा. सावरकर यांच्या विचारांशी त्या तन्मय झाल्याने त्यांना तर मदत केलीच शिवाय स्वातंत्र्यवीर सावरकरांना अंदमानची ५० वर्षांची शिक्षा झाल्यानंतर त्यांचे धाकटे बंधू नारायणराव सावरकर यांच्या शिक्षणासाठी आणि बाबाराव सावरकर यांच्या पत्नी सौ. वहिनी यांना आर्थिक मदतही मॅडम कामा यांनी केलेल्याचा उल्लेख दिसून येतो.

इसवी सन १९०२ मध्ये युरोपात गेल्यानंतर त्यांनी युरोपियन देशांशी संपर्क साधून इंग्रजांनी भारतात चालविलेल्या दडपशाहीविरुद्ध वाचा फोडली. विशेषतः अमेरिकन वार्ता पत्रांनी कामाबईंना उत्तम प्रतिसाद देऊन भारतीय क्रांतिकारकांवर वर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. त्यांनी पॅरिस येथून इतिहास प्रसिद्ध असे 'वंदे मातरम' हे मासिक सुरू करून भारतीय क्रांतिकारकांना योग्य ते प्रोत्साहन दिले.

जर्मनीत होणाऱ्या या आंतरराष्ट्रीय सोशलिस्ट कॉंग्रेसच्या अधिवेशनात सरदारसिंग जी राणा आणि मादाम कामा गेले होते. या मेळाव्यात सर्व राष्ट्रांचे ध्वज फडकवण्यात आले परंतु भारताचा ध्वज नसल्यामुळे मादाम कामा यांना दुःख झाले त्यामुळे एका रात्रीत त्यांनी रेशमी कपड्यावर तिरंगी ध्वज व त्यावर कमल व तारे काढून भारताचा ध्वज तयार केला आणि दुसऱ्या दिवशी तो ध्वज सर्वप्रथम व्यासपीठावर फडकविला स्वतंत्र भारताचा ध्वज म्हणून त्यांनी वंदे मातरम्‌चा जयघोष केला सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी या ध्वजाला मानवंदना दिली. या अधिवेशनात हिंदुस्तानात संबंधित ठराव मांडण्यासाठी मादाम कामा उभ्या राहिल्या आणि हातातला हिंदुस्तानचा राष्ट्रध्वज त्यांनी फडकावला. अधिवेशनासाठी कामा बाईंनी काही तरूण सहकाऱ्यांच्या सहाय्याने राष्ट्रध्वज तयार केला होता मादाम कामा या प्रथम देशभक्त होते कौटुंबिक आणि राजकीय कारणास्तव भारत सोडून परदेशात त्यांनी ही चळवळ चालू केली होती भारतीय वेशातल्या कामाबाईंनी मोठ्या अभिमानाने हा ध्वज फडकावला आणि इंग्रजांनी भारतात चालविलेल्या जुलमी राज्यकारभाराचे चित्र स्पष्ट करीत तुम्ही न्यायाचा पक्ष घ्या आणि भारताच्या स्वातंत्र्याचा विचार करा असा खणखणीत शब्दात इशारा दिला शेवटी हा ठराव संमत झाला.

हिंदुस्थान बाहेर हिंदुस्थानचा ध्वज फडकविण्यात ची ही घटना आधुनिक भारताच्या इतिहासातील पहिली घटना असावी असे दिसते. या राष्ट्रध्वजावर वंदे मातरम हे देवनागरीतील शब्द होते या ध्वजावर हिरवा केशरी तांबडा या तीन रंगांचे पट्टे होते हे रंग गुणवाचक होते तांबडा रंग शक्तीचा केशरी रंग

विजयाचा आणि हिरवा रंग धैर्य उत्साह यांचे निदर्शक होते. तत्कालीन हिंदुस्थानच्या आठ प्रांतांची प्रतीक म्हणून आठ कमळे व खालच्या पट्ट्यावर चंद्र-सूर्याच्या आकृत्या होत्या हा ध्वज फ्रान्समध्ये राहणारे भारतीय क्रांतिकारक हेमचंद कानूनगो यांनी बनवला होता असा उल्लेख दिसून येतो. भारतात स्वातंत्र्य चळवळ करून मॅडम कामा यांना भारतात येण्याची परवानगी सरकारकडून मिळाली डॉक्टर नारायणराव सावरकर, लाला हरदयाळ यांच्या प्रयत्नांमुळेच मॅडम काम या भारतात येऊ शकल्या होत्या.

अशाप्रकारे स्वातंत्र्यासाठी प्राणपणाने झुंज देण्यासाठी गुलाबाच्या उमलत्या फुलाप्रमाणे टवटवीत चेहऱ्याने परदेशी गेलेल्या मादाम कामा विकलांग अवस्थेत विशाल क्रांती संसार उद्ध्वस्त झाल्याचे पाहून भग्न हृदयाने भ्रमिष्ट अवस्थेत आपल्या गौरवर्णीय शरीरयष्टीचा, कोमेजलेल्या पारिजातकाच्या फुलाप्रमाणे चोडामोडा झालेल्या अवस्थेत मृत्यू जबड्यात ओळीत असताना मायभूमीत आल्या. मुंबई बंदरात पाऊल ठेवताच त्यांची शुद्ध गेली आणि त्यातच त्यांचा १९ ऑगस्ट १९३६ रोजी पारशी रुग्णालयात मादाम कामा यांचा मृत्यू झाला.

**समारोप –** प्रस्तुत शोधनिबंधात संशोधिकेने मॅडम मादाम कामा यांनी स्वातंत्र्यचळवळीत सहभाग घेऊन केलेल्या कामगिरीचा उल्लेख केलेला आहे.

**संदर्भ**

१) पारधी, आर. एन- भारतीय स्त्री जीवन व कर्तुत्व-प्रकाशन-वेद मुद्रा अमरावती २००५
२) कठारे, अनिल- आधुनिक भारताचा इतिहास.. -प्रशांत प्रशांत पब्लिकेशन, २०१५
३) मोरवंचीकर, रा. श्री- आधुनिक भारत.. विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद १९९४
४) धारणकर, सरल- आधुनिक भारतातील स्त्री जीवन... डॉक्टर प्रकाश अतकरे ऑगस्ट, २००४
५) सबनीस, मिलिंद प्रभाकर- वंदे मातरम एक शोध प्रकाशन वंदेमातरम शतकोत्तर रौप्य महोत्सव जयंती समारोह समिती, पुणे.२०००

# नव्वदोत्तरी महानगरीय आणि ग्रामीण कवितेचा अनुबंध

**प्रा. डॉ. सत्यजित बळीराम साळवे**
प्रमुख, मराठी विभाग
डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

भारतीय अर्थव्यवस्थेत १९९० नंतरचा बदल सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय पातळीवर उलथापालथ करणारा ठरला. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरणाने या देशातील समाजरचनेची अर्थकारणाची, राजकीय विचारांची समीकरणे संपूर्णपणे बदलून टाकली. त्याचा मोठा प्रभाव साहित्यावर पडला. कवितेचे रूप- स्वरूप आणि आशय- अभिव्यक्तीचं सीमोल्लंघन होऊन वैचारिक कवितेने वर्तमानात आपलं वर्चस्व मराठी काव्यविश्वात अधोरेखित केलेले दिसते.१९६० ते १९७५ या कालखंडात समाज देशप्रेमाने, देशसेवेने भारावलेला होता. या काळात आणीबाणीने देशातील लोकशाहीला बटिक बनवण्याचे काम केले. १९७५ ते १९९० या काळाने 'प्रॅक्टिकल' विचारसरणीवर जगणारी समाज व्यवस्था जन्माला घातली. १९९० ते २००५ या काळात 'प्रोफेशनल' नावाची नवीपिढी उदयाला आणली. राजकारणावर धर्माचा पगडा निर्माण केल्याचा हा काळ होता. ६ डिसेंबर १९९२ ला बाबरी मशिदीचा विद्धंस या देशातील एकता -एकात्मता आणि जातीय- धार्मिक सलोखा उद्ध्वस्त करणारी घटना ठरली. १९०५च्या बंगाल फाळणी नंतर हिंदू-मुसलमान यांच्यातील दरी रुंदावणारी ही घटना आहे. २००५ ते २०२० या काळात 'सोशल मीडिया' नावाच्या तंत्रज्ञानाचा समाजात प्रसार आणि प्रचार झाला. आणि संपूर्ण जग एका 'टच'वर तळहातावर येऊन बसले.जागतिकीकरण ही मुख्यतः आर्थिक क्षेत्रातील घटना असली तरी तिच्या दृश्य-अदृश्य परिणामांमुळे समाज जीवनात मूलगामी बदल झाले आहेत.हे बदल केवळ भौतिकस्तरावरच घडले आहेत, असे नाही; तर आपल्या सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांवर ही झाले आहेत. त्यामुळे समाजातील परस्परपूरकतेची भावना बऱ्याचअंशी नष्ट होऊन व्यक्ती आणि समूहात संकुचित आणि आत्मकेंद्रीवृत्ती बळावली. सामाजिक मूल्यांमध्ये संघर्ष निर्माण झाला या सगळ्या बदलांना नव्वदोत्तर काळातील कवितेने नव्या परिभाषेत प्रतिसाद दिला. अभिव्यक्तीची पारंपरिक चौकट नाकारून समकाळातल्या जगण्याचे अनेक अंत:स्थ धागे या कवितेने उलगडून दाखवले.[१] माहिती-तंत्रज्ञानाचे जाळे काही सेकंदात जगभर विस्तारले. कोरोना विषाणूने जगभर पाय पसरवले आणि विज्ञान-तंत्रज्ञानाच्या काळात महामारीने मानवी जीवन हतबल करून टाकले. या साऱ्या बदलांचा परिणाम साहित्यावर विशेषतः कवितेवर मोठ्या प्रमाणावर झाला. माणसे 'मशीन' सारखे धावत असताना त्यांच्या बोथट झालेल्या भावना -वेदना आणि संवेदना आपोआप गळू लागल्या. त्यामुळे जिवंत प्रेतं सडकेवर फिरू लागल्याचा हा काळ आपण सारे अनुभवू लागले आहोत.

'खाऊजा' धोरणामुळे बदलाचे वारे केवळ शहरापुरते न राहता खेड्यापाड्यापर्यंत येऊन धडकले, त्यामुळे महानगरे आणि खेडी यांच्यातील अंतर भौगोलिकदृष्ट्या कमी झाले नसले, तरी समाज माध्यमांच्या क्रांतीमुळे संपूर्ण जग जवळ आल्याचा भास या काळाने निर्माण केलेला आहे.

जागतिकीकरणानंतर बदलत चाललेल्या सामाजिक, सांस्कृतिक मूल्यव्यवहारांचे बरे वाईट परिणाम सर्वप्रथम महानगरात जाणवू लागल्याने अशा स्वरूपाचे बदलते मूल्यभान व्यक्त करणारी कविता आधी महानगरीय कवींनी लिहिण्यास प्रारंभ केला आणि त्यानंतर जागतिकीकरणाचे वारे जसेजसे खेड्यापर्यंत घुसत गेले तशतशी ग्रामीण भागात राहणाऱ्या कवींनीही याच पद्धतीने आपल्या भावना व्यक्त करायला सुरुवात केली. नागर व अनागर भागातून लिहिली जाणारी ही कविता सामाजिक व सांस्कृतिक संवेदनातील बदलांबरोबरच बदलत्या परिभाषेलाही जवळ करणारी होती.[२]

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील साहित्य प्रवाहात दलित, ग्रामीण, आदिवासी, भटके -विमुक्त, मुस्लिम, स्त्रीवादी अशा प्रवाह बरोबर महानगरीय संवेदनेचे साहित्य आश्वासकपणे प्रसवत आहे. विशेषतः १९९० नंतरच्या मुक्त अर्थव्यवस्थेचे मुलगामी परिणाम सर्वच स्तरांवर झाल्यामुळे साहित्यात देखील त्या परिणामांची दखल घेतली गेल्याचे दिसते. महानगरीय कविता ही त्या परिणामावर भाष्य करणारी सजग जाणीव आहे, हे अधोरेखित होते. यात हेमंत दिवटे, संजीव खांडेकर, मन्या जोशी, सलील वाघ, श्रीधर तिळवे, मंगेश काळे, वर्जेश सोलंकी, सचिन केतकर इ. महानगरीय संवेदनेची कविता लिहून आजच्या वर्तमानाचा अस्वस्थ करणारा कोलाहल शब्दबद्ध करताना दिसत आहेत.

काल-परवा न्यायव्यवस्थेने नुकतेच एक मत नोंदवलेले आपल्या लक्षात असेल व्यवस्थेच्या आणि सत्तेच्या विरोधात बोलणे हे नागरिकांचा 'आउटलेट' आहे, ते जर दडपशाहीने बंद केले जात असेल तर देशात अराजकता माजेल. या व्यवस्थेच्या विधानाची पावलोपावली येणारी अनुभूती कॉमनमॅनला यांना ततपप करणारी आहे चोहोबाजूंनी अनामिक दहशतीच्या विळख्यात सामान्य माणूस अस्वस्थ आहे. दडपशाही आणि ठोकशाहीच्या व्याख्या लोकशाहीत सबळ करण्यात भक्तमंडळी गुंतलेली आहे. विवेकाला अर्थात मानवतावादाला हरताळ फासणारी झुंडशाही सार्याच क्षेत्रात आपले 'सेन्सॉरशिप' गाजवत आहे.

पोकळ घोषणांनी, महागाईने, जातीय विद्वेषाने आणि देशद्रोहाच्या नव्या परिभाषाने सामान्य जीवन जगणारा माणूस दिवसेंदिवस होरपळून निघताना दिसत आहे. जीवघेण्या घुसमट आणि घालमेलीत तो प्रचंड उद्विग्न झाला आहे. त्याचा सत्ता-धर्म-जात यांनी पार चोथा करून टाकला आहे. देव-देश-धर्माची भाषा बोलणारी पिलावळ या काळाचे नवीन अपत्य आहे. अशा दूषित सामाजिक पर्यावरणाचा अचूक वेध महानगरीय संवेदनेची कविता घेताना दिसते. भ्रष्टाचार अनीती, चंगळवाद, बाजारशरण मानसिकता यामुळे आजच्या माणसाचे जगणे बदललेले आहे. महानगरीय कवितेसंदर्भात कवयित्री नीरजा म्हणतात, ऐंशी नंतरच्या महानगरीय कविता लिहिणाऱ्या अनेक कवींवर आजही अनियतकालिकांची चळवळ आणि विशेषतः चित्रे-कोल्हटकर या दोन्हींचा प्रभाव असल्याचं आपल्याला जाणवत यातील काही कवी या प्रभावातून बाहेर पडून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. अभिधानंतर, शब्दवेधसारखी नियतकालिक अशा कवींच्या आज हातात आहेत. आणि या व्यासपीठाचा उपयोग ते चित्रे-कोल्हटकरांनी बळ दिलेल्या पण काहीतरी वेगळे सांगण्याचा प्रयत्न करणाऱ्या कवींच्या कविता लोकांपुढे आणण्यासाठी प्रयत्न करतात. नव्याचा शोध घेण्याच्या त्यांच्या या प्रयत्नात गेल्या

दहा वर्षात अनेक कवी पुढे आले आहेत. त्यातील काही महत्त्वाची नावे आहेत, श्रीधर तिळवे, मंगेश काळे, हेमंत दिवटे, रमेश इंगळे-उत्रादकर, रवींद्र चावरेकर, मोहन बोरसे, नितीन कुलकर्णी, मन्या जोशी, नितीन रिंढे, अजय कांडर आणि वर्जेश सोलंकी या सगळ्याच कवींच्या जाणीवा ह्या आजच्या जगाशी जोडलेल्या आहेत. जागतिकीकरण, भ्रष्ट व्यवस्था, ऱ्हास पावत चाललेली मूल्यव्यवस्था ह्यातून आलेले नैराश्य, जगण्यात आलेला एकसुरीपणा यांनी अस्वस्थ झालेल्या या कवींमधल्या वीरनायकानं  केव्हाच मान टाकली आहे. महानगरातील झपाट्याने बदलणारं वास्तव त्यांना हादरून सोडत आहे. त्यांच्यातल्या सर्जनाला आव्हान देत आहे. एक प्रकारचं 'वांझ' निर्मितीक्षमता हरवलेलं जगणं कवी जगताहेत.[३]

महानगरातील माणसाचे जगणे त्याचा भोवताल गुदमरण्याच्या, भेदरण्याच्या सार्याच भयग्रस्त जाणिवा घेऊन जिवंत राहण्यासाठी जगणाऱ्या माणसाची ससेहोलपट, संघर्ष आणि यातनादायी प्रवास करणारा महानगरीय कवितेचा प्रवास आहे. क्षणोक्षणी श्वास घुटमळण्याच्या सार्या व्यथांना पचवत जाणारा हा माणूस महानगरीय कोलाहलात नुसताच जीवंत राहतो. हे भेदक वास्तव महानगरीय संवेदनेची कविता टिपताना दिसते. धर्म ही अफूची गोळी आहे. त्या धुंदीत धर्माच्या ठेकेदारांनी मांडलेला हैदोस आपण अनुभवत आहोत. 'जफर आणि मी' या कवितेत हिंदु-मुसलमानांमधील वाढत जाणारी दरी दिवसेंदिवस अधिकाधिक रुंदावत चालली आहे. महानगरातील शांतता घालवण्यासाठी धर्म नावाचा अणुबाँब सर्रासपणे वापरला जातो. याचं अत्यंत भेदक चित्रण कवी वर्जेश सोलंकी आपल्या कवितेत करताना दिसतात.

त्याची आई माझ्या आई सारखी
घरासाठी खपताना चेहऱ्यावरचे छिलके निघालेली
त्याच्या घरच्या भिंती माझ्याच घराच्या भिताडयासारख्या
कुठे कुठे पोपडे निघालेल्या
त्याचे बाबा हळहळतात माझ्या बाबांसारख

(ततपप/वर्जेश सोलंकी)

फाळणीच्या दिवसाबद्दल बोलताना सारं काही उद्ध्वस्त झालेलं आपुलकीचं,जिवाभावाचं एकतेचं आणि एकात्मतेचे आमचं नातं एकाएकी परकं कसं झालं? हा सवाल सोलंकी विचारतात.

काय माहित मात्र काही दिवसापासून
कोणीतरी फिरवतोय गल्ली मोहल्ल्यातून
जफर व माझ्यातल्या वेगळेपणाची पत्रकं

(ततपप/वर्जेश सोलंकी)

शहरी कोलाहलात समाजाचे पार्टिशन करण्यासाठी आणि शहर धुमसत ठेवण्यासाठी ही ठिणगी नेहमी वापरली जाते,हे समकाळातलं भयंकर वास्तव आहे. मनुष्य, समाजमन, कुटुंबव्यवस्था हा आजवर माझ्या कवितेचा अस्वस्थतेचा व कुतूहलाचा विषय राहिला आहे.रोजचे धकाधकीचे जीवन जगताना सर्व सामान्य माणसाला पडणारे प्रश्न बघता-बघता त्याच्याच कविता माझ्याकडून लिहील्या  गेल्या. वर्तमानपत्रात छापून येणारी बातमी सारखी कविता नसावी. तिचे आघात कवितेला झेलावे लागतात. चांगल्या कवितेच्या निर्मितीसाठी कवीला वर्षानुवर्षे वाट पाहावी लागते. अशी तळमळीची आणि कॉमनमॅनबद्दलची कळकळ कवी वर्जेश सोलंकी व्यक्त करतात. लढणाऱ्या माणसांचे दुःख, व्यथा यांना वाट मोकळी करून देण्यातच कवितेचा खरा धर्म दडलेला असतो. अशा या भूमिकेची ही कविता आहे. महानगरीय कल्लोळात जीवघेणी अस्वस्थता वसंत पाटणकर नोंदवतात,

महानगरातील विशिष्ट परिस्थितीमुळे दीर्घकाळ वास्तव्य करणार्या माणसांची मानसिक घडण बदलते या विशिष्ट मानसिक घडण यालाच आपण महानगरीय संवेदनशीलता म्हणतो. उदाहरणार्थ महानगरातील माणसे, इमारती, दुकाने, वाहने इत्यादी गोष्टी गर्दीतून एकाकीपणाची भावना, व्यक्तित्व लोप झाल्याची जाणीव निर्माण होते. या गर्दीमुळे, प्रदूषणामुळे येथे कोणताही मोकळेपणाचा अवकाश नसतो.जेथे आपुलकी, ओलावा निर्माण होत नसतो. तर तुटकपणा, संवादशून्यता त्रुटीतता आणि प्रसंगी अमानुषता पाहावयास मिळते.

महानगरातील बहुतांश गोष्टी या नैतिकतेशी निगडीत असल्यामुळे यांत्रिकता, अमानवीकरण, अमानुषपणा, परात्मता या गोष्टींचा अनुभव येथे येतो. किंवा महानगरातील गतिमानता तेथील घड्याळ्याच्या काट्यावर चालणाऱ्या वेगवान जीवनामुळे सततचा ताण,व्यग्रता,अस्वस्थता जाणवत राहते. सारांश महानगरीय संवेदनशीलतेचे ठळक विशेष सांगायचे तर ते साधारणपणे पुढीलप्रमाणे आहेत एकाकीपणा, अर्थशून्यता, पोरकेपणा, अमानवीकरण, अमानुषता, बधिरपणा, व्यक्तित्वलोप, परात्मभाव, असंबध्दता, संवाद शून्यता, त्रुटीतता, तुटकपणा, सततची व्यग्रता, ताण इ.

जागतिकीकरणात महानगरीय माणसांचे बदललेले रूप-स्वरूप अस्वस्थ करणारे आहे. या धकाधकीच्या आणि गोंधळाच्या सार्वत्रिक स्थितीत तो जगणारा माणूस किती यातना कवेत घेऊन जगत आहे. आजूबाजूचा विसंवादाचा ,विसंगतीचा कोलाहल आहे. तरी तो शहरीकरणाच्या अब्रुची आब राखत जीवनाच्या संघर्षात उतरलेला दिसतो. तरीही जागतिकीकरणात विविध ब्रँडमुळे मानवी जीवनशैलीमध्ये झालेला बदल, त्या बदलाला सामोरा जाणारा माणूस यांचे सूक्ष्म आणि मार्मिक चित्रण कवी मन्या जोशी करताना दिसतात.

मी कोक पिऊन
बुडबुडती हिपहॉप
एमएनसीजचं इन्टिग्रेटेड सर्कीट
रिसायकल शब्दांची जीन्स
पाडते सोशिक डोळे

(ज्याम मज्या/मन्या जोशी)

महानगरातील एकाकीपणात गुदमरलेलं आयुष्य, सायरनच्या आवाजात बोथट झालेली संवेदना, मुड्याप्रमाणे निश्चेत थंड गोळ्यासारखी जगणारी माणसे

तरीही आपलं सगळं कसं आलबेल असतंअशा अविर्भावात जगताना दिसतात. अनैतिक गोष्टींना बळ पुरवत सोयीच्या भूमिका घेणारे प्रसंगी दिसल्यावर ही न दिसल्यासारखे करणारे मध्यमवर्गीय पांढरपेशी माणसे परिवर्तनाचा गाडा पुढे सरकू देत नाही. अशी खंत महानगरीय कवितेतून व्यक्त होताना दिसते. आजच्या वर्तमानात जगणारी लहान- लहान मुले दहशतीचा चेहरा घेऊन हिंडू लागली, तर अशा भयंकराच्या काळात आम्ही जगत आहोत. याची जणू साक्ष कवी वर्जेश सोलंकी यांची कविता देते.

मुलगा
गमतीने रोखतो माझ्यावर
खेळण्यातील पिस्तूल
मीही त्याला बरं वाटावं म्हणून
करतो हँड्सअप
येत राहतो त्याच्या बंदूकीतून
गोळ्यांचा तांत्रिक आवाज
हा एकंदर खेळ असतो वरपांगी
माझ्या तुमच्या सगळ्यांच्याच नजरेतून
मात्र त्याच्या डोक्यात तयार होत गेलेल्या खून्नशीचं काय?
(ततपप/वर्जेश सोलंकी)

ही खुन्नस संवेदनशील माणसाला अस्वस्थ केल्याशिवाय राहत नाही.व्यापार संस्कृतीमुळे नवी अर्थनीती, राजकारण, दहशतवाद, सामाजिक पर्यावरण आणि संस्कृतीवर आघात करणाऱ्या घटनांनी मानवी जीवन ढवळून निघाले. रोजचे जगणे-मरणे संशयाच्या भोवर्यात सापडले. या सगळ्या घटनांचा प्रभाव मानवी व्यवहारावर पडल्यामुळे महानगरातील नवमध्यमवर्ग ढवळून निघाला. त्याचे पडसाद कलामाध्यमातून दिसून आले. राष्ट्रीय स्तरावरील अनेक घटितांनीही सामान्य माणसाच्या जीवनात आलेली स्थित्यंतरे ही अत्यंत महत्त्वाची आणि प्राणांतिक आहेत.[४]

वर्तमान काळातील अतिशय जटिल बनलेल्या सामाजिक वास्तवाचे संदर्भातून महानगरीय कवितेचे कलात्मक मूल्य हरवले जाणार नाही, याचे सजग भान महानगरीय संवेदनेची कविता लिहिणाऱ्या कवींना आहे.

**ग्रामीण कविता** – ग्रामीण जीवन वास्तवाचे चिंतन करणारी कविता श्रीकांत देशमुख, इंद्रजीत भालेराव, प्रकाश किनगावकर, कैलास दौंड, गणेश भाकरे, संतोष पद्माकर पवार, ऐश्वर्य पाटेकर, रवि कोरडे, केशव सखाराम देशमुख, बालाजी मदन इंगळे, केशव खटिंग, भारत दौंडकर, कल्पना दुधाळ अशा कितीतरी कवींनी लिहीलेली आहे, असे दिसते.

१९ मार्च १९८६ रोजी साहेबराव करपे या शेतकऱ्याने कुटुंबासह जगाचा निरोप घेतला. देशातील ही शेतकऱ्यांची पहिली आत्महत्या आहे. आज ३५ वर्षे उलटून गेली. तरी शेतकऱ्यांची दैना काही संपत नाही. उलट दिवसेंदिवस वाढत जात असल्याचे चित्र समोर उभे राहत आहे. अन्नदात्यासाठी एक दिवस अन्नत्याग करून त्यांच्या वेदनांचा, दुःखांचा पाढा मायबाप सरकार समोर मांडला, खरा पण गेंड्याच्या कातडीचे शासन कर्जमाफी नावाच्या भुलभुलैयात शेतकऱ्यांची फरफट करीत आहे. आत्महत्या करायला भाग पाडणाऱ्या साऱ्या घटकांचा धिक्कार आहे. पालनकर्ता असलेल्या शेतकऱ्याला जीवन संपून घ्यावेसे वाटते म्हणजेच माणूस म्हणून जगणाऱ्या साऱ्यांना शरमेने मान खाली घालायला लावणारी ही घटना आहे. कुटुंब, समाज यातून या पोषणकर्त्याने कुणाकडे बघावे. म्हणजे त्याला आपला आत्महत्येचा विचार टाळता येईल. मुलाबाळांचा आपल्या संसाराचा विचार न करता फासावर चढतो आणि आम्ही दिवसागणिक आत्महत्येच्या संख्येत आत्महत्यांचे भर घालत, कळवळा आणि उसणे अवसान आणत दुःखात सामील झाल्याचे नाटक करतो.

दुःख दळून खाणाऱ्याला
आत्महत्येच्या कड्यावर
आणून पोहोचवणा-यांनो
देवाचं जातं दमान फिरतं
पण फार बारीक दळतं
असं कबीर सांगून गेलाय
(टाहो/इंद्रजीत भालेराव)

शेतकऱ्याला आत्महत्या करायला लावणा-यांचा नरडीचा घोटं घेतल्याशिवाय थांबणार नाही. आणि हे चक्र पूर्ण झाल्याशिवाय राहणार नाही. असा अत्यंत कडवट शाप देऊन ग्रामीण कविता अंतर्मनाने तळतळून जाते. शेतकरी आत्महत्याच्या भीषण वास्तवाचे उत्तर व्यवस्थेला अजूनही देता येत नाही. शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नावर टाहो फोडत गगनभदी किंकाळीने अजगरासारख्या सुस्तावलेल्या शासन, प्रशासन, अधिकारी, समाज, दलाल, सावकार, खोत या साऱ्यांना झोपेतून जागे करण्याचा प्रयत्न १९९० नंतरची ग्रामीण कविता करताना दिसते. जिथे पायांनाही शेताची माती लागत नाही, जिथे गोठ्यातील खंडीभर गायी नजरेला पडत नाहीत. जिथे बैलांचा पोळा मोडीत जाऊन ट्रॅक्टर्सचा पोळा भरू लागला. जिथे दुधान्यातले दूध गरम करणे संपुष्टात आले आहे. जिथे घरी बीज धरून ठेवून पेरणीसाठी नंतर बाहेर काढणे संपले आहे. जिथे सडकेभवतीची शेती कुक्कुटपालन,डबररोटींचा कारखाना,मॉल उभारणी कॉलन्यांची स्थापना किंवा ढाबे हॉटेल्स यांच्यासाठी विकली गेली आणि एकूणच तिथला 'बळीराजा' या व्यवस्थेने खुला करून संपून टाकला. तेथील लेकरांनी लिहिलेली 'ग्रामीण' असणारी कविताच भेसळींची होऊन बसली.[५]

जीवनाचे सुंदर सुजलाम-सुफलाम चित्र निव्वळ कल्पनेच्या जोरावर उभे करणाऱ्या आणि ग्रामीण कविता एसीच्या चार भिंतीत रंगवून तिचं लोभस रूपडं मांडणाऱ्या साऱ्या कवी, पत्रकार, लेखक, दिग्दर्शक यांना ग्रामीण कविता एक सणसणीत चपराक दिल्याशिवाय राहत नाही. काही दिवसापूर्वी किसान

मोर्चाचा विधिमंडळावर निघालेला लॉंग मार्च उभ्या भारताने पाहिला. दोनशेमैलांची पायपीट करून येणाऱ्या बाया माणसांच्या पायांचे सालपट निघालेल्या उभ्या देशाने पाहताच, एकच कळवळा दाटून आला, पण काही दिवसात त्यांच्या मूलभूत प्रश्नांचा विचार करावा, उजळणी करावी, पाठलाग करावा, जाब विचारावा असे कुणालाच कसे वाटले नाही. काही दिवसात शेतकऱ्यांच्या प्रश्नांना बगल देणाऱ्या शासन-प्रशासन सोबत शेतकऱ्यांचे बगलबच्चे दावणीला बांधले जातात. तेव्हा ते हतबल होणार नाही तर काय करतील? शेतकऱ्यांचा वाली संपला आहे. असं वाटणं साहजिकच आहे. दिल्लीच्या भोवती शेतकऱ्यांच्या प्रश्ना सोबत आंदोलन करणारे शेतकरी व्यवस्थेला नक्षलवादी आणि दहशतवादी वाटतात, यातच सत्ताधीशांची संवेदना किती टोकदार आहे, याचा प्रत्यय आल्यावाचून राहत नाही. वर्तमान परिस्थितीत गाव ग्लोबल व्हिलेज झाल्याची अनुभूती येत असताना गावच्या गाव जागतिकीकरणाच्या विळख्यात मरणासन्न अवस्थेत शेवटच्या घटका मोजत आहे. आपुलकी- ओलावा, माणुसकी आणि जिव्हाळा यांचा दरेक पावलावर होणारा खून गाव बदलल्याची साक्ष देत आहे. ग्रामीण जीवनात नव्या गुंतागुंतीचे समस्याची नीट उकल केल्याशिवाय गाव-खेडी उभी राहू शकणार नाहीत. विस्कटलेली घडी सावरायची असेल तर नव्या आव्हानांना तोंड देता आले पाहिजे. नवे कायदे आणि नवी व्याख्या येऊनही माणसातील विसंवाद वाढत चालला आहे. नागर भागाचे अनुकरण करण्यात खेडी- गाव स्वतःचे सत्त्व-तत्व हरवत चालले आहेत. महात्मा जोतिराव फुले यांच्या काळातील शोषक कमजोर झाला असता तरी खेड्यातून आलेला दबंगगिरीचे राजकारण करणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरातला नवा शोषक आज जन्माला आला आहे. तो अधिक धूर्त,चतुर, चाणाक्ष बेरकी, लबाड आणि नीती आणि अनीतीची ऐशीतैशी करणारा आहे.यांचे कडून शेतकऱ्यांचे, कष्टक-याचे शोषण थांबवणे हेच मोठे आव्हान आहे. त्यासाठी सकल शेती मातीच्या नव्या समस्या समजून घेणे आज काळाची गरज आहे. ग्रामीण साहित्याचा जन्म चळवळीतून झाला आहे. शेटजी-भटजी आणि लाटजी यांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवताना महात्मा फुले यांनी शेतकर्यांचा आसुड, गुलामगिरी, ब्राह्मणांचे कसब या सारखे ग्रंथाचे लेखन केले. फुले-शाहू -आंबेडकर आणि मार्क्स यांच्या विचार सूत्रावर ग्रामीण साहित्याचा डोलारा उभा आहे. ग्रामीण कवितेचा अभ्यास ग.ल. ठोकळ यांच्या 'सुगी' आणि 'मीठभाकर, बहिणाबाई चौधरी यांची गाणी असा झालेला दिसतो. तो परावर्तित करण्याचे काम समकाळातील ग्रामीण कविता करताना दिसत आहे. शेती-मातीशी नाते सांगणाऱ्या माणसाचे चित्रण ग्रामीण साहित्याचा मूलाधार आहे. काळया मातीशी असणारा लळा कवितेचे भावविश्व ढवळून काढतो. कृषीवलांच्या अनुभवातूनच अस्सल साहित्य जन्माला येत असते, त्याला ग्रामीण कविता देखील अपवाद नाही. अठराविश्व दारिद्र्याचा भार डोईवर उचलणाऱ्या शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या, कास्तकारांच्या, कुणब्यांच्या जीवनातील करूण कहाण्या ग्रामीण कवितेने अधोरेखित केल्या आहेत. आस्मानी संकटांनी मेटाकुटीला आलेला बळीराजा सुलतानी आश्वासनाच्या जीवघेण्या धगीत पुरता होरपळून निघत आहे. ग्लोबलायझेशनचा सर्वात मोठा फटका भारतीय शेतीला बसला आहे. तरीही शासन पातळीवर याची दखल निव्वळ कागदात बंदिस्त झाली आहे. अशा साऱ्याच पातळीवर झालेली शेती जीवनाची वाताहत ग्रामीण कवितेचे सत्व आहे.

भारत हा कृषिप्रधान देश आहे;असे लिहिताना, बोलताना बरं वाटतं. पण भारत हा भांडवली व्यवस्थेचा पाठीराखा बनत चालला आहे,हे नाकारता येणार नाही. म्हणून तर शेतकऱ्यांनी कर्जमाफी रेंगाळत ठेवून उद्योगपतींचे कोट्यावधी कर्ज माफ करणारे शासन राजरोसपणे सत्ता उपभोगताना दिसत आहे.

रोज मनानं कोरडा
मज भेटतो माणूस
देतो लुचून हातात
बिनदाण्याचं कणीस

(भूईशास्त्र/ ऐश्वर्य पाटेकर)

आजपोवतो लेखणीच्या अभ्यासकांनी शेतकरी जीवनाला 'टिपिकल' पणे चित्रित केलेले आहे. त्याला कधी उदात्त, उदार आणि कमालीचा भावूक दाखवला, तर कधी लबाड, व्यसनी, लफंगा, खलनायक पद्धतीने दाखवला, तर कधी गबाळा, विदूषक वृत्तीचा असा शेतकरी साहित्यातून चित्रीत झालेला होता. खाउजा धोरणाच्या बदलामुळे तो मरणासन्न होऊन निपचित पडला हे दाखवण्याचे धैर्य आणि धाडस नव्वदोत्तर ग्रामीण कवितेने केले आहे. हातात शिंगाडे घेऊन जाब मागणारा, आपल्या न्याय हक्कासाठी अविरत लढा देणारा शेती -माती -नाती यांच्याशी सजगतेने आधुनिक दृष्टीने पाहणारा कुणबी हे आधुनिक जगाच्या उंबरठ्यावर १९९० नंतरच्या साहित्याने प्रकर्षाने मांडले आहे. हे निरीक्षण नोंदवणे, मला गरजेचे वाटते.

ताठ कणा आणि बळीबाणा दाखविल्याशिवाय कुणब्यांचे जगणं बदलणार नाही, किती काळ सहन करत राहाव्यात यातना, वेदना आणि हतबलता आता ठरवलं पाहिजे, आमच्या मालाचा भाव पाडणाऱ्या सरकार, दलाल, व्यापारी यांना वठणीवर आणावे लागेल. हातावर तुरी देऊन पसार होणाऱ्या सरकारला जाब विचारावा लागेल.

गळ्यातला फास काढ
माळ खुंटीला टांग
डोळ्यामधून आग ओक तीच
आतड्याचा कर चाबूक
नरड्यावर पाय दे,राक्षसांच्या...
पहा सगळे कसे
तुझ्या पायी लोळण घेतील..!

(वाताहतीचे शब्दशिल्पे/ महेंद्र भास्कर पाटील)

उत्तर आधुनिक काळात देशातील सरंजामी आणि धूर्त व्यवस्थेला सुरुंग लागला पण औद्योगिकीकरणाच्या भयंकर अशा भांडवली व्यवस्थेने दबंगगिरी निर्माण केली. भांडवली व्यवस्थेने माणूस विचारच करू नये यासाठी नवनवी उपभोगाची साधनांची रेलचेल बाजारात सुरू ठेवली आहे.उपभोग आणि चैनीच्या विलासात माणूस डोळे बंद करून बसला आहे. भांडवलशाही व्यवस्थेला गोंजारत त्यांची मुले राज्यकर्त्यांचे पाय चाटण्यात धन्यता मानत आहेत.

निष्कर्ष :

१) महानगरीय आणि ग्रामीण कविता यांचा अनुबंध स्पष्ट करताना उत्तर आधुनिक काळामध्ये ग्रामीण कविता आणि महानगरीय कविता खाउजा धोरणामुळे माणसांच्या बाजारशरण मानसिकतेचा वेध घेताना दिसते.

२) बहुजनवादी विचारधारा कवितेच्या माध्यमातून प्रसवणारे आणि बदललेल्या सामाजिक परिप्रेक्ष्यातून सांस्कृतिक मूल्यसंवेदना मांडणारे महानगरीय आणि ग्रामीण कवी यांचा वैचारिक अनुबंध एकरेषीय संवेदन पातळीवर आहे; सांगता येते.

३) अत्यंत वेगळ्या सामाजिक तथा सांस्कृतिक वातावरणातून आलेल्या कवींची भावना, वेदना आणि संवेदना या पातळीवर आढळणारे सारखेपण म्हणजे आजच्या वर्तमानाचा कालस्वर पकडण्याच्या माध्यमातूनच हा सारखेपणा आला असावा, असे मानण्यास हरकत नाही.

४) वेगवेगळ्या सामाजिक आर्थिक राजकीय तथा सांस्कृतिक भोवतालाचे पडसाद महानगरीय आणि ग्रामीण कवितेत उमटताना दिसतात. एकंदरीतच सामाजिक आणि सांस्कृतिक कल्लोळाची ही कविता आहे, असे सांगता येते.

५) जात-पात, धर्म -पंथ, प्रांत हा अभिनिवेश बाजूला सारून भाषा- बोलीभाषा, व्यवहार, लोकनिती, लोकपरंपरा यांचा समन्वय साधणारी महानगरीय आणि ग्रामीण कविता आहे.

**संदर्भ**

१) जागतिकीकरण बदलते सामाजिक वास्तव आणि समकालीन मराठी कविता- पी. विठ्ठल, अक्षरवाङमय प्रकाशन, पुणे)

२) सर्वधारा- दशकपूर्ती विशेषांक/ जाफेमा/ २०१७ नव्वदोत्तर कवितेची सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी- प्रवीण दशरथ बांदेकर- (पृ. क्र.१८व १९)

३) ऐंशी नंतरची मराठी कविता- नीरजा आमची श्रीवाणी वर्ष १२ अंक १ ऑक्टोबर २००४ ते जानेवारी २००५ का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे (पृ. क्र.२१ व२२)

४) सर्वधारा- दशवर्षपूर्ती/ विशेषांक/ जाफेमा/२०१७/नव्वदोत्तर महानगरी कविता-दा.गो.काळे पृ.क्र.४२)

५) सर्वधारा -दशकपूर्ती विशेषांक/ जाफेमा/२०१७ नव्वोदत्तर ग्रामीण कविता- डॉ.केशव सखाराम देशमुख पृ.क्र.५१)

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# सातपुड्यातील भिल्ल आदिवासींचे समाज जीवन
# (विशेष संदर्भ नंदुरबार जिल्हा)

**सहा. प्रा.करणसिंग. टी.वळवी**
ज. जि. म. प्र. सह. समाजाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव

**सारांश –**

सातपुड्यातील भिल्ल आदिवासी समाज आदिवासी हा शब्दच मुळात आधीपासून विशिष्ट भूप्रदेशावर राहणाऱ्या लोकांचा समूह या अर्थाने वापरला जातो. यातून आदिवासी या देशातला मूळ रहिवासी आहे, हे अधोरेखित होते. म्हणूनच त्यांच्यासाठी आजच्या आधुनिक परिवर्तनवादी व्यवस्थेत त्यांना 'मूळ निवासी' असे बिरुद वापरले होते. हा समाज मुळात जन्मत:च फारच जिद्दी व मेहनती असल्यामुळे यांना 'कष्टकरी समाज' म्हणून ओळखले जाऊ लागले. डोंगर, जंगल, दऱ्याखोऱ्यातील नैसर्गिक साधन संपत्तीवर आधारितत्यांची दिनचर्या असते. सातपुड्यातील आदिवासींचे सांस्कृतिक जीवन अतिशय आगळेवेगळे आहे. आदिवासी समाजाच्या जीवन पद्धतीत कला, श्रद्धा, मूल्य, सण, परंपरा इत्यादींचा समावेश आहे. आदिवासी जमातीचे सांस्कृतिक मूल्ये, जीवनपद्धती, कला इ. भिन्न व इतर समाजापासून वेगळी आहेत. त्याचप्रमाणे त्यांच्या लग्न पद्धती, नृत्य प्रकार, सामाजिक चालीरीती, देवदेवता ही त्यांची संस्कृतीची वैशिष्ट्ये आहेत.

भिल्ल आदिवासी जमातीचे जीवन अगदी साधे आहे. त्यांच्यात अनेक रूढी, परंपराचे आजही पालन केलेजाते. आदिवासी समाजात प्रदेशानुसार भाषेतही वेगळेपणा दिसून येते. सातपुड्यातील भिल्ल समाज धर्माकडे फार आदराच्या भावनेने पाहिले जाते. त्यामुळे त्यांचे जीवन अधिक सुलभ होऊन अनेक संकटापासून त्यांची सुटका होत असते. असा त्यांचा समाज असल्यामुळे आदिवासींचे धार्मिक जीवनसत्तेला विशेष महत्व दिले जाते. धर्मामध्ये कोणत्या ना कोणत्या प्रकारे नैसर्गिक शक्तीवर विश्वास ठेवला जातो व प्रार्थना, पूजा विधीद्वारे त्या शक्तीला प्रसन्न केले जाते. आदिवासी समाजात सामाजिक जीवनावर धार्मिक संस्कृतीचा प्रभाव असतो.३

आदिवासींचे धार्मिक जीवन हे धार्मिक आचरण प्रणालीचे असते. म्हणून प्रत्येक समाजात धर्मानुसार आचरण केले जाते.प्रार्थना, यज्ञ,धार्मिक विधी, निषेध, नियम या माध्यमातून आदिवासींचे धार्मिक जीवन दैवशक्तीवर आधारित असल्याचे दिसून येते.सद्यस्थितीत अजूनही आदिवासी समाजाची संस्कृती आणि अस्तित्व टिकून आहे.रक्तसंबंधावर आधारित एकात्मिक संघटना, समान बोलीभाषा व समान लोकसाहित्य तसेच सामाजिक,सांस्कृतिक एकजिनसीपणा कायम आहे. मात्र आदिवासीमध्ये लेखनकलेचा अभाव दिसतो. याचे कारण म्हणजे त्यांची बोलीभाषा लिपिबद्ध नाही. आदिवासी समाज जीवनात धर्म आणि जादूटोणा आजही महत्त्वपूर्ण आहे.

आदिवासी समाजात आज महाराष्ट्रात अनेक आदिवासी जमाती आहेत. प्रत्येक आदिवासी जमातींचे सामाजिक जीवन, आर्थिक जीवन, सांस्कृतिक वैशिष्ट्ये, चालीरीती, धार्मिकता यांच्यात सारखेपणा आढळत नाही. प्रत्येक जमातीचे सामाजिक जीवन हे सभोवतालच्या भौगोलिक, आर्थिक परंपरागत चालत आलेल्या आणि रूढ झालेल्या जीवनदृष्टीने बनलेले आहे. तसे असले तरी सर्वसामान्य आदिवासीचे जीवन त्यांचे मूल्य आणि वैशिष्ट्ये यांच्यात सारखेपणा आढळतो.

**प्रस्तावना –**

आज महाराष्ट्रात अनेक आदिवासी जमाती आहेत. प्रत्येक आदिवासी जमातीचे सामाजिक जीवन, आर्थिक जीवन, सांस्कृतिक चालीरीती, धार्मिकता यांच्यात सारखेपणा आढळत नाही. प्रत्येक जमातीचे सामाजिक जीवन हे सभोवतालच्या भौगोलिक, आर्थिक, परंपरागत चालत आलेल्या आणि रूढ झालेल्या जीवन दृष्टीने बनलेले आहे. असे असले तरी सर्वसामान्य आदिवासींचे जीवन, त्यांचे मूल्ये आणि वैशिष्ट्ये यांच्यात सारखेपणा आढळतो.

आदिवासी विशिष्ट भू-प्रदेशावर राहणारा, मर्यादित लोकसंख्या असणारा, रक्तसंबंधावर आधारित गट, स्वतःची बोलीभाषा, लेखनकलेचा अभाव, स्वतःची वेगळी जीवनपद्धती तसेच साधी अर्थव्यवस्था असणारा समाज सीमित तंत्रविद्या, समान धर्म असणारा समाज जो इतर कोणत्याही समाजापेक्षा वेगळा आहे. दुर्गम, डोंगराळ व पहाडी भागात वसलेला रक्तसंबंधाला विशेष महत्त्व देणारे आदिवासी वैयक्तिक आशा-आकांक्षा नसतात. निसर्गपूजक व निसर्गाच्या नेहमी सहवासात राहून मनमोकळे जीवन जगतात आणि तरीही निसर्गाची जोपासना करतात. परंपरागत रितीरिवाजांनी बांधलेल्या परंतु जीवनाचा समतोल कधी ढळू न देणारा आणि सध्यास्थितीत परिवर्तनात काही प्रमाणात समायोजन साधणारा समाज म्हणजे आदिवासी समाज होय.

निसर्ग आणि मानवी मूल्यांशी अतूट नाते सांगणारी आदिवासींची संस्कृती ही जगातील एकमेव संस्कृती आहे. निसर्गाशी थेट नाते आदिवासी समाजाचे आहे. आदिवासी तेथे जंगल आणि जंगल तेथे आदिवासी असल्यामुळे निसर्गातील प्रत्येक वस्तूला ते दैवत म्हणतात. निसर्गवर त्यांची नितांत श्रद्धा दिसते. झाडांची पूजा करणे, डोंगर नदी-नाला, झाड-वृक्ष-वेली यांना देव मानून आदिवासी समाज निसर्गाच्या कधीही विरुद्ध गेला नाही. परिवर्तनाच्या प्रक्रियेत आदिवासी संस्कृतीचे वेगळेपण आजही टिकून आहे.सातपुड्यातील आदिवासींच्या पावरा, भिल्ल,गावित, मावचीया जमाती आहेत. तर वळवी, पाडवी, वसावे, पराडके, तडवी, राहसे, ठाकरे ही कुळे आहेत.

सातपुडा प्रदेश हा प्रामुख्याने भिल्ल प्रदेश म्हणून ओळखला जातो. त्यात राजस्थान, गुजरात आणि मध्य प्रदेशातील पर्वतरांगा, विंध्य आणि अरवली पर्वतांचा भाग, महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, जळगाव, अमरावती हे सातपुडा पर्वतरांगेत आहे. महाराष्ट्र राज्याच्या वायव्य दिशेस नंदुरबार आणि धुळे हे

जिल्हे आहेत. त्यांच्या उत्तरेस मध्यप्रदेशचा मेवाड जिल्हा, पश्चिमेस गुजरातमधील सुरत, भरूच जिल्हा, दक्षिणेस नाशिक जिल्हा, पूर्वेस जळगाव जिल्हा असा सातपुडा पर्वताचा विस्तार आहे.

**आदिवासींचा अर्थ –** नागरी व ग्रामीण समाजापासून दूर डोंगर, दऱ्याखोऱ्यात, जंगलात राहणाऱ्या व्यक्तींच्यासमूहांना आदिवासी असे म्हटल्या जाते. या आदिवासींना 'धरतीचे लेकरू' किंवा 'जंगलाचे राजे' असे म्हटले जाते. एलवीन, ए. व्ही. ठक्कर या अभ्यासकांनी या आदिवासींना अगदी 'मूळचे रहिवासी', 'प्राचीन' म्हटले आहे. तर हटटन यांनी त्यांना 'आदिम किंवा आदिवासी' म्हटले आहे. डॉ. जी. एस. धुर्ये यांनी त्यांना 'तथाकथीत, मूळचे रहिवासी व मागासलेले असे हिंदू' म्हटले आहे. भारतीय राज्यघटनेत त्यांचा उल्लेख 'अनुसूचित जमात' असा केला आहे.

**आदिवासी जमातीची व्याख्या –** आदिवासी समाजातील लोक म्हणजे अतिशय मागासलेले किंवा मागासलेला समाज असे आजपर्यंत सर्व सामान्यत: समीकरणच बनले आहे. परंतु असे मत किंवा विचार मांडणे चुकीचे आहे. म्हणून मानववंशशास्त्रज्ञ व अभ्यासकांनी आदिवासी समाजाच्या केलेल्या व्याख्या बघणे आवश्यक आहे. सन १९६२ साली शिलाँगमध्ये आदिवासी समितीच्या परिषदेने केलेली व्याख्या पुढीलप्रमाणे, ''एकसमान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजांपासून उत्पत्ती सांगणाऱ्या, एका विशिष्ट भू-प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागे असलेल्या, अक्षर ओळख नसलेल्या व रक्त संबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रीतीरिवाज यांचे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला 'आदिवासी समाज' म्हणतात.''

डॉ. मजुमदार यांनी आदिवासींची केलेली व्याख्या खालीलप्रमाणे, ''समान नाव असणारा, एकाच भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, एकच बोली भाषा बोलणारा व विवाह व्यवस्था इत्यादी बाबतीत समान निषेध नियमाचे पालन करणारा व परस्पर अंतरदायित्व निर्माण कररण्याचा दृष्टीने एक पद्धतशीर अर्थव्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटुंबाचे किंवा समान समूहाचे एकत्रीकरण म्हणजे 'आदिवासी समाज' होय.''

**संशोधनाचे उद्देश –**

१. सातपुड्यातील भिल्ल आदिवासींचे सामाजिक जीवन अभ्यासणे व सामुदायिक सण-उत्सव, प्रथा, रूढी, परंपरा जाणून घेणे.

२. सातपुड्यातील भिल्ल आदिवासी जमातींच्या दैनंदिन जीवनात भिल्लांच्या देवी-देवतांविषयी असणाऱ्या श्रद्धा अभ्यासणे.

**संशोधनाचे गृहितके –** संशोधनासाठी पुढीलप्रमाणे गृहितके लक्षात घेऊन भिल्ल आदिवासी समाज निसर्गपूजक असून पूजा, प्रार्थना, बळी, नवस प्रथा, परंपरा याना विशेष महत्त्व देतात. सुखदुःखाच्या प्रसंगी भिल्ल देवीदेवतांची अर्चना, उपासना, पूजा करतात व सामुदायिक सण-उत्सव साजरे करतात.

**संशोधनाची पद्धती –** प्रस्तुत शोधनिबंध शास्त्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब करून पूर्ण करण्यात आला आहे.तथ्य संकलन करताना प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही स्रोतांचा उपयोग केलेला आहे.

**प्राथमिक स्रोत –** संशोधनासाठी मुलाखत, प्रश्नावली व अनुसूचित निरीक्षण, सर्वेक्षण इ. माध्यमातून माहिती मिळवली आहे.

**द्वितीय स्रोत –** संशोधनासाठी ग्रंथ, मासिके,साप्ताहिक, वर्तमानपत्र, इंटरनेट इ. साधनांचा वापर केला आहे.

**आदिवासी भिल्लांचे कुळे व घरे –** आदिवासी जमातीमध्ये कुळाला (clan) एक आगळेवेगळे स्थान असते.कुळावरून कुळाचे संबंध, कुळाचा मातृभाव ठरतो. भिल्ल समाजातील कुळे पुढीलप्रमाणे आहेत - वळवी, पाडवी, वसावे, तडवी, परडके, राहसे, ठाकरे इत्यादी एकाच कुळातील मुला-मुलींचे विवाह निषेध मानले जाते. त्यांचे भाऊ-बहिणीचे नाते समजले जाते. मग ती मुलं-मुली कोणत्याही गावात राहणारी असोत. वधू-वर वेगवेगळ्या कुळातील असतील तरच भिल्ल समाजात लग्नसंबंध जोडतात. भिल्लची घरे सातपुड्यातील भिल्लांची वस्ती मुख्यत्वे डोंगर, टेकड्या, दाट वने, पठारे, डोंगरदऱ्या, खोऱ्यात त्यांच्या राहण्याची मूळ ठिकाण होतं. भिल्लांची घरे हे मातीचे, लाकडाचे, बांबूपासून तयार केलेले घरे आढळतात.

**वेशभूषा दागदागिने –** सातपुड्यातील भिल्लांची प्रत्येक समुदायाची वेशभूषा ही त्या समुदायाची ओळख दर्शवत असते. टी. बी. नाईक यांच्या मते, बहुतेक भिल्ल आदिवासी कपडे विणण्याची कला माहीत नसावी. कारण ते कधीही कपडे विणतांना दिसले नाहीत. आयते किंवा रेडिमेड कपडे ते वापरताना दिसतात. धोतर, बनियन, पगडी असा पेहराव पुरुषांचा तर स्त्रियांचा पेहराव नऊवारी लुगडं, नऊवारी लुगडी, (पातड) लुगडी नेसतात आणि पदर डोक्यावरून घेतात किंवा वडीलधाऱ्या माणसाचा सन्मानामुळे डोक्यावर पदर घेतात. स्त्रिया आखूड साडी, चोळीचा वापर करतात. आदिवासींना आकर्षक दागिने वापरायची पद्धत आहे. स्त्रीया आपल्या आवडीनिवडी आणि कुवतीनुसार चांदी किंवा सोन्याचे दागिने वापरतात. स्त्रियांच्या कानात रिंगा, पायात, हातात आणि हातांच्या भुजावर दागिने परिधान करताना आढळतात. स्त्रीया गळ्यापासून पायांच्या बोटापर्यंत खूप जाड दागिने वापरतात. सोन्याचे दागिने त्या खूप कमी वापरतात. नाकातील नथ, गळ्यातील चैन व फुली केवळ सोन्याची असते. आदिवासी भिल्लमध्ये काही शकुन हातावर गोंदवून घेण्याची प्रथा आहे. शहरी जीवनाच्या संपर्कामुळे पारंपारिक दाग-दागिने वापरण्याचे प्रमाण जरी कमी झाले असले तरी लग्न-सोहळा, उत्सव अशा वेळी पारंपरिक दागिने घातले जातात.

**धार्मिक जीवन –** प्रथा, चालीरीती आणि रूढी सामान्य सामुदायिक सण, उत्सव व पूजाविधि सातपुड्यातील याहामोगी देवी भिल्लांची मुख्य कुलदैवत मानले जाते. ते गुजरात येथील सातबारा तालुक्यात अतिघनदाट जंगलाच्या ठिकाणी आहे. देव-मोगरा हे तीर्थस्थान आहे. तेथे महाशिवरात्रीला या देवीची जत्रा भरते. हजारो स्त्री-पुरुष दर्शनासाठी येतात. तसेच तोरणमाळ येथील गोरखनाथ यांनादेखील भिल्ल पूजा विधी करतात. भिल्लांची सातपुड्यात चार तीर्थस्थळ ठिकाणे आहेत. त्यात अस्तंबा डोंगरावर यात्रा भरते. दाब आदिवासींचे थंड हवेचे ठिकाण. देवमोगरा, तोरणमाळ हे सातपुड्यातील भिल्लाचे आदिवासींचे तीर्थ ठिकाणे आहेत. यांच्या देव-देवता निसर्गाशी निगडित आहेत. सृष्टीतील पंचमहाभूते हीच त्यांना देवतारुपी वाटतात. देवतांना प्रसन्न करण्यासाठी ते अनेक उत्सव व विधी करतात.

**वाघदेव पूजा –** वाघ हा जंगलाचा स्वामी असल्याने परिसरातील माणसे व गाय-गुरांचं संरक्षण करावे, म्हणून आदिवासी वाघांची पूजा करतात. पूजेसाठी बकरा, कोंबडे बळी देतात.

**पोळा (आमास) –** ज्या बैलांच्या श्रमाने शेतीतून अन्नधान्य पिकवतो. त्या बैलांच्या कष्टातून उतराई होण्यासाठी हा सण साजरा करतात. पोळा या दिवशी बैल व नांगर यांची पूजा केली जाते. पावरा, भिल्लामध्ये बैलांच्या सणास 'पोळा' म्हणतात.

**भोंगऱ्या बाजार –** होळी सणाच्या एक आठवडा आधी भिल्ल, पावरा आदिवासींच्या वस्तीत किंवा तालुक्याच्या ठिकाणी हा भोंगऱ्या बाजार

भरतो. होळीसाठी लागणारे साहित्य, वस्तू खरेदी करण्यासाठी भिल्ल,पावरा समाज बाजारात येतात.

**लाह –** 'लाह' या शब्दाचा मराठी भाषेतील अर्थ मदत किंवा सहकार्य असा आहे. ही मदत शेती, गवत उचलण्यासाठी, घरबांधणी, शेतातील नांगरणी, वखरणी अशा विविध बाबीशी संबंधित असते. एखाद्या भिल्ल आदिवासी बांधव कामात जर मागे राहत असेल व त्याला मदतीची अपेक्षा असेल तर समाजातील लोक एकत्रित येऊन कुठलीही आर्थिक अपेक्षा न बाळगता त्याला सर्वांबरोबर नेण्याचा प्रयत्न करतात.

**धार्मिक प्रथा –**

**कणसुरीची पूजा –** कणसुरी ही धान्य पिकवणारी देवता आहे. सातपुड्यातील भिल्ल आदिवासी पाड्यात ज्वारीची मळणी करण्याअगोदर ज्वारीच्या कणसाच्या राशीचा पूजाविधी करतात. पूजाविधी केल्याने कणसुरी माता प्रसन्न होते. तिच्यामुळं धनधान्याला बरकत येते, असे म्हणतात. असा पूजा विधी केल्यानंतर नव्या ज्वारीच्या भाकरी खाण्यास सुरुवात करतात.

भिल्ल उत्सवात धुंदपणे नाचतात. देवी-देवतांची स्तुतीपर गाणी गातात. दुःखद प्रसंगी देवी-देवतांची करुणा भाकतात आणि मनोभावे त्यांची पूजा करतात. त्यांना प्रसन्न ठेवण्यासाठी बोकड, कोंबडी, नारळाचा नवस दाखवितात व सोबतच महूची दारूही अर्पण करतात. त्यांच्या सण-उत्सवात मोहाची दारू लागते. पूजाविधी प्रसंगी देवी-देवतांच्या नावाने जमिनीवर दारूचे दोन-तीन थेंब टाकून त्यांना आव्हान करतात. त्यात निसर्गातील झाडे-झुडपे, वेली,नदी-नाले, वृक्ष, टेकड्या, सूर्य, चंद्र, आकाश, तारे या सर्व नैसर्गिक निसर्गातील वस्तूंना यांनी देवत्व प्रदान केले आहे.

**होळी –** होळी हा भिलांचा मुख्य सण आहे. याचा प्रत्यय नंदुरबार जिल्ह्यातील भिल्ल, पावरा जमातीतील सण-उत्सव साजरा करण्याच्या पद्धतीवरून दिसून येतो. फाल्गुन महिन्यात चंद्रकोर दिसल्याबरोबर होळी आली, असा संकेत समाजाला दिला जातो.

सातपुड्यातील भिल्लांची मुळची होळी ही दाब मोरीराही येथे सर्वप्रथम पेटवली जाते. दाब या ठिकाणीची होळी देवतांनी पेटवून सुरुवात केल्याची आख्यायिका सातपुड्यातील आदिवासी भिल्लामध्ये प्रचलित आहे. यानंतर प्रत्येक गावात वेगवेगळ्या दिवशी होळी पेटवली जाते. हा होळीचा सण पाच-सहा दिवस चालतो. होळीला गूळ, नारळ, वाटी, खजूर, साखरगाठी यांचा नैवेद्य दिला जातो. आदिवासी होळीला ढोल वाजवण्याची प्रथा आहे. ढोल वाजवल्यानंतरच होळी पेटवतात. ढोलकीच्या तालावर बुद्ध्या, बावा आदिवासी होळीनृत्य सादर केले जाते. त्यांच्या डोक्यावर मोरपिसांचा टोप असतो, गळ्यात सुकलेल्या उंबराच्या किंवा टेंबर यांच्या माळा असतात. पायात लहान घुंगरू, कमरेला मोठे घुंगरू किंवा भोपळ्याचे तुंबडे बांधलेले आणि हातात धाऱ्या किंवा भाला असतो. अंगाला राख फासलेली असते. अशा प्रकारचा साज घेऊन भेरीच्या (बिरी-बिरी) तालावर कमरेला विशिष्ट बाक देऊन तांडव नृत्य सादर करीत असतात.

**विवाह प्रथा –** आदिवासी लोकांमध्ये विवाहांचे स्वरूप सर्वसाधारण हिंदू विवाह प्रमाणे धार्मिक नसून दोन कुटुंबातील तो एक करार सबंध एवढा मानला जातो. म्हणून त्यांच्या विवाह पद्धतीत फारसे विधी आढळत नाहीत. आदिवासी समाजात बालविवाहाची पद्धत नसून मुलगा किंवा मुलगी वयात आल्यावर विवाह होत असतात. व्यक्तीने कोणत्या वयात विवाह करावा आणि आपला जोडीदार निवडावा, याबद्दल आदिवासी समाजात काही निर्बंध प्रचलित आहेत. क्वचित अपवाद वगळले तर सर्वसाधारण वधूपेक्षा वरांचे वय २-४ वर्षांनी जास्त होऊ शकते. आपला जोडीदार निवडताना सामाजिक रूढींना अनुसरून तो जोडीदार विशिष्ट गटातलाच असला पाहिजे, इतर गटातला असू नये, असे निर्बंध असतात. नात्यातील कोणत्याही व्यक्तीबरोबर विवाह करता येतो. याबद्दल निश्चित नियम असून या नियमाचा भंग करणाऱ्याकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो. विवाह दोन व्यक्ती व कुटुंबातील करार एवढेच स्वरूप असल्याने पती-पत्नींचा जर कधी काही कारणावरून वाद निर्माण झाला तर घटस्फोट घेण्याची पद्धत सोपी व सहज असते.

**निष्कर्ष –**

१) सातपुड्यातील आदिवासी समाज हा निसर्गपूजक म्हणून ओळखला जातो. आजही आदिवासी निसर्गसंस्कृती जोपासत आहे.
२) आदिवासी भिल्ल समाजातील 'लाह' ही परंपरागत चालत आलेल्या पद्धतीमुळे गावातील लोकांना मदत करणे व त्यातून एकत्र येऊन काम करण्याचा महत्त्वाचा गुण आहे.
३) आदिवासी समाजात पोळा या सणातून बैल व नांगर यांना जास्त महत्त्व दिले आहे. ज्यामुळे आपले व कुटुंबाचे पोट भरते.
४) आदिवासी जमातीत होळी नृत्यात ढोल वाजंत्री व बुध्या बावा या नृत्यामुळे आदिवासी समाजात इतर समाजापेक्षा वेगळेपण दिसून येते.

**संदर्भ**

१) डॉ. गोविंद गारे, सातपुड्यातील भिल्ल : ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
२) प्रो.डॉ. पुष्पा गावित, आदिवासी संस्कृती : भाषा आणि साहित्य, अथर्व प्रकाशन, धुळे.
३) वाहरू सोनवणे, आमु आहि वाघा, भिल प्रकाशन, शहादा.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# उद्योजकता विकास : एक नावीन्यपूर्ण, सर्जनशील आणि नफा कमावण्याची प्रक्रिया

**डॉ. कोल्हे गोपाळ गोरख**
प्रोफेसर आणि मार्गदर्शक
वाणिज्य विभागप्रमुख,
धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर

**योगेश सुरेश पाटील**
संशोधक विद्यार्थी
नूतन मराठा महाविद्यालय,
जळगाव

**गोषवारा :**

*उद्योजकता विकास ही नवकल्पना, सर्जनशीलता आणि विविध वैज्ञानिक ज्ञान आणि अनुभव वापरून नफा मिळवण्याची प्रक्रिया आहे.*

*हे संघटन विकसित करते, जे भविष्यात व्यवसाय चालवण्यास, रोजगार प्रदान करण्यास आणि समाजाला आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या विकसित होण्यास मदत करते.*

*या संशोधनात मी उद्योजकांचे गुण, कार्य, ज्ञानाचा प्रसार, कार्यपद्धती आणि समाजाप्रती असलेली कर्तव्ये समजावून सांगण्याचा प्रयत्न केला.*

*उद्योजकांना भेडसावणाऱ्या आर्थिक समस्या, उद्योजकांना मदत करण्याची सरकारी कर्तव्ये, जागतिक बाजारपेठेत व्यवसायाचा विस्तार इत्यादी विषय संशोधनात समाविष्ट आहेत.*

**१) परिचय** (Introduction) –

उद्योजकता विकास ही संसाधने एकत्रित करण्याचे नवीन मार्ग शोधण्याची प्रक्रिया आहे. जेव्हा संसाधनांच्या या नवीन संयोजनाद्वारे व्युत्पन्न केलेले बाजार मूल्य, बाजार मूल्यांपेक्षा जास्त असते, तेव्हा ही संसाधने इतरत्र वैयक्तिकरित्या किंवा इतर काही संयोजनात निर्माण करू शकतात, तेव्हा उद्योजक नफा कमावतो.... उद्योजकता – Econlib, https://www.econlib.org

**एक उद्योजक –**

एक अशी व्यक्ती आहे जी एक नवीन व्यवसाय तयार करते, बहुतेक जोखीम सहन करते आणि बहुतेक पुरस्कारांचा आनंद घेते. व्यवसाय उभारण्याच्या प्रक्रियेला उद्योजकता असे म्हणतात. उद्योजकाला सामान्यतः नवकल्पक, नवीन कल्पना, वस्तू, सेवा आणि व्यवसाय/किंवा प्रक्रियांचा स्रोत म्हणून पाहिले जाते. ... https://en.wikipedia.org/wiki/Entrepreneurship

सुप्रसिद्ध उद्योजकांच्या उदाहरणांमध्ये बिल गेट्स, स्टीव्ह जॉब्स, मार्क झुकरबर्ग, पियरे ओमिड्यार, एरियाना हफिंग्टन आणि कॅटरिना फेक यांचा समावेश आहे.

मायक्रोसॉफ्टचे संस्थापक बिल गेट्स यांनी मायक्रोसॉफ्ट विंडोज, मायक्रोसॉफ्ट ऑफिस आणि इंटरनेट एक्सप्लोरर सारखी सॉफ्टवेअर आणि ऑपरेटिंग सिस्टम विकसित केली.

ॲपल कॉम्प्युटरचे सह-संस्थापक स्टीव्ह जॉब्स, Macs, iPods आणि iPhones तसेच Apple TV चे उत्पादन करतात.

मार्क झुकरबर्ग, फेसबुकचे संस्थापक.

पियरे ओमिड्यार, शइरू चे संस्थापक.

-rianna Huffington, Huffington Post चे संस्थापक, एक सुप्रसिद्ध ऑनलाइन न्यूज साइट.

कॅटरिना फेक, फ्लिकरची सह-संस्थापक, जी इंटरनेटवर प्रतिमा आणि व्हिडिओ होस्ट करते.

https://study.com/academy/lesson/what-is-an-entrepreneur-definition-characteristics-examples.html

जोखीम घेण्याची सहनशीलता ही उद्योजकांसाठी आवश्यक गुणधर्म आहे. नकारात्मक परिणामाची शक्यता असली तरीही तुम्ही जोखीम घेण्याचा विचार करू शकता. व्यवसाय सुरू करणे धोक्याचे असते आणि त्याहूनही अधिक म्हणजे जेव्हा तुम्ही तुमचे स्वतःचे पैसे वापरत असाल. काहीवेळा तुम्ही तुमच्या नवीन उपक्रमासाठी गुंतवणूकदारांना पटवून देऊन किंवा उद्योजक संघ तयार करून जोखीम पसरवू शकता.

उद्योजकांनाही सर्जनशीलता हवी. Macs, iPods आणि iPhones, तसेच Apple TV ची निर्मिती करणार्या Apple संगणकांचे सह-संस्थापक स्टीव्ह जॉब्स आणि Facebook चे संस्थापक मार्क झुकरबर्ग यांनी नाविन्यपूर्ण उत्पादने बाजारात आणली ज्याने आमची जगण्याची पद्धत बदलली.

यशस्वी उद्योजक, पहिल्या सेल्युलर फोनप्रमाणे पूर्णपणे नवीन उत्पादन किंवा सेवा बाजारात आणू शकतात. आयफोनने जसे स्मार्ट फोनचे जग बदलले तसे ते नाटकीय पद्धतीने एखाद्या गोष्टीवर आमूलाग्र सुधारणा करू शकतात.

https://www.entrepreneur.com/article/244210

**५ प्रकारचे उद्योजक –**

**संशयी उद्योजक –**

हा उद्योजक इतरांचे यश पाहतो आणि लगेच त्यावर प्रश्न विचारू लागतो. ते त्या व्यक्तीच्या व्यवसायाचे परीक्षण करतात आणि यशस्वी उद्योजकाला मिळालेल्या संधी किंवा वारसा शोधतात.

**कॉपीकॅट उद्योजक –**

हा उद्योजक इतरांचे यश पाहतो आणि त्यांची अचूक कॉपी करण्याचा प्रयत्न करतो. त्यांची वेबसाइट सारखीच आहे, त्यांची बिझनेस कार्डे सारखीच

आहेत आणि ते ज्या प्रकारे स्वतःला सादर करतात ते त्यांच्या उद्योगातील नेत्याची कार्बन कॉपी आहे.

**संशोधन उद्योजक –**

या उद्योजकाला शिकायला आवडते. ते व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा वाढवण्यासाठी धोरणांसाठी प्रत्येक संभाव्य परिस्थिती आणि परिणामांचे संशोधन करतात.

**दृढनिश्चयी उद्योजक –**

हा उद्योजक नाही ते करेल. काहीही झाले तरी, त्यांना उद्योजकतेचे मूल्य दिसते, कॉपी न करता यश मिळणे शक्य आहे हे ते पाहतात आणि त्यांचा व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा वाढवण्यासाठी ते प्रयत्न करतात.

**कुशल उद्योजक –**

या उद्योजकाने उद्योजकता आणि व्यवसाय उभारणीचे सर्व टप्पे पार केले आणि यशापर्यंत पोहोचले. ते त्यांचा व्यवसाय वाढवण्यावर आणि त्यांच्या आयुष्याच्या पलीकडे वाढलेला वारसा सोडण्यावर लक्ष केंद्रित करतात.

https://www.hive.org/world/the-history-of-entrepreneurship/

मूळ उद्योजक व्यापारी होते. मानवी व्यापाराचे पहिले ज्ञात उदाहरण १७,००० इइए च्या आसपास न्यू गिनी येथून आले आहे, जेथे स्थानिकांनी ऑब्सिडियनची देवाणघेवाण केली, एक काळा ज्वालामुखीचा काच इतर आवश्यक वस्तूंसाठी शिकार बाण बनवण्यासाठी वापरला जातो. या सुरुवातीच्या उद्योजकांनी वस्तूंचा एक संच दुसऱ्यासाठी बदलला.

**२. साहित्य पुनरावलोकन** (Literature revew)–

साहित्य पुनरावलोकन म्हणजे तुमच्या दिलेल्या विषयातील किंवा निवडलेल्या विषयाच्या क्षेत्रातील उपलब्ध साहित्याचा शोध आणि मूल्यमापन. हे तुम्ही ज्या विषयावर किंवा विषयावर लिहित आहात त्या संदर्भात कला स्थितीचे दस्तऐवजीकरण करते. साहित्य समीक्षेची चार मुख्य उद्दिष्टे आहेत: हे तुमच्या निवडलेल्या अभ्यास क्षेत्रातील साहित्याचे सर्वेक्षण करते. ... What is a literature review? https://www.rlf.org.uk : Resources

हे वर्तमान ज्ञानाचे विहंगावलोकन प्रदान करते, तुम्हाला संबंधित सिद्धांत, पद्धती आणि विद्यमान संशोधनातील अंतर ओळखण्याची परवानगी देते.

एक चांगली साहित्य समीक्षा केवळ स्त्रोतांचा सारांश देत नाही तर, त्या विषयावरील ज्ञानाच्या स्थितीचे स्पष्ट चित्र देण्यासाठी ते विश्लेषण, संश्लेषण आणि समीक्षक मूल्यांकन करते.

या उद्देशासाठी, खालील साहित्याचे पुनरावलोकन केले आहे. वेबसाइट्स, ब्लॉग्स आणि पोर्टल्स, वेबपेजेस, सोशल मीडिया इत्यादींवरून सोयीनुसार जास्तीत जास्त डेटा गोळा करण्यात आला.

–एलिझा लुकास पिंकनी (१७३९), मडायिंगफटू मेक अ डिफरन्स – उत्तर अमेरिका खंडात ब्लू इंडिगो डाईचा परिचय करून देणारी अमेरिकेतील पहिली महत्त्वाची कृषीतज्ज्ञ म्हणून तिला ओळखले जाते. https://www.hive.org/world/the-history-of-entrepreneurship

–मेरी कॅथरीन गोडार्ड (१७६६) – Spreading the word - अमेरिकेतील पहिली महिला प्रकाशक. https://www.hive.org/world/the-history-of-entrepreneurship

–लिडिया पिंकहॅम – ॲन लॅंडर्स – पिंकहॅम्स व्हेजिटेबल कंपाऊंड हे १९ व्या शतकातील सर्वात प्रसिद्ध पेटंट औषधांपैकी एक बनले. https://www.hive.org/world/the-history-of-entrepreneurship

**३. उद्दिष्टे**

१) उद्योजकता आणि उद्योजकता विकासाचा अर्थ अभ्यासणे.

२) या क्षेत्रात झालेल्या नवनवीन शोधांचा अभ्यास करणे.

३) अस्तित्वात असलेल्या जोखीम घटकांचा अभ्यास करणे.

४) नवीन नफा निर्माण करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

५) उद्योजकता विकासाच्या क्षेत्रात इंटरनेट तंत्रज्ञानाचा सहभाग शोधणे.

उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी आणि आवश्यक परिणाम प्राप्त करण्यासाठी, उपलब्ध अभ्यास साहित्य, पुस्तके, जर्नल्स, मासिके, वर्तमानपत्रे, साहित्य, इंटरनेट आणि विविध इलेक्ट्रॉनिक माध्यमे जसे की स्मार्ट फोन / टीव्ही, गॅझेट्स इ. यांचा विचार करून दुय्यम डेटा गोळा केला गेला.

सोयीनुसार आणि २४७ उपलब्धतेनुसार, मोठ्या प्रमाणात डेटा विश्वासार्ह वेबसाइट्स, ब्लॉग आणि ॲप्समधून गोळा केला गेला.

**४. अभ्यास क्षेत्र –**

या संशोधनात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना या विषयावर त्यांचे मत विचारण्यात आले.

गुगल फॉर्म ॲप्लिकेशनद्वारे तयार केलेली प्रश्नावली विद्यार्थ्यांकडून माहिती गोळा करण्यासाठी वापरली गेली. विद्यार्थ्यांच्या विविध व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये प्रश्नावली पोस्ट करण्यात आली होती..

पुनरावलोकन सत्रात संशोधकाच्या लक्षात आले की प्रतिसादकर्त्यांनी या विषयावर त्यांचे सकारात्मक तसेच नकारात्मक प्रतिसाद दिले.

**५. संशोधन कार्यपद्धती –**

या प्रकल्पासाठी, विश्लेषणासाठी आवश्यक डेटा संकलित करण्यासाठी प्रश्नावली आधारित सर्वेक्षण पद्धत तयार करण्यात आली. त्रेस्रश्रश फॉर्म सुविधेद्वारे एक प्रश्नावली तयार केली आणि संबंधित व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये पोस्ट करण्यात आली.

Google फॉर्मद्वारे विद्यार्थ्यांच्या १४५ क्रमांकांना प्रतिसाद देण्यात आला, त्यापैकी विश्वासार्ह डेटा असलेली १०० प्रश्नावली विश्लेषणाच्या उद्देशाने निवडण्यात आली, पुढे सारणी स्वरूपात रूपांतरित केली गेली आणि MS-Excel सॉफ्टवेअरद्वारे विश्लेषण केले गेले आणि अर्थ लावले.

**६. डेटा संग्रह** (Data collection) **:**

संशोधन आराखडा संशोधनातील समस्या सोडवण्यासाठी मोठ्या प्रमाणात मदत करते, ज्याचा हेतू कल्पनेवर आधारित नसून सत्य शोधणे हा आहे .डेटा संकलनाची पद्धत मुख्यत्वे चौकशीचे स्वरूप, उद्देश, व्याप्ती आणि उपलब्धता यावर अवलंबून असते.

डेटा संकलनाच्या दोन पद्धती आहेत

१. प्राथमिक डेटा संकलन

२. दुय्यम डेटा संकलन

**१) प्राथमिक डेटा संकलन:**

प्राथमिक डेटा म्हणजे संशोधकाने विशेषतः संशोधन असाइनमेंटसाठी गोळा केलेली माहिती. येथे निरीक्षण, सर्वेक्षण, प्रश्नावली पद्धती इत्यादी विविध स्रोतांकडून प्राथमिक डेटा गोळा केला जातो.

**२) दुय्यम डेटा संकलन:**

विषयाचे योग्य आकलन होण्यासाठी पुस्तके, जर्नल्स, नियतकालिके इत्यादी विविध स्रोतांद्वारे तपशीलवार अभ्यास करण्यात आला आणि त्यातून भरपूर डेटा देखील गोळा करण्यात आला. सोशल मीडिया आणि गुगल, याहू इत्यादी विविध सर्च इंजिन वापरले होते.

**७. संशोधन नमुना:**

गुगल फॉर्मच्या स्वरूपात प्रश्नावली, विविध व्हॉट्स ॲप ग्रुपमध्ये पोस्ट केली. १३२ विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला, त्यापैकी विश्वासार्ह डेटा असलेल्या १०० प्रश्नावली विश्लेषणासाठी निवडल्या गेल्या, आणि MS-Excel सॉफ्टवेअरद्वारे विश्लेषण करण्यात आले.

**८. डेटा विश्लेषण आणि व्याख्या** (Data analysis and interpretation)–

महाविद्यालयीन १०० प्रतिसादकर्त्यांच्या सर्वेक्षणाच्या विश्लेषणावर आधारित खालील तक्ते आणि आलेख, यादृच्छिकपणे निवडलेले आणि त्रैक्षश्रश फॉर्म वापरून तयार केलेल्या प्रश्नावलीद्वारे डेटा गोळा केला गेला. गुगल फॉर्मद्वारे केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे, विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला. प्रतिसादाच्या आधारे खालील विश्लेषण केले गेले आणि निष्कर्ष काढण्यात आला.

*TABLE 1 : उद्योजकता विकास ही आधुनिक स्पर्धात्मक जगाची मूलभूत गरज आहे हे तुम्ही मान्य करता का??

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | Yes | 92 | 92 | 92 |
| | No | 4 | 4 | 96 |
| | Maybe | 4 | 4 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

उद्योजकता विकास ही आधुनिक स्पर्धात्मक जगाची मूलभूत गरज आहे हे तुम्ही मान्य करता का? या प्रश्नासाठी ९२% उत्तरदात्यांनी होय पर्यायाला उत्तर दिले, ४% उत्तरदात्यांनी नाही पर्यायाने उत्तर दिले तर ४% उत्तरदात्यांनी कदाचित पर्यायासाठी उत्तर दिले. होय म्हणणार्यांचे प्रमाण खूप मोठे म्हणजे ९४% आहे.

आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ९२% प्रतिसादकर्ते मान्य करता की, उद्योजकता विकास ही आधुनिक स्पर्धात्मक जगाची मूलभूत गरज आहे.

*TABLE 2 : वाणिज्य आणि व्यवस्थापनावर आधारित शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाद्वारे उद्योजकता विकासाचे ज्ञान प्राप्त करण्यास मदत करते हे तुम्ही सहमत आहात का?

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | Yes | 72 | 72 | 72 |
| | No | 26 | 26 | 98 |
| | Maybe | 2 | 2 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

वाणिज्य आणि व्यवस्थापनावर आधारित शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाद्वारे उद्योजकता विकासाचे ज्ञान प्राप्त करण्यास मदत करते हे तुम्ही सहमत आहात का? या प्रश्नासाठी ७२% उत्तरदात्यांनी होय उत्तर दिले, २६% उत्तरदात्यांनी नाही तर २% उत्तरदाते कदाचित पर्याय निवडला.

होय म्हणणार्यांचे प्रमाण खूप मोठे आहे. आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ५३% प्रतिसादकर्ते मान्य करता की, वाणिज्य आणि व्यवस्थापनावर आधारित शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाद्वारे उद्योजकता विकासाचे ज्ञान प्राप्त करण्यास मदत करते.

*TABLE 3 : उद्योजकता विकासात इंटरनेट महत्त्वाची भूमिका बजावते हे तुम्ही मान्य करता?

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | Yes | 88 | 88 | 88 |
| | No | 9 | 9 | 97 |
| | Maybe | 3 | 3 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

उद्योजकता विकासात इंटरनेट महत्त्वाची भूमिका बजावते हे तुम्ही मान्य करता? या प्रश्नासाठी, ८८% उत्तरदात्यांनी होय, ९% उत्तरदात्यांनी नाही तर ३% प्रतिसादकर्त्यांनी कदाचित पर्यायासाठी उत्तर दिले.

आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ८८% प्रतिसादकर्ते मान्य करता की, उद्योजकता विकासात इंटरनेट महत्त्वाची भूमिका बजावते.

*TABLE 4 : उद्योजक हे धोका पत्करणारे लोक आहेत हे तुम्ही मान्य करता का??

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | Yes | 75 | 75 | 75 |
| | No | 25 | 25 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

उद्योजक हे धोका पत्करणारे लोक आहेत हे तुम्ही मान्य करता का? या प्रश्नासाठी, ७५% उत्तरदात्यांनी होय पर्यायाने उत्तर दिले, तर २५% प्रतिसादकर्त्यांनी नाही उत्तर दिले,

आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ७५% प्रतिसादकर्ते मान्य करता की, उद्योजक हे धोका पत्करणारे लोक आहेत.

*TABLE 5 : उद्योजक नेहमीच नवनिर्मिती करतात हे तुम्ही मान्य करता?

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | Yes | 82 | 82 | 82 |
| | No | 12 | 12 | 94 |
| | Maybe | 6 | 6 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

उद्योजक नेहमीच नवनिर्मिती करतात हे तुम्ही मान्य करता? या प्रश्नासाठी, ८२% उत्तरदात्यांनी होय पर्यायाचे उत्तर दिले, तर १२% उत्तरदात्यांनी नाही पर्यायाने उत्तर दिले तर ६% उत्तरदात्यांनी कदाचित पर्यायासाठी उत्तर दिले. होय म्हणणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण खूप मोठे आहे, म्हणजे ७८% इतर

दोन पर्यायांपेक्षा. आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ८२% प्रतिसादकर्ते मान्य करता की, उद्योजक नेहमीच नवनिर्मिती करतात.

*TABLE 6 : उद्योजक समाजात नवीन संधी आणि रोजगार निर्माण करतात हे तुम्ही मान्य करता का?

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | Yes | 74 | 74 | 74 |
| | No | 19 | 19 | 93 |
| | Maybe | 7 | 7 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

उद्योजक समाजात नवीन संधी आणि रोजगार निर्माण करतात हे तुम्ही मान्य करता का? या प्रश्नासाठी, ७४% उत्तरदात्यांनी होय पर्यायाला उत्तर दिले, तर १९% उत्तरदात्यांनी नाही पर्यायाने उत्तर दिले, तर ७% प्रतिसादकर्त्यांनी कदाचित पर्यायासाठी उत्तर दिले. होय म्हणणार्यांचे प्रमाण खूप मोठे आहे, म्हणजे इतर दोन पर्यायांपेक्षा ७४%.

आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ७४% प्रतिसादकर्ते मान्य करता की, उद्योजक समाजात नवीन संधी आणि रोजगार निर्माण करतात.

= TABLE 7 : तुमच्या मते, कोणते ऑनलाइन माध्यम, उद्योजक त्यांचे व्यवसाय विकसित करण्यासाठी सहाय्यक माध्यम म्हणून वापरतात?

| | | Valid % | Cumulative % |
|---|---|---|---|
| Valid | वेबसाइट | 66 | 66 |
| | ब्लॉग | 21 | 87 |
| | सोशल मीडिया | 13 | 100 |
| | Total | 100 | |

तुमच्या मते, कोणते ऑनलाइन माध्यम, उद्योजक त्यांचे व्यवसाय विकसित करण्यासाठी सहाय्यक माध्यम म्हणून वापरतात? या प्रश्नासाठी, ६६% लोकांनी वेबसाइट, २१% प्रतिसादकर्त्यांनी ब्लॉग, तर उर्वरित १३% लोकांनी सोशल मीडिया पर्यायाला मत दिले.

वरील आकडेवारी दर्शवते की सर्वाधिक टक्केवारी म्हणजे ६६% प्रतिसादकर्त्यांनी मान्य केले – वेबसाइट ऑनलाइन माध्यम, व्यवसाय विकसित करण्यासाठी सहाय्यक माध्यम आहे.

*TABLE 8 : उद्योजकता विकासामुळे देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात मदत होते हे तुम्ही मान्य करता का?

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | Yes | 55 | 55 | 55 |
| | No | 24 | 24 | 79 |
| | Maybe | 21 | 21 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

वरील प्रश्नासाठी, ५५% उत्तरदात्यांनी होय पर्यायाने उत्तर दिले, २४% उत्तरदात्यांनी नाही पर्यायाने उत्तर दिले तर २१% उत्तरदात्यांनी कदाचित पर्यायासाठी उत्तर दिले.

आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ५५% प्रतिसादकर्ते मान्य करता की, उद्योजकता विकासामुळे देशाच्या आर्थिक आणि सामाजिक

विकासात मदत होते.

*TABLE 9 : तुम्ही सहमत आहात का की, इंटरनेट उद्योजकांना जागतिक बाजारपेठेत त्यांचा व्यवसाय वाढवण्यास मदत करते?

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | Yes | 84 | 84 | 84 |
| | No | 9 | 9 | 93 |
| | Maybe | 7 | 7 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

वरील प्रश्नासाठी, ८४% उत्तरदात्यांनी होय, ९% उत्तरदात्यांनी नाही तर ७% उत्तरदात्यांनी कदाचित पर्यायाने उत्तर दिले.

आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ८४% प्रतिसादकर्ते मान्य करता की, इंटरनेट उद्योजकांना जागतिक बाजारपेठेत त्यांचा व्यवसाय वाढवण्यास मदत करते.

*TABLE 10 : उद्योजक हे तज्ञ असतात, नफा कमावण्यासाठी काम करतात हे तुम्हाला मान्य आहे का?

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | Yes | 78 | 78 | 78 |
| | No | 12 | 12 | 90 |
| | Maybe | 10 | 10 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

वरील प्रश्नासाठी, ७८% उत्तरदात्यांनी होय पर्यायाने उत्तर दिले, १२% उत्तरदात्यांनी नाही पर्यायाने उत्तर दिले तर १० उत्तरदात्यांनी कदाचित पर्यायासाठी उत्तर दिले.

होय म्हणणाऱ्या प्रतिसादकर्त्यांचे प्रमाण इतर दोन पर्यायांपेक्षा खूप जास्त आहे.

आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ७१% प्रतिसादकर्ते मान्य करता की, उद्योजक हे तज्ञ असतात, नफा कमावण्यासाठी काम करतात.

*TABLE 11 : ग्रामीण आणि अशिक्षित लोकांना उद्योजकता विकासाबद्दल पुरेसे ज्ञान आहे हे तुम्हाला मान्य आहे का?

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | Yes | 45 | 45 | 45 |
| | No | 25 | 25 | 80 |
| | Maybe | 20 | 20 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

वरील प्रश्नासाठी, ४५% उत्तरदात्यांनी होय पर्यायाने उत्तर दिले, २५% उत्तरदात्यांनी नाही पर्यायाने उत्तर दिले तर २०% प्रतिसादकर्त्यांनी कदाचित

पर्यायासाठी उत्तर दिले. येथे आम्हाला होय आणि कदाचित पर्याय (म्हणजे ४५ आणि २०) द्वारे संमिश्र प्रतिसाद मिळाला.

आकडेवारी दर्शवते की ६५% (४५% + २०%) प्रतिसादकर्ते मान्य करता की, ग्रामीण आणि अशिक्षित लोकांना उद्योजकता विकासाबद्दल पुरेसे ज्ञान आहे.

***TABLE 12 : उद्योजकांच्या विकासात सरकार महत्त्वाची भूमिका बजावते हे तुम्ही मान्य करता?**

| | | % | Valid % | Cumu.% |
|---|---|---|---|---|
| Valid | Agree | 68 | 68 | 68 |
| | Disagree | 32 | 32 | 100 |
| | Total | 100 | 100 | |

Source : Questionnaire Survey

वरील प्रश्नासाठी, ६८% उत्तरदात्यांनी सहमत पर्यायाला उत्तर दिले, तर केवळ ३२% प्रतिसादकर्त्यांनी असहमती पर्यायाने उत्तर दिले.
येथे आपण असे निरीक्षण करू शकतो की मोठ्या संख्येने म्हणजे ६८%
आकडेवारी दर्शवते की जास्त टक्केवारी म्हणजे ६८% प्रतिसादकर्ते मान्य करता की, उद्योजकांच्या विकासात सरकार महत्त्वाची भूमिका बजावते.

**९) गृहीतके –**

१) H0 : उद्योजकता विकास देशाच्या आर्थिक-सामाजिक विकासात क्रांती आणू शकत नाही
H1 : उद्योजकता विकास देशाच्या आर्थिक-सामाजिक विकासात क्रांती आणू शकतो
२) H0 : जागतिक, इंटरनेट आधारित स्पर्धात्मक बाजारपेठेत उभे राहण्यासाठी उद्योजकता विकास हा एक आवश्यक घटक नाही.
H1: जागतिक, इंटरनेट आधारित स्पर्धात्मक बाजारपेठेत उभे राहण्यासाठी उद्योजकता विकास हा एक आवश्यक घटक आहे.

१०) गृहीतके चाचणी

१) H0 : उद्योजकता विकास देशाच्या आर्थिक-सामाजिक विकासात क्रांती आणू शकत नाही
H1 : उद्योजकता विकास देशाच्या आर्थिक-सामाजिक विकासात क्रांती आणू शकतो

-तक्ता क्रमांक १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, ९२% प्रतिसादकर्त्यांनी मान्य केले की उद्योजकता विकास आधुनिक काळाची गरज आहे.
येथे, आम्ही शून्य गृहितक नाकारतो आणि असा निष्कर्ष काढतो की उद्योजकता विकास देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात क्रांतिकारक बदल घडवून आणू शकतो.

-तक्ता क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, ७२% प्रतिसादकर्त्यांनी मान्य केले की शिक्षण प्रणाली विविध अभ्यासक्रमांद्वारे उद्योजकता विकासात मदत करत आहे. येथे, आम्ही शून्य गृहितक नाकारतो आणि असा निष्कर्ष काढतो की उद्योजकता विकास देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात क्रांतिकारक बदल घडवून आणू शकतो.

-तक्ता ११ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, ९२% प्रतिसादकर्त्यांनी मान्य केले की ग्रामीण आणि अशिक्षित लोकांना उद्योजकता विकासाबद्दल पुरेसे ज्ञान आहे.
येथे, आम्ही शून्य गृहितक नाकारतो आणि असा निष्कर्ष काढतो की उद्योजकता विकास देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात क्रांती करू शकतो.

-तक्ता क्रमांक ६ नुसार, ७४% प्रतिसादकर्त्यांनी हे मान्य केले की उद्योजक समाजात नवीन संधी आणि रोजगार निर्माण करतात.
येथे, आम्ही शून्य गृहितक नाकारतो आणि असा निष्कर्ष काढतो की उद्योजकता विकास देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात क्रांती घडवू शकतो. ---------

२) H0 : जागतिक, इंटरनेट आधारित स्पर्धात्मक बाजारपेठेत उभे राहण्यासाठी उद्योजकता विकास हा एक आवश्यक घटक नाही.
H1: जागतिक, इंटरनेट आधारित स्पर्धात्मक बाजारपेठेत उभे राहण्यासाठी उद्योजकता विकास हा एक आवश्यक घटक आहे.

-तक्ता क्र. ९ नुसार ८४% प्रतिसादकर्ते सहमत आहेत की, इंटरनेट लोकांना इंटरनेट आधारित जागतिक बाजारपेठेत त्यांचा व्यवसाय वाढवण्यास मदत करत आहे.
येथे आम्ही विश्लेषणातून शून्य गृहीतक नाकारतो आणि असा निष्कर्ष काढतो की जागतिक, इंटरनेट आधारित स्पर्धात्मक बाजारपेठेत उभे राहण्यासाठी उद्योजकता विकास हा एक आवश्यक घटक आहे.

-तक्ता १२ नुसार, ६८% प्रतिसादकर्ते सहमत आहेत की सरकार उद्योजकता विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.
येथे आम्ही शून्य गृहितक नाकारतो आणि असा निष्कर्ष काढतो की जागतिक, इंटरनेट-आधारित स्पर्धात्मक बाजारपेठेत उभे राहण्यासाठी

उद्योजकता विकास हा एक आवश्यक घटक आहे.

११. **निष्कर्ष** (Conclusions) – विश्लेषणानुसार, सारण्या तयार केल्या आहेत आणि खालील निष्कर्ष काढले आहेत.

मोठ्या संख्येने प्रतिसादकर्ते मान्य करता की, उद्योजकता विकास ही आधुनिक स्पर्धात्मक जगाची मूलभूत गरज आहे

मोठ्या संख्येने प्रतिसादकर्ते मान्य करता की, वाणिज्य आणि व्यवस्थापनावर आधारित शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाद्वारे उद्योजकता विकासाचे ज्ञान प्राप्त करण्यास मदत करते.

जास्त टक्केवारी म्हणजे ८८% प्रतिसादकर्ते मान्य करता की, उद्योजकता विकासात इंटरनेट महत्त्वाची भूमिका बजावते

जास्त टक्केवारी म्हणजे ७५% प्रतिसादकर्ते मान्य करता की, उद्योजक हे धोका पत्करणारे लोक आहेत

मोठ्या संख्येने ८२% प्रतिसादकर्ते मान्य करता की, उद्योजक नेहमीच नवनिर्मिती करतात.

७४% प्रतिसादकर्ते मान्य करता की, उद्योजक समाजात नवीन संधी आणि रोजगार निर्माण करतात

मोठ्या संख्येने प्रतिसादकर्त्यांनी मान्य केले – वेबसाइट ऑनलाइन माध्यम, व्यवसाय विकसित करण्यासाठी सहाय्यक माध्यम आहे.

मोठ्या संख्येने प्रतिसादकर्ते मान्य करता की, उद्योजकता विकासामुळे देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात मदत होते.

मोठ्या संख्येने प्रतिसादकर्ते मान्य करता की, इंटरनेट उद्योजकांना जागतिक बाजारपेठेत त्यांचा व्यवसाय वाढवण्यास मदत करते.

मोठ्या संख्येने प्रतिसादकर्ते मान्य करता की, उद्योजक हे तज्ञ असतात, नफा कमावण्यासाठी काम करतात.

मोठ्या संख्येने प्रतिसादकर्ते मान्य करता की, ग्रामीण आणि अशिक्षित लोकांना उद्योजकता विकासाबद्दल पुरेसे ज्ञान आहे

मोठ्या संख्येने प्रतिसादकर्ते मान्य करता की, उद्योजकांच्या विकासात सरकार महत्त्वाची भूमिका बजावते

१२. **सूचना** (Recommendations) : निष्कर्षांच्या आधारे खालील शिफारसी सुचवल्या आहेत.

स्पर्धात्मक बाजारपेठेचे ज्ञान विविध संबंधित वेबसाइट्स आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून पोहोचवले पाहिजे.

शैक्षणिक अभ्यासक्रमात जागतिक व्यवसायाच्या गरजेनुसार आवश्यक आणि संबंधित विषय अपडेट केले जावेत.

उद्योजकांना जागतिक बाजारपेठेत त्यांचा व्यवसाय वाढवण्यासाठी सरकारने आर्थिक मदत दिली पाहिजे.

उद्योजकांना व्यवसायातील नवीनतम ट्रेंडचे ज्ञान देण्यासाठी सोशल मीडिया, वेबसाइट्स, टेलिव्हिजन शोच्या माध्यमातून विशेष प्रशिक्षण सत्रांचे आयोजन केले जावे.

उद्योजकांनी नवीनतम अद्यतने मिळविण्यासाठी आणि त्यानुसार निर्णय घेण्यासाठी इंटरनेट तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य केला पाहिजे.

उद्योजकांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी त्यांचे ज्ञान समृद्ध करण्यासाठी विशेष प्रशिक्षण सत्रांची व्यवस्था करावी.

उद्योजकांनी नफा मिळविण्यासाठी आणि जागतिक स्पर्धात्मक बाजारपेठेत उभे राहण्यासाठी सर्व संभाव्य तंत्रांचा वापर केला पाहिजे.

उद्योजकांनी विविध मोहिमांच्या माध्यमातून ग्रामीण भागात त्यांच्या व्यवसायाचे ज्ञान देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**References -**

1. Econlib, https://www.econlib.org
2. https://en.wikipedia.org/wiki/Entrepreneurship
3. https://study.com/academy/lesson/what-is-an-entrepreneur-definition-characteristics-examples.html
4. https://www.entrepreneur.com/article/244210
5. https://www.hive.org/world/the-history-of-entrepreneurship/
6. What is a literature review? https://www.rlf.org.uk : Resources